## मराठी बखर गद्य :
## ऐतिहासिक व वाङ्.मयीन स्वरूप

संयुक्त विद्यमाने
मराठी विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

नॉलेज पार्टनर,
शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ.

सुवर्ण महोत्सवी वर्ष
२०१४-१५ निमित्त

नॅक पुनर्मूल्यांकन 'बी'

स्थापना : १९६५

कासेगांव शिक्षण संस्थेचे,

# आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा.



लोकनेते राजारामबापू पाटील

ता.वाळवा, जि. सांगली. (महाराष्ट्र) ४१६ ६०१ फोन : (०२३४२) २४२०३२, २४२६३२
**Email :** san.accashta@gmail.com **Web site :** www.aaccashta.org

मराठी विभाग आयोजीत,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली पुरस्कृत,

## राष्ट्रीय चर्चासत्र

# मराठी बखर गद्य :
# ऐतिहासिक व वाङ्.मयीन स्वरूप

संपादक


*डॉ. श्रीमती एम. जी. तानवडे*
संयोजन सचिव,
प्रमुख ,मराठी विभाग

*प्रा. डी. जे. दमामे*
समन्वयक,
सहा.प्राध्यापक,मराठी विभाग


शुक्रवार व शनिवार दिनांक २३ व २४ जानेवारी २०१५

**PROCEEDING**

# सुवर्ण महोत्सवी वर्ष
## २०१४-१५

ज्ञान-विज्ञानं विमुक्तये

नॅक पुनर्मूल्यांकन 'बी'

कासेगांव शिक्षण संस्थेचे,

स्थापना : १९६५

# आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा.

ता.वाळवा, जि. सांगली. (महाराष्ट्र) ४१६ ३०१ फोन : (०२३४२) २४२०३२, २४२६३२

मराठी विभाग आयोजीत,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली पुरस्कृत,

**राष्ट्रीय चर्चासत्र**

# मराठी बखर गद्य : ऐतिहासिक व वाङ्मयीन स्वरूप

**प्राचार्य**

**डॉ. विलास काळे**

**संपादक**

**डॉ. श्रीमती एम. जी. तानवडे**
संयोजन सचिव,
प्रमुख ,मराठी विभाग

**प्रा. डी. जे. दमामे**
संयोजक,
सहा.प्राध्यापक,मराठी विभाग

**शुक्रवार व शनिवार दिनांक २३ व २४ जानेवारी २०१५**

# PROCEEDING

Marathi Bakhar Gadhya : Aitihasik va Wangmayeen Swarup

**''मराठी बखर गद्य : ऐतिहासिक व वाङ्मयीन स्वरूप''**


- **संपादक :**

**प्रा. डी. जे. दमामे**

**डॉ. श्रीमती एम. जी. तानवडे**



**ISBN** 978-93-5196-698-2

- **प्रकाशक** :

**प्राचार्य,**

आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा.

ता.वाळवा, जि. सांगली. (महाराष्ट्र) ४१६ ३०१

फोन : (०२३४२) २४२०३२, २४२६३२

- **मुखपृष्ठ संकल्पना :**

**जयकर दमामे**

- **अक्षर जुळणी / मांडणी :**

सिध्दी डिजीटल आर्टस्,

कचेरी रोड, इस्लामपूर

९४२३२७०७२८

- **बौद्धिक सहयोग**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ.


टीप : या प्रोसिडिंग (Proceeding) मध्ये प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

ISBN 978-93-5196-698-2


मार्गदर्शक

**मा. आ. जयंतरावजी पाटील**

माजी ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य

## कासेगांव शिक्षण संस्था नियामक मंडळ

मा.श्री. शामराव पाटील(काका)
अध्यक्ष

मा.श्री. बिडेश ढवळेकर
उपाध्यक्ष

मा.प्राचार्य, आर. डी. सावंत
सचिव

मा. श्री. व्ही. डी. माने
सदस्य

मा. श्री. बाबुराव पाटील (तात्या)
सदस्य

मा. सौं. शैंलजादेवी जयंतराव पाटील
सदस्या

मा. श्री. चाँद गणीसाहेब आत्तार
सदस्य

मा. श्री. तय्यबअली चौंगुले
सदस्य

## सल्लागार समिती

डॉ. अनिल गवळी
अधिष्ठाता, कला व ललित कला शाखा, शिवाजी वि. कोल्हापूर

प्राचार्य, डॉ. विलास काळे
आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा

श्रीमती डॉ. दीपा देशपांडे
माजी प्राचार्या,आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा

प्राचार्य, डॉ. राजेंद्र कुरळपकर
के.आर.पी. कन्या महाविद्यालय,इस्लामपूर

डॉ. कृष्णा किरवले
प्रमुख, मराठी विभाग, शिवाजी वि. कोल्हापूर

डॉ. विश्वनाथ शिंदे
प्राध्यापक, मराठी विभाग, शिवाजी वि. कोल्हापूर

डॉ. रवींद्र ठाकूर
प्राध्यापक, मराठी विभाग, शिवाजी वि.कोल्हापूर

डॉ. राजन गवस
प्राध्यापक, मराठी विभाग, शिवाजी वि.कोल्हापूर

डॉ. डी. ए. देसाई
अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ

डॉ. शिवकुमार सोनाळकर
सचिव, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ

डॉ. रणधीर शिंदे
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग, शिवाजी वि. कोल्हापूर

डॉ. नंदकुमार मोरे
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग, शिवाजी वि.कोल्हापूर

## संपादक मंडळ

### संपादक

डॉ. श्रीमती एम. जी. तानवडे

प्रा. डी. जे. दमामे

### सदस्य

डॉ. व्ही. डी. सुर्वे
प्रा. एम. बी. पाटील
प्रा. जी. बी. मासाळ
प्रा. डॉ. ए. बी. पाटील
प्रा. डॉ. एस. जी. पाटील
प्रा. डॉ. पी. ए. ओलेकर
प्रा. डॉ. आर. एन. नाईक

प्रा. डॉ. पी. व्ही. मोहिते
प्रा. डॉ. डी. के. मोरे
प्रा. डी. सी. फसाले
प्रा. एस. ए. जानराव
श्रीमती एस. जे. शिंदे
प्रा. श्रीमती टी. डी. पाटील(डांगे)
प्रा. एस. एम. मोहिते

ISBN 978-93-5196-698-2

महाराष्ट्र विधानसभा

विधान सभा
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

**जयंत राजाराम पाटील**
विधानसभा सदस्य
२८३,इस्लामपूर विधानसभा मतदार संघ.

जावक क्रमांक :

दिनांक : १७ जानेवारी,२०१५

## शुभसंदेश

आर्टस्‌ ॲण्ड कॉमर्स कॉलेज आष्टा यांच्या वतीने आयोजित केलेल्या ''मराठी बखर गद्य : ऐतिहासिक व वाङमयीन स्वरुप '' या विषयावरील चर्चासत्रास माझ्या मनःपुर्वक शुभेच्छा. महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवानिमीत्ताने जे नवनवे स्तुत्य उपक्रम आयोजिते केले जात आहेत त्या बद्दल प्रथम मी सर्वांचे अभिनंदन करतो.

मराठी भाषा बहुआयामी आहे. मराठी वाङमयाचे समृध्द दालन कुणालाही हेवा वाटावा असेच आहे. संत साहित्याने मराठी मनाला अध्यात्मिक बैठक दिली तर पंडीती साहित्याने श्रृंगारप्रचूर भक्तीचे दालन उघडले. तर शाहिरी वाङमयाने लावणीची नजाकत दिली तशी पोवाड्यातल्या वीरश्रीची अनुभूती दिली. या सर्व वाङमयात बखर वाङमयाने मनाचा शिरपेच खोवला आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासात शिवकाल व पेशवाईचा कालखंड महत्वाचा मानला जातो. मराठी वीरांनी आपल्या पराक्रमाने या काळाला तेजाची झळाळी दिली आहे. स्वराज्यापासून सुराज्य निर्मीती पर्यंतचा हा सुवर्णकाळ अक्षरबध्द करण्याचे काम बखरींनी केले आहे. रणांगणावर शौर्यगाथा लिहिणाऱ्या आणि आपल्या झुंझार कर्तृत्वाने अटकेपार झेंडे लावणाऱ्या नरवीरांची किर्ती बखरींनी अजरामर केली आहे. इतिहासाच्या पायावर उभारलेल्या या वाङमय शिल्पाकडे पाहण्याच्या एकसुरी दृष्टिमुळे अभ्यासकांच्या समीक्षक नजरेतून, वाङमय इतिहासकारांच्या चिकीत्सक दृष्टितून बखर वाङमय वंचित राहिले आहे. वास्तविक ऐतिहासिक व वाङमयीन असे दुहेरी पैलू असणाऱ्या बखर वाङमयाचा या पूर्वीच चौफेर अभ्यास व्हायला हवा होता.

काळाची हाक ऐकून अभ्यासकांत नव्या जाणिवा व नव्या संवेदना निर्माण व्हाव्यात या प्रांजळ हेतूने या चर्चासत्राचा विषय निवडल्याबद्दल मी संयोजकांचे पुनःश्च अभिनंदन करतो. या जुन्या विषयाकडे पहाण्याची नवी दृष्टी ठेऊन ज्या अभ्यासकांनी आपले अभ्यासपूर्ण शोधनिबंध पाठवले आहेत, त्यांचे मी अभिनंदन करतो. या चर्चासत्राच्या निमीत्ताने जे विचारमंथन झाले त्याला शाश्वत अक्षरत्व देऊन हा अमूल्य ठेवा जाणकार अभ्यासकांच्या हाती सुपूर्द करताना आम्हा सर्वांनाच आनंद होतो आहे.

बखर वाङमयावर झालेल्या या चर्चासत्राचा सविस्तर कार्यवृत्तांत या स्मरणिकेच्या रुपाने देऊन अभ्यासकांना एक अक्षरशिल्प प्राप्त करुन देण्याचे प्रशंसनीय काम संपादकांनी केले आहे.

एक दुर्लक्षित विषयाला उभारी देणाऱ्या चर्चासत्राचे आयोजन व यात झालेल्या विचारमंथनाचे स्मरणिकेच्या रुपाने अक्षरशिल्प उभारण्याच्या विधायक कामास मी मनापासून शुभेच्छा देतो.

**(जयंत पाटील)**

■ कार्यालय: राजारामनगर, पोस्ट: साखराळे, तालुकाः वाळवा, जिल्हाः सांगली पिन- ४१५ ४१४ ■ दूरध्वणी: (०२३४२) २२०८६१ ते ६५ फॅक्स ०२३४२-२२१००९

ISBN 978-93-5196-698-2

प्रा. (डॉ.) ना. ज. पवार
एम.एस्सी., पीएच्.डी.
कुलगुरू

Prof. (Dr.) N. J. Pawar
M.Sc.,Ph.D.
Vice-Chancellor

'A'
Re-accredited by NAAC (2014)
with CGPA 3.16
शिवाजी विद्यापीठ,
विद्यानगर, कोल्हापूर – ४१६ ००४.
SHIVAJI UNIVERSITY,
Vidyanagar, Kolhapur - 416 004.

दूरध्वनी : कार्यालय – (०२३१) २६९२१२२
निवास – (०२३१) २६९१०७५
फॅक्स : ००९१-२३१-२६९१५३३
Tel. : Office - (0231) 2692122
Resi. - (0231) 2691075
Fax : 0091-231-2691533
E-mail : vcoffice@unishivaji.ac.in
Web : www.unishivaji.ac.in

## संदेश

कासेगाव शिक्षण संस्थेचे, आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा जि. सांगली हे महाविद्यालय सुवर्णमहोत्सवी वर्षात मराठी विभागातर्फे दिनांक २३ व २४ जानेवारी २०१५ रोजी ' मराठी बखर गद्य : ऐतिहासिक व वाङमयीन स्वरुप ' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करीत आहे. व यानिमित्ताने मागविण्यात आलेल्या शोधनिबंधांचा ISBN प्राप्त संदर्भ ग्रंथ प्रकाशित करणार आहे हे वाचून आनंद झाला.

चर्चासत्रातील मुख्य विषयावर होणारे विचारमंथन सहभागी संशोधकांना मार्गदर्शक ठरेल असा मला विश्वास आहे. तसेच यामध्ये सहभागी होणारे शिक्षक, संशोधक दर्जेदार शोधनिबंध सादर करतील अशी मला आशा आहे.

राष्ट्रीय चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा.

19/1/2015

(ना.ज. पवार)
कुलगुरू

कोल्हापूर
दि. १९ जानेवारी, २०१५

ISBN 978-93-5196-698-2

प्राचार्य (डॉ.) अ. शं. भोईटे
एम.एस्सी., पीएच्.डी.
प्र-कुलगुरू
Prin. (Dr.) A. S. Bhoite
M.Sc.,Ph.D.
Pro-Vice-Chancellor

'A'
Re-accredited by NAAC (2014)
with CGPA 3.16
शिवाजी विद्यापीठ,
विद्यानगर, कोल्हापूर - ४१६ ००४.
SHIVAJI UNIVERSITY,
Vidyanagar, Kolhapur - 416 004.

दूरध्वनी : कार्यालय - (०२३१) २६०९०५४
फॅक्स : ००९१-२३१-२६९१५३३
Tel. : Office - (0231) 2609054
Fax : 0091-231-2691533
E-mail : pvcoffice@unishivaji.ac.in
Web : www.unishivaji.ac.in

## संदेश

कासेगाव शिक्षण संस्थेचे, आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा जि. सांगली हे महाविद्यालय सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करत असून मराठी विभागातर्फे दिनांक २३ व २४ जानेवारी २०१५ रोजी 'मराठी गद्य : ऐतिहासिक व वाङमयीन स्वरुप' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात येत आहे हे वाचून आनंद झाला.

चर्चासत्राच्या अनुषंगाने मागविण्यात आलेल्या शोधनिबंधांचा ISBN प्राप्त संदर्भ ग्रंथही प्रकाशित करण्यात येत आहे ही औचित्यपूर्ण बाब आहे.

चर्चासत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर शिक्षक तसेच संशोधक आपले शोधनिबंध सादर करतील असा मला विश्वास वाटतो. चर्चासत्राच्या अनुषंगाने होणारे विचारांचे आदान प्रदान सहभागी संशोधकांना निश्चितच प्रेरणादायी ठरेल असे मला वाटते.

राष्ट्रीय चर्चासत्रास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

(अ.शं. भोईटे)
प्र-कुलगुरू

कोल्हापूर
दि. १६ जानेवारी, २०१५

ISBN 978-93-5196-698-2

कासेगांव एज्युकेशन सोसायटी, कासेगांव

ता. वाळवा, जि. सांगली.

☎ : (०२३४२) २२१००५,२२०३२९,९९७०७००८२१



बी. पी. टी. ॲक्ट आर. नं. एस. एस. एफ. २४ सोसायटी ॲक्ट आर. नं. १४३६-१९४५-४६

जावक नं. दिनांक :

## संदेश

संस्थेच्या आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवानिमीत्त महाविद्यालयाने अनेक चांगले संकल्प केले आहेत. त्यापैकी विविध चर्चासत्रांचे आयोजन हा एक महत्वाचा संकल्प आहे. आपण आयोजित केलेल्या ' बखर गद्या ' वरील या चर्चासत्रास माझ्या हार्दिक शुभेच्छा !

मराठे शाहीतील शिवकाल व पेशवाईच्या सुवर्णयुगाचे आलेख बखरीमध्ये काढले गेले. देशासाठी बलीदान करणाऱ्या शुरवीरांच्या हौतात्म्याची गाथा ज्यात चित्रीत केली गेली त्या बखरी मात्र इतिहासाच्या एकेरी पारड्यात जोखल्या गेल्यामुळे कौतुकापासून आणि निःपक्षपाती समीक्षेपासून वंचित राहिल्या. आजवर बखर वाङमयाचा अभ्यास झाला तो इतिहासाचे संदर्भ साधन म्हणून बखरीला साहित्यमुल्यही असते, तिच्यात कल्पनाविस्ताराचे स्वातंत्र्य असते ही गोष्ट समीक्षकांनी मान्यच केली नाही. ना ऐतिहासिक प्रामाण्य, ना साहित्यिक मुल्य अशा सीमारेषेवर बखर रेंगाळत राहिली.

उशिरा हा होईना पण समिक्षकात एक नवी जाणिव निर्माण होवू पाहते आहे. परिणामी बखर वाङमयाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टीकोन अभ्यासकात रुजु पाहतो आहे. एक इतिहासकार म्हणून पाहण्यापेक्षा एक सहृदय, स्वामीनिष्ठ, कल्पक शब्दचित्रकार म्हणून बखरकाराची भुमिका लक्षात घेतल्याने तिचे साहित्यीक पैलू लक्षात येत आहेत. तिची भाषाशैली, वर्णनशैली, विनोदाचा ओघ, व्यक्तीचित्रण कौशल्य, शब्दलाघव, समाजजीवनाचा आविष्कार , आज्ञाधारकता, प्रसंग चित्रणे या अष्टपैलूंचा यत विचार केला जातो आहे. ऐतिहासिक निकषांचे बंधन डावलून बखरकारांचे साहित्यीक स्पंदन ऐकायला हवे. यासाठीच या चर्चासत्राचे आयोजन करुन चौकटबध्द अभ्यासकांची कोंडी फोडण्याचे एक नवे आवाहन केले आहे. आजवर उपेक्षित राहिलेल्या विषयाला वाचा फोडणे हा या मागचा उद्देश आहेच; शिवाय एवढी वर्ष कुचंबलेला हा प्रवाह मोकळा करुन त्याला उचित न्याय, दिशा देणे या सद्हेतूने या चर्चासत्रात विद्वान अभ्यासकांकडून शोधनिबंध मागवले आहेत.

या सक्षम सखोल विचारधारांना शाश्वत अक्षर प्रवाहात एकत्र आणून स्मरणिकेच्या रुपात प्रसिध्द करण्याचा हा प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहे. म्हणूनच या प्रशंसनीय उपक्रमास माझ्या हार्दिक शुभेच्छा !

प्राचार्य आर. डी. सावंत
सचिव,
कासेगांव एज्युकेशन सोसायटी

ISBN 978-93-5196-698-2

**Dr. Anil Pandurang Gavali**
M. A.; B. Ed.; NET-JRF, Ph. D.
Dean, Faculty of Arts & Fine Arts
Member of Senate
Member of Academic Council

B Accredited by NAAC
(2009)

**Address :** Office :
Yashwantrao Chavan College,
Halkarni, Tal. Chandgad,
Dist. Kolhapur-416 552.
Resi. : Samarth, 13/A, Radha-Krishna
Colony, Near Sane Guruji Vasahat,
Kolhapur - 416 012.
Phone : Off. (02320) 239076
Mobile : 8275267966
E-mail : dranilgavali@rediffmail.com

Ref. No.

Date :

## संदेश

आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा (ता. वाळवा, जि. सांगली) या महाविद्यालयाने सुवर्ण महोत्सवी वर्षात ' मराठी बखर गद्य : ऐतिहासिक व वाङमयीन स्वरुप ' या विषयावर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे. मराठी बखर गद्य हा विषय थोडासा अलक्षित असला तरी तो राष्ट्रीयदृष्ट्या खुप महत्वाचा आहे. इतिहास, संस्कती आणि भाषा या तीन घटकांशी बखर वाङमयाचे महत्वाचे नाते आहे. मध्ययुगीन काळात भारतात सत्तारत असणाऱ्या विविध जाती-जमातीचा राजकीय, सामाजिक, धार्मिक इतिहास म्हणजे बखर गद्य होय. त्या त्या बखरीतून त्या त्या सत्तेची व समाजाची सांस्कृतिकताही स्पष्ट होते. तसेच या काळात भारतात जवळ जवळ सर्वत्र उर्दु भाषेचे प्राबल्य वाढल्याचे दिसते. त्यामुळे उर्दु आणि इतर भाषा यांची सरमिसळ (Codemixing) कशी होते याचा अभ्यासही खुप महत्वाचा आहे. या चर्चासत्राच्या निमीत्ताने अशा गोष्टींना उजाळा मिळणार आहे. काही नवीन संशोधन यातून नक्कीच पुढे येईल. या राष्ट्रीय चर्चासत्रास माझ्या हार्दिक व मनःपुर्वक शुभेच्छा.

**डॉ. अनिल गवळी**
अधिष्ठाता
कला व ललितकला विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

ISBN 978-93-5196-698-2

कासेगांव शिक्षण संस्थेचे,

# आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा

ता. वाळवा, जि. सांगली. (महाराष्ट्र) ४१६ ३०१

मराठी विभाग आयोजित व
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली पुरस्कृत,

दोन दिवसीय

# राष्ट्रीय चर्चासत्र

# मराठी बखर गद्य : ऐतिहासिक व वाङ्मयीन स्वरूप

# कार्यक्रम पत्रिका

**शुक्रवार दि. २३ जानेवारी २०१५**

नांवनोंदणी व चहापान : सकाळी ९.३० ते १०.३०
उद्घाटन सत्र : सकाळी १०.३० ते १२.००

**उद्घाटक** : **प्राचार्य आर. डी. सावंत,** सचिव, कासेगांव शिक्षण संस्था.
**प्रमुख पाहुणे** : **डॉ. अनिल गवळी,** अधिष्ठाता,कला व ललित कला विद्याशाखा, शिवाजी वि. कोल्हापूर.
**बीजभाषक** : **डॉ. सतिश बडवे,** प्रमुख, मराठी विभाग,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा वि. औरंगाबाद.
**अध्यक्ष** : **डॉ. राजन गवस,** प्राध्यापक, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
**प्रमुख उपस्थिती** : **प्राचार्या डॉ. दीपा देशपांडे,** संचालिका, रा.बा.पा. सह. बँक लि., पेठ.
**डॉ. कृष्णा किरवले,** प्रमुख, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
**डॉ. डी. ए. देसाई ,** अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी संघ
**डॉ. एकनाथ आळवेकर डॉ. सुनिल चंदनशिवे डॉ. सुमन चव्हाण**
सदस्य, मराठी अभ्यास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**सत्र पहिले : दुपारी १२ ते २**

मराठी बखर गद्य वाङ्मयाचे स्वरूप

अध्यक्ष : डॉ. शिवाजीराव देशमुख, प्रमुख, मराठी विभाग, तुळजाभवानी महाविद्यालय,तुळजापूर
निबंध वाचक : डॉ. प्रमोद पडवळ, प्रमुख, मराठी विभाग, काशी हिंदू विश्वविद्यालय, वाराणसी.
डॉ. शिवाजी पाटील, बळवंत कॉलेज, विटा.
डॉ. केशव कुलकर्णी, श्री माधवराव पाटील महाविद्यालय, मुरूम, उस्मानाबाद.

**भोजनावकाश : दुपारी २ ते ३**

**सत्र दुसरे : दुपारी ३ ते ४.३०**

मराठी बखर गद्य : ऐतिहासिक व वाङ्मयीन दृष्टीकोन

अध्यक्ष : डॉ. सुलक्षणा कुलकर्णी, प्राचार्या, एम.बी.एस.के. कन्या महाविद्यालय कडेगांव.
निबंध वाचक : डॉ. प्रभाकर देसाई, मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
डॉ. उदय जाधव, शहाजीराजे महाविद्यालय, खटाव.
डॉ. प्रदीप मोहिते, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा.

**सत्र तिसरे : दुपारी ४.३० ते सायं. ६**

निबंध वाचन सत्र : मराठी बखर गद्य : प्रकार, विषय विवेचन, वास्तव व काल्पनिकता
अध्यक्ष : डॉ. बळवंत तुरंबेकर, डी. आर.माने महाविद्यालय, कागल.

**शनिवार दि. २४ जानेवारी २०१५**

चहापान व नाष्टा : सकाळी ९ ते १०

**सत्र चौथे : सकाळी १० ते १२**

निबंध वाचन सत्र : मराठी बखर गद्य : समकालीनता,
इतिहासाची सत्यासत्यता, संहिता व संपादन प्रक्रिया

अध्यक्ष : डॉ. रणधीर शिंदे, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**सत्र पाचवे : दुपारी १२ ते २**

मराठी बखर गद्य : काळ, समाज वास्तव व भाषा विशेष

अध्यक्ष : डॉ. रविंद्र ठाकूर, प्राध्यापक, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
निबंध वाचक : डॉ. संजय करंदीकर, प्राध्यापक, मराठी विभाग, म. सयाजीराव विद्यापीठ, बडोदा.
डॉ. नंदकुमार मोरे, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
डॉ. सुनिता उम्रस्कर, मराठी विभाग, गोवा विद्यापीठ, गोवा

**भोजनावकाश : दुपारी २ ते ३**

**संदर्भ ग्रंथ प्रकाशन समारंभ**

हस्ते : मा. आ. जयंतरावजी पाटील
माजी ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य

समारोप समारंभ दु. ३ ते ४.३०

प्रमुख पाहुणे : डॉ. विश्वनाथ शिंदे, प्राध्यापक, मराठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
अध्यक्ष : डॉ. विलास काळे, प्राचार्य, आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा.
प्रमुख उपस्थिती : डॉ. शिवकुमार सोनाळकर, सचिव, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ
डॉ. शिवाजी होडगे, सदस्य, मराठी अभ्यास मंडळ शिवाजी वि. कोल्हापूर
डॉ. संजय पाटील, सदस्य, मराठी अभ्यास मंडळ शिवाजी वि. कोल्हापूर
डॉ. प्रकाश कुंभार, सदस्य, मराठी अभ्यास मंडळ शिवाजी वि. कोल्हापूर

**स्थळ : सभागृह, आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा.**

ISBN 978-93-5196-698-2

# मनोगत.....

लोकनेते राजारामबापू पाटील हे महाराष्ट्रातील दैवततुल्य व्यक्तीमत्व. सच्चा राजकारणी म्हणून त्यांचा लौकीक होताच; पण समाजकारणी म्हणून त्यांची ख्याती झाली ती त्यांनी केलेल्या शैक्षणिक कार्यातून. ग्रामीण भागातील तळागाळातल्या लोकांपर्यंत शिक्षण पोहोचावे. म्हणून त्यांनी १९४५ साली कासेगाव शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज पर्यंत या शिक्षण संस्थेने ३१ प्राथमिक शाळा, ११ उच्च माध्यमिक विद्यालय, तीन व्यवस्थापन महाविद्यालय, एक अभियांत्रीकी, एक परिचारिका व एक औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय अशा प्रचंड वटवृक्षात रुपांतर केले आहे. समाजसेवेच हे असिधारा व्रत मा. बापूंचे सुपुत्र ना. जयंतराव पाटील यांन पुढे चालू ठेवले आहे.

आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज आष्टा ही या वटवृक्षाची शाखा. १९६५ साली स्थापन झालेल्या या महाविद्यालयाने आष्टा व पंचक्रोशीतल्या विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व आत्मबळ निर्माण केले आहे. या शिवाय काळाच्या गतीशी सम राखण्यासाठी वेगवेगळे करीअर ओरिएंटेड कोर्सही महाविद्यालयाने सुरु केले आहेत. समृध्द ग्रंथालय, भव्य क्रीडांगण, जिम्नॅशियम हॉल, इनडोअर हॉल, अद्यावत महिला वसतीगृह अशी असंख्य बलस्थाने घेवून आमचे विद्यालय काम करीत आहे.

या वर्षी महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमीत्त आम्ही विविध उपक्रमांचे आयोजन करीत आहोत. १९६८ मध्ये महाविद्यालयात मराठी विभाग स्थापन झाला. पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या अध्यापनातून अनेक सुसंस्कृत नागरिक तयार करण्याचे काम हा विभाग करतो आहे. सुवर्ण महोत्सवाचे औचित्य साधून आम्ही मराठी बखर गद्यावरील राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करीत आहोत. या निमीत्ताने बखर वाङमयावर चर्चा व्हावी व त्याच्या विविध पैलूंचा उहापोह व्हावा यासाठी विद्वान अभ्यासकांकडून शोधनिबंध मागवले होते. हे सर्व शोधनिबंध अभ्यासकांना पुढील काळातही संदर्भासाठी उपयुक्त ठरावेत यासाठी प्रस्तुत संदर्भग्रंथ ISBN सह प्रकाशित करतो आहोत.

मध्ययुगीन वाङमयात पद्यग्रंथाइतकेच गद्य साहित्यालाही तितकेच मुल्य आहे. बखर गद्य हे गद्य लेखनाचा उत्कृष्ट आविष्कार आहे. तथापि पद्य वाङमयाइतका अभ्यास व मुल्यमापन बखरगद्याचे झाले नाही. बखरीतील वैविध्य भाषाविष्कार, तिचे साहित्यीक विशेष यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करुन ऐतिहासिक दृष्टीकोनातून तिचा विचार केला गेला. इतिहासाच्या अभ्यासाचे संदर्भ साधन म्हणून तिच्याकडे पाहिले गेले; मात्र साहित्य व इतिहास या दोन्ही बाजूचा अभ्यास व्हावा, बखरींच्या विविध अंगांचा सखोल अभ्यास व्हावा, बखरींच्या सर्वांग परिपुर्णतेची साधक-बाधक चर्चा होवून अभ्यासकांना एक नवी दृष्टी मिळावी या हेतूने हा चर्चासत्रात अनेक शोधनिबंध सादर होवून त्यावर विस्तृत चर्चा व्हावी व प्रत्येक निबंध हरेक अभ्यासकाच्या नव्या अभ्यासदृष्टीचे प्रतिक व्हावे. बखर वाङमयाच्या या नव्या वाटा शाश्वत राहाव्यात, भावी काळातल्या अभ्यासकांना उपयुक्त ठराव्यात यासाठी हा संदर्भग्रंथाचा अक्षरठेवा तुमच्या हाती सोपवत आहोत. नजरचुकीने संपादनात काही त्रुटी राहिल्या असल्यास ' न्युन ते पुरते अधिक सरते ' मानून घ्यावे ही विनंती.

**प्राचार्य**

**डॉ. विलास काळे**

# संपादकीय.....

मराठी भाषेचे अध्ययन करताना तिच्यातील विविध संप्रदायांनी समृध्द केलेल्या वाङमयाने तिची वैभव संपन्नता लक्षात येते. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात स्वराज्याची स्थापना होऊन मराठीला राज्यभाषेचे स्वरुप प्राप्त झाले. या काळात मराठ्यांनी घडवलेल्या पराक्रमाचे पवाडे साहित्यात अवतरले. शिवकाल व पेशवेकालात राष्ट्रीय भावना, भाबडी पक्षनिष्ठा, स्वकियांबद्दलच्या अभिमानातून बखर वाङमयाचा जन्म झाला. मराठी गद्य सारस्वतात बखर वाङमयाने स्वतंत्र दालन उघडले. इतिहास व गद्य सारस्वताचा एक नमुना अशा दुहेरी अंगांनी बखरी महत्वपूर्ण ठरल्या. मराठी सारस्वतात मराठेशाहीच्या तेजस्वी पराक्रमाचे नंदादीप बखरींच्या रुपाने पाजळू लागले.

मराठ्यांच्या पराक्रमाचा इतिहास कथन करण्याच्या प्रेरणेतून इंग्रजी आमदानीत पौराणिक, मशनरी, चळवळी विषयक वर्णनाच्या हेतूने अनेक बखरी लिहिल्या गेल्या. कधी प्रत्यक्ष पाहिलेल्या, ऐकलेल्या घटनांवर आधारित, काही आठवणींच्या आधारावर, काही कागदपत्रांचे आधार घेवून तर कधी चरित्र, आत्मचरित्र, कैफियतीच्या रुपात, कधी पौराणिक वा सांप्रदायिक संदर्भावर अशा बहुपदरी, बहुपेडी बखरींनी मराठी वाङमयाचे दालन समृध्द झाले आहे.

आश्रितांच्या भुमिकेतून स्वामीनिष्ठा, पक्षनिष्ठेच्या कसोटीवर स्वामींची आज्ञा पालन करण्याच्या हेतूने व्यवहारिक कारणासाठी वृत्तांत व स्मरणशक्तीच्या आधारावर बखरींचे लेखन झाले. या बखरी लिहिणारे लेखक कुणी मोठे अभ्यासक, इतिहास संशोधक नव्हते. ते कारकुन होते. त्यामुळे बखरींच्या लेखनाला शास्त्रशुध्द व सैध्दांतिक रुप येवू शकले नाही. यामुळे बखरींना ऐतिहासिक प्रामाण्य जेमतेम असते. त्यात इतिहासापेक्षा ऐतिहासिक वृत्त कथन असते. त्यात सुसंगती असली तरी काहीवेळा सत्याचा अपलाप झाला आहे. त्यामुळे बखरींना इतिहास मानता येत नाही. त्यांना इतिहासाच्या अभ्यासाचे संदर्भसाधन मानले जाते.

आजपर्यंत बखरींचा एकांगी दृष्टीकोनातून विचार केला गेला. इतिहास व वाङमय यांच्या सीमारेषेवर असणाऱ्या बखर वाङमयाकडे मराठी समिक्षा व साहित्य अभ्यासकांनी काहीसे दुर्लक्ष केले. त्याकडे वाङमयीन हेतूने पाहिलेच नाही. बखरींचे साहित्यीक विशेष बुध्दीवंत समीक्षकांच्या नजरेतून सुटल्याने बखर गद्यावर अन्यायच झाला आहे. साहित्यातले हे दालन दुर्लक्षण्याचा करंटेपणा झाला आहे. वास्तविक बखरीला ऐतिहासिक प्रामाण्य कमी असले, त्यांचे लेखन इतिहासाला पोषक झाले आहे. त्यांचे लेखन स्वतंत्ररित्या झाले असून आशय, विषय, मांडणी व प्रभाव हे वाङमय विशेष त्यात पुरेपुर भरले आहे.

मानवी जीवनाचे सांगोपांग दर्शन, लोकजीवनाचे प्रतिबिंब, कल्पकता, भाषासौंदर्य, रमणीयता, रंजकता, मनुष्य स्वभाव दर्शन, कल्पना वास्तवता यांचा सुरेख मेळ अशा अनेक भाषा विषयांनी परिपूर्ण अशा बखर वाङमयाचा पुनःश्च नव्याने अभ्यास व्हावा. त्यांच्या बहुपेडी विशेषांची चर्चा व्हावी. बखरींच्या छुप्या गुणवैशिष्ठ्यांवर प्रकाश टाकावा अशा विविध उद्देशांनी आम्ही या चर्चासत्राचे आयोजन केले आहे. या चर्चासत्राच्या निमीत्ताने आम्ही महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील बहुतांशी विद्यापीठे व महाविद्यालयांशी पत्रव्यवहार केला.

बखरीचा ऐतिहासिक व वाङमयीन दृष्टीकोन, प्रकार, भाषाशैली, वास्तव आणि काल्पनिकता, समाजदर्शन, ऐतिहासिक सत्यता, संहिता व संपादन प्रक्रीया अशा विविध विषयांवर अभ्यासपूर्ण निबंध मागवण्यात आले. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. या शोधनिबंधाचे स्मरणिका रुपात संपादन करण्याचे कार्य सिध्दीस जाते आहे.

आमच्या विनम्र आवाहनाला निबंध लेखकांनी उत्तम प्रतिसाद दिला, तथापि स्मरणिकेच्या पृष्ठ मर्यादेमुळे सर्वच अभ्यासकांचे निबंध यात समाविष्ट करता आले नाहीत. या बद्दल आम्ही दिलगीर आहोत. महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित यु. जी. सी. पुरस्कृत या चर्चासत्राच्या व स्मरणिकेच्या परिपूर्तीसाठी आमचे प्रेरणास्थान असलेले मा. ना. जयंतरावजी पाटील यांचे प्रोत्साहन आम्हाला लाभले. संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचे कुशल मार्गदर्शन व कार्यतत्पर प्राचार्य डॉ. विलास काळे यांचे उत्तम सारथ्य याच्या बळावर या कार्यात आम्हाला सफलता मिळाली.

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक वर्ग, शिवाजी विद्यापीठाचा मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ या सर्वांचे मौलिक सहकार्य लाभले आहे. या सर्वांचे आभार मानण्याचा औपचारिकपणा करण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहण्यात आम्हाला धन्यता वाटेल.

आपले ऋणाईत

**संपादक**

**डॉ. माधुरी तानवडे**
संयोजन सचिव

**प्रा. डी. जे. दमामे**
संयोजक

ISBN 978-93-5196-698-2

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | बखर : स्वरूप, ऐतिहासिकता आणि समाजदर्शन - डॉ. संजयकुमार करंदीकर | १ |
| २ | पानिपत युध्दावर लिहलेल्या बखरी एक मागोवा - डॉ. केशव कुलकर्णी | ४ |
| ३ | बखर वाङ्मयातील. लालित्य आणि वाङ्मयीन. महत्ता - डॉ. शिवाजीराव देशमुख | १० |
| ४ | भाऊसाहेबांच्या बखरीतील जाबसाल : एक निरीक्षण - डॉ. प्रमोद भगवान पडवळ | १२ |
| ५ | मराठी बखर वाङ्मय : वेगवेगळी रूपे - डॉ. व्ही. जी. काळे | २३ |
| ६ | मराठी बखर गद्य : प्रेरणा व स्वरूप - प्रा. डी. जे. दमामे | २७ |
| ७ | इतिहासाशी समांतर वाङ्मयीन प्रवाह : बखर - प्रा.एकनाथ शामराव पाटील | ३० |
| ८ | सभासद बखर : एक शिवकालीन दस्तऐवज - प्रा. आर. डी. कांबळे | ३३ |
| ९ | बखर वाङ्मयातील राजदुर्गांचे (किल्ले) दर्शन ! - डॉ. दीपक चव्हाण | ३६ |
| १० | बखर वाड.मयाचे स्वरूप व वैशिष्ट्ये - प्रा. विठ्ठल नामदेव रोटे | ४० |
| ११ | मराठी बखर वाड्:मय विषय विवेचन - प्रवीण लोंढे | ४३ |
| १२ | मराठी बखर वाड्:मयाचे मूल्यांकन - डॉ.शांताराम गो. बुटे, | ४७ |
| १३ | रघुनाथ यादव विरचित पानिपत बखरीचा समीक्षणात्मक परामर्श - प्रा.डॉ.तारसिंग भोगा नाईक | ५० |
| १४. | मराठी बखर - ऐतिहासिक सत्यता - डॉ. माधुरी गोपाळ तानवडे | ५३ |
| १५ | मराठी बखर गद्यावरील परकीय भाषांचा प्रभाव - प्रा. अनंता मच्छिंद्र कस्तुरे | ५७ |
| १६ | बखर वाङमय : वास्तव आणि काल्पनिकता - प्रा. संगीता पैकेकरी | ६० |
| १७ | पानिपतची बखर व भाऊसाहेबांची बखर यांच्या वाड.मयीन स्वरूपाचा तुलनात्मक अभ्यास - प्रा. सुवर्णा पाटील | ६२ |
| १८ | पेशव्यांच्या बखरीतील समाजदर्शन - प्रा. डॉ. सौ. दीपा यशवंत कुलकर्णी | ६५ |
| १९ | मराठी बखरगद्य : वाङमयीन दृष्टीकोन - प्रा.प्रदीप मोहिते | ६८ |
| २० | इतिहासाचा आधार घेऊन निर्माण झालेले मराठी चित्रपट - शशिकांत चौधरी | ७१ |
| २१ | बखर : इतिहास व वाङ्मयाच्या कक्षेत न सामावणारी शौर्यगाथा - प्रा. युवराज देवाळे | ७४ |

| | | |
|---|---|---|
| २२ | बखर वाङ्मयातून दिसणारे तत्कालिन समाजाचे प्रतिबिंब - प्रा. एन. व्ही. शिंदे | ७७ |
| २३ | भाऊसाहेब बखरीमधील दत्ताजी शिंदे यांचे शौर्यवर्णन - प्रा. डॉ. प्रमोदकुमार ओलेकर | ८० |
| २४ | बखर वाङ्मय - लोकतत्व आणि गुणवैशिष्टये - प्रा. अमोल चांदेकर | ८२ |
| २५ | मराठी बखरींचा आद्य हुंकारःमाहिमची उर्फ महिकावतीची बखर - प्रा. राजाराम पाटील | ८३ |
| २६ | बखर : समाजदर्शन घडविणारी कथनिका - प्रा. एम. एस. माळगी | ८५ |
| २७ | मराठी बखर : एक वाङ्मयीन प्रकार - प्रा. अंबादास घुले | ८७ |
| २८ | मराठी बखरींची भाषाशैली - प्रा. अशोक गौरीशंकर माळगे | ९० |
| २९ | बखर साहित्याची गुणवैशिष्ट्ये - प्रा. मांतेश म. हिरेमठ | ९३ |
| ३० | बखर वाङ्:मयातील अद्भूतता,चमत्कृती - प्रा. कदम संभाजी धोंडीराम | ९५ |
| ३१ | बखर वाङ्मय - स्वरूप प्रकार व महत्व - प्रा.सौ. प्रेरणा एल.चव्हाण | ९९ |
| ३२ | मराठी बखर गद्य ऐतिहासिक व वाड्:मयीन पैलू - प्रा. बाळासाो आण्णा सुतार | १०१ |
| ३३ | प्राचीन मराठी गद्य बखर वाङ्मय, बखरीचे प्रकार : विषय विवेचन - प्रा. दिपक गडकर | १०३ |
| ३४ | बखरीतील पौराणिक उपमा-दृष्टांत - डॉ.सुरेश बा. शिंदे | १०७ |
| ३५ | बखरवाड.मय निर्मीतीमागची प्रेरणा, प्रयोजने व स्वरूप - डॉ. सुनिता उम्रस्कर | १११ |
| ३६ | 'होळकरांची कैफियत' मधील व्यक्तिवर्णने - डॉ. माधवी देसाई, | ११६ |
| ३७ | बखर गद्य: वाड:मयीन दृष्टीकोन - प्रा. रेखा काशिनाथ पसाले | १२२ |
| ३८ | बखरींचे प्रकार - विषय विवेचन - प्रा. डॉ. उदय जाधव | १२४ |
| ३९ | सभासद बखरीतील लोकतत्त्व - आप्पासो बुडके | १२७ |
| ४० | मराठी बखर : वाङ्मयीन दष्टिकोन - प्रा.डॉ.मल्हारी धोंडीबा मसलखांब | १३० |
| ४१ | मराठी बखरींतील शब्दविचार - डॉ. आनंद शामराव बल्लाळ | १३४ |
| ४२ | ऐतिहासीक दृष्टीकोणातून बखर वाड:मय -एक अभ्यास - डॉ. सिध्दार्थ आर. दवाणे | १३८ |
| ४३ | मराठी बखरगद्य : वाड्.मयीन दृष्टिकोन - प्रा.डॉ. प्रभाकर रामचंद्र पवार | १४२ |
| ४४ | होळकरांची थैलीः महत्त्व आणि विशेष - प्रा.नीलेश केदारी शेळके | १४६ |

ISBN 978-93-5196-698-2


| | | |
|---|---|---|
| ४५ | पेशवेकालीन बखर वाड.मय:वास्तवता आणि काल्पनिकता - डॉ. शिवाजीराव पाटील | १५० |
| ४६ | मराठी बखर शिवपूर्वकाल, शिवकाल व पेशवेकालीन समाजजीवन-प्रा.रमेश.एच्.पाटील | १५३ |
| ४७ | मराठी बखर गद्य : वाङ्मयीन दृष्टिकोन - प्रा.डॉ.गणेश मालटे | १५६ |
| ४८ | मराठी बखर गद्य : एतिहासिक व वाड्:मयीन स्वरूप - प्रा. डॉ.गायकवाड वाय. जे. | १५९ |
| ४९ | बखरगद्यातील तत्कालिन समाजजीवनाचे प्रतिबिंब - प्रा. सुखदेव नारायण एकल | १६४ |
| ५० | बखर वाङ्मयावर भाषावैज्ञानिक अंगाने दृष्टीक्षेप - प्रा. सोने वनश्री बाळासो | १६७ |
| ५१ | भाऊसाहेबांची बखर : शर्थिच्या पराक्रमाची अयशस्वी गाथा - डॉ.सविता व्हटकर | १७० |
| ५२ | 'बखर भाऊसाहेबांची' मधील तत्कालीन समाजाचे चित्रण:एक चिंतन - वृषाली कदम | १७४ |
| ५३ | ''शिवकालीन बखरींचा ऐतिहासिक दृष्टिकोण''- प्रा.डॉ.तानाजी ज्ञानदेव पाटील. | १७९ |
| ५४ | 'बखर : इतिहास लेखनाचे महत्त्वपूर्ण साधन' - डॉ. अशोक शिंदे | १८२ |
| ५५ | मद्रासमधील मराठी बखर वाङ्मय - डॉ. अरुण शिंदे | १८७ |
| ५६ | बखर वाङ्मयातून दिसणारे तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब - प्रा. लोहीता रेडेकर | १९२ |
| ५७ | 'बखर' अभिव्यक्तीतील वाड्.मयीन गुण - प्रा. जवाहर लक्ष्मण मोरे | १९६ |
| ५८ | मराठी बखर गद्य: वाङ्मयीन दृष्टिकोन - डॉ. शिल्पा नेवे | १९९ |
| ५९ | बखर वाड.मय संकल्पना स्वरूप व वैशिष्ट्ये - प्रा. सौ. निर्मला वसंतराव मोरे | २०२ |
| ६० | बखरींची भाषाशैली - प्रा. डॉ. मालती रवींद्र पाटील | २०५ |
| ६१ | मराठी बखरींचे ऐतिहासिक दृष्टीकोनातून पुनःवाचन - मुफिद महंमदइक्बाल मुजावर | २१० |
| ६२ | बखर गद्य : वाङ्मयीन स्वरूप - डॉ. केशव भीमाचार्य ताशी | २१५ |
| ६३ | बखर वाङ्मयाचे स्वरूप व भाषाशैली - प्रा. सुनिता गोरख रोकडे | २१८ |
| ६४ | छ. संभाजी महाराजांचे बखर वाड्:मयातील व्यक्तिदर्शन:एक ऐतिहासिक चिकित्सा - प्रा. शशिकांत मोहिते | २२३ |
| ६५ | सभासद बखरीतील लोकतत्त्वे - डॉ. प्रकाश दुकळे | २२७ |
| ६६ | बखर वाङ्मय : स्वरूप व संकल्पना - कु. तृप्ती सुरेश काटकर | २२९ |

ISBN 978-93-5196-698-2

# बखर : स्वरूप, ऐतिहासिकता आणि समाजदर्शन

**डॉ. संजयकुमार करंदीकर**
प्रपाठक, मराठी विभाग, महाराजा सयाजीराव युनिवर्सिटी ऑफ बरोडा वडोदरा (गुजरात)

प्राचीन मराठीतील साहित्यनिर्मिती परंपरा विचारात घेतली तर असे दिसून येते की वाङ्मय निर्मिती ही प्रामुख्याने काव्यात्म स्वरूपातच होत होती. कदाचित पाठांतराची सुलभता आणि त्या काळातील मुखोद्गत करण्याची परंपरा यामुळे काव्याचा मोठ्या प्रमाणात स्वीकार झाला असावा. असे असले तरी थोड्याफार प्रमाणात का होईना गद्य लिहीले जात होते. सतराव्या शतकाच्या शेवटी गद्य लेखनाच्या परंपरेला विशेष गती आलेली दिसते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात झालेली स्वराज्यस्थापना आणि त्यामुळे मराठीला प्राप्त झालेले राज्यभाषेचे स्थान. स्वाभाविकरित्या पराक्रमाचे पवाडे जसे कवितेतून गायले जात होते तसेच राजकीय पटलावरील विविध व्यक्तींची चरित्रेही गद्य वाङ्मयातून रेखाटली जात होती. या काळाचे गद्य लेखन प्रामुख्याने बखरवजा असून त्यावर स्वराज्याची छटा स्पष्ट दिसत होती. मराठी गद्यसारस्वताच्या इतिहासात बखर वाङ्मयाचे स्थान महत्त्वपूर्ण असे आहे. मात्र या बखरींचा अभ्यास ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून करण्याऐवजी गद्य सारस्वताचा एक नमुना म्हणून केला तर वाङ्मयीन सौंदर्याचे केवढे मोठे दालन आपणासमोर खुले आहे हे आपल्या लक्षात येते. कारण ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीने त्या पूर्णपणे विश्वसनीय आहेत असे मानणे कठीण आहे. म्हणूनच ‘एक अस्सल चिटोरे सर्व बखरींच्या बहुमताला हाणून पाडण्यास बस आहे;‘ असे वि.का.राजवाडे म्हणाले असावे. पण बखरींचे स्वरूप पाहता सत्यशोधन करणे ही त्यांची भूमिकाच नव्हती. त्यामुळे त्यांतील वाङ्मयीन स्वरूपच तेवढे महत्त्वाचे ठरते.

ऐतिहासिक घटनांचे कथन करण्याच्या प्रेरणेतून मराठी बखर वाङ्मयाची निर्मिती झाली असे दिसून येते. मराठ्यांच्या इतिहासातील निरनिराळ्या घटना–प्रसंगांवर जवळजवळ दोन अडीचशे बखरी लिहिल्या गेल्याचे राजवाडे सांगतात. अर्थात तत्कालीन राजकीय आणि सामाजिक जीवनाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने विपुल साहित्य उपलब्ध आहे असे दिसते. असे असूनही या गद्य वाङ्मयाचा तशा अंगाने अभ्यास झाल्याचे दिसून येत नाही.

बखरींचे स्वरूप–विशेष तपासून पाहताना आपल्या असे लक्षात येते की प्रामुख्याने बखरींचे लेखन गद्यातूनच झालेले आढळते. महिकावतीची बखर हाच काय तो अपवाद म्हणता येईल कारण या बखरीचे लेखन गद्यपद्यमिश्रित अशा स्वरूपात झाले आहे. इतर साहित्यप्रकारांच्या तुलनेत बखररचनेचे स्वरूप बरेचसे वेगळे आहे. ’बखरींचा प्रारंभ असतो पुराणपद्धतीचा आणि शेवट असतो फलश्रुतिमय, सृष्टीची उत्पत्ती, राजांच्या वंशावळी इत्यादी गोष्टी बखरीच्या प्रारंभी देऊन नंतर तो वृत्तकथन करतो.’ ’राजकीय स्वरूपाचे ऐतिहासिक लेखन म्हणजे ‘बखर‘ असे म्हणता येते. मराठ्यांच्या इतिहासातील निरनिराळ्या घटना–प्रसंगांवर अनेक बखरी उपलब्ध झालेल्या आहेत. रचनाकाळाच्या दृष्टीने ‘महिकावतीची बखर‘ ही सर्वात जुनी बखर मानली जाते. या बखरीचे स्वरूप गद्य–पद्यात्मक मिश्रित आहे. पण बहुतेक बखरींचे लेखन गद्यातून झालेले आहे. बहुतेक बखरकार हे

सरकारी दरबारी वावरणारे होते. कोणातरी पुरुषाच्या आज्ञेनुसार या बखरींचे लेखन होत असे.'

बखरकार हे प्रामुख्याने कोणातरी राजाचे किंवा धन्याचे आश्रित असल्यामुळे आपल्या मालकाचा गौरव करणे ही त्यांच्यातील वृत्ती स्वाभाविकच ठरते. 'बखरींचे लेखन पोष्यपोषक भावाने झाले आहे. बखरकार हे आश्रित असल्याने आपल्या धन्याचा गौरव आणि निवेदनाय पक्षपातीपणा बखरलेखनात येणे स्वाभाविकच होते. अशा पक्षपातीपणापोटी आणि गौरवार्थ केलेल्या लेखनापोटी आवेश, आवेग आणि अतिशयोक्तीही बखरीत आली. कुठे कौटुंबिक अभिमान, तर कुठे राष्ट्रीय अभिमानही तीत आला.' त्यामुळे ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने त्या गौण ठरत असल्या तरी इतिहासलेखनाला काही मार्गदर्शक सूत्रे पुरविण्याच्या दृष्टीने किंवा इतिहासाला पोषक करण्याच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व पूर्णपणे नाकारता येणार नाही; हेही तितकेच खरे आहे. ज्या कारणांमुळे बखरीला इतिहास म्हणून गौण स्थान प्राप्त होते त्याच कारणांमुळे तिच्यातील लालित्याचे गुण निदर्शनास येतात. म्हणूनच ललित वाङ्‌मयाला जवळचा आणि त्यापासून वेगळा असा एक साहित्यप्रकार म्हणून बखरींचा उल्लेख करावा लागतो.

साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध असतो. समाजाच्या आशा-आकांक्षा आणि ध्येय-धारणा या साहित्याच्या रूपाने प्रकट होतात. साहित्याचा त्या त्या काळातील समाजजीवनाशी प्रत्यक्षा-प्रत्यक्ष संबंध असतो. त्या संबंधाची योग्य ती चर्चा झाली तरच आपल्याला वाङ्‌मयीन दृष्टिकोनातून काही प्रश्नांची उत्तरे मिळतात. साहित्यातील अंत:प्रवाहांशी असलेला समाजजीवनाचा संबंध दृष्टीआड केला तर काही चुकीचे निष्कर्श हाती येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. बखर वाङ्‌मयाच्या मूल्यमापनाच्या संदर्भात आतापर्यंत असेच घडले आहे. श्री.रं.कुलकर्णींच्या मते, 'बखर हा एक वाङ्‌मय प्रकार आहे याची अभ्यासकांनी नोंद घेतली असली तरी बखरींचे समालोचन आणि त्यांचे मूल्यमापन प्रामुख्याने इतिहासाचे साधन या दृष्टीनेच झाले आहे. या साहित्याच्या निर्मितीत कारणीभूत झालेली प्रेरणा आणि ज्या काळात हे साहित्य विकास पावले त्या काळाचा मागोवा न घेता इतिहास-कथनाच्या बाबतीत बखरी कितपत साहाय्यक होऊ शकतात या विचारांनी प्रारंभीच्या संशोधकांनी बखर साहित्याचे समालोचन केले आहे. इतिहासाचे साधन या दृष्टीने बखर साहित्याचा विचारच होऊ नये असे मला सुचवायचे नाही. परंतु, इतिहाससंबंधीच्या आपल्या आजच्या कल्पना बखरकारांनी पूर्ण कराव्यात ही अपेक्षा बाळगणे कितपत सयुक्तित ठरेल याचा विचार अवश्य केला पाहिजे.' श्री.रं. कुलकर्णींच्या या विचाराच्या अनुषंगानेच बखर साहित्याचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे.

आपल्या विशिष्ट लेखन पद्धतीमुळे बखरींना एकप्रकारे स्वतंत्र वाङ्‌मयप्रकाराचे मूल्य प्राप्त झाले आहे. बखरकार हा नुसता लेखक नाही तर तो एक कथनकार आहे. प्रत्यक्ष घडलेल्या नि पाहिलेल्या किंवा ऐतिहासिक कागदपत्रांतून वाचलेल्या घटनांशी तो एकरूप होतो; त्यावर आपल्या कल्पनेचा साज चढवतो. पण हे वर्णन इतके सजीव असते की ती ती पात्रे किंवा घटना आपल्या समोर साक्षात उभी आहे किंवा ती घटना आपल्यासमोर घडते आहे असेच वाचकाला वाटत असते. बखरकार लेखनाच्या ओघातच तत्कालीन सामाजिक-राजकीय परिस्थिती आपल्या समोर मांडत असतो. महिकावतीच्या बखरीत केशवाचार्य सांगतो- केशवाचार्याच्या काळापर्यंत सारा कोकण प्रांत म्लेच्छांनी आक्रमिला होता, वर्णा-वर्ण पुसून गेले होते, अभिमान गळाला होता, क्षत्रिय आचारहीन

झाले होते, सर्वत्र भ्रष्टता माजली होती; आणि महाराष्ट्रधर्म बुडाला होता. या सामाजिक परिस्थितीचा विचार करून अठरापगड जातींना कर्तव्याची जाणीव करून देण्याच्या भूमिकेतून या बखरीचे लेखन झाले असे लेखक स्वत: म्हणतो. मल्हार रामराव चिटणीसकृत श्रीमंत छत्रपती धाकटे शाहू यांचे प्रकरण या बखरीतही बखरकार चरित्रनायकाच्या चरित्रापेक्षा तत्संबंधित अन्य घटनांचे तपशील देतो. उदा. महादजी शिंद्यांनी दिल्लीस पातशाहीची पुन: स्थापना करून पातशहापासून मिळालेल्या वस्त्रांची मुतलिकीची माहीती देतो. नाना फडणिसाने सवाई माधवरावर बसविलेली जरब  व परिणामत: बुद्धिभ्रंश होऊन सवाई माधवरावाने केलेली आत्महत्या इत्यादी हकीकत देतो. एकंदर पुणे आणि सातारा–कोल्हापूर येथील राजकारणामुळे शाहूच्या कर्तबगारीला कसा वाव कमी होता हे तो निदर्शनास आणून देतो. तसेच श्रीरामदासस्वामीचे चरित्राची बखर यात बखरकार रामदासाच्या समानधर्मीयांच्या–तत्कालीन संतांच्या हकीकती देतो शिवाय तत्कालीन महाराष्ट्राच्या धार्मिक–आध्यात्मिक जीवनाचे चित्रही रंगवतो. तसेच पेशवाईच्या अखेरची अखबार या बखरीत पेशवाईच्या अखेरच्या धडपडींची हकीकत देताना बखरकार कंपनी सरकारने पुण्याची नाकेबंदी केल्यावर हवालदिल झालेल्या प्रजेला दिलासा देण्याबाबत साहेबबहादुरास सल्ला देणारा व पुण्यातील चाल सांगणारा पुण्याचा नगरशेट हरेश्वरभाई या सारख्या कर्तृत्त्ववान माणसांचे चरित्र वर्णन करतो. तसेच पुण्यावर घडणाऱ्या राजकीय देवकीमुळे पेशवे सरकारांना व सरदारांना जसे जोन हात करीत परागंदा व्हावे लागले तसे पुण्याच्या नागरिकांना जिवाच्या व लूटमारीच्या भितीमुळे मुठीत जीव घेऊन राहावे लागले; असा तो मोठा विचित्र आणि बेभरवशी काळ होता. त्या काळाची आणि पुण्यातील व पुण्याबाहेरील परिस्थितीची विषण्णता मोजक्या शब्दांत टिपण्यात वेंकट बल्लाळ यशस्वी झाला आहे.

मराठी बखर साहित्य हे अफाट आहे या गद्य वाङ्मयात साहित्यिक मूल्यही आहेच. मात्र त्यांचा फारसा विचार झालेला नाही. प्राचीन मराठी गद्याचा अभ्यास या साधनांचे योग्य समालोचन केल्याशिवाय होणार नाही. याचा विचार होणे आता गरजेचे आहे.

[1] प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल.रा. नसिराबादकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर

[1] साहित्य विमर्श, विद्या व्यवहारे, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

[1] प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल.रा.नसिराबादकर, फडके प्रकाशन कोल्हापूर

[1] प्राचीन मराठी गद्य: प्रेरणा आणि परंपरा, श्री.रं.कुलकर्णी, सिंधू प्रकाशन, मुंबई

ISBN 978-93-5196-698-2

# पानिपत युध्दावर लिहलेल्या बखरी एक मागोवा

डॉ. केशव कुलकर्णी
(मराठी विभाग), श्री. माधवराव पाटील महाविद्यालय मुरूम (उस्मानाबाद)

मराठी गद्य वाङ् मय १७ व्या शतकापर्यंत अत्यल्पच होते यादवकाळात 'लिळाचरित्र,' गोविंदप्रभू चरित्र यांचा अपवाद वगळता मराठी वाड्.मयात गद्य वाड्.मयाचे स्थान अल्प स्वरूपात होते. १४ व्या शतकात 'महिकावती बखर' केशवाचार्य नामक कोण्या विद्वान ब्राम्हणाने लिहली ती गद्य व पद्य स्वरूपात असल्याने तिचे वर्गीकरण चंपू काव्यात करण्यात आले आहे. तरी सुध्दा मराठीतील पहिली बखर म्हणून महिकावतीची बखरीचा उल्लेख करावा लागेल.

पानिपतच्या युध्दावर प्रकाश टाकणाऱ्या बखरी भरपूर प्रमाणात असल्या तरी काही उल्लेखनीय बखरीचा उल्लेख महत्वाचा वाटतो. बखर लेखकांबद्दल काही वेळा गोंधळ होतो. बखरीचा नेमका लेखक कोण? असा ही संभ्रम निर्माण होतो. त्याकाळी मुद्रीत साधने नव्हती. मुद्रणकला नव्हती त्यामुळे हस्तलिखीत लेखन पुन्हा लिहताना आशय उतरून घेणारा लेखक स्वतःचे काही घुसडतो किंवा पक्षपात करतो तेव्हा पाठ भेद व मतमंतारे निर्माण होता संहिता संपादन करताना पाठभेद तपासावे लागतात. त्याचे वेगळे निकष असतात.

पाठभेद व पाठनिश्चिती याबद्दल श्री चक्रधराचे सहकारी व नंतर सांप्रदायाचे आचार्य बनलेल्या नागदेवाचे कार्य प्रशंसनीय आहे. १२९४ साली अल्लाउद्दीन खिलजीचे सैन्य महानुभावी लोकांच्या मागे लागले आणि महानुभाव लोक सैरावैरा पळत सुटले. यालाच खालसियाची धाड म्हणतात. सैरावैरा पळत असताना माहिमभट्ट संकलित लिळाचरित्र ग्रंथ हरवला. धाड संपली सर्व महानुभाव एकत्र जमू लागली. ग्रंथ हरवला आता काय? हा प्रश्न सर्वांना पडला त्यात हिराईसा नावाची एक प्रज्ञावंत स्त्री होती. तिला पुर्ण लिळाचरित्र पाठ होते. त्यात काही वेळा गफलत होत असताना नागदेवाचार्यांनी तो अभ्यासला व जेव्हा पाठभेद होत असत तेव्हा 'हे श्री मुखाचे बोल नव्हती' असा निर्वाळा देत यातूनही समाधान वाटले नाही. तरी तीच मते कायम ठेवून 'एकी वासना दुजी वासना' असे नोंदवीत त्यांनी ग्रंथ पुन्हा लिहला. हाच प्रकार ज्ञानेश्वराच्या भावार्थही दिपिकेबद्दल झाला. १६ व्या शतकात एकनाथांनी ज्ञानेश्वरी शुध्द केली पाठभेद तपासून ४०० ग्रंथातून नवी प्रमाण ज्ञानेश्वरी लिहली विसाव्या शतकात विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनी पुन्हा पाठशुध्दी करून ज्ञानेश्वरी लिहली. ही ज्ञानेश्वरी सरकारी प्रत म्हणून प्रमाण मानण्यात येते. असा घोळ प्राचीन वाङ्मयात नेहमीच घडत असतो. संघाच्या मुद्रीत काळातसुध्दा निर्मित्या होत आहेत. केशवसुताची 'देव दानवे नरे हे मत लोका कळवू द्या' यात कवळ द्या किंवा कळवू द्या हा भेद अनुत्तरीत राहतो. नारायण सुर्वे यांच्या 'भुसा भरलेले भोत' भोत किंवा भुत हा ही एक यक्ष प्रश्न वाटतो.

विवेचनाचे तात्पर्य एवढेच की, पाठभेदामुळे केवळ गोंधळ होतो व करतात हा एक प्रश्नच वाटतो तै कासवाची दिठी । होय अमृताची वृध्दी असे ज्ञानेश्वर लिहीतातॉ. तर नानामहाराज साखरे संपादीत प्रतीत '' तै कासवाचिचे दृष्टी'' असा पाठभेद येतो अर्थात मुळ शब्द बदलून दुसरा शब्द घालणे सवडीपेक्षा आवडीलाच प्राधान्य दिल्याचे जाणवते. बखर वाडःमया बाबत असाच संभ्रम राहतो.

आज्ञेनुसार बखरकाराने बखर लिहली. बखर लिहताना ' घडले ते स्वामीचे सेवेसी' व पौष्य शब्दाचा वापर केल्यामुळे लेखक व आश्रयदात्यांचे नाव कळते. भाऊसाहेबांची बखर 'भाऊसाहेबांची कैफियत' होळकराची कैफियत,

होळकराची थैली व रघुनाथ यादव विरचित ‘पाणिपतची बखर’ या प्रमुख बखरी आहेत. होळकरांच्या कैफियतीत भाऊ या व पानिपत युध्द अगदी संक्षिप्त स्वरूपात आहे. व होळकराची थैली सुध्दा याच स्वरूपाची आहे. पानिपत युध्दात या दोन्हीचे स्थान नगण्य आहे. भाग वरील चार ग्रंथात पानिपत युध्द व भाऊसाहेब पेशवे या केंद्रस्थानी ठेवून लिहल्याचे अभ्यासांती जाणवते. एकाच घटनेवर किंवा आशयावर वेगवेगळे लेखन जेंव्हा लेखक करतात तेव्हा त्या घटनेकडे पाहण्याचा प्रत्येक लेखकाचा दृष्टीकोन हा भिन्न असतो. अशावेळी त्यांची मांडणी, वाङ्.मयीन व राजकीय घडामोडी याचा तौलनिक अभ्यास रंजक वाटतो. पानिपत युध्दावर बखर लिहणारे बखरकार हे बहुतांशी समकालीन होते. व पानिपत युध्दानंतर लगेच या घटनेला अक्षरबंद करण्यात आले. त्यामुळे बखरीतील घटनांची विश्वासार्हता अधिक वाटते. दृष्टी वेगळे, दृष्टीकोन वेगळा, धनी वेगळे व लेखक ही वेगळे, पक्ष वेगळा त्यामुळे आपल्या धन्याचा गौरव दुसऱ्या बद्दल पक्षपाती भुमिका असा काहीसा प्रकार जाणवतो. भाऊसाहेबांच्या बखरीचा लेखक हा शिंदे यांच्या पक्षाचा असावा म्हणून होळकरावर टिका करतो. १४ जानेवारी १७६१ रोजी दुपारी चार वाजता मल्हारराव होळकरांनी रणांगण सोडून पळ काढल्याचे सांगतो. त्यामुळे पानिपत युध्दाच्या पराभवाचे खापर होळकरांच्या माथी येते. या उलट रघुनाथ यादव चित्रे उर्फ चित्रगुप्त यांनी लिहलेल्या ‘पानिपत बखर’ या ग्रंथात पराभवाची चाहूल लागल्याचे जाणवताच बायका, मुल, निशस्त्र लोकांना सुरक्षित स्थळी नेण्याचे काम भाऊ ने होळकरावर सोपवल्यामुळे मल्हारराजांनी रणांगण सोडले असे लिहतो. त्यामुळे या दोन घटना मधला संग्राम इतिहासकाराला दुर करता आला नाही. प्रस्तुत लेखकाच्या मते चित्रगुप्ताचे म्हणणे खरे असे वाटते कारण होळकर हे पहिल्या बाजीरावाचे १७२०-१७३९ विश्वासू सहकारी होते. ते असा पळण्याचा प्रकार करतील असे वाटत नाही. शेवटी ‘पिंडे पिंडे मती भिन्न’’ असाही प्रकार स्वाभाविक आहे. भाऊसाहेबांच्या कैफियतीवर पुराणाचा प्रभाव कमी आहे तर भाऊसाहेबांच्या बखरीवर अधिक जाणवतो पण चित्रगुप्ताची बखरीवर पुराणाचा भरपूर प्रभाव असल्याने ती पुराणोक्त वाटते पण काही घटना, प्रसंग व्यक्तीचित्रण यात रघुनाथ यादव उर्फ चित्रगुप्त सरस उतरतो त्यामुळे बखरीचे वाङःमयीन मुल्य अबाधीत राहते. विशेषतः युध्द वर्णणात कैफियती व्यतिरीक्त इतर बखरकारांनी कौरव पांडवांच्या युध्द वर्णनाचा आधार घेत युध्दवर्णने लिहली आहेत.

**भाऊसाहेबांची कैफियत :**

ही बखर व्यक्ती चित्रणात्मक स्वरूपाची असल्यामुळे भाऊसाहेब आणि पानिपत याचे अभेद्य स्वरूप यात आढळल्यामुळे अग्रकमाने मी बखरीला प्रथम स्थान द्यावे लागते. या कैफियतीत कोणाच्या आज्ञेचा व प्रेरणेचा उल्लेख आलेला नाही. लेखकाने सदाशिवराव भाऊ पेशवांच्या व्यक्तीमत्वाचा वेध अनेक घटना प्रसंगातून घेण्याचा प्रयत्न केला आहे. चरित्र ग्रंथ लिहताना हीच पध्दत योग्य वाटते. कारण चरित्र नायकाच्या जीवनातील घटना व क्रम त्या परिस्थितीत त्याने घेतलेले निर्णय त्याच्या व्यक्तीमत्वाचे अनेक पैलू स्पष्ट होतात.चरित्र नामकाचे व्यक्तीमत्व साहित्यात लिहताना काही तारतम्ये बाळगावी लागतात. छत्रपती शिवाजी महाराजाचे चरित्र लिहताना अनेक अवधाने बाळागावी लागतात. चरित्रनामकाच्या अंतरंगात शिरून त्यांच्या व्यक्तीमत्वाचे पैलू साकारणे व उत्तम व्यक्तीचित्र योग्य साकरणे याला प्रतिभेची विलक्षण झेप लागते. व्यक्ती विशेष साकारताना वातावरण व घटना यातून विकसीत होत गेला. व्यक्तीमत्वाचा प्रवास तारतम्याने घ्यावा लागतो. छत्रपती शिवाजी एका जहागीराचा मलगा ४०,००० वार्षिक उत्पन्न असलेली सुपे परगण्याची जहागीर. नंतर त्यांनी एक करोड होन उत्पन्नाचे राज्य निर्माण केले. रांझे पाटलाचे हात पाय तोडण्याची शिक्षा देणारा शिवाजी

केवळ १५ वर्षाचा मुलगा, पुरंदरचा तह करताना ३५ वर्षाचा राजा तर ४४ व्या वर्षी राज्यभिषेक करणारे छत्रपती. कर्नाटक मोहिमेवर जाताना शिवाजीचे वय ४७ वर्षे होते. वयोमानानुसार त्यांच्या व्यक्तीमत्वात होणारे बदल हे तारतम्याने घ्यावे लागतात. कोणलाही न घाबरणारे निडर व शौर्य बाळगून वागत असलेले राजे जेव्हा संभाजी दिलेरखानाच्या गोटात गेला तेव्हा घायाळ झालेले राजे हे व्यक्ती विशेष साकारताना काही अवधान ठेवण आवश्यक असते. त्यांची निर्णयक्षमता याचा मानसिक दृष्टीकोनातून सुक्ष्म अभ्यास करावा लागतो. अन्यथा व्यक्तीमत्व साकारणारा जन्मापासूनच छत्रपतीचे परिणाम लावले तर त्या व्यक्तीच्या कर्तृत्वाला न्याय मिळू शकणार नाही त्याला अलौकीकतेचा, अद्‌भुततेचा देवत्वाचा, विभूतीपुजनाचा स्पर्श होण्याची दाट शक्यता असते. यांचे भान चरित्र लेखकाने ठेवणे अगत्याचे वाटते.

वरील विवेचनाचा सारांश एवढाच की भाऊसाहेबांची कैफियत ही चरित्रात्मक स्वरूपाची आहे. पानिपत युध्दाचा प्रमुख सेनापती भाऊ असल्यामुळे त्यात एक ते दीड वर्षाच्या कर्तृत्वाचे हालचालीचे चित्रण असल्यामुळे पानिपत युध्दावर प्रखर प्रकाश टाकण्यात ही बखर समर्थ ठरली आहे. याचबरोबर बखरकार इतर पात्रावर प्रकाश टाकण्यास विसरत नाही. तत्कालीन राजकीय, धार्मिक व सामाजीक जीवनाचे चित्रण लेखकाने सविस्तर केल्यामुळे पेशवेकालीन समाज जीवनाचे सुक्ष्म कंगोरे यात हळूवारपणे उलगडलेले जाणवतात. राजनीती, युध्दनीती, राजकीय हालचाली, मराठयाचे राजनीती विषयक धोरण, लष्करी डावपेच व ऐतिहासिक पत्र व्यवहाराशी दिसणारे साम्य यामुळे कैफियत अधिक विश्‍वसनीय वाटते. माहिती संक्षिप्त स्वरूपात सांगीतल्यामुळे यात नेटकेपणा व नेमकेपणा आला आहे. तसेच विवेचनाच्या आघात इतर अनेक घटनांच्या आधारे भाऊच्या चरित्राचा वेध घेत पानिपत युध्दाकथा सांगण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे. वास्तव चित्रणामुळे हा लेखक समकालीन असावा किंवा युध्दप्रसंगी उपस्थित असावा हे पानापानातून जाणवते.

भाऊसाहेंबाची कैफियत काराने एक दीड वर्षाच्या काळात भाऊंचे व्यक्तीचित्रण व पानिपत युध्दविषयक विवेचन करताना ओघानेच राजकीय व सामाजीक जीवन दर्शन घडविले आहे. कारण व्यक्ती ही समाजाचा एक घटक असतो. ती ज्या काळात जगत असते तो काळ व्यक्तीशी निगडीत असतो. व म्हणून व्यक्तीबरोबर तत्कालीन समाजजीवन उलगडत जाते. तो काळच मुलूखगिरीचा होता. दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर शस्त्रपुजा करून मराठी सैन्य मुलूखगिरीस निघत असे, ते वर्षाकाळाच्या प्रारंभी परत येत असे. लोकांवर पुराणाचा प्रभाव होता. त्यामुळे श्रुती-स्मृती पुराणोक्त धर्माचेच आचरण केले जात असे, तरीसुध्दा धर्मबाहय वर्तन व फितुरी हे प्रकार सर्रास होत असता, आज याने परीसीमा गाठली आहे. अशावेळी त्या प्रकारास हे कृत्य करणाऱ्या कठोर दंड दिला जात असे. तसेच कपटकारस्थान करणाऱ्यांना शिक्षा दिली जात असे, हे भाऊसाहेब पेशवांवर हल्ला करणाऱ्या मुजफर खानाच्या प्रसंगावरून दिसून येते. युध्दात शत्रुचा पराभव झाला तर युध्दखर्च व जबरदस्त खंडणी अथवा त्या खंडणी रकमेएवढा मुलूख आपल्या राज्यातील सामील करून घेत असत. पण मराठे सहिष्णू वृत्तीचे असल्यामुळे त्यांना फारसे यश मिळाले नसावे, कारण त्याचे बोलके उदाहरण म्हणजे पेशव्यांची कोलमडलेली अर्थव्यवस्था. शिवप्रणीत अर्थनीतीचा अवलंब केला असता, मराठे आजही अजिंक्य राहिले असते. शरण आलेल्यांना जीवदान देणे हे पृथ्वीराज चौहान याला जेवढे भोवले तेवढेच मराठयांना भोवले. शिवाजीप्रणीत राजनितीचा न अवलंब केल्याचा हा दुष्परिणाम मानावा की काळपरत्वे त्याची निकड स्वार्थासाठी हे प्रकार अवलंबले? दत्ताजीचा वध करणारा कुतूबशहा जेव्हा कुंजपुऱ्यात सापडला तेव्हा भाऊसाहेबांनी त्यांना देवू केलेल्या प्रलोभनाचा किंचीतही विचार न करता शिरच्छेदाची आज्ञा दिली. त्यामुळे भाऊ तडफदार वाटतो. अतिरीक्त आत्मविश्‍वास हा एक मराठयांचा महान दोष मानावा

लागेल. धर्माच्या शुभाशुभाच्या विचाराचा पगडा तत्कालीन जनमाणसावर होता. त्यामुळे मुहूर्त पाहून कूच करणे, तीर्थक्षेत्रांना भेटी देणे, हे याचेच द्योतक आहे. मराठयात स्वाभिमान होता. क्षात्रतेज होते पण एकी नव्हती. या उलट नजीबखाने पुकारलेल्या जिहादामुळे परकीय व या देशातील मुसलमान एकत्र होवू शकले व आजही शकतात. या घटना राष्ट्रास मारक ठरतात. मराठयांसही मारक ठरल्या. या उलट मुहूर्तावर विश्वास न ठेवता इब्राहीमखान कुंजपुरा सर करताना दिसतो. श्रुती स्मृती पुराणोक्त धर्म व त्याचे आचरण आदर्श समाजव्यवस्थेसाठी पाळलेच पाहिजेत मात्र त्याचा अतिरेक नको, अंधश्रध्दा निर्मुलनावर व्याख्यान देण्यासाठी बाहेर पडलेले काही महाभाग आजही मांजर आडवे आले म्हणून परत फिरताना दिसतात. तेव्हा त्यांच्या बुध्दीची कीव येते. परंतु मराठे पराक्रमी होते. पण त्यांचा पराक्रम शत्रुचे उच्चाटन करण्याऐवजी आपआपसात कुरघोडी करण्यातच खर्ची पडला. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे पानिपत युध्द होय.

सामाजीक व राजकीय जीवन मार्मिकपणे रेखाटण्यात भाऊसाहेबांच्या बखरीचा लेखक कमालीचा यशस्वी ठरला आहे. त्याची दृष्टी सर्वव्यापक असून तो व्यासंगी व बहुश्रूत असल्याचे त्याची बखर अभ्यासताना जाणवते. घटना त्यामागची कारणे व त्याचे तपशीलवार तार्किक विवेचन कृष्णाजी शामराव करतो. तेव्हा त्याच्या उत्तुंग प्रतिभेचा अविष्कार जाणवतो. पराभवास 'गृहकलह' हेच कारण मानून त्या दिशेला अनुसरून बखरीची मांडणी केली आहे., त्याने केवळ घटनेची मांडामांड केली नाही तर तो त्यांची तार्किक मीमांसा मार्मिक शब्दात व अलंकारिक भाषेत करतो त्यामुळे ही बखर इतर बखर वाङःमयात महत्वाची वाटते. बखरकार स्पष्टवक्ता व प्रसंगी पराभवाची कारणे शोधताना मराठयांच्या मर्मस्थळावर बोट ठेवून अंगुलीनिर्देश करण्याइतका निर्भीड आहे. सामाजीक जीवनाचे चित्रण यथार्थपणे केल्यामुळे पेशवेकालीन सामाजीक जीवनाचे संदर्भ शोधणे शक्य झाले आहे. तत्कालीन चालीरीती, हेवेदावे, मनुष्य स्वभाव, इर्षा, व्देष, असुया जीवनविषयक तत्वज्ञान याचे प्रभावी चित्र त्यात अभ्यासवयास मिळते, स्वामीद्रोह करणे, पगडीभाईत्व स्विकारणे, जोहार करणे, रणातून पती पाठीवर घव घेवून परत आला तर त्याचे मुखावलोकन न करणे, सन्मुख घाव असेल तर त्याची आरती करणे इत्यादी राजपूत स्त्रियांचे चित्रण त्यात वास्तव स्वरूपात आले आहे. पाच गोळया व दारू पाठवून युध्दाचे आव्हान देणे, खंडणीसाठी वेढा घालणे, धर्मपुत्र होणे, मोगलाई मसलत करणे, सती जाणे (बळवंत मेहंदळयांची पत्नी सती गेली – नोव्हेंबर १७६०) या अशा कित्येक घटना प्रसंगातून पेशवे कालीन सामाजीक जीवनाचे कंगोरे लेखकाने बारकाईने टिपले आहेत. समाजातील सर्व वर्णाधिष्ठीत बंधने युध्दकाळात शिथिल होत असावीत असे जाणवते. रणात मृत्यू म्हणजे साक्षात मोक्षप्राप्ती असे मानले जात असे. शकुन, अपशकुन, फलज्योतिष यांचाही पगडा त्या काळी होता. एखादे अनुचित कर्म केले तर भुमिकंप होतो असे लेखकाने दिल्लीच्या तख्ताचे व कचेरीचे छत जेव्हा भाऊ काढतो त्या प्रसंगी रेखाटलेले आहे. राजा हा ईश्वराचा अंश ही धारणा त्या काळी होती. भाऊ व नाना यांनी कलियुगी ईश्वराचा अवतार घेवून कर्तृत्व दाखविले. हे धर्ममुलक विचारांचे द्योतक आहे.

याबाबतीत पानिपतच्या बखरीचा लेखक रघुनाथ यादव थोडासा वेगळा वाटतो किंवा इतरांपेक्षा त्यांचे वेगळेपण शोधण्याचा इथे प्रयत्न केला आहे. त्याने धर्म व समाजविषयक भाष्य करताना म्हणीचा सार्थ उपयोग केला आहे. जिहादच्या नावाखाली लाखो मुसलमान एकत्र येतात, तख्त या ताबूत ही नजीबखानाची भुमिका दिसते. सर्वसामान्य लोकांना तर 'दिल्लीश्वरो या जगदीश्वरा' एवढेच आदर्श असावेत. लेखकाच्या मते, अटक ही हिंदुस्थानची सरहद्द असावी, मानाप्रमाणे हत्ती, घोडे, पालख्या देवून पराक्रमी लोकांचा यथोचित गौरव करण्याची प्रथा होती. राजकीय घडामोडीबद्दल रघुनाथराव

हा अनभिज्ञ असावा असे त्याच्या बखरीवरून जाणवते.

**बखरीतील युध्दवर्णने :**

बखरीतील युध्दवर्णने कितपत योग्य याबद्दल निश्चित मत मांडणे कोणालाही शक्य नाही. क्षणचित्रे टिपण्यास आजच्यासारखी प्रसार माध्यमे नव्हती. एकतर लेखक युध्दात सहभागी असला पाहिजे. दुसरी ऐकीव माहिती व सर्वात महत्वाचा तिसरा प्रकार म्हणजे सहभागी झालेल्या व जीवंत राहिलेल्या योध्दयांच्या मुलाखती. स्वतः लढण्यात गुंतला असल्यास इतरांकडे लक्ष देणे कसे शक्य, यालाही महत्वाचा पुरावा म्हणजे राजाचे हेरखाते. यांच्याकडून विश्वसनीय माहिती ऐकून युध्दवर्णने लिहली असावीत. ठळक घटना व घडामोडींची नोंद, कल्पनाविलासाने त्यात रंग भरणे ऐतिहासिक दृष्टया याचे प्रामाण्य बेताचे असले तरी वाङःमयीन दृष्टीकोनातून याचे मोल असाधारण आहे, शिवाय ज्या हेतूने बखरी लिहल्या, त्यातून स्वकुळाचा पराक्रम समजावा व तसा पराक्रम गाजवून राष्ट्रप्रेम वृध्दीस लागावे यातून राष्ट्रय भावना जागृत व्हावी या हेतूने बखरी लिहल्या गेल्या. या संदर्भात यशवंतराव चव्हाण यांचे सहयाद्रीचे वारे या ग्रंथात मांडलेले मत चिंतनीय आहे. ते म्हणतात, 'लोकोत्तर व्यक्तीच्या स्मृतीला वंदन केल्यामुळे आपल्या थोर परंपरेचे भान येते. 'ऐतिहासिक पुरूषाच्या जीवनकार्याला वेध घेताना ही त्यांची भुमिका सार्थ वाटते. पेशवे काळात पुराणांचे प्राबल्य होते. एकनाथ, रामदास, मुक्तेश्वर, मोरोपंत, इतर पंडीत कवी व आख्यान कवी जे रामायण व महाभारतीय काळात मनाने जगत होते त्यांनी राम रावणाची, कौरव पांडवांची युध्दे चितारली. त्याचेच पडसाद बखरी उमटले असावेत, याबद्दल शंका नाही. ऐतिहासिक प्रामाण्यापेक्षा रंजकता हा वाङःमयीन गुण लक्षात घेवून काही बखरीत युध्दवर्णनाची तौलनिक नोंद घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.

कैफियतकाराने जे युध्दवर्णन केले आहे., त्यातून तो प्रत्यक्ष सहभागी असावा असे जाणवते. ७ डिसेंबर १७६० या दिवशी संपलेल्या युध्दाचे वर्णन करताना लेखक लिहतो, 'गिलच्याकडील साहेब लोक मातब्बर दोन चार पडले वगैरे बहुत ठार झाले. काही एक जखमीही झाले. ते दिवशी सुजाहित डवला नजीबखान राहिला पुढे आला होता. कस्त खाऊन माघार गेला किंवा २२ डिसेंबर १७६० रोजी झालेल्या बळवंतराव व इराणी यांच्या युध्दाचे वर्णन पहा बळवंतराव यांचे कुमकेस लोक जावून मिळाले, जुंज बळकट होवू लागले, दिवस थोडा राहिला, बळवंतराव यास छातीवर गोळी लागली, ठार झाला. घोडयाखाली पडला. तो तिकडील लोकांची दाटी करून घोडयाखाली उडया टाकून डोसके कापून न्यावयास आले. ते समयी हुजरातिच्या दहा पाच लोकांनी हिंमत बळकट धरून पुढे होवून मोठया जबरदस्तीने दहा पाच त्याजकडील असाम्या ठार करून पायाशी धरून ओढून आणला. शेवटच्या युध्दाचे वर्णन करताना लेखक लिहतो भाऊसाहेब व जनकोजी शिंदे शे पन्नास लोक व रायांचे मुरद्याचा हाती इतकी बाकी राहिली. त्यात भोवती वेढा पडला. तेव्हा युध्द बहुत केले. पुर्वी भारती युध्दात अतिरथी महारथी जुंज जाहाले त्याप्रमाणे भाऊसाहेबांनी ही लढाईची शर्थ केली.

अशा युध्दवर्णनात लेखकाचे सुक्ष्म निरीक्षण तर आढळतेच, याहीपेक्षा संक्षिप्त शब्दात जास्त आशय सांगण्याची त्याची विलक्षण प्रभावी शैली जाणवते. यात अतिशयोक्तीचा मुळीच अभिनिवेश दिसत नाही, त्यामुळे हे युध्दवर्णन अत्यंत दृष्टांताचा संदर्भ सोडला तर यात लेखकाचा प्रांजळपणा दिसून येतो.

भाऊसाहेबांच्या बखरीचा लेखक वाङःमयीन व ऐतिहासिक दृष्टीकोनातून अधिक प्रभावी वाटतो. ही बखर युध्दानंतर लगेचच म्हणजे १७६३ मध्ये लिहली असे श. ना. जोशी यांचे मत आहे. शेजवलकरांच्या मते भाऊसाहेबांची

ISBN 978-93-5196-698-2

बखर म्हणजे कैफियतीची वाढवून लिहलेली आवृत्ती आहे. बुध्दीबळाचा सांकतिक पट वापरून यांनी हा युध्दपट मांडला, मोहरा इरेस पडणे, प्याद्यांचा फर्जी होणे, इत्यादी बुध्दीबळातील चाली इथे पाहावयास मिळतात. घटनांचे वर्णन इतके प्रभावी, की डोळयापुढे याचे चित्र उभे राहते. युध्दसामग्री, सैन्यरचना, डावपेच यांच्या वर्णनावर लेखकाचा भर आहे. कुंभेरीच्या वेढयाचे वर्णन करताना तो लिहतो,' तो दुर्ग असाध्य सलाबत, मोर्चेलावून सुरूंग लावावे तरी रान रेतीचे सुरूंगास यत्न नाही. तोफा नीच धरल्या तरी गोळा रेतीत जातो. चढत्या धरल्या तरी गोळा कुंभेरीपार होवून याजकडीलच दुसरे मोर्चातील लोक मनुष्य जाया होत. निझाम व मराठे युध्दाचे वर्णन करताना सर्वप्रथम युध्दजन्य हालचाली, डावपेच याचे वर्णन करतो. इब्राहीमखान गारद्याच्या तोफांच्या माऱ्याने भाजणारे निझामाचे सैन्य व त्यांची होणारी ससेहोलपट याचे वर्णन लेखकाने मार्मिक शब्दात केले आहे. तो म्हणतो,'भडभुंजे लाहया भाजतात तैसी गत जहाली, धुराचे गर्दीत कोणी कोणास दिसेनासे जाहाले, दत्ताजी शिंदे केवळ डुक्कर खळीस येतो तैसे इरेस पडून मारामारी केली' मेहंदळे व इराणी यांच्या नोव्हेंबर १७६० मध्ये पानिपत येथे झालेल्या युध्दाचे वर्ण करताना लेखकाचे वर्णनाचा कळसच गाठला आहे. धाकटी यंत्रे व हस्तनाला व सुरतनाला व जेजाला बंदुका व रेखले यास गणतीच नाही. मोठी गर्दी होवून गेली. धुराचे गर्दीने सुर्यबिंब अगदी आच्छादून गेले. कोणाची खबर कोणास नाहीशी झाली. त्यात शुर होते त्यास वीरश्रीया आल्या. भ्याड होते त्यास दे माय धरणी ठाव असे जाहाले. घोडे मनुष्य धुंद जाली. रणतुरे व रणभेदी व आराबियाची वाद्ये एकदाच कल्लोळ झाला.

पानिपतच्या बखरीच्या युध्दवर्णनाला पुराणाचा साज असल्यामुळे लेखकाला हे कलयुगातले महाभारतीय युध्द वाटते. युध्दवर्णनावर पुराणाचा प्रभाव असल्यामुळे त्याची वर्णने पुराणाधिष्ठीत झाली आहेत : महराटे याजकडील तोफेची एक सरबत्ती जाहाली. तेव्हा फौजेत धुर फार होवून एकास एक दिसेनासा झाला. धुराने सुर्यकिर्णेआच्छादिली. धरणी कंपायमान जाहाली किंवा रक्तबंबाळ चालीला, रक्तोभेदक कलेवर वीराचा विच्छिन्न शरीर भयानेक वीरश्रीत बलोभराद्भुत गेले. क्षण ठायीठायी लागली. परम भयानक शेब्दे घे-घे-घे हे गर्जना उचंबळली.

या अशा वर्णनामुळे हे वर्णन काल्पिनक वाटणे स्वाभाविक आहे, पण रंजनात्मक दृष्टीकोनातून वाङःमयीन मुल्य अभ्यासू जाता हे वर्णन वीर व करूण रसाचा परिपोष करणारे, प्रभावी वाटते.

**संदर्भ –** र. वि. हेरवाडकर, मराठी बखर, विनस प्रकाशन पुणे १९७५
श्री. रं. कुलकर्णी, प्राचीन मराठी गद्य, प्रेरणा आणि परंपरा, सिंधु प्रकाशन, मुंबई १९७०
पानिपथची बखर, रघुनाथ यादव चित्रे, सं.र.मु.जोशी, म.सा.प.आंध्रप्रदेश प्रकाशन, १९५५
श.ना.जोशी, संपादक, भाऊसाहेबांची बखर
कृष्णाजी अनंत सभासद, 'सभासदांची बखर', सं.भिमराव कुलकर्णी, १९८७
नाना फडवीसांचे आत्मचरित्र, सं.द.वि.आपटे, महाराष्ट्र इतिहास मंजिरी, पुणे शके १८४५
भाऊ साहेबांची कैफियत, सं. भिमराव कुलकर्णी, अनमोल प्रकाशन, पुणे-२, १९८२

ISBN 978-93-5196-698-2

# बखर वाड्मयातील. लालित्य आणि वाड्मयीन. महत्ता

डॉ. शिवाजीराव देशमुख
मराठी विभाग, तुळजाभवानी महाविद्यालय , तुळजापूर

**प्रास्ताविक :**

प्राचीन मराठी वाड्.मयाच्या पद्यात्मक रचना निर्मितीत गद्यात्मक बखर वाड्.मयाचे महत्व फार मोठे आहे. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात स्वराज्याची स्थापना होऊन मराठीला जेव्हा राजभाषेचे स्थान निर्माण झाले, तेव्हा तरवार बहाद्दरांच्या पराक्रमाचे वर्णन लेखणी बहाद्दारांनी करण्यास प्रारंभ केला याच काळात बखर वाड्.मयाचा जन्म झाला. या बखरी त्या त्या काळातील राजकीय इतिहासाचा दस्तऐवज म्हणून खूप महत्वाच्या ठरल्या आहेत. महाराष्ट्रीय समाजाच्या व्यवहारिक जीवनाचे प्रतिबिंब पहण्याचे एक महत्वाचे साधन म्हणून बखरमयाचावाड्.पुढील काळात वेगवेगळया अंगानी अभ्यास झालेला आहे.

त्या –त्या काळातील जीवनाचे सामाजिक, सांस्कृतिक राजकीय, धार्मिक आणि व्यवहारिक जीवन त्या त्या काळात निर्माण झालेल्या बखरीतून अभिव्यक्त होताना दिसते. या बखर वाड्मयाने महाराष्ट्रीय इतिहासाचा मोठा ठेवा जोपासला आहे. अर्थात या बखरीतून आलेल्या चित्रणाविषयी अभ्यासकात एकवाक्यता असलेली दिसून येत नाही. बखरवाड्.मय जसे आशयाने वैविध्यपूर्ण आहे तसेच ते रचना निर्मिती घटकांच्या बाजूनेही मूल्यात्मकता धारण करणारे आहे. साहिति मूल्यात्मकतेला घेऊन इतिहासकालीन जीवनाचे नेमके चित्रण रेखाटणारा हा वाड्मय प्रकार त्यातील लालित्य आणि वाड्.मयीन महत्ताच्या अनुशंगाने अभ्यासावा हा हेतू ठेवून मी माझे प्रस्तुत विषया संदर्भाचे विवेचन मांडित आहे. त्या काळाला आणि जीवनानुभवांना साकार करणाऱ्या अनेकविध बखरी मराठी वाचक मनावर त्यातील लालित्यपूर्ण चित्रणामुळे अधिराज्य गाजविताना दिसतात.

राष्ट्रीय पुनरुज्जीवनाच्या काळात इतिहासाचा चिकित्सापूर्वक बोध घेताना बखरीचा काटेकोर अभ्यास झाल्याचे पहावयास मिळते. या अभ्यासातूनच अनेकांनी बखर वाड्.मयाचे वेगवेगळया अंगांनी अवलोकन केले आहे बखर निर्मिती संदर्भात काव्येइतिहासकारांनी मांडलेले मत बखरीचे नेमके प्रयोजन सिध्द करणारे आहेममराठीते राज्याचालिहितात, उत्कर्ष झाल्यावर निरनिराळया प्रतापी सरदारांच्या हकिकती लिहिण्याचा प्रसंग आला. तेव्हा लहान टिपणे लोक करावयास लागले व तदनंतर त्याआधारे मोठमोठ्या बखरी रचिल्या गेल्या असा बखरी लिहिण्याचा प्रघात पडला मराठी राज्याची उभारणी करणाऱ्या सरदारांच्या प्रतापाची हकिकत सांगण्याच्या हेतूने बखर निर्माण झाल्याची पहावयास मिळते. असे काव्य इतिहासकारांनी सांगीतले असले तरी वास्तवात मात्र बखर निर्मितीचे अनेकविध हेतू असल्याचे पहावयास मिळते.

छत्रपती शिवाजी महाराज इ.स.१६७६ मध्ये भागानगरचे कुतुबशहाकडे रवाना झालेरायगडावरुन. प्रथम सातारा पुणे भागात आले. सातारा जिल्हयातील निमस्तेड मायेनी या गावी नेजोरीचे कान्हा कोळी व सुर्याजी घडवती महाराजाना भेटले. त्यानी चिंचवडकर देवाविरध्द तक्रार केली. जेजुरीला गुरवांचा तंटा सुरु होता. त्या चिंचवडच्या देवानी हस्तक्षेप केला देघांचे हात तोडून कोडाण्यावर त्याना देवानीठेवलेभलत्याच. ठिकाणी हस्तक्षेप केला हे पाहून महाराज संतापले. त्यानी देवाना सरळच लिहिले की, तुमची बिरदे आम्हास द्या व आमची बिरदी तुम्ही घ्या.

कोंडाण्याच्या गडकऱ्यासही महाराजांनी फटकारले मक्ती चाकर आमचा की देवांचा कैद्याची सुटका करुन देण्याचे

ISBN 978-93-5196-698-2

आश्वासन देऊन महाराज पुढे सरक लेछत्रपतीच्या. धार्मिक धोरणात कुणाची ढवळाढवळ ते खपवुन घेत नसत. चिंचवडच्या गोसावी याना लिहिलेले वरील पत्र म्हणजे इतिहासातील ललित बाबींचा विचार करण्यासाठी महत्वाचे ठरेल. यात शंका नाही. महाराजांच्या धार्मिक धोरणाचे एक ठळक वैशिष्टय म्हणजे धर्मक्षेत्रात पूज्य मानलेल्या सत्पुरुषानीही मर्यादा सोडू राजकारणात लुडबुड केलेली त्याना सहन होत नसे.

तसेच महाराज कुठल्याही एक पंथाच्या आहारी गेले नाहीत त्याकाळी हिंदू धर्मात अनेक पंथ होते. तरीही त्यानी सर्व पंथाना व सर्व धर्माना समान वागणुक दिली.

शिखर शिगंगापुर क्षेत्राचे इतिहास भौगोलिक महत्व कथन करणारे इतिहासाचे राजवाडे यांचा हा अभिप्राय, ममशिवाजीने एक मोठी डौलदार छत्री शिखर शिंगापुरास उभारली. शिखर शिंगणापुरावर भोसल्यांची फार भक्ती असे आणि भक्ती करण्यासारखेच ते स्थान आहे. तेथुन पुर्वेस नगरपासुन सोलापूर पर्यंतचा सर्व बालाघाट दिसतो दक्षिण मिरजेपर्यंतचा टापु नेत्रकक्षेत येतो. पश्चिमेस पन्हाळयापासून रायरी सिंहगडपर्यंतचा डोंगराळ प्रदेश कनीकेवर प्रतिबिंबीत होतो आणि उत्तरेस फलटण, बारामती, पाटस, खडे व जुन्नर या तालुक्याची मरुमल पृथ्वीवर अंथरलेली दृष्टीपथास भरते.असे हे महाराष्ट्राचे मध्यवर्ती ठिकाण राष्ट्राच्या पितराचे शेवटचे विश्रांती स्थान होण्यास सर्वथैव लायक आहे.

मुल्ला नुस्रती हा द्वितीय आले आदिलशहा शके (१५७८-१५९४) याच्या दरबारातील राजकवी होतात्याने. गुलशने इश्क शके १५८० मध्ये अल्लीनामा इ.स. १६६६ मध्ये आणि तारीखे इस्कंदरी हा तिसरा ग्रंथ शके १५८७ मध्ये लिहिला. नुस्रतचे राजकरणाचे निरीक्षण उत्तम आहे त्याचे. कथन इतिहासाला धरुन सत्य असलेले इतर पुराव्याने दिसून येते.

मराठा सैन्याच्या पराक्रमाबाबत नुस्रती म्हणतोममदिसेना. वो जल्दी के वक्त अपने आप बिरादार है सावा के चोरां के बाप मराठा वीर घोडयावर स्वार झालेनंतर त्याची दौड किती वेगाने होत असे सांगत असताना मराठी वीर सज्जनांचे मित्र आणि चोरांचे कर्दन काळ असतात असे कवि म्हणतो तो याच काव्यात, पुढे मरके म्हणातो दौदमे आ को बारे स बात मुदासा ले उस का उड हात हा मराठयांच्या शौर्याचे असले बहारदार वर्णन मराठयांच्या मराठी, संस्कृत वा अन्य भाषेत कोण त्याही लेखकाच्या तोंडून आपण ऐकले आहे काय?

मराठा दौड करीत असताना वाऱ्याशी गोष्टी करतो त्या वेळी त्याचे मुंडासे हात हात वर उडत असते. देवीसिंग चौहान या लेखकाबद्दल अभिप्राय देतातमममुल्ला. नुस्रती याने आपल्या काव्यात वस्तुतः इतिहास ग्रंथात
निःपक्ष पातीपणाचे धोरण अवलंबिलेले आहे.

राजाराम महाराजांचा काळ जाहलाते समयी अंबीकाबाईसाहेब विशालगडी होत्या त्यानी.हवालदाराना महाराजांचा काल सिंहगडी झाला. सती जाण्याचे पहावे असे हवालदार यास सांगि तेव्हा दिवस थोडा राहिला मलकापुराहून साहित्य येणे त्यास रात्र होईलफ्रअशी. शंका उपस्थित करुन हवालदार गलबलीचे दिवस, किल्ल्याचे कामाची सबब सांगु लागला तेव्हा राणीसाहेब यानीममस्वार पाठवुन जलदीने आणावे मी गेल्यावाचुन सूर्य अस्तास जाणार नाही तुम्ही खोट मानु नका असे सांगितले राणीसाहेबानी सदरची सावली पडली तेथे मातीचा ढीग करुन त्यावर पळसाचे पान रोविले यावर हवालदाराने मलकापुरकडे साहित्यासाठी स्वार दवडला त्यामागे स्वाराची डाक ठेविली पळसाचे पानावरुन सावली २) गेली नाही. प्रकाश आहे तसा होता. मलकापुरहून साहित्य येऊन महाराजांचे पागोटे बरोबर बाईनी सहगमन केले. स्नानविधी सर्वत्र करीत तोपर्यंत प्रकाश दिसतच होता. सर्वत्र सदरेस आल्यानंतर चार तास रात्र जाहली. अंधकार दिसु लागला. हेही

पाहून सर्वत्रास आश्चर्य वाटले सतीच्या प्रताप असे सर्वत्र म्हणो लागले. या प्रसंगाचे वर्णन मल्हार रामराव चिटणीस यानी साहित्य अंगाने कसे रोमांचकारी केले आहे त्याचा प्रत्यय येतो

पानिपतचे युध्दा इ.स.१७६१ चे १४ जानेवारीस पानिपतावर झाले भरत खंडात घनघोर अशा ज्या लढाया झाल्या त्यात या लढाईच्या उल्लेख आवर्जुन येतो. या लढाईची वर्णने कथा, कांदबऱ्या, नाटके यातुन गेली दोन आडीच शतकापास अव्याहतपणे वाचकापुढे येत आहे. इंग्रजी, मराठी, फारसी या भाषातुन या लढाईचे तपशील मराठभ वाचकापुढे त्या वेळच्य धुरीण लेखकानी दिले आहेत मपानिपतची. बखरफ मकाशीराजाची बखरफ मभाऊसाहेबाची बखरफ अशा बखरीतुन या युध्दानंतर प्रत्यक्ष दर्शनी मंडळीनी त्याचे वर्णने तपशील दिलेले आहेत.

भाऊसाहेबाची बखरफही यातील एक वाड्.मयाचा उत्तम नमुना म्हणावा अशी बखर आहे. पानिपतची बखर ही रघुनाथ यादवानी पानिपत युध्दानंतर दोन वर्षानी १८ फेब्रु. १७६३ लिहिली मात्र होती भाऊ साहेबाची बखर म्हणजे मराठी बखर वाड्.मयाचा मेरुमणी, विलक्षण परिणामकारी अशा जुन्या मराठी गद्याचा सहज सुंदर अविष्कार एक श्रेष्ठ अशी ललितकृती व तितकीच महत्वाची अशी ऐतिहासिक कृति म्हणून बखर मराठीत अजोड ठरली आहे.

भाऊसाहेबाच्या बखरीत सामील झालेला ऐतिहासिक भाग साधारण इ.स.१७५४ पासुन राघोबा पेशव्याचे उत्तरेकडील मोहिमेने होतो. राघोबा पेशव्याचे सांगातील जयाप्पा शिंदे आणि मल्हरराव होळकर हे नामांकित सरदार सैन्य हा कुंभेरीच्या वेढयात सुरजमल जाटाशी लढताना मल्हारराव होळकर यांचा एकुलता एक पुत्र खंडेराव मोचीत निशाणापाशी आला. किल्ल्यातुन एक जेजालाची गोळी आली व त्यातच खंडेरावाचा मृत्यु झाला.

हा प्रसंग बखरकार पुढील शब्दात आपले पुढे ममांडतोएकदिवशी राजश्री मल्हारराव होळकर याचा पुत्र खंडेराव होळकर केवळ बेहोष होता. त्याची आयुष मर्यादा सरली म्हणोत मोर्चितयात निशाणपासी आला. त्यास मुंगीस पंख फुटत तैसा प्रकार जाहला. भोजन करुन मोर्चियात निशाणापासी येताच एकाएकीच किल्यातून जेजालाची गोली, प्रलयी वीज पडती तसी येऊन खंडेराव यास अकस्मात लागोन मोचीत ठार जाहला. सुभ्रवर्ण चसु होऊन गतप्राण जाहाला. या वर्णनात बखरकाराने घडलेल्या प्रसंगाचे केलेले वर्णन नेटकेपणाने वाचकापुढे उभे केल हे स्पष्ट होत

मारवाड प्रांती रामसिंग बीनेसिंग या भावातील प्रदेश वाटणीचा तंटा लागला असता रामसिंग याचा चेतराम वकील होता. रामसिंगाने आपण बीजेसिंगाचे वर्तनाने निर्माल्यवत झालो तेव्हा प्राण त्याग किंवा देशत्याग करावा हे उत्तम असे चेतराम वकीलास विचारले असता चेतराम वकीलाचे हे उत्तरममप्राणपहा त्याग स्त्री जातीने करावा आणि देशत्यागब्राम्हण संन्यासी यानी करावा. तुम्ही संस्थानी राजपुत्र त्यात हटेले हाडे रजपुत हिंमत मर्दा मदत खुदा मारता मारता मरावे परंतु केवळ अजिद होऊ नये.

या तंटयात जयाप्पा शिंदे यानी बीजेसिंगाचे वास्तव्य असलेले नागुरास वेढा घातला त्यास कुठुनही मदत मिळेना केवळ घाबरा होऊन त्याने मोगलाई मसलत केली.

जयाप्पा शिंदे त्याचे तळावर स्नानास जाते वेळी दगा करण्यासाठी बीजेसिंगाकडून तीघे मारेकरी पाठविले जयाप्पा शिंदे यास स्नानानंतर मुखावर धोतर घेऊन डोळे चोळीत राहण्याची त्यांची सवय होती.

त्यानंतर घडलेली हकीगत बखरकार अशी सांगतो तो जैसा राजा नलाचे द्वारी कली वृषभरुप धरुन तिष्ठत होता तैसा मारेकरी जपुनच होते त्यानी संधी सापडताच जयाप्पा शिंदे याच्या कुशीत सुप्याचा मारा केला. कास कारेगार झाले या खबरा

ISBN 978-93-5196-698-2

बीजेसिंगस समजल्या . सर्व सरदारास मराठयांचे तळावर चालुन जाण्यासाठी तो मममम्हणतोयारहो ! आता आहेत काय मुरगी मारेबचे दानादान तैशी गत होईलबीजेसिंग. मारवाडयात केलेल्या कृतीचे वर्णन किती मोजक्या पण लालित्यपूर्ण भाषेत बखरकाराने केले आहे हे सांगणे नको.

जयाप्पा शिंदे दगाबाजीने ठार झालेनंतर नागोरचा वेढा शिंद्याना उठवावा लागला. दिर्घकाळचा वेढा पडला असलेने शिंद्याचे सैन्यास खर्चासाठी हिसेब द्यावयाचा राहिला होता. शिद्याच्या जामदार खान्यातही खडखडाट होता. त्यामुळे दत्ताजी जनकोजी बेचैन होते. दृष्ट दृष्टीस पडत नव्हते. अशावेळी बुंदीचा राजा मृत्यु पावलेमुळे चुलते दायाद व राजाचे मु यामध्ये राज्याभिषेकाची चिंता राजस्त्रोस लागली होती तिने उज्जनीस मुलास तक्ती बसवून टिळा लावावा अशी शिंद्याकडे विनंती करुन त्यासाठी पाऊण कोड रुपये देण्याची तयारी दाखविली.

बखरकार याचे सार्थ वर्णन करतोममपदरी पैसा नाही मोठे संकट पडले. दिवसा आन गोड लागेना रात्रौ निद्रा येईना केवळ ईश्वराव तारच नवकल करुन होते. तो त्यांची क्रिया शाबुद अजरका दाता राम भाग्य भाग्य कालपरत्वे येते जाते. परंतु निश्चयात मात्र चालु नये. त्यात ईश्वर सहाय्य होतो जैसी किया धरावी तैस फल पावावे.

सन १७३७ मध्ये इराणचाममबादशहा नादीरशहा याने दिल्लीवर स्वारी करुन मोगलांचा पाडाव केला. बखरकार या प्रसंगाचे वर्णन करतो नादरशहा बेलाशक फौजचे पाठीवर आला. तो किलीज खान आधीच जपुन सिधच होता. मनसुर अली दाजपासी भाग्न भारी म्हणोत भडयुजे अभिधान होते तेही भाग किलीच खान याजपासी राहिली होती. किलीज खान याने दिलीपत बादशहाची फौज तोंडापुढे येताच एकदाच सरबती केली. त्याजवर जसे भडींजे लाहया भाजतात तैशी गत केली. ममनादिरशहाची फौज चढे घोडयानिशी दिलीस पोचली तो शहरपन्हा खालीच होता. चढे घोडयानिशी शहर घेतले तो शहरास कधी उपद्रव ऐसा ठाऊक नव्हता केवळ द्वारकेप्रमाणे दिल्ली नांदत होती. ऐसा शहरचा चिंधी धोरण केला.

पुढे मलकाज मानी चे मसलती वरुन नजीबखान रोहिले त्याने ज्या काही विपरीत गोष्टी केल्या त्या स्वतःचे भावास कंदाहारच्या अब्दालीकडे पाठवुन दिल्लीवर चाल करुन येण्यास सल्ला दिला मात्र त्याने गाजुद्दीनखान वजीर यास आपल्या या गुप्त खलबताची काहीच माहिती लागु दिली नाही. आपण त्याचा कसलाही संबंध नाही हे तो दाखवुन हिंदुस्थानातील राजेराजवाडे यांचेशी गुप्तपणे सर्व हालचाली वजीराच्या परस्पर करीत होता. अहमदशहा ममअब्दादिल्लीच्यीस बादशहा तुमचे हस्तगत करुन तुझा पुत्र तैमुरशहास मलकाजमानीची कन्या चंदाजमानी तुैरशहास देईन. दिलीचा भेद झाडून मपा आहे चढया घोडयानिशी दिलीचा किल्ला हस्तगत करुन देर्ठन असे वरचेवर कळवीत होता वीजर असलेल्या गाजूद्दीनखान यास रतिमात्र ठाऊक नाही.

बखरकार या गंभीर घटनांचे वर्णन लिहिममतमामो गारुडी रान भारितो तसा प्रकार त्याने केला.

अहमदशहा अब्दाली दिल्लीवर चालुन आला. त्याने प्रचंड लुट आणि कत्तल प्राणी, पशु, मनुष्ये याची करुन दिल्ली घेतली बखरकार सांगतोममचढते घोडयानिशी शहर घेतले. तो गिलच्याची ताकीद भारी शहरात दहा हजार गिलच्यानी मारिलेफ्फ४२ तो आब्दुल आणि दुराणी निमा मशीदीसस येऊन आपला स्वधर्म उजुनदाजु करीत होता. तो अर्ज बेगानी अर्ज केला मक्शहराती गर्दी होऊन दुराणीची बहुत कतल जाहालीफ्फ्तो. खान रोहिला व सैदमहंमद कतलबाज जवळ होता. तो अब्दुल आलीने त्याचे तोंडाकडे पाहुन जवळ निमच्या होतात तो अर्धा ओढुन जवळ ठेवताच कतल म्हपुकार जाहला. ते समई त्याचीमकतलफकाय स्त्री पुरुष मारावे असा नेम नाही, पुरुष, पोर, स्त्री, कुतरी, घोडी, गाढवे, गुरु, वगैरे

हाताखाली जे सापडेल ते मारावे अशी सोडेतीन घटाकपर्यंत कतल जाहाली. अब्दुलआलीने निमाज करुन करांचली ओढुन ठेवली होती. तीस मेणकरुन ठेविले. मेणद्वाहीकफरिताचम्हणोन पुकार जाहला. तो गिलच्याची कैद भारी ताकीद म्हणताच मानेवरी ठेविली असली तरी सोडावे. साडेतीन घटकात आठराहजार मनुष्य कतल झाले.

पुण्यातुन पेशव्यानी राघोबा दादाचे हाताखाली उत्तरेकडे फौजा रवाना केल्या. पण पेशव्याचे सैन्य उत्तरेकड गेलेनंतर अब्दालीची गाठ या सैन्याशी झाली. अटकेपार पंजाबच्या बंदोबस्त करुन राघोबा पेशवा दक्षिणेकडे वाटेव असताना वाटेत मल्हारराव होळकरानी दत्तोजोस उत्तरेकडे अशा मोहिमा घ्याव्यात याबाबत विचारले त्यावर मल्हारराव होळकारानी दत्ताजीस सल्ला दिला तो याप्रमाणेममनजीबखान यासी हाती धरुन भागीरतीस पुल बांधोन पलीकडील आयोध्या व ढका व बंगाला व काहुर देशपावेतो मोहिम ममकहेरावीन. करता तुम्ही नजीबखान याचे पारिपत्य कराल तरी तुम्हास पेशवे धोत्रे बकवावयास लावतील असे स्पषट सांगितले.

मात्र राघोबा पेशव्यानी या अगोदर जनकोजी शिंदेममयासनजीबखान रोहिल्याबाबत जो सल्ला दिला होता तो असा नजीबखान रोहिला याचे पारिपत्य करुन त्यास जिवे न सोडावे आम्हीच. त्याचे पारिपत्य केले असते परंतु मल्हारराव यासी अगत्य त्याचे पडले. त्याचा धर्मपुत्र म्हणोन त्याचे जितके धर्मपुत्र आहेत तितके मात्राकामी आहेत.सपास दुध पाजीत आले तरी त्याचा दृष्ट स्वभाव जाणार नाही. आम्ही त्यास पिसाल्या कुतरियाची गत केली असती परंतु तुपाचे घागरीवर उंद्राचे पिटकुले बसते तैसा प्रकार जाहला आहे.

नजीबखान रोहिल्याबाबतचे हे बखरकाराचे वर्णन अगदी चपखल शब्दात त्याने बसवुन त्याचे दुष्ट अतःकरणाची ओळख मोजक्या शब्दात वाचकापुढे उभे केले आहे यात शंकाच नाही राघोबा पेशव्यानी शिद्याना हा सल्ला देऊनही मल्हारराव होळकरांचा मागाहुन दिलेला सल्लाच रास्त आहे असा दत्ताजीस भास होऊन त्यांचे मनात होळकरांचा सल्ला ठसला. मबखरकार म्हणतो लेअियाचे ध्यानात धन बसते तैसे जाहालोममअग्नीवर. अग्न टाकवे तसेच पुर्तेपणे ठसले.

नजीबखान रोहिल्याचे अंतस्थ डावपेच पूर्ण होताच तो दत्ताजीस भुलथापी देऊन मी शत्रुत्वाजवळ भागीरतीस पुल बांधन ठीक करतो. तुम्ही गणमुक्ते जारुन तीर्थ विधी करण्याची सुचना ही करतो एकखोटीच. बतावणी होती. जनकोजी शिंदे यानी दत्ताजीस सल्ला दिला आणि नजीबखानास जवळ ठेऊनच कार्य त्याचेकडून करुन घ्यावे असे सांगितले. परंतु दत्ताजीस नजीबखानाचज्ञा कावा उमगला नाही. जनकोजीचा सल्ला तूानी धुडकावला दत्ताजी शिंदे यानी भागीरथी नदीस पुल बांधण्यासाठी त्यांचे छावणीतुन त्यास निरोप दिला. त्याप्रसंगाबाबत बखरकार नमुदममयाप्रक्करतो. ार उत्तर होताच दुसरे कोणी न बोलता सर्वत्रानी कल्पना मुंगीस लीती पक्ष फुटतात तैसीगत जाहाली उपाय नाही.

नजीबखानाचा कावा उघड झाला. शिंद्याना मोठा विशाद वाटला. इंद्रप्रस्थ हस्तीनापुरावर शिद्याचे सैन्य चालुन गेले. सुजात दौल व रोहिले यानी कोड रुपये खंडणी द्यावी म्हणजे आम्ही माघारी जातो असे राहिल्याचा वकील चेतार यास सांगितले तेव्हा चेताराम वकीलाने दत्ताजीस दिलेले उत्तर मार्मिक आहे ते असे कौरवपांडव यांचा घरकलह लागला सनई भगवान श्रीकृष्ण परमात्मा याने आपले भांगे येऊन याच वटवृक्षाखाली सिष्टाई केली. ते समई दुर्योधन याने उत्तर की सुईचे आग्रावरील मतिका प्राप्त होणार नाही तेथे इंद्रप्रस्थ कैचे व वरुणावत कैचे साक्षात भगवान यांची सिष्टाई य जागी सिधीस गेली नाही तेथे तुमचा मनसोबा काय सिध्दीस जातो मुरवेल तरी कुच करुन जावे तरी युध्दास आपण सिधच आहोत.

नजीबखान रोहिल्याचा कावा लक्षात आल्यावर त्याचा नतिजा त्यास देण्यासाठी दत्ताजीस मोठीच विवेचना वाटत

होती.सर्व सरदाराना एकदा एकत्र बोलावुन दत्ताजीने भागीरथीपार जाऊन त्याचा मोड करण्याचा बेत सर्वाना सांगितला भागीरथीपीकडे सुज्यात दौला आणि नजीबखानाने अवघे हिंदुस्थान भारन टाकले आहे. हे फौजेतील लोकानी सांग पाहिले. तरीही दत्ताजी म्हतातममसुज्यातदौला याचा व आमचा स्नेह भारी पुर्वी मन्सुर अली याचे कामास आमचे बाप रानोजी शिंदे बहुत प्रकारे आले होते. प्रस्तुतही त्यांचे वकील आम्हापासी आहेत. त्यांचे बोलण्यात व स्नेहात अंतर नाही. परंतुममोगलाई मसलतफअसे यास उमजले नाही. एक सुज्यातदौला याचे बलावर तर नजीबखान याने हिंमत बांधली असे असता यास कालगतीमुळै झोपड पडलीममजैसी. देवची उजरी तैसी बुद्या उपजेशरीरीअसा प्रकार घडला.

नजीबखानाचे मसलती प्रमाणे अब्दुलअली लाहोरास पांच झाला. दत्ताजी शिंदेच्या फौजांची आली गिलच्याचे दुराणा फौजाची यमना तिळावर बरारी घाटावर रणकंदन झाले दत्ताजी मारले गले पण त्यापुर्वी गिलच्याच्या समवेत झुंज देण्यासाठी दत्ताजीने जो सैनिकी जामविमा केला त्याची माहिती बखरकारममदेतोदत्ताजी शिंदे यानी प्रातःकाली
उठोन, फौजेस ताकीद केली आणि शंख वाजविला आणि शिंगे वाजविली सेला, आला, आणि अनीन तग सिध्द करुन आंगात बखतरे चिलखते, टोपपेटय, जिरे दस्ताने, टोपास बिन्या, दंडास बाव बिरदे वगैरेनिसी सिध्द होऊन गोटाबाहेर निघाले.

मराठी इतिहासातुन युध्दा क्षेत्रावर जाताना मराठा योध्दा कशा प्रकारे दक्षता घेऊन रणांगणावार जात असे याबाबत बखरकाराने बारकाव्यानिशी दिलेले तपशील पाहुन मराठा वीराचे क्षणाचित्र नजरेपुढे उभे राहिल्याशिवाय राहत नाही.

या वर्णनातील वैशिष्ट पूर्ण बाब म्हणजे दत्ताजीच्या दंडास बाबत बिरदे बांधलेली होती. मराठयाच्या इतिहासात अशा प्रकारे केलेले हे हुबेहुब वर्णन एकमेव वाटावे असे आहे. बखरकाराचा हा तपशील मनाला भावल्याशिवाय राहत ना अब्दालीची दुराणी फौजेशी यमुना तिरी जी लढाई झाली त्यात शिंद्याच्या फौजेचे भारी नुकसान झाले.

शिद्यांचे नाईकजी भोईटे व जिवाजी भोईटे व गोविंदपत आनी अब्दुलअलीच्या फौजेस झुंज दिली. त्यात झा पराभवाबाबत बखरकार म्हणतो,

भोईटे व बुंदेले यांचे दृष्टीस काय पडले हे न केले येवढे पराक्रमी होते परंतु त्यांच्या पोटात हर सिरली आणि निशाणा मागे फिरवुन तडाखा पळो लागले. त्याचे मागे फौजही भरधाव पळो लागली. बापास पुत्र व पुत्रास बाप पुढे उभे राहिलात तेथे कोण उभे राहतो. असा पळ सुटला तेव्हा गिलचे पाठीस लागोन तमाम जसा कुणबी विल्याने शालव पीक कापतो त्याप्रमाणे गलिमाचे लोकाचे सिरछेद करुन लागले गिलचे. केवळ बेहोष एका सिराचे तीन भाग याप्रमाणे आवस्ता केल्या येकाने पुढे डोचके वाचावे. येकाने मागे सैती मारावी व एकाने डोचके कापुन न्यावे ते सरका करावे.

मराठी सैन्याची शत्रु बहुत झालेली कत्तल मोजक्या शब्दात वाचकापुढे उभी केली आहे बरारी घाटावर दुराणीच फौजेशी शिंद्याचे फौजेचा सामना व तुंबळ युध्द चालु असता दत्ताजी शिंदे आणि तानाजी खराडे सैन्यात होते. त्या दत्ताजीस माघार घेण्याचा सल्ला दिलाफ़फ़५४ त्यास जे उत्तर दत्ताजी यानी दिले ते असे हा खंदारचा पात शहा अब्दुलआली चालोन आला आहे या रानात ईश्वरे मृत्यु आणिली तरी उत्तम आहे. योगी, संन्यासी, तपस्वी नाना प्रकारचे देहदंडन करितात की मोक्षसाधन व्हावे त्यात आम्हा क्षेत्रिया स्वकर्म हेच की रणात विन्मुख होऊ नये म्हणोत सर्व साधने साधिली तेही कर्म ईश्वरे दाटुन चालुन आणिले अशात कोणी आभाग्य असेल ते विनमुख होईल रण सोडून निघाल्यास दोमुकावे, इकडून तर्कसाधन,आणि आपेश मरणाहुन, यात मरताच उत्तम म्हणोन गाडून उभे राहिले.

या दिवशीचे युध्दात शिंद्याचे फौजेतील यशवंतराव जगदाळे व त्याचा भाऊ पिराजी जगदाळे गोली लागलाने ठार पडले. पाटील यानी लालमणी घोड्याचे तोंड किंचित आधारे फिरुन मुडदा ओढा ओढा म्हणोन बोलतात तो एका एकीच काशाची दोरी तुटते तशी गोली बगलेस बरगडीस लागोन दत्ताजी पाटील घोडयाखाली आले.

नजीबखान रोहिल्याचा गुरु कुतुबशहा अंबारीत बसोन आला त्यास राजाराम चोपदाराने विनंतीमसाहेब,केली पटेल घायाल पडा है बचाव करणार.

पटेल कहा है दिखलाफवअसे विचारुन राजाराम चोपदाराने तेथे दत्ताजी शिंदे घायाळ पडले तेथेहोते. कुतुबशहास आंबारी सुध्दा आणले कुतुबशहा अंबारीतुन उतरुन जवळ आला दत्ताजी शिंदे उताणे पडले होते कुतुबशहाखाली वाकुन बोलिलामपटेलकी हमारे साथ तुम और लढेंगे.

दत्ताजी शिंदे सावध होते त्यास. पुर्ते उमजले की हे काही आपणास वाचवीत नाहीत मग व्यंग गोष्टी सांगणे विहीत नव्हे म्हणोन दम बांधोन जाबसाल केलामम‌निशाकी, आकताला बचेंगे तो औरबी लढेंगे असे ऐकताच कुतुबशहा याने कमरेचा सुरा काढोन लाथेने ढकलुन, पालथा घालुन, सिरच्छेद  केला मराठयातील एका खंद्या पराक्रमी वीराचे हे बाणेदार उद्गार गेली २५ वर्षे तमाम मराठयाना स्पूर्ती देतात. त्याचे यथातथ्य वर्णन योग्य शब्दात देऊन या बखर कर्त्याने इतिहासाची व मराठी साहित्याची बहुमोल सेवा केली आहे यात संदेह नाही.

**निष्कर्ष :–**

१. व्यक्तिवर्णनातील संपन्नता हा बहुतांश बखरीचा प्रधान वाडःमयीन विशेष असलेला दिसून येतो.

२. सूचक वातावरण निर्मिती आणि भावस्पर्शी सजीवता ही अनेक बखरीच्या केंद्रस्थानी असलेली दिसून येते.

३. प्रामाण्याच्या दृष्टीने बखरींचा दर्जा शेवटचा असला तरी साधन म्हणून त्यांना महत्व आहे.

४. बखर लेखन हे प्रतिज्ञेने आणि वृत्तीने साहित्य असते हे स्पष्ट होते.

५. बखरींना ऐतिहासिक आणि सामाजिक मूल्य आहे तसे वाड्ःमयीन मूल्यही कसे प्राप्त होते ते स्पष्ट होते.

**संदर्भः–**


१. काव्येतिहासंग्रह, अंक१, पुस्तक १ १८७८ पुणे.

२. शककर्ते शिवराय उत्तरार्ध ले विजय देशमुख प्रकाशक छत्रपति सेवा प्रतिष्ठान प्रकाशन नागपुर,दुसरी आवृत्ती १९८६

३. इतिहासाचार्य विका राजवाठे समग्र साहित्य खंड १२ वा
संपादक – डॉ.मु.ब.शहा. प्रस्तावना राम शेवाळकर, राजवाडे संशोधन मंडळ धुळे १९९८ पृ.१७३

४. दक्खिनी हिन्दीतील इतिहास ले देवीसिंग व्यं.चौहान मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय ग्रंथमाला २१ सन १९७३ पृ.७३

५. मल्हार रामराव चिटणीस विरचीत श्री मन्महाराज संभाजीराजे आणि थोरले राजाराम यांची चरित्रे संपा. शिवाजीराव चव्हाण, प्रा.पंडीतराव टापरे, साहित्य सेवा प्रकाशन सातारा, पृष्ठ.५७

६. भाऊसाहेबाची बखर संपादक– प्रा. भिमराव कुलकर्णी प्रका.एस.जी. कुलकर्णी ३२३ सदाशिव पेठ पुणे २ दुसरी आवृत्ती १९६९ प्रस्तावना पान २०

ISBN 978-93-5196-698-2

# भाऊसाहेबांच्या बखरीतील जाबसाल : एक निरीक्षण

**डॉ. प्रमोद भगवान पडवळ**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, काशी हिंदू विश्वविद्यालय वाराणसी

प्रास्ताविक

मराठी साहित्यात बखर साहित्य प्रकाराचे एक विशिष्ट स्थान आहे. गद्यवाङमयाचा एक स्वतंत्र प्रकार म्हणून बखरीची ओळख आहे. ऐतिहासिक आणि वाङमयीन अशा दोन्हीही दृष्टीने बखरीला असाधारण महत्त्व आहे. 'बखर' हा शब्द 'खबर' या अरबी शब्दापासून निघालेला असून मूळ अरबी शब्दाचा तो वर्णविपर्यय (Metathesis) आहे. यावर अनेक विद्वान सहमत आहेत. र. वि. हेरवाडकर बखरीविषयी लिहितात, "बखरीचे एकंदरीत स्वरूप पाहता बखर म्हणजे ऐतिहासिक व्यक्ती व घटक यांची हकीगत हे मान्य होण्यास प्रत्यवाय नाही"[1] इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मते, "बक  बकणे, बोलणे या धातूपासून बखर शब्द निपजला आहे. मुसलमानांच्या सहवासाने त्यांच्या तवारिखा पाहून, मराठयांनीही बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला"[2] मोल्सवर्थच्या शब्दकोशात, "Any history, relation, memori etc. in Prakrit Prose."[3] असा बखरीचा अर्थ दिलेला आहे. वा. गो. आपटे बखरीला गद्य–इतिहास, चरित्र म्हणतात."[4] मराठी भाषेच्या सरस्वतीकोशात वि. वा. भिडे यांनी बखरीचा अर्थ, "राजा, थोर पुरुष, लढाई इ. ची हकीकत."[5] असा दिलेला आहे. ऐतिहासिक शब्दकोशात बखर शब्दाचा अर्थ बातमी, हकीकत, इतिहास असा आहे[6] वा. सी. बेन्द्रे बखरीला चरित्र ग्रंथ म्हणतात.[7] 'प्राचीन मराठी गद्य–प्रेरणा आणि परंपरा' या ग्रंथात डॉ. श्री. रं. कुळकर्णी लिहितात, "'बिलखैर' अथवा 'बखैर' या शब्दाचे 'बखेर' हे रूप रूढ होण्याची शक्यता वाटते.[8] प्राचीन काळी बकरीच्या चामडयावर लिहिण्याची प्रथा होती. बकरीच्या चामडयावर लिहिल्यामुळे 'बखर' शब्द रूढ झाला असावा असे डॉ. कुलकर्णी यांना वाटते.[9] बखरीची सर्वसमावेशक व्याख्या करता येणे कठीणच आहे. वरील सर्व व्याख्यांचा विचार करता असे म्हणावेसे वाटते की, ऐतिहासिक व्यक्ती, घटना, प्रसंगाचे गद्यात्मक वर्णन म्हणजे बखर होय. अर्थात ही व्याख्या परिपूर्ण आहे असे नाही कारण गं. ब. ग्रामोपाध्ये म्हणतात त्याप्रमाणे, "बखर शब्द ज्या विवक्षित लेखनाला लावला जातो त्या लेखनाचे स्वरूप सर्वत्र सारखे नाही. त्या सा–यांसाठी 'बखर' हा शब्द सैल अर्थाने वापरला जातो."[10] आजपर्यंत 'बखर' या प्राचीन गद्य वाङ्मय प्रकाराची चर्चा अनेक विद्वानांनी आपापल्या पद्धतीने केलेली आहे. यामध्ये इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, गं. ब. ग्रामोपाध्ये, र. वि. हेरवाडकर, श्री. र. कुळकर्णी, इ. विचारवंत महत्त्वपूर्ण आहेत. प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय 'जाबसाल' असल्यामुळे पुढील भागात मूळ मुद्दयाचा विचार करूयात.

जाबसाल :–

'जाबसाल' (ज्याबसाल) हा फारसी शब्द आहे या शब्दाचा अर्थ, 'प्रश्नोत्तर, संभाषण, बोलणे (अरबी–ज्यवाब्–सुआल्) असा 'फार्सी–मराठी व्युत्पत्ति कोशात दिलेला आहे.[11] एखादया प्रसंगी कोणाच्याही बोलण्यावर दुस–याने काही प्रतिक्रिया व्यक्त केली की तो जाबसाल होतो. सरस्वती शब्दकोश भाग–1 मध्ये जाबसालाचा अर्थ संभाषण, प्रश्नोत्तररूप संभाषण असा दिलेला आहे.[12] तर मराठी शब्दरत्नाकर मध्ये 'जाबसाल' या शब्दाचा अर्थ जवाबसवाल, प्रश्नोत्तरे असा सांगितलेला आहे.[13] बखरींचा अंतर्भाव ऐतिहासिक लेखन प्रकारात करावयाचा की साहित्यिक लेखन प्रकारात करावयाचा यात मोठीच संभ्रावस्था आहे कारण बखरीला ऐतिहासिक प्रकारात स्थान दयावे तर ऐतिहासिक लेखनासाठी आवश्यक असणारी विश्वासार्हता बखरीत नाही. बखरीत कित्येक ठिकाणी काल्पनिक व अद्भुतरम्य वर्णन आलेले असते. बखरींला साहित्यिक म्हणावे

तर काही बखरीत ऐतिहासिक घटनांची जंत्रीच दिलेली आढळून येते. मात्र बखरीतील उत्कृष्ट जाबसाल बखरीला साहित्याच्या पंक्तीत बसवतात. यासंदर्भात सुमन बेलवलकर लिहितात, ".....बखरींना इतिहासाच्या पंक्तीत वाकडा पाट! पण बखरींची साहित्यात प्राणप्रतिष्ठा करण्यास या जाबसालांचा वाटा फार मोठा आहे."[14] भाऊसाहेबांच्या बखरीतील प्रभावी जाबसाल पाहता सुमन बेलवलकर यांच्या मतातील सत्यता प्रत्ययास येते.

भाऊसाहेबांच्या बखरीतील जाबसाल :–

आतापर्यंत भाऊसोहबांच्या बखरीची जेवढी चर्चा झाली तेवढी अन्य कुठल्याही बखरीची झालेली नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे सदर बखरीतील वाङमयीन सौंदर्य आणि प्रभावी जाबसाल होय. या बखरीविषयी गं. ब. ग्रामोपाध्ये लिहितात्," युद्धवर्णनात्मक बखरीत सामान्यपणे बसू शकणारी पण विशेषतः कोणत्याही विशिष्ट प्रकारात न मोडणारी आणि शिवाय वाङमयीनदृष्टया उत्कृष्ट ठरणारी बखर म्हणजे 'भाऊसाहेबांची बखर' होय"[15] भाऊसाहेबांच्या बखरीत एकाचढ एक असे असंख्य जाबसाल आहेत त्यांचा परामर्श पुढील भागात घेतलेला आहे.

पेशव्यांचे पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर यांचा एकुलता एक मुलगा खंडेराव होळकर याचा सूरजमल जाटाबरोबरच्या कुंभेरीच्या लढाईत दुर्देवी अंत होतो.अत्यंतिक क्रोध आणि शोकाने मल्हारराव अस्वस्थ होतात. पुत्रशोकाच्या विषादातून ते प्रतिज्ञा करतात, "सूरजमल जाट याचे सिरछेद करीन व कुंभेरीची माती यमुनेत टाकीन तरीच जन्मास आल्याचे सार्थक नाहीं तर प्राणत्याग करीन." (पृ. 4) "नंदकुळाचा नाश केल्याशिवाय शेंडीला गाठ बांधणार नाही' या प्रतिज्ञेची आठवण याठिकाणी येते वरील उद्‌गारावरून मल्हाररावांच्या दृढनिश्चयी स्वभावाचा परिचय होतो. होळकरांची स्वामीभक्ती पुढील वक्तव्यावरून दिसून येते. "तुम्ही खावंद आहा. ज्यात धन्याची मर्जी राजी असेल त्यास आम्ही राजी आसे." (पृ. 8–9) नागुरचा मारवाडी सरदार बिजेसिंग मल्हारावांकडे शिदंयांविरोधात मदतीची मागणी करतो तेव्हा मल्हारराव त्याला सावध उत्तर देतात," ते व आम्ही येका खावंदाचे चाकर. यास्तव उघड कुमक करिता येत नाही." (पृ. 13) उत्तर भारतात मराठयांचा दबदबा निर्माण करणा–या शिंदे व होळकरांचे आपसात कधीच पटले नाही. त्याचा हा एक नमुना आहे.

बिजेसिंग मारेक–यांकरवी जयाजी सिंदेंचा खून करतो. दत्ताजी शिंदे यांच्यासाठी हा फार मोठा आघात असतो, मृत्युशय्येवर असलेल्या जयाजीकडून दत्ताजी शिंदे यांचा हौसला वाढवणारे संभाषण पहा, "वैरी युद्धास आला आणि तू रांडेसारखा रडतोस?हे क्षत्रीय धर्मास उचित की काय?आतां मजला काही होत नाहीं. तुम्ही शत्रुपराभव करावा." (पृ. 15) बिजेसिंगाला मल्हाररावांची आतून फूस होती त्यामुळे जयाजीच्या हत्येस मल्हाररावही तितकेच कारणीभूत आहेत असा दत्ताजीचा पक्का समज असतो. नानासाहेब व भाऊसाहेब शिंदे– होळकरांचा समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करतात त्यावर दत्ताजीचा जाबसाल महत्त्वपूर्ण आहे. "आतां त्यांची भेट स्वर्गी" (पृ. 20) गंगोबा तात्या जनकोजीच्या मनातील किलमिष दूर करण्याचा प्रयत्न करतात त्यावर जनकोजीचे उत्तर असते. "त्यांची आमची पुण्य भेट आतां स्वर्गी. अजूनही तुम्हास जितके करावयाचे आसेल तितकें करावें." (पृ. 44) जयाजीचा मृत्यू जनकोजीच्या चांगलाच जिव्हारी लागला होता याचा प्रत्यय यातून येतो त्याचबरोबर शिंदे–होळकर यांच्या नात्यातील कडूपणा दृष्टोत्पत्तीस येतो.

नजीबखानाशी हातमिळवणी करून गंगेस पूल बांधून आयोध्येच्या सुजातद्‌दौलाकडून पैसे उकळण्याचा सल्ला मल्हारराव जनकोजीला देतात त्यावर स्वामीनिष्ठ जनकोजी शिंदे उत्तर देतात, "नजीबखान रोहिला मात्रागमनी आहे. जलमस्थानी मैथून करणार. गाजुद्‌दीखान याचे घरीं वाढला. त्याचें

सार्थक केलें! हे तुम्ही जाणतच आहां. त्यांत कामांतूर होऊन कामांवर नजर दयावी तरी खावंदाचे द्रोही व्हावे. त्यासीं आम्हांस मोहीम नजीबखान याजवरच नेमून दिल्ही आहे. आसें असता हे कार्य केलियास श्रेष्ठ स्वामीद्रोही व्हावें. त्यात आम्हाकडें केवल सिलेदारीपणा आम्ही सरकारचे पागेचे बारगीर. आम्हांकडून हा विचार घडूं नये." (पृ. 45) पाताळयंत्री व दुष्ट नजीबखान रोहिला याला जनकोजीने खूप पूर्वीच ओळखले होते. अबदाली–कुतुबशहा विरुद्धच्या लढाईत बयाजी शिंदेला प्रोत्साहन देताना दत्ताजी म्हणतात', 'बयाजीबाबा तुम्ही हमेशा लढाया करितां. नव्यानें झुंज करीत नाही. केलियाचें नवल नाहीं. न केलियाचें मात्र नवल आतां बोलावयास फुरसत नाही, त्वरा करावी." (पृ. 76) दत्ताजीचे वरील उद्‌गार बयाजीला प्रेरणा देणारे ठरतात. आपल्यावरील कलंक धुवून टाकण्यासाठी बयाजी प्राणपणाने लढतो मात्र नियतीच्या मनात वेगळेच असते. लढाईत बयाजीचा अंत होतो.

अब्दाली व दत्ताजी यांच्या धुमश्चक्रीत तानाजी खराडे दत्ताजीला म्हणतात, "पाटीलबाबा दुराणीची फौज झाडून उतरली, गोविंदपंत बुंदेले तों तिकडेच बुडविले. तसेंच मालोजी सिंदे यांचा ठिकाणा नाहीं. निशाण रघडें पडलें. आबरू जाणेचा प्रसंग. निशाण काढता उत्तम आहे." (पृ. 78) यावर दत्ताजीचे उत्तर, "आपण मेला जग बुडालें, आबरू जाते आणि वांचतो कोण?अजून निघावयाची काय बाकी राहिली आहे? सफेजंगी होऊन गेली, आतां निशाण काढतो तर फौज पळूं लागेल. मग म्याहीं पलावें?मग देशी तोंड मी दत्ताजीनें काय म्हणोन दाखवावें?..... आपेश मरणाहून वोखटे यात मरतांच उत्तम." (पृ. 79) या जाबसालाने दत्ताजीचे मरण जगण्यापेक्षा मोठे होते. नजीबखानाचा गुरु कुतबशहा घायाळ दत्ताजीला म्हणतो, "पटेल हमारे साथ तुम और लढेंगे?" (पृ. 81) मृत्यु समोर दिसत असताना दत्ताजीचे बाणेदार उत्तर पहा. "निशा आकताला. बचेंगे तो और बी लढेंगे (पृ. 81) दत्ताजीच्या मृत्युनंतर पुतण्या जनकोजी शोक करतो. अशावेळी दत्ताजीची गरोदर पत्नी भागिरथीबाई त्याला म्हणते," बाबा, तूं रांडेसारखा रडतोस?जयाजी सिंदे याते पोटी चौघी लेकी जाहल्या, तसीच तू येक जाहली असतीस तरी आणखी येक जांवांई येतां. पाटील काय घेऊन गेले?तुमची दौलत, महाल, मुलूक, खजिना, हाती, घोडे, सर्व तुम्हांपासी ठेऊन गेले. तुम्ही हिंमत धरून त्याचें साह्य करावे. आतां रडून होणें काय." (पृ. 87) भल्या भल्या पराक्रमी योद्ध्यांनी धीर सोडला असताना भागिरथीबाईचे वरील उद्‌गार वीरपत्नीला साजेसे आहेत. जनकोजीपेक्षा पतीनिधनाचे भागिरथीबाईचे दुःख निश्चितच मोठे होते परंतु अशा कठीण समयी तिने सर्वांना धीर देण्याचे काम केले.

मल्हाररावांची नाराज पत्नी गौतमाबाई त्यांना सुनावताना म्हणते, "सुभेदार, तुमचें वृद्धपण जाहलें. सिंदे यास मूल म्हणोन. अधिक काय?त्याचा तोंडचा जार वाळला नाहीं. तों त्यांनी एवढा पराक्रम करून मारतां मारतां मेले. ए–हवीं मृत्यलोकास आला प्राणी वाचत नाहीं. परंतु इहलोकीं इतकी कीर्ति करून वर परलोकीं साधन करणें हेंच दुर्लभ. हें मूल जनकोजी सिंदे, यांणी एवढा पराक्रम केला, तुमचे दिवस समीप आले; तरी हिमंत धरून मारतां मारतां मरावें. हा प्रताप क्षत्रीय जातीनें करावा, खेद स्त्री जातीनें करावा. पुरुषास साजत नाहीं. प्रस्तुत जवळ जखमी व मुले व बायका आलीं आहेत, तरी आतां जाऊन भेटून त्यांचें समाधान करावे" (पृ. 91). व्यक्तिगत मतभेद असले तरी संकटाच्या घडीत एकदुस–याला मानसिक आधार देणे किती आवश्यक आहे याचा पाठ गौतमाबाई मल्हाररावांना शिकवते. गौतमाबाईच्या वरील उद्‌गारावर मल्हाररावांचा अहम दुखावणे स्वाभाविकच होते. यावर मल्हाररावांची प्रतिक्रिया तशीच होती. ते म्हणतात, "तुझ चितांत आम्हीं मरावें असें आहे." (पृ. 92) यावर गौतमाबाई पतीला उपदेश करतात. "सधवा असतां कोणी वैधव्याचीं आस्ता धरील असी कोणीही नाही. आहेवपणे हळदकुंकुमंडित मरावे हीच सर्वांची आस्ता परंतु जसे पूर्वाचरण असतें तसेंच घ्यावें लागतें. आपलें पदरीं लौकिक भारी तुम्ही आपलें घोंगडी विणावयाचें स्वकर्म करीत आसतां तरी सहजच

ISBN 978-93-5196-698-2

वांचावयाची आस्था धरावी. वाटा तरीं शूराचा उचलिला आहे. वाण सतीचें घेतलें आहें हें साभाळावें, असेच धर्मशास्त्र" (पृ. 92) यावरून गौतमाबाईच्या व्यक्तित्वाचा वेगळा पैलू दृष्टीस येतो. दत्ताजीच्या मृत्युनंतर मल्हारराव जनकोजीच्या सांत्वनासाठी जातात. त्याठिकाणी होते उलटेच जनकोजीच मल्हाररावांना धीर देतात" सुभेदार, हा मृत्युलोक आहे. यांत केव्हाही मरणें खरें. वडील कीर्ति करूनच मेले. आपणही किती दिवस जगणे आहे. त्यांत अवकाशही नाहीं. सुपांतील हसती व जात्यातील रडती....." (पृ. 93) हे उद्‌गार जनकोजीच्या परिपक्वतेची साक्ष आहेत.

उत्तर भारतात अब्दालीकडून शिंदे व होळकर यांची ससेहोलपट होते तेव्हा स्वतः भाऊसाहेब हे दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार, समशेर बहाद्‌दर, इब्राहिमखान गारदी, तुकाजी शिंदे, महादजी शिंदे इ. ना साबेत घेऊन मोहिमेवर निघतात. मराठे आपल्याला एकटे तर पाडणार नाही ना ही भीती इब्राहिमखानच्या मनात असते. भाऊसाहेब त्याची शंका दूर करतात व वचन देतात." निदान प्रसंग पडला तरी तुम्हांस सोडून निघणार नाहीं. जेथें तुम्ही गाडून उभे राहाल तेथें भी राहीन यासी आंतर करणार नाही." (पृ. 106) भाऊसाहेब आपले वचन शेवटपर्यंत पाळतात. मल्हारराव होळकर व नाना फडणवीसांसारखे शूर वीर रणांगण सोडून पळत असताना भाऊसाहेब इब्राहिमखानाबरोबर रणमैदानात पराक्रमाची शर्थ करतात. जनकोजी शिंदे व मल्हारराव होळकर हे मराठयांचे उत्तरेतील सरदार. या दोहोंना उत्तरभारताच्या राजकारणाची इत्यंभूत माहिती असते. त्यामुळे भाऊसाहेबांनी मोठे निर्णय घेताना आपले ऐकावे असे उभयतांना वाटते. शाहजादा शहाआलमला दिल्लीच्या गादीवर बसविण्याच्या भाऊंच्या निर्णयाला मल्हारराव उघड उघड विरोध करतात. अशावेळी जनकोजी संयमित प्रतिक्रिया देतात. "आपले चालनासें दिसोन आलें, तेव्हा हरएक मसलत आपण सांगों नयें, आपले जागा प्रतिष्ठेनें राहावें" (पृ. 112) वरील वक्तव्यावरून जनकोजीच्या परिपक्व स्वभावाचा परिचय होतो.

पादशहाच्या तख्तावरील रूप्याचे छत तोडण्याच्या भाऊंच्या कृत्यामुळे सूरजमल जाट नाराज होतो. तो भाऊला उघड उघड विरोध करू लागतो. सूरजमलने सल्ला देणे भाऊंना आवडत नाही. भाऊ म्हणतात, "आम्ही काही दक्षण सोडून तुमचे बळावर आलो नाहीं तर आपले चित्तास येईल तें करूं. तुम्ही राहाल तरी राहावें. नाहीं तर आपले ठिकाणास जावें. गिलज्याचें पारिपत्य केल्यावर तुम्ही आम्ही पाहून घेऊ." (पृ. 114) भाऊचा हा जाबसाल निश्चितच निष्ठूर होता. मात्र भाऊंना स्वतःच्या सामर्थ्याची पूर्ण जाणीव होती त्यामुळे न मागता मिळालेल्या सल्लांना त्यांच्या लेखी काहीच किंमत नव्हती. मनात असेल ते स्पष्टपणे बोलून दाखविणे हा भाऊंचा स्वभाव होता. मल्हाररावांनी अब्दालीचा धसका घेतला आहे असा बळवंतराव मेहेंदळेंचा समज असतो. मेहेंदळे म्हणतात, "सुभेदार, तुमचे आंगी दुराणीचे भय, शाहारे म्हणजे हीव आंगांत शिरलें, तें, आद्यापिं जाईना।" (पृ. 119) यावर मल्हाररावांचे उत्तर होते," तू ब्राह्मण. जात निर्बल, कांहीं आकाशीची गांठ फाडून आला नाहीं. पंचाननाची गाठ पडली नाही तंवर जंबुक गर्जना करतो गाँठ पडलियावर शुद्‌धही निघून जाईल." (पृ. 119) मल्हाररावांचे हे उद्‌गार स्पष्ट, अकृत्रिम आणि कुणाचीही पर्वा न करणारे आहेत.

गोविंदपंत बुंदेल्यांचे शीर अब्दाली भाऊंकडे पाठवतो आणि संदेश देतो, "तुमचे गोविंदपंत पुढे तुम्हांस स्वर्गी जागा पाहावयास गेले आहेत. आणि तुम्हांस पहावयास शीर पाठविलें आहे. होय किंवा नव्हे हे पाहावे." (पृ. 131) या दुखद प्रसंगी भाऊसाहेब जशास तसे उत्तर देतात." तो जागा सर्वांचा आहे. त्याशिवाय दुसरी गती कोणती आहे?प्रस्तुत तुम्ही थोर, खंदारचे पातशाहा, तुम्ही तेथें जाल तेव्हां तुमचे स्वरूपाप्रमाणें मान जाला पाहिजे. सबब तुमचे मेजवानीचे तरतुदीस पुढें गोविंदपंत साहित्यास गेले आहेत." (पृ. 131–132) भाऊंचे हे

उत्तर अब्दालीच्या डोळयांत झणझणीत अंजन होते. पानिपतच्या लढाईत घायाळ झालेला इब्राहिमखान गारदी दोन–तीन दिवसांनंतर आब्दालीच्या तावडीत सापडतो त्याला सेवेत ठेवण्याची अब्दालीकडून विचारणा होते मात्र स्वामीभक्त इब्राहिमखान स्पष्ट शब्दात नकार देतो. त्याचा रोखठोक जाबसाल पुढीलप्रमाणे." भाऊसाहेब यांचे व आमचें वचनाचें इमानप्रमाण जालें आहे. यास्तव आसी गोष्ट आपणापासून कदापि घडणार नाही." (पृ. 155–156) या उत्तराने अब्दाली दुखावला जातो आणि इब्राहिमखानाचा शिरच्छेद करतो. मराठयांच्या इतिहासात अशा स्वामिभक्त सेवकांची असंख्य उदाहरणे आहेत.

अशाप्रकारे भाऊसाहेबांच्या बखरीच्या लोकप्रियतेचे रहस्य उत्कृष्ट जाबसालांत दडलेले आहे. यासंदर्भात सुमन बेलवलकरांचे मत असे, त्या लिहितात, "निरनिराळया प्रसंगांच्या निमित्तानं घडलेलं हे बोलणं म्हणजे भाषेचा अतिशय ओजस्वी आविष्कार आहे. बोलणारी माणसं जितकी मोठी होती तितकीच त्यांची भाषाही! नियतीच्या रेटयापेक्षाही त्यांच्या शब्दात अधिक ताकद होतीं, म्हणुनच जुनी शस्त्रं वस्तुसंग्रहालयात जमा होतात आणि असले जाबसाल भाषेचे जडजवाहीर बनतात."[16] भाऊसाहेबांच्या बखरीतील प्रभावी जाबसाल पाहता सुमन बेलवलकरांचे उपरोक्त विचार समर्थनीय आहेत.

निष्कर्ष

1- मराठी साहित्यातील एक गद्य वाङ्मयप्रकार म्हणून बखरीचे ऐतिहासिक व वाङमयीन महत्त्व आहे.

2- 'बखर' या शब्दाची व्युत्पत्ती सांगण्याचा अनेक विद्वानांनी प्रयत्न केलेला आहे.

3- 'भाऊसाहेबांच्या बखरी' ची जेवढी चर्चा झाली जेवढी अन्य कुठल्याही बखरीची चर्चा झालेली नाही.

4- या बखरीतील प्रभावी जाबसाल बखरीचे वाङ्मयीन सौंदर्य खुलवतात.

5- मल्हारराव होळकर, दत्ताजी शिंदे, जनकोजी शिंदे, गौतमाबाई, भागिरथीबाई, भाऊसाहेब इ. चे वेगवेगळया प्रसंगी निघालेले उद्‌गार म्हणजे भाषेचे ओजस्वी आविष्कार आहेत. संदर्भ साहित्य

1- मराठी बखर, र. वि. हेरवाडकर, व्हीनस प्रकाशन, द्वितीयावृत्ती 1975, पृ. 3

2- तत्रैव, पृ. 1

3- Molesworth J.T.A. Dictionary of Marathi and English, 1857

4- मराठी शब्दरत्नाकर, वा. गो. आपटे, आनंद कार्यालय, पुणे, प्रथमावृत्ती 1922, पृ. 50

5- सरस्वतीकोश भाग–2, वि. वा. भिडे, चित्रशाळा प्रेस, पुणे, द्वितीयावृत्ती 1970, पृ. 1289

6- ऐतिहासिक शब्दकोश भाग–2, संपा. य. न. केळकर, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 1962, पृ. 877

7- उनि. र. वि. हेरवाडकर, पृ. 2

8- प्राचीन मराठी गद्य प्रेरणा व पंरपरा, श्री. रं. कुळकर्णी, सिंधू पब्लिकेशन्स, मुंबई, प्रथमावृत्ती 1970, पृ. 99

9- तत्रैव, पृ. 99

10- मराठी वाङ्‌मयाचा इतिहास, संपादक– रा. श्री. जोग, महाराष्ट्र साहित्य परिषद्, पुणे, प्रथमावृत्ती 1973, पृ. 491 (प्रकरण बारावे, बखरवाङ्‌मय– गं. ब. ग्रामोपाध्ये

11- फार्सी–मराठी व्युत्पत्तिकोश, संपा. यू. म. पठाण, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, प्रथमावृत्ती 2008, पृ. 60

12- सरस्वती शब्दकोश, भाग–1, वि. वा. भिडे, चित्रशाळा प्रेस, पुणे, द्वितीयावृत्ती 1969, पृ. 731

13- मराठी शब्दरत्नाकार, उ. नि. पृ. 178

14- बेलभाषा, सुमन बेलवलकर, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, प्रथमावृत्ती 2008, पृ. 60

15- उनि.मराठी वाङ्‌मयाचा इतिहास, संपादक– रा. श्री. जोग, पृ. 492.

16- उनि. बेलभाषा, सुमन बेलवलकर, पृ. 98.

⊠ उदाहरणासाठी घेतलेले जाबसाल हे भाऊसाहेबांची बखर, संपा. प्रा.भीमराव कुलकर्णी, प्रकाशक :एस. जी. कुलकर्णी, पुणे, प्रथमावृत्ती, 1965 या प्रतीतील आहेत

ISBN 978-93-5196-698-2

## मराठी बखर वाङ्मय : वेगवेगळी रूपे

डॉ. व्ही. जी. काळे
प्राचार्य, आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा

प्राचीन मराठी वाडःमयात आकृती बंधाची विपुलता अभ्यासल्यानंतर मराठी वाङ्.मय हे किती समृध्द होते याचे आश्चर्य वाटते. काळानुरूप साहित्याचे प्रकार बदलत गेल्याचे जाणवते. मराठी प्रारंभीच्या काळातच म्हणजे यादव काळात मराठीने अमृताशी पैज जिंकली होती येथेपर्यंत मराठी साहित्याचे स्वरूप संप्रदायी होते. नाथ, वारकरी, महानुभव, दत्त आणि समर्थ असे पाच भक्ती सांप्रदाय महाराष्ट्रात आहेत. आपआपल्या संप्रदायाचा प्रसार करण्यासाठी त्याची रचना करून संप्रदायिक तत्वज्ञान लोकांना सांगण्यासाठी का होईना ही रचना केली गेली असे असले तरी सुध्दा मराठी वाङ्.मय दिवसेंदिवस समृध्द होत गेल्याचे जाणवते.

परंतु यात थोडीशी विषमता जाणवते. ती गद्य व पद्य स्वरूप रचनेची गद्याचे स्वस्त अल्प तर पद्य वाङ्.मय जास्त प्रमाणात रचले गेले. बहुतेक गेयता हे त्याचे कारण असावे त्यात समाधानाची बाब म्हणजे महानुभाव साहित्याचे गद्य रचनेचे योगदान महत्वाचे आहे. इ. स. १८८८ साली 'लीळाचरित्र' हा पहिला चरित्रग्रंथ प्रसिध्द झाला. तो मराठीतील आद्य चरित्रग्रंथ म्हणून मानला जातो. नंतर गोविंदप्रभू चरित्र, दृष्टांतपाठ इत्यादी ग्रंथ हे अस्सल मराठी भाषेचे रूपे होत. त्यानंतर मात्र पदनिर्मिती विपूल झाली. पत्रे, फर्माने, राजाज्ञा, अर्ज, एवढया पुरते गद्य साहित्य निर्माण होत गेले. मात्र इसवी सनाच्या १८ व्या शतकात ग्रंथ, साहित्याची निर्मिती होवू लागली. याचे कारण शिवाजीने शुन्यातून निर्माण केलेले हिंदवी स्वराज्य. स्वराज्याची स्थापना झाली आपले राज्य झाले, राज्यव्यवहार चालविण्याची पत्रे, आज्ञा, माहिती, नेमणुका, युध्दवर्णन हे सर्व व्यवहार गद्य पत्राव्दारे होत असत. त्यात गद्य साहित्यानिर्मितीला स्थान मिळाले.

घडलेल्या घटना, व्यक्ती विशेष, युध्दवर्णन, वीराचा पराक्रम सांगून पुढील पिढीच्या समोर मांडणेसाठी बखर वाङ्.मय निर्माण होवू लागले. मराठयांची पत वाढली. आर्थिक व्यवहार वाढले. पेढया व हुंडयांचे व्यवसाय वाढले. पेढया पाठविल्यानंतर (आर्थिक व्यवहाराचे पत्र) हुंडी वटतं असे. आजच्या भाषेत आष्टयातून चेक दिला तो काश्मिरात सुध्दा पास होतो. सावकारशाही याच काळात भरभराट होती. व्यवहार व व्यापार सचोटीने होत असे. विशेषतः पेशवे काळात हा व्यवहार वाढला कारण मुलूखगिरी करणे, संस्थाने स्थापने उदा. ग्वालहेर, इंदौर, उज्जैन, तंजावर, बेंगळूरू येथे मराठी संस्थाने होती. १८०२ मध्ये मराठे-इंग्रज युध्दाचे वेळी अर्धा भारत मराठयांच्या अधिपत्याखाली होता. पेशव्यांनी अटकेपर्यंत झेंडे रोवले म्हणून अटक आज भारतात आहे. या संदर्भात शेजवलकर यांचे मत अतिशय धार्मिक व बिनतोड आहे ते आपल्या पानिपत (१६६१) या ग्रंथात लिहीतात,''ज्या ज्या प्रदेशात मराठयांचे घोडे गेली तेवढा भाग भारतात आहे. बाकी सर्व भागाची फाळणी झाली. याचा सरळ अर्थ मराठयांनी खैबर खिंड ओलांडून अफगाणपर्यंत गेले नाहीत आणि पुर्वेला कोलकत्याच्या पुढे गेलेच नाहीत स्वाभाविक दोन्ही मुस्लिम राष्ट्रे स्थापन झाली. याचा अर्थ मराठी सैन्याचा विलक्षण दरारा भारतावर होता. मग आम्ही महाराष्ट्रीयन सामान्य ठरतो का? मला अभिमान आहे. महाराष्ट्र जी माझी कर्मभुमी आहे.

वरील विवेचनाचे कारण की बखरीची निर्मिती ची ही प्रस्तावना आहे. मात्र बखर वाङ्.मय स्वरूपाने गद्य असत्य तरी पद्य वाटावे इतकेच सकस आहे. याचे कारण बखरीचे स्वरूप पुराणांनी व्यापले आहे याचे कारण सर्वच मराठी मनावर पुराणांचा प्रभाव व मराठी गद्याचे आणि अविकसित रूप यामुळे बखरीचे स्वरूप पुराणासारखे वाटते, असे असले तरी श्री. र.

कुलकर्णी यांच्या मते बखर निर्मितीमागे धर्मरक्षणाची भूमिका होती. हे मत योग्य वाटते. मात्र बखरींचे पौराणीक अंतरंग मात्र अस्सल मराठमोळे आहे. हे बखर वाड्.मयाचे वाड्.मयीन वैशिष्टय आहे.

**बखरीचे वर्गीकरण** :वर्गीकरण ही अभ्यास सुलभीकरणासाठी केलेली एक उपयुक्त प्रक्रिया आहे. यात संशोधकात मतभिन्नता आढळते. तरी सुध्दा बखर निर्मितीच्या प्रेरणा व परंपरा लक्षात घेवून बखरीचे खालील प्रकारानुसार वर्गीकरण योग्य वाटते.

**१) चरित्रात्मक बखरी** : एखाद्या कर्तृत्वान घराण्यातील पराक्रमी व्यक्तीचा पराक्रम त्यांच्या वंशजांना श्रुत व्हावा. प्रेरणास्पद ठरावा म्हणून मुद्दाम काही बखरीची निर्मिती झाल्याचे जाणवते. उदा. सभासदांची बखर, होळकरांची थैली, भाऊसाहेबांची कैफियत, शिवछत्रपतीची सप्तचरित्रात्मक बखर इत्यादी अनेक उदाहरणे सांगता येती. यात सत्य घटना पुरावे व सुसंगतवार चरित्र असेलच असे आग्रहाने सांगता येत नाही. तरीसुध्दा सभासदांची बखर ही या सर्वांत विश्वसनीय मानली जाते. ज्याने शुन्यातून राज्य निर्माण केले, अशा थोर युगप्रवर्तक शककर्त्या शिवाजीची ही चरित्र कहाणी आहे. या बखरीचा लेखक शिवाजीचा समकालीन व विश्वासू सहकारी असल्यामुळे शिवाजीच्या जीवनातील अनेक घटनांचा तो साक्षीदार असावा. बखरीतील अद्‌भूत व पौरणिक भाग अर्थात पुराणांच्या प्रभावाने झालेला तो वगळल्यास ऐतिहासिक दृष्टीकोनातून सुध्दा ही एक श्रेष्ठ बखर आहे. आकर्षक निवेदनशैली, प्रसंगाची रोमहर्षक उपमा, औचित्यपुर्ण मांडणी, घटनांचे चित्तवेधक वर्णन, उत्कट स्वभाव चित्रण, प्रसंगोचित वातावरण निर्मिती, समर्पक दृष्टांत यामुळे सभासदांची बखर ही एक श्रेष्ठ दर्जाची बखर ठरते.

चरित्रात्मक बखरीत श्री शिवछत्रपतींची सप्तप्रकरणात्मक चरित्र या मल्हार रामराव चिटणीस विरचित्र ग्रंथाचा उल्लेख करावा लागेल. त्याची रचना इ. स. १८१० मध्ये झाली. ही शिवछत्रपतींवरची शेवटची बखर असावी. दरम्यान चित्रगुप्ताची बखर, भोसले वंशचरित्र इत्यादी शिवचरित्रपर बखरी लिहल्या गेल्या. चिटणीसांनी शिवाजीच्या मृत्यूनंतर १३० वर्षांनी ही बखर १८१० मध्ये छत्रपती शाहू (दुसरा) यांच्या आज्ञेने लिहली असे बखरकार सांगतो. त्यानंतर छत्रपती प्रतापसिंह गादीवर बसले असा निर्देश लेखकाने केला आहे. हा सन कालविपर्यायाचा दोष असावा. या चरित्र लेखनामागचा हेतू सांगताना लेखक लिहतो,''जे श्रवण, पठण, मनन केले असता सकस विद्या, गुणसंपन्नता व शौर्य, औदार्य, गांभीर्य, दया, धर्म व नीती हे सहज उत्पन्न होत असावेत. ही चिटणीसांची लेखनामागची प्रेरणा होती. त्याने हे चरित्र सात प्रकरणात विभागून लिहले आहे. यात साधन व संदर्भ ग्रंथाचा पुर्णपणे अभाव असल्यामुळे त्याची विश्वसनियता अगदी सामान्य वाटते. या बखरीवर पुराणाचा भरपूर प्रभाव पडला आहे. घटनांच्या बाबतीत लेखकाने फारसे गांभीर्य बाळगलेले जाणवत नाही.आख्यायिका, दंतकथा, माहिती व पुराणानुसरणाने हे चरित्र लिहले गेले असावे, पराक्रमी व्यक्तीचे चरित्र रंजक करून सांगण्याच्या हेतूने या महाचरित्रात्मक बखरीची निर्मिती झाली आहे. पेशव्यांची बखर, सभासदांची बखर, भाउसाहेबांची कैफियत, होळकरांची थैली, हनुमंत स्वामीची बखर, या अशा काही चरित्रात्मक बखरीचां अंतर्भाव चरित्रात्मक बखरीत केला जातो.

**युध्दवर्णन पर बखरी** :भाऊसाहेबांची बखर, पानिपतची बखर, खडर्याच्या स्वारीची बखर इत्यादी बखरी युध्दवर्णनपर आहेत. सर्वात विश्वसनीय व वाड्.मयीन दृष्टीकोनातून भाउसाहेबांची बखर ही श्रेष्ठ दर्जाची वाटते. सदाशिवराव भाऊ पेशवे या व्यक्तीचित्रणावर व तत्कालीन राजकीय परिस्थितीवर विशेष प्रकाश टाकणारी असून तिचा मुळ हेतू पानिपत युध्द कथन करणे हा आहे. १७५४ ते १७६१ या कालखंडातील उत्तरेकडील राजकारणावर प्रकाश टाकत बखरकार विवेचनाचा ओघ

पानिपत युध्दाकडे घेवून जातो. शेवटी प्यादाचा फर्जी होवून प्यादाने कशी मात केली हे बुध्दीबळातील रूपक घेवून सुचक अर्थाने ही बखर लिहली गेली असल्यामुळे पानिपत युध्दामागची कारण परंपरा सुसुत्रपणे सांगितली आहे. युध्दप्रसंग कथन करणारी ही बखर असून पानिपतच्या युध्दानंतर लगेच ही लिहली आहे. पेशव्यांच्या आर्थिक हव्यासामुळे उतरेकडील राजकारणात अनावस्था माजली. त्यात जयाजी शिंदे व मल्हारराव होळकरात वितुष्ट निर्माण होवून गृहकलह निर्माण झाला. व त्याचाही विपरीत परिणाम मराठयांच्या राजकारणावर झाला. काही सरदारांच्या स्वार्थी व मतलबी कृतीमुळे व एकनिष्ठेच्या अभावामुळे भाउसाहेबांसारखा खंदा सेनानी लाभूनही पुर्ववैमनस्य, परस्परांवर कुरघोडी व अंतर्गत पेटलेला गृहकलह यामुळे १४ जानेवारी १७६१च्या पानिपत येथे झालेल्या युध्दात मराठयांचा दारूण पराभव झाला. या अर्थाचे विवेचन बखरकाराने केले आहे. ऐतिहासिक व वाङ्.मयीन दृष्टीकोनातून या बखरीचे महत्व असाधारण आहे.

पानिपतची बखर ही रघुनाथ यादव चित्रे उर्फ चित्रगुप्त याने लिहली. पानिपत युध्दवर्णन प्रसंगावर ही बखर लिहली आहे. युध्दात सहभागी व कामी आलेल्या सरदारांची नावे, युध्दसमयी यांची तपशीलवार माहिती, त्यातील बारकाव्यांसह लिहली आहे. ७ डिसेंबर १७६० ला बळवंतराव मेंहदळे युध्दात मारले गेले. या युध्दात मराठे व अब्दालीकडील जे सरदार मरण पावले त्यांची नावांसह यादी लेखकाने दिली आहे. मात्र काही ठिकाणी अतिशयोक्तीची परिसीमा गाठली आहे.

**आत्मचरित्रपर बखरी :**

प्राचीन मराठी साहित्यात आत्मचरित्रांचे प्रमाण फारच अल्प आहे. चरित्र ग्रंथ विपूल आढळतात. म्हाईंभटाने संकलित केलेले लीळा चरित्र १३ व्या शतकातील मराठीतील पहिले गद्य चरित्र होय. इ. स. १२८८ मध्ये याची निर्मिती झाली. मात्र आत्मचरित्राचा अभावच आहे. स्वतःबद्दल लिहणे ही कल्पनाचा त्याकाळी विचारात घेतली नसावी किंबहुना काही तरी करावया जावे ही मोक्षमुलक संकल्पना वास्तव लेखनाला बाधक ठरली असावी पण अभावाने का होईना नाना फडणवीसांनी युध्दोपरान्त आत्मचरित्र लिहले, त्यामुळे तत्कालीन घडामोडींचे वास्तव व यथार्थ दर्शन त्यातून घडते. वास्तविक आत्मचरित्रांचे निकष वेगळे, आत्मगौरव करवून घेणे व आत्मक्लेश किती सहन केले याची तपशीलवार यादी लेखक लिहीताना दिसतात. आत्मचरित्रात प्रामाणिकपणा हा महत्वाचा गुण आहे. अन्यथा वास्तावाचे भान संपले की लेखक कसे वाहवत जातात हे बऱ्याच प्रसंगी जाणवते. इथे त्याचे निकष स्वरूप याबद्दल चर्चा विस्तार भयास्तवर अशक्य व अनावश्यक. तो एक संशोधनाचा विषय आहे. परंतू नाना फडणविसांनी अतिशय मोजक्या शब्दात पानिपत युध्दोपरांत झालेल्या हत्या, दुर्दशेचे चित्रण प्रभावी पण मोजक्या शब्दात मांडले आहे. पानिपतच्या वेळी नाना फडणवीस हा अवघ्या १९-२० वर्षाचा होता. अर्थात त्यानुसार त्याने १७४२ ते १७६१ पर्यंतचे अनुभवलेले जीवन साकारले आहे. त्याच्या जीवनात पानिपत ही एक महत्वाची घटना आहे. त्याच्या वर्णनामुळे पानिपत युध्द व युध्दोपरान्त दुर्दशेवर प्रखर प्रकाश पडला आहे.

या अशा प्रामाणिक वर्णनामुळे नानांच्या व्यक्तीमत्वाचा एक वेगळा पैलू व्यक्त होत असताना मराठयांच्या युध्दोपरान्त ससेहालपटीचे विदारक दारूण चित्र प्रत्ययास येते. इ. स. १८०० मध्ये नानाचा मृत्यू झाला नाना फडणवीस याची कारकीर्द अनेक गोष्टींनी गाजली. अनेक राजकीय घटना घडल्या हे आत्मचरित्र जर शेवटी लिहले असते तर पेशव्यांच्या राजकारणाचे अनेक पैलू अधिक स्पष्ट झाले असते. उदा. माधवराव, नारायणराव, सवाई माधवराव, बाजीराव रघुनाथ, रघुनाथ बाळाजी यांच्या कारकीर्दीवर अधिक प्रकाश पडला असता.

या व्यतिरीक्त बखरीचे अन्य काही प्रकारात वर्गीकरण समीक्षकांनी केले आहे. आज्ञापत्र हा राजनीती विषयक एक बखर प्रकार होय. काही बखरीची स्वरूप आख्यान काव्य सदृश आहे. त्यात प्रामुख्याने नीती-अनीती, सत्य-असत्य इत्यादी तत्वांचा पुरस्कार करून पुराण नायकाच्या महंनीय गुणाचे संस्कार राजकुलातील परिवारातील मुलांवर व्हावेत या दृष्टीकोनातून 'बकासुराची बखर, पांडवांची बखर यांची निर्मिती करवून घेतली आहे. त्याचबरोबर सत्पुरूषाचे चरित्र सांगण्याच्या भुमिकेतून व आपआपल्या सांप्रदायाचे महत्व पटवून देण्यासाठी सांप्रदायिक बखरीची निर्मिती झाली आहे. उदा. हनुमंत स्वामींची बखर, रामदासांची बखर या होत. या अशा बखरी म्हणजे १८ व्या शतकातील गद्य आख्यात काव्येच होत. विशेष घराण्याच्या बखरी याची निर्मिती वेगळया दृष्टीकोनातून झाली आहे. यात संपुर्ण गद्यकाव्याचा इतिहास सांगण्याचा लेखकाचा प्रयत्न दिसतो. वतने, जहांगिरी, इनाम मिळवणे, टिकवणे यासाठी काही बखरीची निर्मिती हेतूपुरस्पर झाल्याचे अभ्यासाअंती निष्कर्षावरून जाणवते. उदा. नागपूरकर भोसल्यांची बखर, पेशव्यांची बखर इत्यादी.

इतर काही बखर सदृश प्रकार वाका (पटवर्धनीवाका) कैफियती (भाउसाहेबांची कैफियत) थैली (होळकरांची थैली) अखबार यांचाही समावेश बखर वाङ्.मयात करावा लागतो. श्री. रं. कुलकर्णी यांना वार्तापत्रे मानतात. पक्षनिष्ठ धोरण, धन्याविषयक अफाट निष्ठा यातून काही ठिकाणी अकारण गौरव तर विरोधी लोकांवर अकारण टिका असे स्वरूप जाणवते. त्यामुळे एकांगीपणा व बढाईखोर प्रवृत्ती जाणवते. भाउसाहेबांच्या बखरीचा लेखक कृष्णाजी शामराव हा शिंदे यांच्या पक्षाचा असावा. कारण त्याने केलेल्या शिंदे घराण्याचा गौरव कदाचित अकारण नसेल पण होळकरांवर केलेली टिका कदाचित योग्य असूनही ती पक्षपाती वाटते. अर्थात लेखक आश्रित असल्यामुळे हे घडणे स्वाभविक. लोक शाहीत पक्षीय भ्रष्ट निष्ठा कोणत्या थराला गेल्या आहेत. याला संदर्भ किंवा पुरावा देण्याची गरज भासत नाही.

पुर्वजांचा पराक्रम व श्रुती, स्मृती, पुराणोक्ती धर्माचे पालन याच्या प्रभावाने बखरीचे स्वरूप पुराण कथेप्रमाणे बनले आहे. इतिहास म्हणून या बखरीचे मोल जरी साधारण असली तरी इतिहासाधिष्ठीत एक वाङ्.मय प्रकार म्हणून बखर वाङःमयाचे स्वरूप अनन्यसाधारण आहे. १८ व्या शतकात उमललेल्या या गद्य वाङ् मय पुष्पाने मराठीचे गद्य वाङ् मय समृध्द केले आहे. हे त्यांचे मराठी भाषेवर फार मोठे उपकार आहेत.

अशा रीतीने बखर वाङःमयाचे स्वरूप अभ्यासू जाता असे म्हणता येईल की बखरीची निर्मिती राष्ट्रीय भावनेतून झालेली आहे. इतिहासाला जवळीक साधणारी एका सुंदर वाङ् मय कृती म्हणजे बखर होय. तसेच १८ व्या शतकातील एक सुगंधीत वाङःमयपुरूष म्हणजे बखर होय.

बखरकारांनी राष्ट्रीय उत्थानाच्या भुमिकेतून बखरी लिहल्या. आदर्श नितिमुल्यांचे दर्शन घडावे, पराक्रमाची गाथा सांगून राष्ट्रप्रेम जागृत करणे यातून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे हे बखरकारांचे ध्येय होते. यासाठी पुराणशैलीचा आदर्श त्यांनी घेतला असला तरी बखरीचे अंतरंग अस्सल मराठमोळे आहे. त्यातील परंपरा मात्र राजकीय ध्येयवादी आहे. धन्याने दिलेल्या आदेशानुसार सहेतुक निर्मिती झाली असली तरी व्युत्पन्न अशा लेखकांनी बहुश्रूतपणे त्याचे लेखन केले व शौर्य, वीर, करूण प्रसंगी हास्य इत्यादी रसांचा उत्कर्ष साधला आहे.

**संदर्भ –** र. वि. हेरवाडकर, मराठी बखर, विनस प्रकाशन पुणे १९७५

श्री. रं. कुलकर्णी, प्राचीन मराठी गद्य, प्रेरणा आणि परंपरा, सिंधु प्रकाशन, मुंबई १९७०

पानिपथची बखर, रघुनाथ यादव चित्रे, सं.र.मु.जोशी, म.सा.प.आंध्रप्रदेश प्रकाशन, १९५५

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखर गद्य : प्रेरणा व स्वरूप

प्रा. डी. जे. दमामे
(मराठी विभाग) आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा

प्राचीन मराठी वाड्.मयात बखर वाड्.मयाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. काव्याच्या तुलनेने मराठी गद्याची निर्मिती अत्यल्प झाल्याचे जाणवते. असे असूनही ऐतिहासिक व वाड्.मयीन दृष्टीकोनातून बखरीचे महत्व अनन्यसाधारण आहे. पत्रे, फर्माने, राजाज्ञा इत्यादी प्रकार सोडले तर प्राचीन मराठी वाडःमयात गद्य वाड्.मय अल्प प्रमाणात निर्माण झाले. व मराठी गद्य वाड्.मयाच्या संदर्भात इसवीसनाचे १३ वे शतक अतिशय महत्वाचे ठरते. महानुभवाची ग्रंथ संपदा पाहिली की मन थक्क होते, लीळाचरित्र, गोविंदप्रभू चरित्र, दृष्टांतपाठ, स्मृतीस्थळ याचा मागोवा घेतला तर महानुभवाचे मराठी भाषेवर उपकार कोणीही विसरू शकत नाही.

प्रामुख्याने बखरीची निर्मिती १८ व्या शतकात झाली. तत्पुर्वी एकदम मंदावली होती. कारण सुमारे ३०० वर्षे यवनाच्या गुलामीत जगणाऱ्या मराठी माणसाचा पराक्रम लोप पावला होता. पंचहजारी, मनसबदारी, जहांगिरी, चोंभाई, निहाई यातच धन्यता मानणाऱ्या क्षत्रियाची अवस्था अतिशय दयनीय झाली होती.

या अशा तमोयुगात एकदम स्वातंत्र्याची पहाट उगवली ती थोर युगपुरूष शककर्त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपाने परंपरागत दबलेली कुचंबलेली मराठी माणसाची अस्मिता उफाळून आली शिवाजीनी फक्त स्वराज्य स्थापन तर केलेच तर त्यांचे सुराज्य ही केले. शिवाजीचे राज्य हे हिंदूचे राज्य नव्हते तर हिंदवी स्वराज्य होते. त्यामुळे जाती भेदाला थारा न देता सर्वधर्म समभावाची व धर्मनिरपेक्षवादाची संकल्पना अस्तित्वात आणली. दुर्दैवाने हया अशा गोष्टी लोकांना समजत नाहीत म्हणून वेगवेगळे झेंडे हवेतच फडकताना दिसतात. मातीशी त्याचे इमान जाणवत नाही.

माणसं पारखणे हा शिवाजीचा महान गुण होता. निष्ठावंत सहकारी निर्माण करणे हे केवळ शिवाजीच करू शकले. माणसाचे गुणदोष पारखून त्याला आपलेसे करणे व क्षमतेनुसार जबाबदारी स्वराज्याची स्थापना करणे हे फक्त शिवाजीलाच शक्य झाले आहे. त्यांच्या महान उमद्या पारखी वृतीमुळे तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे (दाऊदखान पुत्र पहिला कोतवाल, सिध्दी हिलाल, याहयाखान) यासाख्या निष्ठावान सरदारांनी स्वराज्यासाठी प्राणाचे मोल दिले. इथे ब्राम्हण मराठा असा भेद जाणवेल पण दाऊदखान चे योगदान महत्वाचे ठरते. पन्हाळगडाच्या वेढ्याने त्यावेळी सिध्दी हिलाल अतुलनीय पराक्रम गाजवला तो जखमी झाला पण त्यांचा मुलगा मृत्यू पावला. या उदाहरणावरून शिवाजीच्या उदारमतवादाचे स्वरूप स्पष्ट होते. पुण्याचा पहिला कोतवाल म्हणून सिध्दी हिलाल याची नेमणुक केली. यावर काय भाष्य करणार.

१६८० साली शिवाजींनी देह ठेवला १६८१ साली औरंगजेब महाराष्ट्र गिळंकृत करण्यासाठी दक्षिणेत आले. शिवाजीच्या मृत्यूनंतर संभाजी महाराजांनी प्राणाची बाजी त्यातून स्वराज्य राखण्याचा प्रयत्न केले. १६८९ साली संभाजी महाराजांचा खून झाला. राजाराम जिंजीस गेले तेथून युध्द चालूच ठेवले. १७०० मध्ये राजारामाचा मृत्यू झाला. १७०० ते १७०७ या कालखंडात राजारामची पत्नी ताराबाई हिने युध्द चालूच ठेवले. औरंगजेबासारख्या बलाढय शत्रुला टक्कर देण्याइतकी ताकद मराठयात नव्हती. होती ती फक्त शिवाजीप्रणीत राष्ट्राभिमानाची चेतना. केवळ चेतनेवरच मराठी अजिंक्य राहिले शेवटी दिल्लीश्वराला मराठवाडयाच्या भूमीतच चिरनिद्रा घ्यावी लागली. आणि मराठी स्वराज्य अजिंक्य राहिले.

**बखर लेखनाची प्रेरणा** : वरील प्रस्तावना प्रदीर्घ व अप्रस्तुत वाटणे, स्वाभाविक आहे. पण इतिहासाचे आकलन

झाल्याशिवाय वर्तमानाचा शोध घेता येत नाही. १७ व्या शतकात शिवाजीच्या रूपाने सळसळते चैतन्य अवतरले आणि वीरश्रीचा ओघ वाढू लागला. यातूनच पोवाडे बखरी, वाके, थैली याची निर्मिती सुरू झाली.

**बखर म्हणजे काय** : याबद्दल विव्दानात मत-मतांतरे आहेत. 'बखर' हा शब्द खबर या मराठी अरबी शब्दापासून निघालेला वर्ण विपर्यय होय. असे र. वि. हेरवाडकर यांचे मत आहे. श्री. रं. कुलकर्णी यांच्या मते पत्र लिहीण्यापुर्वी पत्राचे डावे बाजूस मराठीत क्षेम । कुशल असे लिहीतात तर उर्दुत खैर किंवा रब्बाखैर असा वापर आढळते. बखरीचे स्वरूप पत्रासारखेच असल्यामुळे रब्बाखैर व खैर बखर अशी ते व्युत्यती मानतात. रब्बाखैर क्षेम कुशल खैर वखैर यापासून 'बखर' या शब्दाची व्युत्यती मानावी लागतात.

**बखरीची निर्मिती प्रेरणा व प्रयोजन :** पुर्वजांच्या कर्तृत्वाचे पुढील पिढीस स्मरण व्हावे म्हणून राजाने किंवा आश्रयदात्याकडून पदरी असलेल्या आश्रित कारकून यांना आज्ञा करून बखरी लिहून घेतल्याचे जाणवते. घडलेल्या घटनांचा इतिहास जाणून घेण्याची प्रेरणा ही या मागे असावी. कारण प्रत्येक गोष्टीचे कुतहूल असते आणि कुतहल हे सार्वकालिक सत्य आहे. भाऊसाहेबांचा बखरकार कृष्णाजी शामराव हा बखर लिहताना प्रारंभी लिहतो आणि बखरीच्या शेवटी याप्रमाणे वर्तमान झाले. ''नजीवनखान प्यादा होता तो फर्जी झाला त्याने प्यादेमात केली. याप्रमाणे जाली हकीकत सेवेसी लिहीतो असे'' यावरून धन्याने आज्ञा केली व सेवकाने लिहून पाठवली यात बुध्दीबळाचे रूपक खुपच समर्पक वाटते. यावरून बखर निर्मिती स्वयंप्रेरित नसून परप्रेरीत असल्याचे जाणवते. मात्र या निर्मिती मागची प्रेरण उदात्त होती.

अशी आज्ञा देण्याचे कारण काय याचा उल्लेख मागे झाला आहे. राजाने सांगितले व सेवकाने लिहले हा रूक्ष व्यवहार नव्हता त्यांची वृत्ती सांगकाम्या कारकुनाची नव्हती. ते स्वतः विव्दान व रसिक होती.या वाङ् मय प्रकाराने आपल्या कालखंडात गद्य निर्मिती करून इतिहास व ललित याचा सुंदर समन्वय साधला आहे. त्या दृष्टीकोनातून बखरीचा भाषिक,सामाजिक, धार्मिक, राजकीय, वाडःमयीन इत्यादी अनेक अंगाने अभ्यास करणे अतिशय महत्वाचे वाटते.

**बखर एक वाड्.मय प्रकार** : बखर हा स्वतंत्र व संपन्न वाङ् मय प्रकार आहे. बखरकार भुतकाळातील व्यक्तींना, घटनांना शब्द सामर्थ्याव्दारे जिवंत करून वर्ण्य विषयाशी एकरूप होवून सहजतेने पुनःप्रत्यय घडवितो. त्याचबरोबर बखरीत प्रसंगी चित, रस, परिपोष, शैलीदार भाषा, दाखले, दृष्टांत, म्हणी, सुभाषिते, दोहे याचा सहज सुंदर वापर असतो. घडलेल्या घटनांची मांडणी यात आहे. बखर वाड्.मय लिहीत असताना लेखकासमोर पुराणाचा आदर्श होता. पौराणिक अद्‌भुत कथेचा अतिशयोक्तीचा प्रभाव पडल्यामुळे बखरीची परंपरा पौराणिक आहे. हे श्री. र. कुलकर्णी यांचे मत सर्वसामान्य झाले आहे.

याची ही काही कारणे आहेत. त्या काळात केवळ अवतारी पुरूषाची अद्‌भूत चरित्रे रचण्यात संत व पंडित कवी स्वतःला धन्य समजत होते. साहित्य हे कालसापेक्ष असते हे मान्य करून सुध्दा त्यात काही त्रुटी जाणवतात. ज्या राम रावणाच्या युध्दात मोरोपंत रमले होते. त्याचकाळात पानिपत युध्द झाले होते. मोरोपंत मात्र बारामतीच्या बापूजी नाईकाच्या महालात रामकथा सांगण्यात गुंतले होते. पुराणकथा ऐवजी वास्तव व वर्तमानकथा मोरोपंतांनी रचली असती तर ऐतिहासिक जाऊ द्या. वाड्.मयीन दृष्टया ते काव्य रमणीय उतरले असते.बखरकार तरी याला अपवाद असणार? लिहावयाची आज्ञा त्याला झाली होती. आता कसे लिहावयाचे ते बखरकाराच्या प्रकृतीधर्मानुसार त्याच्या समोर लेखनाचा आदर्श होता. तो पुराणिक वर्गाचा त्यमुळे बखरीचे स्वरूप पुराणपरंपरेचे असले तरी या सर्व गोष्टीपलिकडे जावून तत्कालीन, राजकीय घटना व सामाजिक व धार्मिक जीवन व व्यक्ती विशेष यांच्या विशेष चित्रणामुळे बखरीला पुराणापेक्ष वेगळे महत्व प्राप्त झाले

आहे.

**बखरीचे ऐतिहासिक स्वरूप** : ऐतिहासिक दृष्टीकोनातून बखरीला दुय्यम स्थान आहे याचे कारण बखरीची अनैतिहासिकता स्वाभाविकच आहे. बखरकारांनी मी इतिहास लिहीत आहे. अशी भुमिका कधीच मांडली नाही. त्याच्या आज्ञेनुसार तो फक्त घटनांची तपशीलवार नोंद घेत आहे. आणि इतिहासकारांनी बखरीकडून अशी अपेक्षा का बाळगावा? मुळात इतिहास लेखन ही कल्पनाच भारतीय साहित्यात रूजली नव्हती. १८७१ मध्ये ग्रँट डफ नावाच्या इंग्रज अधिकाऱ्याने मराठयांचा गाळीव व चुकीचा इतिहास लिहला. त्याला प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्नात पाव शतक खर्ची गेले आता काही सुसंगत इतिहास लोकांना समजू लागला आहे. प्रांरभी बखरीला इतिहास म्हणून निकष लावले गेले. नंतर जसजसे ऐतिहासिक दस्तऐवज सापडत गेली. तसतसे इतिहास संशोधनाचा भ्रमनिरास झाला. त्यामुळे ऐतिहासिक संदर्भात बखरीला दोष देणे योग्य नाही. मात्र वाङ्.मयीन दृष्टीकोनातून १८ व्या शतकात उमलेला तो एक गद्य वाङ् मय प्रकार आहे हे सहज मान्य करावे लागते.

**बखर आणि इतिहास** : बखरकार ऐतिहासिक घटना देवून त्यावर भाष्य करतो. घटना व कल्पित प्रसंगाच्या सहाय्याने त्यात रंजकता निर्माण करतो. इतिहास फक्त घटना देतो, त्यावर भाष्य करत नाही. बखरकार प्रसंगाचे व्यक्तीचे व काळाचे चरित्र सांगतो बखरीत इतिहास कथन असले तरी त्याचे ऐतिहासिक प्रामाण्य बेताचे असते. इतिहास म्हणून बखरीवर सर्वथैव विसंबून राहता येत नाही. परंतू इतिहासाच्या चौथऱ्यावर बखरीची इमारत उभी आहे. भाऊसाहेबांच्या बखरीतला घटना प्रसंग हे अनेक बाबतीत तार्कीक कसोटीवर प्रमाण ठरणाऱ्या वाटतात. सभासदांच्या बखरीत असलेले शिवाजी महाराजांचे चरित्र हे सुध्दा इतिहासापेक्षा अधिक वाटते तरीसुध्दा बखर म्हणजे प्रमाण इतिहास पुर्णतः मानता येत नाही.

**समारोप** : येथपर्यंत बखर निर्मितीची पार्श्वभुमी बखरीची व्याख्या, प्रेरणा व प्रयोजन, वाडःमयीन स्वरूप यावर असलेला पुराणाचा प्रभाव आणि इतिहास व बखर यातील साम्यभेद अभ्यासण्याचा येथे अल्पसा प्रयत्न केला. मागे उल्लेख केल्याप्रमाणे सामाजीक, धार्मिक, राजकीय व आर्थिक अभ्यास करणे मनोरंजक वाटते नव्हे. पुर्व संस्कृती व इतिहास समजून घेण्यासाठी बखर वाडःमयाचा अभ्यास सर्वांगीण व्हावा एवढीच प्रामाणिक इच्छा.

**संदर्भ ग्रंथ सुची :**

१. मराठी वाङ्ःमय कोश – खंड चौथा, समिक्षा संज्ञा– समन्वयक संपादक – विजया राजाध्यक्ष महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई – प्रथमावृत्ती नोव्हेंबर २००२ पृ.क्र.२३२

२. मध्ययुगीन वाङ्ःमयीन प्रवाह– MAR २५१– य.च.म.मु.विद्यपीठ, नाशिक – पृ.क्र.४८

३. प्राचीन म.वा. इतिहास – भाग सातवा– डॉ. देशपांडे अ.ना., व्हीनस प्रकाशन पुणे, पृ.क्र.३५६

४. मध्ययुगीन वाङ्ःमयीन प्रवाह – MAR २५१– य.च.म.मु.विद्यपीठ, नाशिक – पृ.क्र.४९

५. प्राचीन म.वा. इतिहास – भाग सातवा– डॉ. देशपांडे अ.ना., व्हीनस प्रकाशन पुणे, पृ.क्र.३६२

६. मराठी बखर – र. वि. हिरवाडकर

ISBN 978-93-5196-698-2

# इतिहासाशी समांतर वाङ्‌मयीन प्रवाह : बखर

प्रा.एकनाथ शामराव पाटील
प्रमुख मराठी विभाग,मा.श्री.आण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,हातकणंगेल, जि.कोल्हापूर.

'खबर देणे' यापासून 'बखर' हा शब्द आला असावा. प्राचीन मराठीतील वाङमय हे अधिकता काव्यत्मक स्वरूपाचे होते. ज्योतिष, आठवणी, कथा, चरित्र असे लेखन पूर्वी झाले. तेही यादवकाळात मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. नाथांचे, ख्रिस्त अनुयायांचे पंचतंत्र असे लेखन या काळात थोडेफार उपलब्ध होते. शिवकाळ आणि पेशवेकाळात मात्र मराठी गद्य लेखनाचा अवतार तेजस्वी आणि कलात्मक होता. या काळातले वाङ्‌मय राजकीय आणि कौटुंबिकतेने समृध्द होते, तसेच या काळातले लेखन बखरवजा होते. ऐतिहासिकतेपेक्षा वाङमयीन सौंदर्याचा साक्षात्कार बखर वाङ्‌मयाद्वारे होतो. म्हणून बखर वाङ्‌मय म्हणजे मराठेशाहीच्या तेजस्वी पराक्रमाचे नंदादीप होते.

**बखर वाङ्‌मयाचा उगम :**

'बखर' म्हणजे वार्ता, समाचार, हकिगत, वृत्त या अर्थाचा अरबी शब्दाचा विपर्यास्त होऊन 'बखर' शब्दाची निर्मीती झाली आहे. तर 'बक' म्हणजे 'बकणे' 'बोलणे' अशीही उत्पती श्री.वि.का.राजवाडे यांनी सांगितली आहे. बखरीची व्याख्या मोल्सवर्थ यांनी 'Any history narration memoir and chronicle in prakirit prose' अशी केली आहे. तर मेजर कँडी यानी बखरीबद्दल 'A written narrative or history on prakrit prose' विचार सांगितला आहे.

'बखर' शब्दाचा रूढ अर्थ 'राजकीय स्वरूपाचे ऐतिहासिक लेखन' असा आहे. गद्यातील इतिहास असेही त्याचे स्वरूप असू शकते. मुस्लीमात 'तवारिखा' लिहिण्याची पद्धत होती म्हणून मुसलमानांच्या सहवासाने त्यांच्या 'तवारिखा' पाहून मराठयानाही 'बखरी' लिहीण्याची प्रथा सुरू केली. एकंदरीत इतिहासाचे वृत्तकथनाच्या गरजेतून बखर वाङमयाची निर्मीती झाली.

मराठी वाङ्‌मयाच्या इतिहास बखर वाङ्‌मय फार महत्व आहे. इतिहास आणि ललित साहित्य याचे मिश्रण असणारा वैशिष्टपूर्ण लेखनप्रकार म्हणजे बखर. इतिहासातील घटनांचा वस्तुनिष्ठ पण तपशीलवार असा कलात्मक आणि सौदर्यपूर्ण अविष्कार म्हणजे बखर होय. लीळाचरित्र, गोंविदप्रभू इत्यादी काही महानुभावीय ग्रंथ, नाथानी लिहीलेली अर्जदस्त कऊलपत्रसारखी छोटी प्रकरणे, फादर स्टिन्सन यांच्या ख्रिस्तपुराणास लिहिलेली प्रस्तावना. एवढे लेखन सोडले तर मध्ययुगीन मराठीत गद्य लेखन फारसे झालेले नाही. राजकीय क्षेत्रात संपर्काच्या निमित्ताने लिहिलेली ऐतिहासिक कागदपत्रे हा त्यानंतरच्या काळातील प्राचीन मराठी गद्याचा ठेवा होय. त्यासोबतच मराठी बखर वाङ्‌मयाचीही निर्मिती होती. लेखनातील मराठी मोळेपणा, भाषेचा खानदानीपणा आणि शैलीदार लेखन यामुळे बखर हा प्राचीन मराठीतील अस्सल देशी बाण आहे असे म्हटले पाहिजे.

मराठीशाहीच्या उदयाबरोबर बखर वाङ्‌मयाने लक्षणीय रूप धारण केले आणि पेशवाईत तो प्रकार समृध्द झाला. काळाबरोबर याला उतरती कळाही लागली. साहित्य हे समाजाचे अपत्य असते असे म्हणतात, ते बखरीलाही लागू पडते. काळ व त्या काळातील माणासाचे कर्तृत्व व त्यानिमित्याने एकूणच तत्कालीन मानवी जीवन आणि त्या काळातील सांस्कृतिक स्पंदने यातील एखादा वाङ्‌मयीन प्रवाह मूळ धरतो आणि त्या कालखंडातील प्रेरणा कर्तृत्व व सांस्कृतिक वातावरण यांच्या अस्ताबरोबर तो वाङ्‌मय प्रवाहही थांबतो. हे बखर वाङ्‌मयाचा अभ्यासावरून लक्षात येते. मराठी राज्य व

ISBN 978-93-5196-698-2

त्यातील राजकीय घडामोडी हिच बखरीच्या लेखनामागील प्रेरणा आहे असे म्हणता येईल. या घडामोडीच्या 'हकीगती लिहिणे' हेच मुख्य प्रयोजन बखरी लिहिण्याच्या मागे होते. हकिगती लिहिण्याच्या निमित्ताने तो काळ आणि त्या काळातील सामाजिक राजकिय व सांस्कृतिक जीवन उलघडून दाखवला. ऐतिहासिक घडामोडीच्या निमित्ताने शिव छत्रपतीसारख्या कर्तृत्वान व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते. नारायणरावांच्या वधासारख्या नानाविध नाट्यपुर्ण प्रसंगाच्या उकलीतून तत्कालीन विचार सरणी जीवनमूल्य व सांस्कृतिक धारणा याचाही अविष्कार होतो. म्हणून बखर वाङ्मयाच्या उगमाचा उहापोह करणे गरजेचे वाटते.

लीळाचरित्रातील कान्हेरदेव याने लोणार तीर्थावर श्रीचक्रधर स्वामीचे दर्शन घेतल्याची आख्यायिका स्वतंत्र कथेचे रूप घेऊन येते. स्मृतिस्थळातील स्मृती १४५ ते १५० पर्यंतच्या स्मृतीमधून रामदेवराजाची पत्नी कामाइसा यांच्या सती जाण्याची करूणकथा आहे. ही कामाइसाची कथा आणि शाहू महाराजाच्या बखरीतील सकवारबाईच्या सती जाण्याच्या कथा एकसारख्या आहेत. या घटना कथा वाङ्मयाच्या परंपरा सांगणाऱ्या आहेत. बळवंतराव मेहंदळे च्या पत्नीचे सती जाण्याचे हृदयद्रावक वर्णन भाऊसाहेबांच्या बखरीत आले आहे. या तिन्ही कथा वाङ्मयाच्या परंपरा साधर्म्य दाखवणाऱ्या आहेत. अर्थात बखर वाङ्मयाची सुरूवात या कथा वाङ्मयापासून झाल्या आहेत असे म्हणावे लागेल.

**बखरीचे ऐतिहासिक महत्व :**

समक्ष अवलोकन करून व ऐतिहासिक कागदपत्राच्या नोंदी यांच्या सहाय्याने बखरकाराने केलेले लेखन वृत्तकथन म्हणून ग्राह्य मानता येईल. स्थलकाल व्यक्तीविपर्यास, प्रसंगकारण विपर्यास, कल्पितता, दंतकथा, अदभूतता, संदिग्धता यामुळे ऐतिहासिक सत्याला अनेकवेळा बाधा येते. पण बखरीत पूर्ण सत्याचा अभाव असतो असे म्हणता येणार नाही. सत्यशोधन आणि चिकित्सा ही बखरकाराची भूमिका नसते, तर बखरकार अश्रित असल्याने धन्याचा गौरव, स्वामीनिष्ठा व्यक्त करण्याचा प्रयत्न बखराकाराचा असतो.

प्राचीन मराठी गद्य वाङ्मयाच्या इतिहासात स्वतंत्र वाङ्मयकार म्हणून बखरीचा उल्लेख केला जातो. वेगळा विषय आणि वेगळी लेखनपद्धमुळे हा लेखनप्रकार वैशिष्टयपुर्ण वाटतो. बखरकार हा कलाकार आहे व त्यास बखरीचे केवळ नोंदवजा लेखन करावयाचे नसून तो सजवायचा आहे. एक वाङ्मयीन कलाकृती म्हणून नाटयात्मकता साकारली जाते हे बखर लेखनाचे सामर्थ्य आहे.

रेखीव रचना, कल्पनाचातुर्य निवेदनकौशल्ये ही बखरीची वैशिष्टये. व्यक्तिदर्शन वर्णन पद्धती रसपरिपोष आणि भाषाशैली या वाङ्मयीन गुणवैशिष्टयाकडे लक्ष ठेऊन लेखन केल्यामुळे हे ऐतिहासिक लेखन आकर्षक आणि मनोरंजक झाले आहे. प्रौढ व रसाळ भाषा, संस्कृत आणि फारसीप्रचुर्य पौराणिक दाखले, अलंकार, सुभाषिते, वाक्यप्रचार, म्हणी याचा वापर, दंतकथा आख्यायिकांचा आश्रय, सैन्य, कोट, दुर्ग यांची जमाखर्चाची दिलेली माहिती. कधी प्रसंगनिर्मितीसाठी लहान सुटसुटीत वाक्ये तर कधी तपशीलवार निवेदनसाठी लांबलचक व शिथील वाक्यरचना, निवेदनात कधी आटोपशीरपणा, तर कधी हरदासी थाट असे या लेखनशैलीचे स्वरूप आहे. बखरीतील भाषा ही साधी गद्य नीरस नुसतीच निर्जीव वर्णन करणारी ललिततर साहित्याची भाषा नाही. तर जिवंत रसरसीत आणि मनोहर अशा वाङ्मयीन मूर्तीचे दर्शन देणारी ललित वाङ्मयाची भाषा आहे.

बखर वाङ्मयात कल्पना विलासाबरोबर राजकीय आणि लौकीकजीवनात तिला महत्व आहे. वाङ्मयीन

कौशल्याबरोबर काही ऐतिहासिक वैशिष्ट्यांचाही प्रत्यय घडतो त्या दृष्टीने बखरीचे वर्गीकरण केले आहे.

**१. चरित्रात्मक बखरी :** ९१ कलमी बखर सभासद बखर, चित्रगुप्त बखर, शाहू महाराज यांची बखर, शिवदिग्विजय बखर, श्री.शिवाजीप्रताप बखर इत्यादी.

**२. युद्धकथात्मक बखरी :** राक्षतागडची बखर, भाऊसाहेबांची बखर, होळकरांची थैली आणि पानिपतची बखर.

**३. स्फुट कथात्मक बखरी :** साष्टीची बखर, खडर्याच्या स्वारीची बखर, सनपुरीची बखर आणि हरिवंशाचा बखर इत्यादी.

**४. कथात्मक बखरी कालसापेक्ष :** महिकावतीची बखर, पेशव्यांची बखर, मराठी साम्राज्याची छोटी बखर, शेडगावकर बखर, होळकरांची कैफियत आणि नागपूरकर भोसले यांची बखर इत्यादी.

चित्रगुप्ताची बखर मधील कथा मनाला भावणारी आणि सहज नजरेत भरणारी असे लेखन आहे. तर शिवदिग्विजय बखर आख्यानाच्या धतीवरची आहे. अर्थात व्याख्यानाच विस्तार आणि लेखकाच्या प्रतिभाव्यापारामुळे रूप, रंग, रस असे साहित्यिक गुणधर्म यात आले आहेत. अशाच पद्धतीने साहित्यनिर्मितीचे भान ठेऊन आनंद, रसाळ कथेचा अनुभव देणारी श्रीशिवाजीप्रताप ही बखर आहे.

छ.शाहुमहाराजांच्या बखरीत श्रोत्याची चोखदंळवृत्ती बखरकाराचे कथनकौशल्ये यांचा सुंदर मेळ घातलेला दिसतो. या बखरीप्रमाणेच पानिपतची बखर, भाऊसाहेबांची बखर इत्यादी बखरीमधील कथा व्यापक तर कधी अल्प अवकाशात व्यक्त झाली आहे. बखरकाराच्या अभिव्यक्तीत वाङ्मयीन सौंदर्य पहायला मिळते.

हरिवंशाच्या बखरीत लहान लहान कथा आल्या आहेत. बखरकाराचा अविष्कार आणि वैशिष्टपूर्ण निवेदनशैली यामुळे बखरीचे वाङ्मयीन सौंदर्य अधिकच खुलून दिसते. सरळ साधे रांगडेपणा बखरीने स्वीकारला आहे. यात इतिहासकथा निवेदनात प्राधान्य असले तरी रचनावैशिष्ट्या बरोबर मानवीजीवनाचे दर्शन घडवणारा व इतिहासाशी समांतर प्रवास करणारा असा वाङ्मयीन प्रवाह म्हणजे बखर आहे.

**संदर्भ :**


१) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल.रा.नसिराबादकर.

२) प्राचीन मराठी गद्य प्रेरणा आणि परंपरा, डॉ.श्री.र.कुलकर्णी.

३) मराठेशाहीतील पत्ररूप गद्य, डॉ.पवार सुधाकर

४) बखर वाङ्मय : उद्गम आणि विकास, डॉ.संकपाळ बापूजी.

५) मराठी बखर गद्य, ग.ब.ग्रामोपाध्ये.

६) मराठी बखर, र.वि.हेरवाडकर.

७) ऐतिहासिक पत्रबोध, सरदेसाई गो.स.

ISBN 978-93-5196-698-2

# सभासद बखर : एक शिवकालीन दस्तऐवज

प्रा. आर. डी. कांबळे
मराठी विभाग,कला महाविद्यालय, कोवाड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर

बखर वाङ्मय हे प्राचीन मराठी गद्याचे एक भव्य दालन आहे. बखर म्हणजे हकिकत. बहुधा खबर या फारशी शब्दाचा वर्णविपर्यय होऊन अथवा'बखैर' या शब्दापासून बखर हा शब्द बनला असावा. बखर हा शब्द मुसलमानपूर्व काळापासून शालिवाहनाची बखर, विक्रमाची बखर, पांडवांची बखर इत्यादी शब्दप्रमाणे महाराष्ट्रात प्रचलित होता. १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात स्वराज्य स्थापना होऊन मराठीला जेंव्हा राजभाषेचे स्वरुप प्राप्त झाले तेव्हा तलवारबहाद्दरांचे पराक्रम वर्णन करण्यासाठी कलम बहाद्दरांची लेखणी कुरकुरु लागली. या काळातील गद्य-ग्रंथ प्रामुख्याने बखरवजा असून त्यावर स्वराज्याचे तेज फाकलेले स्पष्ट दिसते.

मुसलमानांच्या सहवासाने त्यांच्या तवारिखा पाहून मराठ्यांनीही बखरी लिहिण्याचाच प्रघात पाडला असावा. बखरींचे लेखन मुख्यत: स्वराज्याच्या काळात झालेले असले तरी त्यांची परंपरा अशी पुरातन आहे. वि. का. राजवाडे यांनी पाहिलेली जुन्यातली जुनी बखर म्हणजे 'शालिवाहनाची बखर', महानुभावांनी लिहिलेल्या सिंधणादि यादवाच्या बखरी ची काही त्रुटीत पानेही त्यांच्या अवलोकनात आलेली होती. हेमाडपंती बखरीचीही त्यांनी नोंद केलेली आहे. परंतु त्यानंतरची उपलब्ध असलेली जुन्यातली जुनी बखर म्हणजे माहिकावतीची उर्फ माहिमची बखर होय. यानंतरची उपलब्ध बखर म्हणजे इ.स. १५६५-६६ मधील 'राक्षस-तागडीची बखर', मराठ्यांच्या स्वराज्यापूर्वीच्या या बखरी. या नंतर पाचपन्नास वर्षांनी भोसल्यांचे कूळ जन्मास आले आणि स्वराज्याचा पाया घातला गेला होता. या स्वराज्य स्थापनेपासून तो शनिवारवाड्यावर इंग्रजीचा बावटा उभारला जाईपर्यंत साधारण दोन-अडीचशे बखरींचे लेखन झाले असावे. अव्वल इंग्रजी आमदानीतही मराठे सरदारांच्या वतनासाठी म्हणून काही बखररुप लेखन झाले.

बखर हे तत्कालीन महत्वाच्या घटनांचे वृत्तांतकथन असते त्यातील तपशील पुराव्याने सिद्ध होणारा असतो, त्याची पातळी प्रत्यक्षाचीच असते. बखरींकडे गद्य-सारस्वताचा स्वतंत्र विकास म्हणून पाहिले जाते. इतिहासाचा संबंध जे घडले किंवा जे घडत आहे त्याच्याशी आहे. त्याचे काटेकोर वस्तुनिष्ठ प्रतिपादन ही त्याची प्रतिज्ञा असते. साहित्याची सृष्टी कल्पनेची अन् इतिहासाची सृष्टी ही वास्तवाची असते. बखरी या दोन्हींच्या सीमारेषेवर उभ्या असतात. इतिहास आपली प्रकृतिसिध्द सीमारेषा ओलांडून साहित्याच्या प्रांतात प्रवेश करते. साहित्य स्वत:च्या प्रकृतीविरुध्द नोंदलेल्या प्रत्यक्षाची, खऱ्याखुऱ्या सर्जनाच्या आड येणारी बंधने स्वच्छेने स्वीकारीत असते. त्यातून बखरीचे साहित्यस्वरुप घडत जाते. बखरीचे निवेदन हे प्रत्यक्षाचे असते. पण ते केवळ वृतांतकथन नसते. कागदोपत्री विखुरलेल्या आणि इतिहासाने नोंदलेल्या व्यक्ती व घटना यातून बखरकार आपल्या अनुभवांची अर्थपूर्ण इमारत उभी करत असतो त्यामुळे बखर एका व्यक्तिमत्वाला जाणवलेले, त्याने साक्षात केलेले ऐतिह्य अनुभवचित्र ठरते. इतिहासाची आलेली अनुभूती या दृष्टीने अनन्यसाधारण असते. बखरकार कोरडेपणाने निवेदन करीत नसून तिचे निवेदन कल्पकतेने करतो. त्यामुळे बखरीवर साहित्याची कांती चढू लागते, बखरकाराचा हेतू इतिहासलेखनाचा नसून राजकीय जीवनात घडलेली हकिकत सांगण्याचा असतो. एखादी साहित्यकृती निर्माण करावी असा हेतू नसतो तरीही बखरींमध्ये साहित्यगुण आढळतात.

बखरकार हे फडावर, दप्तरात काम करणारी अशी सामान्य कारकुनी पेशातील माणसे, आपल्या आश्रयदात्यांच्या स्वकीयांच्या पराक्रमाचा वृत्तांत लिहून ठेवणे हा त्यांच्या लेखनाचा प्रमुख हेतू असतो. त्यांच्या लेखनात आपोआप जिव्हाळा येतो. बखरकाराचा प्रमुख हेतू म्हणजे इतिहासकाळातील व्यक्ती व प्रसंगाचे चित्रण करणे हा होय. बहुतेक बखरींचे लेखन हे कुणाच्या ना कुणाच्या तरी आज्ञेवरुन झालेले आहे दिसते. म्हणजेच हे लेखन उत्स्फूर्त नाही तर परप्रेरित आहे.

शिवपूर्वकालापेक्षा शिवकाळात बखरी लिहिल्या गेल्या. त्यातील निम्या शिवचरित्रपर आहेत. पण सभासदांच्या बखरीशिवाय समकालीत अशी दुसरी एकही बखर नाही. बहुतेक शिवचरित्रपर बखरी उत्तरकालीनच आहेत. कृष्णाजी अनंत सभासदांच्या बखरीपासून मराठीत राष्ट्रीय भूमिकेने राष्ट्रपुरुषांबद्दल ऐतिहासिक लेखनाला सुरुवात झाली. स्वराज्याच्या उदयाबरोबर बखरींचा उदय झाला. स्वराज्यसंस्थापकाचे मराठीतील पहिले समकालीन चरित्र म्हणून ऐतिहासिकदृष्ट्या सभासद बखर महत्वाची ठरते. सभासद बखरीत शिवाजीराजांनी स्वराज्यस्थापनेसाठी उभारलेली मावळ्यांची संघटना, चार पातशाह्यांशी दिलेली लढत, स्वराज्यस्थापना, अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानाचे परिपत्य, आग्र्याहून सुटका, त्यांची शासनव्यवस्था, आरमार, राज्याभिषेक, व्यंकोजीप्रकरण इत्यादी महत्वपूर्ण ऐतिहासिक घटनांचे कथन केले आहे.

शिवरायांच्या व्यक्तिमत्वाचे अत्यंत रेखीव प्रतिबिंब सभासद बखरीत आलेले आहे. पारतंत्र्यातून स्वातंत्र्याकडे वाटचाल करण्यासाठी शिवरायांनी केलेले अनंत प्रयत्न व त्यांची फलश्रुती यांची नोंद सभासदकाराने केलेली आहे. यातील सर्वच प्रसंग स्वराज्यस्थापना व स्वराज्याचे संवर्धन या केंद्रिभूत घटनांशी संबंध आहेत. म्हणूनच सभासद बखर ही एक चरित्रात्मक बखर म्हणून ओळखली जाते.

शिवछत्रपतींचे चरित्र हे कृष्णाजी अनंत सभासद याने राजाराम महाराजांच्या आज्ञेने लिहिले आहे. तो शिवाजीराज्यांच्या राज्यकारभारात प्रविष्ट असावा. (छ. शिवाजीराजे यांची बखर, प्रास्ताविक पृ. ३) हा राजारामाच्या पदरी असून याला शिवाजीच्या काळातील चांगली माहिती असावी असे बखरीच्या सुरुवातीपासून दिसते. राजारामाने जिंजीस अष्टप्रधानांच्या ज्या नेमणूका केल्या त्यात प्रल्हाद निराजीचा हस्तक कृष्णाजी अनंत सभासद यास मोरेश्वर पिंगळे या पेशव्यांचा मुतालिक नेमिले, चंदी हे या चरित्राचे लेखन स्थळ आहे. राजारामाबरोबर जी अत्यंत विश्वासू व निवडक मंडळी जिंजीच्या प्रयाणाच्या वेळी गेली, त्यात चित्रकार कृष्णाजीपंत होते. हे विशेष महत्वाचे होय. हा मजकूर पत्रात्मक असून त्यात 'चरित्र' असे आरंभी व 'चरित्र आख्यान' असे म्हटले तरी 'हि बखर संपूर्ण जाहली' अशी शेवटी नोंद आहे. 'शिवछत्रपतीचे बखर' हे काव्येतिहासकारांनी संपादनाच्या वेळी नामकरण केले सभासदाची बखर हे नाव विशेष रुढ आहे.

शिवचरित्रातील हकींगत सांगताना लेखक लिहितो – 'राजियाने भेटी देता खानाने राजियाची मुंडी कवटाळून खांकेखालें धरिली आणि हात्तीची जमदाड होती तिचें मेण टाकून कुशीस राजियाचे चालविली. तो आंगात जरीची कुडती होती त्यावरि खरखरली आंगास लागली नाही. हे देखोन राजियांनी डावे हाताचें वाघनख होतें, तो हात पोटांत चालवला. खानानें अंगात झगाच घातला होता. वाघनखाचा मारा करितांच खानाची चरबी बाहेर आली. दुसरा हात, उजवे हातचे बिचवियाचा मारा चालविला. ऐसे दोन वार करुन मुंडी आसडून चौथरियाखालें उडी घालोन निघोन गेले (२०) या वर्णनात राजियानें भेटी देता या शिवाजीच्या पूर्वसंकेतात्मक कृतीला खानानें राजियाची मुंडी कवटाळून खांकेखालें धरिली' या अफजलखानाच्या दगाबाज कृतीने दिलेला प्रतिसाद व त्याचे आणि हातीची जमदाड होती तिचें मेण टाकून कुशीस राजियाचे चालविली हे स्वाभाविक पण भीषण पर्यवसान यांतील विरोधाभास नाट्यात्मक आहे. खानाची जमदाड शिवाजीच्या जरीच्या कुडतीमुळे खरखरली हे अर्थानुकारी वर्णन हृद्य आहे. 'आंगास लागली नाही' हे त्याचे पुढील स्पष्टीकरण त्या भयंकर प्रसंगातील अनपेक्षिततेची यथार्थ कल्पना आणून देते. पुढे शिवाजीने वाघनख असलेला डावा हात खानाच्या 'पोटांत चालवला' या शब्दसंहतीत शिवाजीच्या नैतिक भूमिकेला योग्य पुष्टी मिळाली आहे. 'खानाने आंगांत झगाच घातला होता' या वस्तुस्थितीमुळे शिवाजीच्या वाघनखाच्या माऱ्याचे 'खानाची चरबी बाहेर आली' हे पर्यवसन स्वाभाविक वाटते. त्यानंतर शिवाजीच्या उजव्या हाताने 'बिचवीयाचा मारा चालविला' यात शिवाजीच्या प्रसंगावधानची व खानाच्या अगतिकतेची सूचना आहे. व 'ऐसे दोन वार करुन मुंडी आसंडून चौथरियाखालें उडी घालोन निघोन गेले' या शेवटच्या

प्रसंगवर्णनात अर्थवाहकता निर्माण होते.

त्याचप्रमाणे सालेरीच्या युध्दाचे चित्रदर्शन पुढील प्रसंगातून दिसते. प्रतापराव, सरनोबत व मोरोपंत पेशवे 'उभयंता सालेरीस पावले. एकतर्फेने लष्कराने धाडी घातली, एकतर्फेने मावळे लोक शिरले आणि मारामारी केली मोठे युध्दा जाहाले. चार प्रहर दिवस युध्द जाहले. मोघल, पठान, रजपूत, रोहिले तोफांची हत्ती, उंटे आराबा घालून युध्द जाहाले. युध्द होताच पृथ्वीचा धुराळा असा उडाला की, तीन कोस औरस, चौरस आपले व परके मानूस दिसत नव्हते. हत्ती रनास आले. दुतर्फा दहा हजार मानूस मुर्दा जहाले. उंट, हत्ती गणना नाही. रक्ताचे पुर वाहिले. रक्ताचे चिखल जहाले त्यामध्ये रुतो लागले, असा कर्दम जाहाला. मारता मारता घोडे जिवंत उरले नाहीत. जे जिवंत सापडले ते सहा हजार घोडे राजियाकडे गणतीस लागले. सव्वाशे हत्ती सापडले. सहा हजार उंटे सापडली. मालमत्ता, खजिना, जड जवाहिर, कापड अगणित बिछाईत हातास लागले. बेविस वजिर नामांकित धरिले. खासा इखलास खान व बेलोल खान पाडाव जाले. ऐसा कुल सुभा बुडविला. हजार दोन हजार सडे सडे पळाले असे युध्द जाले'. या वर्णनात मराठ्यांच्या पराक्रमाच्या पार्श्वभुमीवर युध्दाची भिषणता दिसून येते.

शिवाजीच्या देहावसानाचा असाच प्रसंग उत्कट आहे, राजास व्यथा ज्वराची जाहाली. राजा पुण्यश्लोक कालज्ञान जाणे. विचार पहाता पहाता आयुष्याची मर्यादा जाली असे कळून... मातब्बर लोग जवळी बोलावून आणिले मग त्यास सांगितले की, 'आपली आयुष्याची अवधी जाली. आपण कैलासास श्रीचे दर्शनास जाणार... परंतु मज माघारे हे राज्य संरक्षण करणार ऐसा पुत्र दिसत नाही'. येणे प्रमाणे राजे बोलिले. सर्वांचे कंठ दाटून नेत्रापासून उगम स्त्रवू लागले. परम दुखः जाले. त्याउपरी राजे बोलिले की, तुम्ही चुकुर होवू नका हा तो मृत्यू लोकच आहे... आता अवघे बाहेर बैसा. आपण श्रीचे स्मरण करतो.म्हणोन अवधियास बाहेर बसविले आणि राजे यांनी श्री भागिरथीचे उदय आणवोन स्नान केले. भस्म सारण करुन रुद्राक्ष धारण केले आणि योगाभ्यास करोन आत्मा ब्रम्हांडास नेऊन दशद्वारे फोडून प्राण प्रयान केले. यातील कारुण्य त्यातील गांभिर्यामुळे अधिकच भेदक झाले आहे.

बखर लेखनाच्या दृष्टीने शिवकाळ हा विशेष महत्वाचा होय. शिवपूर्वकालात बखरींचे लेखन झाले असले तरी शिवकाळापासून त्याला एक विशिष्ट स्वतंत्र वळण लागले. किंबहुना मराठी बखरींची खरी परंपरा सभासदाच्या बखरीपासून निर्माण झाली. स्वराज्याच्या उदयाबरोबर बखरींचा उदय व्हावा ही घटना मोठी सूचक म्हणता येईल. स्वराज्य संस्थापकाचे मराठीतील पहिले समकालीन चरित्र म्हणून ऐतिहासिक दृष्ट्या सभासदाची बखर महत्वाची ठरते. त्याचप्रमाणे साहित्य गुणसंपन्न अशा या बखरीला मराठी गद्य वांड्.मयाच्या इतिहासातही अढळ स्थान निर्माण झाले आहे.

छ. शिवाजी राजा हा कर्तव्यदक्ष पुत्र, प्रेमळ पिता, निर्व्यसनी पती, झुंजार योध्दा, मुत्सद्दीपना असणारा सरदार, प्रजाहितदक्ष राजा, ध्येय्यवादी शककर्ता, आत्मकल्याणकाराविषयी सतत जागरुक असणारा एक धर्म साधक अशी शिवप्रभुंची विविध वैशिष्ट्ये सभासद बखरीत आढळतात. शिवकालीन मराठी गद्याचे प्रातिनिधीक रुप बखरीत आढळते.

**संदर्भ :**


१. शिवछत्रपतींचे चरित्र (सभासद बखर), (संपा.) र. वि. हेरवाडकर, व्हिनस प्रकाशन पुणे, १९९६

२. प्राचीन मराठी वांड्.मयाचे स्वरुप, ह. श्री. शेनोलीकर, डायमंड प्रकाशन १९८७

३. सभासद बखर, (संपा.) यु. म.पठान, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, २०००

ISBN 978-93-5196-698-2

# बखर वाङ्मयातील राजदुर्गांचे (किल्ले) दर्शन !

डॉ. दीपक चव्हाण
प्रमुख, मराठी विभाग, नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्स, इचलकरंजी.

**बखर वाङ्मयातील राजदुर्गांचे वर्णन :**

स्वराज्य स्थापनेसमयी शिवरायांनी प्रारंभी घेतलेले व बांधलेले जे राजदुर्ग आहेत. त्या संदर्भातील लेखन बखर वाङ्मयात आलेले आहे. त्याचा विचार करीत असतांना त्या लेखनातून जे वाङ्मयीन गुणविशेष पहावयास मिळतात त्याचा अभ्यास येणे करावयाचा आहे.

''मग किल्ले कोंढाण इदलशाही होता तो भेद करून घेतला. ठाणे आपले ठेविले. सर्वच पुरंदरगड इदलशाही येथे निळकंठराव म्हणोन ब्राह्मण गडास खावंद होते ते मेले. त्यांचे पुत्र दोघे ते एकांत एक भांडू लागले. त्यांची समजावीस करावयास म्हणेन राजे पुरंदरास गेले, आणि ते दोघे भाऊ कैद करून तोही गड आपणच घेतला आपले ठाणे बसविले.''

त्याजवरि कोकणात कल्याण भिवंडी मारिली आणि माहुरी किल्ला अदलशाही घेतला मुरबाद म्हणून डोंगर होता त्यास वसविले त्याचे नांव 'राजगड' म्हणोन ठेविले. त्या गडाच्या चार माच्या बसविल्या कोकणात चंद्रराव मोरे म्हणोन राजकरीत असत. त्याजकडे गड कोट दाहा बारा हजार लष्कर हाशम समेत राज्य करीत असत पाठविले. विचार करिता चंद्रराव मोरे यास मारल्या विरहित राज्य साधत नाही. खासा राजा चालोन जाऊन जावळी सर केली मावळे लोकास कौल देऊन संचणी केली प्रतापगड म्हणून नवाच वसविला.''[१]

याठिकाणी प्रथम कोंडाना पुरंदर घेतल्याचे वर्णन आहे, पण सप्तप्रकरणालाच चरित्रात (चिटणीसाची बखर) तोरणा प्रथम घेऊन स्वराज्याचे तोरण बांधले असा उल्लेख आहे. ''तेंव्हा तोरणा किल्ला विजापूरी पातशाहीतीलच, तेथे राजकारण करून मावळे लोक पासलकर, कंक मालुसरे वगैरे सरदार ठेवून ममतेत ठेविले (होते), त्यांचे हातेवरील नामजाद लोक यास वश करून, भेद करून किल्ला आमचे निसबतीस द्यावा, आम्ही पातशाहापासूनही आपलेकडे करून घेऊ, म्हणून वश करून घेतला, आणि किल्ला पहावयास जाऊन पाहून 'प्रचंडगड' असे नांव ठेविले. 'दुरजा' देवीचा डोंगर याचे संनिग्ध फार चांगला पाहून तेथे वस्ती करून किल्ला करावा असे चित्तांत आणून सांप्रदायानुरूप लोक हवालदार कारकून नेमून किल्ला केला. त्या पर्वतास तीन माच्या चांगल्या होत्या त्यासही काम लावून बांधिल्या व किल्ल्यास इमारत करविली. आणि किल्ल्याचे नांवे 'राजगड' ठेवून माच्यांची नांवे एक 'सुवेळा' व एक 'संजिवनी' व एक 'पद्मावती' अशी ठेवून चार किल्ले असे केले. राजधानीस राहण्यास योग्य अशक्ष कल्पना करून बांधिते जाले.''

तोरण्यावर स्वराज्याचे तोरण बांधले किंवा कोंडाणा पुरंदर प्रथम घेतला. या घटनेपेक्षा स्वराज्यस्थापनेला राजदुर्गांचीच नितांत आवश्यकता होती हे मात्र निश्चित. तोरणा घेतल्यानंतर त्याचे स्वरूप पाहून त्याला शिवरायांनी 'प्रचंडगड' हे नांव दिले. ते अतिशय सार्थकच आहे. जावळीतील प्रतापगड तोरण्यासोबतचा राजगड. या राजदुर्गांची नावे ही शिवरायांचा कर्तृत्वाची ओळख करून देतात हे मात्र सत्य आहे.

शिवरायांनी एक एक राजदुर्ग कसा स्वराज्यात आणला याचे वर्णन चिटणीस याप्रमाणे करतात. ''किल्ले घेण्यास आपणच खासे जावे. धारकरी याजबरोबर आपणच मालेस अगोदर चढावे. तसेच भेदानी व माहितगार मावळे लोक यांचे युक्तीने घ्यावे. कोट-घेरियाचे गावचा सेकार आगोठीस किल्ल्यावर जाणार, त्या दिवसात धारकरी निवड करून किल्ल्याचे घेरातील गाव तेथे आपले लोक मजूर करून डोईवर भारे घ्यावे, त्यात तरवारा घालून आपणही त्यात जावे. किल्ल्यावर जाऊन किल्ला घ्यावा. असे अनेक प्रकार सीमेपरती मेहनत करून महाराज किल्ला घेत चालले. ते बांधारीचे कांगोरी, तुंग,

तिकोना, लोहगड राजमाची, कुवारी, घनगड, केंजळा आदि करून किल्ले घेतले. बांदल देशमुख तर्फ हिरडस मावळ हे येऊन न भेटत, तेंव्हा त्यांजवर स्वारी करून धरून आणले, मारले. रोहिडा किल्ला घेतला.''

**शिवरायांचे राजदुर्गावरील व्यवस्थापन :** शिवरायांची राजदुर्गांचा बंदोबस्त त्रिवेणी स्वरूपाचा होता. याविषयी सभासद म्हणतो ''जे जे गड घेतले त्या गडावर राजियाने कारभारी बंदोबस्ती ऐसी पध्दत घातली की, गडावरी हवालदार एक व सबनीस एक व सरनोबत एक असे तिघेजण एका प्रतीचे जो कारभार करणे तो तिघांनी एका प्रतीचा करावा.गडावरी गल्ल्याचे सामानाचे अंबर करावे. त्यास कारखानीस म्हणून कारभारी केला. त्याचे विद्यमाने कारखाने यास जमाखर्च लिहावा. गड तोलदार आहे तेथे त्या गडाचा घेरा थोर त्या जागा सात पाच सरनोबत ठेवावे. त्यास तट वाटून द्यावे. हुशारी खबरदारीस त्यांनी सावध असावे. शिवरायांची ही त्रिवेणी बंदोबस्ती पध्दत सभासद म्हणतो त्याप्रमाणे नवीन व अत्यंत महत्त्वाची दिसते. यावरून शिवराय राजदुर्गांना किती महत्त्व देत होते याची येथे कल्पना येते.

**राजदुर्गांच्या वरील संघर्ष :** शिवरायांनी स्वकीय आणि परकीयांशी अतिव संघर्ष करून राजदुर्गांतून स्वराज्याचे बीजारोपन केले. आदिलशाहीतील राजदुर्ग घेतल्यानंतर विजापूरात जो आहाकार निर्माण झाला. त्यावेळी अफझलखान म्हणाला 'शिवाजी काय? चढे घोडियानिशी जिवंत कैद करून घेऊन येतो.'फ

तो स्वराज्यावर चालून आला स्वत:च्या सर्वस्वी अहंकारात बुडालेल्या अफझलखानास शिवरायांनी प्रतापगडाखालीच कायमचे गाढले. त्यानंतर शिवरायांनी केलेल्या पराक्रमाचे वर्णन ९१ कलमी बखरीत असे आले आहे. ''त्या उपर तेच समई येऊन सातारा, चंदन-वंदन वगैरे विशाळगड व पनाळा फुलगड वाईपासून तहद रांगणा प्रसीध गड व भिवगड व पारगड सदरसांधे ऐसे गड घेऊन शिवाजी राजे पनालियास गेले.''

सिद्धी जोहर शिवरायांच्यावर चालून आल्यानंतर शिवराय राजदुर्ग पनाळावर आले व त्यांनी आपल्या राजनीतीने शेवटी सिद्धीस फसी पाडले व विशाळगडास प्रयाण केले. याचे वर्णनही ९१ कलमी बखरीत असे आले आहे - ''त्या उपर विशाळगड मार्गे पाई चालता चार कोस गड उरला तो प्रात:काळ झाला तो फौज रातोरात चंद्रज्योति लावून मार्ग काढीत पाठीवर कुल लागली.''येथील चंद्रज्योत, मार्ग काढणे, पाठीवर येणे या शब्दातील भावार्थ प्रसंगानुरूप लक्षणीय आहेत.

शाहिस्तेखानाच्या फजितीनंतर राजा जयसिंग व दिलेरखान स्वराज्यावर चालून येतात. त्यावेळी दिलेरखान जयसिंगला म्हणतो, ''गोटाजवळ कोंढाणा व पुरंधर हे दोन किल्ले आहेत. पुरंधरास आपण सुलतानढवा करितो आणि गड घेतो. तुम्हीं कोंढाणा गड घेणे. गड घेत चालला म्हणजे शिवाजी येईल.''

यावर मिर्झा राजे जयसिंग दिलेखानास म्हणतात - ''गड आले तरि बरे नाहीतर नामोश जाईल याजकरिता गडास न लागावे मुलुख काबीज करावा गडास सामान चालो न द्यावे म्हणजे गड अपाप येतील.''

पण, जयसिंगाचे ऐकेल तो दिलेखान कसला. तो आपल्या अफाट सैन्यासह पुरंदरला भिडला. त्याला पुरंदर घेता येईना मोठा निकराचा संघर्ष चालू झाला. शेवटी किल्लेदार मुरारबाजीने आपल्या हजार लोकापैकी निवडक सातशे लोक घेऊन दिलेरखानाशी घोरंदार युद्ध केले.

मुरारजबाजीचा पराक्रम पाहून दिलेरखान आश्चर्यमुग्ध होऊन म्हणतो - ''अरे, तू कौल घे मोठा मर्दाना शिपाई तुज नावजतो ---- असा शिपाई खुदाने पैदा केला. त्यावेळी मुरारबाजीचे बहादुरीचे शब्द त्याची शिवभक्ती व राजदुर्ग प्रेम व्यक्त करतात ते असे - ''तुझा कौल म्हणजे काय? मी शिवाजी राजाचा शिपाई तुझा कौल घेतो की काय?''

मुरारबाजीच्या पराक्रमाची गाथा ही 'राजदुर्ग' पुरंदरशी निगडीत आहे. 'पुरंदर' म्हणजे इंद्र तर मुरारबाजी म्हणजे त्या इंद्राचे वज्र होय.

ISBN 978-93-5196-698-2

त्यापुढे शिवराय आणि जयसिंग यांचे बोलणे होऊन जो तह (संधी) झाला. त्यामध्ये शिवराय जयसिंगास म्हणतात – ''तुम्हाला जे गड पाहिजेत ते आपण देतो.''

येथे या ठिकाणीही राजदुर्गाचे अनन्य साधारण महत्त्वच प्रत्ययास येते. शिवरायांचे 'अग्रा' येथे जाणे पुन्हा येणे पुढे तळा–घोसळा घेणे इ. राजदुर्गाचे वर्णन बखरकार वारंवार करतात.

राजदुर्गावर होणाऱ्या संघर्षामधील वर्णनामध्ये जे वीरत्व, शुरत्व व्यापून राहिलेले आहे. हे वर्णन वाचत असताना आपल्या अंगावर शहारे आल्याशिवाय राहत नाहीत. या वीरस्सात्मक व रोमहर्षक प्रसंगातून अनेक वाङ्मयीन गुणवैशिष्ट्ये साकारलेली आहेत. येथे वागणी दाखल दोन प्रसंग घेऊ.

कणेरगडचे युद्ध रामजी पांगारा व दिलेरखान यांच्यात झाले. त्याचे वर्णन असे ''रामजी पांगेरा म्हणून हसमांचा हजारी (त्याने) हजार लोकानिशी कणेरगड आहे. त्या खाले दिलेरखानाशी युद्ध केले ––चौफेरा मावळे लोक वेढले. एक प्रहर टिपरी जैशी शिमग्याची दणाणते तैसे मावळे भांडिले. दिलेरखानाचे बाराशे पठाण रणास आणिले.

वरील तो संघर्षमय प्रसंग आहेत त्यामध्ये तानाजीच्या रामजी पांगारांच्या व्यक्तिमत्वाबरोबरच त्याच्या पराक्रम व युद्ध वर्तनातील जो जिवंतपणा आहे तो अतिशय प्रभावी शैलीत प्रकट झाला आहे. साक्षात चलित चित्रच गोचर होतांना दिसते. या प्रसंगाची संक्षिप्त वाक्यरचना ही फार महत्त्वाची आहे. स्वराज्यासाठी लढणाऱ्या या नरवीरांची ही संघर्ष गाथा बखरकारांनी अत्यंत प्रभावी, ओघवत्या भाषेत चित्रीत केली आहे.

कोंढाणा घेतल्यानंतरचा शिवरायांचा 'आनंद' तर अत्यंत चितवेदक आहे. शिवकाळात 'स्वराज्य'साठी राजदुर्गांची नितांत आवश्यकता असल्याने पूर्वीचे 'राजदुर्ग' स्वराज्यात आणणे त्यासाठी तातडीची, जोखमीची, गनिमीकाव्याची युद्ध तंत्रे वापरून मोहीम शिवराय आखत होते. नवे राजदुर्ग बांधत होते. त्यावरून स्वराज्य 'रक्षण' करीत होते. पुढेही संभाजीराजे, राजाराम महाराज, रणरागिणी ताराबाई, थोरले शाहूराजे यांच्या काळात.राजदुर्गांच्या बाबतीत संघर्ष होत गेले आहेत. त्याचा मागोवा ही घेतला पाहिजे.

छत्रपती संभाजी राजांनी जंजिरा घेत असताना जी राजनीती वापरली होती. ती त्यांच्या दृष्टीने महत्त्वाची होती. भलेही ते त्यात अपयशी झाले असले तरी त्या मोहिमेत त्यांचे थोर साहसी व्यक्तिमत्त्व प्रकट होते. शिवरायांना जंजिरा घेणे शक्य झाले नाही. आपण तो स्वराज्यात आणावा हा त्यांचा दृढ निश्चय होता. त्यासाठी त्यांनी विविध राजनीतीचे डावपेच आखले होते. 'जंजिरा' शेवटी त्यांचे पुत्र थोरले शाहू महाराज यांच्या वेळी स्वराज्यात आला. असे बखरकार सांगतात.

छ. राजाराम महाराजांच्या संघर्षमय कारकिर्दीत संपूर्ण महाराष्ट्र मोंगल सैन्यांनी व्यापला होता. स्वराज्याचा बिमोड करावयास आलेल्या पातशहाला. प्रथम 'राजदुर्गा' बाबत संघर्ष करावा लागलेला आहे. ''यानंतर खासा पातशहा सिंहगडास येऊन मोर्चे देऊन एक वर्ष छावणी करून सिंहगड पुरंदर हे किल्ले घेतले. मधील किल्ले किरकोळ घेऊन तिकडेच छावणी करून राहिले–––– इकडे रामचंद्र निळकंठ यांनी बांधारीचे किल्ले विशाळगड रांगणा गगनगड बावडा वगैरे –––– ऐसे करू लागले.''

येथे स्वराज्य गिळंकृत करणाऱ्या पातशहास 'राजदुर्ग' साठी एक एक वर्ष संघर्ष करावा लागत होता. तर दुसऱ्या बाजूला ते स्वराज्यात पुन्हा आणण्यासाठी स्वराज्यातील सैन्य अथक प्रयत्न करीत होते. हा लपंडाव चाललेला होता. ह्या लपंडावाचे चित्र अधिक गतिमान झाले ते रणरागिणी ताराबाई यांच्या वेळी राजदुर्गांवरील संघर्ष हा पाठशिवणीचा खेळच होऊन गेला होता. पातशहा कधी लाच देऊन तर कधी संघर्ष करून राजदुर्ग हस्तगत करीत होता. मोठ्या आनंदाने त्यावर निशाण चढवून त्यांचे नामकरण करीत होता. तेही मोठ्या कल्पकतेने त्याच्या त्या आनंदात थोड्याच दिवसात विरजण पडत होते. स्वराज्यातून गेलेले राजदुर्ग पुन्हा स्वराज्यात येऊन जरीपटका आपल्या शिरी डोलवत होते. एकंदरीत औरंगजेब

ISBN 978-93-5196-698-2

पातशहाच्या नाकीं दम आला होता. त्यातच त्याचा मृत्यू झाला.

औरंगजेबच्या मृत्यूनंतर शाहू महाराज दक्षिणेकडे आले. त्यावेळी 'रायगड' स्वराज्यात नव्हता. म्हणून त्यांनी सातारा येथे गादी स्थापन केली. ती अशी – ''रायगड हसबी यापासून सुटला नाही. कोकण बिकट जागा. हावा मानवायची नाही. राजगडची ही मावळ हवा. याजकरिता सातारा येथे कृष्णातीरी व देश राहावयास योग्य जाणून साताराच राहावयास जागी करावी म्हणून किल्ला नजीक शाहूनगर ऐसे नाव ठेऊन वस्ती करविली.''

स्वराज्याचे मानबिंदू असणाऱ्या या राजदुर्गांच्यापेक्षा त्या ठिकाणच्या नैसर्गिक वातावरणाच्या पार्श्वभूमीवर शाहूराजे सातारा येथे राहिले व त्याठिकाणी त्यांनी दुसरी गादी स्थापन केली व सैन्यासाठी पांडव गडाची जागा निश्चित केली तर का? ----''पांडवगडाची माची थोर, जागा बिकट, लोकसुद्धा दम खाववयास योग्य'' हे कारण होते. कारण त्यांना पांडवगडाची प्राकृतिकता आवडलेली दिसते. स्वराज्य 'करवीर' व 'सातारा' अशा दोन भागात विभागले गेले आणि अंतर्गत संघर्ष चालू झाला. या अंतर्गत संघर्षात ही'राजदुर्गां'च्यावर दोन्हीकडून लक्ष केंद्रीत केले गेले. पुढे वारणेच्या तहाने सारे शांत होत गेले पण, 'सातारा' गादीचे अस्तित्व पेशव्यांनी कमी केले. या काळात राजदुर्गांवर विशेष संघर्ष झाले नाहीत. तथापि वसईच्या किल्ल्यावरील संघर्ष एक उदाहरण घ्यावयास हवे. ते असे – ''तीन वर्ष वसई भांडली. किल्ला हस्तगत होत नाही. मनुष्य फार कामास आले. नऊ लाख बांगडी फुटली. लढाईचा मोठा प्रसंग केला. परंतु किल्ला हस्तगत होत नाही. चिमाजी अप्पा यांना तर किल्ला घेण्याचा निश्चय मोठा.'' वर आपण शिवरायांच्या पासून स्वराज्याचे मानबिंदू असणाऱ्या राजदुर्गांवरील 'संघर्ष' व त्या संघर्षमय वातावरणातील तीव्रतेचा मागोवा घेतला. या साऱ्या पार्श्वभूमीवर वसईची लढाई किती तकलादूपणे व मंदगतीने लढली. तरीही त्यात नऊ लाख बांगडी फुटावी. हे मोठे दुर्भाग्य म्हणजे या युद्धात रणनीती व राजनीतीचा अभावच असलेला दिसतो. तथापि या बखरीचे संपादक म्हणतात, मराठ्यांची जिद्द मोठी हे मात्र प्रस्तुत लेखकास पटण्यासारखे नाही.

**संदर्भ ग्रंथ :**


हेरवाडकर र. वि. (संपा.) शिव-छत्रपतींचे चरित्र (कृष्णाजी अनंत सभासद विरचित) (सभासद – बखर) व्हिनस प्रकाशन-पुणे ३०, पुनर्मुद्रण २०००६ ते ०८

हेरवाडकर र. वि. (संपा.) श्री शिव छत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र (मल्हार रामराव चिटणीस विरचित) व्हिनस प्रकाशन-पुणे ३०, आ. दु. २०००३७

हेरवाडकर र. वि. (संपा.) शिव-छत्रपतींचे चरित्र उ. नि.

वाकसकर वि. स. (संपा.) श्री शिव छत्रपतींचे ९१ कलमी बखर आणि भोसले घराण्याची चरितावली व्हिनस प्रकाशन-पुणे ३०, आ. प. १९६२

हेरवाडकर र. वि. (संपा.) शिव-छत्रपतींचे चरित्र उ. नि.

हेरवाडकर र. वि. (संपा.) थोरले राजाराम यांचे चरित्र प्रकरण श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांची चरित्रे (मल्हार रामराव चिटणीस विरचित) व्हिनस प्रकाशन-पुणे ३०, आ. प. १९७२

हेरवाडकर र. वि. (संपा.) थोरले शाहू महाराज यांची चरित्र (मल्हार रामराव चिटणीस विरचित) व्हिनस प्रकाशन-पुणे ३०, आ. प. १९७६

हेरवाडकर र. वि. (संपा.) पेशव्यांची बखर व्हिनस प्रकाशन-पुणे ३०, आ. प. १९७५

ISBN 978-93-5196-698-2

# बखर वाड.मयाचे स्वरूप व वैशिष्ट्ये

**प्रा. विठ्ठल नामदेव रोटे**
मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय,बोरगांव, ता. वाळवा, जि. सांगली

**प्रस्तावना :**

बखर हा दक्षिण आशियातील, विशेषकरून मराठी साहित्यातील, ऐतिहासिक साहित्यातील एक प्रकार आहे. साधारणत: इ.स. १७६० ते १८५० च्या आसपास बखरींचे लेखन झाले आहे. ऐतिहासिक घडामोडी, लढाया, थोर पुरूषांची चरित्रे सांगण्याच्या हेतूने बखरींचे लेखन झाले आहे. आजपर्यंत २०० बखरी लिहिल्या गेल्या असतील परंतु बखरींच्या मूळ प्रकृति प्रयोजनाकडे पूर्ण दुर्लक्ष करून बखरींच्याकडे इतिहास किंवा इतिहास सदृश लेखन म्हणून पाहिले जात आहे.

प्राचीन मराठीतील विवक्षित गद्य वाडमयाला 'बखर' म्हणून संबोधिले जाते. या विवक्षित वाड.मयाचे स्वरूप पाहिले तर ते चरित्र, आख्यान वा वंशानुचरित या प्रकारचे दिसते. तर कधी करीणा, कैफियत, थैली या रूपांनी आढळते. तर सरळ हकीगत, वृत्तांत, अखबार म्हणून ही लिहिले जाते. या विविध प्रकारांनी लिहिलेल्या गद्याला 'बखर' हें समावेशक नाव आहे. 'बखर' या शब्दाचा अर्थ हकीकत, बातमी, इतिहास, कथानक, चरित्र असा कोशात आढळतो. हा शब्द 'खबर' या फारशी शब्दापासून वर्णव्यत्यासाने आला असावा. बखरी ज्या काळात लिहिल्या गेल्या त्या काळात मराठी भाषेवर फारशी भाषेचे असलेले वर्चस्व लक्षात घेता वरील व्युत्पत्ती बरोबर असावी असे वाटते. वि.का. राजवाडे यांच्या मते, 'बख-बकणे, बोलणे' या शब्दापासून बखर शब्द मराठीत आला असावा. राजवाड्यांना 'खबर' पासून 'बखर' ही व्युप्तत्ती मान्य नाही. राजवाडे म्हणतात, 'बखर' हा शब्द भाष्, भख्, बख् या धातूपासून निघाला आहे. तसा 'बखर' हा शब्द बख् या अपभ्रष्ट धातूपासून निघाला आहे. पूर्वी भाट लोक मोठमोठ्या वीर पुरूषांच्या 'बखरी' तोंडाने बोलत असत. त्यावरून 'बखर' हा शब्द प्रथमत: तोंडी इतिहासाला लावू लागले आणि नंतर लेखी इतिहासालाही तो शब्द लावण्यात आला. त्याप्रमाणे 'बखर' या शब्दाची व्युत्पत्ती 'बखर' (फारशी) आणि भख् (संस्कृत) अशा दोन्ही शब्दापासून सांगता येते. या दोन्ही शब्दांचे मूळ एकच असण्याची शक्यता आहे.

**बखरीचे स्वरूप :** बखर लेखनामागील प्रेरणा एकच दिसत नाहीत. शूर वीरांची चरित्रे सांगणे, त्यांनी मारलेल्या लढाया व केलेले पराक्रम यांची वर्णने करणे व नविन लोकांना त्यातून मार्गदर्शन करणे असा उद्देश मराठेशाहीतील प्रारंभीच्या बखरीमागे असला तरी नंतर त्यात फरक पडत गेला आहे. पुराणांच्या प्रभावाने बाणलेली व चरित्रनायकासंबंधीच्या आदरामुळे वाढलेली अवतार कल्पना सामान्यपणे सर्वत्र दिसते. बखरीच्या अखेरीस फलश्रुती सांगण्याची पध्दतीही पौराणिक प्रभावाची द्योतक होय. परंतु मार्गदर्शनाचा हा उद्देश सर्वत्र आढळत नाही. विशेषत: कैफियती , करीणे, अखबार म्हणून त्यांचे लेखन झाले तेव्हा मार्गदर्शनाचा उद्देश राहिला नाही. त्याजागी पूर्वजांनी केलेले पराक्रम सांगून वतने मिळविणे एवढाच उद्देश उरला. त्यामुळे बखर लेखनावर या सर्वांचा परिणाम झालेला आहे.

बखर लेखनाचे स्वरूप सारखेच नाही 'बखर' हा शब्द लेखकांनी आपल्याला हवा तसा लावला आहे. ढोबळमानाने इतिहासविषयक सर्वच गद्य लेखन बखर या नावाने संबोधले जाते. ऐतिहासिक घटना, वार्ता, प्रसंगवर्णन, वंशावळी, राज्यकारभार विषयक उपदेश, ऐतिहासिक पुरूषांची चरित्रे या सर्व प्रकारच्या साहित्याचा बखरीत समावेश असतो. परंतु या साहित्याची वर्गवारी करून बखर संज्ञेस पात्र ठरणारे साहित्य वेगळे करावयास हवे. तरच बखर साहित्याचे स्वरूप निश्चित करता येईल. अभ्यासाच्या दृष्टीने बखरीचे वर्गीकरण पुढील प्रमाणे करता येईल.

**१. चरित्र – आख्यानपर :** सभासद बखर, सप्तप्रकरणात्मक चरित्र, ९१ कलमी बखर इ.

**२. प्रसंगवर्णनपर :**राक्षसतागडीची बखर, पानिपतची बखर, खड्याच्या लढाईची बखर इ.

**३. वार्तापत्रे:**पुणे अखबार, होळकरांची थैली, १७३८ सालची हकीकत इ.

४. **उपदेशपर साहित्य :**नारायण व्यवहार शिक्षा, आज्ञापत्र

५. **सांप्रदायिक व भक्तिपर :**हनुमंत स्वामींची बखर, जयराम स्वामींची बखर इ.

६. **आत्मचरित्रात्मक:** नाना फडणीसाचे आत्मचरित्र

७. **पौराणिक बखर:** बकासुराची बखर, नलाख्याना बखर. मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा करण्याच्या प्रयत्नाने ऐतिहासिक गद्याचे दालन उघडले गेले. या दालनात छोट्या मोठ्या लोकांनी लिहिलेली नाना पत्रे जशी आढळतात तशीच पुरातन माहितगारकरवी नविन लोकांच्या मार्गदर्शनासाठी सजविलेल्या अनेक बखरीही आढळतात. ग्रँट डफने मराठ्यांचा इतिहास लिहिला परंतु तो पूर्वग्रह दूषित अल्पमाहिती व चुकीच्या माहितीच्या आधारे लिहिला. त्यामुळे मराठ्यांच्या अभिमान दुखविला. त्यामुळे न्यायमुर्ती रानडे, चिपळूणकर, कीर्तने, साने, राजवाडे, खरे, पारसनीस इ.नी मराठ्यांच्या इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला. त्यातून मराठ्यांचा इतिहास लिहिला गेला पण त्यातून बखरी, पत्रे, कैफियती उजेडात आल्या. हे ऐतिहासिक गद्य वाड.मय इतिहासाला सापडले. परंतु बखरींचे लेखन ज्या हेतूने झाले आणि ज्या विशिष्ट पध्दतीने झाले, त्यामुळे इतिहास लेखनाचे साधन म्हणून जरी त्यांचे महत्व कमी झाले तरी ऐतिहासिक काळातील साहित्याची एकशाखा म्हणून तिला महत्व प्राप्त झाले.

**बखर वाडमयाची वैशिष्टये :**

१. बखरींचे वाचन करताना आपण कादंबरी वाचीत आहोत की काय? असा प्रश्न निर्माण होतो. कारण घटनांचे वर्णन करताना बखरकार इतका समरस झालेला असतो की त्यातील ऐतिहासिकता व घटना निघून जातात व त्याला कथानकाच रूप प्राप्त होते. उदा. पानिपतची बखर, सभासद बखर, भाऊसाहेबांची बखर

२. बखरलेखनातून ऐतिहासिक सत्याचे दर्शन घेण्याऐवजी वाडमयीन भावसत्याचे दर्शन घडल्याचा भास होतो.

३. इतिहास लेखनाहून वेगळा आणि ऐतिहासिक कादंबरीला जवळ असणारा निराळाच परिणाम बखरकार निर्माण करतो. त्यामुळे गद्याचा स्वतंत्र प्रकार म्हणून पाहिले जाते.

४.बखरकार ऐतिहासिक पात्रांना जिवंत करण्यासाठी उपमा- उत्प्रेक्षांदी अलंकारांचा असा वापर करतो की ती पात्रे आपणास जिवंत वाटतात.

५. बखरकार वीर, करून आणि शृंगार रसाचा वापर करून बखरीत नाट्य निर्माण करतो.

६. बखरीत भाषेचा वापर प्रवाही झालेला आहे. सुसंस्कृत मराठी बरोबर फारशी उर्दू, संस्कृतप्रचूर शब्दांचा वापर झालेला आहे. भाषेला डौलदार, धारदार, ऐटबाज स्वरूप प्राप्त होते. ती अधिकाधिक रसाळ, प्रौढ, रेखीव होते. त्यामुळे बखरीतून जिवंत व रमणीय चित्रे निर्माण होतात.

७.केवळ इतिहास कथन किंवा वृत्तांत निवेदन एवढाच हेतू बखरलेखनाचा नसून पुराणसदृश्य साहित्य निर्माण करीत आहोत याची जाणीव बखरकारांना असावी.

८. धर्मरक्षणाची प्रेरणा, पराकृमी पुरूषांचे कर्तुत्व, धर्मावरील श्रध्दा, ही प्रेरणा बखरवाड.मयीच्या निर्मितीस कारण ठरली असावी.

९. बखरींचे वर्गीकरण पाहिले तर बखरींच्यावर इतिहास, पुराणांचा प्रभाव आढळतो. उदा.शायिस्तेखान व अफजलखानाचे वर्णन करताना बखरकारापुढे रावण व दुर्योधन उभे राहतात किंवा औरंगजेबाच्या अंतकाळाचे वर्णन.

१०. भविष्यकथन, स्वप्नदृष्टांत, दैवी आकाशवाणी, चमत्कार, अद्‌भुतता, अलौकीक घटना बखरकरांनी आपल्या लेखनात आणल्या आहेत.

११.पुराणोक्त, संस्कृत भाषेचा प्रभाव बखरीवर पडलेला असला तरी पंडिती वळणाच्या भाषेचाही बखरकरांनी वापर केलेला आहे. कथाप्रधान व पांडित्य शैलीचा वापर बखरीत आढळतो.

१२.बखरीतून फक्त इतिहास, सत्यापलाप किंवा राजप्रशस्तीची भूमिका घेतली नाही तर विशिष्ट प्रेरणा आणि परंपरा,

धर्मरक्षणाची प्रेरणा हे बखर लेखनाचे उगमस्थान आहे.

१३. बखर वाड.मयाला स्वत:चा आकृतीबंध आहेच तसाच प्रकृतिधर्मही आहे.

**समारोप :** प्राचीन मराठी गद्य परंपरेतील बखर हा एक महत्वाचा टप्पा आहे. महाराष्ट्रातील वीर, पराक्रमी कर्तृत्ववान पुरूषांचे चरित्र, इतिहास या बखरीतून आपणास वाचायला मिळतो. बखरींचे लेखन विशिष्ट काळातच झालेले दिसते. हिंदवी स्वराज्य स्थापनेपासून ते इंग्रजांचा अंमल सुरू होईपर्यंतचा काळ बखरीतून येतो. साधारणत: दोन अडीचशे बखरीचे लेखन या काळात झाले. प्राचीन मराठीत महानुभवांच्या गद्य लेखनानंतर खंडीत झालेले गद्यलेखन बखररूपाने पुढे आहे. मराठेशाहीत जे नवे वीर युग निर्माण झाले आणि त्यातील शुरवीरांनी स्वराज्य मिळविण्यासाठी व नंतर टिकविण्यासाठी ज्या मर्दुमक्या गाजविल्या त्या मर्दुमक्यांच्या व त्या गाजवणाऱ्या वीर पुरूषांच्या पराक्रमांचा मराठी बखरनविसांनी लिहिल्या त्यातून एक लक्षणीय लेखनप्रकार जन्माला आला.

**संदर्भ :**

१. ग्रामोपाध्ये, गं.ब, १९८६, मराठी बखरवाड्याचा पुनर्विचार, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती.

२. कुलकर्णी, श्री.रं, १९९१, प्राचीन मराठी गद्य  प्रेरणा आणि परंपरा, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, द्विवतीयावृत्ती.

३. नसिराबारकर, ल.रा, प्राचीन मराठी  वाड.मयाचा इतिहास

४. http://mr.wikipedia.org/wiki/ बखर २९/११/२०१४

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखर वाङ्ःमय विषय विवेचन

**प्रवीण लोंढे**
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

इतिहास आणि वाङ्मय या दोन्ही दृष्टीने बखरीचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. मराठ्यांचा इतिहास प्रकाशात यावा यासाठी बखरींचा उगम झाल्याचे दिसते. बखर वाङ्मयाला प्राचीन साहित्याची परंपरा असली तरी तिचा उदय हा मराठ्यांचा काळात झालेला दिसतो. प्रस्तुत निबंधात मराठीतील बखर वाङ्मयाची थोडक्यात ओळख करुन देण्याचा प्रयत्न केला आहे.

'बखर' या शब्दाच्या व्युत्पत्तीसंबंधी अनेक विद्वानांनी आपापली मते मांडली आहेत. 'बखर' या शब्दाची 'बखेर', 'बखैर' अशी काही रूपे सापडली आहेत. 'बखर' हा शब्द अरबी भाषेतील 'खबर' या शब्दाचा वर्णविपर्यस होऊन आला असल्याचे म्हटले जाते. 'खबर' या शब्दाचा अर्थ वार्ता, माहिती, समाचार असा आहे. मराठी भाषेचा कोश तयार करीत असताना जगन्नाथ शास्त्री क्रमवंत यांनी 'बखर' म्हणजे 'प्राकृत भाषेत राजादिकांचे लिहिलेले गद्यरूप चरित्र' अशी अर्थसंकल्पना वापरली आहे. मोल्सवर्थच्या मराठी-इंग्रजी शब्दकोशात अपू History, Narration, Memoir and Chronicle in Prakrut Prose (कोणताही इतिहास, कथन, आठवण आणि प्राकृत भाषेतील बखर) असा अर्थ दिला आहे. मेजर कँडीने 'बखर' म्हणजे A written narrative or History in Prakrut Prose असा अर्थ दिला आहे. डॉ.पटवर्धन, य.रा.दाते, आपटे, य.न.केळकर आदी शब्दकोशकारांनी 'खबर'हा मूळ शब्द मानून 'बखर'शब्दाचे बातमी, हकीकत, इतिहास, अर्ज असे अर्थ दिले आहेत. कृ.पा.कुलकर्णी यांनी भाषाशास्त्रीय व्युत्पत्तीने विचार करता मूळ अरबी 'खबेर' या शब्दाचा वर्णव्यत्यास होऊन 'बखर'हे रूप बनले असावे असे सांगितले आहे. इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांच्या मते 'बक्' म्हणजे 'बोलणे', 'बकणे' ह्या धातूपासून 'बखर' हा शब्द मराठीत तयार झाला आहे. वि.ल.भावे यांनी 'बखर' हा शब्द 'माहिती देणे' या अर्थाने मराठेशाहीत रूढ झालेला होता असा मानले आहे. श्री.श.ना.जोशी यांच्या मते, 'बखर' एक पत्रप्रकार असून 'बखर' या नावाचा कचेरी पत्राचा प्रकार मराठेशाहीत होता. त्यासाठी व्यवहारविषयक कागदपत्रांप्रमाणे माहितीपत्र म्हणून बखरपत्रही तयार होई व अधिकृतपणे ते पत्र व्यवहार्य मानले जाई. डॉ.श्री.रं.कुलकर्णी यांनी 'वृत्तांत' या अर्थाने 'बखेर' हा शब्द प्रथम आला असून अधिकृतपत्र वा कागद अशा आशयाचा दुसरा उल्लेख असल्याचे म्हटले आहे. असे असले तरी मराठी भाषेत आणि वाङ्मयाच्या इतिहासात 'बखर' हा शब्द रूढ झाला आहे. 'बखर' या शब्दाची एक स्वतंत्र वाङ्मयपरंपरा निर्माण झाली आहे.

मराठी बखर वाङ्मयाचे महाराष्ट्राच्या इतिहासाशी आणि विशेषतः मराठ्यांच्या इतिहासाशी जवळचा ऋणानुबंध आहे. मराठ्यांच्या कर्तृत्त्वाचे, त्यांच्या पराक्रमांचे ऐतिहासिक संदर्भ बखर वाङ्मयात सापडतात. राजांच्या कर्तृत्त्वाचे पोवाडे, पराक्रमांच्या नोंदी या बखरीतून मांडल्या आहेत. वस्तूनिष्ठ सत्यरूपात राजकीय स्वरुपाच्या ऐतिहासिक लेखनाचा आढावा या बखरीतून प्रकट झाला आहे. या राजकीय घडामोडींना त्या त्या राजवटीतील सुसंगत घटकांना जसे महत्त्व आहे तसे वाङ्मयदृष्ट्या इतिहास कथानिवेदनासही महत्त्व आहे.

बखर वाङ्मयाचे त्याच्या लेखनावरून समक्ष पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या घटनाप्रसंगावर आधारित, आठवणी व स्मृतीच्या आधारे लिहिलेल्या, ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे लिहिलेले बखरसदृश्य ऐतिहासिक लेखन, चरित्र-आत्मचरित्र इ. संदर्भाचा आधार घेऊन लिहिलेले लेखन आणि पौराणिक कागदपत्रांवर लिहिली जाणारी, चमत्कार दृष्टांत, साक्षात्कार यावर विश्वास ठेऊन लिहिलेल लेखन अशा प्रकारात बखरीचे विभाग पाडले आहेत.

या एकूण बखर वाङ्मयाचा विचार करता कालक्रमानुसार बखर वाङ्मयाचे शिवपूर्वकालीन बखरी, शिवकालीन बखरी आणि पेशवेकालीन बखरी असे प्रकार पडतात. शिवपूर्वकाळात मराठे सरदार व सैनिक दुसऱ्या ठिकाणी चाकरीस असल्यामुळे बखरीचा कर्ता एकच नसे त्यामुळे बखरी कमी लिहिल्या गेल्या. अशा बखरीमध्ये सर्वात जुनी बखर म्हणून

'महाकावतीची बखर' ओळखली जाते. या बखरीचा कालखंड इ.स. ११३८ ते १४४९ असा मानला आहे. या बखरीचा कर्ता केशवाचार्य हा असून त्यांने मालाडच्या तत्कालीन देसला नायकोराव याच्या इच्छेनुसार या बखरीचे लेखन केले आहे. ही बखर लिहिताना निवाडे, हकीगती, महजर, हस्तलेख, हेमाडपंती लिपीच्या लेखांचा आधार घेतल्याचा उल्लेख आहे. ही बखर एकूण सहा प्रकरणात विभागली असून या बखरीतील प्रकरण एक व चार ओवीपद्यात लिहिली आहेत. या एक व चार प्रकरणांचा लेखक भगवानंद दत्त आहे. पहिल्या अध्यायात वंशोत्पत्तीवर्णन दिले आहे. दुसऱ्या अध्यायात कोकणातील सूर्यवंशीय, सोमवंशीय कुळाच्या पूर्वपिठीका दिल्या आहेत. या पूर्वपिठीकेच्या अनुषंगाने अनेक पौराणिक कथा सांगितल्या आहेत. उदा. सुलोचना-विचित्रवीर्यकथा, पद्मावती स्वयंवरकथा इ. प्रकरण दोन मधून महाकावतीचा इतिहास सांगितला आहे. तिसरे प्रकरण हे परिशिष्ट आहे. या बखरीचे वाङ्मयीन रूप प्रत्ययकारी आहे. बखरीतील व्यक्तीदर्शन युद्ध-प्रसंग वर्णन, कथाप्रवाहाची मालिका, निवेदनशैली, सूत्रबद्ध तशीच प्रौढ भाषाशैली यासारखी विविध गुणसंपन्नानी अशी ही बखर नटलेली आहे. मराठी वाङ्मयातील पहिली तसेच मराठी बखर वाङ्मयाच्या स्वरूपाची कल्पना येण्याची दृष्टीने महाकावतीची ही बखर महत्त्वाची आहे. ती गद्यपद्यात्मक अशी आहे. वंशानुचरित्र किंवा वंशावळवर्णन हा तिचा महत्त्वाच गुण आहे. शिवकाळात ९१ कलमी बखर, सभासदांची बखर, चित्रगुप्ताची बखर व चिटणीसांची बखर यासारख्या बखरी लिहिल्या गेल्या. याकाळात शिवाजी महाराजांचा कर्तृत्त्वाने महाराष्ट्राला एक नवीन परिणाम लाभत होते. या पार्श्वभूमीवर शिवकालीन बखरी लिहिल्या गेल्या. याकाळातील राजकीय इतिहासाच्या दृष्टीने बखरीचे नाते राजदरबारी होते तर तिचा वाङ्मयीन आविष्कार समकालीन लोकजीवनाशी त्यांच्या संस्कृतीशी तसाच समकालीन वाङ्मयाशी समांतर असा होता.

या काळातील '९१ कलमी बखर' ही शिवचरित्रावरील पहिली बखर लिहिली गेली. दत्ताजी त्रिमल वाकेनवीस यांनी तत्त्कालीन काळातील राजदरबारातील प्राथमिक स्वरूपाच्या नोंदी, यादी, वंशावळी यांच्या मदतीने ही बखर लिहिली गेल्याचे म्हटले जाते. अत्यंत साधे-सहज असे निवेदन, सुबोध भाषा, अलंकाराच्या किंवा कल्पनाविलासाच्या आहारी न जाता केलेल्या प्रसंगाची गुंफण ही या बखरीची वैशिष्ट्ये होत.

कृष्णाजी अनंत सभासद यांनी 'शिवछत्रपतीचे चरित्र उर्फ सभासदाची बखर' ही राजारामांच्या आज्ञेने जिंजी येथे इ.स.१६९४ मध्ये लिहिली. शिवाजीच्या पराक्रमावर केंद्रित ही बखर आहे. इ.स.१७६० ते १७७० च्या दरम्यान रघुनाथ यादव चित्रगुप्त यांनी 'चित्रगुप्तविरचित शिवाजी महाराजांची बखर/ चित्रगुप्ताची बखर' लिहिली. 'यमाच्या दरबारी जसा साक्षात चित्रगुप्त चिटणीशी करी तशी रघुनाथ यादव राजारामपुत्र शंभु छत्रपती यांच्या कोल्हापूर दरबारी चिटणीशी लेखनाची सेवा करी. म्हणून रघुनाथ यादवांनी आपले आडनाव चित्रे असे न लावता पौराणिक थाटावर आधारित चित्रगुप्त असे लावले'(वि.का.राजवाडे : ऐतिहासिक प्रस्तावना : १९२९ : पृ.२१६) चित्रगुप्तांनी ही बखर शंभूराजांच्या मृत्यूनंतर वनवासात असताना यशवंतराव शिंदे यांच्या आश्रयाला चिकोडी येथे आल्यानंतर लिहिली. या बखरीतून पौराणिक दाखले, संस्कृतप्रचुर शब्दांचा वापर, फारसी- उर्दु, मराठी व संस्कृत इ. भाषांचा वापर, श्लोक, पद्ये यासारख्या गोष्टींचा वापर केला गेला आहे. चरित्रनायकाचे व्यक्तीमत्त्व अधिक वैशिष्ट्यपूर्णरितीने या बखरीतून प्रकट झाले आहे.

मल्हार रामराव चिटणीस यांनी 'शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र' इ.स.१८१० मध्ये लिहिले. यातून चिटणीसांनी एक चरित्रमालाच गुंफली आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे पूर्वजन्मवर्णन व जन्मकथन, राज्य-आक्रमण आणि सज्जन सेवन, अफजलखान वध, राज्यमर्यादास्थापन, दिल्लीपती पराभव, दक्षिणदिग्विजय आणि राज्याभिषेक अशा सात प्रकरणातून चरित्रनायकाचा पराक्रम आविष्कृत झाला आहे. ही बखर म्हणजे थोडक्यात मराठी साम्राज्याचा चरित्रात्मक इतिहास म्हणूनच ओळखली जाते. याशिवाय चिटणीसांनी 'संभाजी महाराजांचे चरित्र', 'थोरले राजाराम यांचे चरित्र', 'श्रीमंत धाकटे रामराजे यांचे चरित्रे', 'श्रीमंत छत्रपती धाकटे शाहू यांचे प्रकरण' यासारख्या बखरीतून मराठ्यांच्या छत्रपती घराण्याचा इतिहास लिहून ठेवला आहे. याशिवाय खंडो बल्लाळ यांनी 'शिवदिग्विजय'ही बखर लिहिली. या बखरीतून केवळ शिवाजी महाराजांची पराक्रमगाथाच वाचायला मिळत नाही तर त्यांच्या वैयक्तिक भावजीवनाची कथाही वाचकांसमोर उलगडत जाते. त्यामुळे मराठी बखर वाङ्मयाच्या इतिहासात या बखरीस अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

पेशवेकाळात साधरणतः भाऊसाहेबांची बखर, पाणिपतची बखर, नाना फडणविसांचे आत्मचरित्र, गंगाधरशास्त्री यांचे आत्मचरित्र यासारख्या बखरी लिहिल्या गेल्या. 'नाना फडणीसांचे आत्मचरित्र' मधून फडणीसांच्या जीवनातील एकोणीस वर्षाची हकीगत आली आहे. आत्मा व शरीर यांच्या संबंधाच्या तात्त्विक विवेचनाने या आत्मचरित्राची सुरूवात झाली आहे. त्यामुळे संपूर्ण लेखनाला एक तात्त्विक बैठक मिळाली आहे. भाऊसाहेबांबरोबरचा हिंदुस्थानचा प्रवास, मथुरा, वृंदावन या तीर्थक्षेत्रांच्या भेटी, पुराणश्रवण, नाममंत्रग्रहण तसेच पाणिपतच्या युद्धानंतरचा नाना फडणीसांचा पळापळीचा परतीचा हृदयद्रावक प्रवास यासारखी चित्रणे या बखरीतून आली आहेत. यातून त्यांचे केवळ लौकिक चरित्रच दिसत नाही तर त्यांच्या अंतःस्थितीचे चित्रणही पहायला मिळते. मराठीतील आत्मचरित्रलेखनाचा आदर्श या बखरीच्या आधारे समोर ठेवता येतो.

मल्हार गणेश यांनी १७४८ ते १७५३ याकाळातील आपले आत्मवृत्त लिहिले. बाळाजी गोविंदच्या फौजेने वाताहत केल्यापासून व त्यातच तीर्थरूप (गणेश संभाजी खांडेकर) यांचा मृत्यू झाल्यापासून मल्हार गणेशला उत्तर हिंदूस्थानापर्यंत जी वणवण करावी लागली त्याचे चित्रण आले आहे. यात अहिल्याबाई, आनंदीबाई, तुकोजीराव यांच्या भेटीचे वृत्त या बखरीतून आले आहे. तत्कालीन काळातील परिस्थितीचा आढावा नेमकेपणाने समोर मांडण्याचा प्रयत्न दिसतो. ही बखर म्हणजे मल्हार गणेश यांनी आपल्या बंधूला लिहिलेले पत्र आहे.

चरित्रात्मक बखरीच्या परंपरेत गोविंद खंडेराव चिटणीस यांची 'श्री शाहू महाराज यांची बखर'महत्त्वाची ठरते. गोविंद हे खंडो बल्लाळ यांचे पुत्र. वयाच्या दहाव्या वर्षापासून ते शाहू महाराजांच्या सेवेत होते. त्यामुळे शाहू महाराजांच्या बालपणापासूनचे चरित्र, त्यांचे कौटुंबिक व राजकीय जीवनाचे चित्रण या बखरीतून आले आहे. बखरीच्या प्रारंभी संभाजी व राजाराम यांची त्रोटक माहिती आहे. परंतु शाहूंची संपूर्ण हकीगत वर्णिली आहे. त्यात दिल्लीतील वास्तव, पातशहा व बेगम यांचा त्यांच्यावरील लोभ, पातशहाबद्दल शाहूंची भक्ती व त्या भावनेनुरूप पातशहांच्या चपला पूज्य मानून शाहूंनी ते आपल्या पागोट्यात बांधणे यासारखे तपशील या बखरीत आढळतात.

'पाणिपतची बखर' ही रघुनाथ यादव उर्फ चित्रगुप्त यांनी श्रीमंत महाराज मातोश्री गोपिकाबाई यांच्या आज्ञेने पुणे येथे लिहिली. 'पाणिपत' या शब्दाला मराठीत एक वेगळाच अर्थ मिळाला आहे. दुःख आणि अभिमान या दोहोंचे तो प्रतीक बनला आहे. पाणिपतच्या युद्धावर मराठीत मोजक्याच पण लक्षणीय बखरी लिहिल्या गेल्या. त्यातील रघुनाथ यादव यांची 'पाणिपतची बखर' ही महत्त्वाची बखर होय. युद्धप्रसंगाचे वर्णन हे प्रस्तुत बखरीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. याशिवाय युद्धवर्णनातील बखरीमध्ये 'भाऊसाहेबांची बखर', 'चेऊलची बखर', 'खर्ड्याच्या स्वारीची बखर' या बखरींचा सामावेश होतो. 'पेशव्यांची बखर' ही बखर नाना फडणीसांनी आठ वर्षे वयाच्या सवाई माधवरावांकरिता चिटणीस बाळाजी गणेश या कारकूनाकडून इ.स.१७८२ मध्ये लिहून घेतली. या बखरीत छ.शिवाजी महाराजांनी 'महाराष्ट्र राज्याच्या वृद्धीविषयी' साहस करून राज्याभिवृद्धी कशी केली याचे निवेदन आहे. या बखरीची भाषा साधी, सरळ व प्रासादिक आहे. 'भोसलेवंशचरित्र' ही १८०३ मध्ये सरफोजीराजे यांचा मित्रसेवक बाबूराव चिटणीस यांनी लिहिली. महाराष्ट्राबरोबरच तंजावर येथे असलेल्या भोसले घराण्याचा इतिहास या बखरीतून साकार झाला आहे. त्यामुळे अन्यत्र न आढळणारे व तंजावरच्या राजघराण्याशी संबंधित असलेले अनेक तपशील सालानुक्रमानुसार या बखरीत आढळतात. गणपतराव गोविंद बर्वे यांनी इ.स.१८१७ मध्ये 'मराठी साम्राज्याची छोटी बखर' लिहिली यातून त्यांनी मालोजीपासून ते शेवटचा छत्रपती प्रतापसिंह यांच्यापर्यंतची हकीगत असल्याचे बखरीतील प्रकरणांवरुन दिसते. या बखरीच्या अखेरीस वंशवर्णन व वंशावळी असे दोन परिशिष्ट्ये दिली आहेत. याशिवाय 'भट पेशवे घराण्याची हकीगत (१८१८)', 'नागपूरकर भोसल्यांची बखर (१८२२)', 'श्रीमंत महाराज भोसले यांची बखर', 'शेडगावकरांची बखर (१८५४)', 'पेशव्यांची बखर(१८५५)' यासारख्या बखरी मराठी बखर वाङ्मयात लिहिल्या गेल्या.

बखर वाङ्मयाबरोबरच 'कैफियत'हा एक प्रकार या काळात अस्तित्त्वात आला होता. कैफियत म्हणजे यर्थाथ माहिती होय. पेशवेकाळात 'श्रीमंत भाऊसाहेब यांची कैफियत', 'सरदार गोखले यांची कैफियत', 'होळकरांची कैफियत'

अशा कैफियती लिहिल्या गेल्या. या काळात मोठ्या व्यक्तीने मोठ्या व्यक्तीला पाठवलेली पत्ररूप हकीगत म्हणजे थैली. हा बखरीत सामावणाऱ्या लेखनाचाच  एक प्रकार अस्तित्त्वात होता. उदा. होळकरांची थैली/ मल्हार होळकर यांची थैली. शिवाय बातमीपत्रवजा बखरीच एक नमुना म्हणून 'हकीगत'ओळखली जाई.

आशयाच्या दृष्टीने इतिहासाशी समकक्ष निगडीत असलेली ही बखर वाङ्मयाची परंपरा अभिव्यक्तीच्या दृष्टीने मात्र विविध रूपे स्वीकारते. यादवकाळात ती आख्यायिकांच्या रूपाने जन्माला आली. शिवकाळात चरित्रकथेच्या रूपाने तर पेशवेकाळात अनेकविध रूपाने आविष्कृत झाली. मराठी बखरींचा या विकासक्रमाने अभ्यास केला असावा. यामध्ये निर्मितीकाव्याची एकसलग अशी संगती असल्याचे दिसते. बखरीच्या या विकासक्रमात तिच्या वाङ्मयीन रूपावर व परंपरेच्या विकासावर प्रकाश पडतो. त्यामुळे मराठी बखरींच्या वाङ्मयीन व आकृतिबंधाचा व गुणवैशिष्ट्यांचा शोध घेणे सुलभ होते.

बखर वाङ्मयातून अनेकविध व्यक्तीचित्रणे आकाराला आली आहेत. आज जो मराठ्यांचा इतिहास आपल्यासमोर उभा आहे तो बखर वाङ्मयाच्या आधारेच उभा आहे. या बखरीतून शिवाजी महाराजांनी घडविलेले परिवर्तन, त्यांचे व्यक्तीदर्शन, संभाजी महाराजांचे चित्रण, राजाराम महाराज, औरंगजेब बादशाह, शाहू महाराज, भाऊसाहेब, मल्हारराव होळकर, चिमाजी आप्पा, पहिले बाजीराव पेशवे, यशवंतराव होळकर, पुरूषोत्तम दाजी, छत्रपती प्रतापसिंह महाराज तसेच जिजाबाई, सईबाई, सोयराबाई, महाराणी येसूबाई, ताराबाई, सकवारबाई, गोपिकाबाई पेशवे, आनंदीबाई पेशवे, अहिल्याबाई होळकर यासारखी स्त्री चित्रणेही बखर वाङ्मयातून प्रकट झालेली आहेत. या व्यक्तींच्या कृती–प्रवृत्तींचे वेधक आणि भेदक, विराट आणि विशाल असे दर्शन या बखरीतून प्रकट होते.

मराठी बखर वाङ्मयाच्या भाषेचा विचार करता ती केवळ गद्यलेखनाची भाषा नाही तर ती गद्य–पद्य मिश्रित अशी आहे. ती केवळ तार्किक विचारांची भाषा नाही तर ती मानवी भावभावनांची, विकारांची भाषा आहे. इतिहासातील व्यक्तींच्या मानवी भावभावनांचे अनुभवविश्व कथन करणारी आहे. या भाषेचे स्वरूप हे जड भाषेचे  नसून ते ललित वाङ्मयाच्या भाषेचे आहे. या भाषेत गद्यशैलीचा विकास झालेला आहे. लयबद्धता व नादमाधुर्य तीमधून कमी अधिक प्रमाणात आविष्कृत होताना दिसते. सुबोधता, काव्यात्मता, विचारसौंदर्य, अनुभवसंपन्नतेचे भावसौंदर्य, निवेदनाचा कलात्मक आविष्कार, अल्पाक्षर रमणीयता, साचेबंदपणाची मर्यादा, संस्कृतप्रचुर वस्तूनिष्ठ सांकेतिकता, बहुश्रुतता, आत्माविष्काराचा स्पर्श, समुदायवर्णन, रचनावैशिष्ट्य, प्रसंगवर्णन यासारख्या अनेकविध अभिव्यक्ती विशेषांनी बखर वाङ्मय महत्त्वाचे व वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहे.

थोडक्यात महाकावतीच्या बखरीपासून पेशवेकाळात अनेक बखरी लिहिल्या गेल्या. यातून तत्कालीन मराठी सत्तेचे, मराठी साम्राज्याचे दर्शन घडत गेले. साधारणतः १५व्या शतकापासून ते अव्वल इंग्रजी कालखंडापर्यंतचा एक दस्तऐवज या बखर वाङ्मयाने जतन केल्याचे दिसते.

(प्रस्तुत शोधनिबंधासाठी 'बखर वाङ्मय : उद्गम आणि विकास'या ग्रंथाचा आधार घेण्यात आला आहे.)

**संदर्भ :**

संकपाळ, बापूजी, 'बखर वाङ्मय : उद्गम आणि विकास',दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १९८२.

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखर वाङ्ःमयाचे मूल्यांकन

डॉ.शांताराम गो. बुटे,
प्राचार्य,श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर.

**प्रस्तावना :** मराठी बखर वाङ्मयाचे मूल्यांकन करताना बखर शब्दाची व्युत्पत्ती, त्याचा शब्दार्थ, बखर वाङ्मयाची निर्मितीमागची भुमिका, प्रेरणा तसेच बखर लेखनाची प्रक्रिया व वैशिष्ट्ये कशा प्रकारची आहेत, त्याचे प्रकार म्हणजेच वर्गीकरण, तसेच बखर लेखनाचा कालावधी या अनेक बाबींचा समावेश करणेत आलेला आहे.

**बखर–व्युत्पत्ती व शब्दार्थ :** मराठीतील एक प्राचीन गद्य वाङ्मय प्रकार होय. या बखर शब्दाची व्युत्पत्ती अनेक प्रकारे आढळतात. ''बखर'' हा अरबी शब्द होय. ''बक'' या शब्दापासून याची व्युत्पत्ती झालेली आहे. खबर या शब्दातील पहिले दोन वर्णाचा व्यत्यास होवून खब चे बख झालेले आहे. व पुढे हा बखर शब्द तयार झाला आहे. अशाप्रकारे वर्ण विपर्यासामुळे हा शब्द निर्माण झाला असे मत आहे.

बक म्हणजे बोलणे ह्या धातुपासून बखर शब्द झाल्याचे इतिहासकार राजवाडे म्हणतात.खुशालकींची हकीकत ह्याअर्थी असणाऱ्या बिलखैर या शब्दापासून बखर शब्द आला असेही रूपे आढळतात. बकऱ्याच्या चामड्यावर लिहिण्याच्या अरबस्तानामधील प्रथेवरून बकर बखर अशी व्युत्पत्ती पुढे करण्यात आली आहे.

**बखर वाङ्मय निर्मितीची प्रेरणा :** महीकावतीची बखर ही आज उपलब्ध असणाऱ्या बखरीत सर्वांत जुनी बखर आहे. निरनिराळ्या लेखकांच्या लेखनाने ती पूर्ण झाली आहे. या बखरीचा लेखक केशवचार्य कोकणप्रांती होता. ''म्लेंच्छार्णवाखाली सर्व प्रांत बुडाला. सर्वत्र भ्रष्टता माजली. महाराष्ट्र धर्म बुडाला.'' तेव्हा कुलस्वामिनीने '' धर्म महाराष्ट्र रक्षाया कारणे राजश्री नायकोबारायास स्वप्न दिले की, सर्व लोक जमवून केशवाचार्याच्या मुखे महाराष्ट्र धर्म सांगावा.''

जयराम स्वामीची बखर लिहिणारा बखरकार लिहितो की, ''मी जयरामस्वामी यांचे चरित्र लिहिलेले आहे. व परंपरेने सांगत आलेल्यावरून लिहिलेले आहे. त्यास कोणी दोष देवू नये.'' हनुमंत स्वामीची समर्थ चरित्राची बखर लिहिताना लेखनाची 'प्रेरणा' खालील शब्दात वर्णन केली आहे. ''जन्म प्रभृतीपासून समाधीपर्यंत श्री समर्थाचे चरित्र म्हणजे अनंत लिला आहेत. त्या सर्व सांगण्याची बुद्धी कोणास आहे? तथापि तुम्ही प्रश्न केलात त्याप्रमाणे पूर्वी श्री गंगाधर स्वामी यांस शिष्यमंडळी यांनी श्रीचे चरित्र श्रवण करण्यास्तव सज्जनगड येथे विनंती केली.''

शिवछत्रपतीच्या ९० कलमी बखरीत, बखर लिहिण्यामागची 'प्रेरणा' अशी नमूद करण्यात आलेली आहे, ''सदरहू आख्यान संकलित ९० प्रकरण पुण्यश्लोक राजा याची कथा वर्तती ती लिहिली जाते..... वडीली संग्रह केला होता. रायगड दप्तरी वंशावळी होती. त्याची तालीक वडिलापाशी होती. संकलित लिहून ठेवली होती.....'' यात चरित्र लेखनाच्या संबंधातील आस्था; चरित्राविषयक सामग्रीची नोंद, जपणूक, काळजी इत्यादी जाणिवा दिसून येतात. सभासद बखरीच्या सुरवातीलाच राजारामाची बखरलेखनाची आज्ञा दिलेली आहे. त्यात चरित्रपर बखर लिहवून घेण्यामागील प्रेरणा सूचित केलेली आहे. ''आपले पिते थोरले राजे यांनी इतका पराक्रम केला व चार पातशाहींचा लाविला. अैसा पराक्रम केला अैसे असतां औरंगजेब येवून (त्याने) किल्ले किल्ली अनर्थ मांडला याचा अर्थ काय? तुम्ही पुरातन राज्यातील माहितगार लोक आहात तर किस्तकाबिल पासून चरित्र लिहून देणे म्हणोन आज्ञा केली''

श्री शाहू महाराजांची बखर लिहिणारा गोविंद खंडेराव चिटणीस यांनी बखर लिहण्यामागील उद्देश सांगताना म्हटले आहे, हे अैकून पुन: आज्ञा करते जाले की, हे संकलीत सांगितले परंतु इत्थंभूत कळावे असा हेतू आहे. तर जेणे करून कार्याची तृप्ती होय आणि आस्थापूर्वक असा मजकूर आला असेल तसा कळवावा....'' पेशवेकाळातील हरिवंशाची बखर लिहणारा बखरकार आपल्या लेखन प्रेरणेच्या संबंधात लिहतो; ''त्यात वडिल कृष्णंभट बापाजी यांचे वंशाचा व किर्तीचा विस्तार लिहतो..... त्यांनी श्रीमंत पेशवे यांची सेवा ऐकनिष्ठपणे करून तैनाता व जहागिरी संपादन केल्या. त्या कसत्या केल्या, पेशवे यांची सेवा कशी केली व पराक्रम कसे केले ते वर्णन करिता....''

ISBN 978-93-5196-698-2

**बखर वाङ्मय लेखनाची प्रक्रिया व वैशिष्ट्ये :** बखर लेखनाची परंपरा ही मुलत: ऐतिहासिक स्वरूपाची असली तरी उपलब्ध असलेल्या प्रत्यंतर-पुराव्यांच्या आधारे घटनांची नोंद करण्यापेक्षा समाजमनावर बद्धमुल झालेल्या आख्यायिकांना प्राधान्य देण्याची प्रवृत्ती त्यामधून प्रत्ययास दिसून येते. ऐतिहासिक कारणमीमांसा करण्यापेक्षा इतिहास आणि पुराण यात नाते प्रस्थापित करण्याची धडपड बखरीतून अनेकदा प्रत्ययास येते. ऐतिहासिक व्यक्तीविषयी लिहिताना पुराणकालीन आदर्शाची मांडणी करण्याचा महत प्रयत्न दिसून येतो. पुराणाच्या पंचलक्षणापैकी वंशवर्णन आणि वंशानुचरित या दोन वैशिष्ट्यांनीयुक्त तो इतिहास असेही बखरकारांची धारणा असल्याचे जाणवते. इतिहासापेक्षाही वाङ्मयीनदृष्ट्या बखरी महत्त्वाच्या ठरल्या आहेत.

१. बखर लेखन आज्ञेने, त्याचप्रमाणे जाणकाराच्या भूमिकेतून करण्यात येत असल्यामुळे चरित्रात्मक लेखनाच्या प्रक्रियेची, संकलन, चिंतन, मनन, संघटन, कालानुक्रम, महत्त्वमापन व्यक्तिचित्रण आणि आकृतीबंध आदि विविध अंगे त्यातून लक्षात येतात.

२. बखरकार ऐतिहासिक काळाशी त्याचप्रमाणे व्यक्तिशी तादात्म्य पावल्यामुळे त्या वातावरणाचा ते आभास निर्माण करू शकतात. मात्र एखाद्या ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरलेल्या व्यक्तिजीवनाचा सापेक्ष लक्षात घेण्यास ते असमर्थ ठरले.

३.बखर लेखनाची प्रक्रिया आणि बखरकारांना ऐतिहासिक व्यक्तिजीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोण यात विलक्षण असा साम्य भाव आढळतो.

४.व्यक्तिचित्र, प्रसंगचित्र उभे करण्याचे सामर्थ्य बखरीमध्ये प्रकर्षाने दिसून येते. उदा.चित्रगुप्ताच्या बखरीतील शिवराज्याभिषेक, सभासदांच्या बखरीतील अफझलखानाचा वध, भाऊसाहेबांच्या बखरीतील दत्ताजी शिंदे यांच्याप्रसंग. म्हणूनच बखरीमधील व्यक्तिरेखन हे विशेष परिणामकारक झालेले आढळून येते.

५.ऐतिहासिकदृष्ट्या व चरित्रात्मकदृष्ट्या बहुमोल ठरणाऱ्या सामग्रीची त्यांनी नोंद केलेली दिसते.

६.संतचरित्रातील अनेक आगंतुक अंगे वास्तवाच्या फरकामुळे बखर लेखनातून आपोआपच गळून पडली.

७. बखरीमधील कथन पद्धती वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. संस्कृत, फारशी, अरबी व मराठी अशा विविध भाषांतील शब्दांचा आकर्षक मेळ यामध्ये दिसून येतो.

८.प्रसंगचित्रण जीवंत स्वरूपात करण्यात बखरकारांचा हातखंडा आहे.

९.बखरीमधील वस्तुनिष्ठ चित्रणावर मर्यादा दिसून येतात. कारण बखर ही आज्ञेने लिहिली जात होती.

१०.प्राचीन चरित्रात्मक लेखनाशी त्यांचे जिव्हाळ्याचे साम्य असल्याचे आढळून येते.

११.वीररस व करूणरस याचा प्रत्यय बखरीतून आढळतो. तसेच देशभक्ती, देशप्रेम, स्वामीनिष्ठा, स्वामीभक्ती, आज्ञाधारकता अशा विविध बाबींचासुद्धा समावेश बखरीतून झाल्याचे दिसून येते. उदा.अफझलखानाचा वध, वसईची लढाई तसेच नारायणरावांचा खून, पानिपतचा पराभव, पळ इत्यादी प्रसंग शौर्य व करूणरसाची उदाहरणे आहेत.

१२. विविध ठिकाणी प्रसंगानुसार अलंकारिक भाषा वापरली जाते. उदा.वर्णित शुरवीराला कर्णार्जुनाची उपमा दिली जाते. युध्द प्रसंगाला भारतीय युद्ध असे म्हटले जाते.

**बखर वाङ्मयाचे प्रकार :**बखर वाङ्मयाची वर्गवारी (प्रकार) खालीलप्रमाणे उदाहरणासह देता येतात.

**१) चरित्रात्मक बखरी :**शिवाजी, संभाजी, ब्रह्मेंद्र स्वामी यांच्या बखरी.

**२) वंशानु चरित्रात्मक बखरी :**पेशव्यांची बखर, नागपूरकर भोसल्यांची बखर.

**३) प्रसंग-वर्तनात्मक बखरी :**पानिपतची बखर, खरड्यांच्या स्वारींची बखर.

**४) पंथीय बखरी :** श्री समर्थाची बखर

**५) आत्मचरित्रात्मक बखरी :** नाना फडणीस, गंगाधर शास्त्री पटवर्धन, बापु..... यांची आत्मवृत्ते

**६) कैफियती बखरी :** होळकरांची कैफियत, होळकरांची थैली.

**७) पौराणिक कथा बखरी :** कृष्णजन्म कथा बखर.

ISBN 978-93-5196-698-2

**८) राजनीतिक बखरी :** आज्ञापत्र, जाहिरमाना.

**बखर वाङ्मयाचा कालखंड :** बखर वाङ्मयाचा लेखनाचा कालावधी हा १३ वे शतक ते १९ व्या शतकापर्यंत असल्याचे दिसून येतो.

**इसवी सन विवरणलेखक :**

**१४४८:** महिकावतीची किंवा बिंबस्थानची बखरमधील प्रकरण २ रे व ३ रे –केशवाचार्य

**१४७८:** महिकावतीची किंवा बिंबस्थानची बखरमधील प्रकरण ६ वे –आबाजी नाईक व रघुनाथ कावळे

**१५३८:** महिकावतीची किंवा बिंबस्थानची बखरमधील प्रकरण ५ वे –अज्ञात व्यक्ती

**१५६५:** राक्षसंतगडीची बखर – तालिकोटची लढाई

**१५७८:** महिकावतीची किंवा बिंबस्थानची बखरमधील प्रकरण १ ले–भविष्योत्तर पुराण –भगवान दत्ता

**१५९४:** महिकावतीची किंवा बिंबस्थानची बखरमधील प्रकरण ४ थे –भगवान दत्ता

**१७१८:** श्री शिव दिग्विजय बखर–खंडोबल्लाळ चिटणीस

**१७४९:** श्री शाहू महाराज यांची बखर –गोविंद खंडेराव चिटणीस

**१७६१:** सभासदांच्या बखरीची विस्तृत आवृत्ती –रघुनाथ यादव चित्रे (चित्रगुप्त)

**१७६0 ते १७७0–९१ :** कलमीबखर –दत्ताजी त्रिंबक वाकेनवीस

**१७६३:** भाऊसाहेबांची कैफियत –त्रिंबक सदाशिव पुरंदरे

**१७९३:** हनुमंत स्वामीकृत समर्थाची बखर

**१८0३:** भोसले घराण्याची बखर–बाबुराव चिटणीस

**१८१0:** सप्त प्रकारात्मक शिवचरित्र, मराठ्यांची बखर

**१८२९:** श्री शिवाजी प्रताप ग्रंथ –– बखरीचे

ऐतिहासिक मूल्य जसे महत्त्वपूर्ण आहे तसे वाङ्मयीनदृष्ट्या तिचे मूल्य उत्कृष्ठ असल्याचे आढळून येते. अशाप्रकारे वरीलप्रमाणे मराठी बखर वाङ्मयाचे मूल्यांकन करण्यात आले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) कृष्णाजी शामराव कामतीकर – भाऊसाहेबांची बखर – साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९५.

२) जोशी शंकर नारायण – कृष्णाजी अनंत सभासद विरचित छत्रपती श्री शिवाजी राजे यांची बखर, प्रथमावृत्ती, १८ ऑक्टोबर १९६0, चित्रशाळा प्रकाशन, पुणे – २.

३)जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.) – मराठी विश्वकोश – खंड ११ वा, प्रकाशक –सचिव, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई – १.

४) जोशी पं.महादेवशास्त्री – भारतीय संस्कृति कोश – खंड ६ वा, प्रकाशक – सचिव, भारतीय संस्कृति कोश मंडळ, ४१0, शनिवार पेठ, पुणे – ३0.

५) वाकसकर कुलोत्पन्न, सदाशिवसुत विनायक प्रभु –शिवछत्रपतींची ९१ कलमी बखर, प्रथमावृत्ती, १९६२, व्हिनस प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे – ३0.

६) साने काशिनाथ नारायण – रघुनाथ यादव विरचित पानिपतची बखर, आवृत्ती पाचवी, शके १८४५.

ISBN 978-93-5196-698-2

# रघुनाथ यादव विरचित पानिपत बखरीचा समीक्षणात्मक परामर्श

प्रा.डॉ.तारसिंग भोगा नाईक
श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर.

**प्रस्तावना :** बखर ही एक मराठीतील प्राचीन गद्य वाङ्मय प्रकार असून या शब्दाची व्युत्पत्ती अरबी शब्दापासून झालेली आहे. ''बखर'' हा अरबी शब्द होय. ''बक'' या शब्दापासून याची व्युत्पत्ती झालेली आहे. खबर या शब्दातील पहिले दोन वर्णाचा व्यत्यास होवून खब चे बख झालेले आहे. व पुढे हा बखर शब्द तयार झाला आहे. अशाप्रकारे वर्ण विपर्यासामुळे हा शब्द निर्माण झाला असे मत आहे.

बखर लेखनाचा उद्देश हा इतिहास लिहिणे, माहिती सांगणे किंवा चरित्रकथन करणे या प्रमुख उद्देशाने बखरीची निर्मिती झाली असल्याचे दिसून येते. शिवकालापासून ते पेशवेकालापर्यंत म्हणजेच १६ व्या ते १९ व्या शतकापर्यंत सुमारे अडीच वर्षांच्या कालखंडात मराठ्यांच्या इतिहासातील निरनिराळ्या व्यक्तींवर प्रसंगावर अंदाजे २०० ते २५० बखरी लिहिल्या गेल्याची नोंद इतिहासात झाल्याचे दिसून येते.

पानिपतचे संग्राम युध्द हे महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महान पर्व होय. लौकीकदृष्ट्या या युद्धात मराठ्यांना अपयश प्राप्त झाल्यामुळे मराठी सत्तेला पायबंद बसला. तरीसुद्धा एका दृष्टीने मराठ्यांचा पराक्रमाचा तो एक उत्कर्ष बिंदू होता. असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

पानिपतची बखर ही रघुनाथ यादवाने नानासाहेब पेशव्यांच्या पत्नी गोपिकाबाई हिच्या आज्ञेने लिहिली आहे. ती पुढीलप्रमाणे –''आज्ञाधारक रघुनाथ यादव लेखक दिमत चिटणीस कृतानेक साष्टांग दंडवत विज्ञापना तागाईत छ २५ जमादिलाखर पावेतों सेवकाचे वर्तमान यथास्थित असे. विशेष. नवी खबर श्रीमंत यांजकडून वर्तमान आजपर्यंत झालें ते विदित व्हावें म्हणून आज्ञाधारकास आज्ञा जाहली. त्यास यथामतीनें निवेदन करितों. श्रवण केलें पाहिजे.'' अशी आहे.

**पानिपतच्या बखरीच्या प्रती :** ही बखर काव्येतिहाससंग्रहात प्रथम शके १८०७ (इ.स.१८८५) मध्ये प्रसिद्ध झाली. या बखरीच्या एकूण चार प्रती काव्येतिहाससंग्रहकर्त्यास मिळाल्या. त्यांचा इतिहास खालीलप्रमाणे आहे.

**१) पुणे प्रत १ :** ही प्रत राजश्री शंकर तुकाराम शाळिग्राम यांजकडील होती. ही खर्ची उभ्या बंदावर लिहिली असून अक्षर चांगले आहे.

**२) भिवंडी (ठाणे) प्रत :** जुन्नरी कागदाच्या चौरस बंदावर, दोन्ही बाजूंनी पुस्तकासारखी वही बांधून त्यावर लेखन केले आहे. हिची पहिली दोन पृष्ठे नाहीत. एकूण ४१ बंदांत (८१ पृष्ठे) ही लिहिली असून सवाई माधवरावांच्या लग्नापर्यंत हीत मजकूर आहे.

**३) नागपूर प्रत :** बाळबोधीत असलेली रा.वामनराव दाजी ओक याजकडील ही प्रत तीन. मूळ बखरीचा शके १६८३ वृषानाम संवत्सर हा आहे. शेवट 'ही नकलेची नकल श्रावण शुद्ध ५ पंचमी शके ११५४ आनंदनाम संवत्सरे मुक्काम पुणे येथे केली' असे असल्यामुळे हिचा लेखनकाल कळत नाही. नकलकार श्रीधर गणेश परांजपे असे आहे.

**४) पुणे प्रत २ :** हिच्या पहिल्या पृष्ठावर 'सखाराम मोरेश्वर वझे दस्तुर खुद्द' असे आहे. मूळ साठ–पासष्ट बंद असलेल्या या प्रतीचे एकूण साडेअठ्ठेचाहीस बंद उपलब्ध झाले. मूळ प्रतीचे अक्षर न लागल्याचा पुरावा हीत स्पष्ट दिसतो. दोन फूट लांब व चार इंच रूंद असे हिचे खर्ची बंद आहेत. अक्षर साधारण असून बंदाच्या एका बाजूने ही लिहिली आहे. शेवटचे बंद नसल्याने हिचा काळ व लेखक कळत नाही. ही व नागपूर प्रत यासारख्या आहेत.

भिवंडी (ठाणे) व पुणे या प्रतींवरून मुख्यत: ही बखर काव्येतिहाससंग्रहात प्रसिद्ध झाली.

**वाङ्मयीन मुल्यांकन :** इतिहासकालीन व्यक्ती व घटनांचे म्हणजेच प्रसंगाचे चित्रण हा मुख्य उद्देश बखरीचा असल्याने तो परिणामकारक होण्यासाठी भाषा सौंदर्याकडे विशेष लक्ष देण्यात आल्याचे दिसून येते. लेखनात आत्मीयता असल्याने जिव्हाळ्याचे लेखन झाल्याचे त्यामध्ये जिवंतपणा आढळून येत असून सहज आपल्या हृदयाचा वेद घेतला जातो. प्रस्तुत

बखरीत व्यक्ती वर्णने प्रकर्षाने दिसून येतात.

उदा. मराठ्यांनी बादशाही खजीना लुटण्याचा बेत आपणांस पसंत पडला नाही हे जाटाकडून कळल्यावर त्याच्याविषयी भाऊसाहेबांचे विचार बखरकार सांगतो की, ''जाटाचा विश्वास नाही. हा कार्यवादू, समयास फिरून पडेल. आम्हांस हाच शत्रू. याचा भरंवसा नाहीं.'' या वर्णनात मराठ्यांच्या दृष्टिकोणातून जाटाचे व्यक्तिचित्रण सुबक रेखाटले आहे. जाटास विश्वासात घेताना भाऊसाहेब म्हणतात, 'आम्ही फरजंद, लहान माणूस न हों. जेणेंकरून बादशाही सलामत राहील तेंच करावयास आलों आहों... इराणीचा हिशेब कोण धरितो? आमचे खातरेंत नाहीं.' भाऊसाहेबांच्या या उद्‌गारात त्यांची कर्तव्यतत्परता व आत्मविश्वास ही दिसतात. युद्धात प्राणावर येऊन बेल्यावर 'चिरंजीव विश्वासरावसाहेब, तीर्थस्वरूप नानासाहेबांचे व सौभाग्यवती गोपिकाबाईंचे प्राणांचेही प्राण!' हे भाऊंचे विश्वासरावासंबंधीचे वर्णन किती अर्थपूर्ण आहे! लढाईत पिछेहाट होत असताना मल्हारराव होळकरांप्रमाणे जनकोजी शिंदे यास भाऊंनी पुण्यास जाण्यास आज्ञा दिली. त्या वेळी जनकोजीने उत्तर दिले की, 'मी पुण्यास माघारा जावयाचा नाहीं. खावंद जर माघारे पुण्यास येतील तर मी जाईन. नाहीं तर मी जेथें खावंदाचा जोडा पडेल तेथें माझें शिरकमल पडेल.' या त्याच्या उत्तरात त्याची उत्कट स्वामिभक्ती दिसून येते.

बखरीमधील घटनांचे म्हणजेच प्रसंगाचे हुबेहूब वर्णन डोळ्यासमोर उभे राहणे हे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य या बखरीमधून दिसून येते.

कोणताही प्रसंग डोळ्यापुढे उभे करण्याचे बखरकाराचे कसब वाखाणण्यासारखे आहे. इतर बखरींप्रमाणे याही बखरीत वीर व करूण हे दोन रस आढळतात. उभय सैन्यांच्या लढाईतील वीरश्रीचे वर्णन करताना लेखक सांगतो की, 'लढाईची हातघाई झाली. भाला व बिचवे व गुरगुजे व जमदाडा व वाघनखें यांचे चपेटे फार झाले. एकमेकांच्या गळ्यास मिठ्या मारून पुढचे पाय पुढें टाकू लागले. कोणी मागें फिरेना. सक्रोध होऊन, अवसानें धरून एकमेकांवर पर्जन्यप्राय कोसळूं लागले. मल्लयुद्धाचें मारणेंच कडोविकडीचें परस्परें दाखवूं लागले.'

करूणरसात्मक प्रसंगाचे वर्णनही तितकेच उत्कट. शेवटच्या घटकेचा प्रसंग आल्यावर भाऊसाहेब म्हणतात की, ''विश्वासराव साहेब! तुमचें वय लहान. तुम्हीं सुखाची जाती तिलप्राय अनुभवली नाहीं. तुम्हांसारखे सगुण पुत्र, उभयतांची ममता तुमचे ठायीं विशेष, असें असतां हें महत्तर अपेश श्रीसांबानें माझे विभागास आणिलें.'' असें बोलतांच भाऊसाहेबांच्या नेत्रांस पाणी आलें कीं, 'रावसाहेब! तुम्हांस मीं मरणाचे घरीं आणिलें. ही गोष्ट सर्वोपरी आमचे पासून गेली!' ऐसी भाषणें ऐकून सर्वांस गहिंवर आला. या भाषणात विश्वासरावाबद्दल भाऊसाहेबांच्या हृदयात असणारी ममतेची भावना किती सहजतेने व्यक्त झाली आहे! युद्धाचे वर्तमान कळल्यावर नानासाहेबांनी भाऊसाहेबांसाठी केलेला शोक हा हृदयाला पाझर फोडणारा असाच आहे.

त्याचप्रमाणे वस्तुवर्णन हासुद्धा बखरीचा एक विशेष गुण आढळून येतो. भालदार-चोपदारांनी लष्करात ताकीद दिल्यानंतर लढाईला निघालेल्या मराठे सरदाराच्या शस्त्रांचे हे सुंदर वर्णन पहा -

' रणांगणाचा शृंगार करून, घुग्या व बखतरें व टोप, चिलखतें, बिन्या व बिरजे व वस्त्रें तकटीं व मुक्तमाला व मस्तकीं तुरे व कलग्या व अंगींचे बारा अलंकार व जरीचे अबदागिरें करून शोभायमान, हातीं पट्टे व गुरगुज व फिरंगाणा व बिचवे व कटारा व पेशकब्जे व वाघनखें व भाले व कोयते व परीघ व पट्टीश व फरश व गारभांडी व सांगा व बरच्या व बंदुका कटितटीस शस्त्रसंभार बांधून आपआपलाले वाहनारूढ होऊन अंगी स्फुरणें अतिशय, युद्धास जावयास अति उदित, स्वामिसेवेशीं तत्पर, अशा आवेशाचें पुरूष हजारों हजार सिद्ध जाहाले.' यांतील पारिभाषिक शब्दांनी त्या वर्णनाला आगळी शोभा आलेली आहे.मराठी बखरगद्यात परंपरासाहचर्य अनेक प्रकारे दिसून येते. परंपरासाहचर्य म्हणजे लेखकाच्या मनावरील झालेल्या संस्काराचे आविष्करण. बखरकार ही सामान्य कारकुनी पेशातील माणसे असली तरी त्यांच्या मनावरील पौराणिक संस्कार आलंकारिक भाषेत कित्येकदा प्रकट झालेले दिसतात. या दृष्टीने पाहता पानिपतच्या बखरीतील पुढील काही विशेष उल्लेखनीय आहेत.

उदा. 'श्रीराम अयोध्यापूर सोडून वनवासास जावयास सिद्ध जाहाले, तें वर्तमान ऐकतांच दशरथानें कैकेयीच्या

मंदिरांत अंतर्धान केलें, तसेंच भाऊसाहेबांस जाहालें'. हा दृष्टान्त समर्पक होय.

तसेच या बखरीत परकीय पारिभाषिक शब्दांचा म्हणजेच फारशी, अरबी, तुर्की अशा विविध भाषेंचा वापर योग्य त्या ठिकाणी झाल्याचे आढळून येते. उदा.घुगी, बखतर, जंबुरा, तरकस, गुरगज इ.

प्रगाढ आत्मविश्वास हे एक मुलभूत तत्त्व या बखरीमधून दिसून येते. अंतर्मनाची शक्ती म्हणजेच निर्मितीक्षमता ही रघुनाथ यादव यांच्याकडे असल्यामुळे आत्मप्रगटीकरणाद्वारे सामर्थ्यशाली पानिपत बखरीची निर्मिती झालेली आहे.

वरीलप्रमाणे बखरीमधील व्यक्तीवर्णने, प्रसंगाचे हुबेहूब वर्णन, वस्तुवर्णन, परंपरासाहचर्य, वीर व करूणरसांचा अंतर्भाव तसेच पारिभाषिक परकीय भाषेतील शब्दांचा समावेश त्याचप्रमाणे रघुनाथ यादव यांचा प्रगाढ आत्माविष्कार या विविध वाङ्मयीन मुल्यांचा समावेश पानिपतची बखरीमध्ये झाल्यामुळे या बखरीचे ऐतिहासिक मूल्य जसे महत्त्वपूर्ण आहे. तसेच वाङ्मयीन दृष्ट्या तिचे मूल्य उत्कृष्ट असल्याचे सिध्द होते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) कृष्णाजी शामराव कामतीकर - भाऊसाहेबांची बखर - साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९५.
२) जोशी शंकर नारायण - कृष्णाजी अनंत सभासद विरचित छत्रपती श्री शिवाजी राजे यांची बखर, प्रथमावृत्ती, १८ ऑक्टोबर १९६०, चित्रशाळा प्रकाशन, पुणे - २.
३) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.) - मराठी विश्वकोश - खंड ११ वा, प्रकाशक - सचिव, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई - १.
४) जोशी पं.महादेवशास्त्री - भारतीय संस्कृति कोश - खंड ६ वा, प्रकाशक - सचिव, भारतीय संस्कृति कोश मंडळ, ४१०, शनिवार पेठ, पुणे - ३०.
५) वाकसकर कुलोत्पन्न, सदाशिवसुत विनायक प्रभु -शिवछत्रपतींची ९१ कलमी बखर, प्रथमावृत्ती, १९६२, व्हिनस प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे - ३०.
६) साने काशिनाथ नारायण - रघुनाथ यादव विरचित पानिपतची बखर, आवृत्ती पाचवी, शके १८४५.

****

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखर - ऐतिहासिक सत्यता

**डॉ. माधुरी गोपाळ तानवडे**
आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा

प्राचीन वाङ्मयाचा अभ्यास करताना पद्यलेखनाबरोबर गद्यलेखनही मराठीत झाले आहे असे दिसते. या गद्य वाङ्मयाच्या अवलोकनात उत्तर काळात झालेले बखर वाङ्मयाचे लेखन त्यातील विविधता व विपुलता यामुळे आपणांस स्तिमित करून जाते. बखरी म्हणजे चरित्र ग्रंथ. वाका, करीना, हकीकत, कैफियत, ऐतिहासिक स्त्री पुरूषांची चरित्रे अशा वैविध्यपूर्ण लेखनाचा यात अंतर्भाव केला जातो. बील-खैर म्हणजेच खुशालीची हकिकत. या अर्थाने बखर हा शब्द रूढ झाला आहे. मुसलमानांच्या सहवासाने त्यांच्या तवारिखा पाहून बखरी लिहिण्याचा प्रघात पडला असावा. या बखरी बकऱ्यांच्या चामड्यांवर लिहिल्या जात. त्यामुळे बकर असे नाव पडले असावे. बखरींची परंपरा अतिशय पुरातन आहे. शालिवाहनाची बखर, शहाण्णव कलमी बखर, महानुभावियांनी लिहिलेल्या सिंघणादी यादवांच्या बखरी, हेमाडपंताची बखर, राक्षसता गढीची बखर या बखरी सर्वात पुरातन म्हणून परिचित आहेत. स्वराज्य स्थापनेपासून पेशवाई संपेपर्यंत सुमारे अडीचशे बखरींचे लेखन झालेले दिसते.

या संपूर्ण बखर वाङ्मयाचा विचार करता विषयानुसार, कालानुसार बखरींचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येते.

**१. समकालीन बखरी :** सभासदाची बखर, चित्रगुप्तकृत शिवाजी महाराजांची बखर, खर्ड्याच्या स्वारीची बखर इ.

**२. कर्णोपकर्णी ऐकलेल्या हकिकतींचे बाड :** सोहोनीकृत पेशव्यांची बखर, गोविंदपंत बुंदेल्याची बखर इ.

**३. पूर्वीच्या जुन्या टिपणांची बखर :** शिवदिग्विजय, शिवप्रताप, शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र इ.

याच बरोबर राजकारणात्मक किंवा ऐतिहासिक बखरी, पूर्वकालीन राजकारण असलेल्या बखरी, बखरसदृश ऐतिहासिक लेखन आणि ऐतिहासिक वा राजकीय विषय नसलेल्या चमत्कारांनी भरलेल्या बखरी असेही बखरींचे प्रकार पाडले जातात.

बखरींचा मुख्य हेतू इतिहास कथन करणे हा आहे. बखर म्हणजे गद्यात लिहिलेला ऐतिहासिक वृतांत. वीरगौरवात्मक इतिहास म्हणजे बखरी. (श्री. ना. बनहट्टी) बखरी म्हणजे चरित्रग्रंथ (वा. सी. बेंद्रे). या बखरींच्या वैशिष्ट्यांकडे पाहिले की, या बखरींची निर्मिती विशिष्ट परिस्थितीत झाल्याचे जाणवते. साधारणत: कोणत्या तरी राजकीय पुरुषाच्या आज्ञेवरुन बखरींचे लेखन झालेले दिसते. 'साहेबी मेहेरबानीकरुन सेवकांस ... आज्ञा केली.' ही सभासद बखरीची सुरुवात किंवा 'पत्री आज्ञा झाली की ... शाहू छत्रपती यांचा प्रधान मुख्य आदिकरुन सवालक्ष फौजेनिशीहि भाऊगर्दी होऊन प्यादेमात कैशी झाली हे सविस्तर वर्तमान लिहिण्यास आज्ञा केली.' हा मजकूर बखरींचे लेखन आज्ञेवरुन झाले आहे हे सिद्ध करतो. वास्तविक इतिहास आणि वाङ्मय या दोन्ही दृष्टीने बखरींचे अनन्यसाधारण महत्व आहे. इतिहास साधन म्हणून बखरींचा बराच उहापोह झाला. वाङ्मयीन दृष्टीने बखरीकडे थोडे कमीच पाहिले गेले. मराठ्यांचा इतिहास हे बखरीपुढचे मोठे आव्हान होते. मराठ्यांच्या पराक्रमाचा इतिहास लिहिण्याचे आव्हान ग्रँट डफने स्वीकारले. मात्र त्याचे हे काम अपुरे राहिले. एल्फिन्स्टन याने ग्रँट डफच्या मार्गदर्शनाखाली जे लेखन केले त्यात त्याने बखर व इतिहास यांचे स्वरुप वेगळे आहे असे म्हटले आहे. त्यामुळे बखर ही इतिहासाचे अव्वल दर्जाचे साधन नाही असे त्याने म्हटले आहे.

ग्रँट डफची मराठ्यांची बखर इतिहास समजून शाळा कॉलेजमध्ये अभ्यासली जात होती. त्यात काही संक्षेप करुन विद्यार्थ्यांची सोय केली गेली. परंतु बखर म्हणजे इतिहास ही संकल्पना तेव्हापासून रुढ होऊन गेली. त्यामुळे बखरीचा वाङ्मयीन दृष्टीकोनातून अभ्यास कमीच झाला. केवळ बखरींवर भिस्त ठेऊन इतिहास लिहिण्याचा प्रयत्न करणे ऐतिहासिक सत्याच्या निर्णयाच्या दृष्टीने काहीसे अपुरे व पोकळ ठरते. तरीही इतिहासाचे लेखन करताना प्रामाण्याच्या दृष्टीकोनातून कुणीही बखरींना नाकारले नाही. त्यामुळे बखरीचे ऐतिहासिक महत्व कोणालाच नाकारता आले नाही. याच प्रेरणेतून अनेक बखरी प्रकाशात आणण्याचे काम इ.स. १८६९ पासून १९५० पर्यंत अव्याहतपणे झाले. त्यासाठी नियतकालिकांनी,

संस्थांनी प्रयत्न केले.

संशोधनाच्या काळात हाती आलेल्या बखरींची वाचन, लिप्यंतर व संगती लावून संपादन प्रक्रीया सुरु झाली. हे करताना बऱ्याच बखरी मोडी लिपीत होत्या. त्यांच्या लेखनाची धाटणी नकलाकाराप्रमाणे बदललेली होती. एकाच बखरीच्या विविध ठिकाणी नक्कललेल्या विविध प्रती होत्या. काही बखरींची पाने गहाळ झाली होती. अशा परिस्थितीत विषयानुरुप क्रम लावून, विषयवार परिच्छेद करुन, अक्षरदोष काढून त्यांचे संपादन केले जात होते. या साऱ्या विवेचनातून एक गोष्ट जाणवते ती म्हणजे या बखरी लिहिल्या गेल्या त्यांची ऐतिहासिक सत्यता किती व वाङ्मयीन सत्यता किती ?

बखरवाङ्मय ही केवळ कल्पनाविलासाची निर्मिती नसते. तिचा आधार राजकिय इतिहासात व लौकिक जीवनात आपले पाय घट्ट रोवून असतो. शकावली यादी सारख्या प्रमाणभूत साहित्याच्या आधारावर कागदपत्रातील अधिकृत माहितीच्या मदतीने त्या आख्यायिका म्हणजेच वास्तव इतिहासकथा आकाराला येते. ऐतिहासिक व्यक्ती व प्रसंग यांचे चित्रण करताना मानवी भावना, विचार, विकार यांची सांधेजोड केली जाते. स्थल, काल, व्यक्ती, प्रसंग यांनी बद्ध असलेल्या कालपटावर आपल्या प्रतिभेने बखरकार जिवंत चित्रण करत असतो. तो त्यात इंद्रधनुषी रंग भरतो. भावनेचा जिव्हाळा ओततो. एखाद्या कॅनव्हासवर एखादे व्यक्तीचित्र, युद्धाचा प्रसंग रंगवावा तसा तो चितारतो. बखरकार ज्या विविक्षित अर्थाने बखरलेखनाला सीमारेषा घालत असतो त्यादृष्टीने व्यक्ती व प्रसंगाच्या आधारे तो कथा निवेदन करतो. कधी पूर्वसूरींचा मागोवा घेत तर कधी स्वतंत्रपणे लेखन करताना तो त्याच्यादृष्टीने महत्वाचे नसलेले तपशील गाळतो. तरी त्याच्या ऐतिहासिक प्रामाण्यात फारसा फरक पडत नाही. बखरींच्या अंतरंगात राजकीय इतिहासाबरोबर तत्कालिन समाज व संस्कृतीचे दर्शन घडते. किंबहुना राजकीय इतिहासाचे सुसंगत, कथात्मक निवेदन हेच बखरीचे व्यवच्छेदक लक्षण मानले जाते. म्हणूनच वाङ्मय व इतिहास या दोन्ही दृष्टीने आशय अभिव्यक्तिच्या बाबतीत बखरीचा विचार महत्वाचा ठरतो. बखरीचे ऐतिहासिक प्रामाण्य मानण्याच्या दृष्टीने पुढील मुद्दे महत्वाचे ठरतात.

१.बखरीत राजकीय इतिहासाचे सुसंगत निवेदन असते.

२.राजकारणाचा इतिहास हा बखरींचा विषय असतो.

३.बखरी लिहीताना बखरकारांने इतिहासाचे बीज किंवा मूळ सोडलेले नसते.

४.मुसलमानी तवारीखांच्या अनुकरणातून बखरी लिहिल्या तरी त्यांचे अंतरंग अस्सल मराठी होते. ऐतिहासिक व्यक्ति व घटना यांच्या नोंदी पुरताच बखरींचा आवाका नसून त्यांची दृष्टी व्यापक असते.

५. इतिहास लेखन निरपेक्ष व समतोल वस्तुनिष्ठ असावे असे असले तरी बखरकार आपली आत्मनिष्ठा पणाला लावून व्यक्तिचित्रण व जीवनदर्शन घडवत घटना व व्यक्तिंची कार्यकारण परंपरा व भावनांची सुसंगती साधण्याचा प्रयत्न करते.

६.बखरीतून सलग इतिहासाचा कालपट सुसंगत मिळतो. त्यामुळे बखरीची प्रेरणा इतिहासलेखन असावी असे राजवाडे यांनी म्हटले आहे. वरील विवेचनावरुन बखरींचे ऐतिहासिक प्रामाण्य मानले पाहिजे. तिची ऐतिहासिक सत्यता गृहीत धरली पाहिजे असे म्हणावे लागेल. मात्र त्याचवेळी बखरीचे ऐतिहासिक प्रामाण्य व सत्यता याबद्दल साशंक असणाऱ्यांचा गट तिला इतिहासापेक्षा वाङ्मयीन अभ्यासाच्या दृष्टीने प्राधान्य द्यावे असे म्हणतो. इतिहास म्हणून तिची सत्यता नाकारताना हा गट पुढील कारणे देतो.

१. बखरकारांच्या ज्ञानाची मर्यादित व संकुचित व्याप्ती, ऐतिहासिक घटनांचे व्यासंगपूर्ण विश्लेषण करण्याऐवजी पारंपारिक माहितीवर अवलंबून राहण्याची त्यांची वृत्ती अवलोकन, पृथःकरण, टीका व पद्धती यांचा अभाव बखरींमध्ये जाणवतो. त्यामुळे त्या एकांगी वाटतात.

२. बऱ्याच बखरींचे लेखन राजकीय पुरुषाच्या आज्ञेवरुन झाल्याने कळत नकळत त्या व्यक्तिच्या आधिकाराचा दबाव लेखकावर पडल्याने त्यात वस्तुनिष्ठता येत नाही.

३. बरेच बखरीचे लेखक हे राजे, महाराजांचे आश्रीत होते. आपल्या मालकाबद्दलची अतीव निष्ठा, जिव्हाळा, प्रामाणिकपणा त्यांच्यात जाणवतो. त्यामुळे व्यक्तिपूजेचा दोष त्यात जाणवतो.

४. काही बखरींचे लेखन प्रतिकूल परिस्थितीत झाले आहे. तसेच लेखकाला फारशी भाषेचे असलेले अज्ञान यामुळे

ISBN 978-93-5196-698-2

ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने थोडी साशंकता निर्माण होते.(सर जदुनाथ सरकार)
५.बऱ्याचदा बखरीतील लेखनात काहीसा विसंगतपणा, अतिशयोक्ति, अवास्तवता जाणवते. शिवचरित्रप्रदिप व शिवभारत या बखरी याचे उत्तम उदाहरण आहेत.
६.बखरींचे लेखन उत्तर काळात झाल्याने परंपरेने आलेली माहिती ऐकून त्यातील योग्य माहितीचा स्वीकार करुन त्या आधारावर लेखन केले आहे.कुठल्याही बखरकाराला अस्सल कागदपत्रांचा संग्रह पहायला मिळाल्याचे दिसत नाही. एकूण बखरकारांनी कर्तृत्ववान व्यक्तिंची माहिती तुटपुंज्या कागदाच्या आधारे देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.
७.बखरकारांनी संविधानकात स्वारस्य व जिवंतपणा आणण्यासाठी स्वरचित काल्पनिक संभाषणे, पत्रे घालण्याचा प्रयत्न केला आहे. बऱ्याचदा ही पत्रे खरी असे समजून बखरीचे प्रामाण्य ठरविण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु तसे करणे तत्कालिन वस्तुस्थितीचे अज्ञान दर्शवते. या पत्रात मूळ संविधानकातील प्रसंगाचा कालक्रम न समजल्याने ज्या प्रसंगाचे पत्र रचून घालायचे तो प्रसंग ज्याच्या नावाने लिहायचा तो हयात आहे की नाही याबाबतच्या अज्ञानामुळे हयात नसलेल्या माणसांच्या नावाने पत्रे लिहीलेली आढळतात. हे इतिहासाच्या दृष्टीने मारक आहे.
८. बखरींचे लेखन वर्तमान काळातील चिकित्सापूर्ण बुद्धीने केले जात नसे तर त्याच्या लेखनावर पौराणिक संप्रदायाची किंवा कथेकरी पध्दतीची छाप होती.
९. बखरींची विवेचन पध्दती पौराणिक स्वरुपाची राहिल्याने त्यात अशक्य कोटीतील अद्भुत गोष्टी व विचित्र विधाने घुसडली गेली.
१०.पेशवे उत्तरकालीन बखरींचा उपयोग सत्यतेपेक्षा अक्षरवळणाकडे केल्याने उपलब्ध बखरींच्या नकला जितक्या बिनचूक झाल्या पाहिजेत तितक्या झाल्या नाहीत. त्यात पध्दतशीर व संगतवार मजकुराचा अभाव जाणवला.
११. बखरीत जे कालनिर्देश आढळतात त्याबद्दलही साशंकता वाटते. अद्भुत माणसांचे जन्म विशेष दिवसाला झाले पाहिजेत अशी कल्पना रुढ असल्याने अक्षय्यतृतीया, रामनवमी अशा शुभ दिवशीच त्यांची जन्मतिथी दिली गेली. त्यामुळे बरेच कालनिर्देश चुकीचे आढळतात.
१२. बखरींचे लेखन जितके शास्त्रशुद्ध व्हायला हवे तेवढे शास्त्रशुद्ध व साधार झाले नाही. त्यामुळे ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने बखरीची प्रामाण्यता शेवटच्या दर्जामध्ये जाते.
१३.शेडगावकर बखर, शिवदिग्विजय यासारख्या बखरी बनावट भारुडांनी भरल्या आहेत.
१४.चिटणीशी बखरीखेरीज कुठल्याही बखरीची मूळ प्रत उपलब्ध झाली नाही व अन्य बखरींच्या अनेक नकला मूळ प्रतीशी ताडूनही पाहिल्या नाहीत. बऱ्याच बखरीतील प्रसंगांचा मजकूर व तो देण्याचा क्रम निरनिराळा वाटतो. तसेचप्रसंगक्रमही चुकीचा वाटतो.
१५. बऱ्याच ठिकाणी मूळ प्रतीची नक्कल काटेकोरपणे झालेली नसल्याने तिच्यात बिनचूकपणा आलेला नाही.
१६. शिवदिग्विजयसारख्या बखरीत माहिती नसलेले अनेक प्रसंग घुसडले असून व माहिती असलेले प्रसंग वगळले असून तिची मांडणी पाल्हाळीक व कथेकरी मांडणीची आहे.
१७. बखरकारांना शिवाजीच्या चरित्राचे मर्म व वृत्त चांगले अवगाहन न करता आल्याने प्रसंग वर्णनात विसंगती व कालानुक्रमाच्या चुका शिरल्या आहेत.
१८.बखरकारांनी स्थल, काल, प्रसंग यांचे अनेक घोटाळे केले आहेत.
१९.इतिहास हे एक शास्त्र आहे. परंतु बखरकारांना ते न कळल्याने त्यांनी शास्त्रशुध्द पध्दतीने त्याचे लेखन केले नाही.

वरील सर्व विवेचनावरुन एक गोष्ट जाणवते ती म्हणजे बखरींच्या ऐतिहासिक प्रामाण्याबद्दल अभ्यासकांच्या मनात थोडी साशंकताच असलेली दिसते.मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास अभ्यासताना अभ्यासकांनी बखरींमधल्या उणिवा सांगून तिची ऐतिहासिक सत्यता व साधन म्हणून महत्वाबद्दल शंका व्यक्त केली आहे. सर जदूनाथ सरकार यांनी सभासद बखरीबद्दल म्हटले आहे की यातील वर्णने स्मृतीवर आधारली असल्याने स्थल, काल व घटना यांचा

क्रम राहिलेला नाही.

सभासद व चिटणीस बखरकारांनी ज्या कागदपत्रांचा आधार घेतला होता त्यासाठी बखरीवरच विसंबून रहावे लागते. कितीही कारणे दिली तरी बखरींचे ऐतिहासिक महत्व नाकारून चालणार नाही कारण –

● शिवशाहीच्या इतिहासात जिथे जिथे त्रुटी किंवा मोकळ्या जागा आढळतात तिथे बखरींचीच मदत घ्यावी लागते.

● जोपर्यंत अस्सल कागदपत्रांच्या आधारे बखरीतील विधाने खोडून काढता येत नाहीत तोपर्यंत बखरींची सत्यता मानावीच लागते.

● मराठ्यांच्या ऐतिहासिक साधनात बखरींचे स्थान नाकारून चालत नाही.

● शिवचरित्रातील अंधाऱ्या भागावर प्रकाश टाकण्याचे मौलिक काम या बखरी निश्चितच करीत आहेत.

● वा.सी. बेंद्रे यांच्या मते बखरीत जरी काही अतिशयोक्तिचा भाग शिरल्याने तिची विश्वसनियता थोडी कमी झाली तरी साधन या दृष्टीने तिचे महत्व नाकारता येत नाही. बखरीचा उपयोग इतिहास रचनेला मार्गदर्शक किंवा पोषक करण्याइतका या बखरीतून इतिहासाचा परंपरेने आलेला धागा हाती लागू शकतो. मात्र बखरीचा उपयोग इतिहासात काही विवक्षित मर्यादेपुरताच करावा लागतो. यातील मजकूराला इतर साधनांपेक्षा पुरावा म्हणून गौण समजावे लागते. बखर जितकी समकालीन असेल तितके तिला प्रामाण्यअधिक प्राप्त होते. बखरीसारख्या साधनांच्या आधारे इतिहासाची संगती जुळवणे सोपे होते हे विसरून चालणार नाही.

● इतिहासाचार्य राजवाडे यांनी आपल्या प्रस्तावनेत बखरीच्या अस्सलपणाबद्दल मार्मिक विवेचन केले आहे. ते म्हणतात, ‘‘ बखरी बऱ्याच विश्वसनीय असतात असे म्हटले तरी त्यांच्या विश्वसनीयतेला काही मर्यादा आहेत. . . . अस्सल कागदपत्रे मिळाली असता यातील मजकूरात बरीच तफावत दिसली तरी अस्सल कागदपत्रांच्या अभावी या बखरींवर बराच विश्वास ठेवण्यास हरकत नाही.’’

बखरींमध्ये अनेक दोष असले तरी ऐतिहासिक साधन म्हणून तिचे महत्व नाकारता येत नाही. प्रामाण्याच्या दृष्टीने जरी तिचा दर्जा शेवटचा लागला तरीसुद्धा बखरकाराची त्यासंबंधीत व्यक्तीबद्दलची आपलेपणाची भूमिका स्पष्टपणे दिसून येते. इतिहास रचनेला मार्गदर्शक व पोषक असा परंपरेचा धागा बखरीत हाती लागू शकतो. एकूण ऐतिहासिक साधन म्हणून प्रामाण्याच्या दृष्टीने विचार केल्यास तिच्या वाङ्मयीन महत्वाइतकेच ऐतिहासिक महत्वही नाकारता येत नाही हेच खरे.

**संदर्भ ग्रंथ :**


१. ऐतिहासिक कागदपत्रे व स्थळे यांचा अभ्यास

२. मराठी वाङ्मयाचे स्वरुप – ह.श्री. शेणोलीकर

३. महाराष्ट्र जीवनखंड १ – श्री. ना. बनहट्टी

४. साधनचिकित्सा – वा. सी. बेंद्रे

५. भारतीय संस्कृती कोष खंड सहावा – पं. महादेवशास्त्री जोशी

६. मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड चार – वि. का. राजवाडे

७. मराठ्यांचा प्रशासकीय सामाजिक व आर्थिक इतिहास

८. बखरवाङ्मय उद्‌गम आणि विकास –
डॉ. बापूजी संकपाळ

९. ऐतिहासिक बखरी खंड एक – संपादक अविनाश सोवनी

१०. श्री. शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र – प्रा. भीमराव कुलकर्णी

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखर गद्यावरील परकीय भाषांचा प्रभाव

**प्रा. अनंता मच्छिंद्र कस्तुरे**
मराठी विभाग,लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय,गुरुवार पेठ, सातारा.

**१. प्रास्ताविक :**

२.मराठी बखर गद्यलेखनात विविध भाषांचा वापर

अ. भारतीय भाषांचा वापर ब. परकीय भाषांचा वापर

३. मराठी बखर गद्यलेखनावरील परकीय भाषांचा प्रभाव

अ. सभासदाची बखर ब. श्री. शिवछत्रपतींचे सप्त प्रकरणात्मक चरित्र

क. भाऊसाहेबांची बखर ड. मराठ्यांची बखर इ. पानिपतची बखर

४. निष्कर्ष

५. संदर्भ ग्रंथ सूची

**१. प्रास्ताविक :** मराठी बखरीचे गद्यलेखन करताना बखरकारांनी संस्कृत, हिंदी, कानडी, तेलगू आदी भारतीय भाषांप्रमाणेच फारसी, अरबी, इंग्रजी, तुर्की आदी परकीय भाषांचाही वापर केला . या सर्व भाषा तत्कालीन समाज व्यवहार व राज्य व्यवहारात वापरल्या जात असत. त्यामुळे साहजिकच या भाषांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव मराठी भाषेवर पडला. बहुतांशी बखर वाङ्‌मयात परकीय भाषांचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. 'मराठीच्या बाबतीत मराठीची अन्य भाषांपेक्षा जी पृथगात्मकता दिसते. तिच्यामागे द्राविडी व फारसी भाषांचा प्रभाव आहे आणि तो मराठीने अत्यंत मसुंदरपणेफ आत्मसात केलेला आहे.'१ असे मत डॉ. श्रीरंग संगोराम यांनी व्यक्त केलेले आहे. तसेच परकीय भाषांच्या प्रभावाबाबत डॉ. यू. म. पठाण, का. ना. साने आदींनी संशोधन व लेखन केलेले आहे. या शोध निबंधात मराठी बखर गद्यावर परकीय भाषांचा प्रभाव कसा पडला? परकीय भाषेतील शब्द मराठीत रुढ कसे झाले? याबाबतचा शोध निवडक बखरीच्या माध्यमातून येथे घेतलेला आहे.

**२. मराठी बखर गद्यलेखनात विविध भाषांचा वापर :** मराठी बखर गद्याचा इतिहास पाहता बखरीतील भाषेला एक वेगळ्या पद्धतीचा बाज प्राप्त झालेला दिसतो. बखरकारांनी लेखनात भारतीय व परदेशी भाषांचा वापर केल्यामुळेच बखरीतील भाषाशैली वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहे. 'बखरकारांच्या मुळच्या सुसंस्कृत मराठी वाणीला फार्शी-उर्दूची जानपष्ठानाहि झालेली होती. किंबहुना त्यांची मराठी मफार्शी-उर्दूलाफ आपल्या पोटी पचवून पुनरवि डौलदार, धारदार आणि ऐटबाज झाली होती. लहान लहान साध्या वाक्यांपासून ते प्रौढ संस्कृतप्रचुर व लांबलचक घोसदार वाक्ये पेलण्याइतपत तिला शक्ती आली होती.' २ या संदर्भावरून बखर गद्यलेखनात भारतीय भाषांप्रमाणेच परदेशी भाषांचाही वापर झालेला दिसतो.

**अ. भारतीय भाषांचा वापर :** मराठी गद्यलेखनात बखरकारांनी संस्कृत, कानडी, हिंदी, तमिळ, गुजराती, तेलगू आदी भारतीय भाषांचा वापर केला. सर्वसाधारणपणे संस्कृत, हिंदी व कानडी या भाषांचा प्रभाव जास्त प्रमाणात आढळतो. इतर भारतीय भाषांचा विचार करता सभासदाच्या बखरीत संस्कृत तर भाऊसाहेबांच्या बखरीत हिंदी भाषेचा वापर अधिक दिसतो. यावरून बखर गद्यलेखनावर भारतीय भाषांचा असलेला प्रभाव व परिणाम स्पष्ट होतो. याबाबत डॉ. श्रीरंग संगोराम म्हणतात, 'द्रविड कुळातील कानडी भाषेशिवाय तमिळ व तेलगू या भाषांचाही परिणाम मराठीवर झालेला आहे.'३ हे मत यथार्थ वाटते.

**ब. परकीय भाषांचा वापर :** बखरकारांनी बखरीचे लेखन करताना भारतीय भाषांबरोबर परकीय भाषांचा वापरही केलेला दिसतो. इंग्रजी, अरबी, तुर्की, फारसी, पोर्तुगीज या प्रमुख परकीय भाषा बखर गद्यलेखनात आढळतात. 'मध्ययुगात

मुसलमानी राजवटीमुळे फारसी, अरबी व तुर्की या भाषांतील हजारों शब्द मराठी भाषेत जबरदस्तीने शिरले आणि राज्य व्यवहार कोशासारखे प्रतिबंधात्मक उपाय योजूनही त्यांचे प्रमाण फारसे कमी झाले नाही. विशेषत: गद्य वाङ्:मयात त्यांची घुसखोरी फार मोठ्या संख्येने झालेली आहे.' ४ डॉ. यू. म. पठाण यांनी तर म मराठी बखरीतील फारसीचे स्वरुपफ या प्रबंधाच्या अखेरीस ४५०० फारसी शब्दांचा कोश दिलेला आहे. तसेच का. ना. साने यांनीही अरबी, मारसी, तुर्की शब्दांचा लघुकोश तयार केलेला आहे. एकंदरीत बखर वाङ्:मयातील प्रत्येक बखरीमध्ये विविध परकीय भाषांचा प्रभाव दिसतो. मराठीतील प्रत्येक बखरीमध्ये विविध परकीय भाषांचा प्रभाव कमी–जास्त प्रमाणात आढळतो. येथे काही निवडक बखरींच्या आधाराने परकीय भाषांचा प्रभाव कसा पडला हे स्पष्ट केले आहे.

**३. मराठी बखर गद्य लेखनावरील परकीय भाषांचा प्रभाव** :इ.स. १३१८ मध्ये यादवांचा पाडाव झाला आणि राज्याची सर्व सूत्रे मुसलमानांकडे गेली. तेव्हापासून पेशवाईच्या अस्तापर्यंत राज्य व्यवहारामध्ये फारसी व अरबी भाषेचा उपयोग होवू लागला. पोर्तुगीजांनी गोवा व परिसरच्या प्रांतात राजवट केली. ' मराठी बखरकारांनी व कारकुनांनी आपल्या भाषेचे संस्कार फारसी शब्दांवर चालविले. त्यामुळे त्या शब्दांचा नूर उतरून गेला व ते इतर मराठी शब्दांप्रमाणे वापरले जाऊ लागले.'६ यावरून परकीय भाषांचा मराठी बखरींवर असलेला प्रभाव दिसतो. हा प्रभाव काही बखरींमध्ये स्पष्टपणे जाणवतो.

**अ. श्री शिवछत्रपतींचे संप्तप्रकरणात्मक चरित्र :** मल्हार रामराव चिटणीस यांनी शिवकाळात इ.स. १८११ मध्ये शिवाजी महाराजांच्यावर चरित्रात्मक अशी ही सात प्रकरणात बखर लिहिली आहे. ही बखर कारकुनी वळणाची असून यातील भाषा ही संस्कृत व फारसी मिश्र अशी आहे. या बखरीच्या भाषेबाबत ल. रा. नसिराबादकर यांनी 'कारकुनी वळणाची साधी भाषा छोटी छोटी वाक्ये, मांडीला मांडी लावून बसलेले संस्कृत व फारसी शब्द, अलंकारिता या भाषा सौंदर्यासोबत चित्रमयता आणि नाट्यात्मकता यांच्या समन्वयातून घडलेले मनोज्ञ निवेदन यामुळे ही बखर आकर्षक झाली आहे.'७ हे मत मांडलेले आहे. या बखरीत फारसी भाषेचा प्रभाव जाणवतो.

**ब. सभासदाची बखर :** ही शिवकाळातील पहिली बखर कृष्णाजी अनंत सभासद यांनी लिहिली आहे. यामध्ये छ. शिवाजी महाराजांच्या जीवनातील ७१ प्रसंग कथन केलेले आहेत. 'संस्कृत आणि फारसी प्रचूर शब्दयोजना आणि ओघवती भाषा यामुळे हे चरित्र वाचनीय झाले आहे.'८ या बखरीत फार्सी भाषेतून मराठीत सबुरी, खर्च, पेशवा, दस्त, शहर, लष्कर, वार, गर्दी, चाकर हे शब्द जसेच्या तसे आलेले आहेत.

**क. भाऊसाहेबांची बखर :** पेशवेकाळातील या बखरीत पानिपतच्या रणसंग्रामाची सविस्तर माहिती दिली आहे. या बखरीत फारसी भाषेचा प्रभाव दिसतो. 'संस्कृतची प्रौढी आणि फारसीचा धारदारपणा यात मऱ्हाटी वळण मिसळून बखरकारांनी एक ढंगदार अशी भाषाशैली निर्माण केली. भाऊसाहेबांची बखर हे या शैलीचे सर्वोत्कृष्ट असे उदाहरण म्हणता येईल.'९ असे मत डॉ. मु. श्री. कानडे यांनी व्यक्त केलेले आहे. का. ना. साने यांनी या बखरीचे संपादन करताना अरबी, फारसी, तुर्की अशा ४०० शब्दांचा लघुकोश तयार केलेला आहे. या बखरीत फारसी, तुर्की व अरबी भाषेतून मराठीत रुढ झालेले अर्ज, अस्मान, इमान, ऐवज, कारभार, किल्ला, खजिना, खबर, चाबूक, जखमी, तमाशा, तपास, दौलत, नजर, महिना, वकील, हजेरी, हिंमत, हुशार, हिशेब असे शब्द आढळतात. तसेच मराठी, फारसी मिश्र असे इमानप्रमाण, खेळखाना, गोडहत्यारी, गोडीफौज, फौजवळ, बरसातकाल, बहादुरपणा, भाऊगर्दी, भाऊशाही, मल्हारशाही हे शब्द आढळतात. एकूणच या बखरीत फार्सी, अरबी, तुर्की या परकीय भाषेतील शब्दांचा प्रभाव असलेला दिसतो.

**ड. मराठ्यांची बखर :** ग्रँट डफने इ.स. १००० ते १८१८ पर्यंतचा मराठ्यांचा इतिहास हा 'History of Mahrattas' या ग्रंथाच्या नावाने लिहिला आहे. हा इतिहास इंग्रजी भाषेत आहे. या इतिहासाचे कॅप्टन डेव्हिड केपन याने बाबा साने यांच्या मदतीने मराठीत भाषांतर केले आहे. डफने मराठ्यांचा इतिहास हा इंग्रजी भाषेतून लिहिला आहे. या बखरीत इंग्रजी या परकीय भाषेचा झालेला प्रभाव दिसतो.

**इ. पानिपतची बखर :** पेशवेकालीन ही बखर रघुनाथ यादव यांनी लिहिली असून या बखरीमध्ये फारसी, अरबी, तुर्की या परकीय भाषांचा प्रभाव दिसून येतो. याबाबत 'फारसी, अरबी, तुर्की इत्यादी परकीय भाषेतील पारिभाषिक शब्दांच्या योजनेमुळे या बखरीतील भाषा डौलदार झाली आहे.'१० असे मत या बखरीचे संपादक र. वि. हेरवाडकर यांनी मांडले आहे. या बखरीत चिटणीस, खातरजमा, शेर, शिरपेच, छबिना हे फारसी शब्द आढळतात. त्याचप्रमाणे जमादिलाखर, मोहिम, मुरबी हे अरबी तर कैची, करोल हे शब्द तुर्की भाषेतील आढळून येतात. त्याचबरोबर या बखरीत मराठी, हिंदी अशी संमिश्र भाषाही बखरकाराने वापरली आहे. अशाप्रकारे मराठी बखर गद्य लेखनात फारसी, अरबी, इंग्रजी, तुर्की भाषांचा प्रभाव जाणवतो.

**४. निष्कर्ष :**

१. बखरकारांनी बखरीचे लेखन करताना संस्कृत, हिंदी, कानडी, तमिळ, तेलगू या भारतीय भाषांचा वापर केला आहे. यामध्ये संस्कृत व हिंदी भाषेचा प्रभाव जास्त जाणवतो.

२. बखरकारांनी बखरलेखनात फारसी, अरबी, इंग्रजी, तुर्की, या परकीय भाषांचा वापर केला. यामध्ये फारसी व अरबी भाषेचा प्रभाव आजही दिसून येतो.

३. परकीय भाषांच्या प्रभावामुळे बखर वाङ्:मयात तत्काळात हजारो शब्द, वाक्यप्रचार, म्हणी हे अरबी, तुर्की, व फारसी भाषेतील मराठीत रुढ झाले. ते शब्द आजही मराठीत टिकून आहेत.

४.भारतीय व परकीय भाषांच्या प्रभावामुळे मराठी भाषेला बखरकारांच्या विशिष्ट शैलीमुळे वेगळाच बाज, शैली, भाषेचे सौंदर्य प्राप्त झालेले दिसून येते.

५.बखर वाङ्:मयातील प्रत्येक बखरीचे संपादनही विपुल प्रमाणात झालेले आहे. परंतु परकीय भाषेच्या प्रभावाबाबत डॉ. यु. म. पठाण, का. ना. साने यांच्याप्रमाणेच नवीन संशोधन होणे गरजेचे आहे.

६. एकूणच मराठी बखर गद्यलेखनात तुर्की, फारसी, अरबी आदी परकीय भाषांचा प्रभाव तत्कालीन होता आणि त्यातील हजारों शब्द आजही वापरले जातात व मराठीत आजही टिकून आहेत. मराठी भाषा वैशिष्टपूर्ण, डौलदार बनत असेल तर परकीय भाषेतील शब्द, वाक्यप्रचार, म्हणी यांचा वापर करणे गैर नाही, असे मला वाटते.

**५. संदर्भ ग्रंथ सूची :**

१. संपा. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमण, आधुनिक भाषाविज्ञान (डॉ. श्रीरंग संगोराम – मराठीवरील अन्य भाषांचा परिणाम लेख) पृष्ठ ३०७, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृती – १९९९.

२. गं. ब. ग्रामोपाध्ये, मराठी बखर गद्य, पृष्ठ ९, व्हिनस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृती – १९६३.

३. संपा. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमण, आधुनिक भाषाविज्ञान, (डॉ. श्रीरंग संगोराम – मराठीवरील अन्य भाषांचा परिणाम लेख) पृष्ठ ३०५, ३०६, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृती– १९९९.

४. संपा. डॉ. मु. श्री. कानडे, भाऊसाहेबांची बखर, पृष्ठ ७०, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृती १९९३.

५. प्रा. वैद्य, प्रा. गोसावी, मराठीचे भाषाशास्त्र, पृष्ठ ११०, मोघे प्रकाशन, कोल्हापूर.

६. संपा. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमण, आधुनिक भाषाविज्ञान, (डॉ. श्रीरंग संगोराम – मराठीवरील अन्य भाषांचा परिणामलेख) पृष्ठ ३२४, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृती – १९९९.

७. ल. रा. नसिराबादकर, प्राचीन मराठी वाङ्:मयाचा इतिहास, पृष्ठ २६६, फडके प्रकाशन, कोल्हापूर,
पाचवी आवृती – १९९४.

८. तत्रैव, पृष्ठ २६२.

९. संपा. डॉ. मु. श्री. कानडे, भाऊसाहेबांची बखर, पृष्ठ ६६, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृती – १९९३.

१०.संपा. र. वि. हेरवाडकर, पानिपतची बखर, पृष्ठ ३४, व्हिनस प्रकाशन, पुणे,दुसरी आवृती – १९७२.

ISBN 978-93-5196-698-2

# बखर वाङमय : वास्तव आणि काल्पनिकता

**प्रा. संगीता पैकेकरी**
दादा पाटील महाविद्यालय,कर्जत, जि.अहमदनगर

**१ : प्रस्तावना :** वास्तव आणि काल्पनिकता हे साहित्याचे महत्वाचे पैलू आहेत. वास्तव हे सत्य या वाङमयमूल्याशी निगडीत आहे, तर काल्पनिकतेचे सौंदर्य या वाङमयमूल्याशी नाते आहे. एकाच साहित्यिक कलाकृतीमध्ये वास्तव आणि काल्पनिकता यांचा आविष्कार घडविताना मात्र लेखकास सत्य आणि सौंदर्य या दोन्ही मुल्यांची बूज राखावी लागते. काल्पनिकतेच्या हव्यासापोटी वास्तवाचा दर्जा खालावण्याची शक्यता अधिक असते, आणि तसे होऊ न देणे हे लेखकाचे कसब असते.

मराठी बखरीचा वास्तव आणि काल्पनिकतेच्या दृष्टीने विचार करताना तत्कालीन ऐतिहासिक वास्तव माहित असणे आवश्यक आहे आणि ऐतिहासिक वास्तव समजुन घेण्यासाठी अद्ययावत संशोधनाचा आधार घ्यावा लागतो. इतिहास आणि बखर यांचा अन्योन्य संबंध आहे हे सर्वमान्य आहे. अनेक इतिहास संशोधकांनी इतिहास संशोधन करत असताना बखरींवरही संशोधन केले आहे. तेंव्हा बखरींमध्ये वास्तव किती आणि काल्पनिकता किती याचा साधार शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत निबंधात करावयाचा आहे.

**बखर एक वाङमय प्रकार :** 'बखर' या वाङमय प्रकारासंदर्भात यू.म.पठाण लिहितात की, ''शिवपूर्व काळात बखरी' सारखा एक महत्वपूर्ण लेखनाचा या संदर्भात उल्लेख करता येईल. या विवेचनातून डॉ.यू.म.पठाण 'बखर' हा महत्वपूर्ण साहित्य प्रकार असल्याचे निदर्शनास आणून देतात. शिवपूर्व काळातील महिकावतीची बखर ही मराठीतील पहिली बखर मानली जाते. तद्नंतर शिवकालामध्ये छ.शिवाजी महाराजांचे चरित्रकथन करणाऱ्या अनेक बखरी लिहिल्या गेल्या.

'बखर' या शब्दाचा उपयोग ग्रँट डफने 'मराठयांचा इतिहास' लिहिण्यासाठी आवश्यक साधने मिळावी म्हणून जो जाहिरनामा काढला होता, त्या जाहिरनाम्यामध्ये केलेला आढळतो. मराठी वाङमय कोशामध्ये बखरी संदर्भात नोंद सापडते ती अशी– ''आपल्याकडे पत्रलेखनात प्रथम क्षेत्र वा कुशल हा शब्द वापरला जातो त्याच अर्थाने फार्सीत खैर वा बखैर वापरीत. त्याच बखैर चे बखर होणे भाषाशास्त्रीय दृष्टयाही बरोबर ठरते. 'बखर' या शब्दाची प्युत्पत्ती शोधण्याकामी इतिहासाचार्य वि.का.राजवाडे, डॉ.यू.म.पठाण यांनीही संशोधन केले आहे. 'बखरी' संदर्भात डॉ.य.मू.पठाण लिहितात, ''मराठी बखर लेखनाच्या परंपरेचा उद्‌गम इस्लामी राज्यकर्त्यांनी रुढ केलेल्या अखबारीच्या व तवारिखांच्या लेखनाशी संबंध आहे ही गोष्ट आता जवळजवळ सर्वमान्य झाली आहे. 'बखर' हा शब्द 'खबर' या शब्दाचा वर्णविपर्यय आहे असाही एक मतप्रवाह आहे. या मतप्रवाहाबद्दल मतभेद असले तरी 'बखर' या वाङमय प्रकाराचा किंबहुना त्याच्या निर्मितीचा संबंध इस्लामी राजवटीशी, मराठयांच्या इतिहासाशी आणि मराठी भाषेशी आहे हे निश्चित.

''ज्यांनी बखरीचे लेखन केले त्यांना बखरकार असे म्हणतात. फार्सीमध्ये 'तारीख' या शब्दाचा अर्थ 'इतिहास' असा असून 'तयारिख' हे त्या शब्दांचे अनेकवचनाचे रुप आहे. फार्सी तारीखनवीस या शब्दाचा अर्थ इतिहासकार असा होतो. अखरबार हा अरबी शब्द मूळ 'बखा'(=कर्ता) या अरबी शब्दाचे अनेकवचनाचे रुप होय. 'अखबारनवीस' म्हणजे वार्तालेखक. वाका या अरबी शब्दाचा अर्थ प्रसंग असा असून 'वाकिअनवीस'(पुढे याचे रुप वाकनीस असे झाले आहे) या शब्दाचा अर्थ प्रसंग निवेदन करणारा लेखक असा आहे. वार्ता, प्रसंग, इतिहास यांचे लेखन करण्याची जी प्रथा इस्लामी राज्यकर्त्यांनी आपल्या दरबारात सुरु केली तिचेच प्रतिबिंब महाराष्ट्रातही उमटले. मराठी बखर वाङमयातही 'सांगलीकरांचा वाका' 'पेशवाईच्या अखेरची अखबार' अशा प्रकारचे वाके किंवा अखबारी लिहिल्या गेल्या, त्यांचा समावेश आपण बखरीतच केला''. या स्वरुपाचे विवेचन डॉ.यू.म.पठाण यांनी केले आहे. समकालीन बखर आणि उत्तरकालीन बखर असे बखरींचे दोन विभाग मानले जातात. याशिवाय बखरींचे लेखन हे कुणाच्यातरी आज्ञेनुसार झालेले आहे ही बाबही बखरींच्या संदर्भात महत्वाची आहे.

**बखर वाङमयातील वास्तव आणि काल्पनिकता :** ऐतिहासिक वास्तवाच्या दृष्टीने विचार करता कोणतीही बखर

ऐतिहासिक संदर्भ होऊ शकत नाही. कारण बखरींमध्ये बहुतांश प्रमाणात काल्पनिकतेच्या आहारी जाऊन कल्पित कथा रचलेल्या दिसतात. ''सत्याच्या अपलापामुळे बखरींच्या प्रामाण्याला धोका निर्माण झाला'' असे मत हेरवाडकर नोंदवतात, आणि ते ग्राह्य वाटते.

''बखरकार हा त्या काळातील लेखनिक, हिशोब लिहिणारा अशा प्रकारचा होता. तो प्रतिभासंपन्न लेखक नसल्याने आज्ञा केली म्हणून बखरकार बखर लिहित असत. बखरकारांच्यासमोर आपल्या प्राचीन परंपरेचे आदर्श होते हे आदर्श रामायण, महाभारतासारख्या महाकाव्यांचे होते. त्याचप्रमाणे या महाकाव्यांतून आढळणाऱ्या आख्यानांचेही होते. आख्यानांप्रमाणेच पुराणांचेही आदर्श या बखरकारांसमोर होते. त्यामुळेच आपला चरित्रनायक हा अवतारी पुरुष असला पाहिजे अशी भूमिका काही बखरकर स्वीकारतात. भाऊसाहेबांच्या बखरीचा लेखक भाऊसाहेब व नानासाहेब यांच्यामध्ये ईश्वरीअंश असावा असे सांगतो, तर प्रस्तुत बखरीचा लेखकही शिवराय हे ईश्वरी अवतार असे श्रध्दापूर्वक म्हणतो. या संबंधीची बखरीतील अनेक प्रमाणे उद्‌धृत करता येतील.''

शिवाजी महाराजांनी न भूतो न भविष्यति असे कार्य केले, पण त्यांच्या कार्याला बखरकारांनी दैवी चमत्कार मानले व खुद्द छ.शिवाजी महाराजांना देवाचा अवतार कल्पून त्यांचे चित्रण केले.

उदा.१) साक्षात शंभुमहादेव स्वप्नात येऊन काय बोलले ते पहा, ''तुझ्या वंशात आपण अवतार घेऊन देवब्राम्हणांचे संरक्षण करुन म्लेच्छांचा क्षय करतो. दक्षण देशाचे राज्य देतो म्हणून त्रिवार वचन करुन वर दिला.''

२) आपणच अवतरलो आहे.

३)रात्री श्री भवानी तुळजापूरची मुर्तिमंत दर्शन दिले आणि बोलली की, ''आपण प्रसन्न जाहालो. सर्वस्वे साह्य तुला आहे. तुझे हाती अफजलखान मारविणे तुजला यश देतो, तू काही चिंता करु नको म्हणून धीर, भरवसा देऊन अभय दिले. राजे जागे होऊन जिजाबाईआऊस बोलावून आणून स्वप्नाचे वर्तमान सांगितले.''

४) शिवाजी महाराजांच्या महाप्रस्थान समयीचे वर्णन- ''राजियांनी योगाभ्यास करुन आत्मा ब्रम्हांडास नेऊन दसद्वारे फोडून प्राणप्रयाग केले..... त्यानंतर शिवदूत विमान घेऊन आले आणि(राजे) विमानी बसून कैलासास गेले.'' या कल्पकतेतून शिवाजी महाराजांना घेऊन जाण्यास शिवदूत आले असे भ्रामक आणि अवास्तव चित्रण केले आहे.

खंडोबल्लाळ चिटणीस यांनी देखील 'श्रीशिवदिग्विजय' या बखरीमध्ये दिलेली वंशावळ विष्णुपुराणातून घेतली आहे. बखरीमध्ये दिलेला कालनिर्णय चुकीचा आहे.

विशेष लक्ष्य वेधून घेणारी आणि खटकणारी बाब म्हणजे राजवाडयांसारखे विद्वान इतिहास संशोधक छ.शिवाजी महाराजांचा आपल्या लेखनामध्ये एकेरी उल्लेख करतात ही होय. डॉ.यू.म.पठाण यांनी मात्र आपल्या लेखनामध्ये शिवाजी महाराजांचा उल्लेख 'शिवराय' असा आदरार्थी केला आहे हे आवर्जुन नमूद करण्यासारखे आहे.

**समारोप :**

बखर हा मराठी भाषेतील एक महत्वाचा साहित्यप्रकार आहे. कारण त्याचा इतिहासाशी घनिष्ट संबंध आहे. इतिहास हे राष्ट्राचे संचित असते. मराठयांच्या इतिहासातील 'छत्रपती शिवाजी महाराज' हे प्राणतत्व आहे. बखरकारांच्या कल्पना दुर्विलासामुळे मराठयांचा खरा इतिहास पुढे आला नाही. आता कुठे नवे संशोधक व नवे संशोधन पुढे येऊ लागले आहे. जर बखरकारांनी आपापल्या बखरींमध्ये इतिहासाचे वास्तव चित्रण केले असते तर इथले समाजमन कणखर निकोप आणि वास्तववादी घडण्याची प्रक्रिया शेकडो वर्षे आधी सुरु झाली असती.

**संदर्भसूची :**

१) सभासद बखर - संपादक यू.म.पठाण, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस, पुणे,१९७२.
२) छानिपतची बखर - संपादक, र.वि.हेरवाडकर, व्हीनस प्रकाशन, पुणे.
३) प्राचीन मराठी वाङमयाचे स्वरुप - ह.श्री.शोणोवलीकर, सहावी आ., डायमंड पब्लिकेशन्स, जून १९८२.
४) बखर वाङमय उद्‌गम आणि विकास- डॉ.बापूजी संकपाळ, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे.
५) मराठी वाङमयकोश खंड ४, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई - २००२.

ISBN 978-93-5196-698-2

# पानिपतची बखर व भाऊसाहेबांची बखर यांच्या वाड.मयीन स्वरूपाचा तुलनात्मक अभ्यास

**प्रा. सुवर्णा नामदेव पाटील**
मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय,बोरगांव, ता. वाळवा, जि. सांगली

जानेवारी २०१५ रोजी आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, जि. सांगली येथे 'मराठी बखर गद्य: ऐतिहासिक व वाड्मयीन स्वरूप' या विषयावर होणाऱ्या राष्ट्रीय चर्चासत्रात सादर

**प्रस्तावना :** आजच्या जागतिकीकरणाच्या काळात राष्ट्रीय वा वैश्विक एकात्मतेच्या दृष्टीने तुलनात्मक संशोधन पध्दतीचे महत्व वाढत आहे. आजच्या या वैश्विक संकल्पनेच्या पातळीवर विविध विषयांचा व साहित्याचा तौलनिक अभ्यास महत्वपूर्ण ठरत आहे. या संदर्भात भारतासारख्या बहुभाषिक, बहु सांस्कृतिक , बहुधार्मिक, बहुवाडमयीन देशात साहित्याच्या तौलनिक अभ्यासाला बराच वाव आहे. डॉ. चंद्रशेखर जहागीरदार म्हणतात, ''तौलनिक साहित्याभ्यासाच्या साधनसामुग्रीचा एक विस्तृत पट आपल्या इतिहासात सतत उलगडत आलेला दिसून येतो. मात्र एवढी सगळी साधनसामुग्री उपलब्ध असूनसुध्दा भारतीय साहित्यव्यवस्थेत तौलनिक साहित्याभ्यासाच्या दृष्टीकोनाला फारसे महत्व कधी मिळाले नाही'' ही वास्तव स्थिती लक्षात घेता बखर वाड.मयातील पानिपतच्या युध्दावर आधारित असलेल्या पेशवेकालातील पानिपतची बखर व भाऊसाहेबांची बखर या समकालीन बखरींच्या वाडमयीन स्वरूपाचा तुलनात्मक अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

मध्ययुगीन मराठी वाडमयाच्या इतिहासात गद्य प्रकाशन बखर वाड.मयास फार महत्वाचे मानले जाते. 'खबर देणे' यापासून 'बखर' हा शब्द रूढ झालेला आहे. 'बक' म्हणजे 'बकणे' 'बोलणे' तसेच 'मुसलमानांच्या सहवासाने त्यांच्या, तवरिखा पाहून मराठ्यांनीही बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला' असे वि.का. राजवाडे म्हणतात. प्राचीन मराठीतील जास्तीत जास्त वाड.मय हे काव्यात्मक आहे. प्राचीन मराठी वाडमयाच्या इतिहासात काही अपवाद वगळता गद्याचा विकास झाला तो या बखरींच्या सहाय्याने या मराठी गद्याचा शिवकालीन व पेशवेकालीन अवतार तेजस्वी आणि कलात्मक होता. राजकीय जाणिवांनी आणि कौटुंबिकतेने हे वाड.मय समृध्द झालेले होते. त्यातून ऐतिहासिकतेपेक्षा वाड.मयीन सौंदर्याचा साक्षात्कार अधिक होतो.

**बखरीचे वाडमयीन महत्व :** मराठी बखरींची निर्मिती राजकीय वातावरणात झाल्याने ऐतिहासिक दृष्टीने त्यांचे लेखन झाले हे स्पष्ट आहे. मात्र तसे करताना बखरकारांनी आपल्या बखरी लिहिल्या नाहीत तर सजविल्या. या संदर्भात रघुनाथ यादव यांनी पानिपतच्या बखरीच्या शेवटी काढलेले उद्गार महत्वाचे आहेत. ते म्हणतात, ''एक बारनीस शत्रूकडील व श्रीमंताकडील या उभयतांच्या दिनचर्येचे वर्तमान दफात्यास चिटणीसांनी बार केली त्यांची संगत पाहून, कच्या मजकूर सेवेशी निवेदन करावयांकरिता यथामतीने बखर सजवून सेवेशी पाठविली आहे'' वाड्मयलेखनाची भूमिका नसूनही बखरीत वाडमयीन गुणांचे आस्तित्व आढळते हे विशेष स्वकीयांच्या कर्तृत्वाच्या अभिमानाने प्रेरित झाल्यामुळे बखरकारांच्या लेखनात आत्मीयता सहजपणे आली आहे. वर्ण्यविषयासंबंधी वाटणारा जिव्हाळा हा त्यांच्या लेखनात प्रभावीपणे दिसून येतो, त्याचे कारण हेच ऐतिहासिक घटनांचे आपलेपणाने निवेदन करताना बखरकार स्वत: रंगून जातात व इतरांनाही त्याचा प्रत्यय आणून देतात. वीर आणि कारूण्याचा प्रत्यय सतत देणाऱ्या या बखरी म्हणजे प्राचीन मराठी ''गद्य सारस्वताचा एक स्वतंत्र विलास आहे'' वाड्मयनिर्मितीला आवश्यक असणाऱ्या मनोभूमिकेमुळे बखरनविसांची चित्रणे जिवंत वाटतात. या

ISBN 978-93-5196-698-2

सामान्य कारकुनीपेशातील माणसांच्या लेखनात त्यांच्यातील 'कलावंत' वारंवार प्रगट होतो हा एक चमत्कारच म्हणावयास हवा, ''बखरकार हा जाणीवपूर्वक कलानिर्मिती करणारा कलावंत नव्हे परंतु बखरींच्या एकंदर घाटावरून व त्यावर चढवलेल्या कल्पनेच्या व भावनात्मकतेच्या रंगावरून बखरकार हा एक (Unconscious artist) आहे असे अनुमान केले तर ते वावगे होणार नाही.'' हे गं.ब. ग्रामोपाध्ये यांचे विधान बखरकारामधील कलावंतांचा नेमका शोध घेणारे आहे. म्हणूनच एकाच विषयावर, समान काळात दोन वेगवेगळ्या व्यक्तींनी लिहिलेल्या पानिपतची बखर व भाऊसाहेबांची बखर या बखरींचा प्रस्तुत शोधनिबंधात तुलनात्मक अभ्यास करून निष्कर्ष नोंदवण्याचा प्रयत्न केला आहे.

पानिपतच्या बखरीचे वाड्मयीन स्वरूप पानिपतच्या युध्दानंतर दोन वर्षाच्या आत ही बखर लिहिली गेली. त्यामुळे समकालीन बखर या दृष्टीने तिला महत्व आहे. श्रीमंत गोपिकाबाईसाहेब पेशवे यांच्या आज्ञेवरून रघुनाथ यादव चित्रे उर्फ चित्रगुप्त याने ही बखर लिहिली. युध्दाच्या प्रसंगी स्वत: चित्रगुप्त हजर होता. त्यामुळे त्याच्या व्यक्तिचित्रणात, प्रसंगनिर्मितीत वास्तवता आहे. आकर्षक वर्णनपध्दती हे पानिपतच्या बखरेची महत्वाचे वैशिष्ट्ये, ऐतिहासिक व्यक्ती आणि घटना यांच्याबद्दल लेखकाला विलक्षण आपुलकी आहे. त्यामुळे वर्ण्यविषयाशी तो समरस होतो. पक्षनिष्ठेमुळे थोडाफार पक्षपातीपणा त्याच्या लेखनात आला असला तरी समरसतेमुळे त्याची वर्णने जिवंत उतरली आहेत.

रघुनाथ यादवाची वर्णनशैली चित्रमय आणि परिणामकारक आहे. बखरीत सदाशिवराव पेशवे, विश्वासराव, जनकोजी, मल्हारराव होळकर यांची व्यक्तिचित्रणे आहेत. उठावदार, नाट्यपुर्ण संवादामुळे त्यांच्या व्यक्तिरेखांना जिवंतपणा येतो. या युध्दाला बखरकार महाभारतीय युध्दाची उपमा देतो. या बखरीच्या ऐतिहासिक प्रामाण्याविषयी काही शंका प्रकट केल्या गेल्या आहेत. ''एका अफुबाजाने लिहिलेली गोष्ट'', अशी तिची भलावण सर यदुनाथ सरकार यांनी केली आहे. असे असले तरी आकर्षक वर्णनपध्दती हे पानिपतच्या बखरीचे महत्वपूर्ण अंग आहे. उदा. ''हवद्यास हवदे राऊतास राऊत, एकमेळ जाहला व सुतरनाले बाणांच्या कैच्या व करोलांच्या गोळ्या व गरनाला व तोफांचा मारा एकदांच जाहाला एकच रणधुमाळी दोन्ही सैन्यांत माजली धुरेंकरून दिनमणींचा अस्त जाहला असा भास पडला. घे घे हीच गर्जना उठली. उमास घ्यावयास अवकाश पडेना पुढचा पाय पुढे कोणास कोणी हरेना'' हे युध्दास तोंड लागल्यानंतरचे वर्णन.

**भाऊसाहेबांच्या बखरीचे वाड्मयीन स्वरूप :** पानिपतच्या युध्दाचा सविस्तर आणि विश्वसनीय वृत्तांत देणारी ही बखर वाड्मयगुणांनी संपन्न आहे. समकालीन बखर या दृष्टीनेही ती महत्वाची ठरते. कृष्णाजी शामराव हा तिचा लेखक आहे. दादासाहेब पेशवे यांनी जाटास कुंभेरीच्या किल्यात कोंडल्यापासून पानिपतच्या युध्दापर्यंतची हकीकत या बखरीत आली आहे. नानासाहेब पेशवे यांच्या मृत्युच्या वर्णनाने या बखरीचा शेवट होतो. युध्दानंतर लगेचच लिहिली गेल्याने या बखरीला विश्वसनीयता आली आहे. ऐतिहासिक घटनांची आपल्याला माहित आहे. तशी हकीकत लेखक येथे देतो. त्याची काही विधाने मात्र ऐतिहासिक सत्याशी जुळणारी नाहीत. बखरीत काळाचा निश्चित उल्लेख कुठे नाही. 'मग', 'इतकियात', 'दुसरे दिवशी' अशा शब्दांवर बखरकार भागवतो.

परंतु व्यक्तिवर्णने, प्रसंगवर्णने व वस्तुवर्णने यांनी ही बखर समृध्द आहे. 'नजीबखान रोहिला मात्रागमनी' एवढ्या शब्दांतून तो नजीबखानाची व्यक्तिरेखा उभी करतो. 'ईश्वरे यश दिले तरी उत्तम नाही तरी पुन: तुमची आमची भेट स्वर्गी होईल' असे निर्वाणीचे बोलून पत्नीचा निरोप घेणारे बळवंतराव मेंहदळे, दत्ताजी शिंदे रणात पडल्यावर त्यांची पत्नी भागीरथीबाई जनकोजीस म्हणते, ''बाबा तू रांडेसारखा रडतोस काय? जयाजी शिंदे यांचे पोटी चोघी लेकी जाहाल्या,

तैशीच तूं एक आणखी जाली असतील तरि आणिक एक जावई येता. पाटील काय घेऊन गेले? दुनिया, दौलत, महाल, मुलूक, खजिना, हत्ती, घोडे सर्व तुम्हांपाशी ठेऊन गेले. तुम्ही हिंमत धरून त्याचे सार्थक करावे. आता रडून होणे काय?'' यातून या वीरपत्नीचे मनोधैर्य दिसून येते. 'बचेंगे तो और भी लडेंगे' असे म्हणणारे दत्ताजी शिंदे असे व्यक्तिरेखाटनाचे अलौकिक कौशल्य बखरकाराच्या ठिकाणी आहे.

बळवंतरावांचे निधन झाल्यावर आपल्या मुलाला सोडून सती जावयास निघालेली त्याची पत्नी, विश्वासरावांचा मृत्यु, मराठ्यांची कत्तल व त्यांचा पळ या प्रसंगांचे बखरकाराने केलेले वर्णन जिवंत व रोमहर्षक आहे. प्रासादिक, जोमदार, नाट्यपूर्ण भाषा हे या बखरीतील नजरेत भरण्यासारखे वैशिष्ट्ये 'जसा डुक्कर खळीस येतो तैसे इरेस पडून मारामार केली', 'शाळवाचे पिकाप्रमाणे शिरे कापली', 'जसे भडभुंजे लाह्या भाजतात तशी गत केली' मार्मिक उपमा दृष्टान्त देत बखरकार प्रभावी प्रसंगनिर्मिती करतो. भाषासौंदर्य आणि विचार सौंदर्य, इतिहास आणि वाड.मय यांचा सुरेख संगम या बखरीत आढळतो. या बखरीसंदर्भात र.वि. हेरवाडकर म्हणतात, ''मराठीतील इतर कोणत्याही बखरीपेक्षा ही बखर वाङ्मयगुणांनी संपन्न आहे. तो केवळ जुन्या गद्याचा नमुना नसून मराठी भाषेचे वैभव आहे'' तर श्री. भालचंद्र यांनी ''मराठ्यांच्या महाभारताचे पर्व'' अशा यथोचित शब्दात या बखरीचा गौरव केला आहे.

**निष्कर्ष :** पानिपतच्या युध्दावर लिहिलेल्या पेशवेकाळातील या दोन्ही समकालीन बखरींचे वाङ्मयीन स्वरूप पाहता त्यातील व्यक्तिवर्णने, प्रसंगवर्णने आणि वस्तुवर्णने अशितय प्रभावी अशी आहेत. तसेच भाषासौदर्याने आणि कल्पनासौंदर्यानेही या दोन्ही बखरी अंतर्बाह्य नटलेल्या आहेत. परंतु संयम हा लेखनकलेचा गुण मात्र पानिपतच्या बखरीत रसोत्कटतेला बाधा आणताना दिसतो. या बखरीत लहान लहान चटकदार वाक्ये भावनाजागृती करण्यात यशस्वी होत असली तरी त्यांचा एकंदर त्रोटकपणा हा रसनिर्मितीस बाधक ठरतो. एखाद्या प्रसंगांची सुरूवात बखरकार सुंदर वर्णनाने करतो न करतो तोच त्या आटोपशीरपणामुळे त्या प्रसंगाचे चित्रण यशस्वी झाले तरी त्याचे भव्य चित्र डोळ्यापुढे उभे राहत नाही. त्या प्रसंगाची आस्वाद्यमान्यता तीव्रपणे प्रत्ययास येत नाही. याउलट 'भाऊसाहेबांच्या बखरीत' संयम हा गुण विशिष्ट प्रमाणात असल्यामुळे रसोत्पत्तीला सहाय्यभूत होतो. म्हणूनच बखरींना वाङ्मयीन दर्जा देणाऱ्या ज्या काही थोड्या बखरी आहेत आणि ज्यांच्यामुळे बखरीला एक खास वाङ्मयप्रकार मानता येते, त्यात सर्वात श्रेष्ठ अशी बखर म्हणजे प्रस्तुतची भाऊसाहेबांची बखर होय.

**संदर्भ :**


१. संपा. जहागीरदार चंद्रशेखर, 'तौलनिक साहित्याभ्यास : तत्वे आणि दिशा', सौरभ प्रकाशन कोल्हापूर पृ. ७
२. राजवाडे वि.का. 'ऐतिहासिक प्रस्तावना' (१९२८)
३. ग्रामोपाध्ये गं.ब. 'मराठी बखर गद्य'
४. हेरवाडकर र.वि. (संपा.) 'रघुनाथ यादव-विराचित पानिपतची बखर', व्हीनस प्रकाशन, पुणे ३ री आ. जुलै १९३७
५. हेरवाडकर र.वि. (संपा.) 'कृष्णाजी शामराव विरचित भाऊसाहेबांची बखर' , व्हीनस प्रकाशन, पुणे १ ली आ. जाने.१९९०
६. हेरवाडकर र.वि. , 'मराठी बखर', व्हीनस प्रकाशन पुणे १९५०.

ISBN 978-93-5196-698-2

# पेशव्यांच्या बखरीतील समाजदर्शन

प्रा. डॉ. सौ. दीपा यशवंत कुलकर्णी
प्रमुख मराठी विभाग,आजरा महाविद्यालय, आजरा

साहित्य आणि समाज यांचा संबंध जवळचा असतो. समजात जे कांही घडत असते त्याचेच पडसाद साहित्यात उमटत असतात. साहित्य हे मानवी जीवनातील मुखत्त्वेकरुन आधारलेले असते. किंबहुना मानवी जीवनाशिवाय त्याचे अस्तित्त्व असू शकत नाही. त्यामुळे साहित्यात सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब पडणे अपरिहार्य आहे. कृ.वि. सोहनी विरचित 'पेशव्यांच्या बखरीत' याचा प्रत्यय येतो. कोणतेही साहित्य हे आपापल्या काळातील समाजजीवनाचे संदर्भ घेऊन उभे रहात असते. पेशव्यांच्या बखरीमध्ये याचा प्रत्यय अनेक ठिकाणी येतो.

'बखर म्हणजे गद्यात लिहिलेला ऐतिह्य वृत्तांत' ज्यामध्ये इतिहास, समाज व सांस्कृतिक जीवनाचा ठेवा जपला जातो. म्हणून बखर ग्रंथ म्हणजे मराठेशाहीच्या तेजस्वी पराक्रमाचे नंदादीप होत. बखर हा इतिहास नाही ते वाङ्मयीन गुणांनी सजविलेले ऐतिह्य वृत्तकथन आहे. ज्यामध्ये समकालीन राजकीय, सामाजिक घटना महत्त्वाच्या असतात.

कृष्णाजी विनायक सोहनी विरचित 'पेशव्यांची बखर' म्हणजे पेशवे घराण्याचा इतिहास होय. पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांच्या पूर्ववृत्तापासून शेवटचे पेशवे दुसरे बाजीराव यांच्या कार्कीर्दीतील मराठी राज्याच्या नाशापर्यंत सुमारे दीडशे वर्षाचा इतिहास यात आला आहे. ही बखर वैंजनाथ या गावी कृ.वि. सोहनी यांनी तोंडी सांगितली काहींनी तिचे आदराने लेखन केले. १८७८ मध्ये 'काव्येतिहाससंग्रह' मासिकातून 'पेशव्यांची बखर' क्रमशः प्रसिद्ध झाली. साहित्यगुणांनी परिपूर्ण अशी ही बखर आहे पेशवाईचे समग्र चित्र यातून रेखाटले गेले आहे. त्यासाठी लेखकाकडे आवश्यक असणारी आत्मनिष्ठा, विषयाशी एकरुपता तसेच सोहनींनी पेशवाईचा उत्तरकाल स्वतः पाहिलेला आहे. पेशव्यांविषयी आदर बाळगणाऱ्या कुटुंबात त्यांचा जन्म आहे. आपल्या लोकांनी एकेकाळी गाजवलेले कर्तृत्व, केलेला पराक्रम याची नोंद व्हावी या भूमिकेतून ही बखर लिहिलेली दिसते.

सतराव्या व अठराव्या शतकातील रीतीरिवाज, रुढी, परंपरा संकेत हे स्त्रीजीवनाला जाचक असेच होते. रमाबाई सती जातात हा प्रसंग वाचल्यावर त्या काळात सती जाण्याची चाल होती हे लक्षात येते. रमाबाई माधवरावांच्या पार्थीवाजवळ येऊन बसतात व सांगतात मला पाठीमागे रहावयाचे नाही. त्या आपला जाण्याचा निश्चय खरा करतात त्यावेळी त्यांच्या जाण्याची तयारी सुरु होते. यावरुन समाजात स्त्रियांना फारसे महत्त्वाचे स्थान नसते, राजघराण्यातील स्त्रियांचा प्रभाव कुटुंबावर व राजकारणावर होता हे गोपीकाबाई व आनंदीबाई यांच्या उदाहरणावरुन स्पष्ट होते. ध चा मा करणारी आनंदीबाई त्याकाळातील राजकारणावर प्रभाव गाजवते सारा इतिहास बदलवते असे दिसते. स्त्रीहट्ट, बालहट्ट हे पुरवावेच लागतात. त्यात आनंदीबाई आपला हट्ट पुरवून घेतात व पेशवाईचा सारा इतिहास 'ध' चा 'मा' या काजळकृतीने बदलून टाकतात.

पेशवाईत स्त्रीयांचा सन्मान केला जात होता. घरी आलेल्या सासुरवाशिणीला साडी-चोळी नेसविल्याशिवाय तिची पाठवणी केली जात नसे. पुरुषांनी अंगवस्त्र बाळगणे हे प्रतिष्ठेपणाचे लक्षण मानले गेले होते. शाहजतखान याच्या फौजेवर चिमाजीअप्पा यांनी छापा घत्तला त्यावेळी कलावंतीण मस्तानी सापडली. तिच्यावर अशी वेळ आली म्हणून तिने विष खाण्याचा विचार केला. 'तू विष का खातेस?' असे विचारताच ती म्हणाली, ''माझा सांभाळ करील असा आता कोणी

ISBN 978-93-5196-698-2

नाही तुम्ही आपले अंगाखाली ठेवाल तर मी जीव देणार नाही.'' तेव्हा चिमाजी अप्पा यांनी सांगितले, ''माझे वडील भाऊ बाजीराव साहेब बुंदेलखंडात गेले आहेत ते आल्यावर तुझा प्रतिपाळ करतील'' असे सांगितल्यावर ती आप्पासाहेबांपाशी राहिली. यावरुन स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे याच दृष्टीने तिच्याकडे पाहिले जात होते. तसेच नैतिकतेलाही जास्त महत्त्व होते. येथे चिमाजी आप्पांची नैतिकता उल्लेखनिय आहे.

तत्कालीन समाजात बालविवाहाची पद्धती रुढ होती असे दिसते. सवाई माधवराव यांचा व्रतबंध वयाच्या सहाव्या वर्षी झाला तर त्यांचा विवाह नवव्या वर्षी झाला असा बखरकाराने उल्लेख केलेला आहे. माधवराव पेशवे यांच्या विवाहाचे आमंत्रण हिंदुस्थानातल्या प्रत्येक राजांना दिले होते. बालाजी बहिवर थत्ते यांच्या कन्येशी माघ महिन्यात हे लग्न होते. नवरीची उष्टी हळद श्रीमंतास आली, त्या दिवसापासून शहरात लाख घरास शिधे चालू झाले. काहींना पंच पक्वान्नाचे शिधे चालू झाले. देवस्थापनेच्या दिवसापासून आहेराचा समारंभ पाच दिवस चालला होता. थत्ते यांच्याकडून श्रीमंतपूजन झाले त्यादिवशी वाड्यात मोठा समारंभ झाला. लहान थोर सरदार, पागे शिलेदार, ब्राह्मण सरदार, अवप्रधान मंडळ सारेजण त्या दिवशीच्या सभेस हजर होते. हा समारंभ झाल्यावर कुळवंतिणीचे नाच झाले. वाजंत्री व चौघडे वाजले. सारेजण आपापल्या जागेवर स्थानापन्न झाल्यावर श्रीमंतास बोलावणे गेले. श्रीमंतांनी डोक्यास फेटा, अंगात निमा, पायात विजार, मस्तकी शीरपेच, कलगी व मोत्यांचा तुरा कानात चौकडा गळ्यात मोत्यांच्या माळा, हातात पोच्या असा पोशाख तमामी केला होता. मग श्रीमंतपूजनाचा विधी झाला. त्यानंतर रुखवताचा समारंभ झाला. विविध नजराणे, आहेर सरकारात जमा झाले. १०० सोन्याच्या काठ्या मांडवासाठी वापरल्या होत्या. दीड महिना विवाहाचे विविध विधी सुरु होते. या सर्व वर्णनावरुन पेशवाईचे वैभव जपले होते. असे दिसते तसेच लग्नसमारंभात रुखवत मांडला जाई. आहेर केले जात. देवदेवतांचे पूजन केले जाई, हळद लावण्याची पद्धतीही होती, विवाहात होम केला जाई, पाणीग्रहण विधी असे. आपापल्या कुवतीप्रमाणे लग्नाच्या दिवशी भोजनावळीही दिल्या जात. सणवार व विजयोत्सवही मोठ्या उत्साहाने साजरे केले जात. संत एकनाथ च्या रुक्मिणी स्वयंवर ग्रंथाप्रमाणे विवाहपद्धती पेशवेकाळात अस्तित्त्वात होती असे दिसते.

माधवराव पेशवे यांनी निजामअल्लीखाँ यांच्यावर मोठा विजय मिळवला. ते पुण्यास परतले तेव्हा नगरवासीयांनी त्यांचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले. पुणे शहरातले सर्व रस्ते झाडून कुंकवाचे सडे घातले. घाशीराम यांचे तळ्यापासून दरवाज्यापर्यंत दुरस्ता बढाई बोलावून चिराखदानांची तयारी केली व गुलालाच्या रांगोळ्या घातल्या. दुरस्ता खांब ठोकून वरती तक्ते मांडून पावशेर तेल मावेल अशा मोठ्या पणत्या लावल्या. खिराखदाने लावली. हमाल हजारो तेलाचे बुधले घेऊन उभे होते. युद्धाचा विजयउत्सव याप्रकारे साजरा करण्याची पद्धतीर दिसते.

तसेच रंगाचा समारंभही शिंद्यांनी साजरा केल्याचे दिसते. शनिवारवाड्यापाशी स्वारी आल्यानंतर दोन घटिकापर्यंत रंगाचा मार झाला. त्या रंगामुळे रस्त्यावर चिखल झाला. शेकडो पल्ले गुलाल उधळला, हत्तीवर ठेवला. हत्ती गुलाल रस्त्यात उधळीत चालला होता. या सर्व वर्णनावरुन पेशवाईतील समृद्धी यातून व्यक्त होते. समाज हौसी होता. हौसेला मोल नव्हते. त्यासाठी पैसाही जास्त खर्च केला जात होता असे दिसते.

वेशभूषा व अलंकार यासाठी जादा पैसा खर्च केला जात होता. अंगात जमानिमा तमामी, विजार, कमरेस पटका, तसा मस्तकावर शिरपेच व तुरा, कलगी मंदिलावर बांधत. हातात मनगटी पोंच्या, भुजबंद, गळ्यात मोत्यांचे व नवरत्नांचे हार, कानात चौकडा, पायात बादशाही जोडा असा एकूण पेशव्यांच्या थाट होता.

ISBN 978-93-5196-698-2

समाजाची एकूण वृत्ती धार्मिक होती असे दिसते. शाहू महाराज छत्रपती यांना कैलासवास झाल्यानंतर नानासाहेब व भाऊसाहेब यांनी पर्वतीस शाहू महाराज यांची स्थापना करुन देवालयास काम लावले, देवाची स्थापना करुन शिवलिंग बांधले, विष्णूचेही देवालय बांधले मांत्रिकाकडून ताईत मंत्रून गळ्यात घालणे माधवराव पेशवे यांची मती भ्रंश करण्यासाठी असे ताईत त्यांच्या गळ्यात घालण्याचे काही उल्लेख येतात. यावरुन अंधश्रद्धेला खूप वाव येथे दिसत होता.

तसेच बाळाजी बाजीराव यांनी एक वर्षी पर्जन्यात बसून दक्षणा वाटली होती असे उल्लेख बखरीत मिळतात. मनोरंजनासाठी नाच, गाणे इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असे.

पेशवे दसऱ्याच्या दिवशी शिलंगणास जाऊन शिलंगण खेळून विजयाच्या अविर्भावात शहरातून फिरुन येत असत. मोठी मिरवणूक काढली जात असे.

धर्म बुडू नये, जातीचा अभिमान कायम रहावा यासाठी अखंड प्रयत्न केले जात. यासाठी बाळाजी बाजीराव यांच्या जीवनातील एका प्रसंगाचा चांगला पुरावा मिळतो. श्रीमंत बाळाजी बाजीराव यांनी गिलच्याचा मोड केला आणि दादासाहेब यांनी त्यांच्या गळ्याला पेशकबज लाविले तेव्हा रणजितसिंग शीख सोबत होते. त्यांनी दादासाहेब यांचा हात धरुन त्यांना एकीकडे घेऊन सांगितले की, मुसलमानाचे रक्त पिऊन ब्राह्मणपणा बुडवायचा आहे की काय? इत्यादी वर्णनातून जातीचा अभिमान धर्माची निष्ठा दिसते. घाशीराम कोतवालाला दिलेली शिक्षा याच गुणांचे दर्शन घडवते.

शत्रूबद्दलचा राग, तिरस्कार आणि त्याचवेळी स्वकीयांच्या कर्तृत्वाबद्दल वाटणारा अभिमान येथे व्यक्त होतो.

तत्कालीन समाजाचे वापरात असलेले वाक्यप्रचार यात दिसतात. 'सोन्याचे ताट जरी झाले तरी त्यास कुडाचे उठिंगण पाहिजे'. सवाई माधवरावांच्या रंगक्रीडेचे वर्णन 'असा रंग द्वापार युगी श्रीकृष्ण भगवान खेळले तसा कलीयुगी श्रीमंत माधवराव खेळले. असा पुढे कुणी खेळावयाचा नाही व मागेही कुणी खेळला नाही.' अशी शैलीदार भाषा अलंकारांनी नटली आहे. तशीच ती त्या काळातील समाजाचे वैभव, समाजरीत, परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा दाखवते. अशा प्रकारे पेशवेकालीन समाज 'पेशव्यांच्या बखरीत' आपल्याला दिसतो.

**निष्कर्ष** :

१) आपल्या लोकांनी एकेकाळी गाजवलेले कर्तृत्व, केलेला पराक्रम याची नोंद व्हावी या भूमिकेतून ही बखर लिहिलेली दिसते.

२) १८ व्या शतकातील रीतिरिवाज, रुढीपरंपराचे दर्शन यातून घडते.

३) तत्कालीन स्त्रीजीवन, राजकारण, समाजकारण, धर्मकारण यावर प्रकाश पडतो.

**संदर्भ** :

१. बखर वाङ्मय उद्गम आणि विकास : संकपाळ बापूजी.
२. पेशव्यांची बखर : संपादक कृ. वि. सोहनी.

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखरगद्य : वाङमयीन दृष्टीकोन

प्रा.प्रदीप मोहिते
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,करमाळा, जि.सोलापूर

**१. प्रस्तावना :** मराठी बखरगद्य हे प्राथः मराठयांच्या राजकीय इतिहासाचे वाङमयीन संचित आहे. परिणामतः बखर हया साहित्य प्रकारास महाराष्ट्राच्या समाजजीवनात दुहेरी महत्व आहे. एक म्हणजे बखर हे इतिहास संशोधनाचे महत्वाचे साधन आहे आणि दुसरे म्हणजे मराठी वाङमयेतिहासामधील तो एक लक्षणीय वाङमयप्रकार आहे. प्रस्तुत निबंधामध्ये बखरगद्याचे वाड़मयीन दृष्टीकोनातून परिशीलन करणे हे मुख्य प्रयोजन असून या प्रयोजनास सहाय्यभूत ठरेल इतकाच ऐतिहासिक दृष्टीकोनाचा अवलंब केला आहे.

मराठी साहित्याला अनेक वाङमयप्रकारांनी व वाङमयीन प्रवाहांनी समृध्द केले आहे. बखर या वाङमयप्रकाराला तंतोतंत लागू पडणारा एक अभिप्राय मराठी वाङमयकोशात सापडतो, तो असा – 'व्यक्तिविशिष्ट तरीही व्यापक, वास्तवधिष्ठित तरी कल्पनेपेक्षा अद्‌भूत असे अनुभव ललितसाहित्याच्या भाषेतून अभिव्यक्त होतात. त्यामुळे ही भाषा चित्रदर्शी, प्रतिमांकित व विविध संवेदनासूचक असते. व्यक्ती, वस्तू वा घटना यांचे हुबेहूब वर्णन, स्पष्टीकरण वा निवेदन करुन ती थांबत नाही, किंबहुना ते तिचे ध्येय नसते, तर वेचक व अर्थपूर्ण अनुभवांच्या निवडीतुन, त्यांच्या कौशल्यपूर्ण रचनेतून वाचकाला सुजाग व सजग करणे हे ललित साहित्याची निर्मिती करणाऱ्या लेखकास साधावे लागते. ती त्याची प्रतिज्ञा असते.

वाङमय या विद्याशाखेसंदर्भातील प्रस्तुत अभिप्राय विचारात घेतल्यास बखरीतून आविष्कृत होणारे लालित्य आणि सर्वबखरकरांच्या ठायी असलेले वाङमयीन कौशल्य यांचा प्रत्यय येतो.

अशा प्रकारे मराठी बखर हा मराठयांच्या राजकीय इतिहासाचे कोंदण लाभलेला इतिहासाधिष्ठित वाङमयप्रकार आहे आणि स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या देदिप्यमान कारकिर्दीचा या वाङमय प्रकारावर जबरदस्त प्रभाव असल्याचे दिसून येते.

**२. बखर म्हणजे काय ? :** 'बखर' या गद्य वाङमय प्रकाराचा अभ्यास करताना प्रथम बखर म्हणजे काय याचे आलोडन करणे अपरिहार्य आहे. 'बखर' हा शब्द 'खबर' या शब्दाचा वर्णविपर्याय आहे, या बाळबोध सिध्दांताविषयी नी.ज.कीर्तने, कृ.पां.कुलकर्णी, वि.का.राजवाडे, गं.ब.ग्रामोपाध्ये, डॉ.र.वि.हेरवाडकर, एम.नसिरुद्दीन खान, डॉ.श्री.रं.कुलकर्णी, डॉ.यदुनाथ सरकार इत्यादी संशोधकांनी केलेला उहापोह सर्वज्ञान आहे. त्याचप्रमाणे मेजर टॉमस कँडी आणि मौंट स्टयूअर्ट एल्फिन्स्टन या पाश्चात्य विद्वानांनी 'बखरी' विषयी व्यक्त केलेली मतमतांतरे आणि या सर्व विचारमंथनातून रुढ झालेला 'बखर' हा शब्द आजपर्यंत टिकून आहे ही अत्यंत लक्षणीय बाब आहे.

जेम्स थॉमस मोल्सवर्थकृत मराठी–इंग्रजी शब्दकोशातील 'बखर' या शब्दाचा अर्थ पुढील प्रमाणे 'Any History, Nurration, memoir and chronicle in prakrit prose' इतिहासाचार्य वि.का.राजवाडे 'बखर' म्हणजे काय हे विशद करताना 'बखर'हा शब्द मराठी असून तो बक् = बोलणे, बकणे या धातुपासून निपजला आहे अशी 'बखर' या शब्दाची व्युत्पत्ती मांडतात. विस्तारभयास्तव उपरिनिर्दिष्ट सर्व अभ्यासकांच्या 'बखर' या शब्दसंदर्भातील सर्व मतांचा तपशिल न मांडता डॉ.बापूजी संकपाळ यांनी व्यक्त केलेला समतोल अभिप्राय ध्यानी घेणे अधिक योग्य वाटते. डॉ.संकपाळ यांच्या मते बखर या शब्दाची व्युत्पत्ती आणि अर्थ पाहता व तत्संबंधी विविध मतांचा परामर्श घेऊन शोध घेतला असता मुळात

बखैर हाच शब्द प्रस्थापित होतो. बखैर-बखेर-बखर अशी रुपे मुळ ग्रंथाच्या नकलप्रती होत असताना प्रवास करीत करीत 'बखर' या मुक्कामावर थांबतात आणि बखैर म्हणजे 'इतिहासकथा' याच संदर्भात 'बखर' हा शब्द पुढील काळात रुढ होतो. दृढ होतो''. पुढे ते असेही लिहितात की, ''बखैर हा शब्द फार्सी भाषेने प्रदान केला असला तरी इतिहास कथेच्या संदर्भात मराठीने त्या शब्दाला एक विशिष्ट अर्थच्छटा दिली आहे. तआपल्या तेजस्वी अशा परंपरेने तिने मराठीच्या वाङमयेतिहासात स्वतंत्र दालन सजविले आहे. वरील सर्व विवेचनावरुन बखर म्हणजे हा मराठीत रुढ झालेला मराठमोळा शब्द आहे आणि मराठी वाङमयेतिहासामध्ये 'बखर' या गद्यवाङमयाचे स्वतंत्र स्थान आहे हे सिध्द होते.

**३. वाङमयीन दृष्टीकोनातून 'बखर' :**वाङमयीन निर्मीती कशी होते हा प्रश्न जसा सनातन आहे तसा तो नित्यनूतनही आहे. वाङमयाच्या (साहित्य/काव्य) तमाम व्याख्या वाङमयाचे किंबहुना वाङमय निर्मितीचे स्वरुप पूर्णत्वाने उलगडू शकल्या आहेत असे म्हणता येत नाही. समकालीन आणि उत्तरकालीन बखरी राजाज्ञा म्हणून लिहिल्या गेल्या असल्यातरी केवळ 'राजाज्ञा' हे बखर निर्मितीचे कारण आहे असे म्हणता येत नाही किंवा ढहश हळीींेू षे ींहश चरीरींहर लिहिणाऱ्या कॅप्टन जेम्स कनिंगहॅम ग्रँटडफ सुध्दा केवळ राज्यकर्त्या इंग्रजांना मराठयांचा इतिहास कळावा म्हणून मराठयांचा इतिहास लिहिला असे अनुमान काढता येत नाही.मराठी बखरींवर ओझरती नजर फिरवलीतरी मराठी बखरींवर असलेला छ.शिवाजी महाराजांच्या जीवन व कार्य यांचा प्रभाव चटकन नजरेत भरतो म्हणून काही निवडक बखरींचा त्रोटक निर्देश करुन छ.शिवाजी महाराजांच्या चरित्रापर विषयीची मते प्रस्तुत निबंधात उद्‌धृत केली आहेत.

**४. बखरींचे वाङमयीन दृष्टीकोनातून वर्गीकरण :** समकालीन बखरी आणि उत्तरकालीन बखरी या कालिकभेदाबरोबरच बखरींचे वाङमयीन दृष्टीने पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले जाते.

अ) चरित्रात्मक बखर

| अ.क्र. | बखरीचे शीर्षक | बखरकार | लेखान विषय | लेखानकाळ |
|---|---|---|---|---|
| १. | ९१ कलमी | बखरदत्ताजी त्रिमल वाकेनवीस | शिवचरित्र | १७६०-१७७० |
| २. | सभासद बखर | कृष्णाजी अनंत सभासद | शिवचरित्र | १६९७ |
| ३. | श्रीशिवदिग्विजय | खंडोबल्लाळ चिटणीस | शिवचरित्र | १७७८ |

आ) युध्दकथात्मक बखर

| अ.क्र. | बखरीचे शीर्षक | बखरकार | लेखान विषय | लेखानकाळ |
|---|---|---|---|---|
| १. | राक्षसतागडीची बखर | | तलिकोटची लढाई व विजयनगरचा विध्वंस | १७६५ |
| २. | भाऊसाहेबांची बखर | कृष्णाजी शामराव | पानिपत युध्द | १७९० |
| ३. | पानिपतची बखर | रघुनाथ यादव | चित्रगुप्तपानिपत युध्द | |

प्रस्तुत तक्ते हे केवह आकलनसुलभतेसाठी दिले आहेत. या तक्त्यांमध्ये सर्वच बखरींचा निर्देश केलेला नाही हे ध्यानी घ्यावे. उपरिनिर्दिष्ट बखरींमध्ये छ.शिवाजीमहाराज यांचे चरित्र कथन करणाऱ्या तीन बखरी आहेत. या बखरींच्या

विशेषतः सभासदाच्या बखरींच्या आधारे त्यांचे वाङमयीन मूल्य केल्यास जी वैशिष्टये दृग्गोचर होतात त्यांचा आता विचार करु.

**५. बखरीचा वाङमयीन गुणवत्ता :**बखरकारांनी बखरींचे लेखन इतिहास लेखकाच्या भूमिकेतून केले नाही. त्याचप्रमाणे बखर लिहिताना बखरकारांनी सत्याचा आपलाप केला किंवा इतिहास संशोधनाच्या दृष्टीने बखरींना अप्रमाण ठरवून अस्सल कागदपत्रांना अधिक महत्व द्यावे अशा प्रकारचे अनेक आक्षेप अनेक मान्यवर अभ्यासकांनी बखरींच्यासंदर्भात नोंदवलेले आहेत आणि सर्वज्ञात आहेत. बऱ्याच बखरींच्या परिशीलनातून यापैकी बरेच आक्षेप सिध्दही झाले आहेत.

सभासद बखरीतील अफजलवधाचा प्रसंग हा संपूर्ण बखरीतील रसाविष्काराचा परमोत्कर्ष साधणारा प्रसंग आहे. या प्रसंगाचे चित्रण करताना प्रतीत होणारी सभासदाची तादात्म्यता, स्वामीनिष्ठा त्याच्या शब्दाशब्दातुन जागवल्याशिवाय राहत नाही. ''राजियाने भेटी देता खानाने राजियाची मुंडी कवटाळून खांकेखाली धरली आणि हातीची जमदाड(एक प्रकारचे शस्त्र) होती तिचे मेण(म्यान) टाकून कुशित राजियाचे चालविली. हे वाक्य किंवा ''खानाचे शीर घेऊन राजे सिताब गडावीर जिऊ महाल व संभाजी कावजी महालदार असे गेले'' पुढे शिवाजी महाराजांनी अफजलखानाच्या वधानंतर त्याच्या पुत्रास पोटाशी धरुन भव्योदात्त औदार्याचे दर्शन घडवले. त्या प्रसंगीचे वर्णन वाचून संवेदनशील वाचकांना शिवाजी महाराज पृथ्वीमोलाचे वाटतात. हे सर्व कसब सभासदाच्या लेखणीचे आहे. जर सभासदाने हे लिहिले नसते तर महाराष्ट्र भूमीला शिवरायांच्या विराट व्यक्तिमत्वाचा साक्षात्कार झाला नसता.

सभासदाची मार्मिक भाषा, व्यक्ति चित्रण, प्रसंगचित्रण नेमकेपणाने करण्याची त्याची हातोटी अतूलनीय आहे. अर्थाचे थेट प्रक्षेपण करणारी शब्दयोजना हे त्यांच्या लेखणीचे परमोच्च वैशिष्टय म्हणावे लागेल.

**६. समारोप :** विस्तारभयास्तव सर्व बखरींचा परामर्श या एकाच निबंधात घेता आला नाही. तरी सुध्दा मराठीतील बखर गद्य हा काळाच्या कसोटीवर टिकून राहिलेला वाङमय प्रकार सांप्रतच्या व भावी काळातील अभ्यासकांना नेहमीच आव्हान देणार आहे. बखरींच्या संशोधना संदर्भात इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांनी काढलेले हे उद्गार बखरीच्या अभ्यासकांच्या चिरकाल स्मरणात राहतील इतके मननीय आहेत ते असे ''कीर्तन्यांनी सहा महिने खपून दोन बखरी, सान्यांनी बारा वर्षे खूप चाळीस बखरी, खऱ्यांनी वीस वर्षे खूपन दोन हजार पृष्ठे व मी पंधरा वर्षे खपून चव्वेचाळीसशे पृष्ठे प्रसिध्द केली. हया सर्वांनी केलेले काम, एखाद्या राजाने किंवा सार्वभौमाने दोन रखेल्यांचा वर्षभराचा मेहेनताना ह्या कामी खर्चिण्याचे मनात आणिले असते तर पंधरा हजार रुपयांच्या व्ययाने सहा महिन्यात सहज आटोपले असते.(पृ.क्र.१० व ११ बखर वाङमय उद्गम आणि विकास- डॉ.संकपाळ)

**संदर्भसूची :**


१) मराठी वाङमयकोश खंड ४, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई - २००२.

२) मोल्स्वर्थकृत मराठी-इंग्रजी शब्दकोश, शुभद्रा-सारस्वत, पुणे, १९७५.

३) बखरवाङमय : उद्गम आणि विकास, ले-डॉ.बापूजी संकपाळ, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १९८२.

४) सभासद बखर, संपा.डॉ.यू.म.पठाण, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००.

५) बखर वाङमय : उद्गम आणि विकास, ले-डॉ.बापूजी संकपाळ, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १९८२.

ISBN 978-93-5196-698-2

# इतिहासाचा आधार घेऊन निर्माण झालेले मराठी चित्रपट

**शशिकांत चौधरी**
मराठी विभाग, न्यु कॉलेज, कोल्हापूर

**प्रस्तावना :** १३ मार्च १९१३ ते १३ मार्च, २०१४ मराठी सिनेमा सृष्टीचे हे शताब्दीचे वर्ष नुकतेच संपन्न झाले. कॅमेऱ्याच्या तिसऱ्या डोळ्याची किमया काय असते, याची जाणीव एक शतकभर अबालवृध्दांना भुरळ घालीत आली. कारण असंख्य कलांना सामावून घेणारी ही चंदेरी दुनिया, यात कथा-पटकथा-संवाद काव्य लेखकापासून ते थेट कला दिग्दर्शक, नेपथ्यकार, रंगभूषा-वेशभूषा, केशभूषा, नृत्य दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक आणि प्रमुख दिग्दर्शक या सर्वांचेच महत्त्व वाढले. परिणामी मराठी रंगभूमीवरचे एकेकाळी गाजलेले दिग्गज कलाकार आज चित्रपट मालिकातून घर बसल्या आपल्याला पहायला मिळताहेत. ही किमया आहे या जादूई नगरीची. पडद्यावरच्या कलाकारांना प्रकाशात आणणारी पडद्यामागे राहून कार्यरंभ असणारी ही मंडळी आज आपापल्या क्षेत्रात नावारूपाला आली आहेत. त्यांचे नावही झालेले आपल्याला दिसते. पण ज्या कालखंडात नुकतीच सुरूवात होती, त्या कालखंडाचा डोळसपणाने अभ्यास करण्याची आज नितांत गरज आहे.

एखादा चित्रपट निर्माण करताना कुठलाही निर्माता हा आर्थिक फायदा-तोट्याचा प्रारंभी विचार करतोच. तसे करणे यात वावगे काही नाही. कारण आपला चित्रपट पाहणारा प्रेक्षक नेमका कुठला आहे? त्याची या क्षेत्राकडे बघण्याची भूमिका काय आहे? हा चित्रपट ग्रामीण भागासाठी आहे? का शहरी भागासाठी? का निमशहरी? भागासाठी आहे. याचे गणित फायनान्सर या नात्याने तो मनाशी ठरवीत असतो. कारण तोच या चित्रपटाचा फायनांन्सर असतो. पण नेमका याच्या उलटचा विचार दिग्दर्शक करीत असतो. कारण चित्रपट हे दिग्दर्शकाचे माध्यम आहे. त्याने निवडलेली कथा, त्याचे पटकथेत झालेले रूपांतर, त्यातले संवाद, गाणी (लोकेशन), चित्रीकरणाची स्थळे, नैपथ्य व कलाकार या सगळ्या गोष्टींचा विचार करीत, त्याला चित्रपट दिग्दर्शीत करायचा असतो. त्यामुळे कलाकारांची निवड करताना भूमिकेला साजेल असेच कलाकार निवडले जावेत. की या मागची त्याची भूमिका रास्तच असते. मग तो प्रेक्षक अल्पशिक्षित आहे की शिक्षित आहे. ग्रामीण आहे की नागरी आहे, याचा विचार तो करीत नाही. पण आपला चित्रपट आबालवृध्दांना आवडला पाहिजे, ही भूमिका नजरेसमोर ठेवूनच तो कार्य करीत असतो.

आजवर प्रेक्षकांच्या अभिरूचीचा विचार करूनच आजवर चित्रपट निर्मिती होत आली आहे. कारण चित्रपट हा समाजाचा आरसा आहे. तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सादपडसाद हे केवळ कथा, कादंबऱ्यांतूनच उमटतात असे नाही. तर अशा कलाकृती हेरून त्यावर चित्रपट निर्माती केली जाते. त्यामुळे वास्तवतेशी जवळीकता साधण्याचा प्रयत्न चित्रपट कलाही करीत असते. हे महत्त्वाचे आहे.

तसे पाहिले तर घडून गेलेल्या इतिहासावर आजकाल बरेच लेखन होत आहे. घडवणारा इतिहास नजरेसमोर दिसतो आहे. पण त्याचे सादपडसाद व्यक्तिमत्त्वावर उमटविण्यात या कलाकृती यशस्वी झाल्या आहेत.

इतिहास आणि बखर याचं नातं जवळचं आहे. तसेच धार्मिक ग्रंथ, पुराण कथा, ऐतिहासिक घडामोडी यांचेही नाते जवळचे आहे. बखरकारांनी लिहून ठेवलेल्या बखरींवर आधारितच आजकाल इतिहासाचे लेखन होत आले आहे. पण हा इतिहास कितपत खरा, कितपत खोटा हे ठरविण्याचे काम आपले नाही. ते इतिहासकारांचे आहे. पण बखरींचा, ऐतिहासिक घटनांचा आधार घेऊन जे लेखन झाले आहे, त्याला कथा, कविता, कादंबरी, नाटक, पोवाडा यांचा वाटा मोठा आहे. इतिहासातील छोट्या-मोठ्या घटनांचा मानवी मनावर झालेला परिणाम लक्षात घेता, यातूनच एकेक कलाकृती जन्माला आली आहे. त्यातल्या कलाकृतींनी तत्कालीन कथा, नायकांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न तर केला आहेच. पण इतिहासाकडे डोळेसपणाने पाहण्याची दृष्टी ही मानवीमनाला दिली आहे.

छ.शिवाजी महाराज, संभाजी महाराज, ताराबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई, शाहू महाराज, म.फुले, डॉ.आंबेडकर

वल्लभभाई पटेल, यशवंतराव चव्हाण यांच्या कर्तृत्वावर हिंदी-मराठी सिनेमा जगताने आजवर प्रकाश टाकला आहे. केवळ ऐतिहासिकच नाही, तर बाजीराव मस्तानी, यासारख्या चित्रपटातून पेशव्यांच्या राज्यकारभारावरही प्रकाश टाकला आहे. इंग्रजीच्या जुलमी, जबरदस्तीच्या राजकारणावरही प्रकाश टाकला आहे. याचे सादपडसाद कथा, कादंबऱ्यातून जसे उमटले आहेत, तसेच ते चित्रपटांतूनही उमटलेत. अशा कांही चित्रपटांचा नामोल्लेख करणे गरजेचे आहे. केवळ नामोलेखच नाहीतर ऐतिहासिक चित्रपट म्हणून त्यावर प्रकाश टाकण्याची गरज आहे. आणि असे चित्रपट निर्माण करण्यात आघाडीवर राहीलेत ते चित्रतपस्वी भालजी पेंढारकर.

भालजी पेंढारकर म्हटले की, ऐतिहासिक चित्रपटाची नामावलीचं आपल्या नजरेसमोरून चलचित्रपटासारखी सरकत जाते. कारण, घडून गेलेल्या मराठी इतिहासाला नव्याने उजाळा देण्याचे काम जर कुणी केले असेल तर ते चित्रपटाच्या माध्यमातून भालजी पेंढारकर यांनी. देव-धर्म आणि देश ही त्रिसुत्री नजरेसमोर ठेवूनच भालजी पेंढारकर बाबांनी आपल्या चित्रपटाची निर्मिती केली आहे. छ.शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्रीयांचेच श्रध्दास्थान नाही. तर तमाम भारतियांचे श्रध्दास्थान आहे. ''हे हिंदवी राज्य व्हावे, ही श्रींची इच्छा।'' या प्रेरणेतून, गनिमीकाव्याचा आधार घेऊन, निवडक मावळ्यांच्या साक्षीने महाराजांनी जो पराक्रम केला. तो शब्दातून तर व्यक्त केला गेला आहेच. त्याला चित्रपट सृष्टीतर मागे कशी राहील. त्यामुळे एकमेव ऐतिहासिक चित्रपटांचा निर्माता दिग्दर्शक-कथा-पटकथा-संवाद-लेखक-गीत-लेखक म्हणून भालजी पेंढारकरांचे योगदान मोठे आहे. नव्हे मराठी ऐतिहासिक चित्रपटांचा मैलाचा दगड म्हणूनच त्यांच्या या कर्तृत्वाकडे पहावे लागेल. भालजी पेंढारकर बाबांनी केवळ इतिहासावरच प्रकाश टाकला नाही. तर तत्कालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक घडामोडीवर भाष्य केले आहे. आपल्या चित्रपटाच्या माध्यमातूनच अचेतनाला चेतना देण्याचे काम केले आहे.

छ.शिवाजी महाराज हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय जरी असला, तरी धर्मासाठी प्राणाचे बलिदान देणारा शिवपूत्र संभाजी, धर्मावर आणि राज्यावर गंडातर आणू पहाणारा, अफजल खान वध, शत्रूवर तुटून पडणारी पण स्वत:चे साम्राज्य टिकवून ठेवणारी ताराराणी, स्त्री चारित्र्याचे महान पटवून देण्यासाठी रानगे पाटलाला शिकवलेला धडा, दाजी पासलकर, बहिर्जी नाईक, तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे यांचा जो पराक्रम आहे. तो प्रेक्षकानं समोर चित्रफितीच्या माध्यमातून मांडण्यात भालजी पेंढारकर यशस्वी झाले आहेत. इतिहासातल्या छोट्या, मोठ्या पण रोमांचकारी घटनांना बोलके करून तमाम माय मराठीच्या प्रेक्षकांना खूर्चिशी खिळवून ठेवण्यात भालजी पेंढारकरांचे चित्रपट यशस्वी झाले आहेत. पण त्यांच्या चित्रपटाचा नायक हा छ. शिवाजी महाराज नसून त्यांच्यावर प्रेम करणारा मावळा हा त्यांच्या चित्रपटाचा नायक आहे हे जाणकारांनी समजून घेतले पाहिजे.

छ.शिवाजी महाराज म्हणाले की, आजही आपल्या समोर चंद्रकांत मांडरे, सूर्यकांत मांडरे हे बंधू नजरेसमोर उभे राहतात. तर बर्हिजी नाईक म्हटले की, यशवंत दत्त, नानासाहेब फाटक, मास्टर विठ्ठल, जयशंकर दानवे, लीलाबाई पेंढारकर, बकुळाबाई पेंढारकर, श्रीमती सुलोचना, गणपत पाटील, राजशेखर, दादा कोंडके, उषा चव्हाण, अश्विनी भावे, निशिगंधा वाड अशा कितीतरी कलाकारांना आपल्या चित्रपटातून नावारूपाला आणण्यात भालजी पेंढारकर यशस्वी झाले आहेत. त्यामुळे केवळ कलावंत घडविणारे किंवा चित्रपट निर्माण करणारे म्हणून ते परिचित नव्हते, तर कथा, पटकथा, संवाद, लेखक, गीत लेखक, म्हणूनही त्यांनी आपला ठसा या लखलखत्या चंदेरी दुनियेवर उमटवला आहे. त्यांच्या काही निवडक ऐतिहासिक चित्रपटांची नांवेच द्यायची झाली तर

१९३७ – स्वराज्याच्या सीमेवर
१९३९ – नेताजी पालकर
१९४१ – थोरातांची कमळा
१९४३ – बहिर्जी नाईक
१९४७ – जय भवानी
१९४९ – शिलंगणाचे सोने

१९५१ – स्वराज्याचा शिलेदार
१९५२ – छत्रपती शिवाजी
१९५४ – महाराणी येसुबाई
१९५६ – पावनखिंड
१९५७ – नायकिणीचा सज्जा
१९६३ – मोहित्यांची मंजुळा
१९६३ – थोरातांची कमळा–शासन पुरस्कार
१९६४ – मराठा तितुका मिळवावा अर्थात बाल शिवाजी
१९८१ – बाल शिवाजी, चिल्ड्रेन्स फिल्म सोसायटी पुरस्कार
१९८१ – गनिमी कावा

ही यादी फक्त त्यांच्या ऐतिहासिक चित्रपटांची आहे. त्यांनी निर्माण केलेल्या मुकपटांची, धार्मिक, सामाजिक चित्रपटांची दिली नाही. पण एखाद्या नव्याने संशोधन करू पाहणाऱ्या संशोधकाला हा विषय खुणावतो आहे. अशांनी जरूर याचे संशोधन करावे. कारण ती काळाची गरज आहे. सिनेमा क्षेत्रातला भालजींचा वावर हा मुकपटाच्या जमान्यापासून सुरू होतो. १९२३ ते १९३१ या नऊ वर्षात त्यांनी आठ मुक चित्रपटांची केवळ निर्मितीच नाही, तर दिग्दर्शनही केले आहे.

तर १९३२ पासून १९८६ पर्यंत या २४ वर्षात बाबांनी ४८ चित्रपटांची निर्मिती केली आहे. केवळ निर्मितीच नाही, तर कथा, पटकथा, संवाद, गीत लेखन, दिग्दर्शन, अभिनय अशा विविध पातळीवर त्यांनी दिलेले योगदान हे लाख मोलाचे आहे. हे लक्षात घेऊनच त्यांच्या चित्रपटांना जशी लोकमान्यता मिळाली तशीच राज मान्यताही मिळाली आहे.

मराठी, हिंदी, गुजराती, बंगाली, तमीळ या भाषेतूनही त्यांच्या चित्रपटांची निर्मिती झाली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना १९९१ चा चित्र भूषण–१९९१ चा जीवन गौरव पुरस्कार, १९९२ चा दादासाहेब फाळके पुरस्कार, तर १९९४ चा ग.दि.मा.पुरस्कार इ.ने गौरविलेले आहे. नव्या संशोधकांनी यावर अभ्यास करण्याची आज नितांत गरज आहे.

**संदर्भग्रंथ :**

स्वयंभू – द.भा.सामंत
साधा माणूस–भालजी पेंढारकर

ISBN 978-93-5196-698-2

## बखर : इतिहास व वाङ्मयाच्या कक्षेत न सामावणारी शौर्यगाथा

**प्रा. युवराज देवाळे**
मराठी विभाग, के.एच.कॉलेज, गारगोटी.

बखर वाङ्मय हा मराठी सत्तेच्या देदिप्यमान कालखंडाचा रसाळ अविष्कार आहे. पुणे-सुपे परगण्यातून उधळलेल्या स्वातंत्र्याच्या रणधुमाळीचे आरस्पानी प्रतिबिंब बखरींमध्ये पडले आहे. प्राचीन कालापासून भारतीय इतिहासात मराठी वीरांनी आपले मनगट व बुद्धिमत्तेच्या जोरावर कर्तृत्वाची सुवर्ण पाने जोडली आहेत. संघटीत व स्वतंत्र राज्यनिर्मितीचा विचार करता शिवकाळ व पेशवेकाळ हा मराठी सत्तेचा सुवर्णकाळ होय. स्वराज्य निर्मिती व विस्ताराचा हा कालावधी भारतीय रणमैदाने व खलबतखान्यांतून मराठी शक्तीची द्वाही मिरवणारा होता. रणांगणावरील धगधगत्या वास्तवाला भव्योदात्त स्वरूपात मांडण्याचे कार्य बखरींनी केले आहे. रणांगणावर मदमस्तपणे झुंजणाऱ्या आणि आपल्या डावपेचांनी लहान मोठ्या शाह्यांपासून दिल्ली तख्तापर्यंत धडकी भरवणाऱ्या नररत्नांची किर्तीगाथा बखरींनी अजरामर केली आहे. इतिहासाचा आधार आणि वाङ्मयीन मांडणीचा परीसस्पर्श लाभलेल्या बखर  वाङ्मयाला मराठी समीक्षा व वाङ्मय इतिहासाने मात्र फारसे गांभिर्याने घेतलेले नाही. प्रस्तुत निबंधामध्ये बखरगद्यातील वाङ्मयीन गुणविशेष व त्यांच्या अनेकविध स्वरूपाच्या अद्वितीय रचनांचे स्वरूप स्पष्ट करावयाचे आहे.

बखरलेखन वाङ्मयीन हेतूंनी केलेले नाही. हे वास्तव आहे, मात्र त्यामधील वाङ्मयीन गुण अगदी सामान्य वाचकाच्याही नजरेत भरणारे आहेत हे नाकारता येत नाही. बखरींचे वाङ्मयीन विशेष विचक्षण बुद्धिच्या समीक्षक व वाङ्मयेतिहासकारांच्या नजरेतून सुटले ही चिंतेची बाब आहे. बखरगद्याला मराठी साहित्यात मिळालेले नगण्य स्थान व सापत्नभावाची वागणूक हा विचार करण्यास भाग पाडणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. बखरलेखन शुद्ध वाङ्मयीन अथवा इतिहासलेखनाच्या दृष्टीने केलेले नाही. खुद्द बखरींचे लेखन करणाऱ्या बखरकारांनीही आपला धनी, विषयवस्तू अथवा स्वतःचा निर्देश लपवलेला नाही. कारकुनी फडातील सर्वसामान्य लेखनकामाठी करणाऱ्या बखरकारांनी सामान्य लढे, रूक्ष वास्तव व दगदगीच्या दिनक्रमातून विरश्रीची रसाळ शब्दशिल्पे उभी केली आहेत. बखरकारांनी आपणहून दिलेल्या माहितीची मोडतोड करून बखरगद्याला दुय्यम स्थान देण्याचा करंटेपणा पराभूत मानसिकतेतून आला असण्याची शक्यता आहे.

बहुतांशी बखरींचे लेखन व त्यांचे नामकरणही उत्तरकालात केले गेले. तात्कालीन लेखन पद्धतीनुसार मोडी ही बखरलेखनांची लिपी राहिली व लेखनात सलगता होती. बखरींचे संशोधन व प्रकाशन करताना आधुनिक संपादकांनी त्यांचे संस्करण, लिप्यंतर, विरामांचा वापर, परिच्छेद निर्मिती केली.

त्यामध्ये दरम्यानच्या काळात कांही पाठभेदही शिरले, ही वस्तुस्थिती कोणी नाकारतही नाही. मात्र थोड्याफार फरकाने ही परिस्थिती सर्वच प्रकारच्या मध्ययुगीन साहित्य प्रकारांची होती. अशा साहित्यातील सुमार वाङ्मयीन दर्जाकडे डोळेझाक करून बखरींना मात्र सापत्नभावाची  वागणूक देण्यात आली हे स्पष्टपणे प्रत्ययास येते. परकीय भाषेतून आलेल्या वाङ्मय प्रकारांबरोबर त्यांचे वाङ्मयीन निकषही आपोआप त्यांच्याबरोबर आले. अशाच काही तयार निकषांच्या आधाराने आशय व रूपदृष्ट्या पूर्णतः भिन्न असणाऱ्या एतद्देशीय वाङ्मयप्रकारांचे मूल्यमापन केल्याने त्यांच्यावर अन्याय झाला आहे बखर गद्य हा त्यामध्ये पडलेला प्रमुख बळी असे म्हणता येईल.

बखरगद्याच्या उपलब्ध संहितांना त्यांचे स्वरूप न समजून घेता वाङ्मय व इतिहासाच्या असंबद्ध कसोट्या लावल्यामुळे दोन्हींकडे दुय्यम स्थान प्राप्त झाले. वस्तुतः ज्या मुस्लिम इतिहासकारांचे लेखन अधिकृत मानले जाते ते जहुर, अबुल फजल, मिर्झा मुहंमद, काफीखान हे विविध राजे व पादशहांचे आश्रीतच होते. त्यांचे लेखन आपल्या मालकांच्या आज्ञेनेच होत होते. आणि त्यामध्ये पक्षपातीपणा जागोजागी प्रत्ययास येतो.

तरीही इतिहास जेते लिहितात व पराभूतांना तो आपल्या अभ्यासक्रमात शिकवावा लागतो हेच आमच्या आधुनिक समीक्षक अभ्यासकांनी सिद्ध केले आहे. वि. का. राजवाडेंनी बखर गद्याच्या व्युत्पत्तीपासूनच संदिग्ध-धुसर

वातावरण निर्मितीस सुरुवात केली. परभृत मानसिकता आपल्या अस्तित्वाचा शोध स्वतंत्रपणात न घेता परकीय पोथ्या-पुराणे धुंडाळण्यात धन्यता मानते. केवळ उच्चार साधर्म्य व तर्कट लढवण्याच्या तथाकथित विद्वतेतून बखरीचे मूळ अरबी खबर शब्दात शोधले गेले. तसेच ही मखलाशी लपवण्यासाठी खबर स्र बखर असा भाषाशास्त्रातील वर्णविपर्ययाचा भरभक्कम आधार देण्यात धन्यता मानली. मात्र तात्कालिक घटनेची वस्तूनिष्ठ अरबी खबर आणि बखरीतील रसाळ जिवंतपणा, वीरवृत्तीपोषक निवेदन, कल्पकता, अदभुतरम्यता यामध्ये समानतेचा कोणता धागा आहे हे शोधण्याची तसदी त्यांनी घेतलेली नाही. वर्णविपर्ययामध्ये केवळ शब्दातील अंतर्गत ध्वनींचे स्थानबदल होते. वाड;मयीन संकेतांची अदलाबदल, मोडतोड त्यामध्ये सूचित होत नाही याचे भान त्यांनी बाळगल्याचे दिसत नाही. बखरीची लेखन प्रेरणा मुस्लीम राजवटीतील तवारिखा, नामे, अखबार यांमध्ये शोधताना कलात्मकता व वास्तव घटना वर्णनाची लेखनकामाठी यामधील भेदाकडे लक्ष दिलेले नाही. राज्यव्यवहारकोशातील ‘खबर’ आणि ‘बखैर’ हे स्वतंत्र शब्द व त्यांनी निर्देशित केलेले लेखन प्रकार वेगळे आहेत याची दखल न घेता परकीय इतिहाससाधने व कोश धुंडाळण्यात विद्वता खर्ची घातल्याचे दिसून येते. बखरींच्या उपलब्ध संहितांतील वाङ्मयीन विशेषांचे सामान्यीकरण करून स्वतंत्र वाङ्मय प्रकार कल्पिण्यापेक्षा परप्रकाशात त्याला दुय्यम ठरवण्यांची छिद्रान्वेषी दृष्टी बखरगद्याला घातक ठरली आहे. तात्कालीन समाजस्थिती, वाङ्मयीन वातावरण यांचा विचार करता रूक्ष वास्तव व सामान्य जनांना नायकत्व देणाऱ्या अद्‌भूतरम्य कलाकृती म्हणून बखरींचे लेखन महत्त्वपूर्ण आहे. आपले अस्तित्व प्रस्थापित करू पाहणाऱ्या लढवय्या समाजाचे प्रतिबिंब या कलाकृतींमधून प्रत्ययास येते. मर्यादित विकास झालेल्या या एतद्देशिय वाङ्मयप्रकाराचे काही ठळक विशेष पुढीलप्रमाणे नोंदवता येतील.

१. बखरींचे लेखन विशिष्ट राजा, पेशवा, सरदार यांच्या आदेशाने झाले असले तरी त्या कोणाच्याही अनुकरणातून निर्माण झालेल्या नाहीत. त्यांचे अंतरंग पुर्णतः मराठमोळे असून तात्कालीन समाजाच्या धारणा त्यामध्ये पुरेपूर उतरलेल्या आहेत.

२. बखरींचे लेखन इतिहासाप्रामाण्याने झाले नसले तरी त्यातील तपशीलवारपणा व सुसंगतीतून इतिहासाच्या क्रमवार मांडणीचा मार्ग सुकर झाला आहे.

३. वाङ्मय कलाकृतीचे सौंदर्य विषय (Matter), मांडणी (Manner) आणि परिणाम (Effect) या तीन घटकांच्या सेंद्रिय एकात्मत्तेवर अवलंबून असते. मराठी बखर वाड्.मय या बाबतीत कोठेही उणे पडत नाही.

४. बखर वाड;मयाचा उगम इतिहासविषयक मौखिक कथा-कथनातून आला आहे. कीर्ती गाण हा त्याचा प्रधान हेतू आहे.

५. बखरकारांनी ऐतिहासिक घटनांना कल्पकता व पुराणातील संदर्भाचा आधार देत सामान्य अथवा थोर योदध्यांचा चित्रणातून मानवी जीवनाचे विराट दर्शन घडवले आहे.

६. बखरींच्या रचनेत आवश्यकतेनुसार फारसी, संस्कृत शब्द योजना, लहान व सुटी वाक्यरचना तपशीलवार मांडणी आणि रसाळ निवेदन यांची योजना आढळते.

७. प्रासादिक भाषा, काव्यात्म कल्पना, अलंकार, सुभाषिते, म्हणी, ओघवती - नादमय रचना ही बखरगद्याची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

८.कथा, आख्यायिका, दंतकथा यांच्या प्रभावी वापराबरोबरच अदभूतता, अत्युक्ती हे बखर रचनेचे विशेष घटक आहेत.

९.रंजकत्व हा बखरलेखनाचा प्रधान हेतू असल्याने बखरकरांनी स्थल-काल-प्रसंग विपर्यसाकडे फारसे गांभीर्याने पाहिलेले नाही, कदाचित बखरींच्या उत्तरकालीन लेखनामुळे असे दोष आले असावेत.

१०. चिंतन व तत्वज्ञान यांचा बखरीमध्ये अपवादात्मक वापर आहे. प्रसंग वर्णनासाठी पोषक व मुख्य कथा सूत्र रमणीय करण्यासाठी त्याचा सुभाषित स्वरुपात वापर केला जातो.

११. पौराणिक आदर्शांची वर्तमान पातळीवर भव्य मांडणी करताना सामान्य माणसाच्या कर्तृत्वाला असामान्य झळाळी देण्यात बखरकारांचे कौशल्य दिसून येते. रणभूमीवरील रौद्र वास्तवाची कलात्मक मांडणी करण्यात बखरींचे सौंदर्य सामावले आहे.

या ठळक गुण विशेषांबरोबरच बखरींच्या संहितानिष्ठ अभ्यासातून इतर सुक्ष्म विशेषांची मांडणी अभ्यासकांनी तपशीलाने केली आहे. प्रस्तूत निबंध विषयाच्या अनुषगांने विचार करता बखर वाड:मयाची मूळे एतद्देशीय पर्यावरणात

शोधणे व त्याच्या विशेषांची स्वतंत्र मांडणी करणे आवश्यक आहे. मराठी इतिहास लेखनासाठी प्रारंभी बखरींचा वापर केला गेला. तद्नंतर उपलब्ध इतर पुराव्यांच्या तुलनेत बखरींना फारसे महत्त्व राहिले नाही. वास्तविक बखरलेखकाची पक्षनिष्ठा, त्याची कीर्तीकाव्याची भूमिका स्पष्ट असताना त्याच्यावर सत्याच्या अपलापाचा आरोप पूर्णत: अनाठायी स्वरुपाचा होता. जे बखरकर्त्याने इतिहासलेखनाच्या हेतूने लिहिलेच नव्हते त्याच्यात इतिहास शोधणे ही शोधकर्त्याची चूक होती. मात्र वि. का. राजवाडे प्रभृतींनी त्याचा बादरायण संबंध वाड;मय समीक्षेत जोडून एका अस्सल चिटोऱ्याशी तूलना करताना बखरींना गौण स्थान दिले. पुढील बऱ्याच समीक्षकांनी त्यांची री ओढत बखर गद्याला अनुल्लेखाने मारले. बखर गद्यातील कल्पकता, भाषा वैभव, आशयसंपन्नता, अदभूतरम्यता आणि रचनासौष्ठव याकडे वाड;मयीन  निकष म्हणून न पाहता त्यातील न्यून शोधण्याकडे अधिकतर लक्ष दिले गेले. बखरकर्त्यांना इतिहास लेखनापेक्षा आपल्या धन्याचे रसाळ कीर्तीगाण महत्वाचे वाटते. लेखकाचे वाड्.मयीन स्वातंत्र्य महत्वाचे मानणाऱ्या समीक्षकांना इतिहासाचे जोखड इतके महत्त्वाचे का वाटते याचे उत्तर त्यांच्या परप्रकाशीत प्रतिभेकडे अंगुली निर्देश करते. एखादा वाड्.मयप्रकार वेगळा असेल तर त्याचे निकषही वेगळेच असणार हा नियम बखर गद्यालाही लागू होणे आवश्यक आहे. जर निकष तयार नसतील तर ते शोधण्याची, त्यांची नव्याने मांडणी करण्याची आवश्यकता आहे. बखरगद्य हे मराठी प्रतिभा व अस्मितेचे प्रतिक आहे. परकीय संपूर्ण भारतवर्ष काळवंडले असताना आपल्या लखलखत्या तलवारीच्या पात्यांनी आसमंतावर स्वातंत्र्याच्या प्रकाश शलाका प्रसवणाऱ्या रणमर्दांच्या त्या शौर्यगाथा आहेत. स्वतंत्र प्रतिभेला अवकाशही बंदिस्त करु शकत नाही. ज्या योदध्यांनी रणमैदाने गाजविली, ज्या शुरांनी अवकाशाला गवसणी घातली त्यांच्या शौर्यगाथांना इतिहास व वाड्.मयाच्या कक्षेत बंदिस्त करण्याचा करंटेपणा करण्यापेक्षा त्यांचा स्वतंत्र अवकाश शोधणे यानिमित्ताने इष्ट ठरेल.

**संदर्भ :**

१. शेणोलीकर ह. श्री., प्राचीन मराठी वाड्.मयाचे स्वरुप, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, सहावी आवृत्ती, १९८७ पृ-२७३
२. हेरवाडकर र. वि., मराठी बखर, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्र. आ., १९५७, पृ. ७
३. तत्रैव. पृ. १
४. गिरीधारी भास्कर व इतर, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक, अभ्यास पुस्तिका - चरी - २५१/२ पृ.४८
५. हेरवाडकर र. वि., उनि. पृ. १४

ISBN 978-93-5196-698-2

# बखर वाङ्मयातून दिसणारे तत्कालिन समाजाचे प्रतिबिंब

प्रा. एन. व्ही. शिंदे
मराठी विभाग,दहिवडी कॉलेज, दहिवडी, ता.माण,जि. सातारा

बखर गद्य हे मराठी साहित्यामधील तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय समाज जीवनाचे दर्शन घडविणारे प्रभावी ऐतिहासिक वाङ्मय म्हणावे लागेल. खबर म्हणजे वार्ता, समाचार किंवा वृत्त. खबर या अरबी शब्दाचा विपर्यास होऊन बखर शब्दाची निर्मिती झाली. बक म्हणजे बकणे, बोलणे यातून बखर शब्द निर्माण झाला असावा असे इतिहासाचार्य राजवाडे सांगतात. मुसलमानांमध्ये तवारिखा लिहिण्याच्या पद्धतीतून मराठयांमध्येही बखरी लिहण्याचा प्रघात पडल्याचे ते सांगतात. मुळातच बखर गद्याला खूप मोठा इतिहास आहे. मराठ्यांच्या इतिहासातील वेगवेगळ्या घटना प्रसंगांवर बखर लेखन झाले. या बखरींचे स्थूलमानाने पाच वर्ग पडतात. यामध्ये समकालीन बखरी, उत्तरकालीन बखरी, बखरसदृश ऐतिहासिक स्वरूपाचे लेखन, पौराणिक व सांप्रदायिक बखरी, ऐतिहासिक बखरी इ. या सर्वच प्रकारांच्या बखरीमधून तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब पहावयास मिळते.

**राजकीय आणि सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब**

शिवपूर्वकालामधील माहिमची किंवा महिकावतीची बखर ही सर्वांत जुनी बखर आहे. गद्यपद्यमय तिचे स्वरूप. या बखरीमध्ये प्रतापबिंबापासून इंग्रजांच्या आगमनापर्यंतचा एकूण सात राजवटींचा इतिहास (इ.स. 1138 ते इ. स. 1500) पहायला मिळतो. माहिम प्रातांचा, कोकणचा इतिहास यातून प्रकाशित झाला. तत्कालीन राज्यव्यवस्था, जमीन मोजण्याची पद्धती, सैन्यव्यवस्था, संरक्षणव्यवस्था, गावांची व किल्ल्यांची नावे यांची माहिती मिळते. राक्षेसतागडीची बखर यामध्येही विजयनगरच्या विध्वसांची माहिती मिळते. राजभुवरातील पागा, पीलखाना, उस्तरखाना इ.मधून सरंजामाची कल्पना येते. शिवकालामधील सभासदाची बखर यामधून शिवछत्रपतींच्या चरित्राबरोबर तत्कालीन राजकीय व सामाजिक व्यवस्थेचे कल्पना येते. अफजलखान वध, राजांचे दिल्लीस प्रयाण, शिवराज्याभिशेक, भागानगरास भेट, शिवाजी व व्यंकोजी भेट इ. राजकीय घटनांचे वर्णन आहे. अठरा कारखाने, खजिना, शिलेदार, सुभेदार, कारकून, हुजरे, गड, कोट इत्यादींचा तपशील विस्तृतपणे आहे. रघुनाथ यादवांनी लिहिलेल्या शिवाजी महाराज छत्रपती जनेश्वर यांचे चरित्र या बखरीतून शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांचे वर्णन आहे. त्यातून तत्कालीन राजकीय वातावरणाचे, त्यातील संघर्शाची कल्पना येते. भोसलेवंश चरित्र या बखरीतून तंजावरच्या भोसले घराण्यांचा इतिहासाची माहिती मिळते. शिवाजी महाराजांच्या पूर्वीच्या एकूण चौदा पिढ्यांचा इतिहास यामध्ये आढळतो. शिवदिग्विजय या खंडो बल्लाळ चिटणीसांच्या बखरीमधून शिवाजी महाराजांच्या चरित्राबरोबरच तत्कालीन राजकीय घडामोडींचे दर्शन घडते. श्रीशिवाजीप्रताप, शेडगावकर बखर, वाकेनिशी उर्फ एक्याण्णव कलमी बखर या सर्व बखरी शिवकालीन असल्याने शिवाजी महारांचे चरित्र, तत्कालीन राजकारण या दोन्ही गोश्टी या बखरींच्या केंद्रस्थानी आहेत. शिवकाळामध्ये मल्हार रामराव चिटणीस हे बखरलेखनामधील मोठे नाव होते. यांनी एकूण चार बखरींचे लेखन केले. त्यामधील सर्वात उल्लेखनीय बखर म्हणजे शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र ही होय. या बखरीतून शिवाजी महाराजांचे चरित्रामधील विविध घटनांचे वर्णन आले. शिवछत्रपतींच्या

प्रशासनव्यवस्था, त्यातील बारा महाल, अठरा कारखाने, कारभाराची विभागणी, किल्ल्यांचा बंदोबस्त, तोफखाना, पागा, पायदळ व्यवस्था, जमीन वतनदारांचे धोरण, देवस्थानांची व्यवस्था, युद्धसाधने, राजदरबारातील शिश्टाचार, चालिरीती, राजनीती यांची माहिती मिळते. तत्कालीन सामाजिक व राजकीय जीवनाचे सखोल दर्शन घडविणारी ही बखर ठरते.

पेशवेकालामध्ये निर्माण झालेल्या बखरींच्या विशयांमध्ये शिवकालातील बखरींपेक्षा विविधता आढळते. या पेशवेकालामध्ये पानिपतचे युद्ध केंद्रस्थानी आहे. यातून सर्व बखरींचे लेखन झाले. पाणिपतची बखर यामध्ये पानीपतच्या लढाई वर्णन आले आहे. लढाईमध्ये वारलेली शस्त्रे, लढाईची निती यामध्ये स्पश्ट होते. विश्वासराव, भाऊसाहेब आणि अहमदशहा अब्दाली यांच्यामधील राजकीय द्वंद्व, सत्तासंघर्श दिसतो. तत्कालीन अंतर्गत कलहाचे दर्शन बखरीमधून होते. सोनपत पानपत येथील मराठे दुराणी युद्ध या बखरीमध्ये मराठे आणि अहमदशहा दुराणी यांच्यातील राजकीय संघर्शाचे चित्रण येते. भाऊसाहेबांची कैफियत बखरीमध्ये राजकीय स्थितीचे चित्रण येते. तर भाऊसाहेबांची बखर या कृश्णाजी शामराव यांनी लिहिलेल्या बखरीतून पानिपतच्या रणसंग्रमाचे सविस्तर वर्णन पहायला मिळते. तसेच पानिपतयुद्धपूर्व मराठ्यांच्या राजकारणाचे प्रतिबिंबही यामध्ये आहे. महत्त्वाच्या ऐतिहासिक व राजकीय घटनांच्या उल्लेखांवरून तत्कालीन समाजस्थितीची कल्पना यामधून येते. साश्टी उर्फ ठाण्याची बखर यात मराठे व फिरंगी यांच्या लढाईचा वृत्तांत आला. हिंदूचा धार्मिक छळ या कारणामुळे निर्माण झालेला सत्तासंघर्श चित्रित झाला.

पानिपतयुद्धानंतर जवळपास एक लाख बांगडी फुटली. माधवराप पेशवे यांची कारकीर्द संपुश्टात आली. सवाई माधवराव यांना गादीवर बसविले पण मराठी साम्राज्याला अंतर्गत लागलेली कीड याचे प्रसंगचित्रण या बखरींमधून येते. नंतर बदामी लढाईत मराठयांना विजय मिळविला. नंतर माधवरावांनी आत्महत्या केली. वसईच्या तहानंतर मराठ्यांचे राज्य इंग्रजांच्या ताब्यात गेले. पेंढारी, रामोशी, कोळी, बेरड यांनी बंड केले. आपल्याच राज्याची लूट सुरू केली. त्यांनतर समाजामध्ये राजकीय अस्थिरता, अराजकता माजली होती. दुसरा बाजीराव हा रंगेलांचा बादशहा म्हणून ओळखला जात होता. त्याने आपल्या राजदरबारामध्ये स्त्रीयांचे महत्त्व वाढविले. राज्यकारभारत लक्ष दिले नाही. अशा प्रकारचे सामाजिक व राजकीय वातावरणाचे चित्रण या बखरींमधून चित्रित झाले आहे.

**धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब .**

मराठीमधील सर्वात जुनी असलेली महिकावतीची बखर यात महाराश्ट्र धर्माचे चित्रण येते. हा धर्म रक्षण्याकरिता या बखरीचे लेखन झाल्याचा उल्लेख यामध्ये आहे. शालिवाहनाची बखरीतून कृतयुग, त्रेतायुग, द्वापारयुग आणि कलियुग या कालाच्या विभागांची माहिती पौराणिक पद्धतीने दिली. युधिश्ठिर, विक्रम, शालिवाहन, विजयाभिनंदन, नागार्जुन, कल्की, महंमद, येशू या शककर्त्यांची यादी दिली आहे. सभासदाची बखर यामध्ये तत्कालीन समाजमनाचा धार्मिक दृश्टिकोन प्रसृत झाला. भवानी मातेचा शिवाजी महाराजांच्या अंगामध्ये संचार होणे, पृथ्वीकंप होणे, उल्कापात झाला. रात्री जोड इंद्रधनुश्ये निघाली. श्रीशंभुमहादेवी तळ्याचे उदक रक्तांबर झाले. आकाशवाणी झाली. अशा वर्णनावरून धार्मिक जीवनदृश्टिकोण आणि

तत्कालिन अंधश्रद्धाळू मनाचे दर्शन होते. ज्यावेळी शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला. त्यावेळी सर्व रयत पोरकी झाली. रयतेला कोणाचाही आधार नसल्याने समाजातील अस्थिरता, अराजकता, लोकांच्या मनातील भिती, चिंताग्रस्तता यांचे प्रकटीकरण करण्यासाठी अशाप्रकारचे वर्णन बखरकारांनी केले असावे. सभासद बखरीच्या शेवटी फलप्राप्ती सांगताना पुत्र होईल, पुण्य होईल, शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र या बखरीत शिवाजी महाराजांनी अवतार घेऊन धर्मस्थापना केल्याचा उल्लेख आला आहे. मुळातच मल्हार रामराव चिटणीस याच्या व्यक्तिमत्त्वावर धार्मिकता आणि पौराणिकतेचे संस्कार झाले हाते. म्हणूनच ते शिवाजी महाराजांचा अवतारी पुरूश मानतात.

पाणिपतची बखर यामध्ये पानिपतचे युद्ध जरी केंद्रभूत असले तरी पानिपतच्या युद्धामध्ये मराठ्यांचा पराभव होण्याचे प्रमुख कारण म्हणजे प्रबळ धार्मिक भावना असेही सांगितले जाते. कारण, युद्धावर केलेल्या सैनिकांनाही गंगा नदीमध्ये स्नान करून पुण्य मिळविण्याचा मोह सुटला नाही. सांप्रदायिक स्वरूपाच्या बखरींमधून तत्कालीन धार्मिक वातावरणाचे चित्रण मोठ्या प्रमाणात येते. धावडशीचे ब्रम्हेंद्रस्वामी यांचे चरित्र या बखरीत स्वामींच्या जीवनामधील अनेक चमत्कारांचा उल्लेख येतो. हनुमंतस्वामीकृत श्रीसमर्थांची बखर यामध्ये शिव–समर्थ भेटीचा उल्लेख आहे. शिवाय रामायण, महाभारत, भागवत या ग्रथांमधील कथाभाग घेऊन अनेक सांप्रदायिक बखरींची निर्मिती झाली.

एकूण बखर गद्यामधून तत्कालीन धार्मिक वातावरणामधील अराजकता, कर्मकांड, शकून, मुहूर्त, नवस, गाऱ्हाणी, अंगारे–धुपारे इ. गोश्टींमध्ये समाज गुरफटलेला होता. समाजाचे धार्मिक अधःपतन झाले होते. ब्राम्हणांनी धर्माचे स्वरूप स्वार्थीपरायण वृत्तीमध्ये बदलेले होते. धार्मिक आणि सांस्कृतिक कर्मांसाठी बहुजनांना इतरांच्या आधाराची गरज होती. यामध्ये त्यांचा मानसिक व आर्थिक छळही होत होता. त्यातूनच समाजाची दिशा बदलली आणि धार्मिक स्तोम माजले. या धार्मिक परिस्थितीचा विचार जेवढा संतांच्या काळात झाला. तेवढा विचार या बखर काळामध्ये झाला नाही. या काळी राजकीय जीवन सर्वांच्या केंद्रस्थानी होते. स्वधर्म आणि स्वधर्मातील रीति–रिवाज, पंरपरा व रूढी यानुसार समाज चालत असे. त्या रूढींची चिकित्सा करण्याची मानसिकता कोणाचीही नव्हती. अशा स्वरूपाचे धार्मिक वातावरण बखर गद्यामधून प्रतिबिंबीत झालेले दिसते.

**संदर्भग्रंथ :**

1. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल.रा. नसिराबादकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर, नववी आवृत्ती 2006
2. मराठी वाङ्मयाचा इतिहास, संपा. शं.गो. तुळपुळे, महाराश्ट्र साहित्य परिशद, पुणे 1984
3. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, अ.ना. देशपांडे, व्हीनस प्रकाशन, पुणे 1966
4.मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल.रा. पांगारकर, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे 1972

ISBN 978-93-5196-698-2

# भाऊसाहेब बखरीमध्ये प्रतिबिंबीत झालेले दत्ताजी शिंदे यांचे शौर्यवर्णन

**प्रा. डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
आर्टस् अ‍ॅन्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा. ता. वाळवा, जि. सांगली.

१७ व्या शतकात बखर वाङ्‌मयाच्या रुपाने मराठी गद्याचा नवा अविष्कार जन्माला आला. 'खबर' या अरबी शब्दाचा अर्थ वार्ता, माहिती किंवा समाचार असा असून त्या शब्दांचा वर्ण विपर्यास होऊन 'बखर' हा शब्द मराठीत रुढ झाला आहे. शिवाजी महाराजांच्या रुपाने मराठ्यांच्या पराक्रमाला उधाण आले असताना, शौर्य कथा लिहिल्या जाऊ लागल्या. त्यांचा भावनिक अविष्कार पोवाड्या प्रमाणेच बखरी मधूनही झाला. मुसलमानांच्या दैनंदिन नोंदी 'तवारिखा' तून दिसतात. त्याचप्रकारे आपले वंशचरित्र सांगण्याच्या हेतूने बखरी लिहिल्या आहेत. बखरकारांनी सत्य आणि कल्पना यांचा सुंदर मिलाप बखर लिहिताना केलेला दिसून येतो. यामुळेच वा.सी. बेंद्रे यांनी बखरी म्हणजे चरित्र ग्रंथ असे म्हंटले आहे. १
भारताच्या इतिहासात इ. स. १७६१ मध्ये झालेले पानिपतचे तिसरे युद्ध अनन्यसाधारण महत्वाचे आहे. हे युद्ध मराठे आणि अहमदशहा अब्दाली यांच्यात लढले गेले. या युद्धात मराठ्यांचा पराभव झाला व अब्दालीचा विजय झाला. या युद्धात विजय होऊनही अब्दालीला हिंदुस्थानवर वर्चस्व मिळविता आले नाही. या युद्धाने भारतावर राज्य कोणाचे असेल या प्रश्नाचे नव्हे तर कोणाचे नसेल, या प्रश्नाचे उत्तर पानिपतच्या तिसऱ्या युद्धाने दिले होते. येथूनचे भारतातील ब्रिटीश सत्तेच्या उदयाचा मार्ग मोकळा झाला. २

भाऊसाहेबांच्या बखरीला 'पानिपतची बखर' असेही म्हणतात. बखरीच्या वरती बखर भाऊसाहेबांची असा उल्लेख असल्याने यांस शं. ना. जोशी यांनी 'भाऊसाहेबांची बखर' असे नांव दिले. या बखरीत मराठ्यांच्या इ. स. १७५३ ते १७६१ पर्यंतच्या इतिहासाचा उल्लेख आहे. या बखरीतील दत्ताजी शिंदे यांनी उत्तर भारतात आपल्या शौर्याने जो पराक्रम केला, त्याचे वर्णन आले आहे. ३
दत्ताजी शिंदे मराठ्यांचे अत्यंत शूर सरदार होते. भाऊसाहेबांच्या बखरीत त्यांच्या शौर्याची हकीकत सांगितली आहे. बिजेसिंग विरुद्धच्या युद्धात दत्ताजी शिंदे जयाप्पा शिंदेंना धीर देताना 'यशाआपेश शूरांचा वाटा, त्याची क्षिती काय?' असे म्हणत धीर देतात. या युद्धात मराठ्यांच्या पराक्रमाने शत्रू नामोहरण झाला होता. परंतु बिजेसिंग हा जयाप्पास ठार मारण्यासाठी भिकाऱ्यांच्या वेशात मारेकरी पाठवितो. सकाळच्या वेळी स्नान करणाऱ्या बेसावध असणाऱ्या जयाप्पा शिंदे यांचा मारेकऱ्याकरवी खून होतो. हाच बिजेसिंग शिंद्यांना सापडल्यावर मल्हारराव होळकरांनी मध्यस्थी करुन त्याला सोडविले होते. परंतु बिजेसिंग उपकाराची परतफेड अशा पद्धतीने अपकाराने करतो. जयाप्पा शिंदे या बंधुच्या वधाने दत्ताजी शिंदे खुपच व्यतित होतात. स्वतःला सावरुन लवकरच शत्रूविरुद्ध लढण्यासाठी सज्ज होतात. जयाप्पांचा मुलगा जनकोजी शिंदेला सोबत घेत त्यांनी बिजेसिंग विरुद्ध मोहम हाती घेतली. या मोहिमेत बिजेसिंगचा निर्णायक पराभव झाला. त्याच्याकडून मोठी खंडणी वसूल केली व त्याचा बराचसा मुलुख आपल्या ताब्यात घेतला. अशाप्रकारे मराठ्यांचे माळवा व राजस्थान वर वर्चस्व प्राप्त झाले. ४

भाऊसाहेबांच्या बखरीमध्ये दत्ताजी शिंदे हे सिंदखेड येथील लढाईत निजामाचा पूर्ण पराभव कसा करतात याचे वर्णन आहे. एखादी गोष्ट दत्ताजी शिंदे यांनी मनावर घेतल्यावर ती पूर्ण होऊपर्यंत त्याचा पाठपुरावा करण्याच्या वृत्तीचा प्रत्यंतर बखरीमध्ये आपणाला सातत्याने येते. अहमदशहा अब्दालीच्या स्वारी अगोदर दत्ताजी शिंदे व गाजुदीखान वजीर

यांच्यातील संघर्षात दत्ताजी शिंदे यांच्या नियोजनाने यश आले. दत्ताजी शिंदे यांच्यामुळेच ते कुंजपुरा येथे असताना मराठ्यांचे सैन्य अटकपर्यंत पोहोचले. गोविंदपंत बुंदेले यांच्यामुळे दत्ताजी शिंदेंचा नजीबखान रोहिल्याशी स्नेह होता. तरीसुद्धा नजीबखानने आयोध्याच्या सुजाउद्दौलाशी गुप्तपणे करार केला. दत्ताजी शिंदे यांनी आयोध्याचा नवाब सुजाउद्दौलाविरुद्ध शुक्रताल येथे चढाई केली यावेळी नजीबखान रोहिला हा शिंद्यांच्या ताब्यात सापडतो परंतु गोविंदपंत बुंदेल्यांमुळे त्याचे प्राण वाचून सुटका होते. पण नजीबखानवर दाखविलेली ही मेहरबानी नंतर शिंद्यांना खूप महागात पडते. तो मराठ्यांविरुद्ध शत्रूंची जुळवाजुळव करु लागतो. याकामी त्याला आयोध्येचा नवाब सुजाउद्दौला याची मदत मिळते. मराठ्यांच्या विरुद्ध नजीबखान व सुजाउद्दौला हे अफगाणिस्थानच्या अहमदशहा अब्दालीची मदत घेतात. यावेळी या त्रिशक्तीविरुद्ध मराठे सुरुवातीला कमी पडू लागतात. हे पाहून दत्ताजी शिंदे गनिमी काव्याने युद्धाचा निर्णय घेतात. ५

दत्ताजी शिंदे यांचे विरमरण व विरवचन (बचेंगे तो और भी लढेंगे)

अहमदशहा अब्दाली, नजीबखान व आयोध्येचा सुजाउद्दौला या त्रिशक्तीकडे एक लाख चाळीस हजारांची फौज होती. यावेळी दत्ताजी शिंदे मराठा सैनिकांच्या स्त्रिया व मुलांना चमेलीपार जाण्यास सांगतात. युद्धात वाईटप्रसंगी त्यांचा ढालीसारखा वापर होऊ नये हा त्यामागे त्यांचा उद्देश असावा. ६

निष्कर्ष :

भाऊसाहेबांच्या बखरीत दत्ताजी शिंदे यांच्या उत्तर भारतातील मोहिमेचा व त्यांनी दाखविलेल्या शौर्याचा इतिवृत्तांत आढळतो. दत्ताजी शिंदे (ग्वाल्हेरचे शिंदे घराणे) हे स्वतःला पाटील म्हणून घेण्यात धन्यता मानत असल्याचे दिसून येते. या बखरीत दत्ताजी शिंदे यांचा बाणेदारपणा, मुत्सदीपणा, वीरवृत्ती, धाडसीपणा इ. गुणांचे पदोपदी दर्शन होते. दत्ताजी शिंदे यांनी ज्या बाणेदारपणाने मृत्यूला कवटाळले त्याने मराठ्यांच्या इतिहासात वीरश्रीचा व हौतात्म्याचा एक नवा अध्याय लिहिला गेला. दत्ताजी शिंदे यांच्या हौतात्म्याने संपूर्ण मराठी मने सुन्न झाली पण त्यांच्या वीरश्रीने, पराक्रमाने व हसत-हसत मृत्यूला सामोरे जाण्याच्या वृत्तीने तसेच शत्रूपुढे कोणत्याही परिस्थितीत मान न झुकविण्याच्या स्वाभिमानी स्वभावाने मराठ्यांच्यात एक नवी प्रेरणा जागृत झाली. त्यातून सदाशिवरावभाऊ व विश्वासराव पेशवे यांच्या नेतृत्वाखाली याचा बदला घेण्यासाठी मराठ्यांची मोठी फौज उत्तरेला जाण्यासाठी तयार झाली यातूनच पानिपतचे तिसरे युद्ध झाले.

संदर्भ टिपा :

१. डॉ. संकपाळ बापूजी : बखर वाङ्‌मय उद्‌गम आणि विकास, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, प्रथम प्रसिद्धी १९८२, पृष्ठ क्र. ७

२. ग्रोवर बी. एल. (मराठी अनुवाद-डॉ. एन्. के. बेल्हेकर) : आधुनिक भारताचा इतिहास एक नवीन मूल्यांकन, एस्. चंद आणि कंपनी, नवी दिल्ली, २००३, पृष्ठ क्र. ४१

३. जोशी शं. ना. : भाऊसाहेबांची बखर, अ. वि. गृह प्रकाशन, पुणे, १९६५, ८ वी आवृत्ती, पृष्ठ क्र. ९

४. कित्ता, पृष्ठ क्र. ९ ते १८

५. कित्ता, पृष्ठ क्र. ४२ ते ५५

६. कित्ता, पृष्ठ क्र. ५८

७. कित्ता, पृष्ठ क्र. ७४ ते ७७

ISBN 978-93-5196-698-2

# बखर वाड्मय - लोकतत्व आणि गुणवैंशिष्टये

**प्रा. अमोल चांदेकर**
यशवतंराव चव्हाण कला व वाणिज्य महाविद्यालय, इस्लामपूर.

**प्रस्तावना :**

साहित्याभ्यासाच्या नवनविन पदधती म्हणुन ज्या अस्तिवात आहेत त्यामध्ये लोकतत्वीय अध्ययन आणि बखर वाड्मयाची गुणवैशिष्टये यांचा विचार होणे गरजेचे आहे. लोकतत्व आणि गुणवैशिष्टये ही दोन वेगवेगळी टोके असली तरी लोकतत्वातुनच बखरींचा जन्म झाला; कारण साहित्यिक भाषेच्या सहायाने घटना,व्यक्ती,स्थळ अशा वेचक,निवडक घटकांशी पूर्ण तादात्म्य पावतो,समरस होतो आणि मगच एखादी वाड्मयीन कलाकृती वाचकांच्या समोर उभी करतो.

मराठी साहित्यात लोकतत्वीय अध्ययन पद्धतीकडे जाणिवपुर्वक दुर्लक्ष झालेले दिसते. साहित्याच्या अभिव्यक्तीत लोकतत्वाचा अविष्कार दिसुन येतो. बखरवाड्मयातूनही लोकतत्वांचा अविष्कार अपणास पहावयास मिळतो. त्याचप्रमाणे बखरकाराची बहुश्रूतता,राजकीय अनुभव,त्याचे अध्ययन, अतिसुक्ष्म निरीक्षणशक्ती,निवेदन पद्धती इत्यादी गुणवैशिष्टयांचा परिचय बखरीचे अध्ययन करताना होउ शकतो.

बखरवाड्मयामध्ये बखरकाराची निरीक्षणशक्ती जशी असेल तसा लोकतत्वाचा अभिव्यक्त भाव दिसुन येतो. आणि मग यामधुनच त्या बखरीची गुणवैशिष्टये आपणास सापडत जातात.अर्थात लोकतत्व आणि गुणवैशिष्टये ही बखरवाड्मयाच्या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत.

**लोकतत्व :**

लोक आणि तत्व या दोन शब्दांचा अर्थ समजुन घेणे महत्वाचे आहे. लोकरूढी, लोककथा, दैवत,अवतार, लोकविश्वास, लोकभ्रम, लोकप्रथा, कल्पनाबंध, लोकसंकेत या सर्व बाबींचा अंतर्भाव लोकतत्वामध्ये केलेला दिसुन येतो. लोकतत्वाचा तात्विक विचार आजपर्यत मराठी वाड्मयविश्वात झालेला दिसून येत नाही. लोक हा शब्द समुहवाचक आहे या शब्दाचा अर्थ जन, मनुष्य, समाज, जात, मानवजात, वर्ग, संघ, इत्यादी महाराष्ट शब्दकोशात दिलेले आहेत. standerd dictionary of follkiore; legends and mythology या कोशात मारीया लीच यांनी षेश्रज्ञ या शब्दासाठी मराठीत लोक म्हणजे ग्रामीण किंवा नागर भागात राहणारा जनसमुह.

वरील दोन्ही शब्दांच्या अर्थावरून आपल्याला लोक तत्वाची व्याख्या पुढील प्रमाणे करता येईल लोकांच्या जगण्यातील सत्व,सार,मूलघटक, प्रत्यक्ष वस्तूस्थिती किंवा जिवन जगण्याचे खरे स्वरूप म्हणजे लोकतत्व होय.

बखरीचे लेखन हे कोणाच्यातरी आज्ञेने झालेले असल्याने त्यात पक्षनिष्ठपणा जानवत असलातरी लोकमानसातील अनेकविध पैलूंचा अविष्कार बखरकाराच्या कळत न कळत घडत असतो. दगाबाजी, कर्तव्यदक्षता, कुरघोडया, डावपेच, तडजोड, उदात्तता, शोक, हर्ष, धाडस, कणखरता, झुजारपणा, दानशुरता, राग, प्रेम, दया, निष्ठा, गर्व, स्वाभिमान, अशा सर्व लोकतत्वानमुळे बखर साहित्याला पूर्णता आलेली दिसून येते. अनुभवाची अभिव्यक्ती करताना लोक तत्वांचे अविष्करण होत असते. दर्जेदार वाड्मयाची निर्मीतीहोण्यासाठी लोकत्तवे म्हणजे पाया होय.

**गुणवैशिष्टये:**

१.बखरीनवर पुराण कथांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. २.अलौकिक, अद्भूत,चमत्कृतीपूर्ण अशा घटनांचा वापर दिसून येतो. ३.संस्कृत भाषेचा प्रभाव दिसून येतो. ४.सुभषिते,म्हणी,वाकप्रचार,यांचा वापर दिसुन येतो. ५.फारसी भाषेचा प्रभाव दिसून येतो. ६.विविध रसांचा वापर केलेला दिसुन येतो. ७.विशिष्ट निवेदन पद्धतीचा वापर केलेला दिसून येतो.

**संदर्भ :**

१.मराठी वाड्मयाचा इतिहास - ल.रा.नसिराबादकर. २.प्राचीन मराठी गद्य प्रेरणा आणि परंपरा-श्री.र.कुलकर्णी ३.मराठी बखर - र.वि.हेरवाडकर ४.भारतीय तत्वज्ञान- श्रीनिवास , दिक्षित ५.सभासद बखर - यु.म.पठाण.

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखरींचा आद्य हुंकार : माहिमची उर्फ महिकावतीची बखर

प्रा. राजाराम आ. पाटील
मराठी विभाग, आर्ट्स अॅण्ड कॉमर्स कॉलेज, कासेगाव.

**प्रास्ताविक :**

मराठी बखर वाङमय हा स्वतंत्र वाङमय प्रकार म्हणून ओळखला जातो. ' बखर ' ही केवळ ऐतिहासिक दृष्टीने महत्वपुर्ण नाही तर ती वाङमय दृष्टीनेही महत्वाची आहे. प्राचिन इतिहास लेखनाच्या प्रक्रीयेत वाका हकीकत, कैफियत, आत्मवृत्त, स्त्री-पुरुषांची चरित्रे, अख्यायिका यांचा समावेश केला जातो. इतिहास लेखन शास्त्रात या संदर्भसाधनांना महत्वाचे स्थान आहे. तसेच स्थान किंबहुना या बरोबरचा मान बखरींना दिला जातो.

बखर व्याख्या -

मराठीत बखर हा शब्द बक - बकणे - बोलणे असा रुपांतरित होत आला असावा. ' खबर ' या अरबी - फारसी शब्दाचा विपर्यास होवून आला असल्याचे काही अभ्यासकांना वाटले. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांना ' बखर ' लेखनाची परंपरा फार जुनी परंपरा असावी असे वाटते. बखरी प्राचीन काळी तोंडाने बोलल्या जात असाव्यात. त्यावरुन बक - बोलणे - बकणे - बखर असे वर्ण बदलत गेले असावेत. प्राचीन मराठी गद्य म्हणून बखरींचा उल्लेख केला जातो. आज मराठीत उपलब्ध असणाऱ्या बखरींची संख्या २५० ते ३५० च्या घरात आहे. यातील पहिली किंवा जुनी बखर म्हणून महिकावतीची बखर ओळखली जाते. तीलाच माहिमची बखर असेही संबोधले जाते. ही एकच सलग बखर नसून सहा बखरवजा गद्या पद्य प्रकरणांचा एकत्रित संग्रह आहे. ही सर्व प्रकरणे वेगवेगळ्या वेळी निरनिराळ्या व्यक्तींनी लिहिलेली आहे. महिकावतीच्या बखरीतील प्रकरण पहिले व चौथे ओवी या पद्य प्रकारातील आहे. ही प्रकरणे भगवान नंद दत्तनामे या कोण्या व्यक्तीने लिहिली आहेत. अंतर्गत पुराव्याच्या आधारे पाहिले असता प्रकरण २ - ३ व ५ - ६ ही चार प्रकरणे भगवान दलाल मिळाली. त्यात त्याला जाणवले की, प्रकरण २ - ३ मिळून एक स्वतंत्र हकीकत आहे. प्रकरण ५ - ६ मिळून दुसरी हकीकत स्वतंत्र आहे.

पहिल्या प्रकरणी महिकावतीच्या राज्यातील सर्व कुळांची शके १०६० पासून वंशपध्दतीची माहिती दिली आहे. या दोन स्वतंत्र हकीकती किंवा बखरी भगवान दलाच्या हातात होत्या. त्यातून त्याने एकेक पद्य विभाग जोडला. त्यामुळे एकसलग १, २, ३ प्रकरणे मिळून एक बखर बनते. तर ४, ५, ६ मिळून दुसरे प्रकरण बनताना दिसते. त्यातून बखर सजवणे हा प्रकार घडलेला दिसतो. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मते भगवान दलालांनतर आणखी एक अनामिक संहिताकर असावा. त्याने पहिल्या व दुसऱ्या बखरीत एकच धागा आहे असे मानून या दोन्ही बखरी एका पुढे एक लावून एक नवी बखर बनवली. तीच आज उपलब्ध होणारी महिकावतीची बखर होय.

या बखरीबाबत असे म्हणता येते की, ' प्रकरण २ व त्याला जोडलेले परशिष्ठ म्हणून जोडलेले प्रकरण ३ यातील हकीकत म्हणजे महिकावतीची बखर आहे. प्रकरण २ चा कर्ता केशवाचार्य आहे. त्याने मालाड या त्या वेळचा देसला नायकोराव यांच्या सांगण्यावरुन शके १३७० मध्ये दोन प्रकरणे लिहिली. बखरींची अख्यायिका मोठी मजेदार आहे. केशवाचार्य लिहितो, ' कोकण प्रांतात सर्वत्र भ्रष्टता वाढली होती. महाराष्ट्र धर्म बुडाला होता. तेव्हा कुळस्वामीने - श्री देवीने नायकोवरावास स्वप्नदृष्टांत दिला की, ' केळण्यापासून मुंबई पर्यंत सर्व गावचे सर्व जातीचे, सर्व गोत्राचे एकत्रीकरण

**प्रास्ताविक :**

मराठी बखर वाङमय हा स्वतंत्र वाङमय प्रकार म्हणून ओळखला जातो. ' बखर ' ही केवळ ऐतिहासिक दृष्टीने महत्वपुर्ण नाही तर ती वाङमय दृष्टीनेही महत्वाची आहे. प्राचिन इतिहास लेखनाच्या प्रक्रीयेत वाका हकीकत, कैफियत, आत्मवृत्त, स्त्री-पुरुषांची चरित्रे, अख्यायिका यांचा समावेश केला जातो. इतिहास लेखन शास्त्रात या संदर्भसाधनांना महत्वाचे स्थान आहे. तसेच स्थान किंबहुना या बरोबरचा मान बखरींना दिला जातो.

बखर व्याख्या -

मराठीत बखर हा शब्द बक - बकणे - बोलणे असा रुपांतरित होत आला असावा. ' खबर ' या अरबी - फारसी शब्दाचा विपर्यास होवून आला असल्याचे काही अभ्यासकांना वाटले. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांना ' बखर ' लेखनाची परंपरा फार जुनी परंपरा असावी असे वाटते. बखरी प्राचीन काळी तोंडाने बोलल्या जात असाव्यात. त्यावरुन बक - बोलणे - बकणे - बखर असे वर्ण बदलत गेले असावेत. प्राचीन मराठी गद्य म्हणून बखरींचा उल्लेख केला जातो. आज मराठीत उपलब्ध असणाऱ्या बखरींची संख्या २५० ते ३५० च्या घरात आहे. यातील पहिली किंवा जुनी बखर म्हणून महिकावतीची बखर ओळखली जाते. तीलाच माहिमची बखर असेही संबोधले जाते. ही एकच सलग बखर नसून सहा बखरवजा गद्या पद्य प्रकरणांचा एकत्रित संग्रह आहे. ही सर्व प्रकरणे वेगवेगळ्या वेळी निरनिराळ्या व्यक्तींनी लिहिलेली आहे. महिकावतीच्या बखरीतील प्रकरण पहिले व चौथे ओवी या पद्य प्रकारातील आहे. ही प्रकरणे भगवान नंद दत्तनामे या कोण्या व्यक्तीने लिहिली आहेत. अंतर्गत पुराव्याच्या आधारे पाहिले असता प्रकरण २ - ३ व ५ - ६ ही चार प्रकरणे भगवान दलाल मिळाली. त्यात त्याला जाणवले की, प्रकरण २ - ३ मिळून एक स्वतंत्र हकीकत आहे. प्रकरण ५ - ६ मिळून दुसरी हकीकत स्वतंत्र आहे.

पहिल्या प्रकरणी महिकावतीच्या राज्यातील सर्व कुळांची शके १०६० पासून वंशपध्दतीची माहिती दिली आहे. या दोन स्वतंत्र हकीकती किंवा बखरी भगवान दलाच्या हातात होत्या. त्यातून त्याने एकेक पद्य विभाग जोडला. त्यामुळे एकसलग १, २, ३ प्रकरणे मिळून एक बखर बनते. तर ४, ५, ६ मिळून दुसरे प्रकरण बनताना दिसते. त्यातून बखर सजवणे हा प्रकार घडलेला दिसतो. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मते भगवान दलालांनतर आणखी एक अनामिक संहिताकर असावा. त्याने पहिल्या व दुसऱ्या बखरीत एकच धागा आहे असे मानून या दोन्ही बखरी एका पुढे एक लावून एक नवी बखर बनवली. तीच आज उपलब्ध होणारी महिकावतीची बखर होय.

या बखरीबाबत असे म्हणता येते की, ' प्रकरण २ व त्याला जोडलेले परशिष्ठ म्हणून जोडलेले प्रकरण ३ यातील हकीकत म्हणजे महिकावतीची बखर आहे. प्रकरण २ चा कर्ता केशवाचार्य आहे. त्याने मालाड या त्या वेळचा देसला नायकोराव यांच्या सांगण्यावरुन शके १३७० मध्ये दोन प्रकरणे लिहिली. बखरींची अख्यायिका मोठी मजेदार आहे. केशवाचार्य लिहितो, ' कोकण प्रांतात सर्वत्र भ्रष्टता वाढली होती. महाराष्ट्र धर्म बुडाला होता. तेव्हा कुळस्वामीने - श्री देवीने नायकोवरावास स्वप्नदृष्टांत दिला की, ' केळण्यापासून मुंबई पर्यंत सर्व गावचे सर्व जातीचे, सर्व गोत्राचे एकत्रीकरण महाराष्ट्र धर्म राखावा.' तेव्हा नायकारावाने केशवाचार्यांच्या मदतीने मालाड उर्फ म्हालजापूर येथे जोगेश्वरीचे देऊळ जमलेल्या समुदायापुढे राजाबिंबा पासून वंश पध्दत कथन करुन महाराष्ट्र धर्माचे पालन केले. हा बखरीचा वृत्तांत दिला आहे. या बखरीचा काळ फाल्गुन शके १३७० असा आहे. बखरीतील सहावे प्रकरण शके १४०० मध्ये लिहिले आहे. त्यानंतर

ISBN 978-93-5196-698-2

# बखर : समाजदर्शन घडविणारी कथनिका

प्रा. एम. एस. माळगी
मराठी विभाग, क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा. जि. सांगली

**प्रास्ताविक :**

कोणत्याही भाषेत गद्याची वाढ पद्यानंतरच झालेली दिसून येते. मानवाचे आद्य वाङमय काव्यातच लिहिले गेले आहे. इतकेच काय, पण भाषेचा प्रारंभही मनुष्याच्या काव्यमय मनोवृत्तीत झाल्याचे काही विचारवंत मानतात. मानवी जीवनात जसजशी वास्तवता प्रवेश करु लागली तसतसा गद्याचा प्रादूर्भाव होवू लागला. या गद्यपद्यक्रमाला भौतिक कारणेही आहेत. मुद्रणोत्तर जगामध्ये गद्याची वाढ झपाट्याने झालेली दिसून येते. पण अगदी मामुली. व्यवहारामध्येच काय ते गद्याचे प्राधान्य आणि शिवाय जे गद्य होते काव्यगुणांनी युक्त असेच होते.

मध्ययुगीन काळात गद्यामध्ये आजच्या अर्थाने ज्याला गद्य असे म्हणता येईल असे फार थोडे वाङमय आहे. अगदी प्रारंभीचे गद्य म्हणजे शिलालेख, ताम्रपट. एखाद्या राजाची आज्ञा, एखादा जाहीरनामा, एखादे बक्षिसपत्र यांना आजच्या अर्थाने गद्य म्हणणे कठीण आहे. मध्ययुगीन काळात महानुभावांनी काही प्रमाणात गद्य लेखन केल्याचे दिसते. मात्र ते गद्य सुध्दा पद्याप्रमाणेच तालबध्द अल्पाक्षरमणीय असेच आहे. यनंतरचे महत्वाचे गद्य म्हणजे बखर वाङमय हे होय. ऐतिहासिक घटना कल्पनारम्यतेचा मालमसाला भरुन पुराण पध्दतीने कथन करण्याचा बखरकारांचा प्रयत्न आहे.

बखर वाङमय इतिहासाचे साधन असण्यापेक्षा त्यातून त्या-त्या काळातील सामाजिक चालीरीती, आचार-विचार यावर प्रकाश टाकणारे साधन या दृष्टीने त्याकडे पाहणे हे फार महत्वाचे आहे.

मध्ययुगीन गद्य वाङमय साहित्याची एक स्वतंत्र शाखा त्या दृष्टीने लिहिलेले नाही हे लक्षात ठेवावयास आहे. महानुभावी गद्यात महाराष्ट्रातील एका धार्मिक आंदोलनाचे प्रतिबिंब पडले आहे. तर बखरीमध्ये त्या - त्या काळातील राजकीय इतिहास विशिष्ट पध्दतीने लिहिला गेला आहे. महाराष्ट्रीय समाजाच्या व्यावहारिक जीवनाचे प्रतिबिंब पाहण्याचे साधन या दृष्टीनेच ते महत्वाचे आहे. स्वकालाचे यथार्थ दर्शन घडविण्याचे जे कार्य वामन - मयूरांसारख्या शब्दसृष्टीच्या ईश्वरांनाही जमले नाही ते एखादा रघुनाथ यादव फटकाऱ्यात साधू शकतो हा त्या गद्याचा मोठा विजय म्हटला पाहिजे.

बखर गद्याचा जन्म व्यावहारिक जीवनाचे चित्रण करण्यासाठी आहे. त्याची नैसर्गिक बैठकच जीवनाची गद्यमय वास्तवता प्रतिबिंबित करणे ही आहे. शिवाय मध्ययुगीन बखरगद्य हे काही साहित्याची स्वतंत्र शाखा म्हणून वाढलेले नाही. हे लक्षात घेवून बखरीचे अभ्यास होणे गरजेचे आहे.

बखर या शब्दाचा अर्थच मूळात हकीकत, बातमी, चरित्र असा आहे, अशे कोषवाङमय सांगते. त्यामुळे बखरीकडे ऐतिहासिक दस्तऐवज किंवा अस्सल वाङमय या दृष्टीने पहाणे गैर होईल.

बखरकार हा कोणातरी राजाच्या आश्रयाला असल्यामुळे विशिष्ठ धोरण पुढे ठेवून त्याने बखरी लिहिल्या आहेत. उदा :- '' ......पत्रीआका जाली की, हिंदूस्थानांतील आदिअंती वर्तमान प्याद्याचा फर्जी नजीबखान रोहिला होऊन दक्षिणदेशी हिंदूपद शाहू छत्रपती यांचा प्रधान मुख्य अदिकरुन सवालक्ष फौजेनिशींही भाऊगर्दी होऊन प्यादेमान कैशी जाली हे सविस्तर वर्तमान लिहावयास अज्ञा केली....'' (भाऊसाहेबांची बखर), '' तुम्ही पुरातन, राज्यातील माहितगार लोक आहां तरी इस्तकबिलपासून चरित्र लिहून देणे म्हणोन आज्ञा केली त्याजवरुन वर्तमान ऐसे जे....'' (सभासदाची बखर).

**प्रास्ताविक :**

कोणत्याही भाषेत गद्याची वाढ पद्यानंतरच झालेली दिसून येते. मानवाचे आद्य वाङमय काव्यातच लिहिले गेले आहे. इतकेच काय, पण भाषेचा प्रारंभही मनुष्याच्या काव्यमय मनोवृत्तीत झाल्याचे काही विचारवंत मानतात. मानवी जीवनात जसजशी वास्तवता प्रवेश करु लागली तसतसा गद्याचा प्रादूर्भाव होवू लागला. या गद्यपद्यक्रमाला भौतिक कारणेही आहेत. मुद्रणोत्तर जगामध्ये गद्याची वाढ झपाट्याने झालेली दिसून येते. पण अगदी मामुली. व्यवहारामध्येच काय ते गद्याचे प्राधान्य आणि शिवाय जे गद्य होते काव्यगुणांनी युक्त असेच होते.

मध्ययुगीन काळात गद्यामध्ये आजच्या अर्थाने ज्याला गद्य असे म्हणता येईल असे फार थोडे वाङमय आहे. अगदी प्रारंभीचे गद्य म्हणजे शिलालेख, ताम्रपट. एखाद्या राजाची आज्ञा, एखादा जाहीरनामा, एखादे बक्षिसपत्र यांना आजच्या अर्थाने गद्य म्हणणे कठीण आहे. मध्ययुगीन काळात महानुभावांनी काही प्रमाणात गद्य लेखन केल्याचे दिसते. मात्र ते गद्य सुध्दा पद्याप्रमाणेच तालबध्द अल्पाक्षरमणीय असेच आहे. यनंतरचे महत्वाचे गद्य म्हणजे बखर वाङमय हे होय. ऐतिहासिक घटना कल्पनारम्यतेचा मालमसाला भरुन पुराण पध्दतीने कथन करण्याचा बखरकारांचा प्रयत्न आहे.

बखर वाङमय इतिहासाचे साधन असण्यापेक्षा त्यातून त्या-त्या काळातील सामाजिक चालीरीती, आचार-विचार यावर प्रकाश टाकणारे साधन या दृष्टीने त्याकडे पाहणे हे फार महत्वाचे आहे.

मध्ययुगीन गद्य वाङमय साहित्याची एक स्वतंत्र शाखा त्या दृष्टीने लिहिलेले नाही हे लक्षात ठेवावयास आहे. महानुभावी गद्यात महाराष्ट्रातील एका धार्मिक आंदोलनाचे प्रतिबिंब पडले आहे. तर बखरीमध्ये त्या - त्या काळातील राजकीय इतिहास विशिष्ट पध्दतीने लिहिला गेला आहे. महाराष्ट्रीय समाजाच्या व्यावहारिक जीवनाचे प्रतिबिंब पाहण्याचे साधन या दृष्टीनेच ते महत्वाचे आहे. स्वकालाचे यथार्थ दर्शन घडविण्याचे जे कार्य वामन - मयूरांसारख्या शब्दसृष्टीच्या ईश्वरांनाही जमले नाही ते एखादा रघुनाथ यादव फटकाऱ्यात साधू शकतो हा त्या गद्याचा मोठा विजय म्हटला पाहिजे.

बखर गद्याचा जन्म व्यावहारिक जीवनाचे चित्रण करण्यासाठी आहे. त्याची नैसर्गिक बैठकच जीवनाची गद्यमय वास्तवता प्रतिबिंबित करणे ही आहे. शिवाय मध्ययुगीन बखरगद्य हे काही साहित्याची स्वतंत्र शाखा म्हणून वाढलेले नाही. हे लक्षात घेवून बखरीचे अभ्यास होणे गरजेचे आहे.

बखर या शब्दाचा अर्थच मूळात हकीकत, बातमी, चरित्र असा आहे, अशे कोषवाङमय सांगते. त्यामुळे बखरीकडे ऐतिहासिक दस्तऐवज किंवा अस्सल वाङमय या दृष्टीने पहाणे गैर होईल.

बखरकार हा कोणातरी राजाच्या आश्रयाला असल्यामुळे विशिष्ठ धोरण पुढे ठेवून त्याने बखरी लिहिल्या आहेत. उदा :- '' ......पत्रीआका जाली की, हिंदूस्थानांतील आदिअंती वर्तमान प्याद्याचा फर्जी नजीबखान रोहिला होऊन दक्षिणदेशी हिंदूपद शाहू छत्रपती यांचा प्रधान मुख्य अदिकरुन सवालक्ष फौजेनिशींही भाऊगर्दी होऊन प्यादेमान कैशी जाली हे सविस्तर वर्तमान लिहावयास अज्ञा केली....'' (भाऊसाहेबांची बखर), '' तुम्ही पुरातन, राज्यातील माहितगार लोक आहां तरी इस्तकबिलपासून चरित्र लिहून देणे म्हणोन आज्ञा केली त्याजवरुन वर्तमान ऐसे जे....'' (सभासदाची बखर). राजाच्या अगर यजमानाच्या आज्ञेवरुन बखरी लिहिल्या असल्यामुळे त्यांचे स्वरुप काहीसे पक्षपाती असणे सहाजिक आहे.

बखरकार हा प्रामुख्याने इतिहास लेखकाच्या भुमिकेवरुन लेखन करीत आहे असे भासवत असला तरी ते ऐतिहासिक लेखन होवू शकत नाही हे निश्चित.

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखर : एक वाङ्मयीन प्रकार

प्रा. अंबादास घुले
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, भातकुली, जि. अमरावती

कोणताही वाड्मयप्रवाह अचानक जन्मास येत नाही. तसा तो नाशही पावत नाही. वाड्मयप्रवाहाचे रूप नदीच्या प्रवाहासारखेच असते. प्राचीन मराठी वाड्मयाच्या गद्य विभागात बखर वाड्मय हा एक वैभवशाली उपविभाग मानला जातो. मराठी गद्य वाड्मय इतिहासातील बखर वाड्मयाचे स्थान महत्वपूर्ण असे आहे. बखरीचा अभ्यास केवळ इतिहास म्हणून करण्याऐवजी मराठेशाहीतील गद्य वाड्मयाचा एक नमुना म्हणून केला, तर वाड्मयीन सौंदर्याचे मोठे भांडार आपणांसमोर खुले होते ! शाहीरी कवितेप्रमाणेच इतिहासासोबत तत्कालीन सांस्कृतिक जीवनाचा वारसा जतन करण्याचे श्रेय बखरींचे म्हटले पाहिजे. म्हणून बखर ग्रंथांना मराठेशाहीच्या तेजस्वी पराक्रमाचे नंदादीप म्हटले गेले आहे. मर ाठी गद्याचा जन्मच मुळी बाराव्या शतकातील आहे. त्यामुळे बखरवाड्मयाच्या उगमाची मीमांसा दोन-अडीच हजार वर्ष मागे जाऊन करणे चुकीचे ठरते. महानुभावी ग्रंथकारांच्या गद्य वाड्मयाच्या परंपरेतील लीळाचरित्र, स्मृतिस्थळ यातील आख्यायिकांच्यापूर्वी मौखिक परंपरेने पिढ्यान्‌पिढ्या कथाकथन चालत असते पाहिजे. लोक जीवनात अशा कथांचे अतिशय महत्व असते. या कथांना मौखिक पंरपरेतून लिखित स्वरूपात महानुभाव वाड्मयाने आणले. लीळाचरित्रात राजा कन्हरदेव याने लोणार तीर्थावर श्रीचक्रधरस्वामींचे दर्शन घेतल्याची आख्यायिका स्वतंत्र कथेचे रूप घेऊन येते. स्मृतिस्थळातील स्मृती १४५ ते १५० पर्यंतच्या स्मृतीमधून रामदेवराव राजाची पत्नी कामाइसा हिच्या सती जाण्याची कथा येते. तिचे रूप करूण्यरम्य असे आहे. ही कामाइसाची कथा आणि शाहू महाराजांच्या बखरीतील सकवारबाईच्या सती जाण्याची कथा एकसारख्या आहेत. यातील साधर्म्य पाहिले म्हणजे काळाचे अंतर संपते. 'महिकावतीची बखर' हा बखरवाड्मयाच्या विकासाचा पहिला आणि महत्वाचा टप्पा होय. या बखरीने सांगोवांगीच्या तोंडी आख्यायिकांना कागदपत्रांचे आधारे 'बखैरी' चे रूप दिले आहे. बखर वाड्मयाच्या प्रवाहाचे मूलस्त्रोत या बखरीत ठसठशीतपणे दिसतो.

बखर : शब्दाचा अर्थ आणि व्युत्पत्ती

'बखर' शब्दाचा अर्थ आणि व्युत्पत्ती यासंबंधी आजवर अनेक विद्वानांनी आपापली मते मांडलेली आहेत. खबर (वार्ता, समाचार, वृत्त) या मूळ अरबी शब्दाचा वर्णविपर्यास होऊन बखर शब्द मराठीत आला. असे मानले जाते. राजवाडे बखर वाड्मयाविषयी ऐतिहासिक प्रस्तावनेत बखर शब्दाचा अर्थ आणि बखरीच्या उगमाविषयी चर्चा करतांना बक = बकणे म्हणजे बोलणे या धातूपासून बखर शब्दाची निर्मिती झाली असावी. तर बखरीचा उगम संस्कृतात दाखविण्याचा अट्टाहास धरतात. परंतु राजवाडे यांचा हा अट्टाहास मान्य करण्यासारखा नाही. कारण ज्या फार्सी भाषेच्या संपर्काने मराठ्यांनी इतिहास लेखनाची पध्दती स्वीकारली असे मानले गेले, त्या फार्सी भाषेतही 'बखर' हा शब्द नाही, आणि 'खबर' हा एकमेव शब्दच वर्णविपर्यायाने मराठीने स्वीकारला असे गृहीत धरणेही परण्यासारखे नाही. महिकावतीची बखर ते पेशव्यांची बखर या प्रदीर्घ काळात 'खबर'आणि 'बखर' हे दोनही शब्द स्वतंत्रपणे येतात. याचाच अर्थ असा की, 'खबर' आणि 'बखर' या शब्दांचे अर्थ लेखनस्वरूप वेगवेगळे आहेत. तेव्हा खबर ह्या शब्दा विषयी वर्णविपर्यायाचा सिध्दांत स्वीकारता येत नाही. इ. स. १६७४ साली छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक झाला. त्यानंतर त्यांनी राज्यकारभाराच्या सोयीसाठी 'राज्यव्यवहाराकोश' तयार करून घेतला. त्यात 'खबर' आणि 'बखेर' हे दोन्हीही शब्द व लेखनप्रकार वेगवेगळे असल्याची खालील

वार्ता खबरनामिका (राव्यको- लेखनवर्ग - ८,२९५)

आख्यायिका तु बखैर (राव्यको-लेखनवर्ग-८,३१०) अशी नोंद आहे. या संदर्भाच्या आधारे विचार केला तर ' खबर' आणि 'बखेर' शब्दाचे अर्थ वेगवेगळी आहे तेव्हां खबरचे बखेर अथवा - 'बखर' असे शब्दरूप तयार झाले असे

म्हणता येत नाही. कारण वर पाहिल्याप्रमाणे खबर म्हणजे (वार्ता, समाचार, वृत्त) होय. आणि 'बखैर' म्हणजे आख्यायिका ती गतेतिहास निवेदन करते. ती बाह्यात्कारी पत्ररूप धारण करते. परंतु तिचा आत्मा घडलेल्या वर्तमानाची 'कथा' सांगण्यात असतो. बखर लेखकानेही निवेदनासाठी कथात्मक रूपाचा घाट (ऋी) स्वीकालेला असतो. शिवकाळातच या दोन शब्दांचे भेद निश्चित झाल्यामुळे पुढे अभ्यासकांचे शोधकाठीण्य सोपे झाले. तात्पर्य बखर शब्दांचे मूळ रूप आणि अर्थ पाहाता 'बखैर' हाच शब्द प्रस्थापित होतो. कारण बखैर बखेर बखर अशी ही रूपे मूळ हस्तलिखितांच्या नकलप्रती होताना झालेली आहेत. म्हणून बखैर म्हणजे आख्यायिका ! म्हणजे इतिहासकथा याच अर्थाने 'बखर' शब्द मराठीत रूढ झाला आणि पुढे एका वाड्मयाप्रकाराचा द्योतक बनून पुढे आला असे मानावे लागते.

**बखर एक वाड्मयप्रकार :-**

विषय आणि लेखनाची पध्दती यामुळे बखरीस एक स्वतंत्र वाड्मयप्रकाराचे मूल्य प्राप्त झाले आहे. बखरकार हा एक कलावत आहे. त्याला केवल बखर लिहावयाची नाही, तर ती 'सजवायची आहे. सजविणे या शब्दप्रयोगातून त्याची सौदर्यदृष्टीही स्पष्ट होते. 'बखरकार जसा कलावंत आहे तसाच तो कथनकार सुध्दा आहे. प्रत्यक्ष पाहिलेल्या आणि ऐकलेल्या प्रसंगाच्या, व्यक्तींच्या वर्णनाशी तो एकरूप होतो, त्यात आपल्या कल्पनांचे रंग भरतो. हे रंग इतके गहिरे असतात की, तो प्रसंग आणि ती व्यक्ती आपल्यापुढे साक्षात उभी राहते. बखरकाराच्या निवेदनाला रंग, रूप, आणि आकार प्राप्त होऊन त्यातून सुंदर वाड्मयीन मूर्ती निर्माण होते. खरे तर कथानिवेदन हा बखरवाड्मयाचा महत्वाचा विशेष आहे. त्यासाठी कथावस्तुची आकर्षक पध्दतीने केलेली रचना (मांडणी) हे या कथानिवेदना मागील सूत्र आहे. बखरकार इतिहासातील घटनांची नुसती गोळाबेरीज करीत नाही. तो त्यांची संगती लावतो. संगती लावताना कथावस्तुची रचना करतो. व्यक्तींचा आणि घटना-प्रसंगाचा रूपबंध घेतो. त्यांचा कार्यकारण भावाने संबंध जोडतो. आपली कथा श्रोत्यांनी अवधान देऊन ऐकावी, वाचकांनी पुढे-पुढे वाचत जावे यासाठी उल्कंढा आणि विस्मय सतत जागते ठेवावे लागते. बखरकारांनी हे काम कौशल्याने केलेले आहे. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून :- बखरीचा आशय मराठ्यांचा इतिहास तर अभिव्यक्ती वाड्मयीन आहे.

महिकावतीच्या बखरीचे वाड्वयीन रूप प्रत्ययकाही आहे. व्यक्तीदर्शन, युध्दप्रसंगवर्णन, कथाप्रवाहाची धारावाहिक निवेदनशैली, सूत्रबध्द तशीच प्रौढ भााषाशैली आणि वीररसाचा उत्कट अविष्कार या वाड्मयीन वैशिष्टयांनी ही बखर नटलेली अ ाहे.

**१) संवादलेखन :**

बखरीच्या निवेदन शैलीत संवादलेखन महत्वाचे आहे. हा घटन बखरींना कलात्मक पातळीवर घेऊन जातो. बखरीतील संवादलेखनामुळे कथानिवेदन एक सुरी अथवा चाकारीबध्द होत नाही. व्यक्ती आणि घटना-प्रसंग जिवंत होतात. व्यक्तीचे स्वभावविशेष आणि भावभावना प्रकट होतात. इतिहासातील प्रसंग एखाद्या चलचित्रपटासारखा वाचकाच्या डोळ्यासमोरून सरकू लागतो. आणि कथानककाराच्या निवेदनात गतीमानता, नाट्यात्मकताही निर्माण होते. प्राचीन मराठी वाड्मयात नाट्यलेखन अभावानेच झाले. हे मान्य केले तरी बखरींनी नाट्यरसिकांची भूक बखरीतील संवादलेखनाने काही अंशी तरी भागविली हे नाकरता येत नाही. बखरीतील नाट्यमयता, स्वभावपरिपोष, वातावरणनिर्मिती, संग्राम आणि संघर्ष या गुणांनी संवादलेखनामुळे झळाळी येते म्हणून नाट्यलेखनाचे सर्व गुणधर्म बखरीतील संवादलेखनात सामावलेले आहेत. हे मान्य करावे लागते.

**२) विलोम पध्दतीचा वापर :**

बखरकार विलोम पध्दतीचा वापर करतात, म्हणून त्यांच्यावर काल विपर्यासाचा आरोप होतो. यात कालानुक्रमाने निवेदन येत नाही. बखरकार घटना मागे-पुढे करतात. परंतु कथारचने मागील विलोमपध्दतीचे स्थान लक्षात घेता.

कथानकातील उत्कटता वाढविण्यासाठी हा खटाटोप ते करतात. यादृष्टीने भाऊसाहेबाची बखर, शाहू महाराजांची बखर, होळकरांची कैफियत, इत्यादी बखरी महत्वपूर्ण आहेत.

**वर्णनशैली :**

बखरीच्या वर्णनशैली या घटकात व्यक्तीवर्णन, स्थलवर्णन, युध्दवर्णन, रसविष्कार इत्यादी उपघटक येतात. व्यक्तीवर्णनात बखरीने आपली एक स्वतंत्र वर्णनशैली निर्माण केली आहे. यात परंपरा साहचर्य, अल्पाक्षर रमणीयता, तर स्थलवर्णनात परंपरा साहचर्य, चेतनगुणोक्ती, अल्पाक्षर रमणीयता, युध्दवर्णनात परंपरा साहचर्य, निसर्ग प्रतिमाने, गतीमानता, आदी घटकांचा परिपोष होतो. रसाविष्कारात बखरीने वीररसाचा परमोत्कर्ष साधला आहे. वीर रसाबरोबरच बखरकारांनी करूण, अद्‌भूत, वीभत्स, रौद्र , वत्सल, या रसांचाही कमी अधिक प्रमाणात आविष्कार केला आहे.

**भाषाशैली :**

बखरवाङ्‌मयाच्या भाषाशैलीचे आशय आणि अभिव्यक्ती या दृष्टीने काही गुणधर्म आहेत ते गुणधर्म बखर वाङ्‌मय की इतिहास या दृष्टीने पाहता येतात. इतिहासाची भाषा आणि बखरीची भाषा यात मूलत:च भेद आहे. इतिहासाची भाषा बुध्दिनिष्ठ असते. तर वाङ्‌मयाची भाषा भावगर्भ असते. म्हणूनच ती वेगळ्या अनुभवविश्वाची निर्मिती करणारी असते. त्यामुळे तिचे स्वरूप ज्ञानत्मक जड भाषेचे नसून ललित वाङ्‌मयाच्या भाषेचे असते. यादृष्टिने येथे विचार केला तर बखरीची भाषा ही वाङ्‌मयाची भाषा आहे. ती तार्किक विचारांची नव्हे तर मानवी भावभावनांची भाषा आहे. बखर वाङ्‌मयात गद्यशैलीचा विकास झाला. बखर वाङ्‌मयाचा उगत कथाकथानाच्या प्रेरणेतून झाला असल्यामुळे प्रारंभीच्या अवस्थेत बखरी लोककथांची भाषाशैली वापरली जाणे स्वाभाविक होते. या गुणसंपन्नतेमुळे कधी ती नागर नटवे रूप धारण करते, कधी ती अनलंकृत असते. कधी संस्कृत साहित्यातील अलंकाराचा साजशृगांर लेवून येते. परंतु ती आपला मूळ पिंड सोडत नाही की मूळ घाटही टाकून देत नाही. तीत् लयबध्दता आहे. नादमाधुर्य आहे. सुगमता आणि सुबोधता, म्हणी आणि वाक्‌संप्रदायाचाही वापर करते. बखर वाङ्‌मयाची भाषा ही साधी, गद्य, निरस, नुसतीच निर्जिव वर्णन करणारी ललितेतर साहित्याची भाषा नाही. तर जिवंत रसरशीत आणि मनोहर अशा वाङ्‌मयमूर्तीचे दर्शन देणारी ललित वाङ्‌मयांची भाषा आहे, रेखीव रचना, कल्पनाचातुर्य, निवेदन कौशल्य, व्यक्तिदर्शन, वर्णनशैली,रसपरिपोष, आणि भाषाशैली या वाङ्‌मयी गुणवैशिष्ट्यांकडे लक्ष ठेवून बखरकारांने लेखन केल्यामुळे हे वाङ्‌मयीन वृत्तकथन आकर्षक आणि मंनोरजक झाले आहे. बखरकाराचा बखरीच्या संदर्भातील खरा दृष्टीकोन ऐतिहासिकतर होताच परंतु एक सशक्त वाङ्‌मयप्रकार निर्माण करण्याचाही होता हे नाकारता येत नाही.

**निष्कर्ष :**

१) बखर वाङ्‌मयामुळे मराठी गद्याची जमीन सकस झाली.
२) बखरीत लोकभाषा, फार्सी आणि संस्कृत यांचा त्रिवेणी संगम झाला.
३) लोककथा बखर वाङ्‌मयाची प्रेरणा.
४) वाङ्‌मयाच्या दृष्टीने बखरीतील कथानिवेदनास अंत्यत महत्व आहे.
५) बखरकाराने सामान्य माणसाचे भावविश्व त्याच्याच भाषेत बखरीतून उभे केले.

**संदर्भ ग्रंथ :**

१) प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास – ल. रा. नसिराबादकर
२) बखर आणि शाहिरी वाङ्‌मय – बापूजी संकपाळ, डॉ. गंगाधर मोरजे
३) मराठी बखर गद्य – गं. ब. ग्रामोपाध्ये

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखरींची भाषाशैली

प्रा. अशोक गौरीशंकर माळगे
सी.बी.खेडगीज कॉलेज, अक्कलकोट, जि. सोलापूर

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यातील बखर हा एक महत्वाचा वाड्:मयीन प्रवाह आहे. बखरींचा आविष्कार गद्यात्मक आहे. आशय राजकीय इतिहासाचा आहे. अभिव्यक्ती मात्र वाड्:मयीन परंपरेशी नाते जोडून आहे. तरीही, या वाड्:मयप्रवाहाने आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने एक वेगळा स्वतंत्र वाड्:मयप्रवाह म्हणून मान्यता पावला आहे. मराठी माणसासारखेच याचे रुप आहे. ते सरळ, साधे, रांगडे आहे. म्हणूनच हा वाड्:मय प्रवाह अस्सल मऱ्हाठमोळा आहे. त्यात इतिहासकथा निवेदनास प्राधान्य आहे. त्याची स्वनिर्मित अशी रचनावैशिष्ट्ये आहेत. इतिहासाबरोबरच मानवी जीवनाचे दर्शन त्यातून घडते. फार्सी भाषेमुळे त्यास राजदरबारी डौल लाभलेला आहे.

**'बखर' : शब्दाचा अर्थ आणि व्युत्पत्ती :**

'बखर' शब्दाचा अर्थ आणि व्युत्पर्ती यासंबंधी आजवर अनेक विद्वानांनी आपली मते मांडलेली आहेत. 'बखर' म्हणजे देशी भाषेत, गद्यात लिहिलेला इतिहास, कथानक, चरित्र, बातमी, हकीकत किंवा अर्ज असे अर्थ 'आदर्श मराठी शब्दकोशा' चे कर्तेडॉ. प्र. न. जोशी देतात. तर 'मराठी व्युत्पतिकोश' कर्तेकृ. पां. कुलकर्णी त्याचे मुळ अरबी भाषेत आहे. असे सांगतात. त्यांच्या मते मूळ अरबी शब्दाचा (खबर'चा) वर्णव्यत्यास होऊन, खबर बखर हे रुप बनले असावे. इतिहासाचार्य राजवाडे यांनी बक् = बोलणे, बकणे' या संस्कृत धातूपासून तो मराठीत आला असावा, असे सूचित केले आहे. हा संस्कृत अर्थ आणि 'खबर' या पारशी शब्दाचा 'छशुी' बातमी हा अर्थ एकमेकांना जवळचा वाटतो. त्यामुळेच भष्-भख्, बक् या क्रमाने बक या अस्पष्ट धातूपासून बखर हा शब्द आला असावा असे अनुमान, प्रा. स. रा. गाडगीळ व प्रा. कुरुंदकर यानी सभासद बखर याच्या प्रस्तावनेत काढले आहे.

महिकावतीची बखर ते पेशव्यांची बखर या प्रदीर्घ कालात 'खबर' आणि 'बखर' हे दोन्हीही शब्द स्वतंत्रपणे येतात. याचाच अर्थ असा की 'खबर'आणि 'बखर' ह्या शब्दांचे अर्थ लेखन स्वरुप वेगवेगळे आहेत. शिवाय 'बखेर' ''बखैर'' अशी शब्दरुपेही अनेक ठिकाणी आढळतात. तेव्हा कृ. पां. कुलकर्णी यांचा वर्णविपर्यायाचा सिद्धांत स्वीकारता येत नाही.

इ. स. १६७४ साली छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केला. एक नवे राज्य उदयास जगजाहीर केले. स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा यांचा पुरस्कार केला. राज्यकारभाराच्या सोयीसाठी 'राज्य व्यवहारकोश' तयार करुन घेतला. त्यात 'खबर' आणि 'बखैर' हे दोन्हीही शब्द व लेखन प्रकार वेगवेगळे आहे याची स्पष्ट नोंद केली आहे. ती नोंद अशी –

वार्ता खबरनामिका (राज्यको –लेखनवर्ग – ८. २९५)

आख्यायिका तु बखैर ( राज्यको – लेखनवर्ग – ८.३.१०)

या संदर्भांच्या आधाराने विचार केला तर, 'खबर' आणि 'बखैर' शब्दांचे अर्थ वेगळे आहेत. हे तुमच्या ध्यानी आले असेल. तेव्हा यापुढे आपणास 'खबर' चे 'बखैर' किंवा 'बखर' असे शब्दरुप तयार झाले असे म्हणता येणार नाही.

खबर म्हणजे वार्ता, बातमी, न्यूज होय. 'बखैर' म्हणजे आख्यायिका होय. ती गतेतिहास निवेदन करते. ती बाह्यात्कारी पत्ररुप धारण करते. परंतु तिचा आत्मा घडलेल्या वर्तमानाची 'कथा' सांगण्याचा असतो. बखर लेखकानेही निवेदनासाठी कथात्मक रुपाचा घाट स्वीकारलेला असतो. शिवकालातच ह्या शब्दांचे भेदनिश्चित झालेले होते. तात्पर्य, बखर शब्दाचे मुळ रुप आणि अर्थ पाहता 'बखैर' हाच शब्द प्रस्थापित होतो. बखैर बखेर बखर ही रुपे मूळ हस्तालिखितांच्या नकलप्रती होताना झालेली आहेत.

बखैर म्हणजे आख्यायिका ! आख्यायिका म्हणजे इतिहासकथा याच अर्थाने 'बखर' शब्द मराठीत रुढ झाला. पुढे एका वाड्:मयप्रकाराचा द्योतक बनून दृढ झाला.

**बखरींची भाषाशैली :**

बखर वाङ्:मयाच्या भाषाशैलीचे आशय आणि अभिव्यक्ती या दृष्टीने काही गुणधर्म आहेत.

बखरींची भाषा ही केवळ गद्यलेखनाची भाषा नाही. गद्या-पद्य हा अभिव्यक्तीच्या माध्यमाचा भेद झाला. तो बाह्यांगाशी निगडीत आहे. बखरींची भाषा ही वाङ्:मयाची भाषा आहे. ती तार्किक विचारांची भाषा नाही, तर मानवी भावभावनांची भाषा आहे. इतिहासाची भाषा आणि बखरींची भाषा यांत मूलत:च भेद आहे. वाङ्:मयाची भाषा ही वेगळ्या अनुभविश्वाची निर्मिती करणारी भाषा आहे. इतिहासाची भाषा बुद्धिनिष्ठ असते. तर वाङ्:मयाची भाषा भावगर्भ असते. म्हणूनच तिचे स्वरुप ज्ञानात्मक जड भाषेचे नसून ललितवाङ्:मयाच्या भाषेचे आहे. त्या दृष्टीने येथे विचार करणे योग्य ठरेल.

**(अ) गद्यशैलीचा विकास :**

बखरवाङ्:मयाचा उगम कथाकथनाच्या प्रेरणेमधून झाला आहे. त्यामुळे प्रारंभिक अवस्थेत लोककथांची भाषाशैली वापरली जाणे स्वाभाविक होते. ती लोकजीवनातील बोलभाषेच्या जवळची आहे. 'महिकावतीची बखर' आणि 'राक्षसतागडीची बखर' यांत ग्रांथिक बोलभाषेबराबर फार्सी भाषाही सहजपणे मिसळून गेली आहे. शिवकालात राजदरबारची भाषा फार्सीच होती. जनसामन्यांचा राजदरबाराशी संबंध आल्याने त्यांच्या भाषेत राजदरबारी थाट आला. स्वत: बखरकार तर राजदरबारी वावरणारेच होते. त्यामुळे राजदरबारातील फार्सी भाषा व लोकजीवनातील भाषा या परस्पर जवळ आल्या. 'सभासद बखरी' त आणि '९१ कलमी बखरी' त याचे प्रत्यंतर येते. गद्यलेखनाची मराठी भाषाशैली या काळात अधिक प्रौढ आणि प्रगल्भ झाली. शिवचरित्रकथेच्या माध्यमातून ती खळाळून वाहू लागली.

पुढे राज्यव्यवहारकोशाने दिलेले संस्कृत भाषेचे नवे परिमाण तिने स्वीकारले. त्यामुळेच शिवकालीन भाषाशैलीत लोकजीवनातील मऱ्हाठमोळी भाषा, राजदरबारीची फार्सी भाषा आणि सांस्कृतिक वारशाची संस्कृत भाषा यांचा त्रिवेणी संगम झालेला पाहावयास मिळतो. पेशवेकालात या भाषाशैलीचा परमोत्कर्ष झाला आहे. शिवकलात संस्कृत भाषेला राजमान्यता मिळाली. पेशवेकालात तिला राजाश्रय लाभला. त्यामुळे ती पांडित्यप्रधान रुप घेऊन मराठीत मिसळली. राज्यव्यवहाराची भाषा फार्सीच राहिली. बखरकारांच्या व्यासंग, बहुश्रुतता, पांडित्य, व्युत्पन्नता, काव्यात्मदृष्टी आणि बहुभाषिकत्व यांमुळे बखर वाङ्:मयाला गुणंसपन्नता लाभली. बखर वाङ्:मयाची भाषाशैली कधी नागरनटवे रुप धारण करते. कधी ती अनलंकृत असते. कधी संस्कृत साहित्यातील अलंकारांचा साजशृंगार लेऊन येते. तथापि, तिने आपला मूळ पिंड सोडला नाही की मूळ घाट टाकून दिला नाही.

**आ) लयबद्धता व नादमाधुर्य :** खालील वाक्यातून विशिष्ट आशयाची अभिव्यक्ती कशी झाली आहे ते पाहता येईल.

१) 'थोकत थोकत मिरवत महाराज निधि चालिला' २)'हत्ती पलखदंती काळे काजळासारखे उत्तम उन्मत्त पंचरंगी रंगविले'

वरील वाक्यांतून प्रसादात्मकता, लायबद्धता व नादमाधुर्य हे गुणधर्म प्रकट होतात. भाषाशैली नागर रुप घेऊन येते. पहिल्या वाक्यासारखे पंडित कवी मोरोपंत यांचे एक वर्णन आहे. 'वाजत गाजत सतत आज तया जतन करुनि आणा हो !' दोन्हीत आपणांस साधर्म्य आढळेल. आणखी काही अभिव्यक्तीची उदाहरणे पुढील प्रमाणे देता येतील.

१)घरी जप्ती पाठविली. लुटली - जाळली. २) जहाँबाजीचे हुन्नरे गेले राज्य साधावे. ३) चाले चाले झांशीच आले.

४) हरिपंततात्यास मसलत तोलेना ! ५) भारती कथेवर त्यांची अती प्रीती होती.

प्रासादात्मक, लायबद्ध व नादमधुर शब्दांनी भाषाशैली नटली आहे. एखादे काव्य वाचल्याचा आपल्याला अनुभव येतो. बखरवाङ्:मयाच्या बांधाबांधावर असे काव्याचे ताटवे फुललेले आहेत.

**इ) सुगमता आणि सुबोधता :** एखादी अवघड गोष्टी सोपी करुन सांगायची असेल तर आपण दृष्टान्त देतो. तुलना करुन सांगतो. बखरकारांनी असे अनेक दृष्टान्त देऊन आपले निवेदन-कौशल्य प्रकट केले आहे.

**ई) अभिजात संस्कृत- साहित्याचा प्रवाह :** बखर वाङ्:मयाच्या प्रवाहामधून अभिजात संस्कृत-साहित्याचा उपप्रवाह कसा वाहतो आहे ते कळून येईल. जिजाबाई 'कदलीस्तंभातुल्य' भूमीते अचेतना पडली.धरादेवी शोणितकुंकुमे विराजली. शिवाजी महाराज 'गजशावकतुल्य' डुलो लागले. भाऊसाहेब 'कल्पांतीचा आदित्य' भासले. अभिजात संस्कृत-साहित्यातील उपमानांच्या सृष्टीमधून गगन, सूर्य, चंद्र, तारे, कौस्तुभमणी, मेरुपर्वत, मेघ, विद्युल्लता, सागर, अग्नि, अमृत अशी अनेक उपमाने बखरकारांनी उपोजिली आहेत. त्यामुळे त्यांच्या भाषाशैलीला ललित्य लाभले.

**उ) लोकवाङ्मय :** दृष्टान्तामुळे आशयाचे आकलन सुलभ झाले. परंतु ही संस्कृतनिष्ठ परंपराच केवळ बखरींनी अंगीकारली असे नाही. त्याकाळी मोठ्या प्रमाणात असणारा शेतकरीवर्ग मराठ्यांच्या इतिहासात आपली कामगिरी

ISBN 978-93-5196-698-2

बजावित होता. एका हातात नांगर तर दुसऱ्या हातात तलवार घेऊन तो मराठी दौलतीसाठी झटत होता. बखरकारांनी त्यांचेही भावविध त्यांच्याच भाषेत उभे केले आहे.

उदा. १) जसा कुणबी विळ्याने शाळवाचे पीक कापतो तसे २) पायदळ कडब्यासारखे कापले. ३) जसे शेतास माळा तसे किल्ले मुलखास माळा !

बखरकारांच्या भाषाशैलीत असे अनेक दृष्टान्त किंवा दाखले आले आहेत. काही दृष्टान्त तर शतकानुशतके चालत आले आहेत. बोलभाषेचा हा अंत :प्रवाह बखर वाङ्मयात सहजतेने सामावून गेला आहे. त्यास सनातन जीवनमूल्ये व नीतिमूल्ये आहेत. बखर वाङ्मयाने या मूल्यांचेही जतन केले आहे. हे फार महत्वाचे आहे.

बखरकारांनी उपयोजिलेल्या प्रतिमानांमधून, दृष्टान्तामधून बखर वाङ्मयाच्या भाषाशैलीचा विकास दिसून येतो. शिवकालीन बखरीतील प्रतिमानांत अधिक सविभाविकता आहे. सहजस्फूर्तता आहे. तर पेशवेकालीन बखरीतील प्रतिमानांत अभिजातता, कलात्मकता, काव्यात्मता व लोकजीवनाची अनुभवसंपन्नता आहे. वाङ्मयात मानवी जीवनास महत्व आहे. जीवनातील अनुभव हे सार्वकालिक व सार्वजनिक असले तर त्या वाङ्मयास श्रेष्ठत्व प्राप्त होते.

**ऊ) म्हणींचा उपयोग :** बखरीत वापरलेल्या म्हणीतून विचारसौंदर्य व भावसौंदर्य यांचे दर्शन घडते. संस्कृत सुभाषिते, हिंदी दोहे, सुविचार याबरोबरच लोकजीवनातील, बोलभाषेत असणाऱ्या म्हणींनाही बखरीत आणल्याने भाषाशैलीस अनुभवसंपन्नतेचे अधिष्ठान प्राप्त झाले आहे.

उदा.१) मेला तरी औषधावाचून खरुज गेली. २)धड धन्याचे ना चोराचे. ३) आम्हांस धनी ना गोसावी. ४)जात्यातील रडती, सुपातील हसती. ५) कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळा.

म्हणी म्हणजे जीवनानुभव सांगणारे सुविचार असतात. त्यांच्या विविध प्रसंगातील उपयोगाने बखर वाङ्मयाची अनुभवसंपन्नता वाढली आहे.

**ए) वाक्संप्रदाय :** म्हणींच्या प्रमाणेच अनेक वाक्संप्रदायांचाही भाषाशैलीच्या वैभवाची कल्पना येईल.

उदा. छातीचा कोट करणे, प्यादेमात होणे, रणास आणणे, चिंधीचोळा करणे, पानिपत होणे, ससेहोलपट होणे, पगडीभाई होणे, सानकरोटी देणे, संकल्प सोडणे असे कितीतरी वाक्संप्रदाय इतिहासाशी, त्यातील घटनांशी निगडीत आहेत. बखरीतील आशयाशी एकजीव झालेल आहेत. त्यांतून तत्कालीन चालीरीती, लोकव्यवहार, धार्मिक समजूती व्यक्त झालेल्या आहेत. मराठीप्रमाणेच संस्कृत, हिंदी, फार्सी या भाषांमधील अनेक वाक्संप्रदाय बखरींत आढळतात. त्यामुळे बखकारांच्या बहुश्रुततेचे व भाषावैभवाचे दर्शन होते.

**ऐ) मराठी भाषेची प्रादेशिक विशेषता :** संस्कृत, फार्सी, हिंदी या भाषांबरोबरच मराठी भाषेची प्रादेशिक वैशिष्ट्येही बखरीत आलेली आहेत. सनपुरीच्या बखरीत मराठवाड्यातील भाषेची लकब अशी 'मी त्याची खातरजमा करील' तर नागपूरकर भोसले यांच्या बखरीत वऱ्हाडी भाषा आली आहे. जसे – 'येथे तो फंद मचून आहे.' अशा वाक्याप्रमाणेच कुन्हा, दिरींग, खासर, साळी असे वऱ्हाडी भाषेतील शब्दही हजेरी लावतात.

उत्तर पेशवाईत आणि मराठी राज्याच्या अस्तमानकाली संस्कृत, फार्सी भाषांच्या आवर्तातून बाहेर पडण्याचा प्रयत्न झाला. शिवकालीन इतिहासापासून दूरस्थ टप्प्यावर उभे राहून बखरकार लिहितात तेव्हा नजराणा म्हणजे दक्षिणा, बरगे म्हणजे मराठी, कुणबी, पेशगी म्हणजे खंडणी, फिरंग म्हणजे तलवार असे पर्यायी शब्द देण्यात येऊ लागले. तर इंग्रजांच्या आगमनानंतर कप्तान, रसिद, कंपू, पलटण, कुमेदान, बुक, रजबण, डाक्तर, आपसर, सोजीर, संत्री असे इंग्रजी शब्द आलेले आढळतात. वरील विवेचानातून मराठी बखर वाङ्मयातील भाषाशैलीचे स्वरुप दिसून येतात.

**संदर्भ :**

१)डॉ. प्र. न. जोशी – 'आदर्श मराठी शब्दकोश' विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे, प्रथम आवृत्ती – १९९७०.
२)कृ. पां. कुलकर्णी – मराठी उत्पत्ती कोश –
३) प्रा. रा. ना. घाटोळे – 'मराठी वाङ्मयाचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर. तृतीय आवृत्ती – १९९५.
४) रघुनाथ विनायक हेरवाडकर – पेशव्यांची बखर, साहित्य सेवा प्रकाशन, सातारा.
५) संपा. प्रा. शिवाजी रा. चव्हाण – पेशव्यांची बखर, साहित्य सेवा, प्रकाशन, सातारा.
६)ला. रा. नसिराबादकर, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास फडके प्रकाशन, कोल्हापूर, नववी आवृत्ती –२००६.

ISBN 978-93-5196-698-2

# बखर साहित्याची गुणवैशिष्ट्ये

**प्रा. मांतेश म. हिरेमठ**
मराठी विभाग, दे. आनंदराव बळवंतराव नाईक कॉलेज, चिखली, ता. शिराळा.

प्राचीन मराठी गद्य वाङ्मयाच्या इतिहासात एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून बखर वाङ्मयाचा आवर्जुन उल्लेख केला जातो. वेगळा विषय आणि वेगळी लेखनपद्धती यामुळे हा प्रकार पडला. बखरकाराजवळ सौंदर्यदृष्टी असावी लागते. बखरकार घटना, व्यक्ती, स्थळ अशा वेचक, निवडक घटकांशी पूर्ण तादात्म्य पावतो, समरस होतो आणि मगच एखादी वाङ्मयीन कलाकृती वाचकांच्या समोर उभी करतो. बखरकाराजवळ असलेल्या कल्पनेच्या गहिऱ्या रंगामुळेच एकेक प्रसंग, व्यक्तिरेखा उठावदार व जिवंत होते. क्षुद्र-निर्जीव बाबींना त्यामुळे जणू अंखुर फुटतात आणि भावनांचे विविध पडसाद, कल्लोळ वाचकांच्या अंतःकरणात उमटतात. वीर आणि करुण रसाचा साक्षात्कार घडविणाऱ्या या बखरी म्हणजे गद्य सारस्वताचा? व्यक्तिमत्त्वाचा परिचयही वाचकास सहजपणे होत असतो. बखरकाराची बहुश्रूतता, राजकारणातील त्याचा अनुभव, अध्ययन, सूक्ष्म निरीक्षणशक्ती, निवेदन कौशल्य इ. गुणांचा परिचय बखरीचे वाचन करीत असताना होऊ शकतो. 'भावनापूर्णता' हे बखरीचे आणखीन एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून ओळखले जाते. सुभाषिते, म्हणी, वाक्प्रचार यांचा वापर मोठ्या कलात्मकतेने बखरकार करत असतो.

**बखरींवर पुराणकथांचा असलेला प्रभाव :**

इतिहास आणि पौराणिक कथांशी बखरकार इतके समरस झालेले दिसतात की, त्यांच्या भाषाशैलीवर आणि दृष्टांत देण्याच्या पद्धतीवर असलेला पुराणकथांचा प्रभाव सहजपणे जाणवतो. ऐतिहासिक व्यक्तींच्या ठिकाणी त्यांना पुराणपुरुषांचे दर्शन घडते. शाहिस्तेखान आणि अफझलखान यांचे वर्णन करताना बखरकारांच्या नजरेसमोर रामायणातील रावण आणि महाभारतातील दुर्योधन उभे राहतात. सभासदांच्या बखरीतील पुढील उदाहणावरून हे स्पष्ट होते.

''अफझलखान सामान्य नव्हे केवळ दुर्योधनच जातीने होता. अंगाचा बळाचाही तैसाच. त्याला एकले भीमाने मारिलें तैसें केले.'' अफझलखानाच्या वधात भीमाने केलेल्या दुर्योधनाचा वध सभासदास दिसतो, तर शाहिस्तेखानाचे वर्णन करताना 'स्वारी म्हणजे कलियुगींचा रावणच संपत्ती गणना न करवे तैसाच बरोबरी खजिना बैमोइन' रावणाशी नाते जोडतात. दिलेरखानाची तुलना बकासुराशी केली आहे.

**चमत्कार, अद्‌भूतकथा, भविष्यकथन, स्वप्न, दृष्टांत, आकाशवाणी अलौकिक घटनांचा वापर :**

औरंगजेबाच्या अंतकाळीचे वर्णन एखाद्या पौराणिक आख्यानाचे रूप घेऊन येते. औरंगजेबाचा अंतःकाळ जवळ आला असता त्यांची कन्या दुःखी होते. औरंगजेब तिचे सांत्वन करताना आपल्या पूर्वजन्माची कथा सांगतो.

'बेगम यांनी विनंती केली की, दो गोष्टींविशी (श्रमी झाले आहे.) आपल्यासारखा पिता यास मृत्यूसमय आणि माझा पुत्र बंदी म्हणौन श्रमी. हे ऐकोन व बादशहा बिछान्यावर बसोन जवळ होते, त्यास बाहेर काढोन बोलिले की, तुम्ही कष्टी न व्हावें, शत वर्षे वाचले असतानाही मृत्यू आहेच. पुत्रासाठी श्रमी होता तरि हा पुत्र तुझा पुन्हा शिवाजी उत्पन्न झाला आहे.त्याचा झेंडा दिल्लीत लागेल. माझे पुत्र त्याच्या आश्रमाने चालतील... श्रमी व्हावयाचे कारण नाही. आज पंचवीस वर्षे हिंदू मोडीत असता मोडीत नाहींत त्याचें कारण हें...' या उताऱ्यातील भविष्यकथन एखाद्या पुराणात शोभण्यासारखे आहे. सप्तप्रकरणात्मक चरित्रातही अशा प्रकारचे भविष्यकथन आले आहे.

भविष्यकथनाप्रमाणेच भविष्यसूचक स्वप्न, स्वप्नदृष्टांत, आकाशवाणी, दैवी चमत्कार व अलौकिक घटना बखरकारांनी आपल्या लेखनात योजल्या आहेत. अशी वर्णने वाचताना आपण पौराणिक काळात व वातावरणात वावरल्यासारखे वाटते. सभासद बखरीत शिवाजी महाराजांना भवानी देवीने वेळोवेळी दिलेले अभय. ८१ कलमी बखरीत नदीने दिलेला उतार आणि इतर अनेक प्रसंग पौराणिक घटनांचे स्मरण करून देणारे आहेत. शिवाजी महाराजांनी जंजिऱ्यावर स्वारी केली तेव्हा झालेली आकाशवाणी चिटणीसांच्या सप्तप्रकरणात्मक चरित्रात आली आहे. ती आकाशवाणी

पुढीलप्रमाणे, 'जंजिरा या काळी साध्य नाही. सातशें वर्षांचा मुहूर्त त्यास दिला आहे.' त्यानंतर तीन उपोषणे केली असता समुद्रांनी दृष्टांत दिला की, मालवण म्हणून कोळीयांचे बेट गल्बते उभी करण्याचे लहान आहे. तें तुला दिल्हें. तेथे जागा करावी. त्यावर दुसरे दिवशी पाहविले तों समुद्राचे पाणी लांब जाऊन बेटावरील जागा विस्तीर्ण झाली. त्याप्रमाणे समुद्र प्रसन्न होऊन स्थळ दिल्हें.. किला बांधविला. त्याचे नाव सिंधुदुर्ग असे ठेविले.'

अशा अनेक उद्‌भुत कथा, दृष्टांत, चमत्कार बखरींमध्ये अनेक ठिकाणी पहावयास मिळतात. याप्रमाणेच अशुभसूचक संकेतांची वर्णनेही अनेक ठिकाणी वर्णिलेली आहे.

**संस्कृत भाषेचा प्रभाव :**

बखरीत येणारी कितीतरी सुभाषिते, म्हणी, वाक्प्रचार संस्कृत भाषेचे बोट धरून आली आहेत असे वाटतात. बखरकारांना संस्कृत भाषा चांगली अवगत होती. त्यामुळेच बखरीमध्ये येणारी मराठी वाक्यरचना देखील संस्कृत वाक्याच्या धर्तीवर असलेली दिसते. उदा. 'शुभ्रवर्णचक्षू होऊन गतप्राण जाहला,' उपशम न होई ऐसे जाहले', 'विनायकशांती आदि केली', इ. त्याचप्रमाणे संस्कृतधर्तीची वाक्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील. 'श्रींचे कृपेकरून आपले घरी द्रव्य आले,' त्याप्रभावे करून दिवसेंदिवस अधिक योग्यता वाढली,' 'जेथे जावे तेथे हे थोर आहेत असे उदिमभाग्य वाटू लागले' इ.

**फारसी भाषेचा पडलेला प्रभाव :**

शिवकाल आणि त्यानंतर पेशवेकाळापर्यंतच्या पत्रव्यवहारातील भाषेवर संस्कृत भाषेचा आणि फारसी भाषेचा असलेला प्रभाव सहजपणे नजरेत भरतो. मराठी भाषेच्या व्यवहारावर असलेला फारसी भाषेचा प्रभाव दूर करण्यासाठी म्हणून शिवाजी महाराजांनी 'राजव्यवहारकोश' तयार करवून घेतला होता. या कोशात राज्य दरबारात रूढ असलेल्या अनेक शब्दांसाठी देशी (व्यवहारातले) प्रतिशब्द दिले होते.

**विविध रसांचा वापर :**

अद्‌भुत, रौद्र, वीर, करुण आणि भक्ती या विविध रसांचा आविष्कार बखरीत अनेक ठिकाणी झाला आहे. प्रभावी रसाविष्कारामुळे प्रसंगात जिवंतपणा येतो. सभासद बखरीत शिवकालीन धामधुमीचे चित्रण झाले आहे. अनेक मोहिमांचे आणि युद्धांचे चित्रण करतेवेळी बखरकाराने वीररसाचा पुरेपूर वापर केला आहे. शाहिस्तेखानाचे पारिपात्य, आग्र्याहून सुटका, अफझलखानाचा वध यांसारख्या प्रसंगात अद्‌भुत रसाचा उत्कट प्रत्यय येतो. शहाजीराजांचे निधन, संभाजी महाराजांना मोगलांचा आश्रय घ्यावा लागतो, तो प्रसंग, मृत्यूपूर्वी शिवाजी महाराज आपल्या सहकाऱ्याशी विचारविनिमय करतात तो प्रसंग हे सर्व प्रसंग करुण रसाने ओथंबलेले दिसतात. अद्‌भुत रसाचा यथायोग्य मान भाऊसाहेबांच्या बखरीत राखण्यात आला आहे. बखरकारांनी सांगितलेल्या सुजाउदौलाच्या जन्मकथेत लोककथा आणि पुराणे यांतून येणाऱ्या अद्‌भुताचे मिश्रण पहावयास मिळते.

**निवेदन पद्धती :**

बखरी लिहित असताना वैशिष्ट्यपूर्ण निवेदनपद्धतींचा वापर बखरकारांनी केला आहे. निवेदनाची पद्धत ही कधी कथन रूपाने, तर कधी संवाद रूपाने पुढे सरकताना दिसते. बखरकाराच्या निवेदनातून प्रसंग व व्यक्ती यांचे चित्रण अत्यंत समर्थपणे प्रत्ययाला येते. शिवपूर्वकालीन आणि शिवकालीन बखरींमध्ये कथन किंवा कथात्मकता प्रभावी झाली आहे, तर पेशवेकालीन बखरीमध्ये पांडित्याचा प्रभाव जाणवतो. सभासदाच्या बखरीत मात्र पांडित्या आणि कथात्मकतेचा समतोल बखरकाराने सांभाळलेला दिसतो.

**संदर्भ :**

१. प्राचीन मराठी गद्य प्रेरणा आणि परंपरा, श्री. र. कुलकर्णी. मेहता पब्लिशिंग, पुणे.

२. सभासद बखर, डॉ. यु. म. पठाण, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे.

३. मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल. रा. नसिराबादकर.

ISBN 978-93-5196-698-2

## बखर वाङ्मयातील अद्‌भूतता,चमत्कृती

**प्रा. कदम संभाजी धोंडीराम**
बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी.

बखर म्हणजे इतिहासात घडलेल्या घटनांची शब्दचित्रे. बखर हा बखर लेखकाच्या उच्च अभिरूचीचा आविष्कार आहे.त्यात त्या कलावंताचे हळूवारपण रसिक ह्रदय दिसते.त्यात पराक्रमी वीरपुरूषांच्या विजिगीषु वृत्तीचे दर्शन घडते. राजकारणी पुरूषांच्या मुत्सद्देगिरीचा प्रत्यय येतो. साध्या मराठमोळया माणसांच्या भोळया पण भावनिक मनाची साक्ष पटते.सांसारिक दुःखाची अनुभूती घेण्याची तयारी असलेल्या आदर्श कर्तव्यनिष्ठा दिसते.

बखर वाङ्मयाचे लेखक हे तत्कालीन व्यवस्थेमध्ये ब्राम्हणच असल्यामुळे आख्यानकाव्य, पोथीपुराणे, आध्यात्मिक साहित्याचा अनुभव असल्यामुळे बखर लेखनातील घटना,प्रसंगांना रंजकता आणण्यासाठी आध्यात्माचे दाखले दिले आहेत.तसेच अनेक शूर योध्दयांच्या कर्तृत्वामागे दैवी शक्ती आणि दैववाद जोडला आहे. त्यामुळे चिकित्सक दृष्टीने बखरीच्या घटना , प्रसंगाकडे लक्ष देणाऱ्या वाचकांच्या हे लक्षात येते की,दैववादामुळे त्या शूर वीरांचा पराक्रम कमी होतो. अशा घटनांचा येथे आढावा घेणेत आला आहे.सर्व जगात ईश्वर भरून राहिला आहे बखरकार मात्र सुज्यातदौलाच्या ताकदीबद्दल लिहितो की,सुज्यातदौला हिडींब बकासूरासारखा हत्तीच्या मागल्या पायावर पाय देवून शेपूट ओढून धरतो.तेव्हा हत्तीला पुढे जाता येत नाही. म्हणजेच हा हत्तीच्या ताकदीचा,तसेच भगिरथीसारखी मोठया नदीच्या पात्रातून सहज पोहत जाणारा. नदीतील सुसर हाताने ओढून काढणारा अशी अतिशयोक्तीपूर्ण उदाहरणे बखरकार देतो आहे. हया घटना माणसाला अशक्यप्राय आहेत. सुज्यातदौला भरपूर ताकदवान असेल पणावर वर्णन केलेल्या ताकदीशी त्याची संगती लावता येणार नाही.

एखादी ऐतिहासिक घटनेची भीषणता वाचकाच्या मनावर ठसवायची असेल तर त्यावेळी भौगोलिक सृष्टीत उत्पात झाल्याचे वर्णन करण्याची परंपरा सभासदांच्या बखरीपासूनच सुरू झाली. एक प्रसंग असा, भाऊसाहेबांनी पैशाची टंचाई दूर करण्यासाठी दिल्लीच्या पातशाही तक्तावरील रूपेरी छत काढल्यावर भूमीकंप झाला, लोक वाईट शब्द बोलू लागले. आणि उल्कापात झाला. हया वर्णनावरून असे लक्षात येते की, खरोखर भूमीकंप झाला असेल आणि उल्कापात हा दररोज कुठे ना कुठे होतच असतो. मात्र हया योगायोगाला येथे खरे मानले आहे. दिल्लीचे तख्त हलविल्यावर एवढा उल्कापात होत होता. जेव्हा प्रत्यक्ष हे युधिष्ठिराचे तख्त मुसलमानाकडे गेले तेव्हा असे चमत्कार झाले नाहीत काय? त्याची नोंद बखरकार करताना दिसत नाही. (सभासद-१०५)

प्राचीन काळी बालस्वरूपातील कृष्णाला डोक्यावर घेवून गोकुळात निघालेल्या वसुदेवाच्या बाबतीतील चमत्कार काही हजार वर्षानी मथुरेच्या लोकांना पाहावयास मिळाला. मथुरेतील स्त्रिया बंधन करून घेऊन जात होते.त्यात कित्येक पतिव्रता स्त्रिया होत्या.त्यांनी जीवावर उदार होवून यमुनेत जीव दयावा म्हणून डोहात चालल्या त्यावेळी ईश्वर त्यांच्या मदतीला धावून आला आणि काय चमत्कार डोहात पाणी भालाभर असता बायाकंस मात्र मांडीएवढे पाणी लागले.आणि त्या नदीपार करून पलिकडे गेल्या. मात्र त्यांचा पाठलाग करणा-या सैनिकांची घोडी त्यांच्यासह नदीत बुडू लागली.तेव्हा प्रत्यक्ष ईश्वराने त्यांचे कौतुक केले प्रस्तुत चमत्कृती पाहाता आपला तो बाब्या ही वृत्ती बखरकाराची दिसते. काहीतरी वेगळे करावे ही वृत्ती दिसून येते.

निपुत्रिक मन्सूरअलिला फकिराने स्वप्नात फळ देण्याचे मान्य केले व दुसऱ्या दिवशी प्रत्यक्ष भेटून फळ दिले आणि ते त्याच्या पत्नीने भक्षण केल्यावर मन्सुरअलिची पत्नी पुत्रवती होवून तिला सुजातदौलासारखा बलदंड पुत्र झाला. यावरून असे लक्षात येते की, तुकाराम महाराज म्हणतात, नवसे सायासाने पुत्र प्राप्ती होत असेल तर तेथे नव-याचे काय काम? बखरकार नानासाहेब व भाऊसाहेबांना ईश्वरी अंश मानतात.(बखर १३८) आपण जर ज्ञानेश्वरीचा विचार केला तर असे

लक्षात येते की, तो परमात्मा परमेश्वर म्हणतो मी व माझा अंश सर्व सजीवांमध्ये आहे मात्र सर्व सजीव माझ्यात नाहीत या दाखल्याचा विसर बखरकाराला पडल्याचे दिसते. आपण सर्वजन ईश्वराचे अंश आहोत. मग नानासाहेब व भाऊसाहेब यांनाच तो ईश्वराचे अंश मानतो केवळ त्यांच्या प्रेमापोटी तर नसेल असे चमत्कार बखरकार बखर लेखन चांगले व्हावे यासाठी करतो आहे असे जाणवते.

पाणिपतच्या बखरीमध्ये रघुनाथ यादवांच्या तोंडचे वर्णन करताना तो लिहितो, तेथे मारामारी काही सामान्य जाहाली नाही.ते समयी स्वर्गी इंद्रलोकीचे इंद्रसुध्दा सुरगण विमानात बसून अंतराळी युध्द पाहावयास आले. आता येथे वरील विधानाचा अर्थ समजावून घेताना असे दिसून येते की रामायण व महाभारत मालिकेमध्ये असे दाखविले आहे की, जेंव्हा जेंव्हा लढाया झाल्या तेंव्हा हे इंद्रलोकीचे देवगण विमानात बसून पुष्पवृष्टी करत आहेत हा प्रसंग खरा समजल्यास विमानाचा प्रथम शोध राईट बंधूनी का लावाला. भारतीयांना ही कला माहित असताना या शोधाचे श्रेय परदेशात का जाते?अशा अंधःश्रध्दांचे पेव बखरींमध्ये अनेक वेळा पाहावयास मिळते.बखरीतील प्रत्येक घटना ही ईश्वरी कृपेने,मर्जीने, ईश्वराने घडवून आणली असे वारंवार म्हटले आहे मग त्या योध्दयांचे काय? त्यांनी युध्द केले की ईश्वराने घडवून आणले. काही ठिकाणी असा उल्लेख आला आहे ईश्वराचा आशीर्वाद हा सर्वच मानवाला आहे असे समजले तर युध्दही मानवानेच करावे लागणार आहे. पाणिपतच्या बखरीचा शेवट करताना बखरकार लिहितो की, दोन्ही सैन्याच्या आतोनात कत्तली झाल्या. रक्ताच्या नद्या वाहू लागल्या तेंव्हा पिशाच्य समुदाय आनंदाने नाचू लागला. चारशे वर्षेझाली क्षुधातूर होतो ते समयी अठरा औक्षणी दळांचे रक्तमांस भक्षिले. त्या अलिकडे फार दिवस भोजन नाही.याजकरिता श्रीने आम्हाकरिता हे युध्द निर्माण केले.या वरील विधानाचा विचार करता असे लक्षात येते की, चारशे वर्षेपिशाच्य उपवाशी होती हे त्याला कोणी सांगितले? अशी युध्दे आणि कत्तली हया ईश्वर घडवून आणतो हे विधान चुकीचे आहे कारण जो पालनकर्ता आहे तो असे करणे शक्य नाही. बखरकाराने आपली मते घुसडण्याचा प्रयत्न केला आहे.

हनुमंत स्वामीकृत बखरीमध्ये शिव-समर्थ योगाचे वर्णन अत्यंत चमत्कारिक वाटते श्रीस्वामी समर्थाच्या भेटीसाठी व्याकुळ झालेले शिवाजी महाराजांना चैन वाटत नाही. श्रींची भेंट व्हावी हाच ध्यास त्यांना लागला होता.यासाठी प्रसंगी ते सर्व वैभव सोडायला तयार होते. स्वामींचे दर्शन घडल्याशिवाय अन्न ग्रहण करणार नाही असे ते म्हणून चिंताग्रस्त झाले. तेंव्हा स्वामींची मुर्ती स्वप्नात पायी पादुका, कौपीन धारण ,हाती माळ,काखेत कुबडी व गळयात मेखला मस्तकी जटाटोप याप्रमाणे मूर्ती सन्मुख उभी पाहून महाराजांनी प्रणिपात केला. मग स्वामींनी मस्तकी हात ठेऊन,अलिंगन देऊन मस्तक अवग्रहण करून नारळ दिला. प्रसाद घेवून पुन्हा चरणी मस्तक ठेवून विनंती केली की, मुर्ती पाहून परम संतोषाने पावलो.प्रसादेकरून सर्व कल्याण जहाले. नाव श्रावणात करावे व स्थळ कोणते ते सांगावे विनंती केल्यावरून हास्यवदन करून बोलिले की,बाबा आम्ही गंगातिरी राहाणार सांप्रत्य तुझ्याकरिता कृष्णतीरी आहोत तुझ्या राज्यात समर्थ संप्रदाय वाढवून श्रीची स्थापना करून उपासनेची सेवा आणि ब्राम्हणांची भक्ती करून आहो. नाव रामदास ऐसे म्हणत आहेत. तुझे राज्यात असोन तुझे दर्शन नाही तू धर्मराज्य,देव ब्राम्हण,षट्कर्मेधर्म स्थापना विषयी तुला श्रीची आज्ञा,तुला भेटीची इच्छा प्राप्त झाली म्हणोन चाफळहून आलो धर्माचा उच्छादजाला. त्याची स्थापना करून देव ब्राम्हण हयांचे ठायी परम सादर असावे ऐसे सांगोन अदृश्य झाले. वरील गोष्टीचा विचार करता असे लक्षात येते की, शिवाजी महाराजांना समर्थांचा ध्यास लागला होता. त्यांना कशातही चैन वाटत नव्हता. सर्व सोडायला ते तयार होते.त्यावेळी त्यांच्या स्वप्नात स्वामींची मूर्ती येते आणि मस्तकावर हात ठेवून आशीर्वाद देते. राजे या मूर्तीला नाव विचारतात ती मुर्ती रामदास हे नाव सांगते.आपण तुझ्या भेटीसाठी चाफळहून आलो आहे असे सांगून आणि देवाब्राम्हणांचा आदर करावा असे सांगून अदृश्य झाली हे आश्चर्य वाटते. कारण रामदास स्वामींचा समावेश संतमंडळीमध्ये केला आहे.रामदास स्वामी हे देव नव्हते. त्यामुळे मानव अदृश्य होणे म्हणजे जादुटोणाच म्हणावा लागेल.असे अनेक चमत्कार बखरकाराने दिले आहेत.(प्राचीन मराठी गद्य)

पेशव्यांची बखर हया बखरीमध्ये राजे लोक आजारी असताना दैवी उपाय अथवा श्रध्देपोटी अनुष्ठानास ब्राम्हण घालणे,पुत्र व्हावा यासाठी ब्राम्हण अनुष्ठान बसविणे,जन्माच्यावेळी अपशकून झाल्यास शांती करणे अशा अंधःश्रध्दाचा वापर बखरकारांनी केल्याचे दिसते.

शिवप्रभू चरित्र या बखरीमध्ये अनेक ठिकाणी अद्भुतता,फलश्रुती,पौराणिक दाखले दिले आहेत.मालोजी भोसले यांनी शंभूमहादेवाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवली तेंव्हा शंभू महादेव स्वप्नात येवून अवतार घेण्याचे ,मुसलमानांचा नाश करण्याचे ,दक्षिणेकडील राज्य देण्याचे सांगतो तसेच शिवाजी राजांच्या जन्मावेळी जिजाऊच्या स्वप्नात शंभूमहादेव येवून आपण तुमच्या पोटी जन्म घेतला आहे पुढेही भरपूर नावलौकीक होणार आहे. अफझलखानाने तुळजापूरच्या कुलदेवतेची मूर्ती फोडून,जात्यात घालून भरडून पीठ केले. तेव्हा आकाशवाणी झाली. अरे, अफझलखाना, नीचा आजपासून एकविसाव्या दिवशी तुझे शीर कापून तुझे लष्कर अवघे संहार करून नवकोटी चामुंडादेवीस शांत करते.

शिवाजी महाराजाचा विजय झाला व अफझलखानाचा खातमा तेव्हाचा प्रसंग पाहाता भवानी मातेने राजांना काळजी करू नये, मी सारे पार पाडते त्याप्रमाणे सर्व काही पार पडले त्यानंतर भवानी राजांच्या स्वप्नात आली व प्रतापगडावर मंदिर बांधण्यास सांगितले.पुढे हीच भवानीमाता भक्तांच्याही स्वप्नात जाते आणि सांगते की, तुम्हाला आता तुळजापूराला जाण्याची गरज नाही मी आता प्रतापगडावरही आहे येथे येवून तुम्ही नवस फेडू शकता .

राजांचा नावलौकीक वाढतच होता अशावेळी पुन्हा एक संकट येते की,रजपूत राजा जयसिंग राजांवर चाल करून येत आहे हा प्रसंग बाका होता तेंव्हा भवानी माता येते आणि सांगते जयसिंगास मारवत नाही तेंव्हा असे कर की,त्याच्या बरोबर दिल्लीस जावे, तिथे अनेक संकटाना तोंड द्यावे लागेल काळजी करू नये संभाजी राजांचे रक्षण करून घेवून येईन सर्व गोष्टी यशस्वी होतील चिंता करू नये. मी जे राज्य दिले आहे ते सत्तावीस पिढयांसाठी आहे मुलांनी चूक केल्यास आई बापाने समजून घ्यायची असते.होणा–या चूका मी सांभाळून घेईन चिंता करू नये.असे सांगून ती माता अदृश्य झाली.

शायिस्तेखान राजावर चालून येत आहे हे कळल्यावर राजांना काळजी वाटायला लागली कारण इथे कोणताच इलाज चालणार नव्हता हा शायिस्तेखान बादशाहाचा नातेवाईक होता.त्याच दिवशी भवानी अंगात आली व बोलायला लागली की,राजांना म्हणावे की, शायिस्तेखानाची भीती बाळगू नये जसा अफझलखानाला मारला तसा शायिस्तेखानाच्या गोटात शिरून मारावे आपण तुमच्या पाठीशी आहे.असे सांगून माता अदृश्य झाली.

राजे दिल्लीस गेले तेव्हा बादशाहाने राजांना नजर कैदेत ठेवले तेथून बाहेर पडणे कठीण होते तेव्हा माता स्वप्नात येवून म्हणाली की, काही काळजी करू नये या ठिकाणाहून तुला व तुझ्या पुत्राला घेवून जाते व शत्रूचा बुध्दीभ्रंश करते त्यांच्यावर मोहिनी घालते.सर्वांना सहिसलामत घेवून जाते.असे सांगून राजांना भयमुक्त केली व अदृश्य झाली.

भागानगर भेटी दरम्यान श्रीशैल्यास जावून दर्शन घेतले. तिथले ठिकाण पाहून ते इतके भारावून गेले की त्यांना वाटाया लागले की,साक्षात हा स्वर्गच आहे. इथेच आपला देह ठेवावा. त्याच क्षणी माता राजांच्या अंगात आली आणि म्हणाली तुला या गोष्टीनी मोक्ष मिळणार नाही. हे काम करू नकोस, कारण अजून तुला भरपूर काम करावयाचे आहे. असे सांगून भवानी अदृश्य झाली त्यानंतर राजांचा शिरकमल वाहण्याचा विचार बदलला.

राजांचे देहावसान झाले तेव्हा शिवदूत विमान घेवून आले आणि राजे विमानी बैसून कैलासासी गेले आणि जड शरीर त्यांनी मृत्यूलोकी सोडून गेले.त्यादिवसी पृथ्वीकंप झाला, गगनात धुमकेतू चमकले,आकाशातून उल्कापात झाला,रात्री जोड धुमकेतु निघाले अष्टदिशा दिग्दाह झाल्या. श्रीशंभूमहादेवाच्या तळयाचे उदक रक्तांबर झाले.पाण्यातील मासे पाण्याबाहेर पडून पाणी दुर्गंधीयुक्त झाले.अशी अरिष्टे आली.

शिवाजी महाराज हे युगपुरूष होते हे म्हटल्यास वावगे वाटू नये कारण परकीयांच्या दाढेतून देश बाहेर तर काढलाच शिवाय एका मराठी राजाने राज्याभिषेक केला ही गोष्ट काही सामान्य नव्हती. यासाठी त्यांना युगपुरूष म्हणावे वाटले केवळ त्यांच्या प्रेमापोटी नव्हे. बखरकराचे अनेक अद्भूत चमत्कार पाहावयास मिळतात. यमुनेच्या डोहात जीव द्यायला निघालेल्या स्त्रियांच्या मांडीला पाणी लागून त्यांना जीवदान मिळते, माणसं आजारी असताना अनुष्ठानाने ती बरी होत नाहीत तर ती औषधोपचाराने ही गोष्ट सर्वांना माहित आहे,या पेशवाईमध्ये फक्त दैववाद दिसून येतो.

शिवप्रभू चरित्र या बखरीमध्ये बखरकार सभासद लिहितात की, शंभूमहादेवाच्या ठिकाणी यात्रेकरूचे पाण्यावाचून हाल होत होते ही समस्या मालोजी राजांनी तलाव बांधून दूर केली तेव्हा शंभूमहादेव स्वप्नात येतात आणि तुझ्या वंशात जन्म घेणार असे सांगतात. आता हयागोष्टीचा विचार करता असे लक्षात येते की,चांगले काम केले की देव

ISBN 978-93-5196-698-2

त्याचा मोबदला देतात. याप्रमाणे शिवाजी राजांचा जन्म होतो श्रीशंभूमहादेव स्वप्नात येवून मी तुझ्या पोटी जन्म घेतला आहे असे सांगतात. अफझललखानाने तुळजापूरची भवानी फोडली तेव्हा भवानी अफझलखानाला शिव्या देते त्यानंतर प्रतापगडावर त्याचा वध होतो नंतर भवानी राज्यांच्या स्वप्नात येऊन मंदिर बांधण्यास सांगते आणि तेथिल भक्तांच्याही स्वप्नात जावून सांगते की मी प्रतापगडावर आहे येथेच यावे.आग्र्याहून सुटका,शायिस्तेखानाची स्वारी, श्रीशैल्याचे दर्शन, शिवाजी राजांचे देहावसान, राजे विमानात बसून स्वर्गात जातात. अशा अनेक घटनामध्ये बखरकार देवावर हवाला ठेवतो त्यामुळे शिवाजी महाराजांचे कर्तृत्व आपोआप कमी होते तो असेही म्हणतो की, देव ब्राम्हणांचे रक्षण करणे ब्राम्हण भोजन घालणे अशाही गोष्टी येतात.

शेवटी बखरकार फलश्रुती अशी सांगतो की हे चरित्र जे घरी लिहून ठेवतील त्यांच्या भयास पारावार नाही व जे वाचतील त्यास मोठे पुण्य जोडेल,निपुत्रिकास पुत्रप्राप्ती होईल, दरिद्री लक्ष्मीवंत होतील,अपेशियांस यशवंत होतील व पुण्ययाश्रलोक पराक्रमीहोतील,जे पुत्रवत असतील त्यासही पुत्र होतील.येणे प्रमाणे सर्व मनोरथ पूर्ण होतील.

वरील सर्व गोष्टींचा विचार करता असे लक्षात येते बखरकार फलश्रूती सांगतो त्यामागे त्याचा स्वार्थ आहे.त्यांने देव,देवी स्वप्नात येतात असे सांगून लोकांना भुरळ घातली आहे. ब्राम्हणाला जपण्यास सांगतो म्हणून मी या बखरकाराच्या भाकड कथावर आधारित हा विषय निवडला आहे. या सर्व गोष्टी या बखरकाराने देवून राजांना कमी लेखण्याचा प्रयत्न केला आहे.

संदर्भ

१) भाऊसाहेबांची बखर
संपा-डॉ.मु. श्री. कानडे, सक्हेवर्धन पब्लिसिंग हाऊस, एप्रिल १९९३.
२) प्राचीन मराठी गद्य
संपा-डॉ. शं गो. तुळपुळे,व्हिनस प्रकाशन पुणे, फेब्रूवारी १९६१.
३) वाङ्ःमयीन रसास्वाद
डॉ. भीमराव कुलकर्णी, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे, फेब्रूवारी १९६५.
४) पाणिपतची बखर
संपा-र.वि.हेरवाडकर , व्हीनस प्रकाशन, पुणे, जुलै १९९७.
५) कृष्णाजी अनंत सभासद विरचित - शिव-छत्रपतींचे चरित्र
संपा- र.वि.हेरवाडकर, व्हीनस प्रकाशन, पुणे २०००.
६)मराठी बखर
र.वि.हेरवाडकर, व्हीनस प्रकाशन, पुणे एप्रिल १९७

ISBN 978-93-5196-698-2

# बखर वाङ्मय - स्वरूप प्रकार व महत्व

प्रा.सौ. प्रेरणा एल.चव्हाण
(मराठी विभाग), विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर. मोबा.९५०३८२१३७९

**प्रस्तावना :** मराठी गद्यामध्ये बखरीला ऐतिहासिकदृष्ट्या अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. बखर वाङ्मयाने शिवकालीन, पेशवेकालीन वारसा जपलेला आहे. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रीय भावना, राष्ट्रीय ऐक्य बखर वाङमयातून दिसून येते.

बखर म्हणजे थोर पुरूषाचे चरित्र, गद्य इतिहास किंवा थोर पुरूषाचे लढाईची हकीकत. तसेच बखर म्हणजे राजे पुरूषांचे गद्यरूप चरित्र. बखर वाङ्मय म्हणजे देशीकार भाषेचा गद्य इतिहास ह. श्री. शेणोलीकर बखरींना ऐतिहासिक कथा म्हणतात. श्री. मा. बनहट्टी यांच्यामते, बखर म्हणजे वीर गौरवात्मक इतिहास आणि वा. सी. बेंद्रे चरित्रग्रंथ असे बखर वाङ्मयास उद्देशून म्हणतात.

**बखर म्हणजे काय ? :** 'खबर' या अरबी शब्दापासून बखर हा शब्द आला आहे. खबर या शब्दाचा अर्थ बातमी, समाचार माहिती असा होतो. वि.का. राजवाडे यांच्यामते, बक् या धातूपासून बखर हा शब्द निर्माण झाला आहे. बक् म्हणजे बोलणे, सांगणे असा होतो. वि.का. राजवाडे यांच्या मतासारखीच मते डॉ. स. रा.गाडगीळ आणि नरहर कुरूंदकर यांनी मांडले आहेत. मुसलमानांच्या फारसी तवारिखाचे रूप म्हणून बखरीचा उदय झाला असावा असेही मत व्यक्त करण्यात येते.

**बखर वाङ्मयाचे स्वरूप:** बखरीची निर्मिती एका विशिष्ट परीस्थितीत झालेली आहे. बहुतेक बखरकारांना राजाश्रय होता. राजाच्या आज्ञेप्रमाणे बखरी लिहिल्या गेल्या. राजाने सांगितले तसे बखरकाराने लिहिले यावरून बखरीचे स्वरूप चरित्रात्मक तसेच निवेदन पध्दतीचे असल्याचे आढळते असे डॉ. र.वि. हेरवाडकर यांनी मत व्यक्त केले आहे.

बखरकार त्यांच्या कल्पनेच्या आधारे वास्तव मांडण्याचा यशस्वी प्रयत्न सर्वच बखरकारांनी केलेला आहे. बखरकारांना राजाश्रय असल्याकारणाने बखरकार प्रदीर्घ लिखाण करू शकले. एकंदरीत बखरीतून बखरकार बहिश्रूत आहे, संपन्न आहे. त्याचे व्यक्तिमत्व चर्तुस्त्र आहे, याचे दर्शन होते. बखर आज्ञेवरून जरी लिहिली गेली असली तरी त्यात बखरकाराचे व्यक्तिमत्व भारदस्त व स्वतंत्र आहे, असे दिसून येते.

बखर वाङ्मय हे एक उत्कृष्ट ललित गद्य असल्याचे दिसून येते. बखरीमधून चरित्र नायकाबद्दलची वाटणारी आत्मियता, जिव्हाळा, उत्कंठा कोणताही हेतू मनात न धरता कथेसारखी रचली आहे. त्यामुळे तिला वाङमयीन सौंदर्य प्राप्त झाले आहे. राज्यकर्त्याच्या आज्ञेवरून लिहिलेल्या बखरीमध्ये राज्यकर्त्या व्यक्तिविषयी वाटणारा अभिमान ओतप्रोत भरलेला आहे. बखरीतील व्यक्तिचित्रणे, प्रवास वर्णने यांचे चित्रण आकर्षक व परिणामकारक व्हावे अशा स्वरूपाची मांडणी आहे. बखरीतील निवेदन पध्दतीमुळे बखरीला भाषा सौंदर्य प्राप्त झाले आहे. एखादी साहित्यकृती निर्माण करावी असा बखरकरांचा हेतू नव्हता. पण राजकर्त्यांविषयी वाटणारा जिव्हाळा व अभिमानाविषयी मांडताना प्रसंगी रंजकता, कल्पकता आलेली आहे. एकंदरीत साहित्यगुण त्यात आढळतात.

**बखरकाराची भूमिका :** बहुतेक बखरकार राजकर्त्याचे आज्ञापालन म्हणून बखरी लिहिल्या गेल्या आहेत. त्यामुळे या बखरी हुकुमी स्वरूपाच्या झाल्याचे दिसते. बखरकारांना राजाश्रय असल्यामुळे बखरकार प्रदिर्घ लेखन करू शकले. बखरकाराने राजकर्त्या व्यक्तिविषयी आत्मियतेची, आदर्शाची भावना व्यक्त केलेली आहे. बखरकाराजवळ बहुमतपणा व

लेखनकौशल्य असल्यामुळे बखर वाङ्मय प्रकार लोकप्रिय झाल्याचे दिसते.

**बखरीचे प्रकार :** थोर व्यक्तींची चरित्रे, त्यांचे राजकीय जीवन हाच विषय प्रामुख्याने बखरीचा असल्याचे दिसून येते. बखर वाङ्मयामध्ये तिच्या स्वरूपानुसार तिचे वेगवेगळे प्रकार पडतात.

**१) राजकीय बखर :** ज्या बखरीमध्ये थोर व्यक्तींचे राजकीय जीवन बखरकार प्रत्यक्षात पाहिलेला आहे. त्या काळाचा त्या प्रसंगाचा तो साक्षीदार आहे. उदा. सभासदाची बखर, भाऊ साहेबांची बखर इत्यादी अशा बखरीचा समावेश समकालीनांनी लिहिलेल्या बखरीमध्ये होतो.

**२) स्मरणात्मक बखरी :** काही बखरी ह्या स्मरण, दंतकथा, आख्यायिका यावर आधारित आहेत. पेशव्यांची बखर (कृ.वि.सोहनी) या स्वरूपाची आहे. यामध्ये स्थळवर्णने, कालवर्णने, व्यक्तिचित्रणे यामध्ये दोष असण्याची शक्यता आहे. कारण ही बखर काही पुराव्यांच्या आधारे तर काही आठवणींच्या आधारे लिहिली गेली आहे.

**३) उत्तरकालीन बखरी :** ऐतिहासिक कागदपत्रे, जुने ग्रंथ, दप्तरातील माहिती यांच्या आधारे उत्तरकालीन बखरी लिहिल्या आहेत. या बखरीला पुरावे असल्यामुळे ही बखर उत्तरकालीन असली तरी विश्वसनीय ठरते. यामध्ये मल्हार रामराव चिटणीस यांच्या 'सप्त प्रकरणात्मक चरित्र' या बखरीचा समावेश होतो.

**४) वाका कैफियत :** पटवर्धनी वाका, भाऊ साहेबांची कैफियत अशी नावे असली तरी हा बखरीचाच एक प्रकार आहे. यामध्ये ऐतिहासिक स्वरूपाचे लेखन केलेले आहे. राजदरबारातील चिटणीस–कारकुनांनी लिहिलेली वाके , कैफियती या प्रकारात येतात.

**५) धार्मिक बखरी :** काही बखर लिखाणामागील भूमिका धार्मिक स्वरूपाची असल्याचे दिसते. यामधील लेखन ऐतिहासिक किंवा राजकीय नसून चमत्कार, अद्भूतता यांना प्राधान्यक्रम देण्यात आल्याचे दिसते. यामध्ये समर्थाची बखर, बकासुराची बखर इत्यादी बखरीचा समावेश होतो.

**समारोप :** मराठीमध्ये बखरीला ऐतिहासिकदृष्ट्या अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. बखर म्हणजे थोर पुरुषांच्या लढाईची हकीकत होय. बखरीची निर्मिती एका विशिष्ट परिस्थितीत झाली आहे. बखरीमध्ये थोर पुरुषांची कथा मांडत असताना घटना प्रसंग, वातावरणनिर्मिती, व्यक्तिचित्रणे यामुळे बखरीला वाङ्मयीन सौंदर्य प्राप्त झाले आहे. बखरीचे राजकीय, ऐतिहासिक, धार्मिक, दंतकथा असे काही प्रकार पडतात. बखर लिहिण्यामागे बखरकाराची भूमिका केवळ आज्ञापालन म्हणून आहे. शिवाय लेखन कौशल्याच्या बळावर बखरकाराने थोर पुरुषाचे चित्रण, आकर्षक व परिणामकारक केल्याचे दिसते.

**संदर्भ ग्रंथ :**


1) आज्ञापत्र – संपादक विलास खोले लोक वाङ्मयगृह, प्रकाशन
2) मराठी संशोधन पत्रिका (जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर १९७९) मराठी संशोधन मंडळ, मुंबई – डॉ.श्री.गं.मोठे यांचा लेख.
3) सभासद बखर – सं.र.वि.हेरवाडकर
4) मल्हार शामराव चिटणीसकृत राजनीती – का.ना.साने
5) अर्वाचीन महाराष्ट्रेतिहासकालातील राज्यकारभाराचा अभ्यास – शं.ना.जोशी.

ISBN 978-93-5196-698-2

## मराठी बखर गद्य ऐतिहासिक व वाङ्:मयीन पैलू

प्रा. बाळासाो आण्णा सुतार
आबासाहेब मराठे महाविद्यालय राजापूर

'प्राचिन मराठीत बखर-लेखन जे झाले ते मुख्य:ता इतिहास म्हणून हिंदुस्तान इतिहास काय तो दोन भागात लिहीलेला आढळतो'. फारशीत व दुसरा मराठीत असे वि. का. राजवाडे म्हणतात. मात्र मराठयांनी बखरी लिहीण्याचा जो प्रघात पाडला तो मुसलमानांच्या सहवासाने व त्यांच्या तवारिखा पाहून या मतानुसार जर पाहिले तर फार पूर्वी बखर म्हणून असे काही लिहीले जात नव्हते. एखादा बातमीदार घडलेल्या घटनांची माहिती प्रत्यक्षपणचे सांगत असावा ही मुळ मुसलामानी कल्पना म्हणजेच तवारीखा आपणाकडे आली असावी. यालाच वार्ता, समाचार घटना, बातमी, वृत्त असे पर्यायी शब्द होते. 'बक म्हणजे बोलणे' या मुळ धातूपासून बखर शब्दाची निर्मिती झाली असावी असे राजवाडे यांना वाटते.

ऐतिह्य वृतकथनाच्या गरजेतून मराठी बखर वाङ्:मयाची निर्मिती झाली. मराठयांच्या इतिहासातील घटना प्रसंगावर जवळ-जवळ दोन अडीचशे बखरी लिहील्या गेल्याचे राजवाडे, सांगतात. रचना काळाच्या दृष्टीने महिकावतांची बखर ही सर्वांत जुनी बखर होय. बखरींच्या अश्या अभ्यासावरुन वर्गिकरण करताना त्यांचे पाच भागात वर्गिकरण करता येते.

**१) समकालीन आधारीत बखरी :** या प्रकारातील बखरी या समकालीन बखरकाराने समक्ष पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या राजकीय घटना प्रसंगावर आधारीत असतात. या बखरीमध्ये समकालीन राजकारणाचा इतिहास असतो. कृष्णाजी अनंत सभासद यांची 'शिवछत्रपतींचे चरित्र' उर्फ सभासदी बखर ही बखर राजारामाने कृष्णाजी अनंत या पुरातन माहितीगाराकडून इ. स. १६८४ साली मोगलांच्या जीवनातील घटनांचा अन्वयार्थ लावून इस्तकबीलापासून चरित्र लिहून देणे अशी आज्ञा केली ही मराठीतील पहिली चरित्रात्मक बखर होय. या बखरीबरोबरच भाऊ साहेबांची बखरही या प्रकारात मोडते. कृष्णाजी शामराव यांनी व्यंकाप्या नाईक दिंडोरे यांच्या आज्ञेवरुण ही बखर लिहीली. क्ष बखरकार स्वत: पाणपतच्या रणसंग्रमात हजर होता. त्यामुळे या बखरीत तत्कालीन काळाचे सुक्ष्म निरिक्षण आणि भाषेसहित सर्व बारकावे आले आहेत.

**२) केवळ स्मृतीवर आधारीत बखरी :**या बखरींमध्ये आठवणी, दंतकथा, आख्याईका, पारंपारिक हकिकती यांच्या आधारे उत्तरकालात या बखरी लिहील्या जातात पण उत्तरकाळी लिहीलेल्या बखरीतून त्या त्या घराण्याच्या आश्रीतानींच या बखरी लिहील्या असल्यामुळे त्या घराण्या विषयीच्या पक्षपातीपणानेच त्यांचे लेखन झाले आहे. नागपूरकर भोसल्यांची बखर, हरिवंशाची बखर, मराठयांची बखर व कृ. नि. सोहनी निश्चीत पेशव्यांच्या बखरीत पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट हे त्यांच्या मुळ गावापासून श्रीवर्धनापासून निघून आल्यानंतर ते इंग्रजांनी पुण्यात शनिवारवाडा काबीज केल्यापर्यंतची हकिकत आली आहे. यासारख्या बखरीतून मुळ हकीकत कोणीतरी सांगितल्यावर नंतर ती लिहून घेण्यात आल्याने जश्या गोष्टी आठवतील तश्या लिहून काढणे असे त्यांचे स्वरुप झालेले दिसते.

**३) ऐतिहासिक आधारे लिहीलेल्या बखरी :** या प्रकारातील बखरी या ऐतिहासिक कागदपत्रे, जुणे, ग्रंथ, दप्तरातील टिपणे यांच्या आधारे उत्तरकालात लिहीलेल्या आहेत. जरी या बखरी उत्तर कालीन असल्या तरी ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीने बऱ्याचश्या विश्वसनिय ठरतात. या बखरीच्या प्रकारातील मल्हार रामराव चिटणीस विरिचीत सप्तप्रकरणात्मक चरित्र ही बखर मल्हार रामराव पुरातन 'लेखनाधीकारी' पराक्रम कथांचा माहितीगार त्याने १८१० म्हणजे सभासदी बखरीनंतर साधारण दिडएकशे वर्षांनी हे चरित्र लिहले या चरित्रात चरित्र नायबाबरोबरच त्याच्या प्रभावळीतील व प्रभावळी बाहेरील

शत्रुपक्षाती व्यक्ति व त्यांच्या विषयीचे प्रसंगांची चित्रे दिसतात. शिवाजी – अफझल भेट, शाहिस्तेखान – प्रकरण, आग्रा भेट, राज्याभिषेक या प्रसंगातून बारीक बारीक माहितीच्या आधारे इतिहास कथन केले आहे.

**४) बखर सदृश्य ऐतिहासिक स्वरुपाचे लेखन :** हा बखरींचा चौथा प्रकार मानता येईल. यामध्ये वाका, कैफियत, हकिकत, चरित्र, आत्मचरित्र इ. लेखन समाविष्ठ होते. 'वाका' म्हणजे वर्तमान वा हकिकत बखरीत समाविष्ठ अशीही लेखन पध्दती होय. एखाद्या व्यक्तीने केलेल्या मर्दुमकीची अथवा घराण्याची हकीकत असते. पटर्वधनी वाका हे त्याचे उदा होय याबरोबर कैफियतीतून आपली माहिती यथार्थ कळावी असा कैफियत नायकाचा प्रमुख उद्‌देश असतो. उदा. श्रीमंत भाऊ साहेबांची कफफियत होळकरांची कैफियत

**५) पौराणिक व सांप्रदायिक स्वरुपाच्या बखरी :** या प्रकारातील बखरीचे लेखन हे श्रध्दामय असून केवळ धार्मिक भुमिकेने केलेले असते. या बखरीमध्ये ऐतिहासीक सत्य अगदीच कमी असते. चमत्कार अवताराच्या कल्पना, आदर्श जीवन यांचा वापर असतो. या बखरींमध्ये बकासुरांची बखर, कृष्ण जन्मकथा बखर, श्री समर्थांची बखर यांचा समावेश होतो.

**समारोप :** यादव काळानंतर सुमारे साडेतीनशे वर्षानुतर मराठी गद्याचा नवा अविष्कार आढळून येतो तो बखर या रुपाने शिवकालातून मराठयांच्या पराक्रमाच्या अन शौर्यकथा निर्माण झाल्या व त्या अगीनदास सारख्या शाहिराकडून गायल्या जावू लागल्या. तर वैचारिक गाथा बखरीतून होवू लागल्या. बखरी कल्पित अन सत्य यांचे विलक्षण रसायन आहे. बखरी लेखनाला शास्त्र पध्दत नसल्यामुळे लिखित ज्ञात ऐखीव अश्या सर्व साधन सामुग्रीच्या आधाराने लेखन घडले. आश्रयदात्या विषयाची कृतज्ञता व जिव्हाला यामुळे काही घटनात दैवी वलये निर्माण झाली आहे. रामकृष्णांशी किंवा राम–रावण, कौरव – पांडव यांच्या युध्द वर्णनासी तुलना होते. चरित्र नायकाची वंश चरित्र सांगताना त्याची कुळी थेट चंद्रवंशी कृष्णा किंवा सुर्यवंशी दशरथ पर्यंत भिडवतात व त्यांच्या देहवसनी भुमीकंप उल्कापातासारखे प्रकार घडताना दिसतात व त्यांचे चरित्र वाचणारास धनधान्य व संतती प्राप्तीचा योग येईल अशी फलश्रृती सांगतात. फैरा अशा सर्व दृष्टीने अनुकडून केले जाते.

बखरी लेकनामागे लौकिक व्यवहारिक कारणांची प्रेरणा त्यामागे होती. शिववंश वंश हा तसा नवीन राजवंश होता तत्सम घराण्यातील व्यक्तिंना अशा तऱ्हेच्या बखर लेखनाची आशा त्यांनी केली. अशा प्रेरणेतून भुमिकेतून निर्माण झालेल्या साहित्यात स्वयंप्रेरणाचा व स्वयंपुर्तीचा अभाव दिसून येतो. तथापि लेखनाचा सराव ऐतिहासीक कागदपत्रांचे वाचन पुरान किर्तनाचे श्रवण संस्कृतीचा परिणाम यामुळे या लेखनाला साहित्यीक मुल्यही प्राप्त झाले आहे.

मध्ययुगिन मराठी गद्याचा हा वैभवशाली वारसा परंपरेने आपल्या पर्यंत आली आहे. त्यांची उपलब्धी व रसिकतेने अभ्यास संशोधकाच्या अविरत परिश्रमाने घडून येताना दिसतो.

**संदर्भ :**

१) प्राचिन मराठी वाङ्:मयाचे स्वरुप हश्री शेणोलीकर.

२) मराठी बखर गद्य गं. ब. ग्रामोपाध्ये

३) मराठी बखर – र. वी. हेरवाडकर

४) प्राचिन मराठी वाङ्:मयाचा इतिहास – अ. ना. देशपांडे

ISBN 978-93-5196-698-2

# प्राचीन मराठी गद्य बखर वाङ्मय, बखरीचे प्रकार : विषय विवेचन

प्रा. दिपक गडकर
वराडकर बेलोसे महाविद्यालय,दापोली, जि. रत्नागिरी

**प्रस्तावना :** महाराष्ट्र ही संताची आणि वीरांची भूमी आहे. भारतीय संस्कृतीचे आणि उदात्त जीवनमुल्यांचा आविष्कार बहुभाषिय भारतीय साहित्याला लाभले आहे. भारतातील इतर राज्यापेक्षा महाराष्ट्राची रचना प्रामुख्याने भिन्न आहे. महाराष्ट्रात वीरत्व व वैराग्याच्या परंपरा येथे एकत्र नांदल्या आहेत. या सर्व भावनांचा व विचारांचा सारासार विचार मराठी साहित्यात एकत्र झाला आहे.

प्राचीन मराठी साहित्य विविध पंथ आणि धर्म साहित्यामुळे समृध्द झालेले आहे. या साहित्यात पंथ प्रचार, पंथीय विचार फलश्रुती, परमेश्वर भक्तीचे साधन समाज प्रबोधनाचे साधन आदि अनेक कारणांसाठी साहित्य निर्मिती झाली आहे. छापण्याची कला नसल्याने ग्रंथ प्रसार करणे कठिण होते, त्यामुळे सामुदायिक पारायणासाठी ग्रंथ लेखन केलेले पहावयाचे मिळते. प्राचीन मराठी साहित्याची आपण संत साहित्य, पंडिती साहित्य, शाहिरी साहित्य अशा तीन भागात विभागणी केली आहे. या तिन्हिही साहित्य प्रवाहाच्या निर्मितीमुळे विविध प्रयोजने आढळतात.

संत साहित्यांची निर्मिती आत्मोन्नती आणि समाजोन्नती साठी झाला आहे. समाज उध्दाराचा विचार आणि लोक शिक्षण करावे ही संताची भूमिका आपल्या पहावयास मिळते. आपल्या मनातील इच्छा ईश्वराजवळ व्यक्त करण्यासाठी तसेच परमेश्वर भक्तीने उचबळून येणारे मन मोकळे करण्यासाठी साहित्याची निर्मिती केली आहे. पंडिती साहित्याचे प्रयोजन ईश्वरी भक्ती आध्यात्मक भावना व्यक्त करणे आत्मविकासाचा मार्ग चोखाळणे अशी असली तरी कृत्रिमत: अलंकारीतेला व विविध रस निर्मिती याला विशेष महत्व दिले आहे. पंडिती कवींची कविता पाहिली असता पंडितांना आपल्या हुशारीचे प्रदर्शन करावयाचे होते असे लक्षात येते. शाहिरी साहित्यात मानवी भावनाच्या आविष्काराला महत्वाचे स्थान दिले आहे. शाहिरी साहित्य लौकिक सुख दुखांना महत्व देणारे आहे. शिवाय त्यामुळे आत्मगतता आणि आत्मनिष्ठा महत्वाची आहे. शाहिरी साहित्य पोवाडे आणि लावणी या दोन प्रकारात आहे. शाहिरी वाङ्मयात मराठमोळ्या बोली भाषेचा वापर झाला आहे.

**बखर वाडमय प्राचीन मराठी गद्य :** कोणत्याही भाषेत प्रथम पद्य वाङ्मय निर्माण होते व कालांतराने गद्य वाङ्मयाचा जन्म होतो. मराठी गद्य वाङ्मयाचा प्रारंभ महानुभाव पंथांनी केला असला तरी यापूर्वी कदाचित गद्य वाडमय असावे पण आज तरी ते उपलब्ध नाही. हे महानुभावी ग्रंथ १३ व्या, १४ व्या शतकातील आहे. यावेळी महाराष्ट्रात इस्लामी अंमल सुरू झाला होता. मराठीला उत्तेजन नव्हते, त्यामुळे मराठी ग्रंथ निर्मिती थांबली. इस्लामी सत्तेमुळे फारशी राष्ट्रभाषा होती त्यामुळे फारशी भाषेतच ग्रंथ निर्मिती होऊ लागली.

महाराष्ट्रातील १४ व्या व १५ व्या शतकात मुसलमानी राजवट अस्थिर झाली आणि छत्रपती शिवरायानी मराठी स्वराज्य स्थापनेचे प्रयत्न केले. शिवाजी महाराजांच्या पराक्रमामुळे मराठी राज्य निर्माण झाले. त्यामुळे शिवरायांच्या पराक्रमगाथा असलेल्या बखरी निर्माण झाल्या या बखरी मराठी भाषेत व मोडी लिपीत आहे. शिवकाळातील साहित्य बखर वाडमय पत्रात्मक वाडमय व इतर ग्रंथ लेखन असे स्थुल मानाने विभागले गेले आहे. मराठीत आज जवळ जवळ ३०० बखरी उपलब्ध आहेत. त्यातील सुमारे १५० बखरी केवळ अव्वल इंग्रजी कालखंडातील आहे. शिवपूर्व काळातील ३ ते ४ बखरी असून उरलेल्या बखरी शिवकाळ व पेशवेकालीन आहेत.

**बखर म्हणजे काय ? :**बखर हा 'बक' शब्दापासून आलेला शब्द आहे. इतिहाचार्य राजवाडे यांची उपपत्ती बक- बोलणे अशी आहे. बखरी मुखाने सांगितल्या गेल्या 'बखर' हा शब्द 'खबर' बातमी यावरून आला आहे. खबर शब्दातील 'ख' आणि 'ब' शब्दांनी जागा बदलली भाषा शास्त्रानियमाप्रमाणे शब्दात असे बदल घडतात. त्यामुळे 'खबर' च्या ऐवजी 'बखर' ही उपपत्ती सर्वसाधारणपणे सर्वांना मान्य झाली आहे.

ISBN 978-93-5196-698-2

बखर या संकल्पनेचा उगम मुसलमानांच्या तवारिखा -डेली क्रॉमिकल्स या दैनिक वृत्तात आहे. मुसमान राज्यकर्त्यांच्या तवारिखा प्रामाणिकपणे लिहिल्या जात त्यामुळे ते एक इतिहासाचे साधन आहे. आपल्याकडील हिंदू राजांनी मुसलमानी राज्यपध्दतीचा आपल्या राज्य व्यवस्थापनेसाठी अवलंब केला होता. त्यातून तवारिखा सारखा भाग लिहिण्याची प्रेरणा मिळाली पण मराठी लेखकांनी या बखरीचे स्वरूप अगदी वेगळे आहे.

बखर म्हणजे, 'सत्ताधिकाऱ्यांनी सांगणे व कारकूनांनी लिहिणे असा प्रकार होता.'

बखर म्हणजे, 'मराठ्यांच्या इतिहासाचे एक साधन होय.'

बखर म्हणजे, 'ऐतिहासिक पुरूषाचा पराक्रम व ऐतिहासिक घटना कथन करणे होय.'

**बखरीचे प्रकार :** बखर हा शब्द अव्वल इंग्रजी काळात अत्यंत स्थूल अर्थाने वापरला जात होता. एखाद्या पौराणिक व काल्पनिक कथेला बखर असे म्हटले जाते. बखर वाडमय प्रकाराचे ५ प्रकारात वर्गीकरण केले जाते. ते खालील प्रमाणे -

**अ. चरित्रात्मक बखर १. सभासदाची बखर :** ही बखर अनेक कारणांनी महत्वाची आहे. ही शिवचरित्रपर असून इ.स. १६९७ मध्ये या बखरीचे लेखन झाले आहे. कालदृष्टया ही शिवचरित्र सांगणारी पहिली बखर आहे. याचा लेखक कृष्णाजी अनंत सभासद हा राजदरबारी वावरणारा असल्याने सभासद हे नाव घेतले आहे. या बखरीच्या लेखक विशेष असा की, यांनी शिवाजी महाराजांना प्रत्यक्ष पाहिले होते. हा राजकारण निपुण गृहस्थ होता. यांनी या बखरीत ७१ प्रसंग रेखाटले आहेत. पुर्वार्धापेक्षा उत्तरार्ध जास्त विस्तृतपणे लिहिला आहे. यात वर्णिलेल्या २-३ गोष्टी ऐतिहासिक महत्वाच्या आहेत. त्यात शिवराज्याभिषेक शिवाजी अफजलखान भेट शिवाजीचा मृत्यू इत्यादी प्रसंगाचे वर्णन यामध्ये येते. शिवाजीचे दिल्लीला प्रयाण, शिवाजी व्यंकोजी भेट, अफजलखान वध प्रसंग, राज्याभिषेक हे प्रसंग अधिक विस्ताराने लिहीले आहे. शिवाजी महाराजांच्या गड, कोट, खजिना यांची अत्यंत तपशीलवार माहिती यांनी दिली आहे. या बखरीने राष्ट्रपुरूषांबद्दल ऐतिहासिक लेखनास मराठी साहित्यास प्रारंभ केला आहे. शिवकालीन अशी ही एकच बखर आहे. शिवाजी महाराजांच्या चरित्र सांगणाऱ्या व शिवकाल वर्णन करणाऱ्या अनेक बखरी आहेत. श्री शिवदिग्विजय, चित्रगुप्ताची बखर सप्तप्रकरणांत्मक शिवचरित्र व श्री शिवाजी प्रताप इ. शिवचरित्रावर लिहील्या गेलेल्या अनेक बखरी बखरी वाड्मयात पहावयास मिळततात.

**२. हनुमंत स्वामी कृत समर्थाची बखर :** ही बखर समर्थाचे एक शिष्य हनुमंत स्वामी यांनी लिहीली आहे. हिचा लेखन काळ इ.स. १७९३ आहे. ही बखर समर्थांचे बंधू श्री श्रेष्ठ यांच्या नातवाच्या टिपणावरून तयार करण्यात आली आहे. वाडमय दृष्टीने ही महत्वाची असून तितकीच ती सरस आहे. त्यात समर्थ व शिवाजी यांची व्यक्तीचित्रणे प्रभावी व उठावदार आहेत. समर्थ चरित्र समजून घेण्यासाठी ही बखर महत्वाची आहे. हे समर्थाचे गद्य चरित्र आहे. बखरीची भाषा रसाळ असून बखरीला समर्थ संप्रदायात फार मान दिला जातो.

**३. श्री शिवछत्रपतींची ९१ कलमी बखर :** ही बखर दत्ताजी त्रिमल वाकेनवीस यांनी इ.स. १७६० - ७० दरम्यान लिहिली आहे. ही बखर कोणाच्या आज्ञेने लिहिलेली नाही. हा लेखक दत्ताजी छत्रपती शिवाजीच्या मंत्रीमंडळात होता. तो छत्रपती शिवाजी बरोबर आग्रा येथे गेला होता. त्यावेळी दैनंदिनी लेखनाचे काम त्याच्यावर सोपवले होते. तसेच शिवचरित्र त्याने जवळून पाहिले होते. त्याचा वृत्तांत या बखरीत येतो. सदरचे आख्यान ९० प्रकरणे पुण्य श्लोक राजा त्याची कथा त्याने तपशिलवार लिहीली आहे. पुण्यश्लोक हे शिवाजींचे आख्यान आहे. मालोजीला झालेला श्री भवानीचा दृष्टांत आणि शहाजीसाठी भिमा नदी दुभल्याचा प्रसंग असे काही अपवाद सोडल्यास आख्यानाचे चित्रण वास्तव पातळीवर झालेले आहे. अफजलखान वध, शाहिस्तेखान प्रकरण, दिल्लीची कैद असे रोमहर्षक प्रसंगाचे वर्णन मोजक्याच शब्दात केलेले आहे. तसे पाहिले तर ही बखर शिवचरित्र लेखनाला उपयुक्त आहे असे मानले जाते.

**ब. आत्मचरित्रात्मक बखरी- १. नाना फडणीस यांचे आत्मचरित्र :**

हे एक आदर्श आत्मचरित्र आहे. आपल्या अंगच्या दोषाची व दुर्गूणांची कबूली देण्यात मुळीच संकोच बखरकाराने केलेला नाही. हे अपूर्ण असलेले आत्मचरित्र इ.स. १७६१ नंतर कधीतरी लिहीलेले आहे. नानासाहेब पेशवे

यांचा मृत्यू व माधवराव पेशवे यांचा पेशवाई स्विकारण्याचा उल्लेख या बखरीत येतो. ही बखर अपूर्ण असली तरी एक वेगळे लेखन म्हणून महत्वाची आहे. नाना फडणीस हे वृत्तीने पापभीरू व जपजाप करणारे तरीही विषय वासना प्रबल का याचा शोध घेण्याचा हा एक प्रयत्न आहे. हे आत्मवृत्त आत्मनिरिक्षकात्मक आहे. तसेच आत्मचिंतन आध्यात्मिक विचार शरीर व आत्मा या संबंधी तात्वीक विचार या आत्मवृत्तांत येतात. पानिपतावर नाना आपल्या पत्नीसह व आईसह गेले होते. तेथून परतीचे प्रवास चित्र यात रेखाटले आहे. या आत्मवृत्तांचा सर्वात मोठा विशेष असा की यात स्पष्ट वक्तेपणा तसेच आत्मदोषाचे चित्रण अगदी धैर्याने चित्रीत केले आहे.

**२. गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचे आत्मचरित्र :** हे आत्मवृत्त इ.स. १८०३ च्या दरम्यान लिहिले आहे. उत्तर पेशवाईतील एक राजकारणी व वादग्रस्त व्यक्ती म्हणजे गंगाधर शास्त्री पटवर्धन होय. त्यांनी पेशव्यांच्या वाडयात वयाच्या ८ व्या वर्षापासून कारकून काम म्हणून काम केले, ब्रिटीश रेसिडेंट वॉकर यांने त्यांना गायकवाड सरकारशी बोलणे करण्यासाठी नेमले तोपर्यंतची सर्व हकीकत यामध्ये चित्रीत केले आहे. या बखरीचे लेखन मेजर वॉकर गुजरात यांच्या सांगण्यावरून झाले आहे. मेजर वॉकरला आपली माहिती करून देण्यासाठी याचे लेखन केले आहे. यांनी इंग्रजी सरकारकडे केलेली नोकरी, उत्तर पेशवाईतील राजकारणातील माहिती, धुर्तपणा, बुध्दीमता व राजकारणी व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते.

**३. बापू कान्हो यांचे आत्मवृत्त :** सातारचे महाराज छत्रपती प्रतापसिंह यांचे फडणीस व प्रमुख मुत्सद्दीन बापू कान्हो यांचीही आत्मवृत्तांत्मक बखर आहे. हे आत्मचरित्र सातारचे रेसिडंट ग्रेट डफ यांच्या विनंतीवरून बापू कान्हो यांनी इ.स. १८२१ मध्ये लिहीली आहे. बापू कान्हो यांचे उपनाव खांडेकर असे आहे. सातारचे छत्रपती धाकटे शाहू यांचे कनिष्ठ बंधू चतुरसिंग यांच्यासह त्यांनी केलेली कारस्थाने कट व कष्ट याचे वर्णन यामध्ये आले आहे. यामध्ये लेखकाच्या व्यक्तीमत्वाचे फारसे वर्णन येत नाही. राजकारणात घेतलेला भाग व डावपेच याचे तपशिलासह वर्णन आले आहे. त्यामुळे विश्वसनीय राजकीय वृत्त म्हणून हिला महत्व आले आहे.

**४. मल्हार गणेश यांचे आत्मवृत्त :** मल्हार गणेश हे संभाजी खांडेकर यांचे पुत्र आहे. १७४८ ते ५३ या पाच वर्षात गणेश संभाजी हे माळव्यात परागण्याच्या कामावर होते. पाणिपताच्या वेळी गोपाळ गणेश बर्वेयांच्या बरोबर होते, पण पुढे दोघांच्यामध्ये वाद झाला, युध्द झाले तेव्हापासून ते इ.स. १७७९ पर्यंतचा २२ वर्षाचा वृत्तांत मल्हार गणेश यांनी आपल्या बंधूला पत्राने लिहून कळविला ते पत्र म्हणजे ही बखर होय. या बखरीत मल्हार गणेश याला वडिलांच्या मृत्यूनंतर वणवण करावी लागली. याची माहिती मोजक्याच शब्दांत येते. लेखकाची वैयक्तिक व कौटुंबिक माहिती यामध्ये येते लेखकाच्या व्यक्तीमत्वाची चुणूक यामध्ये जाणवते.

**क. प्रसंग वर्णनपर बखरी – १. भाऊसाहेबांची बखर :** ही बखर कृष्णाजी शामराव यांनी इ.स. १७९० मध्ये लिहीलेली असून ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्वाची व विश्वसनीय मानली जाते. यामध्ये वाडमय गुण ही भरपूर आहेत, म्हणून ती बखर सर्वात श्रेष्ठ व महत्वपूर्ण मानली जाते. बखरकाराची कथनपध्दती, प्रभावी अस्ख्लीत, ओजस्वी असून त्यातील घटनांची वर्णने शब्दचित्राप्रमाणे रेखीव व भावना उत्कट अशी आहे. उदा. पानिपतातील पळ, शुक्रतालची लढाई, दत्ताजी शिंद्यांचे आत्मयज्ञे इत्यादी घटना अंतकरण हेलावून टाकतात. ही बखर म्हणजे उत्तरभारतातील १० वर्षातील राजकारणाचे वर्णन करणे व पानिपताच्या युध्दाप्रमाणे राजकीय डावपेच व धोरणे याचेही वर्णन येते. पानीपतच्या युध्दापूर्वीच्या घडामोडीचे वर्णन आहे. घटनांचे सत्य, वस्तूनिष्ठ वर्णन सुंदर व प्रभावी व्यक्तीचित्रणे, भावपूर्ण संवाद, म्हणी व सुभाषीत वाक्य प्रभावी कथन पध्दती या वाड्मयी गुणांमुळे ही बखर फार प्रसिध्द झाली आहे.

**२. पानीपतची बखर :** ही बखर गोपिकाबाईच्या सांगण्यावरून लिहीली आहे. पानीपतच्या युध्दानंतर ती लगेच लिहीली गेली आहे. म्हणून ती ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाची आहे. तरीही त्यातील काही तपशिल चुकीची आहेत. तरीपण त्या चुका गौण आहेत. बखरीची भाषा भारदस्त व अलंकार वृत्त अशी आहे. काव्यमय वर्णने व सुटसुटीत वाक्यरचना यामुळे ती मनोवेधक बनली आहे.

**३. खडर्यांची स्वारीची बखर :**या बखरीला कै. माधवराव पेशवे यांची बखर म्हणून ओळखली जाते. याचा लेखनकाळ सांगता येत नाही. लेखकाचे नावही सांगता येत नाही. या स्वारीतील बारीक बारीक तपशिल जाणणारा तो असावा सवाई माधवरावांनी निजामाची गुर्मी उतरून टाकली ती लढाई म्हणजे खडर्यांची लढाई होय. या लढाईंचा चित्रण या बखरीत येते.

ड. कुलवृत्तांतात्मक बखरी

**१.पेशव्यांची बखर :** ही बखर कृष्णाजी विनायक सोहनी यांनी इ.स. १८५४ – ५५ या वर्षी लिहीली. लेखकांनी आपला संसार सोडून आपले उत्तर आयुष्य वैजनाथ येथील शिवमंदीरात घालवित असताना लोकांना तोंडी सांगितलेली माहिती या बखरीत येते. पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट यांच्या मुळगावातून श्रीवर्धनपासून तहात इंग्रजी सरकारने शनिवार वाडयावर आपल्या सत्तेचा झेंडा चढविला तेथे पर्यंतची हकीकत म्हणजेच पेशव्यांचा उदय व अस्तापर्यंतचा इतिहास या बखरीत येतो. ही बखर प्रामुख्याने मराठ्याच्या पराक्रमांची गाथा सांगणारी आहे.

**२. भोसले वंश चरित्र :** हे चरित्र तंजावर संस्थाच्या व्यंकोजीच्या घराण्यातील शरफोजी यांनी इ.स. १८०३ मध्ये ती बृध्दीश्वराच्या देवळातील शिलेवर कोरून घेतलेली आहे. ही शिलालेखीत बखर आहे. ही तिचे वैशिष्ट आहे. बखरीच्या पूर्वार्धांत शहाजी व शिवाजी यांच्या कर्तृत्वाचा आलेख येतो. उत्तरार्धात व्यंकोजीपासून शरफोजी पर्यंतचा तसेच चरित्र लिहून घेईपर्यंतचा इतिहास सांगितला आहे. लेखन पध्दती पौराणिक आहे.

**३. मराठी साम्राज्याची छोटी बखर :** ही बखर गणपत गोविंद बर्वेयांनी इ.स. १८१७ मध्ये लिहीली. मालोजीराजेपासून ते शेवटचा छत्रपती प्रतापसिंह येथेपर्यंतची हकीकत यामध्ये येते छत्रपतींच्या माहितीपेक्षा पेशव्यांच्या हकींकतींना प्राध्यान दिले आहे.

**समारोप :** मराठी वाडमयातील गद्य वाडमय समृध्द करण्याचे श्रेय बखर वाडमयाला जाते. बखरीमध्ये राजकीय घटना वर्णन केलेल्या असल्या तरी बखर म्हणजे इतिहास नाही. त्यात ऐतिहासिकता कमी आणि काल्पनिकता व अवास्तपणा यांना जास्त महत्व दिले आहे. ऐतिहासिक दृष्टीने बखर वाडमयात दोष आढळतात. या दोषांना बखर वाडमयांची वैशिष्टये आपण मानू शकतो. बखरीमध्ये स्थल, काल, व्यक्तीविपर्यास, झालेला अनेक बखरीत पहायला मिळतो. तो मुद्दाम केलेला असल्याची शक्यता नाही. पण या गोष्टीबद्दल लेखनात जागृतता हवी होती.

अनेक बखरी या आपल्या धन्याच्या आज्ञेवरून लिहिलेल्या आहे. लिहिणारे लेखक पगारी नोकर होते. त्यामुळे त्यात आपल्या धन्याचा फाजील गौरव व पराक्रम याला महत्व दिले आहे. या बखरी स्वंयप्रेरीत नसल्याने त्यात अतिशयोक्ती आणि कल्पनाविलास याला महत्व दिल्याचे जाणवते. कोणतेही घटना पाहणारा प्रत्यक्षपणे साक्षीदार नसतो. यामुळे काल्पनिक व असत्य घटना याची चित्रण या बखरीमध्ये झाले आहे. मराठी बखरीत अनेकदा भिन्न भिन्न पुराणकथांचा वंशावळीचा उल्लेख आढळतो. बखर वाडमयात अनेक काल्पनिक कथा वर्णने दंतकथा यांचा आधार घेतला जातो. म्हणून त्या ऐतिहासिक दृष्टया विश्वसनीय वाटत नाही.

बखर वाडमयात असे दोष असले तरी इतिहास संशोधनाच्या दृष्टीने त्यांना थोडेफार महत्व आहे. कारण ते तत्कालिन समाजशास्त्रीय व ऐतिहासिक संशोधनाचे एक साधन आहे. त्यामध्ये काही ऐतिहासिक घटनेचा उल्लेख असतो. तसेच त्यातून तत्कालिन समाजाच्या जीवनाचे चित्र उमटलेले असते.

**संदर्भग्रंथ :**


१. प्राचीन मराठी वाडमयाचा इतिहास खंड ६ – श्री अ.ना. देशपांडे

२. प्राचीन मराठी वाडमयाचा इतिहास – प्रा. ल.रा. नसिलाबादकर

३. प्राचीन वाडमयाचा इतिहास – श्री ह.श्री. शेणोलीकर

ISBN 978-93-5196-698-2

# बखरीतील पौराणिक उपमा-दृष्टांत

डॉ.सुरेश बा. शिंदे
विभाग प्रमुख-बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी, जि. सांगली

**प्रस्तावना** : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास पाहता आपल्याला असे दिसून येते की या कालखंडात पद्यरूपातच मराठी साहित्य अवतरले. त्याकाळात पाठांतर करून साहित्य लक्षात ठेवण्याची परंपरा होती. त्यामुळे पद्यरूपात हे साहित्य निर्माण झाले. या कालखंडामध्ये महानुभाव संप्रदायातील चरित्र ग्रंथ, एकनाथांची काही स्फुट प्रकरणे, फादर स्टीफन्सच्या 'क्रिस्तपुराण' ची प्रस्तावना असे काही अपवादात्मक साहित्य गद्यामध्ये निर्माण झालेले दिसते. या पद्याच्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर गद्यामध्ये अवतरलेले बखर वाङ्मय आपले वेगळेपण सिद्ध करते. 'महिकावतीची बखर' या बखरीचा अपवाद वगळता इतर सर्व बखरी गद्य स्वरूपामध्ये निर्माण झालेल्या दिसतात. सतराव्या शतकराच्या उत्तरार्धात शिवाजी महाराजांचे राज्य स्थापन झाले आणि मराठी भाषेला राजभाषेचे स्वरूप प्राप्त झाले. याकाळात पद्यातून जसे पराक्रमाचे पोवाडे गायले जाऊ लागले त्याचप्रमाणे हाच पराक्रम गद्यामधूनही चित्रित होऊ लागला. आणि बखर वाङ्मय निर्माण झाले. प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासामध्ये बखर गद्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. बखरीकडे ऐतिहासिक दृष्टिकोणातून ज्याप्रमाणे पाहिले जाते त्याचा अभ्यास केला जातो, त्याचप्रमाणे वाङ्मयीन दृष्टिकोणातून त्याची चिकित्सा केली गेली आहे. कारण बखरी या वाङ्मयीन गुणांनीयुक्त आहेत.

**बखरीचे स्वरूप** : 'खबर' या अरबी शब्दाचा विपर्यास होऊन बखर शब्दाची निर्मिती झाली आहे असे इतिहासाचार्य राजवाडे यांनी म्हंटले आहे. मुसलमान राजवटींमध्ये घडणाऱ्या घडामोडींच्या आधारावर तवारिखा लिहिण्याची पद्धत होती त्यावरून मराठ्यांनीही बखरी लिहिल्या असे राजवाडे म्हणतात. बखरीचे राजकीय स्वरूपाचे ऐतिहासिक लेखन असे स्वरूप आहे. मराठ्यांच्या इतिहासातील निरनिराळ्या घटना-प्रसंगावर जवळ जवळ २०० ते २५० बखरी लिहिल्या गेल्या आहेत. बखरीच्या रचनेवरून व त्याच्या स्वरूपावरून बखरीचे वेगवेगळे प्रकार पडतात. समकालीन, उत्तरकालीन, सांप्रदायिक, पौराणिक असे प्रकार पडतात. त्याचप्रमाणे चरित्रात्मक, प्रसंगात्मक, आत्मचरित्रात्मक, घराण्याचा इतिहास असेही बखरीचे प्रकार पडतात, समकालीन बखरींना ऐतिहासिक दृष्टिने महत्त्व असते. कारण त्या बखरींमध्ये ऐतिहासिक प्रामाण्य असते. अर्थात कागदपत्र व ऐतिहासिक पुराव्याच्या साहयाने लिहिलेल्या उत्तरकालीन बखरीमध्येही ऐतिहासिक प्रामाण्य अधिक असते.

मराठी बखरींच्या स्वरूपाचा विचार करता बखरींचे लेखन हे इतिहासाच्या शास्त्रीय भूमिकेने झालेले नाही. त्याचप्रमाणे ते वाङ्मयीन भूमिकेनेही झाले नाही. 'बखर लेखन किंवा बखररचना या शब्दप्रयोगा ऐवजी 'बखर सजविणे' असा प्रयोग वापरीत. उदारणार्थ, रघुनाथ यादव पाणिपतच्या बखरीच्या शेवटी यथामत्तीने बखर सजवून सेवेशी पाठवली आहे असे म्हणतो. बखर सजविणे या शब्दप्रयोगात लेखनाचा हेतू स्पष्ट होतो. त्यातूनच सौंदर्य प्रमाणबद्धता प्रकट होते. स्वाभाविकपणे त्यामध्ये वाङ्मयीन गुण येतात.

बखर लेखकांची नावे पाहता आपल्या लक्षात येते की, यातील बहुतेक बखरकार दप्तरीकारकून होते. त्याचप्रमाणे ते श्रद्धाळूही होते. त्यांचा रामायण-महाभारतादी पुराणग्रंथांचे श्रवण पठण होते. त्यामुळे बखरीमध्ये अनेक पौराणिक संदर्भ व दाखले येतात. काही बखरींच्याद्वारे या पौराणिक संदर्भ दाखल्यांचा विचार करू.

**शिव-छत्रपतींच्या चरित्र (सभासदाची बखर) :**

कृष्णाजी अनंत सभासद यांने रचलेले शिवाजी महाराजांचे चरित्र म्हणजेच ही बखर होय. याला सभासदाची बखरही म्हणतात. शिवछत्रपतींपासून राजाराम महाराजांच्या अखेरीपर्यंत कृष्णाजी अनंत दरबारी सभासद होते. त्यामुळे एका समकालीन व्यक्तीने लिहिलेली बखर म्हणून ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टिने या बखरीचे महत्त्व अधिक आहे. या वर्णन विषयातील अनेक घटनांचा साक्षीदार बखरकार होता तरीही अनेक पौराणिक दाखले, उपमा व संदर्भ या बखरीमध्ये येतात. अफजल खानाचा वध शिवाजी महाराजांनी केला त्याचे वर्णन करताना बखरकार म्हणतो 'मागे कौरवांचा क्षय पांडवीं केला, असा वीरावीरांस झगडा जाहाला.... अफजलखान सामान्य नव्हे केवळ दुर्योधनच जातीने होता. आंगाचा, बळाचाही तैसाच आणि दृष्टबुद्धीने तैसाच. त्यास एकले भीमाने मारिला. त्याचप्रमाणे केले शिवाजी राजाही भीमच त्यानीच अफजल मारिला हे कर्म मनुष्याचे नव्हे अवतारीच होता तरीच हे कर्म केले' येथेशिवाजीमहाराजांची तुलना भीमाबरोबर केली आहे. तर अफजलखानाची तुलना दुर्योधनाबरोबर केली आहे. खरेतर शिवाजीमहाराज भीमासारखे बदलंड नसूनही आणि सभासदाने प्रत्यक्ष शिवाजी महाराजांना पाहूनही सभासद अतिशयोक्ती पूर्ण वर्णन करतो. कारण यामध्ये त्याला शिवाजी महाराजांच्या युक्ती आणि शक्तीचे मोठेपण सिद्ध करायाचे आहे.

शिवाजी महाराजांचा राज्याभिषक करण्यासाठी काशीवरून गागाभटआले याची तुलना ब्रम्हदेवाशी करताना सभासद म्हणतो, 'भट गोसावी थोर पंडित, चारवेद साहाशास्त्रे, योगाभ्याससंपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येने निपुणे कलयुगींचा ब्रम्हदेव'. विद्वान म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या गागाभटाची तुलना थेट ब्रम्हदेवाशी सभासद करतो. तर शिवाजी महाराजांचा राज्याभिषेकासाठी तयारी बाबत सभासद लिहितो, 'पूर्वी कृतायुगी, त्रेतायुगी, द्वापारी, कलयुगाचे ठायी पुण्यश्लोक राजे सिंहासनी बैसले त्यापद्धतीप्रमाणे शास्त्रोक्त सर्वही साहित्य सिद्ध केले' त्या कालखंडामध्ये गागाभटची विद्वान म्हणून किती ख्याती होती हे ब्रम्हदेव या उपमेमुळे कळते. त्याचप्रमाणे शिवाजीमहाराज या राज्याभिषेकामुळे पूर्वयुगातील राजांच्या जोडीला जाऊन बसले हे बखरकाराला येथे स्पष्ट करावयाचे आहे.सभासदाची बखर ही समकालीन बखर आहे. कृष्णाजी अनंत सभासद याने या बखरीमध्ये वर्णन केलेले अनेक प्रसंग व व्यक्तीही प्रत्यक्ष पाहिलेल्या होत्या. तरीही तो अतिशयोक्तीपूर्ण वर्णन करताना दिसतो. कारण बखरकारांना त्याव्यक्तीचे मोठेपण वाचकांवर बिबंवायचे असते.

**पाणिपतची बखर :**

पाणिपताची बखर ही बखर रघुनाथ यादव याने नानासाहेब पेशव्यांची पत्नी गोपिकाबाई हिच्या आज्ञेने लिहिली आहे. इ.स. १७६३ मध्ये याचे लेखन झाले आहे. याच लेखकाने शिवाजी महाराजांची बखर चित्रगुप्त या नावाने लिहिली होती. हा बखरकार पाणिपतच्या युद्धाच्यावेळी हजर होता. पाणिपतच्या युद्धाची तुलना महाभारताच्या युद्धाशी करताना बखरकार म्हणतो, 'कौरव-पांडवांचे युद्ध जाहाले ते पुराणोक्त थोर वक्ते सांगतात आणि श्रोते ऐकितात ते वर्तमान प्रत्यक्ष पाहाणे प्राप्त जाहाले' पाणिपतच्या युद्धाची व्यापकता यातून स्पष्ट करताना बखरकार दिसतो.

या युद्धात सहभागी झालेल्या योद्धानां भीमार्जुनासारिखे महावीर असे तो म्हणतो. या युद्धात मृत्यू पावलेल्या मराठी वीरांबद्दल तो म्हणतो 'कितीकवीरांच्या पाठीतून भाला हृदयापार होऊन आपआपले पुण्याने कोणी विष्णु लोकास गेले, कोणी कैलासास गेले, कोणी सत्यलोकास गेले, काणी इंद्रलोकास गेले' या वर्णनमागे युद्धामध्ये मृत्यूप्राप्त झाल्यास पुण्य मिळते व स्वर्गप्राप्ती होते हा समज कारणीभूत ठरतो. हे युद्ध पाहण्यासाठी इंद्रसुद्धा सुरगण विमानांत बसून अंतराळात

आला असे बखरकार म्हणतो' यावरून बखरकाराच्या दृष्टिने हे युद्ध किती अपूर्व होते हे स्पष्ट करावयाचे आहे.

पाणिपतच्या युद्धाला तोंड फुटेना व रसद बंद झाल्यामुळे अन्नपाण्यावाचून लोक मरू लागले. त्याबद्दल मल्हारजी होळकर, जनकोजी शिंदे इ. मंडळी सदाशिवपंतांशी चर्चा करण्यासाठी आली. त्यांच्या चर्चेमध्ये पौराणिक दाखले दिसून येतात. मल्हारराव होळकर यांणी दुष्टांत दिला जे, 'द्वापारयुगी राजा दुर्योधन शत बंधूसहित राज्य करीत असता द्रोपदीमुळे सर्व राज्य लयास गेले. तेकाळी व्यासांनी व विदुरांनी व श्रीकृष्ण परमात्मा यांनी बहूत प्रकार सांगितले परंतु राजाचे म्हणणे की सुईच्या अग्री मृत्तिका देणार नाही याहट्टामुळे मार्गशीर्ष वद्य ३० अमावस्या सायंकाळी राजा दुर्योधन गदायुद्धांत पडून राज्य हारविले' या सगळ्या तत्कालीन व्यक्तीवर व त्याचबरोबर बखरकारांवर असलेला पुराणांचा पगडा दिसून येतो. एखादी गोष्ट पटवून सांगण्यासाठीही पुराणातील दाखले दिले जातात ही त्याकाळातील जनसमूहाची मानसिकता होती हे येथे स्पष्ट होते. बखरकार सदाशिवभाऊच्या पराक्रमाने प्रभावित झाला आहे. त्यामुळे तो सदाशिवभाऊंची तुलना पुराणातील व्यक्तीरेखांशी करताना दिसतो. त्यासमयी भाऊ कसा भासला की केवळ कल्पांतीचा आदित्य!.... हा केवळ कलियुगी कर्ण जन्मला यात संदेह नाही' 'भारती युद्धासमान सदाशिवपंतानी युद्ध केले या कलियुगी मानवजातीत ब्राम्हण कुळांत जन्म घेऊन पराक्रम थोर केला... धन्य त्या पुरूषाचा पिता!त्यास सम्म्यता दशरथाची किंवा पंडूची चिमाजी आपाची धन्य की हा पुत्र रामाप्रमाणे निर्माण जाहाला! मानवी होऊन, जातीचा विप्रअसता प्रताप कर्णा प्रमाणे केला!! केवळ राम रावण यांच्या युद्धा-समान युद्ध जाहाजे.' वरील प्रमाणे पाणिपतची बखर या बखरीमध्ये पौराणिक दृष्टान्त व उपमा येतात. याही बखरकारावर पुराणांचा पगडा मोठ्या प्रमाणात दिसून येतो. सदाशिवभाऊ बद्दल असणारा आदरही पदोपदी दिसून येतो. त्यामुळे तो सदाशिवभाऊची तुलना कर्णाशी, रामाशी करताना बखरकार दिसतो.

**भाऊसाहेबांची बखर :**

मराठी बखरीमध्ये वाङ्‌मयीन गुणांनी श्रेष्ठ बखर म्हणून ज्या बखरीचा उल्लेख केला जातो ती बखर म्हणजे भाऊसाहेबांची बखर. या बखरीचा कर्ता कोण? याबद्दल मतभिन्नता आहे. का.ना.साने यांनी संपादित केलेल्या बखरीमध्ये कृष्णाजी शामराव मुक्काम दिल्ली इंद्रप्रहस्थ असा उल्लेख आढळतो.

रोहिल्याचा वकील चेतराम व दत्ताजी शिंदे यांच्यामध्ये बोलणी होतात. त्यावेळी दत्ताजी शिंदे खंडणी मागतात ही घटना हस्तिनापूर येथे घडते. त्यावेळी वकील उत्तर देतो, 'कौरव पांडव यांचा घरकलह लागला ते समई भगवान श्रीकृष्ण परमात्मा याणे आपले आंगे येऊन याच वटवृक्षाखाली सिष्टाई केली ते समई दुर्योधन याणे उत्तर केले की, सुईचे आग्रावरील मृतिका प्राप्तव्हावयाची नाही... साक्षात भगवान याची सिष्टाई याच जागीसिधीस गेली नाही तेथेतुमचा मनसोबा काय सिधीस जातो?' यावरून परकीय वकीलावरही महाभारताचा असणार पगडा सिद्ध होतो. त्याचप्रमाणे पुराणातील स्थळाचा जनमानसावरील पगडा या उदाहरणावरून दिसून येतो. आयोध्येच्या सुज्यातदौला याच्या अचाट शरीरबळाचे वर्णन करताना बखरकार म्हणतो, 'तो केवळ मनुष्य नव्हे.प्रत्यक्ष जातीचे दैत्य व कुळीही दैत्याची' मन्सूर अली सारख्या व्यक्तीला सुज्यात दौलासारखा अचाट शक्तीचा मुलगा झाला. अविंधावर अशी परमेश्वराची कृपा झाली हे सांगताना तो पुराणातील उदाहरणे देताना म्हणतो, 'दैत्यकुळी भक्त प्रल्हाद झाला की नाही? तसेच राक्षसकुळी बिभीषण जाहला की नाही? तसे आविंदी मतलवासी कारण नाही'

सदाशिवभाऊ व नानासाहेब यांच्या बंधुप्रेमाची तुलना करताना खबरकार म्हणतो, 'राम-लक्ष्मणाचा जोडा तुमचा'

दत्ताजी शिंदे यांच्या मृत्यचे दुःखद वर्तमान ऐकल्यावर भाऊंची जी शोकाकुल अवस्था झाली ती सांगताना बखरकार म्हणतो, 'राजा दशरथास कैकयेचे शब्दाबाण किंवा जानकी हरणे रामचंद्र किंवा रूक्मिणी सैवराचे ठायी राजा शिशुपाल तैशी गत भाऊंची जाली'सदाशिव भाऊंच्या मृत्यूचा धक्का नानासाहेबांना बसतो त्यातच त्यांचा अंत होतो. याबद्दल बखरकार म्हणतो, 'श्रीरामचंद्रजी वनवासास गेलियावर मागे राजा दशरथास रघुनाथ वियोगाचे दुःख होऊन राम ! राम! म्हणता शोक करून प्राणत्याग केला, त्याप्रमाणे नानासाहेब भाऊसाहेबांच्या शोके निधन पावले' यातून बखरकार सदाशिवभाऊ व नानासाहेब पेशवे यांच्यातील बंधुप्रेम प्रकट करतो. 'भाऊसाहेबांची बखर' या बखरीमध्येही अशा प्रकारे पौराणिकदृष्टांत उपमा येतात. या बखरकारावरही पुराणाचा पगडा दिसतो. हा बखरकार तर पौराणिक स्थळांचे संदर्भही पुन्हा जागृत करून वर्तमानाशी जोडताना दिसतो हे या बखरकाराचे वेगळे वैशिष्ट म्हणता येईल.

**निष्कर्ष :**

प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासामध्ये बखरी आपल्या स्वरूपामुळे वेगळेपण प्रकट करतात. बखर लेखन करणारे बखरकार हे प्रामुख्याने दरबारामध्ये कारकून पदावर काम करणारी मंडळी होती. राजाश्रयामुळे मानसिक व आर्थिक स्वास्थ्य असणाऱ्या या बखरकारांनी बखरीचे स्वरूप प्रदीर्घ ठेवले. या बखरकारांवर पुराणांचा मोठा पगडा आहे. स्वाभाविकपणे या बखरींमध्ये पौराणिक दृष्टान्त व उपमा येतात. यामुळे बखर लेखनाचे स्वरूप बाळबोध वळणाचे होते. यातील बहुतेक बखरी आज्ञेतून निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे ज्या पक्षाच्या बाजूने लेखन करावयाचे त्या पक्षातील व्यक्तींना पुराणातील व्यक्तीरेखांच्या उपमा देऊन त्यांचे मोठेपण सिद्ध करण्याचा प्रयत्न झालेला दिसतो.त्याचप्रमाणे विरूद्ध पक्षातील व्यक्तीची निंदा करण्यासाठीही पुराणातील उपमा दिलेल्या दिसतात. 'भाऊसाहेबांच्या बखरी' मध्ये स्थळांचेही पौराणिक संदर्भ येतात व स्थळ महात्म्य सांगितले जातात. या दृष्टान्त उपमामध्ये रामायण महाभारतातील उपमा दृष्टान्तांचीच संख्या विपुल दिसते. याला कारण या पुराणांचा पगडा समाजमनावर अधिक आहे. तसाच या बखरकारांवर ही दिसून येतो. बखरकारांच्या या पौराणिक उपमा - दृष्टान्त मागील हेतू अशा प्रकारचा दिसून येतो.

**साधन संदर्भ :**

१. संपा. र. वि. हेरवाडकर, शिव-छत्रपतीचे चरित्र, पुणे, व्हीनस प्रकाशन, १९८६, पृष्ठ २३, ९२, १००, १०२,

५. संपा. र. वि. हेरवाडकर, पाणिपताची बखर, पुणे, व्हीनस प्रकाशन,
आवृत्ती तिसरी जुलै १९९७ पृ. १५, २९,२८,३५,४२,४५

११. संपा. मु.श्री. कानडे, भाऊसाहेबांची बखर, पुणे, स्नेहवर्धन प्रकाशन, १९९३ पृष्ठ ९६

१२. तत्रैव पृ. १३६ १३.तत्रैव पृ.१४६ १४.तत्रैव पृ.१४७ १५.तत्रैव पृ. १९४

१६. तत्रैव पृ. १९० १७.तत्रैव पृ.२०३ १८.तत्रैव पृ. २६४

**संदर्भ ग्रंथ :**

१. मराठी बखर, र.वि. हेरवाडकर, पुणे, व्हीनस प्रकाशन, आवृत्ती दुसरी - १९७५

२. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल.रा. नसिराबादकर, कोल्हापूर, फडके प्रकाशन, आठवी आवृत्ती जुलै २००५.

ISBN 978-93-5196-698-2

# बखरवाड.मय निर्मीतीमागची प्रेरणा, प्रयोजने व स्वरूप

**डॉ. सुनिता उम्रस्कर**
मराठी विभाग, गोवा विद्यापीठ, ताळगांव पठार, तिसवाडी-गोवा

मराठी वाड.मय क्षेत्रामध्ये 'बखर' हा एक महत्त्वाचा वाड.मय प्रकार मानला जातो. बखर हा महानुभावीय गद्यग्रंथपरंपरेचा वारसा जोपासणारा, मध्ययुगीन मराठी साहित्यातील वाड.मयीन व भाषिकदृष्ट्या वैभवशाली व संपन्न असा गद्य वाड.मय प्रकार मराठेशाही व पेशवाईमध्ये विशेष बहराला आला.

पाठांतर सुलभतेमुळे प्राचीन मराठी साहित्य हे बहुतांशी पद्यमय स्वरूपातच निर्माण झाले. मराठी भाषेच्या उगमाविषयी विचार करताना आपल्याला ताम्रपट, शिलालेख, ज्योतिष व वैद्यक, जारण-मारण प्रयोगाच्या, जमाखर्चाच्या चोपड्या इत्यादी लिखित वाड.मयापर्यंत जाता येते. हे सर्व वाड.मय तत्कालीन बोली भाषेतूनच निर्माण झाल्याने ती बोली भाषा ही व्यवहार भाषा न राहता ती ग्रांथिक भाषा बनली. तेराव्या शतकांतील गद्यवाड.मयाचे स्वरूप हे प्रामुख्याने तत्त्वचिंतनपर व धार्मिक-सांप्रदायिक स्वरूपाचे होते. महानुभाव संप्रदायातील 'लीळाचरित्रा'दि गद्यग्रंथ आणि 'दृष्टांतपाठा'चा समावेश ललितगद्यातच होतो. या गद्यग्रंथाच्या केंद्रस्थानी 'श्रीचक्रधर' असल्याने तेच त्यांच्या विचारचिंतनाचे स्फूर्तिकेंद्र बनले.

बखर लेखनाच्या उद्‌गमाच्या काळाचा विचार करता इस्लामी राज्यकर्त्यांचा महाराष्ट्राशी संबंध आल्यानंतरच त्यांच्या 'तवारिखां' व 'अखबारी' महाराष्ट्रीयांच्या अवलोकनात आल्या असाव्यात.[१] 'तवारिखां' व 'अखबारी' मध्ये इतिहासलेखन करण्याची प्रथा इस्लामी राज्यकर्त्यांनी रुढ केली होती. इस्लामी राजवटीमुळे निर्माण झालेल्या भ्रष्टतेमुळे लोकमानसामध्ये अराजकता निर्माण झाली होती. व त्याच्यातून लोकप्रबोधनहेतू पौराणिक-धार्मिक कथा, आपल्या ऐतिहासिक पुरुषांची चरित्रे, आपल्या राजांच्या, दरवाराच्या, सरदाराच्या घराण्याची माहिती सांगून आपल्या वैभवशाली इतिहासाचे कथन करणे बखरकारांना महत्त्वाचे वाटले. त्यासाठी तत्कालीन लेखनप्रकार 'तवारिखां' व 'अखबारी' यासारखेच लेखनकरून ते वाचकांसमोर आणणे त्यांना जास्त सोयीचे वाटले असावे.

मराठीमध्ये बखरींची संख्या बरीच असून भाषा व साहित्यगुण या दृष्टीने त्याचे महत्त्व फार मोठे आहे. बखरीतील वाड.मयीन गूणविशेष पाहता त्यामध्ये रसपूर्ण प्रसंग व वक्तृत्वपूर्ण शैली आढळते. म्हणी वाकप्रचार व सुभाषितांचा वापर, संवादकौशल्य, रेखीव प्रसंगवर्णने व स्वभावचित्रणे, चित्रमयता, अतिशयोक्ती, अद्भुतता व रंजकता ही कथनगुणवैशिष्टये तसेच वीर, करूण इत्यादी रसांची उत्कटता, प्रसाद ओज या गुणांचा प्रत्यय व आवेशपूर्ण, प्रौढ व रसाळ फार्सी-उर्दू मिश्रीत भाषा ही बखर वाड.मयाची वैशिष्टये आहेत.

बखरवाड.मयाचे स्वरूप पाहता त्यातील विषयामध्ये विविधता जाणवते. चरित्रात्मक बखरी, प्रसंगाच्या हकीगती सांगणारी बखरी, स्थलविषयक माहिती देणाऱ्या बखरी, संप्रदायांच्या बखरी, पौराणिक बखरी इत्यादी. चरित्रात्मक बखरीमध्ये शिवदिग्विजय, शिवचरित्र, सभासदाची बखर, सप्तप्रकरणात्मक बखर, चित्रगुप्ती बखर, शिवप्रताप, रायरी बखर इत्यादी बखरी येतात. घराण्याच्या हकीगती सांगणाऱ्या बखरीमध्ये दाभाडे, गायकवाड यांचे घराण्याची बखर येते. प्रसंगाच्या हकीगती सांगणाऱ्या बखरीमध्ये पानिपतची बखर, स्थलविषयक माहिती देणाऱ्या बखरीमध्ये महाबळेश्वरची जुनी माहिती देणारी बखर, संप्रदायांच्या बखरीमध्ये समर्थांची बखर, हनुमंत स्वामींची बखर इत्यादी बखरी पाहता येईल, तर शिक्षणार्थ लिहिलेल्या बखरीमध्ये स. माधवरावांसाठी लिहिलेली बकासुराची बखर घेता येईल. विशिष्ट ऐतिहासिक काळाची बखर म्हणजे पेशवाईच्या अखेरची अखवार बखर तर नानाफडणवीसाचे आत्मचरित्र ही आत्मचरित्रात्मक बखर म्हणून पाहता येईल.

याच्यानंतर आणखी काही विषय म्हणजे विशिष्ट पक्षीय बाजू दर्शक बखर- होळकरांची थैली, कलमी बखर- ९१

कलमी बखर, वृत्तबातमी लेखनपर बखर- शके १७४० मधील माहितीपर बखर, भाषांतरीत बखर-बुंदल्यांची बखर, पौराणिक बखर- कृष्णजन्मकथा, माघ माहात्म्य, धर्मविषयक बखर- ख्रिस्ती मंडळीची बखर, अशा अनेक बखरी वेगवेगळ्या विषयानुरुप लिहिल्या गेल्या.

बखरीचे इतके प्रकार जरी असले तरी स्थूल मानाने केवळ तीन प्रकार मानता येतात. त्यातला एक प्रकार म्हणजे चरित्रपर बखर. या बखरींचा मुख्य हेतू व्यक्तीचित्रे मांडणे हे असते. ही व्यक्ती लोकोत्तर असते. त्यांच्याद्वारे लोकोत्तर प्रसंग, त्या व्यक्तींच्या महत्त्वाकांक्षा, शौर्य, औदार्य, स्वाभिमान, स्वामिनिष्ठा, लोभ, मत्सर इत्यादी प्रेरक भावना या सर्वांचे निरुपण बखरीतून केलेले असते. तसेच राजकीय उलाढालीबरोबरच तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे चित्रण करताना तत्कालीन समाजाच्या नैतिक, धार्मिक, कौटुंबिक जीवनातील चित्रण बखरकार करीत असतो. दुसरी माहितीपर बखर या बखरीमध्ये केवळ हकिगत आलेली असली तरी वेगवेगळ्या उपमा अलंकाराद्वारे ती हकीगत रसपूर्ण व्हावी याकडे लेखकाचा कल असलेला दिसतो. म्हणजे केवळ हकिगत सांगताना त्यामध्ये रसविष्कार झाला तर ती अधिक सरस उतरणार आणि वाचकांची ती हकीगत ऐकण्याची उत्कंठा वाढीस लागणार हा जाणीवपूर्वक हेतू हे गद्य रचताना लेखकांनी बाळगलेला दिसतो. तिसरी धर्मविषयक बखर, यामध्ये अधर्मीयांना धर्माविषयी जाणीव करून देणे व अनितीच्या मार्गावरून नीतीच्या मार्गावर आणणे हा हेतू दिसतो. एकंदरीत व्यक्ति, माहिती व धार्मिक जीवन याविषयी लोकांना ज्ञान करून देणे हे या बखरी मागचे प्रयोजन दिसते.

काव्यंयशसे, अर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये।

सद्यः परनिवृत्तये कान्ता संमित तयोपदेशयोपदेश युजे।। ही मम्मटकृत प्रयोजने आहेत.[२]

व्यवहारज्ञान हे प्रयोजन मानले तर बखरकाराला व्यवहारज्ञान असल्याचे व त्याचे ज्ञान तो वाचकांना किंवा श्रोत्यांना देत असल्याचे दिसते. बखरीचे स्वरूप पाहता बखरीमध्ये आलेल्या हकीगतीची व चरित्राची माहिती बखरकाराला असणे अगत्याचे ठरते. त्यासाठी शास्त्रांचा परिचय, संस्कृतीची ओळख, चालीरितींची माहीती, व्यासंग, अभ्यास, कल्पनाशक्तीची देणगी, भाषेवर हुकमत सूक्ष्म निरीक्षणशक्ती व मानवी स्वभावाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. हे जीवनव्यवहाराचे ज्ञान त्याच्या साहित्यातून प्रसंगपरत्वे वाचकांना मिळते. बखरवाड.मयातून मानवी स्वभावाचे घडणारे दर्शन, त्यांच्या सुष्ट-दुष्ट कृती, राजकारणाचे डावपेच, सज्जन व लबाड माणसांच्या जीवनकथा या दृष्टीने व्यवहार ज्ञान देण्याचे कार्य हे साहित्य करते.

अशुभनिवारण हे प्रयोजन आज तितकेसे महत्त्वाचे मानले जात नसले तरी तत्कालिन समाजव्यवस्थेच्या मानसिकतेमध्ये अशुभनिवारणासाठी साहित्याकडे वळणे हे प्रयोजन मानवी व्यवहारातील परंपरेचे द्योतक आहे. काही बखरीत हे प्रयोजन आढळून येते. उदा. 'चरित्र पुण्यश्लोक राजियाचे जे घरी लिहून ठेवतील त्यांच्या भाग्यास पारावार नाही व जे वाचतील त्यांस मोठे पुण्य जोडेल. निपुत्रियांस पुत्र होतील व दरिद्रियांस लक्ष्मीवंत होतील व अपेशियांस यशवंत होतील व पुण्यश्लोक, पराक्रमी जे पुत्रवंत असतील त्यांसहि पुत्र होतील. जे लक्ष्मीवंत असतील, ते विशेष भाग्यवंत होतील. यशस्वी असतील ते दिग्विजय होतील. येणेप्रमाणें सर्व मनोरथ पूर्ण होतील.'[३] काही पौराणिककथावाड.मयातून निर्माण झालेल्या पौराणिक बखरीमागे समाजातील वाईटाचे, दुष्टपणाचे निर्दालन हेच प्रयोजन असल्याचे जाणवते. प्राचीन साहित्यशास्त्रज्ञांच्या काळामध्ये धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चातुर्वर्गप्राप्तीचे एक साधन म्हणून काव्याकडे पाहिले जात होते. त्याचे रुपांतर हे नंतरच्या काळामध्ये आराधना, भक्तिच्याद्वारे अशुभनिवारण होते अशी श्रद्धा निर्माण झालेली दिसते. आपल्या जीवनजाणिवा अधिकाधिक व्यापक करण्याचे, विस्तृत करण्याचे व आपले मन समृद्ध करण्याचे कार्य साहित्याकडून होत असते. बखर वाड.मयातूनही या प्रयोजनचा विचार करता येऊ शकेल.

उद्‌बोधन किंवा उपदेश करणे हे ही साहित्यामागचे एक प्रयोजन मम्मटाने सांगितले आहे. उद्‌बोधन हे एखाद्या सामाजिक प्रश्नाचे व तत्त्वाचे नाही तर जीवनाच्या व्यापकपणाशी ते संबंधित असते. बखरवाड.मयातून आलेल्या चरित्राद्वारे व प्रसंगाद्वारे समाजमानसाला उपदेश वा उद्‌बोधन होऊ शकते. उदा. भाऊसाहेबांची बखर, तसेच हे कथन करीत असताना काही बखरीमध्ये आलेल्या म्हणी, वाकप्रचार हे त्याचेच द्योतक आहे. उदा. शरण आलियासी मरण चिंतू नये, सुपांतील

हासती-जात्यातील रडती, जैसी क्रिया धरावी तैसे फळ भोगावे, साठी बुद्धी नाठी (भाऊसाहेबांची बखर)

सद्य:परनिवृत्तये हे प्रयोजन हे जीवनवादी विचारधारेपेक्षा वेगळे आहे. लेखकाला आत्मविष्कारामुळे लाभणारे समाधान हे प्रयोजन अतिशय मौलिभूत ठरते. मम्मटाने हे मुख्य प्रयोजन मानले आहे. बखर वायय हे बहुतेकरून कोणाच्यातरी आज्ञेने लिहिलेले जाणवते. त्यांच्या विषयी बखरकारांना आस्था असलेली दिसते. त्यामुळे त्यांची स्वयंप्रतिभा जरी दिसत असली तरी दुसऱ्या व्यक्तीला समाधान देणे हा उद्देश त्यामागे दिसतो.

राजवाडे यांनी संपादित केलेली महिकावतीची बखरमध्ये निवाडे, हकीगती, लढायांची वर्णने व वंशावळी आहे जी गद्य-पद्य मिश्रित आहे. शक १३७० मध्ये त्यावेळचा देसला नायकोराव याच्या सांगण्यावरून केशवाचार्याने ही वंशावळ सांगितली. त्यावेळी इस्लामी आक्रमणामुळे सर्वत्र भ्रष्टता माजली होती. लोक आवारहीन होऊन गेले होते. गोत्र, प्रवर, कुलस्वामी, कुलगुरु ह्यांची कोणासही आठवण नव्हती. महाराष्ट्रधर्म बुडत चालला होता. 'अशा संकट समयी श्रीदेवी कुलस्वामिनी, मालाडच्या देसला जो नायकोजीराव त्यांच्या स्वप्नांत येऊन सांगती झाली की, नायकोरावा, उठ महाराष्ट्रधर्म रक्षिण्याकरितां अठरा पगड जातीचा मेळावा कर आणि केळव्यापासून मुंबईपर्यंतच्या सर्व गांवचे, सर्व जातींचे व सर्व गोत्रांचे खलक जमवून त्यास केशवाचार्यांच्या मुखे महाराष्ट्रधर्म सांगीव'[४] यावरून देवीची आज्ञा मानून व देवीच्या आशीर्वादाने वंशपध्द्ती निरूपण केली. यामागचे प्रयोजन हे जनमानसांना अधर्माविषयी माहिती करून देऊन त्यांना धर्मनीतीकडे आकृष्ट करणे हे असलेले दिसते तसेच तत्कालिन समाजाला उद्‌बोधनकरण्याहेतूनीही या बखरीची निर्मिती झाली असे आढळून येते.

हनुमंत स्वामीची समर्थ चरित्राची बखर लिहिण्यामागची प्रेरणा अशी आहे, 'जन्म प्रभृतीपासून समाधीपर्यंत श्री समर्थांचे चरित्र म्हणजे अनंत लिला आहेत. त्या सर्व सांगण्याची बुद्धी कोणास आहे? तथापि तुम्ही प्रश्न केलात त्याप्रमाणे पूर्वी श्री गंगाधर स्वामी यांस शिष्यमंडळी यांनी श्रीचे चरित्र श्रवण करण्यास्तव सज्जनगड येथे विनंती केली.'[५]

गोविंद खंडेराव चिटणीस यांनी श्री शाहू महाराजांची बखर लिहिण्यामागचा उद्देश सांगताना लिहितात, 'हे ऐकून पुन: आज्ञा करते जाले की, हे संकलील सांगितले परंतु इत्यंभूत कळावे असा हेतू आहे. तर जेणे करून कार्याची तृप्ती होय आणि आस्थापूर्वक असा मजकूर आला असेल तसा कळवावा...'[६]

सप्तप्रकरणात्मक चरित्र लिहणाऱ्या मल्हार रामराव चिटणीसांनी बखरलेखनांची प्रेरणा सांगतांना लिहिले आहे, 'तुम्ही पुरातन सेवक, लेखनाधिकारी याजकरितां पूर्वीपासून महाराजांचे कुलाचे ठायी परमप्रतापी पूर्वज होत आले. त्यानी पराक्रम केले. सार्वभौम राज्ये केली... धर्मस्थापना केली व अमानुषी पराक्रम केले. त्याजपासून आजपर्यंत राज्य उपभोग वंशपरंपरा दक्षिणेत ठाई असे केले. पराक्रम काय केले हे चरित्रपूर्वीक दाखले वगैरे लेहून ठेवले असेल त्या अन्वये लेहून आणावे- जे श्रवण पठण, मनन केले असता सकलविद्या व गुणसंपन्नता व शौर्य, औदार्य गांभीर्य, दया, धर्म, नीती हे सहज उत्पन्न होत असावे म्हणून आज्ञा जाली. त्याजवरून शास्त्राचार, विष्णुपुराणातील दंडनीती, राजधर्म, राजगुरू व रमलशास्त्र व कारकिर्द वडिलार्जित होत्या... दिनचर्या, पराक्रम, कथाही होत्या, त्याचे आश्रये लेहून निवेदन केले की...'[७]

पेशवेकालीन हरिवंशाची बखर लिहिणारा बखरकार सांगतो, 'त्यात वडिल कृष्णंभट बापाजी यांचे वंशाचा व किर्तीचा विस्तार लिहतो... त्यांनी श्रीमंत पेशवे यांची सेवा ऐकनिष्ठपणे करून तैनाता व जहागिरी संपादन केल्या. त्या कसल्या केल्या, पेशवे यांची सेवा कशी केली व पराक्रम कसे केले ते वर्णन करिता..'[८]

शिवछत्रपतीच्या ९० कलमी बखरीत, बखर लिहिण्यामगची प्रेरणा अशी सांगितली आहे, ''सदरहू आख्यान संकलित ९० प्रकरण पुण्यश्लोक राजा याची कथा वर्तती ती लिहिली जाते.... वडीली संग्रह केला होता. रायगड दप्तरी वंशावळी होती. त्याची तालीक वडिलापाशी होती. संकलित लिहून ठेवली होती''[९]

काहीवेळा बखरकारांना त्यांच्या आश्रयदात्यांकडून इतिहास-लेखनाचा आदेश दिला गेल्याचे आढळते. 'सभासदाची बखर मध्ये राजाराम महाराजांनी कृष्णाजी अनंत सभासद यांना जी आज्ञा केली ती प्रारंभी नमुद केली आहे. 'आपले पिते थोरले राजे याणीं इतका प्राक्रम केला व चार पातशाहींशी दावा लाविला, ऐसा पराक्रम केला ऐसे असतां

औरंगजेब येऊन(त्याने) किल्ले किल्ली अनर्थ मांडला याचा अर्थ काय? तुम्ही पुरातन, राज्यातील माहीत(गार) लोक आहात तरी किस्तकाबिलपासून चरित्र लिहून देणे म्हणोन आज्ञा केली.'[१०] येथे आश्रित या अर्थाने लिहित असताना अतिशयोक्ती होणे किंवा अद्‌भूततेकडे झुकणे क्रमप्राप्त होते. जेजे विरतेकडे, पराक्रमतेकडे झुकणारे आहे त्यामध्ये वर्णनात्मकता येणेही अपरिहार्य असते, त्याच्यातून लेखन झाल्यामुळे कदाचित वास्तवतेकडे किंवा ऐतिहासिकतेकडे फारकत होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

बखरनिर्मितीमागील ही प्रयोजने, प्रेरणा व त्याचे स्वरूप पाहता हे लक्षात येते की बखरकाराची भूमिका ही इतिहास लेखकाची नव्हती. श्रेष्ठ व्यक्तिजीवनाचा विचार करणे, तो विचार करीत असताना त्याच्या जीवनातील प्रसंग घटनांचे विश्लेषण करणे, ज्यामुळे सामान्याना एक सन्मार्ग, सद्‌गती मिळून त्यांचा उद्धार करणे अशी श्रद्धा दिसते. श्रेष्ठ जीवन हे अनुकरणीय असते ही महत्त्वाची धारणा या लेखनामागे असलेली दिसते. स्वकीयांच्या कार्य आणि कर्तुर्वाबद्दल आदर व श्रद्धा तर परकीयांनी केलेल्या अन्याय अत्याचाराबद्दल चिढ किंवा उद्वेगाचे उद्‌गार यामुळे वाचकांच्या मनावर एक संस्कार घडावा या हेतूने हे लेखन झालेले दिसते. अनेकदा या इतिहासकारांच्या शौर्याची पराक्रमाची कथा वर्णित असताना त्याची तुलना ते पौराणिक आदर्श समजल्या जाणाऱ्या व्यक्तींशी करतात. उदा. सभासदाची बखरमध्ये ''शिवाजी राजाही भीमच त्यानीच अफजल मारिला, हे कर्म मनुष्याचे नव्हे. अवतारीच होता तरीच हे कर्म केले. यश आले. तसेच साहिस्तेखानाच्या पारिपत्याचे वर्णनकरताना त्यास 'रावण' असे संबोधले आहे. राजा शिवाजीचे चरित्र रेखाटीत असताना, कोणत्याही प्रसंगी न डगमगणारे, प्रसंगावधान राखणारे, मोहिमामध्ये साहस दाखविणारे अशा शिवाजीराज्याच्या शौर्याचे वर्णन ते करतात. यावरून ह्या शौर्यकथांतून जनसामान्यामध्ये त्याचे महत्त्व कळेल व एक आदर्श म्हणूनही भविष्यकाळातील लोकांसमोर ते राहील. ते केवळ आदर्श राजे नव्हे तर आदर्श पुत्र, आदर्श बंधू, आणि आदर्श पिता होते. त्यांच्या कार्याच्या व कर्तृत्वाच्याद्वारे जनसमुदायांच्या मनामध्ये श्रद्धा निर्माण करणे हे त्यामागचे प्रयोजन दिसते.

भाऊसाहेबाची बखर मध्येही भाऊसाहेबाविषयी भाऊसाहेब 'ईश्वरी अंश', 'अवतारी' इत्यादी आदरार्थी संबोधने आलेली आहेत. (पृ. १५०-१३८) अंगावर ब्रह्मांड कोसळले तरी हिंमत हरली नाही. भाऊसाहेब यांजप्रमाणे पराक्रमी दुसरा होणे असाध्य गोष्ट.' (पृ. १३४-१३५) तसेच त्यांची तुलना करताना बखरकार म्हणतात रामचंद्रजी वनवासास गेलियावर मागे राजा दशरथास रघुनाथ-वियोगाचें दु:ख होऊन राम! राम! म्हणता शोक करून प्राणत्याग केला, त्याप्रमाणे नानासाहेब भाऊसाहेबांच्या शोकें निधन पावले![११]

बखरकारांच्या समोर लेखनाचा आदर्श म्हणून ह्या 'तवारिखां', व 'अखबार' हे होतेच. तसेच त्यातील आशयासाठी त्याच्या समोर प्राचीन परंपराचे श्रेष्ठत्व होते. म्हणून रामायण महाभारता सारख्या महाकाव्यातील कला ह्या धार्मिकतेशी जुळणाऱ्या होत्या या बखरीतील नायक हा अवतारी पुरुष आहे अशी भूमिका बखरकार अनेकदा स्वीकारतात. भाऊसाहेबांच्या बखरीचा लेखक भाऊसाहेब व नानासाहेब यांच्यामध्ये ईश्वरी अंश असावा असे सांगतो. तसेच शिवराय हे इश्वरी अवतार आहेत असेही श्रद्धापूर्वक सांगतो. उदा. शिवरायाच्या जन्माच्या पूर्वी शहाजीराजांना जो दृष्टांत झाला, त्याचे वर्णन करताना सभासद बखरकार सांगतो, ' रात्रौ श्रीशंभुमहादेव स्वप्नात येऊन प्रसन्न होऊन बोलिला जें, तुझ्या वंशात आपण अवतार घेऊं. देवब्राह्मणाचें संरक्षण करून म्लेंछांचा क्षय करतो, दक्षण देशाचें राज्य देतों. म्हणोन त्रिवार वचन करून वर दिला.'[१२]

मानवी मन हे नेहमी अद्‌भूत, रौद्र, वीर व करूणतेकडे झुकलेले दिसते व त्याचा पुरेपुर परिणाम वाचकाच्या मनावर घडविणे हे बखरकाराचे उद्दिष्ट असलेले दिसते. विचाराबरोबरच भावनेलाही यामध्ये महत्त्व आहे व ही भावना संस्कृतीने पोसलेली आहे याची तीव्र जाणीव या बखरीतून बखरकारांना करून द्यायची आहे.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांना बखरीतील इतिहासप्रामाण्याचा विचार करणे अगत्याचे वाटले. राजवाड्याच्या मते बखरीच्या लेखनामध्ये अतिशयोक्ति असल्याने त्यांच्या लेखनांमध्ये इतिहासाच्या दृष्टीने अनेक प्रमाद व उणिवां जाणवतात. बखरीकडे ऐतिहासिक पुरावा म्हणून पाहत असताना बखर लिहिण्यामागची प्रेरणा व प्रयोजन याचा

विचार करता येईल. ह्या बखरी म्हणजे वास्तवतेचा आधार घेऊन लिहिलेले लेखन आहे ते वास्तव नाही. बखरीमध्ये अनेक ठिकाणी सनावळी आलेल्या आहेत त्यामुळे वास्तवतेला धरून लिहिलेले असले तरी पूर्णपणे ते वास्तव म्हणता येणार नाही. बखरीमध्ये असलेली अतिशयोक्ती, पाल्हाळिकता व इतिहासाशी व सत्यतेशी असलेली फारकत पाहता असे दिसते की बखर हा इतिहास सांगण्याच्या उद्देशाने निर्माण झालेला प्रकार नाही तर तो एक वाड.मय प्रकार आहे त्यामुळे अतिशयोक्ती, अद्‌भूतता हे साहित्यिक गुण आहेत. या वाययीन गुणाचा आस्वाद रसिकतेने घेणे आवश्यक आहे.

साहित्य समृद्धीसाठी व माणसाच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वासाठी साहित्यकला निर्माण होते. एकप्रकारे लेखकाच्या व वाचकांच्या दृष्टीने असलेले हे प्रयोजनच आहे. मुळात बखर हे साहित्य आहे त्याला आपण इतिहास म्हणत नाही. यामध्ये आलेली चरित्रे व हकीगती ह्या वास्तव जीवनाशी फारकत दाखवित असल्या तरी त्या पूर्णपणे काल्पनिक नाही. त्याला जशा भावलेल्या आहेत, जाणवलेल्या आहेत त्याप्रकारे त्याचे चित्रण बखरकार करतो. आधुनिक चरित्र वाड.मयाची वैशिष्टये त्याना लागू होत नाहीत. चरित्र लेखनाच्या दृष्टीने ऐतिहासिक सत्य हे अधिक महत्त्वाचे असते. ही जाणीव आधुनिक आहे. म्हणून त्याला चरित्रे न म्हणता केवळ ती त्या आशयानुरुप निर्माण झालेली व्यक्तिचित्रे आहेत. स्त्री-पुरुषांच्या कर्तृत्वाने आणि पराक्रमाने भारताच्या नकाशामध्ये महाराष्ट्राला एक वेगळी प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे कार्य या बखरीचे केले आहे.

'श्रद्धा' हे मध्ययुगीन सामाजिक जीवनातील एक प्रमुख मूल्य होते. मानवी मनाला दिव्यतेविषयी व अद्‌भूतते विषयी नेहमीच आकर्षण असलेले दिसते. मानवी मनाला या दिव्य आदर्श माणसामध्ये देवत्व पाहण्याची प्रवृत्ती व देवत्वामध्ये मानवी स्वभावगुण पाहण्याची प्रवृत्ती ही माणसामध्ये उपजत असलेली दिसते. थॉमस फुल्लर यांनी चरित्रलेखनाची प्रयोजने सांगतांना हेच सांगितले आहे की 'चरित्रात्मक लेखन प्रामुख्याने ईश्वराची किर्ती म्हणून, व्यक्तिंचे चरित्र सांगायचे म्हणून, मृत व्यक्तीची स्मृती संरक्षित करावयाची म्हणून, आदर्शाची निर्मिती करावयाची म्हणून, वाचकांना आनंद द्यायचा म्हणून किंवा स्वत:चा प्रामाणिक मार्गाने काही फायदा मिळावा म्हणून होत असतो. अशा या व्यक्तीजीवनामध्ये घडणाऱ्या विविध घटनांची कलात्मकतेने नोंद करून त्या व्यक्तिजीवनाची व त्या व्यक्तिमत्वाची नवनिर्मिती बखरकारांनी केलेली दिसते. बखरकारांनी आपल्या लेखनाद्वारे स्मृतीच संरक्षून ठेवलेल्या दिसतात. धर्मप्रवर्तन व सामाजप्रबोधनाबरोबर कलानंद देणे हे कलाप्रयोजन बखरकारांना मान्य होते. त्यातून समाजाच्या व संस्कृतीच्या सर्वांगांना स्पर्श करणे व व्यापणे हा हेतू सहजसाध्य झालेला दिसतो.

**संदर्भ ग्रंथ :**


१. कृष्णाजी अनंत सभासदविरचित श्री शिवप्रभूंचे चरित्र (सभासद बखर) समर्थ प्रकाशन, औरंगाबाद पृ. ८, संपा. पठाण, यू. म.
२. जोग, रा. श्री., अभिनव काव्यप्रकाश, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९९१, पृ.३४
३. उ. नि. कृष्णाजी अनंत सभासदविरचित श्री शिवप्रभूंचे चरित्र (सभासद बखर) औरंगाबाद पृ. ८७
४. जोशी, प्र. न., राजवाडे विचारदर्शन, व्हीनस प्रकाशन, पुणे, पृ. २२९
५. भाऊसाहेबांची बखर कृष्णाजी शामराव, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९५, पृ.९, संपा. कामतीकर प्रकाश ,
६. तत्रैव, पृ.१०
७. तत्रैव, पृ.१०
८. तत्रैव, पृ.११
९. तत्रैव, पृ.११
१०. तत्रैव, पृ.१०
११. जोशी, शं. ना., भाऊसाहेबांची बखर, पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन, पृ. १४५
१२. उ. नि. कृष्णाजी अनंत सभासदविरचित श्री शिवप्रभूंचे चरित्र, पृ. ११
१३. उ. नि. राजवाडे विचारदर्शन, पृ. २३

ISBN 978-93-5196-698-2

# 'होळकरांची कैफियत' मधील व्यक्तिवर्णने

डॉ. माधवी देसाई,
मराठी विभाग, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज

प्राचीन मराठी वाङ्मयात बखर वाङ्मयाचे एक स्वतंत्र दालन आहे. बखरींचा अभ्यास वाङ्मयीनदृष्टीने करण्याचे वस्तुपाठइतिहासाचार्य राजवाडे, यदुनाथ सरकार, द.वा. पोतदार, शं.गो. तुळपुळे, ग्रामोपाध्ये,हेरवाडकर, य.न. केळकर, भमराव कुलकर्णी, यू.म. पठाण यांनी घालून दिलेले आहेत. ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीने राजवाडे यांनी बखरीबाबत नकारात्मक विधान केले असले तरी, मध्ययुगीन मराठी गद्यात बखरवाङ्मयाचे स्थान लक्षणीय आहे. प्रत्यक्षात वर उल्लेखिलेल्या अभ्यासकांनी जो बखर वाङ्मयाचा अभ्यास केलेला आहे त्या अभ्यासाच्या दिशेने जाऊन अधिक सूक्ष्मपणे बखरींच्या आकलनाचा व त्यातील ऐतिहासिकतेचा विचार होणे गरजेचे आहे. कारण बखर लेखनाची प्रेरणा जर आपण पाहिली तर शास्त्रशुद्ध आणि काटेकोर सत्य इतिहास लिहिण्याचा बखरकाराचा हेतू / प्रयोजन नव्हते किंवा आज ज्याला आपण ललितवाङ्मय म्हणतो त्या स्वरूपात ऐतिहासिक कादंबरी लिहिण्याचीही त्याची इच्छा नव्हती. कादंबरीलेखनाचा त्यांचा हेतू असता तर बखरवाङ्मयातील ऐतिहासिकता आणखीनच पातळ झाली असती, ही गोष्ट जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. बखरकाराला आपल्या समकाळात घडलेल्या घटना विदित करावयाच्या होत्या, त्यात स्वामिआज्ञा, स्वामिनिष्ठा, राजकारणाची आवड, इतिवृत्तलेखनाची आवड, ज्या मोठमोठ्या घटना, युद्धे, महान राजे, लढवय्ये, विभूती, वंशावळीचा इत्यादींचा इतिहास सांगणे हाही हेतू स्वयंस्फूर्तपणे होता. बखरकार हे कोणी संत अथवा स्थितप्रज्ञ महंत नव्हते. त्यामुळे त्यांच्या लेखनात व्यक्तिसापेक्षता येणे साहजिकच होते. तसेच आज्ञा कोणी केली आज्ञेचे स्वरूप व कारण काय, ज्याविषयी बखर लिहायची त्याचे व बखरकाराचे संबंध, नातेसंबंध काय व कसे, हे आणि असे अनेक रंग बखरींना प्राप्त होतात. या पार्श्वभूमीवर बखरीतील ऐतिहासिकता अधिकच विचारार्ह ठरते. स्त्रीविषयकजाणिवा, जीवन जाणिवा, मूल्यजाणिवा, यांचाही विचार ऐतिहासिकतेच्या दृष्टिकोणातून महत्त्वाचा ठरतो. अशावेळी बखरीतील व्यक्तिचित्रणे आणि ऐतिहासिकता यांचा विचार करणे हा माझ्या शोधनिबंधाचा विषय आणि विषयमर्यादा आहे.

**सर्व प्रथम आपण 'मल्हारराव होळकर' यांचे व्यक्तिचित्रण पाहू :**

'होळकरांची कैफियत' या बखरीचा आणि होळकर दौलतीचा नायक असलेला 'मल्हारराव होळकर' हा महापराक्रमी, निडर आणि निधड्या छातीचा होता. होळकर दौलतीचा संस्थापक असलेल्या मल्हाररावाचे मराठी दौलतीत महत्त्वाचे स्थान होते. मल्हाररावाचे वर्णन करताना बखरकार लिहितो, ''मल्हारजी होळकर यांचे गोटात घोड्यापुढे हारी पाहून एका बारगिरावर बाजीराव यांनी काठी टाकिली. तो मल्हारजी होळकर राहुटीचे तोंडी चऱ्हाड वळीत बसले होते. तेथून शिव्या देऊन मातीचे ढेकूळ बाजीराव यास मारिले! ''आम्हास काय रोजमुरे देऊन भागलास म्हणून काठ्या मारतोस?''.....

''मल्हारजी होळकर यांणी पंचवीस घोड्यांची सव्वाशें घोडी केली.... बाजीरावास पाहून गराडा घातला. रायाचे छातीस भाला आणून भाषण केले की, ''ते दिवशी ढेंकूळच मारलें, आता भाला पार करितों! तुझा वाली कोण?''.... मग रायांनी उठोन, घोड्याखाली उतरवून, मल्हारजी होळकर यांचा स्तुतिवाद फार केला की, ''ज्या ठिकाणी कामकाज पडलें तेथे तरवार तुझीच पाहण्यात आली. भोजन करावे.'' (होळकरांची कैफियत पृष्ठ ३-४) ''आपण सडा घोडा राऊत, त्यात

पालपडदा बायको जाते इत्यादी पडदळाचे नाव नाही, बसला त्यास उभे राहून दिले नाही, उभा त्यास घोड्यास हात लावू दिला नाही.!! यांप्रमाणे तहखान्याचे तहखान्यात व बाहेरचे बाहेर एकसा कत्तल झाली.... पायदळ कडब्यासारखे कापले.... पाच हजार नाहीसे करून दयाबहादूर याचे डोके हत्तीवर कापले.... उज्जनीस येऊन अमलफैला केला... एका छाप्यात गावखुद जाहला. मल्हारजी होळकर यांचे तलवारीचा जलूस!... माळव्यात अमलाफैला करून सोदवाड्यात ज्या गढीवाल्याने गोळी वाजविली त्या गढीचा कट्टा करून तीनशेतीनशे पाच पाचशे माणूस मेकसूखाली मारिले! नारळ फोडीत गेले!

'भाऊसाहेबांच्या बखरीत' मल्हाररावजीचे व्यक्तिवर्णन येते ते पराक्रमाबाबत कमी येते.आणि पेशव्यांच्या दरबारी शिंद्यांच्यापेक्षा स्वतःचे महत्त्व वाढून ते अबाधित कसे राहील यासाठी मल्हारराव प्रयत्न व कारस्थाने करताना दिसतो. त्यासाठी शिंद्यांशी वरकरणी गोड बोलतो, पण त्यांला 'अस्तनींतच अग्न' म्हणून रघुनाथदादाला एकांती सांगतो. पेशवे हे शिंदे व होळकराला दोघांना 'राम-लक्ष्मणाची जोडी' म्हणत होते. पण प्रत्यक्षात मात्र ही दोघेही पेशव्यांच्या दरबारात मानमरातब मिळण्यासाठी परस्परांवर शहकाटशह खेळत होते. भाऊसाहेबांच्या बखरीत बखरकार लिहितो, ''मल्हाररावाचा जनकोजीस स्वामिद्रोही सल्ला'' आसे बालतांच मल्हारराव यानी उत्तर केले की, बाबा, तुमचा मूलस्वभाव आटकेपासून रामेश्वरपर्यंत येकछत्री राज्य जाहाले. हिंदुस्थानात एक नजीबखान मात्र खणू राहिला आहे. त्याचे परिपत्य केलिया पेशवे आटकेपासून जासुदाचे हातें पैसा आणवितील. मग तुम्ही आम्ही सहजच निर्माल्यवत जाहालो.मग कोणी पुसणार नाही.''

मल्हारराव होळकर यांनी आपला पालक पुत्र तुकोजी होळकर दोन हजार फौजेनिसी (सिंदेयाजपासी) ठेवून निरोप घेवून देशास चालिले.दत्ताजीसहि मल्हाररावाचा तोच निमकहरामी मंत्र... तेव्हा मल्हारराव यांनी सांगितलें की, .... नजीबखान रोहिला यास हाती धरून... हे न करिता तुम्ही नजीबखान यांचे पारिपत्य कराल तरी तुम्हास पेशवे धोत्रे बडवावयास लावतील असे स्पष्ट सांगितले''. (भाऊसाहेबांची बखर) यावरून मल्हारजीची निष्ठा पेशव्याशी व मराठी दौलतीशी नव्हतीच. उलट तो नजीब खानाला आपला 'पुत्र' मानतो. भाऊसाहेबांच्या बखरीत बखरकार लिहितो, ''मल्हारराव होळकराचा नजीबखान 'धर्मपुत्र' होतो... मी तुमचा धर्मपुत्र आहे माझा बचाव करावा'' नजीबखानाने वकिलामार्फत मल्हारजीला केलेल्या या विनंतीनुसार मल्हारराव दादासाहेबाकडून नजीबखानाला बक्षीस मागून त्याचा बचाव कराते. जो नजीबखान आपला शत्रु आहे, त्यालाच मल्हारराव पुत्र मानतो व याच नजीबखानाने अब्दालीसह पानिपतात मराठ्यांची कत्तल केली.

पानिपतच्या लढाईत मल्हारराव होळकर वाईट वागले. एरवी पाच पाचशे डोकी मेखसूने फोडणारा, कडब्यासारखे पायदळ कापणारा मल्हारराव दुराणीचा हल्ला झाल्यावर मात्र हुजरातीला तोंडी देऊन स्वतः 'पंचवीस स्वारानिसी बाजू घेऊन निघोन गेले'. या दोन्ही बखरीतील मल्हारराव होळकराचे व्यक्तिचित्रण वेगवेगळे आहे, याचे कारण आपल्या लक्षात येते कारण बखरकारांच्या बखर लेखनाची प्रेरणा व प्रयोजन यात फरत आहे. 'भाऊसाहेबांची बखर' घटना युद्ध यांचा वृत्तांत सांगते तर 'होळकरांची कैफियत' ही होळकर दौलतीचे गुणवर्णन करणारी आहे. अर्थातच या पार्श्वभूमीवर आपल्याला मल्हाररावचे व्यक्तिचित्रण अभ्यासताना इतिहासाचा विचार करावा लागतो. मराठी म्हणजे महाराष्ट्रीय माणसाच्या स्वभावातील मोठा दोष (पूर्वीपासूनच) दिसतो व आजही जाणवतो तो म्हणजे स्वतः पराक्रम करून मोठे होण्याऐवजी दुसऱ्या मराठी माणसाचा पराभव करण्यात धन्यता मानणे.म्हणजे मोठी रेषा लहान करावयाची असेल तर त्या रेषे शेजारी दुसरी मोठी

रेषा न मारता पहिली रेषच पुसणे हा चुकीचा मार्ग मराठी माणूस अवलबतो. हाच दाखला इतिहास देतो. बखरीमधील सत्यासत्यतेचा विचार करून ऐतिहासिक दृष्टिकोन स्वीकारावयास हवा कारण भाऊसाहेबांच्या बखरीत नवव्या प्रकरणात नजीबखानाच्या व दुराणीच्या सैन्याने मल्हाररावच्या सैन्याची 'पोळजत्रा' केली. 'होळकराची कैफियत' व 'नजीबखान चरित्र' यातील मल्हारराव आणि भाऊसाहेबांची बखर यातील मल्हारराव लक्षात घेतला तर तिन्ही बखरीतील मल्हाररावाचे व्यक्तिवर्णन एकसारखेच दिसते आणि त्याच्या व्यक्तिमत्वात भलेपणाचा अंश फारच अल्प दिसून येतो. (भाऊसाहेबांची बखर, पृष्ठ २१४)

**२) बाजीराव पेशवा :** 'होळकरांची कैफियत' ज्या व्यक्तिचित्रणांनी सजली आहे त्यात 'बाजीराव पेशवा' यांचे चित्रण अल्पाक्षरी पण देखणे उतरले आहे. बाजीराव हा गुणग्राही पराक्रमीवृत्तीवर फिदा होणारा आणि क्षमाशील वृत्तीचा, दिलदार होता, याचे प्रत्यंतर त्याच्या वर्णनातून येते. मल्हाररावाच्या आडदांडपणाला क्षमा करून बाजीराव त्याला पंगतीभोजनाचा सन्मान देतो.मल्हारजीला सन्मान देऊन आपलेसे करतो. यावरून त्याची लोकसंग्रह करण्याची दूरदृष्टी दिसून येते. मल्हारजीची स्तुती करताना तो म्हणतो, ''ज्या ठिकाणी कामकाज पडले तेथे तलवार तुझीच पाहण्यात आली. भोजन करावे तुमची आमची या अन्नाची क्रिया... असे म्हणून अन्नावर हात ठेवला.'' यावरून बाजीराव पेशव्याचे माणसांना विश्वासात घेण्याचे कौशल्य मनात भरते.

**३) माधवराव पेशवे** : होळकर कैफियतीत माधवरावाचे व्यक्तिचित्रणही बखरकाराने आवडीने रेखाटले आहे. माधवरावाची कारकीर्दच गर्दीची, धकाधकीची गेली. अनेक लहान मोठ्या घटनाप्रसंगांचे चित्रण बखरकार करतो, त्यातून माधवरावाचे व्यक्तिमत्त्व साकारते. दादासाहेब आणि माधवराव यांच्यात परस्परांना जोखण्याचे अनेक प्रसंग आले. पण माधवराव प्रत्येक बाबतीत दादासाहेबाहून सरस ठरले. बखरकार लिहितो, ''माधवरावसाहेब यांनी उत्तर केले की, ''मागे आपण स्वारी करून घरी कर्ज आणत होता तेव्हा कैलासवासी नाना भाऊ आपल्याला वडील होते. माधवरावाविरूद्ध चाललेल्या दादासाहेबाच्या राजकारणात व कारस्थानात होळकरही सामील असल्याचे स्वतः होळरांनीच आपल्या वर्तनातून दाखवावे हाही चातुर्याचा डाव माधवरावानीच होळकरांना सांगितला होता. त्यामुळे दादासाहेबाला नमविण्यात माधवराव यशस्वी झाले. माधवरावाची शिस्त, जरब व दरारा सर्वश्रुत, सर्वज्ञात होता. बखरकार लिहितो, ''दुसरे दिवशी किल्लेदारास ताकीद गेली की, साहेब पोहोचाऊन देणे.माधवरावसाहेब यांचे जरबेचा जलूष मोठा परंतु माधवराव साहेबांचे जरबेपुढे काही एक बनून न येता दादासाहेबास स्वाधीन करताच बनले.''

(होळकरांची कैफियत पृष्ठ ५२)

माधवरावाच्या मृत्यूचे परिणाम सांगून बखरकार त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभावच वर्णने करतो. बखरकार लिहितो, ''.... माधवराव साहेब याजला राजयक्ष्म्याचा उपद्रव होऊन त्यांचा काल जाहला.... हे वर्तमान समजताच, फौजा माघारा फिरोन, .... सुभेदार इंदुरास आले, शिंदे उज्जयनीस, विसाजी कृष्ण देशी गेले.'' (होळकराची कैफियत पृ. ६६)

'होळकरांची कैफियती' त होळकर दौलतीचे वर्णन असले तरी माधवराव पेशव्यांचे व्यक्तिमत्त्व उठावदार झाले आहे. कारण होळकरांची बैतलमाल झालेली दौलत समेटण्यासाठी दादासाहेबानी केलेल्या कारस्थानात गंगोबातात्याला शिक्षा करणाऱ्या माधवरावाने त्याला कैदेतही राजवाड्यासारखा सुखसोयी ठेवल्या होत्या यातूनच त्याचे धोरणी मुत्सद्दीपण दिसते.माधवरावाच्या व्यक्तिर्णनासाठी बखरकाराने ३-४ बंधच खर्ची घातले असले तरी, त्यातून माधवरावांच्या कृती व

वर्तनातून इतिहासातील काही घटितांचे दुवे हाती येतात. त्याचा शोध घेणे हाही एक ऐतिहासिक संशोधनाचा विषय आहे. होळकराच्या दौलतीची काळजी घेणारे माधवराव तसेच होळकरांच्या दौलतीत ढवळाढवळ करणारे माधवराव सर्वांना साथसोबत घेऊन मराठी दौलत सांभाळतात हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून न दिसते. ज्या होळकराच्या दौलतीची काळजी माधवराव धेतात त्याच पेशव्यांच्या बद्दल मात्र मल्हारराव होळकर मात्र दुटप्पी वागताना दिसतात याचे विवेचन या आधी आले आहेच.

**४) यशवंतराव होळकर** : होळकराच्या कैफियतीत जवळ जवळ ४० ते ४५ बंध फक्त यशवंतराव होळकराच्यासाठी लिहिले आहेत. होळकर दौलतीतला यशवंतराव हा खरा खुरा पराक्रमी सूर्य होता. त्याचा पराक्रम, पेशव्यांच्या बद्दलचा आदर, आणि देशप्रेम सर्वच वाखाणण्यासारखे आहे. होळकर कैफियतीच्या लेखकालाही यशवंतरावाबद्दल अत्यंत आदर असल्याने तो गौरववाने व प्रेमाने यशवंतरावाचे व्यक्तिचित्र रेखाटतो. यशवंतरावाच्या व्यक्तिचित्रणाबाबत डॉ. बापूजी संकपाळ लिहितात, ''... बालपणापासूनच युद्धक्षेत्राचा संबंध आलेला यशवंतराव पराक्रमी, शूरवीर आहे याचा हा उपोदघात मानावा लागेल.

यशवंतराव स्वतःची युक्तीने सुटका करून घेऊन पायात जोडा नाही, अनवाणी पादचारी असा भटकट भटकत जातो. वाटेत भवानी शंकराची भेट होते. हळू हळू सैन्य जमा करून फौज उभी करतो. पुणे-नागपूर-सेंदवे-गोवर्धन-नाईकांची हट्टी-महेश्वर अशा अनेकठिकाणची त्याची भ्रमंती. कुणी कैद केले, कुणी झिडकारले, कुणाच्या मनात पाप आले, अशी पार्श्वभूमी निवेदन करून त्याच्या व्यक्तिचित्रणास बखरकाराने उठावदार रूप दिले आहे....''(डॉ. बापूजी संकपाळ - बखरवाङ्मयः उद्‌गम आणि विकास पृ. १४७-१४८)

होळकरांच्या कैफियतीत यशवंतरावाचे वर्णन चढत्या श्रेणीने तेजस्वी होताना दिसते. एकाकी यशवंतरावाचा उल्लेख बखरकार प्रारंभी यशवंत असा करतो, पण जस जसे यशवंतरावाची फौज व कर्तृत्व क्रमाक्रमाने वाढत जाते तसतसा बखरकारही नम्र होत जातो आणि आदराने यशवंतरावाला 'यशवंतराव', 'यशवंतराव महाराज', 'महाराज', 'स्वारी', 'खाशे'.यशवंतराव हा होळकर दौलतीचा खराखुरा नायक शोभतो. होळकर दौलतीकडून त्याला कसलेही सहकार्य, प्रेम, सन्मान न मिळताही तो प्रचंड पराक्रम करतो. 'यशवंतरावाच्या भराऱ्या' हा त्या काळात सर्वतोमुखी झालेला शब्दप्रयोगच यशवंरावाचे कार्यकर्तृत्व किती सामर्थ्यवान होते याची कल्पना येते.

यशवंतरावाने खर्ड्याच्या लढाईत मोठी मर्दुमकी गाजविली. पण सख्या भाऊ काशिराव होळकरकडूनच यशवंतरावाला मात खावी लागते ती काशिनाथ होळकरच्या स्वार्थी कपटी स्वभावामुळे; पण त्याच्या या कपटी स्वभावाचे वर्णन होळकरांची कैफियत मध्ये फारसे येत नाही. यशवंतरावाची तलवार वा भाला ज्याला लागत असे तो पुन्हा पाणी मागत नसे असा बलवंत यशवंत मद्यपानाने व वेडाचे झटके येऊन मरतो.

इंग्रजांना हुसकून लावून, आसपासच्या सरदारांना काबूत ठेवूनही तो पेशव्याला प्रसन्न करू पाहतो पण बाळाजी कुंजर, दौलतराव शिंदे, काशिनाथ होळकर त्याच्या सगळ्या प्रयत्नावर पाणी टाकतात. हलक्या कानाचा, भित्रा, निष्क्रिय दुसरा बाजीराव यशवंतरावाला कधीच समजून जाणून घेत नाही, त्याला सुभेदारीची वस्त्रे देत नाही.

असा हा यशवंतराव धडाडी, शौर्य, दूरदृष्टी, बुद्धिमत्ता, शिस्त, जिद्द यांची साक्षात मूर्ती होता. पण'लेकावळा' असण्याचा न्यूनगंड, अतिसंवेदनशीलता आणि उत्तरार्धातील आयुष्यात व्यसनाधीनता यामुळे तो वेडा होतो. त्याची

शोकांतिका त्याच्या मृत्यूनेच संपते.

इतिहासानेही यशवंतराव होळकराची उपेक्षाच केली व यशवंतरावाला योग्य साथ व सहकार्य मिळाले असते तर त्यानेच इंग्रजाना हिंदुस्तानातून हाकलले असते. पणदुर्दैवाने ते घडले नाही याचे कारण मराठी दौलतीलाच नव्हे तर भारतालाच असलेला फंदफितुरी, गृहकलह, भाऊबंदकीचा अभिशाप होय. इतिहास निर्माण करण्याचे सामर्थ्य असलेला यशवंतराव हाच खरा होळकर दौलतीचा चमकता तेजस्वी तारा होता, पण वर उल्लेखिलेल्या गोष्टींनी हा तारा न चमकताच मावळला, अन्यथा मराठ्याचा इतिहास बदलला असता हे निश्चित.

**५) अहल्याबाई होळकर :** होळकर दौलतीत जिनेस्त्री शक्तीचा जागर केला अशी ही समर्थ स्त्री. बखरकाराने अत्यंत श्रद्धेने तिचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. खुद्द मल्हारराव होळकर म्हणजे अहल्याबाईंचे सासरे यानीही बाईची क्षमता, सामर्थ्य ओळखल्यामुळे त्याना तिच्याविषयी खूप अभिमान आणि विश्वास आहे. कैफियतीच्या ३३, ३४, ३५, ३६ या बंधातून अहल्याबाईचे व्यक्तिमत्त्व व्यक्त झाले आहे. धैर्याच्या, मुत्सद्दीपणाच्या, प्रजाप्रेमाच्या, कुटुंब प्रमुखपदाच्या अपेक्षा ज्या मल्हाररावाने बाळगल्या होत्या त्या सर्व अपेक्षा अहल्याबाईनी पूर्ण केल्या.

अहिल्याबाई सती जाण्याचे ठरविते तेव्हा मल्हारराव म्हणतो, ''बाई, मला उन्हाळा करित्येस की काय? तू माझे पाठीवर आहेस तर अहल्या मेली, खंडू आहे, हा मला भरंवसा.'' (पृष्ठ ४७) यावरून मल्हाररावाला तिच्या बद्दल असलेला विश्वास दिसतो. अहिल्याबाईनीही आपल्या आचार विचाराने तो सार्थ केला. कारण पुढे बखरकार म्हणतो, ''कारण सुभेदार यांनी पैसा उत्पन्न करून मागे टाकावा त्याची व्यवस्था व चार माणसांचे संरक्षण बाईने करावे असा ओघ चालत आला. येणे करून बाईसाहेबांचे तेजापुढे दादासाहेबांचे वर्चस्व काही एक दिसण्यात आले नाही.

आज स्त्री-पुरूष समानता, स्त्रीशक्तीचा जागर, स्त्रीसन्मान यांचा वारंवार उच्चार केला जातो, या विचारांचा पुरस्कार करण्याचे आवाहन केले जाते. पण'होळकरांची कैफियत' मधील अहल्याबाईचे व्यक्तिमत्त्व त्याचे आदर्शरूप आहे. इतिहासातील अशा स्त्रियांच्या व्यक्तित्वाचे, कर्तृत्वाचे नीट व अभ्यासपूर्ण संशोधन होणे आवश्यक वाटते.

**६) बापूराव होळकर** : यांचे व्यक्तिचित्रण प्रसंगानुरूप अल्पसे पण उत्तम उतरले आहे. बापूरावाचा पराक्रम होळकर कैफियतीच्या बंध क्र. ६२ मध्ये बखरकाराने सांगितला आहे. गढीत अर्थ पाहतां एका मडक्यात पावशेर दारू, याशिवाय धान्य अथवा काही एक नाही.त्या बायकोस लुगडेचोळी देऊन सोडून दिले.माणूस जाया फार झाले.ऐशी हजार रूपये जखमीना लागला. त्याशिवाय बक्षिसा. नक्षामुळे इतकें करणे प्राप्त''

बमण्याच्या गढीसाठी झालेल्या लढाईत बापूराव होळकर यांचा पराक्रम नेमका किती कारणी लागला? या छोट्या पण तीव्र लढाईत मराठे, होळकर यांची मुलुखगिरी खरोखरच देशासाठी दौलतीसाठी होती का? रजपुतांनी या गढीला राखण्यासाठी एवढा कडवा विरोध का केला? कारण या लढाईत पैसा, खंडणी या गोष्टी गौण आणि 'नक्षा' म्हणजे 'प्रतिष्ठा' महत्वाची ठरली. 'दिशाहीन लढाई' एवढेच या लढाईच वर्णन करता येईल. पण या लढाईतून इतिहासातील युद्धाचा एक प्रकार किंवा डावपेच मात्र ज्ञात होतो. तो असा माणसाचे डोकीवर हातावर गोळा, त्यात हात घालून वर चढावें असे हातावर गोळा - हा बुरूजावरून किल्यात प्रवेश करण्याचा मार्ग. बमणीच्या गढीच्या लढाईत जयदूभाई याने हा मार्ग अवलंबिला होता.इतिहासात असे अनेक डावपेच व मार्ग बखरीतून वार्णिले असतील, त्यांचा शोध धेऊन त्याची आज देशाच्या रक्षणासाठी काय काय अंमलात आणण्याची शक्यता पडताळून पहाता येईल.

ISBN 978-93-5196-698-2

**७) सवाई मल्हारराव :** होळकर कैफियतीतील सवाई मल्हारराव यांच्या व्यक्तिवर्णना बद्दल बापूजी संकपाळ लिहितात, '' व्यसनाधीनतेमुळे पराभूत झालेल्या सवाई मल्हारराव होळकराच्या वर्णनात,''खंडोबा खंडोबाच्या जागा राहिला, म्हातारपणी अपेशाचे ठिकरे घेतले'' अशी उपरोधात्मक प्रतिक्रियाही अभिव्यक्त झाली आहे. (संकपाळ बाळाजी बखरवाङ्मय : उद्गम आणि विकास दास्ताने, रामचंद्र आणि कं. पुणे - ०२, पृष्ठ १५९) सवाई मल्हाररावाच्या मृत्यूचे वर्णन 'होळकर कैफियती'च्या बंध क्रमांक ७७ मध्ये येते. त्यात सवाई मल्हाररावाचा पराक्रम आणि बाणेदारपणा दिसतो. त्याचा आणि बापूजी संकपाळ यांचा संदर्भ याचा मेळ बसत नाही. बंध क्रमांक ७७ मधील सवाई मल्हारराव (बाबासाहेब) होळकर आणि मुजफरखान यांच्यातील संवाद अत्यंत वेधक आहेत. काशीराव होळकरने रघुपंत खंडेराव व बापू होळकर व चिमाजी बुळे यांच्याशी 'मसलत' करून सवाई मल्हारराव यास पैशासाठी ताब्यात घेण्याचा डाव कला आणि रघुपंत खंडेरावाने त्यात आपल्या कपटाची अधिक भर घालून षड्यंत्र केल्याने सवाई मल्हारराव कैद न होता मुजफ्फरखाना कडून ठार केला जातो. येथे पुन्हा एकदा मराठी दौलतीती आपापसातील भांडणे ईर्षा यामुळे मराठी दौलत बुडली. त्यामुळेच मराठे पानीपतावर पूर्ण हरले. नजीबखानाचे व्यक्तिवर्णन बखरकाराने, अगदी जसेच्या जसे रेखाटले. 'या बरोबरच जुवामर्द, जातीने शिपाई, हासड्याचे बळे रांगडा जवळ फटकू न देणारा पराक्रमी मकाजी, गिता, आपल्या अत्याचाराने 'सर्जेराई' चालविणारा सर्जेराव घाटगे, चार भाषा येणारा शिपाई बापू विठ्ठल, बहादूर कृष्णाजी मुकुंद व तात्या आळेकर व विठ्ठल महादेव इत्यादींची व्यक्तिचित्रणे आकर्षक बनविली आहेत'' (संकपाळ बापूजी, बखरवाङ्मयः उद्गम आणि- पृष्ठ १५९) बखरीतील पात्रे व प्रसंग निखालस खोटे नाहीत तसेच ते निखालस सत्य असतीलच याची खात्रीही नसते. पण बखरीची वर्णनशैली, भाषा यांच्यामुळे बखर प्रभावी होते. बखरी या इतिहासाची अव्वल साधने नाहीत तरीही ग्रॅंट डफची 'मराठ्यांची बखर' प्रमाण मानून महाराष्ट्राचा इतिहास शिकविण्यासाठी ग्रॅन्ट डफची बखर साधनग्रंथ म्हणून शिकविली जाई. पण त्याकाळात 'बखर' म्हणजे इतिहास ही संकल्पनाही रूढ झाली होती. 'बखरी'आणि 'इतिहास' यांचे प्रकृतिभेदाची स्पष्ट जाणीव महत्त्वाची असते.

'इतिहास घडवणे' हे कर्तृत्व असते. इतिहासाच्या मजबूत पायावर देश-दौलतीचा वर्तमान घडायला आदर्श बळ मिळते आणि उज्वल भविष्यकाळ नजरेत येतो. त्यासाठी नेतृत्व करणाऱ्यांनी वर्तमानात आपण कसे वर्तन, राजकारण, करावयास हवे याची जाण आणि भान असावे लागते. तसे ते पेशवे, होळकर, शिंदे इत्यादी पराक्रमी योध्द्यांना, सत्ताधाऱ्यांना सरदारांना असते तर पानिपतमध्ये इतकी भीषण, दयनीय अवस्था झाली नसती. ते भान आणि जाण, मूल्यनिष्ठा मराठी दौलतीत, कमीच असल्याने मराठेशाही बुडाली; अन्यथा पराक्रमी वीरांची, द्रष्ट्या लोकांची, मुत्सद्दीपणाची वानवा मराठी दौलतीला, म्हणण्यापेक्षा राज्याला कधीच नव्हती पण त्याची जाण, भान आणि सन्मान घडला नाही. व्यक्तिद्वेषासाठी राजकारण, परस्परांमधील सत्तेची अहअहमिका, त्यासाठी कुणाशीही अगदी नजीबखानासारख्या विषारी शत्रुशीही हातमिळवणी, फंदफितुरी, त्यासाठी देशहिताचा विसर अशा अनेक कारणांनी मराठी राज्य बुडाले, दौलती बुडाल्या. इतिहासदृष्ट्या कालक्रम, तारखा, वार इत्यादींचा काटेकोरपणा नसेलही, गावांची नावे, स्थळांची नावे, सैनिकसंख्या, शास्त्रास्त्रांची नावे यात चुका किंवा विसंगती असतीलही पण पूर्णपणे असत्यव निखालस चुकीचे वर्णन संभवत नाही. ही विसंगती शोधता येणे शक्य आहे. पण म्हणून बखरीतील ललित जितके मनोवेधक आहे तितकाच त्यातील इतिहासही ... म्हणून बखरीतील इतिहास वर्णन पूर्णतः अव्हेरून चालणार नाही.

ISBN 978-93-5196-698-2

# बखर गद्यः वाडःमयीन दृष्टीकोन

**प्रा. रेखा काशिनाथ पसाले**
आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, कासेगांव.

मराठीतील प्रारंभीचे वाड:मय हे पद्य स्वरुपातच होते. पण पुढे महानुभव वाड:मयापासून गद्याची परंपरा सुरु झाली. मलेखनकल्पतरुफ सारखा ग्रंथ याची प्रचिती देतो. पुढील काळात सतराव्या शतकामध्ये स्वराज्यस्थापना झाली आणि मराठीला राजभाषेचे स्वरुप प्राप्त झाले. मराठीशाहीचे दर्शन मराठी गद्यातुन घडू लागले. पराक्रमी पुरूषांचे पोवाडे जसे कवितेतून गायले जाऊ लागले तसेच आदर्श राज्यकर्त्यांचे कर्तव्य गद्य वाड:मयातून पुढे येऊ लागले.

या काळातील गद्य ग्रंथ प्रामुख्याने बखरवजा असे होते. म्हणून मराठी गद्य सारस्वतांच्या इतिहासात बखर गद्याला महत्त्वपुर्ण असे स्थान आहे. या बखरीतून केवळ ऐतिहासिक मुल्य समोर आणले नाही तर वाड:मयीन तसेच सांस्कृतीक मुल्याच्या अंगानेही बखर गद्याला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. म्हणून 'मराठेशाहीच्या तेजस्वी पराक्रमाचे नंदादीप' असा उल्लेख बखरीचा समर्पक वाटतो. अशा या बखर गद्याचा वाडमयीन दृष्टीकोन नेमका कसा आहे. कोणकोणती वाड:मयीन मुल्ये बखरीमध्ये सापडतात याचा विचार प्रस्तुत शोधनिबंधात केला जाणार आहे .

मराठीतील बहुतांश बखरीचे लेखन हे गद्यातूनच झालेले आहे. कोणाच्या तरी आज्ञेनुसार बखरीचे लेखन केले गेलेचे दिसते. इतर वाड:मयापेक्षा बखरीचे स्वरुप वेगळे आहे. बखरीचा प्रारंभ पूराण पध्दतीचा शेवट फलश्रुतीमय असा असतो. यामध्ये प्रमुख्याने शिवपूर्वकालीन, शिवकालीन, पेशवेकालीन अशा बखरी येतात. या बखरीचा वाड:मयीन अंगाने विचार करता येईल. जरी बखरीचे लेखन हे मुळात वाड:मयीन भूमिकेने झालेले नसले तरी त्यामध्ये साहित्य गुण आढळतात. बखरी सजवीणे या हेतुने बखरीतील व्यक्तीचित्रणे मनोवेधक वाटतात.

मराठी बखर गद्यामध्ये मनोवेधक व्यक्ती वर्णने आली आहेत. दिल्लीहून बादशाहाची फौज विजापूरवर चालुन आली असता. त्याने शाहू छत्रपती कडे मदत मागितली म्हणून याची तजवीज कशी करावी त्यावेळी पेशव्याच्या बखरीमध्ये बाजीराव पेशवा उत्तर देतो ''मोगल म्हणजे काय? आज्ञा झाली असता काळाच्या तोंडात जाऊन देखील सरकारचे पुण्य प्रतापे करुन त्यांचा बंदोबस्त करुन येऊ. तेथे मोगलांची कथा काय''(हेरवाडकर र.वि; १९७५:१२ ) यामधूनन बाजीरावची आत्मनिष्ठा, स्वामीनिष्ठा सुंदरपणे सुचित झाली आहे. तसेच शिवछत्रपती चरित्रामध्ये चरित्रकार अफजलखानाचे व्यक्तीचित्र रेखाटताना लिहतो ''अफजलखान सामान्य नाही केवळ दुर्योधन जातीचाच होता. खंडोबल्लाळ चिटणिसांनी बाजीप्रभुचे अगदी अल्प शब्दात नेटके वर्णन केले आहे. ते असे 'जातीने बहूत मर्द मोठे हीयाचे कजाखदार, कटाक्ष सर्व गुणे युक्त. जेव्हा शिवाजी महाराजांना शह देण्यासाठी साहेबेबींना अफजल खान म्हणतो की शिवाजी काय? चढे घोडिया निशी कैद करुन घेऊन येतो. (हेरवाडकर १९८६:१० ) या ठिकाणी खानाचा उद्दामपणा प्रतिबिंबित होताना दिसुन येतो. एकुणच बखरीचा या अंगाने विचार केला तर साध्या सोप्या वाक्यातुन प्रभाविपणे व्यक्ती चित्रे रेखाटली आहेत असे दिसुन येत. बखरीतुन येणारी सर्व व्यक्ती चित्रे बखरींना जिवंतपणा आणतात. हेच बखरकरांचे श्रेष्ठ असे मुल्य आहे असे वाटते.

मराठी बखरी मधुन येणारी प्रसंगाची चित्रमयता व नाट्यमयता वाचकांच्या नजरेसमोर उभी करण्याची कसब बखरकरांनी पेलली आहे असे दिसते. त्यामध्ये लढाई, युध्द, प्रसंग, सुरतेची लुट, अफजलखान वधाचा प्रसंग, काही वीर तर काही करुण प्रसंगांचे वर्णन बखरीत येते. शिवछत्रपती चरित्रामध्ये सभासदांनी अफजल खानाचे वर्णन अगदी सुक्ष्म पणे

चित्रित कले आहे. या भेटीतील वधाच्या प्रसंगाचा क्रम पहाता त्या वर्णनाला एक प्रकारची अर्थ वाहकता प्राप्त झालेली दिसते. पाणीपतच्या युध्दा प्रसंगा संदर्भात बखरकार सांगतो भाऊसाहेब गर्दीत मिळाले कोठे ठिकाण नाहीसे झाले. तिथकीही तेथे खपली. त्यादिवशी मोठे उल्कापात झाला. दिवसास तारा पडला. दिवाकर चार घटका असता अंधःकार मागे पडले असे युध्द मागे झाले नाही आणि पुढे होणार नाही असा लौकीक सदाशिव पंत भाऊ यांनी युध्दाचा मिळविला (हेरवाडकर १९७५:६१ ) शिवाजी महाराज्यांच्या निर्वानाचा प्रसंगही उत्कंठ असा आहे. या प्रसंगात असणारे कारुण्य राजा प्रतीचा आदर वाक्या वाक्यात ओतंबुन भरला आहे. सवाई माधव रावाच्या लग्न समारंभातील आल्हाददायक वर्णन बखरकाराणे केले आहे. खर्ड्याच्या स्वारीचा प्रसंग ही बखरकाराने उठावदारपणे चित्रित केला आहे.

उदात्तता वाङ:मयीन गुण बहूतेक सर्व बखरीमध्ये आढळतो. जीवनातील सर्व मांगल्य, सत्य, सौंदर्य, ही उदत्ततेची अंगे बखरीमधुन आढळतात. या दृष्टीणे बखरी हा उच्य दर्जाच्या झाल्या आहेत. पेशव्यांच्या बखरीतील पेशवे कालातील मराठ्यांच्या हर्शामषाचे जे विविध प्रसंग आले आहेत. त्यांचे निवेदन बखरकारने उदाततेच्या उच्च पातळीवर नेऊन केले आहे. चरित्रनायकाच्या संदर्भातील अनेक प्रसंग हे चरित्र लेखकांने उत्कटनेने लिहले आहे. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे या संदर्भातील वर्णन पाहण्यांसारखे आहे. या वाङ:मयीन गुणांमुळे बखरी प्रभावी बनल्या आहेत. संयम या गूणांमुळे ही बखरी वाचनीय बनल्या आहेत असे दिसते. बऱ्याचदा अनेक बखरी जरी पाल्हाळ वाटत असल्या तरी कलात्मकदृष्ट्या बखरीनी एक उंची गाठली आहे. असे दिसते माधवरावांचा लग्न प्रसंग प्रदीर्घ आहे. पण ओघवती भाषा आणि सहजता या मुळे तो प्रसंग वाचनीय बनला आहे असे दिसते. स्वयमपुर्ण निवेदनामुळे बखरीला डौलदारपणा प्राप्त झाला आहे.

अल्पाक्षरत्व हा बखरीचा वाङ:मयीन विशेष आहे. छोट्या छोट्या वाक्यांच्या रचनेमुळे कमी शब्दामध्ये मोठा आशय बखरी सांगण्यात यशस्वी झाल्या आहेत. या बरोबर रसात्मका हा ही विशेष बखर गद्यामध्ये आढळतो. रसोत्कटता ही वाङ:मयाची महत्वाची कसोटी मानली गेली आहे. त्यामुळे करुन रस, वीर रस अशा रसाची उत्कट उदाहरणे बकरीमध्ये आढळतात. अफजलखान वध, खर्ड्याची लढाईचा प्रसंग पाणीपत रणसंग्राम याधुन रसो उक्तटतेचा प्रत्येय वाचकांना येतो. या बरोबर शैली दृष्ट्या विचार करत असताना बखरी सुबोध बनल्या आहेत. भाषा सौंदर्या मुळे ही बखरी वाङ:मयीन दृष्टीने समृध्द बनल्या आहेत. त्यांमुळे बखर गद्याला एक ऐतिहासिक मुल्य आहे. त्यामध्ये प्रतिबींबीत होणार इतिहास संस्कृती समाज या अंगाने बखरींना महत्त्व आहे. पण वांङ:मयीन दृष्टीने बखरींचा वेगळा विचार करता येतो. तत्त्कालीन भाषा लेखन पध्दती, अभिव्यक्ती, आविष्कार पध्दती ही बखरीमुळे अभ्यासता येऊ शकते.

**सदर्भ :**

१) हेरवाडकर र.वि. ; संपा- शिवछत्रपती चरित्र ; व्हीनस प्रकाशन, पुणे, १९८६,

२) हेरवाडकर र.वि. ; संपा- पेशव्यांची बखर, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७५,

ISBN 978-93-5196-698-2

# बखरींचे प्रकार – विषय विवेचन

**प्रा. डॉ. उदय जाधव**
प्रमुख, मराठी विभाग,शहाजीराजे महाविद्यालय, खटावता.खटाव, जि.सातारा.पिन. ४१५५०५

मध्ययुगीन मराठी गद्यात 'बखर ' वाड:मयाचे स्थान अत्यंत लक्षणीय आहे. साधारणापणे इ.स. १८६९ ते १९५० पर्यंत बखरींना अंधारातून प्रकाशात आणण्याचे कार्य अव्याहतपणे झाले. हे कार्य अनेक अभ्यासू व्यक्ती, तत्कालीन नियतकालिके, वेगवेगळ्या संस्था यांच्याकडून झाले. त्यामुळेच आज मराठी वाड:मयाच्या इतिहासात संख्येने विपूल आणि एक स्वतंत्र व समृध्द वाड:मय प्रकार म्हणून 'बखर' गद्याचा अभ्यास केला जातो. 'बखर' लेखन हे इतिहासाचे साधन आणि वाड:मय प्रकार म्हणून महत्वाचे मानले जाते. मात्र 'बखर ' म्हणजे काय? 'बखर ' शब्दाची व्युत्पत्ती काय? बखरींचे प्रकार किती व कोणते?, बखरींचा कालावधी कोणता? बखरींची संख्या किती?, त्यांची नावे कोणती? तसेच त्यांचे ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक वा वाड:मयीन महत्व वा मूल्य किती? ते कसे ठरवावयाचे? इत्यादी अनेक प्रश्नांबाबत अभ्यासकांमध्ये खूपच मतमतांतरे दिसून येतात. तथापि, मराठेशाहीच्या निर्मितीनंतर उदय पावलेला आणि मराठेशाहीच्या अस्ताबरोबर नाहीसा झालेला 'बखर' हा मध्ययुगीन मराठी वाड:मयाच्या इतिहासातील वैशिष्ट्यपूर्ण असा वाड:मय प्रकार आहे. त्याचप्रमाणे गौण म्हणून का होईना परंतु इतिहासकारांनी बखरींना दिलेले स्थान महत्वपूर्ण आहे. विशेषत: शिवकाल आणि पेशवेकाल यामधील काळात लिहिल्या गेलेल्या बखरींची योग्यता तर केवळ अपूर्वच मानावी लागेल. बखरींच्या बहराचा हा काळ वाड:मयदृष्ट्या खूप महत्वाचा होता. त्यामुळे या काळातील बखरींचे वर्गीकरण करताना त्यांचे वाड:मयीन आणि ऐतिहासिक मूल्यही विचारांत घ्यावे लागते. अभ्यासाच्या सोयीसाठी बखरींचे वर्गीकरण करणे किंवा त्यांचे प्रकार पाडणे आवश्यक असले तरी, त्यामधये शास्त्रीय काटेकोरपणा येणे शक्य नसते. म्हणून बखरींचे प्रकार पाडण्यापूर्वी अभ्यासकांनी 'बखर' कशाला म्हटले आहे याचा मागोवा घ्यावा लागतो.

डॉ. र.वि. हेरवाडकर यांनी मबखरफया शब्दाचे कोशगत अर्थ देऊन त्या आधारे म्हटले आहे, 'या सर्व मतांचा विचार करता तसेच बखरींचे एकंदर स्वरुप पाहाता बखर म्हणजे ऐतिहासिक व्यक्ती वा घटक यांची हकीगत हे मान्य होण्यास प्रत्यवाय नाही.'२ तर मराठी वाड:मयाचा इतिहास या ग्रंथात लिहिले आहे ' मबखरफशब्द ज्या विवक्षित लेखनाला लावला जातो, त्या लेखणाचे स्वरुप सर्वत्र सारखे नाही. या साऱ्यांसाठी मबखरफ हा शब्द सैल अर्थाने योजला जातो. फारशी तवारिखांच्या अनुकरणाने राज्यकर्त्याच्या पदरच्या लेखकांनी वा अन्य लेखकांनी ज्या बखरी लिहिल्या असतील त्या मूळ तवारिखांच्या स्वरुपाला जवळ जाणाऱ्या बखरी होत. उदा. मखर्ड्याच्या स्वारीची बखरफममराठी साम्राज्याची छोटी बखरफ सोहतीकृत मपेशव्यांची बखरफरघुनाथ यादवकृत मपाणिपतची बखरफइत्यादी. परंतु आतील मजकूर बखरीसारखाच, पण बखर म्हणून न संबोधिलेला असाही एक प्रकार आढळतो. उदा. चरित्र, आत्मचरित्र, कैफियत, शैली, वाका, हकीकत, अखबार इत्यादी.'३ या विवेचनाद्वारे मराठीतील बखरींचे वर्गीकरण वा त्यांचे प्रकार पाडण्यात आलेले दिसतात. मात्र बखरींची संख्याही निश्चित करण्यात आलेली दिसत नाही. शं.ना. जोशी व डॉ. यू.म. पठाण हे सुमारे ५० बखरींची नावे देतात, तर र.वि. हेरवाडकरांनी ११३ ऐतिहासिक व ३५ पौराणिक बखरींची नावे दिलेली आहेत. याशिवाय ऐतिहासिक बखरींची १०, पौराणिक बखरींची २६ तर सांप्रदायिक बखरीच्या १ अशा हस्तलिखितांची नावांसह यादी दिलेली आहे. इतिहासाचार्य राजवाड्यांच्या मते सुमारे २००–२५० बखरी लिहिल्या गेल्या असाव्यात. अर्थात राजवाड्यांनी मबखरफ हा

शब्द व्यापक अर्थाने वापरला आहे असे वाटते.

डॉ. र.वि. हेरवाडकरांनी बखरींचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले आहे. कालदृष्ट्या समकालीन व उत्तरकालीन तर

| | | | |
|---|---|---|---|
| विषयदृष्ट्या | १) चरित्रात्मक, | २) प्रसंगात्मक | ३) विशिष्ट घराण्याचा इतिहास, |
| | ४) विशिष्ट काळातील इतिहास | ५) आत्मचरित्रात्मक | ६) एका विशिष्ट पक्षाची बाजू |
| | ७) कलमी बखर | ८) केवळ बातमी म्हणून आलेले लेखन | |
| | ९) उत्पन्न चालू राहावे यासाठी लिहिलेल्या बखरी | | १०) सांप्रदायिक |
| | ११) शैक्षणिक | १२) भाषांतरीत | १३) स्थलवर्णनात्मक |
| | १४) पौराणिक व | १५) धर्मविषयक | |

या प्रकारांतर्गत त्यांनी बखरींच्या नावांचा ही निर्देश केलेला आहे. डॉ. बापूजी संकपाळ यांनी बखरींचे वाड:मयदृष्ट्या पायाभूत वर्गीकरण करीत असल्याचे नमूद करुन मबखरफ वाड:मयप्रकाराचे अस्तित्व आजही असल्याचे सूचित केले आहे. ते म्हणतात, ‘बखर म्हणजे इतिहासकथा, मबखैर तु आख्यायिकाफ, आणि मपुराणव्यतिरिक्त कथारुप गोष्टी ते आख्यायिकाफहे बखरींचे मूळ अर्थ व रुप लक्षात घेता अनेक नामाभिधानांनी व विविध आविष्कारांनी अभिव्यक्त होणाऱ्या या बखरींचे वाड:मयदृष्ट्या अतिव्याप्ती किंवा अव्याप्ती न येता केलेले वर्गीकरण असे:

**१) चरित्राकथात्मक बखर :** ९१ कलमी बखर, सभासद बखर, चित्रगुप्त बखर, चिटणीसी बखर, शिवदिग्विजय, श्री, शिवाजीप्रताप इ.

**२) युध्दकथात्मक बखर :** राक्षसतागडीची बखर, भाऊसाहेबांची बखर, भाऊसाहेबांची कैफियत , होळकरांची शैली, पाणिपतची बखर इ.

**३) दौलतीची कथात्मक बखर :** (कालसापेक्ष) महिकावतीची बखर, पेशव्यांची बखर, मराठी साम्राज्याची छोटी बखर, शेडगावकर बखर आणि नागपूरकर भोसले यांची बखर, होळकरांची कैफियत इ.

**४) स्फुट कथात्मक बखर :** साष्टीची बखर, खर्ड्याच्या स्वारीची बखर, नारायणराव पेशव्यांची बखर, सनपुरीची बखर, आणि हरिवंशाची बखर इ.हे वर्गीकरण लक्षात घेतले म्हणजे बखर वाड:मयप्रकार लुप्त झाला असे म्हणता येणार नाही. वाड:मयीन अर्थाने पुढील काळात कथा, कादंबऱ्या, त्या व्यक्तींची चरित्रे इत्यादी वाड:मयप्रकारांशी त्याचे नाते जवळचे ठरते. कोणताही वाड:मयप्रकार नष्ट होत नाही तर नवे रुप घेऊन आविष्कृत होत असतो.’४ डॉ. संकपाळ यांचे वर्गीकरण संयुक्तिक वाटत असले तरी, बखर वाड:मयप्रकाराच्या नव्या रुपाचा आविष्कार म्हणजे कथा, कादंबरी हे भाष्य धाडसाचे वाटते.

**गं.बं. ग्रामोपाध्ये यांनी बखरींच्या विषयानुसार केलेले वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे –**

१) चरित्रात्मक (उदा. सभासदकृत शिवछत्रपतींचे चरित्र)

२) आत्मचरित्रात्मक (उदा. नाना फडणिसांचे आत्मचरित्र)

३) युध्दवर्णनात्मक (उदा. पाणिपतची बखर, खर्ड्यांच्या स्वारीची बखर)

४) सांप्रदायिक (उदा. हणमंतस्वामीची बखर)

५) वंशवर्णनात्मक बखर (उदा. पेशव्यांची बखर, हरिवंशाची बखर, भोसले–वंशचरित्र)

६) प्रसंगवर्णनात्मक (उदा. ब्रह्मेंद्रस्वामींच्या निधनाची बखर) इत्यादी बखरींचा विषय मुख्यत: ऐतिहासिक असला तरी पौराणिक म्हणता येतील अशाही काही बखरी आढळतात. (उदा. बकासुराची बखर, नलाख्यानाची बखर).ङ्क५

श्री.रं. कुलकर्णी यांनी चरित्रपर, आख्यानपर, प्रसंगवर्णनपर, वार्तापत्रे, उपदेशप्रधान, सांप्रदायिक व भक्तिप्रधान असे बखरींचे वर्गीकरण सुचविले आहे. (प्राचीन मराठी गद्य = प्रेरणा आणि परंपरा पृ. १००-१०१)

शं.गो. तुळपुळे यांनी चरित्रात्मक, घराण्याच्या हकीगती, प्रसंगाच्या हकीगती, स्थलविषयी माहिती, सांप्रदाय बखरी, विशिष्ट काळातील हकीगती, शिक्षणार्थ लिहिलेल्या बखरी, मुसलमानांचे अनुकरण करणाऱ्या बखऱ्या, उत्पन्नाच्या वहिवाटीसाठी लिहिलेल्या बखरी, आत्मचरित्रात्मक बखरी इ.

१) समकालीन बखरकारांनी समक्ष पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या राजकीय घटना प्रसंगावर आधारीत - उदा. सभासद बखर, भाऊसाहेबांची बखर.

२) केवळ स्मृतीवर हवाला ठेवून आठवणी, दंतकथा, आख्यायिका, पारंपारिक हकीगती यांच्या आधारे लिहिलेल्या उत्तरकालिन बखरी - उदा. पेशव्यांची बखर

३) प्रत्यक्ष बखर हे नाव न देता बखर सदृश्य ऐतिहासिक स्वरुपाचे लेखन यात वाका, कैफियत, शैली, चरित्र, आत्मचरित्र यांचा समावेश होतो.

४) ऐतिहासिक किंवा राजकीय विषय नसलेल्या परंतु बखर हे नाव असलेल्या या बखरी प्रामुख्याने पौराणिक व सांप्रदायिक स्वरुपाच्या असतात. उदा. समर्थाची बखर.

**साधारपणे आशय :** विषय दृष्ट्याच बखरींचे वर्गीकरण केले गेले आहे. मबखरफ वाड:मयाने मराठी गद्य वाड:मयात मोलाची भर टाकली आहे. आशय - अभिव्यक्तीदृष्ट्या काही बखरी मराठी भाषेतील अक्षर कलाकृती आहेत. याशिवाय अजूनही हस्तलिखित स्वरुपात असणाऱ्या बखरींचा अभ्यास होणे गरजेचे आहे. मबखरफहा वाड:मयप्रकार सतत अभ्यास व संशोधनाचा विषय असून आता त्याच्या नेमक्या वर्गीकरण - प्रकारा संदर्भात अधिक चर्चा करण्याचीही आवश्यकता आहे असे वाटत नाही.

१) मराठी बखर गद्य - गं.ब.ग्रामोपाध्ये - व्हीनस प्रकाशन, पुणे-२
दुसरी आवृत्ती १९६३, पृ.क्र. १०

२) मराठी बखर - डॉ. र.वि. हेरवाडकर, व्हीनस प्रकाशन, पुणे
आवृत्ती दुसरी - एप्रिल १९७५ पृ.क्र.३

३) मराठी वाड:मयाचा इतिहास - खंड तिसरा संपादक रा.श्री. जोग
महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, पुनर्मुद्रण १५ ऑगस्ट १९९९
पृ.क्र. ४९१

४) बखर वाड:मय उद्‌गम आणि विकास- डॉ. बापूजी संकपाळ, दास्ताने
रामचंद्र आणि कंपनी, पुणे, प्रथम प्रसिध्दी १९८२, पृ.क्र. ५१

५) मराठी बखर वाड:मयाचा पुनर्विचार - गं.ब.ग्रामोपाध्ये
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे - ३० प्रथमावृत्ती १९८६ पृ.क्र.३२

ISBN 978-93-5196-698-2

# सभासद बखरीतील लोकतत्त्व

**आप्पासो बुडके**
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावना :** साहित्याभ्यासाची एक नवी पद्धती म्हणून लोकतत्त्वीय अध्ययन पद्धतीकडे आपण पाहत आहोत. साहित्य आणि लोकतत्त्व यांचा अतिशय निकटचा संबंध आहे. कलावंत जेव्हा एखादी कलाकृती निर्माण करतो तेव्हा तो नेमके काय करतो? असा प्रश्न जर उपस्थित केला तर त्याचे उत्तर असे देता येईल की; भाषेच्या सहाय्याने घटना, प्रसंग, कथानक, व्यक्तीचित्रण, निवेदन शैली यांची गुंफन करून लेखक वास्तवाचे प्रतिबिंब किंवा प्रतिसृष्टीच कलाकृतीद्वारे निर्माण करीत असतो. साहित्यिकाला जे अनुभव आले, जे वास्तव त्याने पाहिले, समाजातील ज्या व्यक्ती, प्रवृत्ती त्याने अभ्यासल्या; त्याच त्यांच्या साहित्याच्या मुलाधार असलेल्या आढळतात. अनुभवास आलेले हे वास्तव लेखक साहित्यकृतीतून प्रतिकात्मक रूपाने मांडत असतो. तो तटस्थपणे वास्तवाचे कंगोरे उलघडत असतो. त्यामुळे समाजजीवनातील अनेक वृत्ती-प्रवृत्तींचे दर्शन घडते. लोकमानसातील अनेक लोकतत्त्वे अभिव्यक्त होतात. यांचा अभ्यास लोकतत्त्वीय अध्ययन पद्धतीत अपेक्षीत आहे.

मराठी साहित्याभ्यासात लोकतत्त्वीय अध्ययन पद्धतीकडे फारसे कुणी लक्ष वेधलेले दिसत नाही. मुळात लोकतत्त्व ही संकल्पनाच सुस्पष्ट झालेली आहे असे वाटत नाही. आजवर लोकतत्त्वीय अध्ययन पद्धतीचे उपयोजन करण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु लोकतत्त्वाची सैद्धांतिक व तात्त्विक मांडणी करण्याचा प्रयत्न झालेला दिसून येत नाही. साहित्याच्या सर्व प्रकारातून लोकतत्त्वे अविष्कृत होत असतात. बखरवाङ्मयातूनही अशी लोकतत्त्वे मोठ्या प्रमाणात आलेली आपणास पहावयास मिळतात. प्रस्तुत निबंधातून लोकतत्त्व म्हणजे काय सांगून, बखर वाङ्मय आणि लोकतत्त्व यांचा सहसंबंध स्पष्ट केला आहे. तसेच सभासद बखरीतून व्यक्त झालेल्या लोकतत्त्वाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**लोकतत्त्व म्हणजे काय? :** लोककथा, लोकरूढी, दैवत, अवतार, लोकविश्वास, लोकभ्रम, लोकप्रथा, कल्पनाबंध, लोकसंकेत या सर्वांचा समावेश लोकतत्त्वांमध्ये केलेला आपणास दिसतो. लोकतत्त्वाचा तात्त्विक विचार आजवर मराठीत वाङ्मय व्यवहारात झालेला आढळत नाही. या संकल्पनेचा विचार करताना 'लोक' आणि 'तत्त्व' या दोन पदांचा अर्थ समजून घेणे महत्त्वाचे आहे.

**लोक :** लोक हा शब्द समूहवाचक आहे. लोक म्हणजे परंपरेने चालत आलेल्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा वर्ग. महाराष्ट्र शब्दकोशात 'लोक' या शब्दाचे अर्थ जन, मनुष्य, मानवजात, समाज, वर्ग, संघ, जात असे दिलेले आहेत. इंग्रजीमध्ये 'लोक' साठी त्रेश्चज्ञ हा शब्द वापरला जातो. डींरपवशीव ऊळलींळेपरीू ष त्रेश्चश्रज्ञळेीश, डशसशपवी अपव चूींहेश्रेसू या कोशात मारीया लीच यांनी ''लोक म्हणजे ग्रामीण किंवा नागर भागात राहणारा असा जनसमूह, ज्यांची स्वत:ची निराळी परंपरा असते. स्वत:च्या सांस्कृतिक परंपरामुळे आणि पारंपारिक पद्धतीमुळे जनसमूह निराळा उठून दिसतो. असा जनसमूह म्हणजे लोक असे म्हटले आहे.'' यावरून असे स्पष्ट होते की 'लोक' म्हणजे विशिष्ट असा जनसमूह.

**तत्त्व :** इंग्रजीतील एश्रशाशपीं या शब्दासाठी मराठीत 'तत्त्व' हा शब्द वापरला जातो. महाराष्ट्र शब्दकोशात 'तत्त्व' या शब्दाचे अर्थ सत्य, वास्तविक स्वरूप, वस्तुस्थिती, प्रत्यक्ष अस्तित्त्व, ब्रह्म, तेचपण, जीवपण, उत्कृष्ट अंश, सत्त्व, सार, मगज, मूलद्रव्य असे दिलेले आहेत. वि. शं. ठकार यांच्या अभिनव पर्याय शब्दकोशात सिद्धान्त, प्रमेय, नियम, मत, मतप्रणाली, सूत्र, शिकवण, मूलतत्त्व, परिभाषा, ध्येय, आदर्श, ब्रीद, मूल्य, मूलद्रव्य, अस्तित्त्व, सत्य, वास्तव, वस्तूस्थिती, प्राणतत्त्व असे अर्थ दिलेले आहेत. 'भारतीय तत्त्वज्ञान' या पुस्तकात श्रीनिवास दीक्षित यांनी ''तत् म्हणजे ते, जे काही आहे ते ते सर्व एकूण एक यच्च, यावच्य. या 'तत्' चा तत्पणा म्हणजे 'तत्त्व' जसे मनुष्याचा मनुष्यपणा म्हणजे मनुष्यतत्त्व किंवा पशूचा पशूपण म्हणजे पशूत्त्व, तसे 'तत्' चा तत्पणा किंवा तत् चे सार म्हणजे 'तत्त्व'.' असे तत्त्वासंबंधी विवेचन केले आहे.

वरील दोन्ही पदांचा अर्थावरून लोकतत्त्वाची व्याख्या करताना असे म्हणता येईल की, ''लोकांच्या जगण्यातील मूलघटक, सत्त्व, सार, प्रत्यक्ष वस्तूस्थिती किंवा जगण्याचे वास्तविक स्वरूप म्हणजे लोकतत्त्व होय.''

**लोकतत्त्व आणि बखरवाङ्मय :**

कोणतेही वाङ्मय ज्या काळात निर्माण झालेले असते; त्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक घडामोडींचा प्रभाव त्या वाङ्मयावर पडणे अपरिहार्य असते. बखर वाङ्मयाचा विचार करता, त्याचे ढोबळमानाने शिवपूर्वकालीन बखरी, शिवकाळीन बखरी आणि पेशवेकालीन बखरी असे तीन कालखंडात विभाजन करता येते. साधारणता ४०० वर्षाच्या कालखंडात बखर लेखन झालेले दिसून येते. या कालखंडातील लोकजीवन, लोकमानस, समाजजीवन, लोकांच्या वृत्ती, प्रवृत्ती यांचा मुक्त आविष्कार बखरवाङ्मयात दिसून येतो.

सभासदाची बखर, शिवछत्रपतींची एक्याण्णव कलमी बखर, भाऊसाहेबांची बखर, पानिपतची बखर, सप्तप्रकरणात्मक चरित्र, यासारख्या बखरींशिवाय एकूणच बखरवाङ्मयातून तत्कालीन लोकमानस आणि लोकतत्त्वे यांचा मुक्त आविष्कार झालेला दिसून येतो. भाऊसाहेबांच्या बखरीतील 'मारू तो मर जाऊंगा, हटूं तो जनों की लाज, ये खुदा परवर दिगार, दोनो कठीण काज', 'रण सोडून निघाल्यास दोहिंसही मुकावे; इकडे नर्कसाधन, इकडे आपेश; मरणाहून आपेश वोखटे; यात मरताच उत्तम', 'बाबा आम्हास सोडून गेले. आता आंम्हास देशी तोंड दाखववयाचे कारण नाही. रणात मृत्यू आला तर उत्तम आहे; नाही तर विष खाऊन प्राण द्यावा', 'बचेंगें तो और भी लढेंगे', पेशव्यांच्या बखरीमधील 'आपण वडीलपणे येऊन समारंभ केला पाहिजे.' पानिपतची बखर मधील 'कदाचित शत्रूंनी तुमचा पिच्छा पुरविला असता आमच्या कटुंबाचा शिरच्छेद तुम्ही आपले हाती करावा, परंतु शत्रूचे हाती जीवंत लागू देऊ नये' यासारख्या वाक्यांतून भीती, लाज, अब्रू, धाडस, कणखरता, निष्ठा, स्वाभिमान, निर्धार, दगाबाजी, तडजोड, यासारखी तत्त्वे बखरवाङ्मयातून सर्रासपणे आलेली दिसतात. या लोकतत्त्वांमुळेच बखरींच्या वाङ्मयीन गुणवत्तेत वृद्धी झालेली जाणवते.

**सभासद बखरीतील लोकतत्त्वे :**

कृष्णाजी अनंत सभासद विरचित शिवछत्रपतींचे चरित्र उर्फ सभासदी बखर ही इ. स. १६९४ साली राजारामाच्या आज्ञेने जिंजी येथे लिहिली गेली. चरित्रवर्णनपर 'राठेशाहीत झालेली स्वराज्य काळातील पहिली बखर म्हणजे सभासदी बखर होय. आपले पिते थोरले राजे यांनी इतका पराक्रम केला. ऐसे असता औरंगजेब येऊन (त्याणें) किल्लो किल्ली अनर्थ मांडिला याचा अर्थ काय? हे समजून घेण्यासाठी राजारामाने सभासदास शिवछत्रपतींचे 'इस्तकबीलपासून चरित्र लिहून देणे' अशी आज्ञा केली. कृष्णाजी अनंत सभासद विरचित शिवछत्रपतींचे चरित्र उर्फ सभासदी बखर ही इ. स. १६९४ साली राजारामाच्या आज्ञेने जिंजी येथे लिहिली गेली. चरित्रवर्णनपर 'राठेशाहीत झालेली स्वराज्य काळातील पहिली बखर म्हणजे सभासदी बखर होय. आपले पिते थोरले राजे यांनी इतका पराक्रम केला. ऐसे असता औरंगजेब येऊन (त्याणें) किल्लो किल्ली अनर्थ मांडिला याचा अर्थ काय? हे समजून घेण्यासाठी राजारामाने सभासदास शिवछत्रपतींचे 'इस्तकबीलपासून चरित्र लिहून देणे' अशी आज्ञा केली.

सभासद हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे समकालीन होते. तत्कालीन समाजातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक व राजकिय जीवनाचा त्यांचा चांगला अनुभव असल्याचे या बखरीतून प्रत्ययास येते. शिवरायांच्या जीवनातील अनेक घटना, प्रसंग रेखाटताना, व्यक्तीवर्णने, युद्धवर्णन करताना, पराक्रमाचे गोडवे गाताना, तत्कालीन लोकमानस आणि लोकतत्त्वे अभिव्यक्त झाली आहेत.

लेखकास आज्ञा पासून ते फलश्रुतीपर्यंत अशा एकूण १२३ घटना, प्रसंगातून हे चरित्र रेखाटले आहे. सभासद बखर तवारिखांच्या आधारे इतिहास म्हणून नवीनांना 'र्गदर्शक म्हणून लिहिलेले पण बखरकाराच्या पुराणाच्या संस्कारांनी नटलेली त्या'ुळे तिला एक वेगळेच आकर्षक रूप आले आणि त्यातूनच चरित्रात'क बखरींचा आदर्श नि'ोण झाला. 'मालोजीस दृष्टांत' या दुसऱ्या प्रसंगात शहाजीराजे यांचे आजोबा मालोजी व विठोजी राजे भोसले हे निजामशाहीत प्रतिष्ठीत वजीर होते. त्यांची शंभूमहादेवावर प्रचंड निष्ठा होती. मालोजीराजे यांनी लोकांना पाण्यासाठी तळे बांधून दिले. त्यावेळी

त्यांच्या स्वप्नात शंभू महादेव येऊन प्रसन्न होऊन सांगतात, तुझ्या वंशात मी अवतार घेतो. राजे संतोष होऊन दानधर्म करतात. या प्रसंगातून देवाविषयीची लोकमानसात असणारी निष्ठा, भक्ती आविष्कृत होते. देव स्वप्नात येऊन प्रसन्न झाल्यामुळे राजे आनंदाने दानधर्म करतात यातून हर्ष व दानशूरता ही लोकतत्त्वे येतात. 'बारा मावळे काबीज केली' या चौथ्या प्रसंगात ''शामराव निळकंठ पेशवे व बाळकृष्ण पंत मजुमदार व नारोपंत व सोनाजीपंत व रघुनाथ बल्लाळ सबनीस असे कारभारी करून बहुत सावधपणे चौकशीने वर्तणूक करीत चालीले.'' या वाक्यातून लोकजीवनातील सावधपणाचे, चौकसपणाचे तत्त्व अभिव्यक्त होते.

'शिवाजीचा युद्धनिश्चय' या अकराव्या प्रसंगात ''युद्ध केलीयाने जय जाहालीयास उत्तम, प्राण गेलीयाने किर्ती आहे.'' या वाक्यातून लढाऊपणाचे तत्त्व येते. 'खानाच्या कपटाचा परिस्फोट' या प्रसंगातून लोकमानसातील कपटवृत्तीचा आविष्कार होताना दिसतो. 'राजे यांचा दिलासा' व 'शिवाजी अवतारीच होता' या प्रसंगातून लोकांच्या जीवनातील आनंद, तर 'विजापुरी शोक' या प्रसंगातून आदिलशाहीत झालेले दु:ख ही लोकतत्त्वे आपणासमोर येतात. 'लष्कराची रीत' या प्रकरणामधील ''आठ महिने बाहेर लष्करांनी परमुलखात पोट भरावे. खंडण्या घ्याव्या. लष्करात बायको व बटकी व कलावंतीण नसावी. जो बाळगील त्याची गर्दन मारावी. परमुलखात पोर बायका न धरावी. मर्दाना सापडला तरी धरावा. गाई न धरावी. बईल ओझ्यास मात्र धरावा.'' अशा पद्धतीने शिवकालीन लष्कराचे तत्त्वज्ञानच सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

'खानाची बोटे उडाली' या प्रसंगातील ''डेरियांत डेरे सात व दाया असा समुदाय बायका होत्या, त्यांस कळाले की, गनीम डेरियात आला. हे कळोन नबाब शास्ताखान घाबिरा होऊन, मेणबत्या, समया विझवून बायकात लपून राहिला. राजा बायकांवर हात करी असे दोन घटका होते.'' या ओळीतून बायकांवर हात न उगारता स्त्री रक्षणाचे तत्त्व स्पष्ट केल्याचे दिसते. 'खान दिल्लीस चालला' व 'राजे खुशाल' या प्रसंगातून खानाच्या मनातील राजांविषयीची भीती व आपल्या फौजेवरील अविश्वास व्यक्त होतो. म्हणजेच भीती व अविश्वास ही लोकमानसातील दोन तत्त्वेच समोर येतात. ''गड घेईन तेंव्हा पगडी बांधीन.''

**समारोप :** माणूस जगत असताना त्याच्या जीवनात अनेक घटना, प्रसंग घडत असतात. चांगले वाईट अनुभव त्याला येत असतात. समाजात हे घडत असताना तो जगणं सोडून देत नाही, तर या सगळ्याशी दोन हात करत जगत असतो. मग त्याच्या जगण्यात त्याची आपली म्हणून काही तत्त्वे जोपासत असतो. ही तत्त्वे आयुष्यभर त्याची सावली बनून राहतात. मग लोक म्हणत असतात की, आयुष्यभर स्वाभिमानानं, प्रामाणिकपणानं, कष्टानं जगला, कुणाच्या वाळल्या पाचोळ्यावर पाय ठेवला नाही, कुणाच्या आडवं कधी गेला नाही, लय सोसलं, मरेपर्यंत दुसऱ्यावर विसंबून राहिला नाही. यासारख्या वाक्यातून माणसाच्या जीवन जगण्याचे सार व्यक्त होते. या तत्त्वांवरच त्याचे जगणे अवलंबून असते. स्वत:चं असं एकही तत्त्व नाही असा माणूस सापडणं कठीण. उपरोक्त शोधनिबंधाच्या विवेचनातून सभासदाच्या बखरीतील माणसांच्या जगण्यातील लोकतत्त्वांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**सदर्भ:**

१.दिक्षित, श्रीनिवास: भारतीय तत्त्वज्ञान, २०१४,आवृत्ती ११,कोल्हापूर फडके प्रकाशन.
२. हेरवाडकर र. वि.: मराठी बखर,१९७५, आवृत्ती-२, पुणे, व्हीनस प्रकाशन.
३. हेरवाडकर र. वि.(संपा.): कृष्णाजी अनंत सभासद विरचित शिवछत्रपतीचे चरित्र उर्फ सभासद बखर, १९८६, पुणे, व्हीनस प्रकाशन.
४. पठाण, यु. म.(संपा.) : सभासद बखर, २०००, पुणे, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस.
५. ग्रामोपाध्ये, गं. ब. : बखर वाङ्मयाचा पुनर्विचार, १९८६, पुणे, मेहता पब्लिकेशन हाऊस.
६. संकपाळ, बापुजी : बखर वाङ्मय, उद्‌गम आणि विकास, १९८२, पुणे, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी.
७. राज्याध्यक्ष, विजया (संपा.): मराठी वाङ्मयकोश, खंड चौथा, २००२, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखर : वाङ्मयीन दृष्टिकोन

प्रा.डॉ.मल्हारी धोंडीबा मसलखांब
प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय देऊर, ता.कोरेगांव जि.सातारा मो.९९७५१६२६०९

**प्रास्ताविक :** महाराष्ट्राच्या अस्मितेचे मानचिन्ह म्हणजे मराठी बखर होय. महाराष्ट्रीय मातीला आणि मराठी मनाला राजकारण, कला, प्रेम आणि झुंजार वृत्ती यांचे नेहमीच आकर्षण वाटत आलेले आहे. मराठी माणूस राष्ट्राच्या प्रचलित राजकारणावर अधिकार वाणीने बोलणारच राष्ट्रावर संकट आले की, मराठी माणूस तळहातावर शीर घेऊन लढणारच हा मराठी मातीचाच धर्म आहे. आणि मराठी मनाचाही तोच. अशा या लढवय्या शूर मराठी मनाचे आणि मराठी संस्कृतीचे शब्दचित्र म्हणजे मराठी बखर होय.

या बखरी महाराष्ट्राच्या खडकाळ प्रांतात जन्माला आल्या आणि महाराष्ट्राच्या पराक्रमाच्या गाथा ठरल्या. भावी पिढयांना आपल्या पूर्वजांनी केलेल्या पराक्रमांची ओळख करून देण्याचे कार्य या बखरींनीच केले. म्हणून तर मराठयांच्या चढत्या वाढत्या पराक्रमाबरोबरच बखरींनाही उधाण आल. बखरी हे खास मराठी मातीचा स्पर्श झालेले एक वैशिष्टयपूर्ण लेणे होय. बखरीद्वारे महाराष्ट्रात होऊन गेलेल्या कर्तृत्ववान आणि आदर्श राज्यकर्त्याचे त्याच्या कर्तृत्वाचे पराक्रमाचे आणि कारकिर्दीचे दर्शन घडविले आहे. शिवकालीन आणि पेशवेकालीन मराठी गद्याचा अवतार किती वैशिष्टयपूर्ण होता आणि त्याचा अविष्कार किती कलात्मक व तेजस्वी रीतीने व्यक्त होत होता त्याचा प्रत्यय बखरीतून येतो.

राजकीय पार्श्वभूमीवर विविध व्यक्तींच्या जीवन नाटयांचे उग्र भीषण आणि करूण गंभीर दर्शन या बखरीतून घडताना दिसते. या अर्थाने या विविध व्यक्तींचा आणि घटना प्रसंगाचा इतिहासच या बखरीतून आलेला असतो म्हणून तर महाराष्ट्राच्या इतिहासात बखर वाङ्मयाचे स्थान महत्त्वपूर्ण असे आहे. बखरीद्वारे तत्कालिन इतिहास जसा आपणास समजतो. तसे त्या लेखनामधील काही वाङ्मयीन मूल्ये जोपासणारे हे बखर वाङ्मय म्हणजे मराठेशाहीच्या तेजस्वी पराक्रमाचे नंदादीपच होत.

**२) बखर एक वाङ्मय प्रकार :** बखर हे एक ऐतिहासिक संदर्भ साधन मानले जात असले तरी तो एक वाङ्मय प्रकार आहे. तो कलावंतानी रचला असून आपल्या प्रतिभेच्या बळावर त्याने लेखन सजवलेले असते. आणि त्यातून तो प्रसंग व्यक्ती जिवंत करण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे हे लेखन रसिकांच्या मनाला भिडते. त्यासाठी तो वीर करूण रसांचा वापर करीत असतो. त्यामुळे ल.रा.नसिराबादकर या लेखनाला गद्य सारस्वतांचा स्वतंत्र विलास असे म्हणतात. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास पृ.२८९) हे लेखन करता असताना राजदरबाराने रितीरिवाज बहुश्रृतता, कल्पकता, सुक्ष्मनिरीक्षण, निवेदनातील कौशल्य या साऱ्यांची जोड असावी लागते. तशा पद्धतीच्या या लेखनाला उत्कटता प्राप्त होते. विषय आणि लेखनाची पद्धती यामुळे बखरीस एका स्वतंत्र वाङ्मय प्रकाराचे महत्त्व प्राप्त झाले आहे. बखरकार हा कलावंत आहे. त्याला बखर नुसती लिहावयाची नाही, तर ती 'सजवायची आहे'. रघुनाथ यादव पानिपतच्या बखरीच्या शेवटी 'यथामतीने बखर सजवून सेवेशी पाठविली आहे.' असे म्हणतो. बखर सजविणे या शब्दप्रयोगातून त्याची सौंदर्यदृष्टी स्पष्ट होते. शिवकालीन बखरीतील कृष्णाजी अनंत सभासदाची 'सभासदाची बखर' छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील निवडक ७५ प्रसंगावरून शिवचरित्र वाचकांसमोर ठेवते. यातून सभासदाचे वर्णन कौशल्य पणाला लागले आहे. बखरींमधून पेशवेकालीन, शिवकालीन इतिहास समजतो. इतिहास आणि मराठी यांचा परस्परसंबंध आपणास जाणवतो. परंतु बखर

इतिहास नसून वाङ्मयाचा एक स्वतंत्र प्रकार आहे. बखरकारांच्या निवेदनाला रंग, रूप आणि आकार प्राप्त होऊन त्यातून सुंदर वाङ्मयीन मूर्ती निर्माण होते.

**३) बखरीचे स्वरूप :** बखरींचे लेखन ज्या काळात झाले त्या मराठेशाहीच्या काळात काव्याचा सुकाळ होता. गद्यलेखनाचा एवढा प्रकार नव्हता. गद्य लेखन करणे हे कमीपणाचे मानल जाई. अशा या काळातच या बखरी मुख्यतः गद्य स्वरूपात आहेत. महिकावतीची उर्फ माहीमची बखर ही बखर मात्र गद्यपद्य मिश्रीत आहे.पडत्या काळात गद्याला वाङ्मयीन दर्जा प्राप्त करून देण्याचे बखरकारांचे हे कार्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रारंभीच्या काळात जे बखर लेखन झाले. ते अत्यंत प्रासादीक, साधे सरळ आणि नित्याच्या गद्यातच झाले. या गद्यरूप बखरीतून प्रबळ, उत्कट आणि उत्स्फूर्त भावना जिवंत शब्दरूप मिळाले अशा प्रबळ उत्कट आणि उत्स्फूर्त भावनांना वास्तव शब्दरूप देण्यासाठी गद्याशिवाय पर्याय नव्हता. म्हणूनच बखरकारांनी गद्यातून बखरी लिहिल्या खरे तर गद्याला चांगले दिवस येण्याचे चिन्ह आहे. असे वाटण्या इतपत या बखरीतील वाङ्मयीन सौंदर्य अलोट आहे.

२) बखर म्हणजे तवारीकांचे अनुकरण नव्हे कारण तवारिकामध्ये वैयक्तिक वातावरण आणि प्रणयाची उपासना आढळते. तर बखरीत उघडया मैदानावरील पराक्रम आलेला असतो. त्यामुळे बखरींचे स्वरूप हे तवारीकांपेक्षा पूर्णतः वेगळे असते. मराठी बखर म्हणजे पौरूषत्वाला, पराक्रमाला आणि परमतत्वाला वाहिलेली श्रद्धांजली आहे. तर तवारिखा म्हणजे केवळ वैयक्तिक प्रेमभावना फलद्रुप करणारी वैयक्तिक रोजनिशी ठरते. फार तर चालण्यापुरता एखाद्याने पांगुळ गाडयाचा आधार घ्यावा आणि थोडयाच अवधीत अगादी दिमाखने डौलाने राजहंसाचे चालणे चालावे. अशी अवस्था मराठी बखरीची झाली आहे. मराठी बखरीचा साचा तवारीकेचा असेल पण तिचा प्राणमात्र मराठी मनाचा आहे. मराठी मन, मराठी माती आणि मराठी संस्कृती यांच्या ऋणातून निर्माण झालेली ती एक शब्दालंकृती आहे.

३) तवारिकापेक्षा बखरीचे स्वरूप भिन्न झाले कारण बखरकारांची वृत्ती प्रवृत्ती आगळी वेगळी होती. मुळात ही माणस तलवारीपेक्षा टाक कलम हाती घेणारी होती. शब्दांशी खेळणारी होती. शब्दावर जगणारी होती. रामायण महाभारत या ग्रंथाचे चिंतन आणि मनन करणारी होती. त्यातूनच त्यांचे संस्कृतचे ज्ञान चढते वाढते झाले होते. म्हणून आपले हे ज्ञान आणि व्यासंग त्यांनी बखर वाङ्मयातून व्यक्त केला आहे.

४) भारतीय संस्कृतीचे नवनित बखरकारांच्या व्यक्तीमत्त्व मुरल्यामुळे या बखरीतूनही काही संस्कृती विशेष व्यक्त झाले आहे. म्हणून तर भरतीय संस्कृतीचे यश चित्रण कळतनकळत बखरीतून आले आहे. या अर्थाने बखरी या सांस्कृतिक वारसा घेऊन आलेल्या सांस्कृतिक संहिती(माहिती देणारे) म्हणतात.

५) बखरीचा हेतू हा आपल्या प्रिय आणि आदरणिय व्यक्तीचे गुणगान करणे हा असल्यामुळे त्यांच्या अस्मितेला आनि लोकप्रियतेला बखरीतून बराच उठाव मिळाला आहे. साहजिक त्यांच्या अंगी असणाऱ्या नानाविध गुणांचे चित्रण करून बखरकारांनी बखरीची शोभा वाढवली आहे. बखरकार हे स्वाभिमानी आहेत. देशप्रेमी आहेत. आपल्या शूरविरांच्या पराक्रमाने त्यांच्या उदरात आनंदाचे भरते येते. म्हणून त्याच्या मनातील सारे राग रंग आणि भावतरंग बखरीतून व्यक्त झाले आहे. आपल्या राजाबद्दल स्वामीबद्दल बखरकारास नितांत आदर आहे. म्हणून तर शत्रूविषयी तटस्थ आणि आपणाविषयी तादात्म्य. बखरकारांच्या ठिकाणी दिसून येते. त्यामुळे बखरकारांच्या या चित्रणात थोडाफार उणेपणा किंवा एकांगीपणा दिसून येण्याचे शक्य आहे.

६) बखरकारांच्या या स्वकीय प्रेमाने आणि अतिरिक्त स्वामीनिष्ठेने बखरीचे स्वरूप थोडे एकांगी झाले आहे. बखरकारांच्या या एकांगी मनोवृत्तीने बखरीला कधी-कधी पाल्हाळाचा सासुरवास होतो. तर कधीकधी त्यांना समर्थनाचा वास येतो. त्यामुळे वर्ण्य विषयाचे भान सुटून सपाट लेखनाचा खच पडतो. अंध भक्तिमुळे कधी कधी अद्भुताचा किंवा चमत्कारांचा सुळसुळाट होतो.

**बखरीचे वाङ्मयीन मूल्य :** बखरीचे वाचन करत असताना आपणास ललित सहित्यातून मिळणारा आनंद मिळतो. म्हणून वाङ्मयीन दृष्टीने बखरीचे मूल्यमापन करणे गरजेचे ठरते. बखरकाराने आपली लेखणी उचलली होती. ती इतिहास लिहिण्याच्या उद्देश्यानेच तरीपण त्यांना निव्वळ इतिहास लेखन करायचे होते असे मात्र नाही. ऐतिहासिक घटना प्रसंगाचा वाङ्मयीन पातळीवर वाचकांना मनमुराद आनंद घेता यावा अशीही त्यांची दुय्यम धारणा होती.

प्रत्यक्ष डोळयांनी पाहिलेला इतिहास समग्र जीवन ढवळून काढणारा इतिहास आणि नवयुग निर्माण करणारा इतिहास असा हा अनेकांगी इतिहास तर त्याला लिहायचाच होता. पण तो काहीसा वाङ्मयीन पातळीवरून छत्रपती शिवाजीराजांनी हिंदवी स्वराज्य कसे स्थापन केले आणि पेशव्यांनी त्या राज्याचे साम्राज्य कसे स्थापन केले. हेही बखरकारांना सांगावेसे वाटले. पण या सोप्या ऐतिहासीक प्रेरणा स्त्रोतांचे लेखन करता करता आपल्या हृदयात दाटून आलेल्या भावभावना बखरकार रोखू शकले नाहीत. त्यामुळे त्यांचा भावनात्मक अविष्कार इतिहासापासून थोडा दूर जाऊ लागला. त्या इतिहासाला कलात्मक दर्जा किंवा वाङ्मयीन दर्जा प्राप्त झला तो त्यामुळेच.

बखरकारांना वस्तुनिष्ठ इतिहासही अभिप्रेत असावा. निदान त्यांची मूळ भूमिकाही तरी तशीच असावी. पण त्याचे कथन करता असताना मात्र त्यांना आपल्या मनावर आवर घालता आला नाही. त्यामुळे राष्ट्रप्रेम, स्वकीय गौरव स्वकीयांचा आदर स्वकियांचे समर्थन आणि परकियांची निंदा अशा प्रकारचे एकांगी चित्रण बखरीतून येऊ लागले. साहित्यात जसे विविध रसांचे कोंब ओसंडून वाहतात. तसे बखरीतही शृंगार रस सोडून बाकी सारे रस हजेरी लावताना दिसतात. साहित्यात जसे व्यक्तीच्या माध्यामातून समाज आणि संस्कृतीचे चित्रण, दर्शन किंवा चिंतन झालेले असते. तशाच प्रकारचे चित्रण बखरीतूनही आलेले असते. साहित्य वाचनातून जो वाङ्मयातून जो वाङ्मयीन आनंद प्राप्त होतो. तोच आनंद बखरीच्या वाचनानेही मिळू शकतो. म्हणून बखर वाङ्मयाला ललित वाङ्मयात समाविष्ट करणे चूक नाही स्वाभाविक आहे.

बखरीमध्ये काही ठळक वाङ्मयीन गुण आढळतात ते पुढीलप्रमाणे

**१) वर्ण्य विषयाशी तादात्म्य(एकजीव, एकरूप, समरस) किंवा जिव्हाळा :** ज्या विषयाचे आपणास वर्णन करावयाचे आहे. त्याच्याशी एकरूप झाल्याशिवाय कोणतेही लेखन जिवंत होत नाही. परिणामकारक होत नाही. ते तादात्म्यसुद्धा त्या लेखकाच्या जिव्हाळयावर आणि कल्पना शक्तीवर आधारित असते. बखरकारही आपल्या प्रतिपाध्य विषयाशी तादात्म्य पावलेले दिसतात. किंबहुना बखर वाङ्मयातील समर प्रसंग हा बखरकारांच्या अभिमानाचा विषय असल्यामुळे तो त्यांनी अत्यंत जिव्हाळयाने चित्रीत केलेला दिसतो. त्यांच्या या अंगभूत जिव्हाळयामुळेच ते बखर वाङ्मयाशी पराकोटीचे समरस होऊ शकते म्हणूनच बखरीमध्ये प्रकर्षाने भावते. ते या बखरकारांचे हे तादात्म्यच (तादात्म्य समरस)

**२) निवेदनातील प्रामाणिकपणा :** जिथे तादात्म्य येते तिथे निवेदनात सुद्धा प्रामाणिकपणा येतोच आणि प्रामाणिकतेच्या गुणामुळे बखरीत रसोत्कटता हा आणखी एक वाङ्मयीन गुण दिसून येतो. बखरकारांनी केलेल्या शौर्याच्या

ISBN 978-93-5196-698-2

वर्णनात बराच प्रामाणिकपणा आहे. त्यामुळे त्यातून भरपूर प्रमाणात विररसप्रधान निर्मिती साधता आली आहे.

**३) रचनातंत्र कौशल्य :** बखरकारांचे निवेदन कौशल्यपूर्ण आहे. तसेच त्यांची कथानक रचना आणि प्रसंग निर्मितीही कौशल्यपूर्ण आहे. कथावस्तूची त्यांनी केलेली मांडणी मोठी कलात्मक आहे. म्हणूनच एखाद्या उत्कट ललित कथेप्रमाणे प्रारंभापासून अखेर पर्यत वाचकांच्या मनात उत्कंठा व विस्मय निर्माण करून वाचकांच्या चित्तवृत्ती तल्लख करण्याचे सामर्थ्य बखरकारांच्या या लेखनातून दिसून येते.

**४) उत्कृष्ठ आणि वेधक भाषाशैली :** बखरीची भाषाशैली हे तिचे खास आकर्षण आहे आणि तेच तिचे एक वाङ्मयीन अंगही मानले जाते. बखरीची भाषाशैली बरीच अर्थवाहक आणि धवजीवाहक आहे. बखरीतील सुंदर भाषाशैलीमुळे लेखकाच्या भाषा प्रभुत्त्वाचीही कल्पना येते. त्याच्या अंतःकरणातील विचार, विकारांची त्यातून स्पष्ट जाणीव होते. सौंदर्यदृष्टी सहृदयता या कालात्मक गोष्टींची ओळखही बखरकाराच्या अंतकरणातून निर्माण झालेली आहे. त्यामुळे ती स्वतंत्र आणि वैशिष्टयपूर्ण आहे यात शंका नाही.

**५) ओजोगुण किंवा प्रसाद :** बखरीत प्रसाद या गुणांबरोबरच ओज आणि माधुर्य त्याला पूरक (पोषक) ठरणारे गुणही आढळतात. सुलभ अथोक्ती म्हणजे प्रसाद होय. सहजता हा प्रसाराचाच एक अविभाज्य भाग होय. असा प्रसादपूर्ण लेखनात भाषेचा आवेश आढळतो. स्वकीयांचे शौर्य धैर्य तसेच त्यांचा सात्विक आणि स्वाभिमानी बाणा इ.गुणांचे वर्णन करताना बखरकारांचा आवेश फुलून आलेला दिसतो. वेचक शब्द रचनेमुळे बखरीत या गुणांचा सहजपणे झालेला आहे. आवेश प्रसाद व माधुर्य या त्रिगुणांमुळे बखरींना वाङ्‌मयीन तेज लाभले आहे.

**समारोप :** बखरींनी इतिहासापेक्षा वाङ्‌मयीन गुण फार जोपासले आहेत. त्यामुळे एक आगळवेगळा आणि स्वतंत्र वाङ्मय प्रकार म्हणून विशेष महत्त्व मिळाले. त्यांचे विषय आणि मांदणी वाङ्‌मयीनदृष्टया आकर्षक आहे. त्यात जे जे प्रसंग निर्माण केले त्यात स्वत्वरजतम अशा त्रिगुणात्मक मानवी भावनांचे चित्रण आले आहेच. बखरकार हे बहुश्रुत आणि व्यासंगी होते. बखरीत महाराष्ट्रीय माणसाचा इतिहास आल्यामुळे त्याच्या गुणांबरोबर काही दोषही आले आहेत. महाराष्ट्रीयन माणसाचा स्वभाव, त्याच्या भावभावना आणि त्याचे काही खास वृत्तीविशेष, बखर वाङ्‌मयात आल्यामुळे बखरीतील व्यक्तीचित्रे ही महाराष्ट्रीय माण्साची प्रातिनिधीक रूपे ठरतात. हे प्रातिनिधीक स्वरूप बखर वाङ्मयातून आल्यामुळे बखर वाङ्मय हे मराठयांचे प्रातिनिधीक वाङ्मय मानले गेले. साऱ्याच बखरी काही वाङ्‌मयीन दृष्टया सारख्या नाहीत तरीपण स्वतंत्र गद्य लेखनाचा प्रकार होण्यास लागणारे साहित्य गुण तिमध्ये आढळतात. हे मान्याच केले पाहिजे. मराठी बखरीनेच मराठी गद्याला वैभवशाली आणि अभिमानास्पद वळण लावले आणि इतिहास व वाङ्‌मय यांचा सुरेख संगम साधून तिने आपले वेगळेपण कायम ठेवले.

**संदर्भ :**

१) नसिरबादकर ल.रा., प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास, पृ.२८९
२) ग्रामोपाध्ये गं.ब.(सं.),मराठी बखर गद्य, प्रस्तावना, पृ.६०
३) हेरवाडकर र.वि., मराठी बखर

ISBN 978-93-5196-698-2

# **मराठी बखरींतील शब्दविचार** (सभासद बखर आणि भाऊसाहेबांची बखर च्या अनुषंगाने)

**डॉ. आनंद शामराव बल्लाळ**
आजरा महाविद्यालय आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर

**१. प्रस्तावना :** सतराव्या अठराव्या शतकात मराठी वाङ्मय प्रवाहामध्ये फार्सी तवारिखा, अखबार यांच्या प्रेरणेतून बखर गद्याची निर्मिती झाली. तवारिखा, अखबार प्रमाणेच मराठीतदेखील इतिहासलेखन व्हावे, या इच्छेने अनेक राज्यकर्त्यांनी आपापल्या दरबारातील संबंधीत लेखकांना बखर लेखन करण्याचे आदेश दिले. त्यानंतर बखरकाररुपी कलावंतांनी आपल्या प्रतिभेने इतिहासाला कलाकृतीचे रूप दिले. काळाच्या उदरात गडप होणाऱ्या वास्तवाला नवजीवन दिले. त्यात नवचैतन्य ओतले आणि त्यामुळेच तो इतिहास, त्यातील त्या ऐतिहासिक व्यक्ती खऱ्या अर्थाने अमर झाल्या मराठी वाङ्मयाच्या इतिहासाला बखर वाङ्मयाच्या रुपाने एक अमोल लेणे लाभले.[१] शिवकाळात आणि पेशवेकाळात जरी बखर हा वाङ्मय प्रकार बहरला असला तरी शिवपूर्वकाळातील महिकावतीची किंवा माहिमची बखर, राक्षेसतागडीची बखर, शालिवाहनाची बखर या बखरींचे मराठी वाङ्मयातील योगदान महत्त्वाचे आहे. शिवकाळातील बहुतेक बखरींची प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराज हीच असल्याचे दिसून येते. सभासदाची बखर, रघुनाथ यादव चित्रे ऊर्फ चित्रगुप्त याने लिहिलेली शिवचरित्रपर बखर, शरफोजी राजांच्या आज्ञेवरून बाबुराव चिटणीस यांनी सांगितलेली भोसलेवंश चरित्र ही शिलालेखस्वरूपातील बखर, खंडो बल्लाळ चिटणीस यांचे शिवदिग्विजय, शेडगावकर बखर, वाकेनिशी बखर किंवा एक्याण्णव कलमी बखर, मल्हार रामराव चिटणीस यांनी लिहिलेल्या बखरी यांचा याठिकाणी उल्लेख करावा लागेल. शिवकाळात जसे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेतून बखरी निर्माण झाल्या तसेच पेशवेकाळात अनेक बखरींचा विषय पानिपतचा रणसंग्राम हा असलेला दिसून येतो. अर्थात पेशवेकालीन बखरींच्या विषयांमध्ये वैविध्य असले तरी पानिपतचे युद्ध ही या काळातील बखरींची एक मुख्य प्रेरणा सांगता येईल. त्यामध्ये पाणिपतची बखर, सोनपत पानपत येथील मराठे दुराणी युद्ध, भाऊसाहेबांची कैफियत, भाऊसाहेबांची बखर अशा काही महत्त्वपूर्ण बखरींचा येथे उल्लेख करता येईल.

मुसलमानांमध्ये तवारिखा लिहिण्याची जी पद्धत होती, त्यापासून प्रेरणा घेऊन मुसलमानांच्या सहवासाने त्यांच्या तवारिखा पाहून, मराठ्यांनीदेखील बखरी लिहिण्यास प्रारंभ केला. कोणाच्या तरी आज्ञेवरून ऐतिहासिक वृत्तकथन करण्याच्या हेतूने या बखरी लिहिल्या गेल्या. हे जरी खरे असले तरी बहुतेक बखरींचे स्वरूप पाहिल्यानंतर असे लक्षात येते की या बखरींमध्ये अनेक वाङ्मयीन गुणधर्म सामावलेले आहेत. त्या त्या काळातील समाजाची भाषा या बखरींमधून वापरलेली दिसून येते. त्यामुळे त्या भाषेतील अनेक शब्द, तत्कालीन समाजात रूढ असलेल्या अनेक म्हणी, वाक्प्रचार या बखरींमध्ये विपुल प्रमाणात आढळतात. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधामध्ये शिवकाळातील महत्त्वाची मानली जाणारी सभासद बखर आणि पेशवेकालीन बखरीतील महत्त्वाची भाऊसाहेबांची बखर या दोन बखरींच्या आधारे मराठी बखरींतील शब्दविचार मांडण्यात आलेला आहे.

**२. सभासद बखरीतील शब्दविचार :** मराठी बखरींचा एकूणच विचार केला असता शिवकालीन बखरींमध्ये कृष्णाजी अनंत सभासदविरचित श्री शिवप्रभूंचे चरित्र अर्थात सभासद बखर आणि पेशवेकालीन बखरींमध्ये भाऊसाहेबांची बखर या दोन बखरींचे वाङ्मयीनदृष्ट्या महत्त्व अनन्यसाधारण आहे. वास्तविक पाहता मराठीतील बहुतेक सर्वच बखरींमध्ये गद्यपद्यात्मक रचना, तपशीलवार व मनोवेधक वर्णन, अनेक संस्कृत वचने, ठसकेबाज मराठी भाषा, यमकानुप्रासयुक्त भाषा

यांचा वापर केलेला दिसून येतो. परंतु सभासद बखरीतील भाषा ही शिवकालीन भाषा समजून घेण्यासाठी महत्त्वाची ठरते.

स्वराज्यकाळातील पहिली आणि मराठीतील पहिली चरित्रात्मक बखर म्हणून सभासद बखरीकडे पाहिले जाते. कृष्णाजी अनंत सभासद यांनी राजाराम महाराजांच्या आज्ञेवरून इ.स. १६९४ साली चंदी येथे तवारिखांच्या आधारे इतिहास जाणून, लेखनासाठी आवश्यक ती सामग्री गोळा करून आणि घटनांचा अन्वयार्थ लावून लिहून पूर्ण केली असल्यामुळे या बखरीतील बऱ्याच घटना प्रमाण म्हणता येतील, अशा स्वरुपाच्या आहेत. बखरीतील चरित्रनायकाविषयी अर्थात छत्रपती शिवाजी महाराजांविषयी नितांत आदर असल्यामुळे त्यांना परमेश्वरी अवतार मानून त्यांच्या पराक्रमांना केंद्रीत करणाऱ्या घटनांवर आधारलेली ही बखर आहे. शिवाय एका समकालीन बखरकाराने ही बखर लिहिली असल्यामुळे शिवकालीन भाषेचे स्वरूप अभ्यासण्याच्यादृष्टीने ही बखर महत्त्वाची ठरते.

शिवकाळामध्ये दिल्लीची मोगलशाही, विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही, गोवळकोंडयाची कुतुबशाही या चार पातशाह्यांच्या प्रभावामुळे तत्कालीन मराठी भाषेवर फार्सी भाषेचा प्रभाव वाढलेला होता. या पातशाह्यांची दरबारी भाषा फार्सी असल्यामुळे त्यांचा भोवतालच्या परिसरातील मराठी भाषेशी संबंध येत होता. त्यामुळे मराठी भाषा काही प्रमाणात फार्सीमय होऊ लागली होती. हा प्रभाव रोखण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्य व्यवहार कोश निर्माण केला होता. त्यामुळे व्यवहारामध्ये संस्कृत, शुद्ध मराठी, शुद्ध फार्सी आणि फार्सीमिश्रीत मराठी असे भाषेचे तीन स्तर रूढ झालेले होते. हे सभासद बखरीतील भाषेचे स्वरूप लक्षात घेतल्यानंतर लक्षात येते.

या बखरीमध्ये काही फार्सी तत्सम शब्द आढळतात. उदा.– मर्द, किनारा, लष्कर, खबर, अर्ज, हालखुद, फौज, तैनात, रसद, कारकून, कुल, नजर, बाजार, खेरीज, मजकूर, कैद. त्याचप्रमाणे हंबीर, हुकुम, मुतालीक, खरेदी, शास्त्र, निशाण, जागा, पागा, धास्त यासारखे काही फार्सी तद्‌भव शब्ददेखील आढळतात. कृष्णाजी अनंत सभासद यांच्यावरील संस्कृत भाषेच्या प्रभावामुळे या बखरीत संस्कृत शब्द येणे क्रमप्राप्त होतेच. त्यामुळेच अनेक संस्कृत तत्सम शब्द या बखरीत आढळतात. उदा.– अग्निप्रवेश, पुरुषार्थ, सचिव, मंत्री, अमात्य, सुवर्ण, तृण, शास्त्रोक्त, मुहूर्त, अश्व, नगर, आलिंगन, पदार्थ, दर्शन, विकल्प, पितापुत्र, मार्ग, द्रव्य, देवस्थान, वर्तमान. याशिवाय संस्कृत तद्‌भव शब्दांचा वापरदेखील या बखरीमध्ये विपुल प्रमाणात केलेला आहे. उदा.– हळू, मोती, वाघ, भुई, दांत, पाय, घर, कोस, गाव, ठाणे, पाऊस. याचबरोबर पैका, गुरेढोरे, ओळखण, टीरी, वाडे–हुडे, धुरळा, पैकेकरी, माची, झाडी, झड यासारखे अगदी मराठी वळणाचे शब्ददेखील सभासदाने या बखरीत वापरलेले आहेत.

सभासद बखर ही जरी छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र रेखाटणारी बखर असली तरी बखरकाराला चरित्रनायकाच्या जीवनातील सर्वच प्रसंगांमध्ये रस नाही. त्यामुळे या बखरीत शिवाजी महाराजांच्या जीवनातील स्वराज्याची मुहूर्तमेढ, अफझलखानाचा वध, शाहिस्तेखानाची फजिती, आग्र्याहून सुटका यासारख्या शौर्यवर्णनपर प्रसंगांचे अधिक विस्ताराने आणि तपशिलाने वर्णन केलेले दिसून येते. त्यामुळे गनिमास मारून गर्दीस मेळविणे, प्राण गेलियाने कीर्ति आहे, श्री करील तें खरें, याच्या पाठी माझ्या लष्करांनी पाहिल्या असतील, बुडवून फत्ते करणें, नाहीं तर तोंड न दाखविणें, आज एक बाजू पडली, आमची बिरदें अष्टदिशेस लागलीं आहेत, अति धाकले ते धाकले बुध्दिहि धाकटेपणा योग्य केली, आपणांस साहेबांचे पायांची जोड आहे, आपण दूधभात खाऊन साहेबांचे पायाचें चिंतन करून राहीन, बहादूरखान पेंडीचें गुरु आहे त्याचा काय गुमान आहे? यासारखी वैशिष्ट्यपूर्ण वाक्यरचना सभासद बखरीमध्ये आढळते.

सभासद या बखरीमध्ये दान-दक्षणा, गडकोट, बेलतुळशी, ताकीद-पत्रे, पुंडपाळेगार यासारखे सामासिक शब्द, टाकोटाक, घरोघरी, मारामारी यासारखे द्विरुक्त शब्द वापरतोच वापरतो, शिवाय मनांत विकल्प धरणें, जाब लिहिणें, सबुरी करणें, हुन्नर करणें, सर्फराजी करणें, दावा लावणें, सला करणें, धास्त घेणें, शपथ देणें, मुलाजमत होणें, बोलाचाली करणें, तोंडात आंगोळी घालणे, दातीं तृण धरणें, पोटांत भय घालणें यासारख्या वाक्‌प्रचारांचा अगदी परिणामकारकरित्या वापर करतो. अशारितीने सभासद बखरीतील शब्दांचा विचार केल्यानंतर शिवकाळातील एकूणच मराठी भाषेचे स्वरूप लक्षात येतेच शिवाय कृष्णाजी अनंत सभासद यांच्या बखरलेखनाचे वैशिष्ट्यदेखील लक्षात येते.

**३. भाऊसाहेबांची बखर मधील शब्दविचार :**

पानिपतच्या युद्धाचा प्रसंग हा महाराष्ट्राच्या इतिहासातील एक अत्यंत निकराचा प्रसंग मानला जातो. मराठ्यांनी जे वैभव भोगले, ते सारे वैभव पानिपतच्या युद्धात लयास गेले. त्यामुळे या युद्धप्रसंगावर आधारीत अनेक बखरी पेशवेकाळात लिहिल्या गेल्या. पानिपतची बखर, होळकरांची कैफियत, होळकरांची थैली, भाऊसाहेबांची बखर, भाऊसाहेबांची कैफियत, सोनपत पानपत येथील मराठे दुराणी युद्ध, काशीराजाची बखर, नाना फडणिसाचे आत्मचरित्र अशा कितीतरी बखरींमध्ये पानिपतच्या युद्धाची वर्णने सांगितलेली आहेत. परंतु या बखरींमध्ये अतिशय महत्त्वाची आणि वाङ्‌मयीनदृष्ट्या महत्त्वाची म्हणून भाऊसाहेबांच्या बखरींचा उल्लेख करता येतो. या बखरीच्या लेखकाबाबत विविध मतप्रवाह असले तरी कृष्णाजी शामराव हा या बखरीचा लेखक असावा, श्री. का. ना. साने यांना वाटते तर तो चिंतामण गोविंद असावा, असे श्री. शं. ना. जोशी यांनी संपादिलेल्या प्रतीवरून दिसते.[४]

पेशवेकालीन भाषेचे प्रातिनिधिक स्वरूप भाऊसाहेबांच्या बखरीत प्रकर्षाने प्रकट झालेले आहे. पेशवेकालीन शब्दविशेषांमुळे या बखरीमध्ये एक प्रकाराची ऐतिहासिकता आलेली दिसून येते. पेशवेकाळात जशी मराठी भाषा बोलली जात होती, तसेच संस्कृत, मारवाडी, उर्दू, फार्सी अशा भाषा या काळात व्यवहारामध्ये प्रचलित होत्या.समर्पक पौराणिक दाखले, अनेक संस्कृत-हिंदी सुभाषिते, अनेकविध वाक्‌प्रचार आणि म्हणी इत्यादींनी या बखरीला श्रेष्ठ दर्जाचे वाङ्‌मयीन मूल्य आलेले आहे.[५]

भाऊसाहेबांच्या बखरीमध्ये अनेक संस्कृत व तत्सम शब्दांचा भरणा आढळतो. उदा.- मृत्यू, मोक्षसाधन, गुरू, हिंदुधर्म, ईश्वर, साहित्य, प्रलय, बुध्दी, वियोग, विलाप, शोक, स्वकर्म, देव, पूर्वाचरण, दुर्लभ, मनुष्य, वर्तमान, यंत्र, उत्तरक्रिया, सूर्योदय, कृतोपचार, तीर्थ, दैत्य, पात्र प्रमाण, पुत्र इ. अर्थात या बखरीमध्ये संस्कृत तत्सम शब्दांपेक्षादेखील तद्भव शब्दांचा वापर अधिक असलेला दिसून येतो. जसे की, या बखरीत सिरछेद, गत, बती, भुई, रान, रानोरान, आनभव, शांतवन, विच्चार, बुधी, पाटील, कोस, घागर, हात, आग, दक्षण, किलमिष, काज, जलम, बरसात, वडील, नारळ, ससा, आपेश, धनवतरी, रूषी, झुंज, दात, काळ, फळ, सिध्द, आवस्ता, दृष्टी, तोंड अशा कितीतरी तद्भव शब्दांचा वापर अधिक आढळतो.

पेशवेकालीन बखरींवर फार्सीचे प्रभुत्व होते, हे अनेक बखरीतून स्पष्ट होते. त्यामुळे पेशवेकाळातील एकूणच भाषेवर तसा संस्कृत भाषेतील तत्सम आणि तद्भव शब्दांचा प्रभाव जाणवतो, तसेच अरबी - फार्सी तत्सम आणि तद्भव शब्दांचा प्रभाव या बखरीतील शब्दसंग्रहावर झालेला दिसून येतो. गंज, फौज, तमाम, हजार, वकील, दम, हिंमत, साफ, अर्ज, यार, नजर, दौलत, मुकाम, लष्कर, सामान, मर्द, मुर्दा, रूबरू यासारखे अनेक अरबी -फार्सी तत्सम शब्द या बखरीत

आढळतात. तर तोफ, गलीम, साहेब, सुतरनाला, मुरदा, मुडदा, निशाण, नजीक, चोपदार जागा, पागनीस, अंबारी, साहादाने, जाबसाल, सुभा, खतल, कुरनिस, शहा, बुणगे, शरम, फुरसत, जखमी, येकदिल, स्वार, रोजमुरे, उमर, शाबूत, खुशाली, परवा, कागद, हला, मइदान, फते यासारखी अरबी-फार्सी शब्दांची तद्‌भव रुपे देखील या बखरीत अधिक प्रमाणात आढळतात. आगटी, पोळजत्रा, उठावणी, हातघाई, मूठमाती, खांडावा, हिरहिऱ्या आदी मराठमोळ्या शब्दांचा वापरदेखील बखरकाराने केलेला आहे.

भाऊसाहेबांच्या बखरीचे वाङ्मयीन सौदर्य वाढविण्यामध्ये जसा वाटा त्यातील वाक्‌प्रचारांचा आहे, तसाच वाटा त्यातील म्हणींचा आहे. दे माय धरणी ठाय, देईन मान व देईन प्राण, आपण मरावे आणि जग बुडवावे, न भूतो न भविष्यति, आप मेला जग बुडाले, आबरू जाते आणि वाचते कोण?, रणात मृत्यु आला तर उत्तम आहे नाही तर विष खाऊन प्राण द्यावा, कठिण समय वैरियास न यावा, ज्याचा सेवक गांजिला त्याचे जालेपणाची निर्फलता, स्त्रीजातीस मनसुबा पुसावा, याहून अश्लाघ्यता दुसरी नाही, आपण शाबूद तो दुनिया शाबूद, विनाशकाली विपरित बुद्धी, येक आणि चुकी तो बारा बरसकी हयात, पाण्याआधी वळण बांधिता उत्तम अशा कितीतरी म्हणी बखरकाराने उत्तमरित्या वापरलेल्या आहेत. पेशवेकालीन लोकभाषेतील या म्हणींमुळे या बखरीच्या भाषेत एकप्रकारचा गोडवा निर्माण झाला आहे. गं. ब ग्रामोपाध्ये या बखरीविषयी म्हणतात की, बखरींना वाङ्मयीन दर्जा देणाऱ्या ज्या काही थोड्या बखरी आहेत आणि ज्यांच्यामुळे बखरीला एक खास वाङ्मयप्रकार मानता येते, त्यात सर्वात श्रेष्ठ अशी बखर म्हणजे भाऊसाहेबांची बखर होय.[६] तर ही बखर म्हणजे जुन्या गद्याचा नमुना नसून मराठी भाषेचे वैभव आहे, अशा शब्दात र. वि. हेरवाडकर यांनी मराठी बखर या ग्रंथात या बखरीतील भाषेचे कौतुक केले आहे.[७]

**४. समारोप :**

सभासद बखर आणि भाऊसाहेबांची बखर यातील शब्दांचा विचार अशा रितीने करता येईल. एकंदरीतच मराठी बखरींची भाषा साधी, गद्य, नीरस, नुसतीच निर्जीव वर्णन करणारी ललितेतर साहित्याची भाषा नाही, तर जीवंत, रसपूर्ण आणि म्हणूनच खऱ्या अर्थाने ललित वाङ्मयाची भाषा आहे. हे भाषेचे स्वरूप या बखरीतील शब्दांच्या वापरावरून लगेचच लक्षात येते. त्या सभासद बखरीवरून शिवकाळातील आणि भाऊसाहेबांची बखरवरून पेशवेकाळातील भाषा समजून घेण्यास या बखरीतील शब्दवापर निश्चितच उपयोगी पडतो.

**संदर्भ :**

१. डॉ. यु. म. पठाण (संपा.), भाऊसाहेबांची बखर, पृष्ठ १
२. डॉ. यु. म. पठाण (संपा.), सभासद बखर, प्रस्तावनेतून उद्धृत, पृष्ठ २७.
३. डॉ. ल. रा. नसिराबादकर (संपा.), प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, पृष्ठ २९३
४. डॉ. यु. म. पठाण (संपा.), उनि, प्रस्तावनेतून उद्धृत, पृष्ठ ४
५. गं. ब. ग्रामोपाध्ये, मराठी बखरवाङ्मयाचा पुनर्विचार, पृष्ठ १११
६. तत्रैव, पृष्ठ १११
७. डॉ. ल. रा. नसिराबादकर (संपा.), उनि, पृष्ठ ३०३

ISBN 978-93-5196-698-2

# ऐतिहासीक दृष्टीकोणातून बखर वाङःमय -एक अभ्यास

डॉ. सिध्दार्थ आर. दवाणे
कमलादेवी कॉलेज ऑफ आटर्स ॲण्ड कॉमर्स, विठ्ठलवाडी (कल्याण)

प्रस्तावना .

इतिहास हे एक शास्त्र असल्याने त्याचा अभ्यास शास्त्रीय दृष्टीकोणातून होणे आवश्यक आहे. ज्याच्या आधारे किंवा ज्यांच्या साह्याने इतिहास लिहला जातो त्याला इतिहासाची साधने म्हणतात. ही साधने लिखित व पुरातत्वीय स्वरूपाची असतात. मराठयांच्या इतिहासावर प्रकाश टाकणारे अनेक ग्रंथ रूपाने उपलब्ध आहे. इतिहास लेखन हा साहित्य प्रकार हा मराठेशाहीस अस्तित्वात होता. परंतू इतिहासाकडे व ऐतिहासिक व्यक्तिंकडे बघण्याचा दृष्टीकोन शास्त्रीय नव्हता.

मराठयांचा इतिहास लिहतांना वखर वाङःमय हे एक महत्वाचे साधन आहे. परंतू वखरकारांवर पुराणांची फार मोठी छाप दिसून येते. वखरकारांनी वखरी लिहत असतांना शास्त्रीय पध्दतींचा वापर केला नाही. तरीसुध्दा मराठयांच्या इतिहासाचा अभ्यास करतांना एक साधन म्हणून वखरीचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

वखर- वखर या शब्दाच्या उत्पती संबंधी विविध मत दिसून येतात. वि.का. राजवाडे यांच्या मते, वखर हा शब्द वक - बकणे(बोलणे) किंवा सांगणे अर्थातच वखर म्हणजे तोंडी सांगितलेला मजकूर होय. मा. प्रा.पा.ना. कुलकर्णी यांनी बखैर-बखेर-बखर अशा पाय-यांनी बखर हा शब्द निर्माण झाला असावा असे मत व्यक्त केले आहे. तर डॉ. श्री. र. कुलकर्णी यांनी प्राचीन काळी लेखनासाठी चमडयाचा वापर होत असे त्यावरून ते कापड बकरीचे असावे, बकरी शब्दाचा अरबी पर्यायी बकर असा आहे. आणि म्हणून बकरचा बखर असा उच्चार होऊन बखर शब्द रूड झाला असावा असे वेगळेच अनुमान केले आहे. सर्व साधारणपणे या शब्दाची उत्पती अरबी शब्द बखर (बातमी, वृत्तांत) पासून झालेली आहे. मराठयांच्या काळात बखर हा शब्द माहिती देणे या अर्थानेच रूढझाला. अशी माहिती अर्थानेच ऐतिहासिक व्यक्ति व घटना यांच्या विषयी असते. अनेक वेळा चरित्रनायकाच्या हुकूमावरून बखरकाराकडून लिहूण घेण्यात येत असे.

बखर वाङःमयाचा उदय- भारतात इतिहास लेखनाची परंपरा ही फार जुनी आहे. प्राचिन काळापासून भारतात इतिहास लिहला गेला होता. पण त्यात धार्मिक बाबींवरच जास्त लक्ष दिले गेले. १२ व्या शतकात कल्हणने 'राजतरंगीणी' हा ग्रंथ ऐतिहासीक दृष्टीकोनातून लिहला. पण या ग्रंथाचे स्वरूप काव्यात्मकच आहे. भारतात तुर्क सत्तेच्या स्थापनेनंतर इतिहासात राजकिय इतिहासाला महत्व आले. पुढिल काळात दरबारात नोंदी व रोजनिशी लिहल्या जाऊ लागल्या.

'महिकावतीची बखर' ही प्राचिनतम बखर होय. मात्र या बखरीचा लेखन काल सलग नाही. पहिल्या प्रकरणाचे लेखन श. १३७० (इ. स. १४४८) मध्ये तर अखेरच्या प्रकरणाचे लेखन श. १५०० च्या (इ. स. १५७८) च्या सुमारास झाले असावे. त्या मुळे महिकावतीच्या बखरीने मराठी बखर वाङःमयाची सुरवात झाली असे म्हणता येणार नाही. कारण त्यानंतर जवळपास १२५ वर्षे एकही बखर लिहली गेली नाही. सभासद कृत बखर शक १६१६ (इ. स. १६९४) मध्ये रचली गेली. तेव्हापासून ते हरिवशांच्या बखरी पर्यंत म्हणजे शक १७६४ (इ. स. १८४२) पर्यंत बखर लेखनकार्य सतत चालू असल्याचे दिसते. थोडक्यात मराठा राज्याच्या स्थापनेनंतर अत्पावधीत बखर वाङःमयाचा प्रारंभ झाला. आणि मराठा राज्याच्या अस्ता बरोबर हा वैशिष्टपूर्ण वाङःमय प्रकारही अस्तंगत झाला.

बखरीचे वर्गिकरण - इतिहासाचार्य राजवाडे यांनी बखरीचे वर्गिकरण तीन भागात केले आहे.

१. **समकालीन बकरी—** समकालीन बखरकारांनी लिहलेल्या बखरी या प्रकारात मोडतात. अस्सल व विश्वसनीय सरकारी दप्तऐवजाच्या अभावी या बखरींवर अवलंबून राहावे लागते.

२. **ऐकीव माहितीवर आधारलेल्या बखरी—** घटना घडल्या नंतर काही काळाने आपल्या आठवणीवर व ऐकीव माहितीवर विसंबून बखरकाराने अशी बखर लिहली असते.

३.जुन्या बखरीवर आधारीत असलेल्या बखरी—काही वेळा या बखरी म्हणजे जुन्या बखरीच्या नकली असताता. त्यामुळे मुळ बखरीतील सर्व चुकांचाही समावेश असतो. या बखरी ऐतिहासीक दृष्टीकोणातून पुर्णपणे अविश्वसनीय असतात.

डॉ. र. वि. हेरवाडकर यांनी मराठी बखरीचे वर्गिकरण पुढिल प्रमाणे केले आहे.

१.चारित्रात्मक बखर— या बखरीत चरित्र्य नायकाच्या चरित्र्याचे वर्णन असते. उदा. कृष्णाजी अनंत सभासद यांचे शिवचरित्र व मल्हारराव रामराव चिटणीस कृत शिवाजीचे सप्तप्रकरणात्मक चरित्र्य.

२. विशिष्ट घराण्याचा इतिहास— एखादया घराण्याची हकिकत उदा. पेशवांनी बखर व भोसले वंश चरित्र.

३.आत्मचरित्रात्मक बखर— उदा. नाना फडणविसांचे आत्मचरित्र.

४. प्रसंगात्मक बखर— या बखरीत एखादया महत्वाच्या प्रसंगाचे वर्णन असते उदा. पानिपतची बखर.

५. विशिष्ट काळाचा इतिहास— उदा. पेशवाईच्या अखेरची बखर.

६. विशिष्ट पक्षाची बाजू मांडणारी बखर— उदा. होळकरांची कैफियत.

७. सांप्रदायिक बखर— उदा — समर्थांची बखर.

८.भाषांतरीत बखर— उदा. बुंदेल्यांची बखर.

९. स्थळवर्णणात्मक बखर— उदा. महाबळेश्वरची जुनी महती.

१०. उत्पन्नविषयची बखर— करीने किंवा सरकारला सादर केलेल्या कैफियती.

**शिवकालीन बखरी —**

**सभासद बखर—** हि शिवाजी महाराजांवरील सर्वात जुनी व शिवकालात लिहीली गेलेली बखर आहे. छत्रपती राजाराम यांच्या आज्ञेवरून कृष्णाजी अनंत सभासद याने इ. स. १६९४ मध्ये ही बखर लिहली. सभासदांचे खरे नाव 'हिरेपारखी' असून 'सभासद' हे त्यांचे अधिकारवद असावे. छत्रपती राजाराम यांच्या प्रशासनातील तो एक महत्वाचा अधिकारी होता. या बखरीतील मजकूर हा पत्रात्मक आहे. या बखरीची सुरवात मालोजी, विठोजी व शहाजी या शिवाजी महाराजांच्या पुर्वजांपासून होते. शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील एकूण ७१ प्रसंगाचे वर्णन यात आढळते. पण १६५९ पुर्वीच्या प्रसंगाची माहिती ही त्रोटक असून त्यानंतरच्या घटनांचा यात तपशिल आढळतो. या बखरीत महाराजांची राज्यकारभार व्यवस्था, लष्करी व्यवस्था, किल्ले, खजिना, सरदार इ. अनेक बाबींवर प्रकाश टाकलेला आहे.या बखरीचे विवेदन हे पौराणिक असून त्यामधिल इतिहास हा त्रोटक आहे. या बखरीत घटनांचा काळ जरी देण्यात आला नसला तरी बखराने घटनांचा क्रम शेवट पर्यंत पाळला आहे. तसेच ही बखर शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर चौदा वर्षांनी लिहल्याने शिवकालाची माहिती समजून घेण्यासाठी ती बहूमुल्य आहे.

**९१ कलमी बखर—** ही बखर ९१ कलम बखर या नावाने प्रसिध्द आहे. कारण यात ९१ कलम असून मालोजी राजे भोसले यांच्या

पासून शिवाजी महाराजाच्या मृत्यूपर्यंतचा इतिहासाचे वर्णन यात आढळते. ही बखर प्रसिध्द करण्याचे श्रेय संशोधक वि. स. वाकसकर यांच्याकडे जाते. वाकसकरांच्या मते ही बखर मंत्री दत्ताजी त्रिमळ वाकेनिविस यांनी तयार केली. व तिच्या लेखनकाळ १६८५ ते १७०७ असावा.

**चिटणीस बखर—** इ. स. १८११ मध्ये दुस—या शाहू महाराजांच्या आज्ञेवरून ही बखर मल्हारराव रामराव चिटणीस यांनी लिहली. बखरकाराचे आजोबा बाळाजी आवाजी चिटणीस हे शिवाजी महाराजांचे समकालीन होते. या बखरीत एकूण सात प्रकरण आहेत. पहिल्या प्रकरणात भोसले घराण्याची वंशावळ दिल्या आहेत. पण त्या वंशावळ चुकिच्या आहेत. तिस—या प्रकरणात राजाराम महाराजांच्या जन्माची तर चौथ्या प्रकरणात मराठयांचे पायदळ, तोपखाना, कवायती व श्रावण महिन्यातील दानधर्म इ. माहिती आढळते. पाचव्या प्रकरणात शाहिस्तेखानच्या स्वारीचे, सहाव्या प्रकरणात शिवाजी महाराजांची कर्नाटक वरील स्वारी तर सातव्या प्रकरणात राज्यभिषेकाचे वर्णन आढळते. या बखरीत सुध्दा ऐतिहासिक घटनांचा कालानुक्रम दिलेल्या नाही. तसेच ती शिवकालाच्या एकशे पंचविस वर्षांनी लिहल्याने या बखरीत अनेक दोष आढळतात.

**चित्रगुप्त बखर—** ही बखर रघूनाथ यादव चित्रगुप्त याने लिहली असून ही सभासद बखरीवर आधारीत एक बखर आहे. पण सभासद बखरीतील मजकूर आपल्या बखरीत अधिक विस्ताराने दिला आहे. तसेच बखरीच्या मजकुरात आधूनमधुन त्यांनी आपल्या कविताहीघातल्या आहे. या बखरीत बखरकाराचे भाषाप्रभुत्व जरी सिध्द होत असले तरी हे लेखन कृत्रिम असल्याचे स्पष्टपणे जावणते.

**भोसले वंशाची बखर—** या बखरीत तंजावरच्या भोसले घराण्याचा इतिहास लिहला गेला आहे. या बखरीत शिवाजी महाराजांच्या चौदा पिढयांची माहिती वर्णन करण्यात आली आहे. यात शिवाजी महाराजांच्या जिवनातील विविध घटनांचा उल्लेख आढळतो. या बखरीतील माहिती ही सर्व साधारण पणे सत्य आढळते. या बखरीचे एक वैशिष्ट म्हणजे तंजावर सारखा, दुरच्या ठिकाणी हि बखर लिहली गेली असून त्यात शिवपूर्व काल व शिवकाला विषयी महत्वपुर्ण माहिती आढळते.

**श्री. शिवदिग्वीजय—** ही बखर १८१८ साली लिहली गेली. पण ही बखर कोणी लिहली या विषयी विविध वाद आहे

इतिहास संशोधन नंदुरबारकर व दांडेकर यांनी १८९५ साली ती प्रसिध्द केली. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मते, या बखरीचा मजकूर एखादया जुन्या बखरीवरून घेतला असावा. राजाराम महाराजांना राजपद मिळावे म्हणून राणी सोयराबाईचे केलेल्या कृत्यांचे वर्णन यात बखरकाराने केले आहे. बखरकाराचा भाषा प्रौढ व संस्कृत वळणाची असून त्यामध्ये काही संस्कृत श्लोकांचीही समावेश करण्यात आला आहे.

**पेशवेकालीन बखर —**

**श्री. शाहू महाराजांची बखर—** या बखरीचा कर्ता खंडेराव चिटणीस आहे. या बखरीत शाहू महाराजांचा जन्म ते मृत्यूपर्यंतची माहितीचे सविस्तर वर्णन केले आहे. मुघलांच्या कैदेत असतांना शाहू महाराजांच्या परिस्थितीचे तपशीलवर वर्णन बखरकाराने केले आहे.

**पेशवा बखर—** पेशवांचे एक विश्वास सहकारी श्रानिवास दाजी यांच्या सांगण्यावरून कृष्णाजी सोहानी यांनी ही बखर लिहली. इ. स. १७१३ ते १८१८ या काळातील सर्व घडामोडींचा तपशीलवर उल्लेख या बखरीत आढळतो. ही बखर म्हणजे पेशवांच्या पराक्रमांची गाथा होय. या बखरीत इतर बखरीच्या तुलनेने वाङःमयीत गुण अधिक असुन त्यात इतिहास व वाङःमय यांच्या सुरेख संगम झाल्याचे आढळते.

**भाऊ साहेबांची बखर—** पत्ररूपानील या बखरीचा लेखक शिंदयाच्या पदरी एक सेवक असावा. या बखरीत इ.स. १७६१ च्या

पानिपत युध्दाचे तपशीलवार वर्णन करण्यात आले आहे. यात त्यांच्या विश्वसनियतेची खात्री देता येत नाही. बखरीतील मजकूरावरून काही तत्कालीन चालिरीतीवर प्रकाश पडतो. उदा. सतीची प्रथा, समाजात स्त्रियांना देण्यात येणारे मानाचे स्थान, पाठीवर जखम झालेल्या सैनिकाची समाजात होणारी हेटाळणी यांचा उल्लेख बखरकाराने केला आहे.

**पनिपतची बखर—** इ.स. १७६३ मध्ये रघुनाथ यादव याने पेशवा नानासाहेब यांची विधवा पत्नी गोपिकाबाई हिच्या आज्ञेवरून हि बखर लिहली होती. पानिपतच्या युध्दात वीरगती प्राप्त झालेल्या महत्वांच्या व्यक्तिंची यादी हे या बखरीचे प्रमुख वैशिष्ट आहे.

**मराठी बखरीचे वैशिष्टये** — मराठी बखरीचे लेखन इतिहासाच्या शास्त्रीय भुमिकेवुन झालेले नाही. तरी युध्दा बखरींचे काही वैशिष्टये आढळतात.

- बखरी मोडी लिपीत लिहलेल्या आहेत.
- अनेक वेळा बखरी राजा किंवा अनेक लहान मोठया सरदारांच्या सांगण्यावरून लिहल्या जात.
- अनेक बखरींच्या विषय राजकीय असता तरी कालानुक्रम इतिहास लिहला जात नसे.
- बखरीमध्ये राजकिय घडामोडींच्या तुलनेत सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा उल्लेख कमी आढळतो.
- बखरकार स्वकीयांचा स्तुती करत असे. चमत्कार, अवतरांच्या कल्पनांचाही मोठया प्रमाणात समावेश होत असे.

**मुल्यांकन—** मराठयांच्या इतिहासाचा अभ्यास करतांना बखर हे एक महत्वाचे साधन आहे. शिवकाळात व पेशवाईत अनेक बखरी लिहल्या गेल्या. या बखरीतुन आपणास तत्कालीन राजकीय परिस्थिती बरोबर काही प्रमाणात सामाजिक, आर्थिक व धार्मिक परिस्थितींची देखिल माहिती मिळते. तसेच बखरीतील ऐतिहासिक घटना या त्यांच्या निवेदन कौशल्यामुळे आकर्षण झाल्या असून त्या जिवंतच वाटतात. पण बखरींची विश्वसनीयता अत्यंत वादाचा विषय आहे. परंतू बखरीतील दोष मान्य करूनही मराठयांच्या इतिहासाचे ते एक महत्वाचे साधन ठरते. व बखरीचा वापर न करता मराठयांचा कोणताही इतिहास सुसंगतपणे लिहणे शक्य नाही.

**संदर्भ ग्रंथ—**

१. डॉ. अ. रा. कुलकर्णी व ग. ह. बरे(संपादक) — मराठयांचा इतिहास (खंड पहिला)

२. डॉ. मु. श्री. कानडे (संपादक) — भाऊ साहेबांची बखर

३. डॉ. र. वि. हेरवाडकर — मराठी बखर

४. एस. एम. जोशी (संपादक) — छत्रपती श्री शिवाजी राजजे बखर (कृष्णाजी अनंत)

५. प्र. न. देशपांडे — मराठयांचा उदय आणि उत्कर्ष.

६. डॉ. प्रभाकर देव — मराठयांचा इतिहास.

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखरगद्य : वाड्.मयीन दृष्टिकोन

प्रा.डॉ. प्रभाकर रामचंद्र पवार
मराठी विभाग प्रमुख, मुधोजी महाविद्यालय, फलटण

मध्ययुगीन मराठी वाड्.मयाच्या इतिहासात बखर वाड्.मयप्रकाराला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. ऐत्यासिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय दृष्टीने नोंदल्या गेलेल्या माहितीचा, घडामोडींचा लेखाजोखा या बखरींमध्ये वाड्.मयीन अंगाने उतरलेला आहे. यादवकाळातील ज्योतिष, आठवणी, कथा, चरित्रे स्वरुपाचे अल्प गद्यलेखन सोडले तर प्राचीन मराठीतील लेखन हे काव्यात्मक स्वरुपाचेच अधिक आहे. या पार्श्वभूमीवरशिवकालीन व पेशवेकालीन गद्यलेखनामध्ये मबखरफगद्याचे लेखन विपुल प्रमाणात झालेले आढळते. वि.का.राजवाडे यांनी तर मराठीत लिहिल्या गेलेल्या दोन अडीचशे बखरींचा आकडा सांगितलेला दिसून येतो. ऐत्यासिकतेबरोबर वाड्.मयीन सौंदर्याने नटलेल्या बखरींचा मराठी वाड्.मयामध्ये मोठा वाटा असलेला दिसून येतो. एक वाड्.मय प्रकार म्हणून बखरगद्याबद्दल काही विचारशोधके मांडण्याचा सदर शोधनिबंध मी प्रयत्न केलेला आहे, तो पुढीलप्रमाणे होय.

मबखरफ्या वाड्.मय प्रकाराचे चरित्र आख्यान, वंशानुचरित्र, कैफियत, शैली अशा प्रकारचे स्वरुप आहे. ते हकीकत वृत्तांत, अखबार इ. लेखनप्रकारांतून शब्दबध्द झालेले दिसून येते. मबखरफलेखनाची पूर्वपरंपरा आपणाला ऋगवेदाकाळात सापडते. या संदर्भात गं.ब.ग्रामोपाध्ये म्हणतात, ङ्गबखर लेखनाची परंपरा थेट ऋगवेदकाळात जाते. बखर हे फारशी वळणाचे नाव, अर्थात नंतरचे पण वीरपुरुषाचे चरित्र-आख्यान जे बखरलेखनाचे प्राणभूत लक्षण म्हणजेच सशपीश ते ऋग्वेदातील राजप्रशस्तिवर्णनात आढळते. राजवाडे यांनी फारशी तवारिखा म्हणजे तारीखवार घडलेल्या हकीगतींच्या नोंदी म्हणजेच इतिहास३ या मुस्लिम राज्यकर्त्यांत असलेल्या लेखन परंपरेवरुन व मराठयांच्या बखर लेखनांच्या साम्यतेवरुन मबकफ म्हणजे बोलणे वतवारिखातील मखबरफ्या शब्दाच्या वर्णविपर्यासाने मबखरफ्या शब्दाची व्युत्पत्ती सुचवली असावी. अशी माहिती ग्रामोपाध्ये देताना आढळतात. हामबखरफ्या शब्दाचा पूर्वइतिहास पुरेसा वाटतो.

बखरींचे वर्गीकरण सामान्यपणे पाच प्रकारात करता येते. त्यामध्ये. १.समकालीन इतिहास व ऐत्यासिक घडामोडी, ज्या बखरकाराने प्रत्यक्ष पाहिल्या, ऐकल्या व अनुभवलेल्या आहेत. त्याची नोंद घेणाऱ्या बखरी यामध्ये समकालीन ऐत्यासिक प्रमाणबध्दता, राजकीय इतिहास, व घटनांची माहिती इ. चा अंतर्भाव असतो. या प्रकारात आपणाला मसभासद बखरफ्न मभाऊसाहेबांची बखरफ्ह. चा समावेश यईल २. ज्या बखरी केवळ स्मृतींवर व आठवणींवर हवाला ठेवून लिहिलेल्या असतात. त्या बखरीमध्ये आठवणी, दंतकथा, आख्यायिका या आधारे लेखन केलेले असते. कलात्मक पातळीवर केलेल्या लेखनामुळे व स्मृतीवर हवाला ठेवल्यामुळे या बखरींमध्ये कालविपर्यास व स्थलविपर्यास अशाप्रकारचे दोष राहतात. ३. उत्तरकालीन बखरी असा विश्वसनियेतून लिहिलेल्या बखरींचा एक प्रकार सांगता येतो. ऐतिहासिक कागदपत्रे, जुने ग्रंथ, दप्तरातील टिपणे यांच्या अस्सल साधनांच्या आधारे या उत्तरकालीन बखरींचे लेखन झालेले आहे. ४. ज्या लेखनामध्ये चरित्र, कैफियत, हकीगत, आत्मचरित्र इ. प्रकारचे लेखन केले जाते. असा हा प्रकार आहे. त्यामध्ये व्यक्तिशः लेखकाला आलेला स्वानुभव हा महत्त्वाचा असतो. या बखर लेखनामध्ये मभाऊसाहेबांची कैफियतफहिचा समावेश होईल. ५. या प्रकारामध्ये पौराणिक आणि सांप्रदायिक स्वरुपाच्या धार्मिक श्रध्दा, चमत्कार यावर आधारीत लेखन असते पण ते मबखरफ्नावाखालीच केलेले असते. यांमध्येमसमर्थांची बखरफ हिचा समावेश करता येतो. अशा प्रकारे

बखरींचे सामान्यत पाच प्रकारात वर्गीकरण करता येते.

बखरींचे प्रकार व उपलब्धी पाहता विविधता दिसते. त्यामध्ये महिकावतीची उर्फ माहीमची बखर, शालिवाहनाची बखर, विजयनगरचा विध्वंस, शिवकालीन बखरीमध्ये, शिवछत्रपतींचे चरित्र, बुंदेल्याची बखर, मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचे वृत्त, राक्षसतागडीची बखर, सभासदाची बखर, शेडगावकर बखर,जावलीकर मोरे यांची बखर, पेशवेकालीन बखरींमध्ये, साष्टीची बखर, श्री. शाहू महाराज यांची बखर, होळकरांची शैली, पाणिपतची बखर, श्रीमंत भाऊसाहेब यांची कैफियत, पेशव्यांची बखर, होळकरांची कैफियत, मराठयांची बखर, हरिवंशाची बखर, खरडयाच्या स्वारीची बखर, श्रीमंत नारायणराव पेशवे यांची बखर, पौराणिक बखरी सांप्रदायिक बखरी, श्रीसमर्थांची बखर, जयरामस्वामी वडगावकर यांच्या चरित्राची बखर, इ. नामावली बखरींच्या प्रकारोपप्रकारांच्यानुसार देता येते. विशेष म्हणजे या सर्व बखरी गद्यलेखन शैलीतील बखरी आहेत. वर्णनपरता व जिव्हाळा या गुणांतून हे बखरगद्य लेखन झालेले आहे. या संदर्भात र.वि.हेरवाडकर म्हणतात. बखरींचा वाङ्.मयदृष्टया विचार करताना वाङ्.मयदृष्टी किंवा कलादृष्टी ही बखरकारांची भूमिका नसूनही त्या वाङ्.मयीन स्वरुपाच्या झाल्या आहेत हे स्पष्ट आहे. बाणाने लिहलेले महर्षचरितफ्हा इतिहासविषयक काव्यग्रंथ होय. चरित्र-नायकांचा गुणगौरव करण्यासाठीच हे ग्रंथ निर्माण झाले.५ यावरुन आपणाला प्राचीन गद्य-पद्यलेखनांतील वाङ्.मयीन दृष्टिकोन सहज लक्षात येतो. बखर हे अस्सल मराठी लेखन असून तो मबखरगद्यफ्म्रा नावांने स्वतंत्र वाङ्.मयप्रकार मानणे गरजेचे आहे. तिचे अंतरंग खरेच मराठी असून ती लावणी पोवाडयाऐवढीच मराठी मनाला विविध रसांनी बोध व समाधान देणारी आहे. मराठी मनाचा रगेल,रांगडा व मराठमोळा बाज बखरीतून व्यक्त होतो. ऐतिहासिक कादंबरी ही जरी ललितसाहित्य कृती असली तरी कल्पकता व भावनात्मकता याच्या जोडीला वास्तवतेचा वस्तुनिष्ठपणा तीत असतो. अशा प्रकारे राजाश्रयाच्या पाठिंब्याने जोशपूर्ण भाषाशैलीत अनेक बखरी लिहिलेल्या दिसतात. त्यामुळे कादंबरी हा वाङ्.मय प्रकार बखरींच्या जवळ जावून पोहचतो. बखरीतील ऐत्यासिकता व कादंबरीतील काल्पनिकता या गोष्टी ऐत्यासिक वाङ्.मयीनसदृशतेमुळे एकमेकींना बऱ्याच अंशी जवळच्या आहेत. घटना प्रसंग, आशयविषय पात्रे, संवाद, कथानके व सत्याअसत्याचा विजय व आपली म्हणून न्यायी बाजू घेण्याची पध्दत या दृष्टीने इतिहासकालीन कथा या कादंबरीसदृश्य असलेल्या दिसून येतात.

बखरगद्य लेखनाचे वाङ्.मयीन महत्त्व मोठे आहे. बखरकार हा सुध्दा साहित्यिक कलाकार आहे. तो बखर लिहित असताना नोंदी, सनावळया, घटना ऐवढयाच फक्त नोंदवित नाही तर तो बखरीला वाङ्मयीन दृष्टया सजवत असतो. अनेक उपमा, अलंकार, प्रतिमा, उत्प्रेक्षा, उपहास, उपरोध, म्हणी, सुभाषिते, वाक्प्रचार यांनी ऐत्यासिक घटनांना व्यक्तिसह अनेक रसांनी साज आणि बाज चढवत असतो. ती एक भाषेची स्वतंत्र वाङ्.मयीन शैली असते. बखर म्हणजे भाकडकथा हे समीकरण बरोबर नाही. कादंबरी, नाटक, लघुकथा इत्यादी ललितकथांतील काव्यात्मकता व नाटयात्मकता यांचे अस्तित्व तिच्यात असते. चरित्र लेखनातील घटनांच्या पार्श्वभूमीवरील व्यक्तिप्रधानत्व आणि आत्मचरित्रातील स्वत्त्व ही तिच्यात दिसतात. निबंधातील गांभीर्य व लघुनिबंधातील मोकळेपणा नि मोहक पृथगात्मता तिच्या ठायी आहे. या साऱ्यांना तत्कालीन भाषेचा साज चढल्यामुळे ती विशेष आकर्षक होते. मराठी जीवन हा तर तिचा केंद्रबिंदू.मराठमोळेपणाच्या दुर्दम्य अभिमानाने प्रेरित होऊन ती विजिगीषू राष्ट्रीय वृत्तीचा साक्षात्कार घडविते. इतिहास आणि ऐतिहासिक कादंबरी यांच्या सीमेवरील हा वाङ्.मयप्रकार आहे. सर्व लेखनप्रकारांचा तो समावेशक आहे. हेच त्याचे खरे सामर्थ्य.६ हा अभिप्राय

ISBN 978-93-5196-698-2

बखरीच्या वाड्.मयीन सजगतेचा पैलू स्पष्ट करणारा असा वाटतो.

बखरगद्य लेखनाचे कलात्मक सौंदर्य वाढविण्याचे काम वाड्.मयीन कलामूल्यांनी केलेले आहे. बखरींच्या ऐत्यासिक लेखनाने वाड्.मय व इतिहास ही प्रबोधनाची व अभिव्यक्तीची महान साधने झालेली आहेत. बखर लेखनाची प्रकृती व त्याच्या प्रयोजनाकडे लक्ष न देता त्याला इतिहास म्हणता येत नाही तर अशा लेखनाच्या पूर्व सूरींच्या लेखन गाभ्याचे मूळ हे काव्य किंवा स्फुटं प्रकारात असल्याचे निदर्शनास येते. म्हणून तो एक अस्सल वाड्.मय प्रकार आहे, हे मान्य करावे लागते. याबद्दल गं.ब.ग्रामोपाध्ये म्हणतात की, बखरलेखनाला इतिहास वा इतिहाससदृश लेखन समजले जाण्याला ज्याप्रमाणे इतिहासासंबंधीची प्राचीन भारतीय संकल्पना कारण झाली त्याचप्रमाणे १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, धार्मिक किंबहुना सर्वच सांस्कृतिक परिस्थिती कारण झालेली दिसते.८ कारण ग्रामोपाध्ये पुढे म्हणतात, वस्तुस्थिती अशी आहे की, ज्या बखरी लिहिल्या गेल्या होत्या त्या मुळी इतिहास म्हणून नव्हेतच. वीरपुरुषांची गुणगौरवात्मक चरित्रे हे त्यांचे रुप होते. जुन्या पौराणिक वंशानुचरितांचे आदर्श बखरकारापुढे होते हे अर्थात ग्रँट डफला काय किंवा एल्फिन्स्टला काय, माहित असणे अशक्य होते. त्यामुळे स्वत: डफ बखरींना दुय्यम तिय्यम दर्जाचा का होईना इतिहासाच मानीत होता. जी गोष्ट डफची तीच गोष्ट तत्कालीन नवीन इंग्रजी शिकलेल्यांची. केपिन–बाबा साने यांनी ग्रँट डफच्या मराठयांच्या इतिहासाच्या मराठी भाषांतराला ममराठयांची बखरफ असेच नाव दिले होते.याचा अर्थ बखर म्हणजे इतिहास वा इतिहासवजा लेखन असाच सार्वत्रिक समज होता.९ ग्रामोपाध्ये यांचे मत मराठी बखरगद्याचा वाड्.मयीनदृष्टया चिकित्सक पुनर्विचार करणारे आहे. आजच्या दृष्टीने बखरीकडे पाहताना तो वाड्.मयीन विवक्षित इतिहास लेखनाचा नमुना म्हणून पाहण्यास हरकत नाही. कारण वाड्.मयीनमूल्ये व जीवनमूल्यांच्या दृष्टीने बखरहे वाड्.मयीन रुपच आहे. कुठलाही बखरकार असे ऐत्यासिक लेखन करताना रुक्षपणे करत नाही. तर जाणीवपूर्वक, जिव्हाळयाने, रसभरीत वर्णनांनी तो लेखन करत असतो. तेव्हा वाड्.मयाची सर्व वैशिष्टये त्यात उतरतात व बखर वाचनीय होते. बखरीचा वाड्.मय म्हणूनएक स्वतंत्र वाड्.मयप्रकार मानावा असे वाटते ते यासाठीच.१०ग्रामोपाध्येयांचे विश्लेषण साधार असल्याचे जाणवते. र.वि.हेरवाडकरांचे मत ही याठिकाणी दयावेसे वाटते, ते पुढीलप्रमाणे, मराठी बखरींचे साहित्याच्या दृष्टीने मूल्यांकन करताना शैलीगुणाला विशेष महत्त्व दिले आहे, हे मुद्दाम निदर्शनास आणून दयावेसे वाटते. शैलीगुणावरच कोणत्याही वाड्.मयाचा कस लागतो. शैलीविषयक किमान गुणांचे स्वरुप स्पष्ट केल्यामुळे अव्वल दर्जाच्या साहित्यात त्यांचे अस्तित्व कसे असते, हे या विवेचनावरुन लक्षात येईल. मराठी बखरींचे लेखन वाड्.मयाच्या भूमिकेने झालेले नाही; परंतु वाड्.मयनिर्मितीस आवश्यक असणाऱ्या विशिष्टमनोवृत्तीतून ते झालेले आहे, हे ध्यानात घेतल्यास बखरींत साहित्यगुण का आढळतात याचे रहस्यसहज उलगडण्यासारखे आहे. विषयाच्या दृष्टीने ही चर्चा उपयुक्त ठरेल.‰११ हेरवाडकर यांचे मत त्यांनी संशोधन अभ्यास केलेल्या ममराठी बखरफ्या पुस्तकाच्या अनुषंगाने वर्तवलेले मत आहे. अभ्यासकांनी हे पुस्तक मुळातून वाचले पाहिजे तरच या मताचा रोख लक्षात येऊ शकेल.

**सारांश :** बखरगद्य हे अस्सल वाड्.मयीन रुप आहे. वाड्.मयीन गुणांचा संपूर्ण असा परिपोष बखरीत आढळतो. वाड्.मयीन सौंदर्याने मंडित झालेले बखर लेखन मराठी भाषेला समृध्द करणारे झाले आहे. इतिहास व साहित्य यांच्या मदतीने बखरीतील ऐत्यासिकता व वाड्.मयीन जाणीव समजून घेतल्यास हे लेखन ललित वाड्.मयाचा उत्कृष्ट नमुना असलेला दिसून येतो. यादृष्टीने पाहता वाड्.मयीन मूल्यांची ठिकठिकाणी पखरण झालेली बखर नमुनेदार निवेदनशैली व

भाषाविष्काराचा वाड्.मयीन रुपबंध असलेला दिसतो. या दृष्टीने वाचक, अभ्यासक व संशोधकांनी वाड्.मयीन भूमिकेने बखरगद्य लेखनप्रकाराकडे डोळसपणे पाहिले पाहिजे.

**निष्कर्ष :**

१) मध्ययुगीन मराठी वाड्.मयाच्या इतिहासात बखरगद्य वाड्.मयाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

२) बखरीमध्ये आठवणी, दंतकथा, आख्यायिका, ऐत्यासिक वीर पुरुषांची चरित्रे, सामाजिक, सांस्कृतिकव राजकीय घडामोडींचे लेखन केलेले असते.

३) बखरींचे लेखन ललित गद्यलेखनशैलीत झालेले बहुतांशी आढळते.

४) बखरकार हा सुध्दा साहित्यिक कलावंत ठरतो. कारण तो फक्त ऐत्यासिक घटना नोंदवत नाही तर तो बखरीला वाड्.मयीन व जीवनमूल्यांनी नटवत असतो.

५) बखरगद्य लेखन हे अस्सल वाड्.मयीन रुप आहे. या दृष्टीने वाचक, अभ्यासक व संशोधकांनी त्याकडे बघितले पाहिजे.

**संदर्भसूची :**


१) ग्रामोपाध्ये गं.बं. : ममराठी बखर वाड्.मयाचा पुनर्विचारफ, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ. १९८६, पृ. १४

२) तत्रैव – पृ. १४

३) तत्रैव – पृ. १६

४) हेरवाडकर र.वि.: ममराठी बखरफ,व्हीनस प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९५७, पृ. ३५

५) तत्रैव – पृ. ५

६) तत्रैव – पृ. २३३

७) दादैगावकर पद्माकर आणि साजी मॅथ्यू : मपंचधाराफ (लेख–मिथ्थकथांचे पुनर्लेखन आणि आनंद यांच्या कादंबऱ्या), वर्ष ४२ वे – अंक चौथा,/ वर्ष ४३ वे अंक पहिला, जोड अंक : जानेवारी २०००, पृ. ८१

८) ग्रामोपाध्ये गं.ब. : ममराठी बखर वाड्.मयाचा पुनर्विचारफ, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ. १९८६, पृ. ४

९) तत्रैव – पृ. ६

१०) ग्रामोपाध्ये गं.ब. : ममराठी बखर वाड्.मयाचा पुनर्विचारफ, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ. १९८६,पृ. १२९

११) हेरवाडकर र.वि.: ममराठी बखरफ, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९५७, पृ. ९

ISBN 978-93-5196-698-2

# होळकरांची थैलीः महत्त्व आणि विशेष

**प्रा.नीलेश केदारी शेळके**
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज.

मध्ययुगीन कालखंडातील मराठी वाङ्मयाचा विचार करताना लक्षात येते की, या काळात पद्यमय वाङ्मयाचाच विकास अधिक झाला. महानुभावांच्या गद्य वाङ्मयाची परंपरा आणि बखर वाङ्मयाची परंपरा एवढेच गद्य वाङ्मय दिसते. पद्य वाङ्मय परंपरेवर मराठीत खूप संशोधन झाले तसे गद्य परंपरेत झाल्याचे दिसत नाही. आम्ही गद्य वाङ्मयाकडे थोडे दुर्लक्षच केले. खरे तर ही परंपरा प्रचंड समृद्ध होती. मराठ्यांच्या इतिहासाची साधने जमा करण्याच्या प्रयत्नातून का० ना० साने, द० ब० पारसनीस, इतिहासाचार्य वि० का० राजवाडे, रियासतकार सरदेसाई यांनी केलेले कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. काव्येतिहाससंग्रह, भारतवर्ष, विविध ज्ञानविस्तार, इतिहाससंग्रह, भारत इतिहास संशोधन पत्रिका अशा काही मोजक्या नियतकालिंकातून त्यांनी हे प्रयत्न केले. त्यामुळेच हा दुर्लक्षित ठेवा आज मराठी वाचकांसमोर आला आहे. खरे तर त्याकाळातील वाङ्मयाचा हा एक अमूल्य ठेवा आहे. पण आपणाकडे पूर्वी मुद्रणकलेचा विकास झालेला नसल्याने या तशाच पडून होत्या. शिवाय त्या मोडीलिपीमध्ये लिहिल्या गेलेल्या असल्याने त्या बाजूलाच राहिल्या. त्या जर परंपरेने सलगपणे लोकांपुढे आल्या असत्या तर मराठी गद्याचा विकास आजच्यापेक्षा निश्चितच पुढच्या टप्प्यातला दिसला असता. या काळात प्रा. रा. श्री. जोग म्हणतात की, इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर मराठी गद्याला काही परंपरा नसल्यासारखे आपण बालयोग्य गद्य लिहिण्यापासून प्रारंभ केला व त्यातील विचार आणि आशयही त्यास अनुरूप असाच उतरला. बखर गद्याची अधिक जागृत जाणीव असती तर आरंभीचे आपले गद्य अधिक प्रौढ उतरले असते (जोग रा० श्री०, पाणिपतची बखर – संपा० हेरवाडकर – पाच) महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचा संग्राम म्हणजे पानिपतचा संग्राम होय. मराठे–दुराणी युद्ध म्हणजेच पानिपतचा संग्राम. या युद्धात मराठ्यांचा पराभव झाला असला तरी मराठे ज्या इर्षेने लढले त्याला तोड नाही. त्यामुळे पानिपतच्या रणसंग्रामावर अनेक बखरी लिहिल्या गेल्या. यापैकी पानिपतची बखर, भाऊसाहेबांची बखर, भाऊसाहेबांची कैफियत, होळकरांची कैफियत, होळकरांची थैली या महत्त्वाच्या बखरी आहेत. पानिपतचा रणसंग्राम मध्यवर्ती मानून ह्या बखरी लिहिल्या गेल्या आहेत. यापैकीच होळकरांची थैली ही एक महत्त्वाची बखर होय.

**होळकरांची थैली :**पानिपतविषयक लिहिल्या गेलेल्या बखरीमधील ही एक अतिशय महत्त्वाची बखर आहे. इंदूरच्या होळकर संस्थानचा संस्थापक मल्हारराव होळकर यांच्या सांगण्यावरुन ही लिहिली आहे. ही बखर लिहिणारा लेखक कोण हे मात्र कळत नाही. मल्हारराव होळकर स्वत:च आपली हकिकत सांगत आहेत अशा भूमिकेतून लिहिलेली ही बखर आहे. त्यामुळे या थैलीला मल्हारराव होळकर यांची थैली असेही म्हटले जाते. 'थैली' हा बखरीचाच एक प्रकार आहे. थैली म्हणजे मोठ्या व्यक्तीला मोठ्या व्यक्तीने पाठविलेली पत्ररुप हकिकत होय. होळकरांची थैली ही या प्रकारचीच हकिकत आहे. युद्धानंतर लगेचच म्हणजे १७६१ साली हिचे लेखन झालेले आहे. बखरीच्या शेवटी लेखक स्वत: म्हणतो की, शके १६८२ विक्रमनाम संवत्सरे, पौष शुद्र ८ अष्टमीचे दिवशी जाले वर्तमान लिहिले.

ही बखर सुरुवातीस का० ना० साने ह्यांनी आपल्या काव्येतिहाससंग्रह या नियतकालिकातून प्रसिद्ध केली होती. त्याकाळी या थैलीतील काही बंदच सापडलेले होते. मधला काही भाग मिळालेला नव्हता. सान्यांनी जेवढी उपलब्ध झाली

तेवढीच बखर काव्येतिहाससंग्रहात प्रसिद्ध केली. या बखरीचा संपूर्ण भाग आज इतक्या वर्षानंतरही उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे जेवढा भाग उपलब्ध झाला तेवढाच आज अभ्यासकांसमोर आहे. या बखरीत युद्धविषयक मजकूर अतिशय थोडा असला तरी पानिपतहून मल्हाररावांस का जावे लागले याचे स्पष्टीकरण यामध्ये दिले आहे.

**'थैली' चे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्व :** पानिपतवर अनेक बखरी लिहिल्या गेल्या आहेत. मराठी बखरीतील थैली स्वरूपातील ही एकमेव बखर असल्यामुळे तिला ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्व आहेच. या थैलीचा जो भाग उपलब्ध झाला आहे त्यात पठाणांनी कुंजपुरा घेतल्यापासूनची हकिकत आहे. यात युद्धविषयक मजकूर थोडासाच असला तरी आपण पानिपतच्या रणभूमीवरून का निघून गेलो याचे मल्हारराव स्पष्टीकरण देतात, हे ऐतिहासिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे आहे.

मराठ्यांच्या इतिहासात होळकरांना बदनाम करण्याचाच प्रयत्न केला गेला आहे. विशेषत: पानिपतच्या रणभूमीवरून मल्हारराव निघून आले. बगल देऊन आले असेच सांगितले जाते. इतिहासाचार्य राजवाडे असे म्हणतात की, 'मल्हाररावाने दुष्ट बुद्धीने व मत्सराने पानिपतचे रण ऐन प्रसंगी सोडिलें असा त्याजवर दोषारोप आहे तो या बखरीने समूळ (उडूं) जाण्यासारखा आहे'. (राजवाडे खंड-३, पृष्ठ-१८२) ही थैली मल्हाररावांनी स्वत:नी लिहून घेतली असे जरी ग्राह्य धरले तरी इतिहासातील इतर बखरींमधल्या काही गोष्टींचाही इतिहासकारांनी विचार केलेला आहे असे दिसत नाही. पानिपतच्या युद्धाची सविस्तर हकिकत सांगणाऱ्या समकालीन बखरींमध्ये रघुनाथ यादव लिखित पानिपतची बखर ही एक महत्त्वाची बखर आहे. या बखरीतही भाऊसाहेब मल्हाररावांना हेच सांगतात असे बखरकार नमूद करतो. बखरकार म्हणतो, 'मल्हारजी होळकर यांस आज्ञा जाहाली की, तुम्ही पुण्यास जावे. बराबर आमचे कुटुंब व इतरांचे कबिले घेऊन जाऊन, श्रीमंत नानासहेबांस व श्रीमंत सौभाग्यवती गोपिकाबाई साहेब यांस माझे साष्टांग नमस्कार सांगून विज्ञापना माझे तर्फेने करावी.' या दोन्हीही विवेचनावरून हे ऐतिहासिक सत्य समोर येतेच. हे सत्य समोर असतानाही इतिहासकार होळकरांवर हा जो आरोप करतात तो पूर्ण चुकीचा आहे.

**थैलीचे विशेष :** 'होळकरांची थैली' ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची तर आहेच पण त्याचबरोबर वाङ्मयदृष्ट्याही अनेक गुणवैशिष्ट्यांनी संपन्न अशी आहे. यातील मजकूर अतिशय थोडा आणि अपूर्ण असला तरी जो उपलब्ध आहे त्यातील वाङ्मयविशेष अनेक दृष्टीने लक्षणीय आहेत. बखरींना इतिहासाचे अधिष्ठान असले तरी त्यात निखळ इतिहास आढळत नाही तर त्याचबरोबर बखरकाराच्या प्रतिभेमुळे व्यक्तिचित्रण, रसाविष्कार, वर्णनशैली, संवादलेखन चातुर्य इ. वाङ्मयीन कलाकृतींची वैशिष्ट्ये प्रकट झालेली आहेत असा विश्वास डॉ० यु० म० पठाण यांनाही वाटतो.

या थैलीचे वेगळेपण म्हणजे ही मल्हारराव स्वत: सांगतात अशी कथनशैली बखरकाराने स्वीकारली आहे. हे कथन करत असताना मलकाजमानी, सुजायतदौला, अब्दलअल्ली, इभ्रामखान गाडदी, भाऊसाहेब ह्या व्यक्तिरेखा ठळकपणे वाचकांसमोर येतात. मराठी सैन्यापुढे हतबल होणारे अब्दाली आणि सुजायतदौला विषाचे प्याले जवळ करतात तेव्हा मलकाजमानी त्यांच्यात जे नवचैतन्य निर्माण करते यातून तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या बहारदार पैलूचे दर्शन यामध्ये घडते. स्त्री असूनही तिने दिलेली चेतना अतिशय महत्त्वाची आहे. ती सैन्यात पुन्हा नवचैतन्य निर्माण करते. सुजायतदौल्ला याला पुरुषजन्माचे सार्थक कशात आहे हे पटवून देते. तिच्या उत्तेजन वचनांनीच सुजायतदौला आणि अब्दाली पुन्हा युद्धासाठी सज्ज होतात आणि येथून पुढे युद्धाचे पारडे फिरते.

इभ्रामखान गाडदीची व्यक्तिरेखाही अशीच आहे. मोजक्याच शब्दात लेखक त्याची निष्ठा आणि करारीपणा

दोन्हीही दाखवतो. इभ्रामखान आणि मल्हारराव यांचे फारसे सख्य नव्हते असे इतिहासात जरी दाखविले असले तरी बखरीत त्याच्या व्यक्तिमत्त्वावर कोणताही शिंतोडा उडविलेला नाही हे विशेष. उलट भाऊसाहेबांनाच धीर देताना इभ्रामखान म्हणतो, 'मी जिवंत असता सात पातशाहा एकत्र होऊन चालून आले तरी तीन वेळा फिरवीन.'(सोवनी अविनाश,१९९८: २१६) एवढ्या एकाच संवादातूनही त्याचे व्यक्तिमत्त्व समर्थपणे उभे करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

विश्वासरावांची व्यक्तिरेखाही अतिशय कमी शब्दात पण रेखीवपणे बखरकार उभी करतो. भाऊसाहेबांनी रण सोडून जायला सांगितलेले असते. पण इभ्रामखानाच्या शब्दांमुळे आपला विचार बदलून विश्वासराव धैर्याने युद्धात उतरतात. 'आम्ही धाकटे आहो, आदौ पुढे जाऊन, मोक्षमार्ग सिद्ध करुन, स्थळ उभयतांचे पाहू असे मनांत धरुन कोणास न पुसता, इभ्रामखान गाडदी यांजकडे हत्ती डुलवून आणला'(सोवनी अविनाश,१९९८: २१६) हे वर्णन केवळ वर्णन राहात नाही तर विश्वासरावाच्या व्यक्तिमत्त्वातील क्षात्र तेज काय होते याची झलक दाखवून देते.

भाऊसाहेब ही पानिपतच्या संग्रामातील महत्त्वाची व्यक्तिरेखा. काही बखरकारांनी तिला दैवत्व देण्याचाच प्रयत्न केला हे स्वाभाविक आहे. पण या बखरीत त्यांचे सामर्थ्य आणि मर्यादा यासह भाऊसाहेब आपल्यापुढे उभे करण्याचे बखरकाराचे कसब वाखाणण्यासारखे आहे. अडचणीत आल्यावर लढाई शक्य नाही हे ओळखून शत्रूकडून ताहची बोलणी सुरू झाली की लगेच तहाला तयार होतात आपल्या ठिकाणी लढाईची स्थित येत नाही याची त्यांना जाणीव आहे, तरीही लगेच माघार न घेणारे भाऊसाहेब इथे दिसतात. 'सातशे कोस आह्मी चालोन आलो, फौज किती अपार जाहाली आहे, सात कोट रुपये खर्च जाला तो तुह्मी आह्मास द्यावा आणि आपले मुलुखास जावे नाही तर जे होणार ते होईल' (सोवनी अविनाश,१९९८: २११) यातून भाऊसाहेबांचा मुत्सद्दीपणा आणि करारीपणा दिसून येतो. चूहबाजूंनी आपण अडचणीत आलो आहोत हे लक्षात येताच मल्हाररावांना बोलवून विश्वासराव आणि आपली पत्नी या दोघांना घेऊन एका बाजूस जावे असे सांगताना दिसतात. तर शेवटी जगदीशें पुरमपुण्येकरुन जे योजले असेल ते होणारच म्हणून मग एक तलवार फिरंग घेऊन घोड्यावर स्वार होतात आणि आपल्या अद्वितीय पराक्रमाने आपला पुण्यप्रताप, लौकिक करून वैकुंठवास केला असे बखरकार सांगतो. या प्रमुख व्यक्तिरेखांबरोबरच सुजायतदौला, अब्दाली, गोविंदपंत बुंदेले यांच्या व्यक्तिमत्त्वाचेही काही पैलू बखरकार दाखवितो.

संवादाच्या वैशिष्ट्यपूर्णतेप्रमाणेच निवेदनातील सहजता हाही एक महत्त्वाचा विशेष या लेखनात आहे. भाषेतील निवेदन प्रौढ आणि प्रवाही आहे. भाषेला एक विशिष्ट प्रकारची लय आहे. 'या जागेंत पांच हजार मोहरे त्याजकडील मृत्यु पावले. त्यामध्ये चार हजार पुरजे पुरजे होऊन राहिलें', किंवा 'कसे करावे, कोणीकडे जावे, व लोकांच मुख काय ह्मणोन दाखवावे, जहराचे प्याले घेऊन मरावे.' या वाक्यांमध्ये भाषेची सुंदर लय दिसते. निवेदनात प्रश्नार्थक वाक्येही सहजपणे येऊन जातात. १) माणसांची गणती काय ? २) लढाई टाकून जावे तर मुलकांत काय सांगावे ? ३) गालिम जेर होता दिसत नाही, आता विचार काय ? ४) ही गोष्ट कोण जाली ? ५) तेव्हा असे का मरावे ? ६) हे कर्म काय करिता ?

लांब आणि पल्लेदार वाक्ये हा जसा प्राचीन वाङ्मयाचा विशेष होता तसाच लघुत्तम वाक्ये हाही एक विशेष होता. कमी शब्दांची, छोटी छोटी वाक्ये हा बोलीचा विशेष असतो. बखरकारानेही अशीच योजना केली आहे. प्रस्तुत थैलीतही 'अखेरी जमा. ऐसा भयाभंग जाहाला. डेरा उभा केला. लाचार ! नाईलाज ! तयार जाले.' अशी छोटी छोटी लयदार वाक्ये सापडतात.

लेखनाच्या ओघात स्पष्टीकरण करुन जाण्याची एक वेगळी पद्धतही या बखरीत आढळते.

उदा. ङ्गपंकार्त म्हणजे चिखलाने भरुन आर्त जाले ते,'

उजतबाजू म्हणजे हातपाय धूवून,

तमाम चकताईत म्हणजे मोंगल यांचे पातशाहींत

दोन शिलका म्हणजे दोन फैरा –

लेखनकर्ता धार्मिक वृत्तीचा होता हेही त्याच्या लेखनातून दिसून येते. 'गोविंदपंत वैकुंठवासी जाहले, अशुभ वर्तमान, ईश्वर प्रीत्यर्थ दानधर्म, जहर खाऊन मरावे यात वैकुंठप्राप्ती, गंगाप्रवाही निर्मळ, आपली चिंता सर्व ईश्वरास पडली आहे, पाच लक्ष रुपये धर्म केला, उजूतबाजू म्हणजे हापाय धुवून (नमाज पढण्यापूर्वी तयारी केली जायची), उदी वस्त्रे, मिठाई व अंगारा प्रसादिक पाठविला, प्रसादस्पर्शनी अधैर्य अधीरपणा होता तो सर्वांचा जाऊन, पुन्हा शत्रू मर्दनाविशी निष्ठा दृढतर जाली, कृष्णावताराच्या समाप्तीत भिल्लवाणें चरणकमळी निमित्य करुन निजधाम करिते जाले, स्वर्गांचे ठायी देव, गंधर्व यांची विमाने कौतुकार्थ दाटली, आकाशमार्गी घंटानाद व पक्षांचे शब्द भय उत्पन्न होऊ लागले, जन्माचे सार्थक व्हावे म्हणून हा प्रसंग जगदीशें परमपुण्येकरुन योजिला, घरी अथवा दूर्गी, पर्वती, पाताळी कोठेही चुकत नाही, देव व वृद्ध ब्राह्मण व वडील यांचे वंदन करून, जयजय, हरहर म्हणत लढाईस सुरूवात, तर अब्दालीने पीर मूर्छांचे स्मरण करुन युद्धाला सुरुवात केली.' या सर्व ठिकाणी धार्मिक प्रतिमा आणि दाखले यांचा वापर केला आहे.

लेखकाने अरबी–फार्सी शब्दांचा वापर केलेला आहेच पण विशिष्ट वाक्प्रचारांमुळे तिच्यात ऐतिहासिकता आली आहे. सांप्रत, अपार, महर्गता, अखंडदंडायमान, विहित, प्रस्थान, जयश्री वस्त्रे, वार्तिक, परिच्छिन्न, मूर्छांगता, षण्मास, अगस्ती, विज्ञापना, प्रहर, मर्यादा, ईश्वर, कर्म असे अनेक संस्कृत शब्द या आलेले आहेत. शेकडो, कहीं खटका, बिशात या हिंदूस्थानी शब्दांचा वापरही लेखकाने केला आहे. तमाम, गलिम, सलूख, सुदामतप्रमाणे, महकूब, कज्जा, मशारनिल्हे, जरबा, कजियांत, तहकीक, नौबत, शाबुदित, मिसला, मिसलित असे अनेक अरबी शब्द तर जेरदस्त, आराबा, पुरजे पुरजे, शिबंदी, सरंजाम, जामदारखाना, बिनियावर, दरोबस्त, अंदेशे, फकिर, जिमा, फत्तेनिशाण अशा फार्सी शब्दांमुळे विशिष्ट प्रकारचे वातावरण लेखक उभे करतो. धोरंदर, फिरंग, कोस, दक्षण, वडील या शब्दांबरोबरच घेरा दिल्हा, भारी केले, जाहले, लागणे, पडला, अशी प्राकृत, देशी शब्दरचनाही दिसते. मृत्यू शेकडो पातले, संकटात पडले, घोरंदर जाहला, मारामारी जाहली, खटका जाहला, रणभूमीचे ठायी देह पडला, पायउतार होणे अशी रचना लय निर्माण करते तर काळ पाठीशी लागणे, प्रज्वलित होणे, धर्म करणे, जन्माचे सार्थक होणे, पंचप्राण एकत्र करणे अशा वाक्प्रचारांमधून भाषेचे सामर्थ्य प्रकट होते.

उपमादिकांचा वापर हाही एक महत्त्वाचा भाषाविशेष आहे. प्रस्तुत लेखक उपमादिकांचा सुंदर वापर करुन जातो. 'जैसा मृत्यूभये प्राण पळता काळ पाठीशीं आहे, तैसे तोफांचे गोळे जिकडे जो जाईल तिकडें मागेच आहेत.'

**संदर्भ :**

हेरवाडकर र०वि०,संपा० (१९९७)ः पानिपतची बखर, व्हीनस, पुणे.

सोवनी अविनाश, (१९९८)ः ऐतिहासिक बखरी खंड १, शब्दवेध, पुणे.

ISBN 978-93-5196-698-2

# पेशवेकालीन बखर वाङ.मय : वास्तवता आणि काल्पनिकता

प्रा. डॉ. शिवाजीराव पाटील
एम. ए. एम. फिल. पीएच.डी.मराठी विभाग प्रमुख, कला महाविद्यालय, कोवाड. ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात स्वराज्यस्थापना झाली आणि मराठीला राजभाषेचे स्वरुप प्राप्त झाले. मराठी गद्याचा शिवकालीन आणि पेशवेकालीन अवतार कलात्मक आणि तेजस्वी होता. म्हणून मराठी गद्य सारस्वताच्या इतिहासातील बखर वाड्.मयाचे स्थान महत्वपूर्ण आहे. या बखरींचा अभ्यास चर्चासत्राच्या निमित्ताने आपण शोधनिबंधाद्वारे केला तर वाड्.मयीन सौंदर्याचे मोठे भांडार आपल्यासमोर खुले होईल ! शिवकालीन बखरींच्या तुलनेने पेशवेकालीन बखरींतील विषयांच्या स्वरुपात विविधता अधिक दिसते म्हणून पेशवेकालीन मपाणिपतची बखरफ व मभाऊसाहेबांची बखरफ या बखरींच्या अनुषंगाने वास्तवता आणि काल्पनिकता याविषयीचे सविस्तर व संशोधनात्मक विवेचन या शोधनिबंधात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

राजश्रयामुळे असणारे मानसिक स्वास्थ्य बखरकारांना लाभल्यामुळे बखरीचे स्वरुप त्रोटक न राहता प्रदीर्घ बनले. तत्कालीन सांस्कृतिक जीवनाचा वारसा जतन करण्याचे श्रेय बखरींचे असून, मबखर ग्रंथांना मराठेशाहीच्या तेजस्वी पराक्रमाचे नंदादीप असे म्हटले आहेफ पेशवेकालीन बखरी ह्या पानिपतचा रणसंग्राम या महनीय घटनेच्या परिणामातून निर्माण झालेल्या दिसतात प्रसंगात्मक, चरित्रात्मक, आत्मचरित्रपर, काही घराण्यांच्या हकीकती अशा विषयांची व प्रकारांची विविधता त्यात आढळते. पेशवेकाळातील पानिपतचा रणसंग्राम हे मराठ्यांच्या इतिहासातील एक स्वतंत्र पर्व आहे. मराठ्यांच्या क्षात्रतेजाने सारे भारतवर्ष दिपून गेले. पराभवही अभिमानास्पद ठरावा असे हे पर्व ! अनेक विचारांचे आणि भावनांचे स्फुल्लिंग निर्माण करणाऱ्या मराठ्यांच्या या महाभारतावर मपानिपतची बखरफ, मभाऊसाहेबांची कैफियतफ, महोळकरांची थैलीफ, मकाशीराजाची बखरफ, मनाना फडणिसाचे आत्मचरित्रफ या साऱ्या बखरीतून पानिपतच्या युद्धाची समग्र आणि सविस्तर वृत्त स्पष्ट केले आहे. त्यातही मभाऊसाहेबांची बखर ही या सर्व बखरींचा मुकुटमणीफ हे ल. रा. नसिराबादकर यांचे मत योग्यच वाटते. (प्रा. म. वा. इतिहास-ल. रा. नसिराबादकर-पृ.क्र.२५५)

बखरीबाबतचा अभ्यास करत असताना, मसभासद बखरफ, मपानिपतची बखरफ, मभाऊसाहेबांची बखरफ, म९१ कलमी बखरफ, अशा अगदी थोड्याच बखरींना पुर्नप्रकाशनाचे भाग्य लाभले. इतर बखरी मात्र वर्षानुवर्षे तशाच बासनांत पडून राहिल्या. सुमारे दोन अडिचशे बखरी लिहिल्या गेल्या असाव्यात असा अंदाज कै राजवाड्यांनी केला होता. परंतु यापैकी किती बखरी आज अस्तित्वात आहेत याचे गणित मांडले तर उत्तर अगदी नगण्य येईल अशी आजची स्थिती आहेआणि आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उरलेल्या बखरी शोधण्याचे आणि त्यावर नव्याने मांडणी करण्याचे काम हौसेने कोणी संशोधक करेल अशी शक्यताही आजमितीस फारशी दृष्टीपत्तीस येत नाही. अशा वेळी ममराठी बखर गद्य : ऐतिहासीक व वाड्.मयीन स्वरुपफया विषयावरील हे राष्ट्रीय चर्चासत्र विशेष उल्लेखनीय ठरते.

**पानिपतची बखर – वास्तव आणि कल्पकता :**नानासाहेब पेशव्यांच्या पत्नी गोपिकाबाई यांच्या आज्ञेवरुन रघुनाथ यादव चित्रगुप्त याने ही बखर लिहीली. पानिपतच्या युद्धानंतर अवघ्या दोन वर्षाच्या आत ही बखर लिहीली गेली असून, युद्धाचे वेळी तो हजर होता. बखरकार हा कलावंत आहे. त्याला बखर नुसती लिहावयाची नाही, तर ती सजवायची सुध्दा आहे. रघुनाथ यादव या बखरीच्या शेवटी मयथामतीने बखर सजवून सेवेशी पाठविली आहेफ; असे म्हणतो. येथे बखर

सजविणे या शब्दप्रयोगातून लेखकाची सौंदर्यदृष्टी, कल्पनाविलास आणि प्रतिभाविलास स्पष्ट होतो. बखरकार मूळातच एक कथनकार आहे. प्रत्यक्ष पाहिलेल्या आणि ऐकलेल्या प्रसंगांच्या आणि व्यक्तींच्या वर्णनाशी तो एकरुप होऊन वास्तव रेखाटतो. त्यातच आपल्या कल्पनांचे रंगही भरतो. पानिपतच्या बखरीत वास्तव आणि कल्पकता या दोन्हींचे रंग इतके गहिरे होतात की, तो प्रसंग आणि त्यातील व्यक्ती आपल्यापुढे साक्षात उभी राहते.मपानिपतचा संग्राम किंवा मराठे-दुराणी युद्ध हे महाराष्ट्राच्या इतिहासातील केवळ नव्हे तर भारतीय इतिहासातील एक महान पर्व होय. लौकिकदृष्ट्या या युद्धात अपयश प्राप्त झाल्यामुळे मराठी सत्तेला पायबंद बसला तरी एका दृष्टीने मराठ्यांच्या पराक्रमाचा तो उत्कर्षबिंदू होताफ (पानिपतची बखर संपादित – र. वि. हेरवाडकर पृ. क्र. ०२)

आकर्षक वर्णनपद्धती हे पानिपतच्या बखरीचे महत्वपूर्ण अंग आहे. इतिहासकालीन व्यक्ती आणि घटनांचे चित्रण हा बखरकाराचा मुख्य उद्देश असल्यामुळे ते परिणामकारक होण्यासाठी भाषासौंदर्याकडे अधिक लक्ष दिलेले आढळते. बखरकार पक्षनिष्ठ असल्यामुळे त्याच्या लेखनात आपुलकी निर्माण होते.

आज्ञेनुसार या बखरीचे लेखन झाल्यामुळे काही ठिकाणी पक्षनिष्ठा आणि गौरवही आला आहे. पण तो गौरवही सार्थ आहे. उदा. सदाशिवराव भाऊंचा पराक्रम. येथे बखरकाराच्या व्यक्तिवर्णन कौशल्याची आणि निवेदनाच्या पौराणिक धाटणीची कल्पना येते.रघुनाथ यादवाची वर्ण्यविषयाशी एकरुप होण्याची ताकद पाहिली की, भाऊसाहेबांच्या बखरीचा लेखक कृष्णाजी शामराव याची आठवण होते. भाषासौंदर्य आणि कल्पनासौंदर्याने ही बखर अंतर्बाह्य नटली आहे.मअप्रतिम वर्णनशैली, उत्कृष्ट कल्पकता, अलंकारांची समर्पक योजना, भाषाप्रभुत्व इत्यादी गुणांमुळे प्रस्तुत बखर वाड.मयदृष्ट्या सरसफअसल्याचे र. वि. हेरवाडकर सांगतात. (पानिपतची बखर. संपा. र. वि. हे. पृ. २८) उदा. मत्या समयी भाऊ कसा भासला की, केवळ कल्पांतींचा आदित्यफ महजारो हजार त्या कुरुक्षेत्री रणमंचकी निजलेच राहिलेफ मरक्तोंदकें भूलिंगास अभिषेक जाहाला आणि शिरकमले हीच भूलिंगास कमले अर्पण जाहलीफ अशा पौराणिक संदर्भयुक्त उपमा-दृष्टांतांनी बखरीचे वाड्.मयीन सौंदर्य घडले आहे. प्रसंगांची उदात्तता आणि भाषेतील आवेश यांच्या कलात्मक साहचर्यामुळे या सौंदर्यात मोठी भर पडली आहे.

**भाऊसाहेबांची बखर–वास्तवता व काल्पनिकता :**

पौष्य कृष्णाजी शामराव मुक्काम दिल्ली इंद्रप्रस्थ हा या बखरीचा लेखक असून त्याने मराजश्रीया विराजित राजमान्य राजश्री व्यंकापा नाईक दिंडोरे कसबा वेळापूर स्वामींचे सेवेशीफ ही युद्धाची हकीकत लिहून पाठविली आहे. भाऊसाहेबांची बखर ही मराठीतल्या सर्व बखरींची साम्राज्ञीच मानली जाते. ही एक विलक्षण करुण भिषण ट्रेजेडी आहे. बखर मुख्य दोन भागात विभागली असून कुंभेरी प्रकरणी शिंदे होळकरांचे बिनसल्यापासून ते दत्ताजी शिंदेला वीरमरण येईपर्यंतचा एक भाग आणि शिंदे-होळकरांच्या इच्छेविरुद्ध अब्दालीचे पारिपत्य करण्यासाठी भाऊसाहेब उत्तरेत जातात. ही बखर एक बाग आहे. तीत पराक्रमी वीरपुरुष हेच कोणी भव्य वृक्ष आहेत.इतरही क्षुद्र झाडे-झुडपे पुष्कळ आहेत. एका हलकट माणसाच्या नीच वृत्तीच्या कुऱ्हाडीच्या आघाताने हे वृक्ष उन्मळून पडतात आणि झाडे-झुडपे चिरडली जातात. (प्रा. म. वा. इतिहास खंड सात पृ. क्र. ३८९)

बखरकारांना राजाश्रयामुळे लाभलेल्या मानसिक स्वास्थ्यामुळे बखरींचे स्वरुप प्रदीर्घ बनले असून, त्यात

तत्कालीन राजकीय जीवनातील घटनांचे कथन पहावयास मिळते. मबखरींचे लेखन ऐतिहासीक वृत्तकथना च्या भुमिकेतून झाल्याने ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीने त्या पूर्णत: विश्वसनीय मानणे कठीण आहेफ (प्रा. म. वा. इतिहास ल. रा. नसिराबादकर पृ. क्र. २४५) बखारकारांच्या निवेदनाला रंग, रुप आणि आकार प्राप्त होऊन त्यातून सुंदर वाड्.मयीन मूर्ती निर्माण होते. भाऊसाहेबांच्या बखरीत असे जीवंत नाट्यपूर्ण प्रसंग अनेक आढळतात.वीर आणि कारुण्याचा प्रत्यय सतत देणाऱ्या या मबखरी म्हणजे प्राचिन मराठी गद्य सारस्वताचा एक स्वतंत्र विलास आहेफ ऐतिहासीक घटनांची हकीगत लेखकाला जशी माहित आहे तशी दिली आहे.

स्थलविपर्यास, कालविपर्यास, व्यक्तिविपर्यास, प्रसंग आणि कारण विपर्यास, पौराणिक वंशावळीचे संदर्भ, कल्पित व दंतकथांच्या आश्रयामुळे आलेली अद्‌भुतरम्यता, संदिग्ध स्वरुपाचे लेखन यांमुळे बखरीतील ऐतिहासिक सत्याला अनेकदा बाधा येते. म्हणूनच मएक अस्सल चिटोरे सर्व बखरींच्या बहुमताला हाणून पाडण्यास पुरेसे आहेफ, असे राजवाडे म्हणतात ते योग्यच आहे. बखरीची निर्मिती ऐतिह्य वृत्तकथनाच्या भूमिकेतून झाली असली, तरी सत्यशोधन व चिकित्सा करुन ऐतिहासिक सत्य मांडण्याची दृष्टी बखरकरांच्या काळात तयार झाली नव्हती, आणि बखरकारांची ही भूमिकाही नव्हीती, हे लक्षात घेतले तर बखरीत ऐतिहासिक सत्याचा अभाव असतो या तक्रारीला जागा राहणार नाही. या संदर्भात ह. श्री. शेणोलीकर म्हणतात, मबखरकार हे काही त्या त्या राज्याचे अधिकृत इतिहासकार वा वृत्तांतलेखक नव्हते, किंवा स्वयंप्रेरणेने संशोधित इतिवृत्ते लिहून ठेवणारे राजकारणाचे अभ्यासकही नव्हते. कारकूनी पेशाच्या या मंडळींनी आपल्या मालकाच्या आज्ञेवरुन तात्कालिक स्वरुपाच्या काही व्यावहारीक कारणांसाठी ते वृत्तान्त स्मरणशक्तीवर व सांगोपांगी गोष्टींवर भिस्त ठेवून लिहून काढलेफ (प्राचीन वाड्.मयाचे स्वरुप-ह. श्री. शेणोलीकर)

भाषासौंदर्य आणि विचार सौंदर्याचे कलात्मक साहचर्य; इतिहास आणि वाड.मय यांचा सुरेख संगम या बखरीत आढळतो. मराठीतील इतर कोणत्याही बखरीपेक्षा ही बखर वाड.मय गुणांनी संपन्न आहे. मतो केवळ जुन्या गद्याचा नमुना नसून मराठी भाषेचे वैभव आहेफ; जसे र. वि. हेरवाडकर म्हणतात; तर श्री. भालचंद्र यांनी ममराठ्यांच्या महाभारताचे पर्वफ अशा यथोचित शब्दांत या बखरीचा गौरव केला आहे. एकूणच आज बखरींवर नव्याने संशोधनात्मक लेखन व्हावे आणि बखरींचे पुर्नप्रकाशन होऊन बखर वाड्.मय हा गद्य वाड्.मय प्रकार नवोदितांच्या पर्यंत पोहोचवणे गरजेचे वाटते.

**संदर्भग्रंथ :**


१) नसिराबादकर ल. रा. - प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास

२) हेरवाडकर र. वि. - संपादित-पानिपतची बखर

३) देशपांडे अ. ना. - प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास (खंड-७)

४) शेणोलीकर ह. श्री. - प्राचीन मराठी वाड्.मयाचे स्वरुप

५) सोवणी अविनाश - संपादक ऐतिहासिक बखरी (खंड - २)

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखर आणि शिवपूर्वकाल, शिवकाल व पेशवेकालीन समाजजीवन

प्रा. रमेश. एच्. पाटील
समाजशास्त्र विभाग, कुसूमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय इस्लामपूर.

**प्रस्तावना** : समाजाचा इतिहास लिहिणे, माहिती सांगणे किंवा चरित्र कथन करणे या उद्देशाने प्रामुख्याने बखरीची निर्मिती झालेली आहे. शिवकालापासून ते पेशवेकाळापर्यंत सुमारे अडिचशे वर्षेमराठी बखरी लिहिल्या गेल्या आहेत. बखर लेखन आज्ञेने, त्याचप्रमाणे जाणकाराच्या भूमिकेतून करण्यात येत असल्यामुळे, चरित्रात्मक लेखनाच्या प्रक्रियेची, संकलन, चिंतन, मनन, संघटन, कालानुक्रम मुल्यमापन, व्यक्तिचित्रण आणि आकृतीबंध आदि विविध अंगे त्यातून लक्षात येतात. बखरीचे असे एकंदरीत समग्र स्वरूप तपासताना हे लक्षात येते की, बखरकाराची भूमिका ही इतिहास लेखकाऐवजी चरित्रलेखकाची असलेली आढळते. त्या भूमिकेतूनच बखरकारांनी लेखन केले असावे, बखरकारांनी विविध घटनांचे विवेचन करत असताना घटनामागील कार्यकारण भाव, परंपरा, अनुभव व मानवी मन प्रकट प्रकार करण्याचा प्रयत्न केला आहे.

कोणत्याही कालखंडातील साहित्य हे सामानतः तत्कालीन समाजजीवनाचे चित्र असते. साहित्याच्या निर्माता त्या काळच्या समाजाचा वैचारिक प्रतिनिधी असतो, त्याचा तत्कालीन आचार-विचारात विकास झालेला असतो. त्यामुळे कळत न कळपणे त्याच्या लेखनात त्याने लिहिलेल्या व अनुभवलेल्या वास्तवाचे चित्रण होते, कोणत्याही साहित्यात लोकमानसाचे चित्र उमटते. म्हणूनच साहित्य हा समाजजीवनाचा आलेख असतो या दृष्टीने बखरीकडे पाहिले असता त्यात राजकीय इतिहासाबरोबरच लोकव्यवहाराचे चित्रण केलेले आढळते.सदर अभ्यासात मराठी बखरीतून झालेले समाजजीवनाचे दर्शन समाजशास्त्रीय दृष्टया मांडण्याचा प्रयत्न केला गेला आहे. यात प्रामुख्याने शिवपूर्वकाल, शिवकाल व पेशवेकालातील समाजजीवनाचा आढावा घेण्यात प्रयत्न करणेत आला आहे.

**संशोधनाचे उद्दीष्टे** :

१) मराठी बखरीतून झालेल्या समाजजीवनाच्या चित्रणाचा आढावा घेणे.

२) शिवकाल, शिवपूर्वकाल, पेशवेकालातील समाजजीवनाचा आढावा घेणे.

**संशोधनाच्या पध्दती** :सदर संशोधन हे दुय्यम सामुग्रीवर आधारीत असून मराठी बखरीबाबत उपलब्ध असणाऱ्या संपादित साहित्य व इतर संशोधनातून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तत्कालीन समाजजीवनाचा विचार करण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यासाठी ग्रंथालयातील बखरीशी संबंधित विविध ग्रंथ व इतर लेखनावरून हा अभ्यास करणे आला आहे.

एखादी ऐतिहासीक घटना घडून गेल्यानंतर थोडयाच काळात लिहिलेल्या समकालीन बखरीत त्या घटनेचे तपशील स्मरणातून दिलेले असतात. त्यामुळे व्यक्ती, प्रसंग वा वस्तूंच्या बाबतीत विपर्यास होण्याची शक्यता असते. कारण राजकीय घटनात सतत बदल होत राहातात. मात्र समाजास्थितीत सहसा बदल होत नाही. समाजस्थिती सापेक्ष स्थिर असते, सामाजिक क्षेत्रातील बदल कालांतराने होतात त्यामुळे समाजजीवनाची वास्तवाच्या जवळ जाणारी माहिती बखरीतून मिळालेली दिसून येते. सदर अभ्यासात शिवपूर्वकाळ, शिवकाळ व पेशवेकाळातील धर्माधिष्ठीत समाजजीवनाचा विचार करणेत आला आहे. त्यात धर्मावर आधारित श्रध्दा, विचार व लोकव्यवहारातून शिवपूर्वकाल, शिवकाल व पेशवेकालातील समाजजीवनाचा आढावा घेण्यात आला आहे.

**शिवपूर्वकाल :** शिवपूर्वकाळातील समाजजीवनाचा बखरीतील चित्रणाच्या आधारे विचार करता हा समाज धर्मनिष्ठ होता. धर्मानिष्ठ जीवनाचा हा कालखंड होता. जीवनाच्या सर्व क्षेत्रात धर्माचे प्राबल्य असून ईश्वरनिष्टा हा समाजजीवनाचा पाया होता. समाजातील सामाजिक स्तराचा विचार करता ब्राम्हण समाजाचे वर्चस्व असणारी चार्तुवर्ण्य व्यवस्था असणारी समाजरचना आस्तित्वात होती. परंपरागत संस्कार व रूढी यांचे प्रभावातून धर्म आणि मोक्ष यासाठी प्रत्येकाचे जीवन असावे ही मूल्ये समाजजीवनाबरोबरच राजकीय जीवनात ही प्रभावी असलेली आढळून येतात. याबाबत राजवाडेनी म्हटले आहे की, मराठी समाज ऐंहिक जीवनाच्या उपभोगाकडे आकर्षिला होता. प्रत्येक दिवशी अनेकव्रते करणे आणि ब्राम्हणांची पूजा करणे तसेच शकुन, अपशकुन, नवस-सायास, फलज्योतिष अशा लोकभ्रमामुळे दैववादाला चालना मिळली होती. त्यामुळे ही धर्मनिष्ठा ऐतिहासिक व्यक्तीबाबत व त्यांच्या चरित्राबाबत अनेक दंतकथा निर्मितीसाठी कारणीभूत ठरलेली आढळून येते. उदा. शेषापासून शालिवाहनाचा जन्म इ.

**शिवकाल :** शिवपूर्वकालात धर्मनिष्ठा व त्यावर आधारित समाजजीवन आढळते. शिवकालात धर्मनिष्ठेबरोबरच राष्ट्रभक्ती व स्वामीनिष्ठा यांची जोड मिळाली. या कालखंडात एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेमुळे समाजसंघटीत झाला व समाजजीवनात धर्मनिष्ठेबरोबरच राष्ट्रभक्ती हे नवे मूल्य निर्माण झाले. छत्रपती शिवाजी राजांच्या नेतृत्वाखालील चळवळीत स्वामीनिष्ठा महत्वाची बनली. यामुळेच राजा हा ईश्वरी अंश या शिवपूर्वकालीन पौराणिक कल्पनेला शिवकाळात वास्तवात आणण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे शिवकालीन राज्यसत्तेचे दैवी व वास्तव असे दुहेरी स्वरूप दिसते. शिवकाळातील राष्ट्रभक्तीतून निर्माण झालेल्या स्वराज्याच्या चळवळीमुळे समाजाची भौतिक परिस्थिती बदलू लागली. मात्र समाजाचा सर्वात खालील स्तरात फारसे बदल झाले नाहीत. सर्वसामान्य जनता पारंपारिक धर्मनिष्ठ व्यवहारातून वाटचाल करत होती. त्यामुळे पारंपारिक रूढी, परंपरा, किर्तन, गोंधळ, कथा या गोष्टीद्वारे आपले जीवन कंठत होती. समाजाच्या क्षेत्रात महाराष्ट्र प्रांताची अस्मिता निर्माण होण्यास हा कालखंड महत्वाचा आहे.

या काळात धर्ममूलक श्रध्दांचा समाजमनावर प्रभाव पडलेला आढळून येतो. त्यामुळेच शिवाजी हा श्रीशंभूमहादेवाचा अवतार, 'शिवजन्मप्रसंगी, आपणच अवतरलो आहे.' शहाजीस शंभूमहादेवाचा स्वप्नातील दृष्टांत इ. गोष्टी तत्कालीन श्रध्देची द्यौतक आहेत. लोकव्यवहाराचे एक स्वतंत्र अंग शिवकालीत बखरीत आढळते. यात प्रामुख्याने धार्मिक सण-समारंभ, महिलांचेबद्‌दल सैनिकांना असणाऱ्या आज्ञा, स्वारी विजयी झाल्यानंतर आनंदोत्सव करणे, अशा विविध गोष्टींमुळे शिवकालीन बखरीत समाजजीवनाचे प्रतिबिंब आढळते तसेच शिवाजींने, 'शंकूजी गायकवाड याची परद्वारावर नजर याजकरीता त्याचे डोळे काढले' व 'शिवाजीने चंदीहून देशास येताना, येकोजी राजे त्यांचे स्त्रीस चोलीसाडी वा परगणे इनाम दिधले' हे प्रसंगां बरोबरच चिटणिसाच्या संभाजी चरित्रात, औरंगजेबाने संभाजीचा केलेला शिरच्छेद व राजारामाची नाटकशाळा संगुणाबाई हिच्या राजा कर्ण या पुत्रास संरजाम, इत्यादी उल्लेखात तत्कालीन सामाजिक जीवन व संस्कृती प्रतिबिंबित झाली आहेत.

**पेशवे काळ** : पेशवेकाळात शिवकालीन राष्ट्रभक्ती व स्वामिनिष्ठा ही मूल्ये व्यापक होत गेली या कालखंडात स्वराज्याच्या विस्तांराला चालना मिळून त्याचे विशाल साम्राज्यात रूपांतर झाले व मुलुखगिरीला भरपूर क्षेत्र मिळाले, मात्र या बरोबरच मत्सर, दूही या दुर्गणांचा विकास झाला. स्वामीनिष्ठेचा प्रभाव या काळात सर्वाधिक होता, कारण पेशवे सत्ताधारी बनले व त्यांच्या नेतृत्वाखाली इतर सरदार पराक्रम करू लागले. स्वामीनिष्ठेचा प्रभाव या काळात सर्वाधिक होता

कारण पेशवे सत्ताधारी बनून देखील छत्रपतींशी व सातारच्या गादीशी ते एकनिष्ठ राहिले. दिल्लीच्या गादीच्या रक्षणासाठी मराठे पानिपतास झगडले हा इतिहास मराठी मनाची कल्पना आणून देतो आणि मराठ्यांची राष्ट्रभक्ती व्यापक अर्थाने दर्शविती. या काळातील लोकजीवनात व समाजजीवनात शिवकालापेक्षा अधिक स्वास्थ होते असे बखरीत आढळून येते.

'पातशहाने, नाजरी बाजार भरावयाचा म्हणून हुकूम देवून, म्हणजेच तमाम पुरूषांनी घरात रहावे व बायकांनी दुकानांवर माल विकावा, त्यांनीच खरेदी करावी' अशा बखरीत नोंद असलेल्या अनेक गोष्टीवरून पेशवेकालीन लोकव्यवहार लक्षात येवू शकतो बखरीतील अनेक प्रसंगातून स्त्री-पुरूष संबंध, राजे-प्रजा यांतील संबंधामुळे सामाजिक जीवनाचे काही पैलू कळू शकतात. भाऊसाहेबांच्या बखारीतून सामाजिक जीवन व संस्कृती प्रतिबिंबित झालेली आढळते.

**निष्कर्ष** : मराठी बखरीतून शिवपूर्वकाल, शिवकाल, व पेशवेकालीन सामाजिक जीवन व संस्कृती प्रतिबिंबित झालेली आढळते. शिवपूर्वकाळात चातुवर्ण्याधिष्ठीत समाजव्यवस्था होती. परंपरागत प्राचीन संस्कारामुळे त्या काळात धर्म आणि मोक्ष या संबंधीत सामाजिक जीवनाला महत्व प्राप्त झाले होते. तत्कालीन राजसत्ता ही ईश्वरी स्वरूपाची मानली गेल्याने राजाला ईश्वरी अंश मानण्यात आले होते. हा काळ यादव-कालीन होय. धर्म आणि मोक्ष या जीवनपध्दतीमुळे शिवपूर्वकाळात धार्मिक कर्मकांडे, लोकभ्रम व दैववाद वाढीस लागला होता त्यामुळे समाजजीवनात स्थिरता होती. पारंपारिक जीवनाला प्राधान्य देवून जीवन जगले जात होते.

शिवकाळात यात बदलांना सुरूवात झाली. पूर्वीची धर्मनिष्ठा आस्तित्वात राहिली. मात्र त्याला राष्ट्रभक्ती व स्वामीनिष्ठेची जोड मिळाली. यामुळे प्रादेशिक अस्मिता वाढीस लागून महाराष्ट्र धर्माचा विचार पुढे आला. आपला राजा व आपले राज्य, यामुळे समाजजीवनातील मरगळ दूर झाली. समाजजीवनात वास्तवाला महत्व आले मात्र हा बदल संपूर्ण समाजात आढळत नाही. कारण धर्मनिष्ठा व स्वामीनिष्ठेमुळे राजकीय सत्ता व त्यांच्यांशी संबंधित वर्ग बदलला मात्र बहुसंख्य असणारा बहुजन समाज हा रूढीप्रियच राहिला. ही रूढी प्रियता शिवपूर्वकालपेक्षा कमी होती.

पेशवेकाळात राष्ट्रभक्ती व स्वामीनिष्ठेचे क्षेत्र व्यापक बनले, साम्राज्यवाद वाढीस लागला. मूलखगिरीमुळे समाजजीवनात बदल होवू लागले मात्र सामाजिक आचार हे धर्मावर आधारितच होते. ईश्वरनिष्ठा व दैववाद हा या समाजजीवनाचा स्थायीभाव होता. शिवपूर्वकाळ, शिवकाळ व पेशवेकाळातील समाजजीवनाचे बखरीतून झालेल्या चित्रणावरून असेच आढळते की समाज धर्मश्रध्देच्या पगडयात वावरत होता. चमत्कार, लोकभ्रम, दैववाद, रूढी - परंपरा या जखडून होता. कालखंड बदलताना त्यात बदल होत गेले पण ते स्पष्टपणे जाणवत नाहीत कारण तीनही काळात धर्मधिष्ठीत समाज रचना सर्वोच्च स्थानावर होती.

**संदर्भ** :

१) मराठी बखर (१९५७) - हेरवाडकर र. वि., व्हीनस प्रकाशन पुणे.
२) भाऊसाहेबांची बखर (१९९०) - संपादक र. वि. हेरवाडकर, व्हीनस प्रकाशन पुणे.
३) भाऊसाहेबांची बखर (१९९५) - संपादन - प्रा. प्रकाश कामतीकर, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद.

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखर गद्य : वाङ्मयीन दृष्टिकोन

प्रा.डॉ.गणेश मालटे
श्री शिवाजी विज्ञान, कला महाविद्यालय,चिखली जि. बुलडाणा.

सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली आणि तेव्हापासून मराठी भाषेला राजभाषेचे स्वरूप प्राप्त झाले. समाजात पराक्रम गाजविणाऱ्या विरांचे गुणगाण पोवाड्याच्या माध्यमातून कवितेतून वाहायला लागले. तसेच कर्तृत्त्ववान आणि आदर्श राज्यकर्त्यांचे, त्यांच्या कर्तृत्वाचे, कारकीर्दीचे दर्शन मराठी गद्यातूनही घडू लागले. मराठी गद्याचा हा शिवकालीन अविष्कार जितका कलात्मक, तितकाच तेजस्वी होती. कौटूंबिक आणि राष्ट्रीय भावनेने भारलेला होता. राजकीय पार्श्वभूमीवर विविध व्यक्तीच्या जीवननाट्याचे जितके उग्रभीषण, तितकेच करूणरम्य असे दर्शन घडविणारा तो काळ होता. या सर्व वैशिष्ट्यांच्या मुळाशी होती विलक्षण अशी आत्मनिष्ठा, पक्षनिष्ठा, आत्मीयता, प्रेम, व्यावहारिकता या काळात निर्माण होणारे ग्रंथ मुख्यत: वखरवजा होते. त्यातून स्वराज्याचे दर्शन घडविणे हाच मुख्य हेतू होता. म्हणून मराठी गद्य सारस्वताच्या इतिहासातील वखर वाङ्मयाचे स्थान म्हत्त्वपूर्ण आहे. बखर वाङ्मयाचा अभ्यास केवळ इतिहास म्हणून करण्याऐवजी मराठेशाहतील गद्य सारस्वताचा उत्कृष्ट अविष्कार म्हणून अभ्यास केला पाहिजे. वाङ्मयीन सौंदर्याचे प्रचंड मोठे भांडार मबखरफच्या निमित्ताने मराठी वाङ्मयात उपलब्ध आहे. तत्कालीन सांस्कृतिक, वाङ्मयीन, ऐतिहासिक, राजकीय, अर्थविषयक जीवनाचा वारसा जतन करण्याचे काममबखरफ वाङ्मय प्रकाराने केले आहे.

मराठी गद्यात बखर लेखन झाले आहे. त्या बखर लेखनाच्या मागची प्रेरणा प्रामुख्याने ऐतिहासिक वृत्तकथनही आहे. या संदर्भात कै.वि.का. राजवाडे म्हणतात, 'मराठीतील बखर प्रकार मुसलमानांच्या तवरिखा पाहून निर्माण झाला असला, तरी ह्या लेखन प्रकाराची परंपरा संस्कृतमधील भारतापर्यंत पोहचते. संस्कृत भाषेत इतिहास व मराठी भाषेत बखर ज्याला म्हणता तो सारस्वताचा प्रकार संस्कृतात व मराठीत फार पुरातन काळापासून असावा'.१ बखरी ऐतिहासिक वाङ्मयाची नोंद थेट संस्कृत साहित्यात सापडते. बखरीची लेखन परंपरा संस्कृत साहित्यात आल्याची नोंद राजवाडे सांगतात. मबखरफ या शब्दाची मबखेरफ, मबखैरेफ अशी विविध रूपे सापडतात. 'बखर वाङ्मयासंबंधी विचार करतांना शालिवहन, सिंघवादी यादव हेमांडपंत किंवा बिंबस्थन यांच्या बखरीचा प्राचीन म्हणून उल्लेख केला जातो. तालिकोटच्या लढाई संबंधीची राक्षसततागडीची बखरही प्राचीन म्हणजे शिवपूर्णकालातील शेवटी प्रसिद्ध बखर होय. यावरून बखर लेखनाचा प्रघात पुरातन कालापासून चालत होता, असे अनुमान निघते. पण तेराव्या शतकाअखेर महाराष्ट्राचे स्वातंत्र्य नष्ट झाल्यावर इतिहास लिहून ठेवण्याची ही प्रथा खंडीत झाली. तिचा उदय पुन्हा शिवकालातच झाला म्हणून बखर वाङ्मयाची परंपरा तेथूनच सुरू झाली असे म्हटले पाहिजे.ङ्ग३ म्हणजेच बखरीचा इतिहास हा पुरातन काळापासून आहे. काळाच्या ओघात परंपरा खंडित झाली व नव्याने शिवकाळात उदयास आली.

बखरीचे स्वरूप हकीगताचे असते. तो गद्यवाङ्मयाचा इतिहास असतो. परंतु इतिहासातील प्रामाण्य हा गुण विशेष बखरीच्या बाबतीत लागू पडत नाही. इतिहासकालीन मराठ्यांच्या चरित्राचे सर्वांगीण दर्शन बखरीतून घडत असते. महाराष्ट्रातील लोकोत्तर व्यक्ति, लोकोत्तर प्रसंग, त्या व्यक्तीच्या महत्त्वाकांक्षा, शौर्य, औदार्य, स्वाभिमान, स्वामीनिष्ठा, लोभ, मत्सर, इत्यादी प्रेरक विचारांची मांडणी बखरीत झालेली असते. 'राजकीय उलाढाली बरोबरच तात्कालीन

समाजाच्या नैतिक, धर्मिक, कौटूंबिक, जीवनातील घडामोडीचे चित्र बखरकार रंगवीत असतो. इतिहासावर त्यांचा भर असला तर त्याला मानवविषयक जिज्ञासा अधिक असते. त्यामुळे मानवी स्वभावाचे शाश्वत नमुने बखरीतून जीवंत होतात.'४ अतिउच्च शाश्वत मानवीमूल्याचे जतन बखरीतून झाल्याचे दिसून येते. बखरीची निवेदनशैली हरिदासी वळणाची, प्रसंगवर्णनात रमणारी अद्भूत व रहस्योन्मूलक प्रसंगाची वाढवणारी असते. ह्याशिवाय अतिशयोक्त आणि अलंकारिक असते. 'मराठीत ममहिकावतीची बखरफ ही पहिली बखर मानली जाते. तिचा आकृतीबंध पौराणिक वळणाचा आहे. बखरीच्या आशयसूत्रावरून बखरीचे वर्गीकरण करता येते. वार्तापत्रे प्रसंगवर्णनात्मक बखरी, घराण्याचा इतिहास सांगणाऱ्या इतिहास निरूपण प्रधान बखरी, कैफियती अशा वेगवेगळ्या प्रकारच्या बखरी आहेत.'५ अशा प्रकारे बखरीचा आकृतीबंध व आशयसूत्र सांगता येईल.

**बखर वाङ्मयीन दृष्टीकोन :** बखरीचे लेखन हे प्रामुख्याने गद्यात्मक आहे. तसेच बखरीचे लेखन व्यक्तिविशीष्ट भावाने झालेले असते. बखरकार हे आश्रीत राहत असल्याने आपल्या मालकाचा गुणगौरव करणे, लेखनातून स्तुती करणे, कुठे कुटुंबाचा, तर कधी राष्ट्राचा अभिमानही त्या लेखनात असायचा. त्यामुळे लेखनाची शास्त्रशुद्धता फारसी बखरीत आढळत नाही. तरीही संगतवार, कालानुक्रमे घटनांचे कथन करण्याचा त्याचा प्रयत्न आहे. बखरकाराकडून ऐतिहासिक प्रामाण्याची अपेक्षा करणे चूक आहे. बखर हा इतिहास नाही, ते आहे वाङ्मयगुणांनी सजविलेले ऐतिहासिक वृत्तकथन.ङ्घ६ बखर चे लेखन ऐतिहासिक वळणाचे जरी असले तरी वाङ्मयीन गुणांनी ते परिपूर्ण असते.

बखरीचा प्रारंभ हा पुरातन पद्धतीने केलेला असतो. कोणतीही घटना, कथनात वृत्तांत कथन न करता बखरकार सृष्टीच्या उत्पत्तीपर्यंत पोहोचतो. प्राचीन, अतिप्राचीन देव, दैवतांची माहिती देतो. चरित्रकांराची वंशावळ जन्मकथन परंपरा थेट वेदोपनिषद काळापर्यंत नेतो. ऐतिहासिक काळातील व्यक्तीची वंशावळ वेद, उपनिषद, स्तुतीप्रियता हे बखरकाराचे गुण दिसतात. तसेच बखरकार बखरीचा शेवट फलश्रृती दर्शक वर्णनाने करतो. बखरकाराच्या निवेदनाला रंग, रूप आणि आकार प्राप्त होऊन त्यातून सुंदर वाङ्मयीन मूर्ती तयार होतात. भाऊसाहेबांच्या बखरीत असे जीवंत व नाट्यपूर्ण प्रसंग कितीतरी आढळतात. वीर आणि कारूण्याचा प्रत्यय सतत देणाऱ्या या बखरी म्हणजे प्राचीन मराठी गद्य सारस्वताचा एक स्वतंत्र अविष्कार आहे. बखर लेखनात लहान लहान, सुटी सुटी वाक्ये असतात. लहान वाक्यामुळे परिणामकारकता अधिक साधली जाते. बखरकाराची भाषा अधिक प्रौढ, रसाळ, ओघवती असते. बखर लेखनात निवेदन पद्धत असते. 'बहुतेक बखरीचा एकंदर थाट हरिदासी पद्धतीचा दिसतो. श्रोत्यांचे मन, भान हरपण्यासाठी हरिदास ज्याप्रमाणे विविध साधनांचा अवलंब करतात. त्याचप्रमाणे बखरकारही वाचकांचे चित्त वेधण्यासाठी अनुरूप भाषा, काव्यात्म कल्पना, अलंकार, सुभाषिते, म्हणी इ. साधनांचा उपयोग करतात.'७ बखरीमध्ये अनेक प्रकारचे चांगले वाङ्मयीन गुण असतात. भाऊसाहेबांची बखर यांचे उत्कृष्ट उदाहरण आहे. निवडक प्रसंग, निवडक शब्दांच्या साहाय्याने प्रभावीपणे व्यक्त करण्याचे बखरकाराचे कौशल्य अतिउत्तम असते.

बखर लेखनात अत्युत्की, अद्भुतता, पौराणिक पद्धतीचे कथन, माहितीला प्राधान्य, पक्षनिष्ठा, इतिहासाची संगती इ. वाङ्मयीन गुण दिसून येतात. बखरकाराची वाक्यरचना लहान, पण अर्थपूर्ण असते. व्यक्ती आणि प्रसंगानुरूप असणारी जीवंत व रसरशीत भाषा, अलंकृती कल्पनारम्यता, सुभाषिते, म्हणी, यांचा वापर पौराणिक संदर्भ, दाखले यांनी युक्त असलेल्या बखरकाराच्या शैलीला जोड मिळालेली पाहिली की बखरकार हा कलावंत आहे हे स्पष्ट होते.

बखर वाङ्मयात कालविपर्यास, व्यक्तिविपर्यास, प्रसंग विपर्यास हे आक्षेप आहेत. बखररचनेत प्रामुख्याने स्मृतीवर हवाला ठेवून होत असे. दंतकथा, आख्यायिका, जनमाणसाकडून मिळालेली ऐकीव माहिती हा बखरलेखनाचा प्राथमिक भाग असतो. बखर लेखनात मरजकत्वफ दृष्टी, हेतू, प्रयोजने असल्यामुळे अत्युत्ती, अतिशयोक्ती अवास्तवता, अकल्पित, अद्भुतता आढळते. बखर लेखनात वाङ्मयीन दृष्ट्या आक्षेप घेतले जात असले तरी बखरीचे वाङ्मयीन दृष्टीकोनातून अतिशय महत्त्व आहे. बखरीचा वाङ्मयीन दृष्टीकोन स्पष्ट करतांना डॉ. हेरवाडकर म्हणतात, ‘बखर वाङ्मयाने एका नवीन लेखन प्रकाराची भर टाकून मराठी भाषेचे वैभव वाढविले. आकाशात क्षणभर चमकून डोळे दिपविणाऱ्या विद्युलतेचे तेज मराठी बखर वाङ्मयात आहे.’८ असे गौरवपूर्ण प्रकार त्याच्या कथनपद्धतीसाठी प्रसिद्ध आहे. प्रौढ व रसाळ भाषा, फार्सी, उर्दू वळणाचा बाज, प्रसंगवर्णनातून चित्रमयता, अलंकार, सुभाषिते, म्हणी यांचा सरळ सरळ वापर, अतिशयोक्ती, अद्भुतता व रंजकता ही कथनगुणवैशिष्ट्ये, रसांची उत्कटता, प्रसाद-ओज या गुणांचा प्रत्यय, आवेशपूर्ण भाषा हे बखरीचे वाङ्मयीन गुणविशेष आहेत. शिवकालातील बखरीचे लेखन नेटके आहे, कारकुनी पेशातले आहे. भाषाप्रभु बखर लेखन शिवकालात होते. पेशवेकालीन बखरीत कल्पनाचातुर्य, निवेदनकौशल्य यांचा विलक्षण मेळ आढळतो. बखरीनी मराठी वाङ्मयाला वैभव प्राप्त करून दिले आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे, अस्मितेचे दर्शन घडविले आहे. वाङ्मयीन बखर गद्य वाङ्मयात श्रेष्ठ आहे.

**निष्कर्ष :**

१. बखर वाङ्मयाच्या बाबतीत क्रम, विकास, परंपरा, सार काही दिसत नाही.

२. बखरी लेखनात येणारे छोटे छोटे, तुटक-तुटक वाक्य, शब्द यामुळे अर्थपूर्ण जोरकस, प्रौढ व परिणामकारक भाषेने गद्याचे अंगभूत सामर्थ्य प्रगट होते

३. मानवी मूल्यांचे शाश्वत नमुने बखरीत जीवंतपणे वाचकांशी संवाद साधतात.

४. रसांची उत्कटता, उत्कृष्ट भाषाशैली, प्रसादिक ओज या गुणांचा प्रत्यय, आवेशपूर्ण भाषा हे बखर वाङ्मयाचे विशीष्ट गुणविशेष ठरतात.

५. बखरीने मराठी वाङ्मयाला वैभव प्राप्त करून दिले तसेच महाराष्ट्राच्या संस्कृतीचे अस्मितेचे दर्शन घडविले आहे.

**संदर्भ :**

१. प्राचीन महाराष्ट्र- वाङ्मय वैभव :- डॉ.बी.एन.पाटील पृ.क्र.४५०

२. प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप:- ह.श्री.शेणोलीकर पृ.क्र. २८२

३. तत्रैव पृ.क्र. २८३

४. संज्ञा संकल्पना कोष :- संपादक डॉ.वसंता आबाजी डाहाके पृ.क्र.२२२

५. तत्रैव पृ.क्र. २२२

६. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास :- ल.रा.नसिराबादकर, पृ.क्र. २४६

७. प्राचीन महाराष्ट्र-वाङ्मय वैभव, डॉ.बी.एम.पाटील, पृ.क्र. ४५१

८. तत्रैव पृ.क्र. ४५२

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखर गद्य : एतिहासिक व वाङ्‌मयीन स्वरूप

प्रा. डॉ. गायकवाड वाय. जे.
मराठी विभाग प्रमुख, शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम. जि. उस्मानाबाद

**प्रास्ताविक :** बखर वाड्:मय हा महाराष्ट्राच्या इतिहासाचा आणि संस्कृतीचा अमोल ठेवा आहे. मराठ्यांचा इतिहास त्यांची जीवननिष्ठ, श्रध्दा यांचे चित्रण त्यात आलेले आहे. मराठीतील पहिली बखर म्हणून तिचा उल्लेख केला जातो त्या 'महिकावतीच्या बखरीचा' काही भाग इ.स.१३७८ मध्ये रचलेला असला तरी शिवकाल आणि पेशवेकाल हाच बखर वाड्: मय प्रकार बहराला येण्याचा व प्रकट होण्याचा काळ राहिलेला आहे. मुळची 'खबरफवर्ण विपर्यासाने तीच झाली 'बखर' चिटणीस कारकून वगैरे मंडळींनी मुसलमानांचे तवारिखा शाहनामे, फेरिस्ते वगैरे इतिहास साधनांचे कित्ते पुढे ठेवूनच मराठी बखरी लिहिल्या गेल्या आहेत.

बक् म्हणजे बोलणे याच धातुपासून बखर शब्द मराठीत निपजला आहे. 'बखर' हा मराठी साहित्य प्रकार फारसी तवारिखा, शाहनामे, अखबार इत्यादी साहित्यानिशी सदृश्य आहे. ''बखर हा प्राचिन मराठीतील एक विवक्षित गद्य लेखन प्रकार यात चरित्र, वंशावळी, युध्दवर्णने, कैफियत, करीना, आत्मवृत्त इत्यादींचा समावेश होतो. मात्र 'बखर' हे नाव स्वतः लेखकांनी दिले आहे की, संशोधक संपादकांनी दिले हे निश्चित सांगणे कठीण आहे. पण याच प्रकारच्या लेखनाला 'बखर' म्हणून संबोधले जात असावे असे दिसते. कारण ग्रँट डफने मराठयांचा इतिहास लिहीण्यासाठी आवश्यक ती साधने मिळावी म्हणून जो जाहीरनामा काढला होता त्यात 'बखर' हा शब्द वापरला आहे. सातारचे छत्रपती प्रतापसिंह आणि ग्रँट डफ यांच्यात कागदपत्रांच्या देण्याघेण्यासंदर्भात जी बोलणी व जो पत्रव्यवहार झाला त्यातही 'बखर' हाच शब्द वापरला आहे.१ बखर वाड्:मयाचा उगम हा इतिहास विषयक मौखिक कथाकथनातून झालेला दिसतो.

**ङ्गबखर' : व्युत्पत्ती मीमांसा** :'बखर' शब्दाचा अर्थ आणि व्युत्पत्ती यासंबंधी आजवर अनेक विद्वानांनी आपली मते मांडलेली आहेत. बखर लेखनाचा आशय महाराष्ट्राच्या इतिहासाशी संलग्न आहे. परंतु इतिहासाशी संबंधीत असणारे सर्वच लेखन साहित्य हे बखर या सदरात समाविष्ट करता येत नाही. 'बखर' या शब्दाचा अर्थ हकिकत, बातमी, इतिहास, चरित्र अशा शब्दकोशात आढळतो. हा शब्द खबर या फरसी शब्दापासून वर्ण विपर्यासाने आला असावा असे कांही विचारवंताचे मत आहे. बखरी ज्या काळात लिहिल्या गेल्या त्या काळात मराठी भाषेवर फारशी भाषेचा प्रभाव असलेला दिसून येतो. राजवाडे यांच्या मते बक म्हणजे बोलणे या शब्दापासून 'बखर' हा शब्द मराठीत आला असावा. ते असेही म्हणतात की, खबर या फारशी शब्दाचा अर्थ न्यूज असा आहे. बखर या मराठी शब्दाचा इतिहास कहाणी असा आहे.

**मराठीतील बखर वाड्:मयाचा उदय** :महिकावतीची बखर ही मराठीतील आद्य व प्राचिनतम बखर मानली जाते. मात्र एकाच ठरावीक कालखंडात ही बखर पूर्ण केली आहे असे दिसत नाही. या बखरीची पहिली दोन प्रकरणे ही इ.स.१४४९ साली प्रथमतः केशवाचार्यांनी लिहिलेली आहेत व अखेरचे प्रकरण हे इ.स.१५७८ मध्ये पूर्ण केल्याचे दिसून येते. मात्र मध्यल्या १२५ वर्षाच्या प्रदिर्घ कालावधीत एकही नवीन बखर लिहिली गेल्याचे आढळत नाही. ''कालदृष्ट्या मराठीतील ही पहिलीच बखर आहे. पुढील काळात चरित्र आख्यानपर बखरीचे जे विशेष आढळून येतात त्या सर्व विशेषांचे बीजभूत अस्तीत्त्व हे या बखरीतच आढळून येते.''३ ही बखर गद्य पद्यात्मक आहे. मराठीतील गद्य इतिहास लेखनाची मुहूर्तमेळ रोवण्याचे श्रेय याच बखरीचे आहे.

**राक्षसतागडीची बखर** : ही बखर इ.स. १५६५ मध्ये मध्ये 'वेंकटाद्री तकेल निसीदा' या नावाच्या बखरकराने ही बखर लिहिलेली आहे. विजयनगरचा विध्वंस करणारा राक्षसतागडीचा रणसंग्राम हा इ.स. १५४४ मधील आहे. मूळ कानडी वरून ही बखर तयार करण्यात आली आहे.थोडक्यात महिकावतीची बखर आणि राक्षसतागडिची बखर या दोन्ही बखरी पुढील काळातील बखर वाङ्‌मयाच्या प्रवाहाची दिशा निश्चित करतात.

**सभासद बखर** : राक्षसतागडीच्या बखरीनंतर १३० वर्षांनी सभासद बखर ही कृष्णाजी अनंत सभासद यांनी इ.स. १६९४ मध्ये रचली गेल्याचे आढळते. या वर्षापासून मराठी बखर लेखनाला पुन्हा प्रारंभ झालेला दिसून येतो. 'सभासद बखर' म्हणजेच छत्रपती शिवप्रभुंचे चरित्रच आहे. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर मराठ्यांच्या इतिहासात विलक्षण असे परिवर्तन घडले. सभासद बखरीने शिवचरित्र कथेची परिपुर्ण असेच रूप साकारले आहे. ही बखर शिवपूर्वकालीन आणि पेशवेकालीन बखर वाङ्‌मयाचा केंद्रबिंदू आहे. या बखरीने शिवचरित्रपर बखरींच्या विकासाची दिशा निश्चित केली तसेच बखर वाङ्‌मयाच्या प्रवाहास इतिहास आणि वाङ्‌मय यांचे अधिष्ठान मिळवून दिले.

**बखरींचे वर्गीकरण** : बखरीचे वर्गीकरण दोन प्रकारे करता येते. एक विषयाच्या आणि दूसरे कालदृष्ट्या उदा. चरित्र, प्रसंग घराण्याचा इतिहास, आत्मचरित्र किंवा सांप्रदायिक, पौराणिक, भाषांतरीत इत्यादी. कालदृष्ट्या बखरीचे विभाजन केल्यावर या प्रकारात शिवपूर्वकालीन, शिवकालीन, पेशवेकालीन इत्यादीप्रकारचे वर्गीकरण करता येते.

१. **चरित्रकथात्मक बखरी** : चरित्रकथात्मक बखरीत प्राचीन परंपरेनुसार आदर्श अशा ऐतहासीक पुरूषांचे चरित्र सांगितले जाते. शिवाजीमहाराजांच्या जिवनावर अनेक बखरी लिहिल्या गेल्या आहेत.

**अ) ९१ कलमी बखर** :९१ कलमी बखर म्हणून हिचा उल्लेख केला जातो ती दत्तो विमल वाकेनिस यांनी लिहिली आहे. यदुनाथ सरकार यांच्या मते, ही बखर शिवचरित्रावरील लिहिली गेलेली पहिलीच बखर आहे. हिचा लेखन काळा हा इ.स. १७०३ असावा असे सांगितले जाते. लखुजी जाधव हे देशमुख सरदार तर भोसले घराणे त्याच्या आश्रयाला आलेले त्यामुळे त्यांच्यात आपल्यात सोयरीक कशी होणार या विषयी जाधवांच्या स्त्रियांनी अडचण उभी केली. भोसले वंशीयांचा अपमान केला गेला. बखरकाराने शहाजी जिजाई यांचा विवाह कोणत्या परिस्थित झाला. संभाजी थोरला आणि शिवाजी यांचा जन्म कशा अडचणीच्या प्रसंगी झाला याचे वर्णन या बखरीतून केले आहे.

**आ) सभासद बखर** :या बखरीचे लेखक कृष्णाजी अनंत सभासद आहेत. ते राजदरबारा सभासद होते. म्हणूनच ते इतिहासाचे पुरातन माहितगार आहेत. छत्रपती राजाराम महाराजांच्या आज्ञेने त्यांनी चंदी-चंदावर येथे ही बखर लिहिली. बखरीचा मुख्य विषय शिवाजी महाराजांची चरित्रकथाच आहे. प्रारंभी मालोजीराजे, विठोजीराजे, शहाजीराजे यांची हकीकत दिलेली आहे. यानंतर शिवाजी महाराजांच्या व्यक्तीमत्वाचे, जीवनाचे व कार्याचे चित्रण केलेले आहे.

**इ) चित्रगुप्तविरचित शिवाजी महाराजांची बखार** : ही एक चटकदार शिवचरित्रात्मक बखर आहे. सभासदी बखरीचाच अधिक भावपूर्ण रितीने केलेला रसपुर्ण विस्तार असेच स्थूल मानाने या बखरीचे स्वरूप आहे. रघुनाथ यादव, चित्रगुप्त दिमत राजमंदिर परंपरागत महाराजांचे कारकिर्दीचे सेवक यांने ही बखर लिहीली आहे. संभाजीच्या मृत्युनंतर यशवंतराव शिंदेच्या आसऱ्याने हा राहिला आहे. येथेच त्यांने ही बखर लिहिली. सभासद बखरीचीच ही विस्तारीत अशी बखर होय. शिवाजी दिल्लीला औरंगजेबाच्या भेटीला जातात. त्या प्रसंगी राजगडी येवून सर्वांच्या भेटी घेतल्या एवढेच सभासद बखरीत वर्णन आलेले आहे.

**ई) श्री शाहूमहाराज यांची बखर :** हि बखर गोविंद खंडेराव चिटणीस यांनी तोंडी सांगितले आहे. कारण हे वयाच्या १० व्या वर्षापासून शाहूमहाराजांच्या सेवेत होते. गोविंद खंडेराव चिटणीस यांनी तोंडी सांगण्यावरून ही बखर इ.स.१७४९ मध्ये तयार करण्यात आली. यामध्ये बादशहा व बेगम यांच्या सहवासात शाहू महाराज कसे वाढले यांची विस्तृत हकीकत बखरीत दिलेली आहे. या बखरीतून शाहू महाराजांची व्यक्तीरेखा ही ठसठसीत उतरलेली आहे. स्वामी भक्त असलेल्या खंडो बल्लाळ यांचेही व्यक्तीचित्र अत्यंत बहारदारपणे वर्णन केले आहे.

**उ) श्री शिव दिग्विजय :** या बखरीला शिवचरित्रविषयक मराठी बखरीच्या इतिहासात स्वतंत्र आणि महत्त्वाचे असे स्थान आहे. शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर इ.स. १७१८ सुमारास या बखरीचे लेखन झालेले असावे, असे वाटते. बखरकाराने शिवाजींना 'अवतारी पुरूष', साक्षात 'शिव अवतार' असे म्हटले आहे. पौराणिक व मध्ययुगीन वंशावळीच्या आधारे शिवाजींचा संबंध हा युध्दिष्ठीरापर्यंत नेवून दाखविला आहे. यात अनेक पौराणिक दाखले दिले आहेत. मुसलमानी रियासतीत हिंदूंचा छळ कसा होत असे त्यातल्या त्यात स्त्रियांना अब्रूने राहणे कसे अशक्य होते हे सांगण्यासाठीच एका ब्राम्हणाची कथा यात सांगितली आहे.

**ऊ) श्री शिवाजी प्रताप :** थोरले सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या आज्ञेवरून इ.स. १८२९ मध्ये या बखरीचे लेखन झालेले आहे. या बखरीत शिवाजींच्या बालपणाची व त्यांच्या पुर्वजांची सविस्तर हकीकत दिलेली आहे. या बखरीत कल्पीत चुकीचे प्रसंग वर्णन व स्त्रियांची चुकीची माहिती देणे असे प्रसंग या बखरीत वर्णन केले असल्याने या बखरीचे ऐतिहासिक महत्त्व खूपच कमी झालेले आहे.

**ए) श्री शिव छत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र :**मल्हार रामराव चिटणीस हे शिवछत्रपतींच्या दरबारी चिटणीस होते. शिवाजी महाराजांबद्दल खूप श्रध्दा व आदर त्यांच्या ठायी असलेला दिसतो. शिवाजी महाराजानंतर जवळजवळ १२५ वर्षांनी लिहिलेले हे चरित्र आहे. त्यामुळेच घटनांचे वर्णन व कालानुक्रम यामध्ये काही ठिकाणी विसंगती आढळते. सदर बखरीत शिवचरित्रातील घटनांचे व छत्रपतींच्या कार्याचे वर्णन सात प्रकरणात आलेली आहे. तु पुढील प्रमाणे, १. पुर्वज वर्णन, जन्मकथन २. राज्य आक्रमण ३. सज्जन सेवन ४. अफजलखान वध – आरमार वर्णन ५. राज्य स्थापना व पित्रदर्शन ६. दिल्लीपती पराभव ७. दक्षिण दिग्विजय – राज्याभिषेक इ. रघुनाथ यादव हे अत्यंत वास्तव आणि प्रत्यक्षदर्शी वर्णन करताना दिसतात. यात साधी भाषा छोटी वाक्य, अलंकारीक भाषा यामुळे ही बखर आकर्षक झाली आहे.

**२. युध्दकथात्मक बखरी :** या बखरीमध्ये युध्द कथा वर्णिलेली असते. युध्द कथात्मक बखरी या खालीलप्रमाणे आहेत.

**अ) राक्षसतागडीची बखर :** इ.स. १५६५-६६ हा या बखरीचा लेखन काल होय. विजयनगरच्या विध्वंशाची माहिती मुळ कानडी बखरीच्या आधाराने येथे दिली आहे. राक्षस तागडीच्या लढाई नंतर लगेचच ही बखर लिहीली गेली असावी असे वि.का. राजवाडे यांचे मत आहे. या बखरीचे वळण हे कानडी असे आहे.

**आ) भाउसाहेबांची बखर :** या बखरीचा लेखक कोण याबद्दल विद्वानात मतभेद आहेत. या बखरी संबंधी आजपर्यंत जेवढा विचार झाला तेवढा अन्य कोणत्याही बखरी संबंधी झालेला नाही. त्यामुळेच इतिहास लेखकांची व वाङ्मय समीक्षकांची या बखरीसंबंधी मतांतरे खुप झालेली आहे. नानासाहेब पेशवे यांच्या मृत्युच्या वर्णनाने या बखरीचा शेवट होतो. युध्दानंतर लगेच लिहिली गेल्याने या बखरीला विश्वनियता आली आहे.

**इ) पानिपतची बखर :** पानिपतच्या युध्दानंतर अवघ्या दोन वर्षानंतर ही बखर लिहिली गेली. यामुळे ही बखर

समकालीन ठरते. गोपीकाबाईच्या आज्ञेवरून एकनाथ यादव चित्रगुप्ते यांनी ही बखर लिहिली आहे. मराठ्यांच्या अंगी असणारे शौर्य, धैर्य, दृढनिश्चय, राजनिष्ठा इत्यादी गुण या बखरीतून प्रकट होतात. ही बखर म्हणजे एक यशस्वी व प्रभावी अशी शोकांतीकाच आहे.

**ई) होळकरांची थैली** :हा एक बखरीचाच प्रकार आहे. मोठ्या व्यक्तीने मोठ्या व्यक्तीला पत्र रूपाने पाठवलेली हकीकत म्हणजेच थैली. लेखान पानिपतच्या युध्दानंतर म्हणजे इ.स. १७६१ मध्ये झालेले आहे. मल्हारराव हे आपली हकीकत सांगतात अशा भुमिकेतून ही बखर लिहिली आहे. आपण पानिपतच्या रणांगणातून लढाई चालू असताना मध्येच निघून जातो ते भाउसाहेबांच्या हुकूमामुळे हेच या थैलीत स्पष्ट केले आहे.

३. **स्फुटकथात्मक बखरी** :या प्रकारच्या बखरीमध्ये लहान लहान बाबींच्या संदर्भात लेखन केलेले असते.

**अ) साष्टीची बखर/ठाण्याची बखर/ वसईचा दुर्धर धर्मसंग्राम** :मराठ्यांनी इ.स. १७३७ ते १७३९ मध्ये साष्टी व वसई प्रांतावर केलेली स्वारी आणि यामध्ये फिरंग्याचा झालेला पाडाव यांचे सविस्तर वर्णन केलेले आहे. वसईला फिरंग्याच्या ताब्यातून सोडवण्यासाठी गंगाजी नाईक त्याचे पाच भाउ व अन्य सहकारी यांनी केलेल्या बावीस वर्षाच्या पराक्रमाची ही एक कथा आहे.

**आ) खर्डाच्या स्वारीची बखर/ कै.माधवराव नारायणराव पेशवे यांची बखर** : या बखरीचा लेखनकाल तसेच लेखकाचे नावही कुठे दिले दिसत नाही. परंतु खर्डाच्या स्वारीतील बारीक सारीक तपशील जागणारा तो लेखक असावा. सावाई माधवरावांना त्यांने ईश्वरी अवतार मानलेले आहे. निजामाची गुर्मी पुर्णपणे उतरवून टाकणारी जी खर्डाची लढाई ती सवाई माधवरावांच्या कारकिर्दितली एक तेजस्वी गौरवपूर्ण घटना आहे.

**इ) हरिवंशाची बखर** : परंपरागत माहितीच्या आधारे बाळकृष्ण हरिहर पटवर्धन यांनी इ.स. १८४२ साली ही बखर लिहिली गेली. पटवर्धन घराण्यातील कर्तबगार पुरूष यांची विस्तृत माहिति यात आलेली आहे. पटवर्धनांच्या वंशजांची हकीकत देणाऱ्या या बखरीत पुरूषोत्तम कृष्ण उर्फ दाजी यांच्या पराक्रमाच्या वर्णनालाच यात प्राध्यान्य दिलेले आहे.

४. **दौलतीच्या कथात्मक बखरी** : अशा प्रकारच्या बखरी मधून पैसा संपत्ती इत्यादीच्या अनुषंगाने वर्णन आलेले आहे. या प्रकारच्या बखरी पुढीलप्रमाणे आहे.

**अ) महिकावतीची बखर** : माहिम प्रांताचा इतिहास या बखरीत आलेला आहे. इ.स. ११३८ ते १४४८ म्हणजेच राजा प्रताप बिंबा पासून फिरंग्याच्या आगमनापर्यंतचा एकूण सात राजवटीचा हा इतिहास आहे. ही मराठीतील आद्य व प्राचिनतम बखर मानली जाते. मात्र एकाच ठरावीक कालखंडात ही बखर पूर्ण केली आहे असे मात्र दिसत नाही. यादव कालीन अख्यायीकांना हकीकतीत महजर, सते, हस्तलेख, हेमाडपंथी लेख यांचा आधार व पुरावे देवून केशवाचार्यांनी ही बखर लिहिली आहे.

**आ) पेशव्यांची बखर** : या बखरीचे लेखक कृष्णाजी विनायक सोहने हे आहेत. ही बखर इ.स. १८५४-५५ च्या दरम्यान लिहिली आहे. सोहनी यांनी संसार सोडून आपले उत्तर आयुष्य वैजिनाथ येथील शिवालयात घालवीताना तेथील लोकांना ही वखर तोंडी सांगितली व त्यापैकी काही जणांनी ती आदरपुर्वक लिहून घेतली. पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट हे त्यांचे मुळ गाव जे श्रीवर्धन येथून निघ्याल्यापासून तहत इंग्रज सरकारने पुण्यात शनिवारवाडयावर आपल्या सत्तेचा झेंडा चढविला तेथपर्यंतची हकीकत सांगणारी ही बखर आहे.

**इ) होळकरांची कैफियत** : ही बखर इ.स. १८२७ – १८ मध्ये कधीतरी लिहली असावी. ही बखर म्हणजे होळकर घराण्याचा इतिहास निवेदन करणारी आहे. बखरकार हा होळकरांचा पिढीजात नोकर किंवा निकटचा विश्वासू व उत्सदी असावा असे वाटते. ही कैफियत संपुर्ण होळकर घराण्याची असली तरी तिच्या मल्हारराव होळकर, अहिल्याबाई व यशवंराव यांच्यावर लेखकांनी जास्त लक्ष केंद्रीत केले आहे. त्यांचे प्रमुख व्यक्तीमत्त्वाचे विशेष योग्य प्रसंगाच्या आधारे व प्रत्ययकारी रितीने चित्रीत केले आहे.

**ई) मराठी साम्राज्याची छोटी बखर** :या बखरीचे लेखक गणपत गोविंद बर्वे हे आहेत. ही बखर इ.स. १८१७ मध्ये लिहिली गेली. मालोजी पासून ते शेवटचे छत्रपती प्रतासिंह यांच्यापर्यंतची हकीकत देणारी ही बखर आहे.

**उ) शेडगावकर बखर / श्रीमंत महाराजे भोसले यांची बखर** : भोसले यांचे पुर्वज सिसोदे महाराणा सजनसिंहजी यांच्यापासून सातारचे शेवटचे छत्रपती प्रतापसिंह यांच्या दत्तक पुत्राचा दत्तक पुत्र व्यंकोजी महाराज यांच्या पर्यंतचे भोसले यांचा वृत्तांत देणारी ही बखर आहे. जेवढे जमेल तेवढी जुनी माहिती मिळवून खूप प्रयत्नाने ही बखर लिहिलेली आहे. या बखरीचा बराचसा भाग आदरणीय शिवाजी महाराजांच्या चरित्र रेखाटनाने व्यापलेला दिसतो.

**ऊ) नागपूर भोसले यांची बखर** : या बखरीचे लेखक हे काशीराव राजेश्वर गुप्ते हे आहेत. ही बखर इ.स. १८२२ मध्ये लिहिली गेली. ही बखर दुसऱ्या रघोजीच्या मरणापर्यंतची हकीकत देणारी आहे. या बखरीच्या शेवटी परसोजी भोसले आणि मुधोजी भोसले यांच्या कारकिर्दीचीही माहिती देताना बखरकार दिसून येतो.

अशा प्रकारे मराठी वाङ्‌मयाच्या दालनात लिळा चरित्रानंतर गद्य वाङ्‌मयाचा नवा अविष्कार बखर गद्याच्या स्वरूपात उदयाला आला. त्याच्या ऐतिहासीक व वाङ्‌मयीन स्वरूपाबाबत इतिहासकारात आणि वाङ्‌मयीन समिक्षकात बऱ्याच उलटसुलट प्रतिक्रिया नोंदविल्या गेल्या आहेत. शिवकालापेक्षा पेशवे कालात अधिक बखरीची निर्मिती झाली आहे. प्रत्येक बखरकरांने दस्त ऐवजाच्या आधारे प्रामाणिक लेखन केले आहे. मात्र या वाङ्‌मयीन निर्मितीच्या नंतर यांची चिकित्सास केली जात नसल्यामुळे माहितीची शहानिशा केली जात नसावी असे वाटते. एकूणच बखर वाङ्‌मय म्हणजे मराठी वाङ्‌मय वेलीवर बहरलेले सुंदर पुष्पच होय असे म्हणता येते.

**संदर्भ ग्रंथ सुची** :


१. मराठी वाङ्‌मय कोश – खंड चौथा, समिक्षा संज्ञा– समन्वयक संपादक – विजया राजाध्यक्ष महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई – प्रथमावृत्ती नोव्हेंबर २००२ पृ.क्र.२३२

२. मध्ययुगीन वाङ्‌मयीन प्रवाह– MAR २५१– य.च.म.मु.विद्यपीठ, नाशिक – पृ.क्र.४८

३. प्राचिन म.वा. इतिहास – भाग सातवा– डॉ. देशपांडे अ.ना., व्हीनस प्रकाशन पुणे, पृ.क्र.३५६

४. मध्ययुगीन वाङ्‌मयीन प्रवाह – MAR २५१– य.च.म.मु.विद्यपीठ, नाशिक – पृ.क्र.४९

५. प्राचिन म.वा. इतिहास – भाग सातवा– डॉ. देशपांडे अ.ना., व्हीनस प्रकाशन पुणे, पृ.क्र.३६२

* प्राचिन मराठी वाङ्‌मयाचे स्वरूप ङ्ख प्रा. ह.श्री. सेनोलीकर– मोघे प्रकाशन
* मराठी बखर – र. वि. हिरवाडकर
* बखर वाङ्‌मय उद्‌गम आणि विकास – प्रा. डॉ. संकपाळ बाकोजी

ISBN 978-93-5196-698-2

# बखरगद्यातील तत्कालिन समाजजीवनाचे प्रतिबिंब

**प्रा. सुखदेव नारायण एकल**
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज.

मराठी गद्य सारस्वताच्या इतिहासात बखर वाङ्मयाला महत्त्वाचे स्थान आहे. ऐतिहासिक मूल्य असो किंवा वाङ्मयीन मूल्य असो अथवा शैली असो या दृष्टीने बखरींचे योगदान अनन्यसाधारण असे आहे. शाहिरी कवितेप्रमाणे इतिहासासोबत तत्कालिन सांस्कृतिक तसेच सामाजिक जीवनाचा वारसा जतन करण्याचे श्रेय बखरींना दिले पाहिजे.

साहित्यामध्ये सामाजिक जीवनाचे चित्रण येते. ज्या काळात एखादी साहित्यकृती निर्माण होते त्या समाजाचे कालसापेक्ष चित्रण साहित्यात प्रतिबिंबित होत असते. बखर वाङ्मयातून दिसणाऱ्या सामाजिक जीवनाचा शोध प्रस्तुत शोधनिबंधात घेतला जाणार आहे. यासाठी शिवकालीन व पेशवेकालीन बखरींची निवड केली आह. तत्पूर्वी साहित्य आणि समाज यांच्या संबंधाचा विचार प्रारंभी करणे संयुक्तिक वाटते.

**साहित्य आणि समाज :** साहित्य आणि समाज यांचा संबंध अन्योन्य असा आहे. या संबंधाचा परिणाम साहित्याच्या स्वरूपावर आणि प्रयोजनावरही झालेला दिसतो. साहित्यात उमटणारे समाजजीवनाचे प्रतिबिंब लक्षात घेताना साहित्य म्हणजे जीवनाचा आरसा, साहित्य म्हणजे जीवनाची अनुकृती असा विचार केला जातो. तसेच साहित्य म्हणजे जीवनानुभवांचा आविष्कार असेही मत मांडले जाते. त्यामुळे साहित्य हे मानवाच्या भोवतालचे जीवन प्रतिबिंबित करत असते.

लेखक हा साहित्य आणि समाज यांच्यामधील दुवा. साहित्याची प्रतिसृष्टी निर्माण करणारा लेखक हा समाजाचा एक महत्त्वपूर्ण घटक असतो. कोणतीही व्यक्ती ही समाजावर अवलंबून असते. त्यामुळे व्यक्तीचे मन हे समाजनिरपेक्ष असूच शकत नाही. ज्या समाजात तो जन्मतो, वाढतो आणि साहित्यनिर्मिती करतो, त्या समाजातील अनेक संस्कार त्याच्यावर कळतनकळत होत असतात. धर्म, जात, वर्ण, व्यवसाय, भाषा, संस्कृती, परंपरा, श्रद्धा, समजूती, रूढी, चालिरीती, राजकीय-सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक स्थिती, आचार-विचार, नीतिकल्पना, तत्त्वज्ञान, भूप्रदेश इत्यादी अनेक सामाजिक घटकांनी लेखकाचे व्यक्तिमत्त्व संस्कारीत होत असते, त्यामुळे साहित्यनिर्मितीची बीजे लेखकाला त्याच्या सामाजिक अनुभवातूनच मिळतात. म्हणजेच जीवनाच्या प्रत्यक्षानुभूतीतून साहित्याची निर्मिती होत असल्याने सहाजिकच साहित्यात समाजजीवनाचे प्रतिबिंब उमटत असते. समाजामध्ये साहित्यकृत्ती निर्माण होते आणि ती त्याचे संस्कार घेऊनच उभी राहते, आणि हे सर्व अभिव्यक्त होण्याचं साधन म्हणजे भाषा. भाषा ही एक सामाजिक संस्था असं आपण मानतो. या भाषेद्वारे लेखक आपले अनुभव प्रकट करत असतो. लेखक वास्तव जीवनात आलेल्या अनुभवावरच साहित्याची निर्मिती करतो. त्यामुळे सामाजिक जीवनाचे चित्रण त्याच्या साहित्यकृतीत येणे अपरिहार्य असते. हा विचार साहित्यिकांनी, समीक्षकांनी निरपवादपणे स्वीकारला आहे. हे दि. के. बेडेकर यांचे विधान यासंदर्भात समर्पक वाटते.

वरील विवेचनावरुन आपल्याला असे म्हणता येईल की, साहित्यात येणारे सर्व घटक सामाजिक संदर्भ असणारेच असतात या अर्थाने साहित्यव्यवहार हा सामाजिकतेने व्यापलेला आहे. (पाध्ये दिगंबर,१९८८:१८ ) एकूणच एखाद्या साहित्यकृतीतून तत्कालिन समाजजीवन मांडता येते, अथवा तत्कालिन समाजजीवनाचे धागेदोरे शोधता येतात असे म्हणता येईल.

**बखर वाङ्मयातील समाजाचे प्रतिबिंब :** मराठी बखर गद्यामधून तत्कालिन समाजातील रूढी, परंपरा, सण-समारंभ, धार्मिक-राजकीय-सांस्कृतिक जीवनाचे चित्रण झालेले आढळते. प्रामख्याने शिवकाळातील आणि पेशवेकाळातील बखरींच्या अनुषंगाने याचा शोध घेता येतो. धर्ममूलक श्रद्धेचे अस्तित्व प्राचीन काळापासून समाजमनावर खोलवर असलेले दिसून येते अगदी त्याचप्रमाणे पेशवेकाळातील व शिवकाळातीलही समाजमन यापासून दूर नाही असे दिसून येते. याचा प्रभाव लोकांवर मोठ्या प्रमाणात झालेला दिसतो. तत्कालिन समाज हा चातुर्वर्ण्याधिष्ठित होता. त्यामुळे समाजामध्ये यासंदर्भात विविधता पहावयास मिळते. त्याकाळी समाजाचे आचारविचार व इतर व्यवहार हे धर्ममूलक होते असे दिसून येते.

तत्कालिन समाजामध्ये ब्राह्मण वर्गास विशेष मान होता, विधिपूर्वक केल्या जाणाऱ्या धर्मकृत्यामध्ये ब्राह्मणांना विशेष महत्त्व होते. देवी प्रयोगी अनुष्ठाने करावी म्हणजे यश येईल. (हेरवाडकर र०वि०,१९८६ः ४८) असे ब्राह्मण सांगतो त्यावरून ब्राह्मणांना धर्मविधिमध्ये महत्त्वाचे स्थान होते असे दिसते. जयसिंग राजे जयपूर वाले यांनी ब्राह्मणांच्यावर स्वारी केली असता त्यांच्याशी युद्ध न करता त्यांना दान दिल्याचा संदर्भ पेशव्यांच्या बखरीत येतो. किंवा पेशव्यांनी श्रावणमासात दक्षिणेसाठी रमणा बांधून ब्राह्मणास खिचडी वाटून भोजन वगैरे देण्याची प्रथा पाडली. (हेरवाडकर र०वि०,१९७५ः ५३)शिवाजी महाराजाच्या राज्यभिषेकामध्ये गागा भट्ट यांची भूमिका महत्त्वपूर्ण अशी होती. त्यामुळे शिवकाळातही ब्राह्मणांच्याविषयी आदर होता. ब्राह्मणांना उपद्रव न द्यावा. अशी धारणा शिवकाळात होती. यावरून ब्राह्मणवर्गाला समाजामध्ये महत्त्वाचे स्थान होते असे दिसते.

पेशवेकाळातही अशा प्रकारची भावना समाजमनात होती असे दिसते. माधवराव पेशवे हे नियमित गणपतीच्या दर्शनास जात होते व त्यांना राजयक्ष्मा हा रोग झाल्यानंतर थेउरास श्री गणपतीच्या चरणाजवळ जावून पडावे म्हणून ते तेथे राहिले तेथे दैवी उपाय म्हणून अनुष्ठानास ब्राह्मण घातले. (हेरवाडकर र०वि०,१९७५ः २०,२१) तसेच भाऊसाहेब पेशव्यांनी नासिक मुक्कामी असताना गोदामहात्म्य ऐकल्यानंतर त्र्यंबकेश्वरचे देवालय बांधून घेतले. नारायणरावाच्या खुनानंतर नाना फडणीस, सखारामबापू वगैरे मंडळींनी नदीवर बाळवेची लिंगे तयार करुन त्यांच्या अन्नक्रिया लिंगावर हात ठेवून झाल्या. की नानासाहेब यांचा वंश चालवायचा. (हेरवाडकर र०वि०,१९७५ः १४७) एका ब्राह्मण तंट्यात त्यास उपद्रव होणार नाही म्हणून निजामाने कुराण उचलून दिल्याचा दाखलाही बखरीमध्ये सापडतो. शिवाजी महाराजांची श्री भवानी देवीविषयी असणारी भक्ती तर ज्ञात आहेच, तसेच महाराजांनी घेतलेले श्री शैल देवाच्या दर्शनाचा उल्लेख बखरीत येतो. या सर्व संदर्भावरून शिवकाळात व पेशवेकाळात असणारी ईश्वरभक्तीची कल्पना येते.

पेशवेकाळामध्ये मंत्र, तंत्र, जादूटोणा, शकुनापशकुनावर लोकमानसाची खूप श्रद्धा होती असे दिसते. दुसऱ्या बाजीरावाच्या जन्मावेळी अपशकुन फार झाले, त्यावेळी शांती करण्यात आली. सवाई माधवरावांनी महादजी शिंदेकडून दिल्लीहून आणलेल्या वजिरातीच्या वस्त्राचा स्वीकार दिनशुद्धी चांगली पाहून केला. इंग्रज होळकरांच्या मागे लागले तेव्हा त्याच्या दोन लाख फौजेस नदीने वाट दिली. (हेरवाडकर र०वि०,१९७५ः २२५) यावरून तत्कालिन समाजमन हे बऱ्याच अंशी दैववादावर अवलंबून होते त्यामुळे मंत्र, तंत्र, तोडग्यांचा प्रभाव समाजावर होता असे म्हणता येते.

पेशवेकाळामध्ये व शिवकाळामध्ये राजपुरुषाबद्दल समाजामध्ये खूप आदर होता, प्रेम होते. हे बखरीतील दाखल्यावरून लक्षात येते. श्रीमंत पेशव्यांच्या पुण्य-प्रतापांमुळे मोगलांच्या मुलुखात मराठ्यांनी जप्ती करून पराक्रम केला.

तसेच थोरल्या माधवरावांनी मृत्युपूर्वी सखारामबापूस बोलावून नारायणरावास त्याच्या हाती देऊन राज्यकारभार न्यायनीतिने चालविण्यास सांगितले त्यावेळी बापूंनी श्रीमंताचे पायास हात लावून वचन दिले. (हेरवाडकर र०वि०,१९७५ः १०२) यावरून समाजमनात असणारे आपल्या राजांबद्दलचे प्रेम दिसून येते.

तत्कालिन काळामध्ये सण, समारंभ, विवाहसोहळा हे सर्व आनंदाचे क्षण समाज मोठ्या उत्साहाने साजरे करत होता. सवाई माधवरावाच्या जन्माच्या प्रसंगी हत्तीवरून साखर वाटण्यात आली होती, तसेच खर्ड्याच्या लढाईत विजय संपादन केल्यावर त्यांच्यावरून दहीभाताच्या पाट्या ओवाळून टाकण्यात आल्या व त्यानंतर त्यांनी दरबारात प्रवेश केला. सवाई माधवरावाच्या लग्नाच्या वर्णनावरून तत्कालिन काळामध्ये लग्न समारंभ मोठ्या थाटामाटात साजरे केले जात होते याची कल्पना येते. जवळजवळ हा लग्न सोहळा दिड महिने चालला होता, यामध्ये सर्व छोटे मोठे विधी, आमंत्रणे, भोजनावळ्या, मानपान याचे बारीकसारीक वर्णन बखरीत येते यावरून तत्कालिन काळात असणारी लोकाचाराची परंपरा लक्षात  येते. तसेचे लग्न उत्सवादी प्रसंगी करमणूकीचे साधन म्हणून कलावंतीणीच्या नाचगाण्याचे कार्यक्रमही होत.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने विचार करताना आणखी काही गोष्टींचा निर्देश करणे क्रमप्राप्त ठरते. त्या काळामध्ये अलंकार वस्त्रे, भोजनाचे पदार्थ, नाणी, बिरूदे यांचेही उल्लेख येतात. वस्त्र अलंकारामध्ये फ्तू, कुडते, सखलाद, कुडकी, अबनाळ, तैनाळ, नवरत्न, बाराबिरूदे, अश्वबिरूदे, गजबिरूदे, पालखी बिरूदे यांचा समावेश होतो. तसेच शिवकाळामध्ये गब (सोन्याचे नाणे), शिवराई (शिवाजी महाराजांनी पाडलेले नाणे), फ्ग (सुमारे तीन रूपये किमतीचे सोन्याचे नाणे) अशा वेगवेगळ्या लोकवापरातील सोन्यानाण्याचे संदर्भ बखरींमध्ये आढळून येतात. तसेच सर्वसामान्य लोकांच्या भोजनातील पदार्थांचाही उल्लेख बखरींमधून येतो. त्याबरोबरच जमिनी मोजण्याच्या वेगवेगळ्या पद्धतींची माहिती बखरींमध्ये मिळते. यामध्ये प्रामुख्याने शिवकाळामध्ये घुरूंग, चावरे, रूके, पैके, दोऱ्या, खंड्या, पाच हातांची काठी, वीत अशा जमीन मोजण्याच्या पद्धती येतात. त्याबरोबरच शिवकाळामध्ये महसूल गोळा करण्याच्या नियमांचा उल्लेखही बखरीमध्ये येतो. जमिनीचे मोजमाप करून प्रतवारी ठरवून महसूल गोळा केला जात होता.

सारांश शिवकाळातील व पेशवेकाळातील बखरींमध्ये तत्कालिन समाजजीवनाचे प्रतिबिंब पहात असताना, त्याकाळात धार्मिक जीवनात असणारी विविधता, ब्राह्मण पुरोहित वर्गाचे समाजात असणारे महत्त्व, तत्कालिन लोकसमजूती, सण, उत्सव, सोहळे, ग्रामरचना, प्रथा, परंपरा, वस्त्र, अलंकार, आदरातीथ्य बखरींमध्ये पहावयास मिळते. त्यामुळे बखर गद्यातील समाजजीवनाचा एका वेगळ्या अंगाने शोध घेता येतो.

**संदर्भग्रंथ :**

१. पाध्ये दिगंबर, (१९९८)ः साहित्य, समाज आणि संस्कृती, लोकवाङमय गृह, मुंबई.
२. हेरवाडकर र.वि., (संपा), (१९७५)ः  पेशव्यांची बखर, व्हीनस, पुणे,
३. हेरवाडकर र.वि., (संपा), (१९९८)ः शिवछत्रपतींचे चरित्र, व्हीनस, पुणे.

ISBN 978-93-5196-698-2

# बखर वाङ्मयावर भाषावैज्ञानिक अंगाने दृष्टीक्षेप

प्रा. सोने वनश्री बाळासो
(सहाय्यक प्राध्यापक) पी. एल श्रॉफ कला आणि वाणिज्य महाविद्यालय, चिंचणी ता. डहाणू, जि. ठाणे.

साहित्येतिहासात साहित्य प्रकारानुसार भाषेचे स्वरूप गद्य भाषा व पद्य भाषा असे असून बखर वाङ्मय हे गद्य भाषा रूपात आविष्कृत झालेले वाङ्मय आहे. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात गद्य वाङ्:मयाची धुरा वाहून नेण्याचे, त्याला समृध्द करण्याचे तसेच वाङ्मयाला आकार देण्याचे मोलाचे कार्य 'बखर' वाङ्मयाने केले.स्वराज्य काळात पद्य प्रांतात शाहीरी काव्याने जन्म घेतला तर गद्य विभागात बखरींनी वाङ्मयाला बहर आणला. ज्या काळामध्ये बखरींचे लेखन झाले त्या काळात महाराष्ट्र मुलुखावर इस्लामी राजवटीचा प्रभाव होतो. मराठी मुलुखावर कुतुबशाही, निजामशाही, अदिलशाही या राजवटी अधिकार गाजवत होत्या. या मुसलमानी राजवटीमध्ये निर्माण होणाऱ्या साहित्याचा प्रभाव मराठी साहित्यावर पडणे सहाजिकच होते.

महाराष्ट्राच्या इतिहासाचा, महाराष्ट्राच्या संस्कृतीचा एक अमोल ठेवा म्हणून बखर वाङ्मयाकडे पाहिले जाते. महाराष्ट्रेहासातील अनेकविध ऐतिहासिक घटना, जीवननिष्ठा, श्रध्दास्थाने या सर्व गोष्टींचे दर्शन बखर वाङ्मयातून घडते. मराठीमधे बखर हा शद्ब रूढ होताना त्याला इतिहासातील राजकीय वर्तमानकथा हा अर्थ प्राप्त झाला. बखरींच्या अंतरंगामध्ये घडून गेलेल्या मराठमोळ्या वर्तमानकथा आहेत. एखादी ऐतिहासिक व्यक्ती, त्यासंबंधी घटना, व्यक्तीमनातील भावनिक कल्लोळ आदि गोष्टींचे कलात्मक दर्शन बखरींच्या अंतरंगात घडते. एखादे शूरवीर व्यक्तीचित्र रेखाटून त्यातून राजकीय वर्तमानाचे दर्शन घडविले जाते. त्यामुळे ऐतिहासिक घटना, व्यक्ती यांच्याबरोबर तत्कालीन समाज, भाषा, संस्कृती यावर प्रकाश पडतो. आपल्या लेखनास राजकीय अधिकृतता आहे हे सांगण्यासाठी बखर लेखनाची सुरूवात पत्रलेखनाच्या मायन्याने होते. बखरकार राजदरबारात कारकुनकी करीत असत. त्यामुळे राजाज्ञेचे प्रतीक म्हणून बखर लेखन केल्याचे दिसते. शिवपूर्वकालीन राक्षस तागडीची बखर, शिवकालीन ९१ कलमी बखर, सभासद बखर तर पेशवेकालीन बखरींपैकी जवळजवळ सर्वच बखरी या स्वरूपाच्या दिसतात. बखरींची भाषा डौलदार असून त्यामध्ये विविध अर्थछटांनीयुक्त म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते, परभाषेतील शद्ब, त्यातून निर्माण झालेला शद्बसंग्रह, भाषारूपे, मिश्रभाषा यातून भाषिक भांडार समृध्द झाले आहे. बखरकरांनी संस्कृत, हिंदी, उर्दू, मारवाडी, फारसी भाषांच्या मिश्रणातून बखरींच्या भाषेला साज चढविला असला तरी तिने आपला मराठमोळा अविष्कार उदा.'ध' चा 'मा', विश्वास गेला पानिपतात, पगडी उतरविणे... कायम ठेवला.

**बखर शद्ब व अर्थ :** इतिहासाचार्य वि.का.राजवाडे बखरीविषयी बोलताना, ''बक् म्हणजे बकणे, बोलणे ह्या धातूपासून बखर हा शद्ब मराठीत निपजला आहे. ह्यावरून असे अनुमान करावे लागते की, फार पुरातन काळी बखरी तोंडाने बोलत असत, हाताने लिहित नसत.'' (ऐ.प्र.पृ.३४८)असे म्हंटले आहे.

१. ''बखर म्हणजे प्रामुख्याने प्रसिध्द व्यक्ती वा घटना यांची रोचक हकीकत किंवा निवेदन.'' -र.वि.हेरवाडकर (म.ब.- र.वि.हेरवाडकर पृ.३)

२. ''बखरी म्हणजे कथात्मक साहित्याचा इतिहाच्या पार्श्वभूमीवरील कालसापेक्ष वाङ् मयीन आविष्कार होय.'' - गं.ब.ग्रामोपाध्ये (म.ब.वा.पु.- गं.ब. ग्रामोपाध्ये ५२)

३. ''ऐतिहासिक प्रसंग, घटना, व्यक्ती वा कालखंड यांगविषयी लिहिलेला माहितीपर गद्य ग्रंथ म्हणजे बखर होय.'' (पेशव्यांची बखर - कृ.वि.सोवनी पृ. ११) बखर वाङ् मयातून ऐतिहासिक लेखन आविष्कृत झालेले आहे. असे ऐतिहासिक लेखन करीत असताना बखरकरांनी वीर पुरुषाचे किंवा त्यांच्या आयुष्यातील घटनाप्रसंगाचे अतिशय कल्पक असे वर्णन केलेले आहे. म्हणजेच हे वर्णन करताना त्यांनी हकीकती सांगितल्या आहेत. मात्र त्यांच्या सत्त्यतेबद्दल काही वेळेला शंका उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाहीत. असे असले तरी या बखरी पाहिल्यानंतर त्यांचे स्वरूप लक्षात घेऊन, ऐतिहासिक पुरुषाचे चरित्रकथन, ऐतिहासिक पुरुषाच्या आयुष्यात घडून गेलेल्या घटनांची हकीकत, कहानी, इतिहासातील वर्तमानकथा म्हणजे बखर असे म्हणता येते.

**भाषावैज्ञानिक विशेष :** बखर वाङ्मयाचा प्रारंभ महिकावतीच्या बखरीने साधारणत: इ.स. १३५० पासून १८१८ मध्ये मराठेशाहीचा अस्त होईपर्यंतच्या कालखंडाचा विचार करता येतो. यातील पहिली ५० वर्षे संक्रमणावस्थेतील दिसतात. बखर वाङ्मयाची भाषा ही इतर वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळी असलेली पहावयास मिळते. याचे मुख्य कारण म्हणजे मुस्लीम राजवटीमुळे मराठी भाषेशी अरबी-फारसी भाषेशी दृढ व निकटचा संबंध दीर्घकाळ आला. त्याचाच परिणाम बखर वाङ्मयाच्या भाषेवर झालेला आहे.

उदा. मुद्रा = म+उ+द+र+आ = चिन्ह.

मुर्दा = म+उ+र+द+आ = मृत.

केवळ एका स्वनाची जागा बदलली गेल्याने अर्थामध्ये किती भिन्नत्त्व येते हे आपल्या लक्षात येते.

तीर = त्+ई+र्+अ

वीर = व्+ई+र्+अ

भोई = भ्+ओ+ई

डोई = ड्+ओ+ई

केवळ एक स्वन भिन्न आल्याने अर्थामध्ये पूर्णपणे बदल जाणवतो. असे भाषाभेद स्थळ, काळ, पर्यावरणानुरूप भिन्न भिन्न असतात. भाषेतील हे बदल कधी अंगभूत तर कधी अतिसुक्ष्म स्वरुपाचे असतात. बखर वाङ् मयांमध्ये परभाषेच्या संपर्काने, अनुकरणाने अनेक बदल झालेले पहावयास मिळतात. बखरींमध्ये अनेक उच्चारविशेष सापडतात. त्यामध्ये आद्येत्तर ई ऐवजी इ - स्थळि, काहि, किति, देशि, स्वधर्मि, उभयवंशि, तुम्हासि, केलि, ग्रंथि, नाहि, तरि, चरणि, भविष्योत्तरपुराणि, नारदोक्ति, रुषिवाक्य, त्यांतिल, दिवसिं, पृथ्वि, महिमंडळि,नवकोटि, आकाशिहुन, समुद्रि, उठोनि, देवोनि, सहकुटुंबि, राउतासिं, शास्त्रधारि, ठाण्यासि, ह्यातार्‍यासि, कोणाचि अशी अनेक उदा. देता येतील. ए आणि ऐ चा विचार करता आद्य ए ऐवजी ये - येकत्र, येव्हढे, येकुणिस, येक, येकविरा, येकवीस, येकेक, यकविश, आद्य ऐ ऐवजी आइ - आइका, आइकतां, आइकिले, आइकोन. आद्य ऐ ऐवजी आई - आईकोनि, आईकाल, आईकती, आईकिला, आईकिले. आद्य ऐ ऐवजी आये -आयेकउन, आयिकोन, आयकोन, ऋ चा विचार करता, आद्य ऋ ऐवजी रु - रुषि, रुषिवाक्य, रुषीं, रुषेशरु, रुषिकेश, आद्येत्तर ऋ ऐवजी रु - वरुषे, शशीरुतौ, अस्तिकरुषि, वाल्मिकरुषि, वरुषा, समस्तरुषिवरदानाचि. आद्येत्तर ल ऐवजी ळ - प्रळयि, बोलिळा, बळत्कारें, कमळचुरि, कुळस्वामीण, कुळधर्म, कुळगुरू, अळंकार, शाळिवाहन, पाळक, बळाढ्य, कुळकर्णिक, बळत्कारि, श ऐवजी स - सावकास, सेवट, दिवसी, देसमुख,

ISBN 978-93-5196-698-2

दिसेस, सिक्षा, सिपाये, दानसुर, शततं, खुस्याल, सिकाबंद, अनुस्वरागम –होतीं, भांडूं, करितां, तुम्हांवांचून, हें, ऐसें, एकांतीं, बोलणें, चालणें, दिलें, राजगडीं, करूं, असतां, जाहालीं, उतरलें, भीमातीरीं, आलें, हातीं, नावांजितो, धाऊं, भंरवसा, देणें, अवघें, सांपडले, हलकें, होऊँ, सोनें, राज्याचें, मारिलें, गवतानें महाप्राणागम – इलाखा, सखलादी, बंदुखी, हालाखी, दिल्हा, मऱ्हाटा, मऱ्हाठा, साहुकार, बंदुखी, धाशत, हिकडून .ष ऐवजी श – वर्शती, लस्कार. स ऐवजी श – शृष्टी, प्रशवली, उपाशक, सत्यसरश्वती, इंद्रशेन, प्रशुत, सर्वश्वी, गंधर्वशेन, शीतापती, यकविश, यासारखी अनेक उदाहरणे देता येतील. रूपिमविचाराच्या  दृष्टीने बखरींचा विचार केला असता काही बाबी जाणवतात. उदा. दिलेलखानासारिखा मोहरा मारिला. (९१ कलमी बखर – पृ.४४)

या वाक्यामध्ये अनुक्रमे रुपिका /दर/, /खेप+ए+स/, /समागम+ए+चे/, /दहा/ /वीस/, /तोड्+ऊन/, /टाक्+ईत/अशा एकूण तेरा रुपिका, /भाऊसाहेब+आ+स/, /एकंदर/, /हिंदुस्तानच+चे/, /मोहिम+ए+स/, /पाठव+ऊ/ , /नय् +ए/ अशा एकूण तेरा रुपिका तर रुपिका /बादशाह+ई/, /सिंहासन+ए/, /मोड्+ईत/, /चाल्+ईला/ अशा एकूण आठ रुपिका मिळतात. व्याकरणाच्या दृष्टीने वाक्याचा विचार केला असता त्यामध्ये सहा शब्दांचा अंतर्भाव झालेला आहे. या वाक्यातील /दर/, /खेप/, /समागम/, /दहा/ /वीस/, /तोड्/, /टाक्/, /भाऊसाहेब/,/एकंदर/, /हिंदुस्तानच/, /मोहिम/, /पाठव/ , /नय्/ अशा रुपिका स्वतंत्रपणे आल्या आहेत. या रुपिकांना मुक्त रुपिका म्हणता येते. तर काही रुपिका या स्वतंत्रपणे येऊ शकत नाहीत. अशा /ए/,/स/,/ए/,/चे/,/ऊन/,/ईत/ /आ/,/स/, /चे/, /ए/,/स/,/ऊ/,/ए/रुपिकांना बद्ध रुपिका म्हणता येते.

उदा. १.नवरी आरूढलि हस्तिणी वरी ।। रत्नमाळा घेवोन करी ।। (म.ब.पृ.२३)

'नवरी रत्नमाळा हातात घेऊन हत्तीवर बसली' अशा अर्थाचे हे वाक्य आहे. यामध्ये आरूढलि हे क्रियापद 'आरूढ' या धातूला 'लि ' हे लाख्यात (स्त्री.)क्रियापद लागून आरूढलि या रूपिमाची निर्मिती केली आहे. 'हस्तिणी' हे रूपिम हस्ती या संस्कत रूपिमाला 'इण' रूपिका लागून 'हस्तिणी' असे रूपिम बनविले आहे. 'रत्नमाळा' या रूपिमाच्या 'रत्न' आणि 'माळा' अशा दोन रूपिका मिळत असल्या तरी त्यांचा वाक्यातील काही संबंध नाही. त्यामुळे या रूपिमांच्या रत्न, माळा अशा रूपिका न करता 'रत्नांच्या माळा' असे करणे योग्य ठरते. त्यामुळे 'रत्नांच्या माळा' या कार्यकारी रूपिमाची निर्मिती केलेली आढळते. घे या धातूला ऊन हे पंचमीचे विभक्ती प्रत्ययरूपिम लावण्याऐवजी वोन रूपिम लावून घेवोन हे रूप साधलेले आहे. वर आणि कर या रूपिमाला 'ई' रूपिका लावून वरी, करी अशी रूपिमे साधलेली आहेत. काही वेळेला आशयबोधक रुपिमांच्या मागे पुढे अनुक्रमे उपसर्ग व प्रत्यय लावून नवीन आशयबोधक रुपिमांची निर्मिती केलेली आहे. बेलाशक = बेला + शक, अनुचित =अन् + उचित, दुवागीर =  दुआ+अ+गीर, दगेखोर = दग् + ए + खोर, कार्याकारण = कार्य + कारण, स्थिरता = स्थिर + ता, खराबी = खराब + ई , गुणसंपन्नता = गुणसंपन्न + ता अशी कार्यकर रूपिमेही आढळतात. एका अर्थाने बखरींच्या भाषेला समृद्ध करण्याचे कार्य या रुपिमांनी केलेले दिसते.

अशा प्रकारे मराठी बखरींचा भाषावैज्ञानिक अंगाने अभ्यास करता येतो.  मराठी भाषेच्या परिप्रेक्ष्यामध्ये भाषावैज्ञानिक दृष्टीकोनातून बखरींच्या सांगोपांग अभ्यासाची आवश्यकता आहे.

ISBN 978-93-5196-698-2

# भाऊसाहेबांची बखर : शर्थिच्या पराक्रमाची अयशस्वी गाथा

प्रा. डॉ.सौ.सविता अशोक व्हटकर
भोगावती महाविद्यालय, कुरूकली

प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात, गद्य वाङमय प्रकारात बखर या साहित्य प्रकाराला महत्वपूर्ण स्थान आहे. मखबर देणेफ यापासून बखर हा शब्द रूढ झालेला आहे. याशिवाय खबर म्हणजे वार्ता, समाचार, हकीगत, वृत्त या अर्थाच्या शब्दांचा विपर्यास होऊन मबखरफया शब्दाची निर्मिती झालेली आहे. बक् म्हणजे बकणे, बोलणे तसेच मुस्लिमांत मतवारिखाफलिहिण्याची पध्दती होती. त्यांच्या तवारिखा पाहून मराठ्यांनी बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला असे वि. का. राजवाडे म्हणतात. एकंदरीत बखर म्हणजे राजकिय स्वरूपाचे ऐतिहासिक लेखन असा होईल. मराठीमध्ये बखर हा शब्द परभाषेतून आला असला तरी आज एक वेगळा वैशिष्टयपूर्ण अर्थ बखरींना प्राप्त झालेला आहे. म्हणजे बखर म्हटले की, मराठमोळा इतिहास आठवतो. महाराष्ट्राच्या प्रारंभकालीन इतिहास हा मबखरफ आख्यायिकेच्या स्वरूपात दिसतो. शिवकालीन राज्य व्यवहारकोषांमध्ये मविद्यमान जे वर्तले ते वार्ताफ, मपुरावा व्यतिरिक्त कथारूप गोष्टी ते आख्यायिकाफ, असे म्हटले आहे. यावरून शिवकालीन बखरी या चरित्रात्मक स्वरुपाच्या आहेत हे लक्षात येण्यास मदत होते. थोडक्यात काय, तर ऐतिहासिक गद्याचे स्वरूप जे कथन केले जात होते. त्याचे लिखित स्वरूप म्हणजे बखर वाङमय होय. यावरून प्रस्तुत निबंधात मी भाऊसाहेबांच्या बखरींचे ऐतिहासिक महत्व, लढाईचे वर्णन, शर्थीच्या पराक्रमातूनही वीर योध्दांच्या पदरी जे अपयश आले त्या गाथेची मिमांसा करण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठीतील इतर सर्व बखरीत भाऊसाहेबांची बखर ही ऐतिहासिक दृष्टया महत्वाची ठरते. कारण पाणिपतच्या रणसंग्रामातील मानवी जीवनातले जे उग्रभीषण नाट्य या बखरीतून कृष्णाजी रामराव यादव यांनी उभे केले आहे. ते पाणीपतच्या युध्दानंतर दोन वर्षांनी भाऊसाहेबांची बखर या रूपात लिहिली गेली. या बखरीचा दोन तृतियांश भाग हा पाणिपतच्या युध्द वर्णनाचा आहे. तर एक तृतियांश भाग हा युध्दपूर्व मराठ्यांच्या राजाकारणाचा भाग आहे. अशा प्रकारची जी हकीकात लेखकाला माहिती आहे ती या बखरीत लिहिलेली आहे. यावरून मबखरकाराने केलेली विधाने ऐतिहासिक सत्याशी जुळणारी नाहीत. बखरकाराची ही माहिती ऐकींव असावीफ१ या मताला वाव मिळतोच. मुलतः ही बखर लिहिण्याचा उद्देश हा मराठमोठया पराक्राचा इतिहास सांगणे, असा असल्यामुळे दत्ताजी शिंदे आणि भाऊसाहेब यांनी निजामाबरोबर केलेल्या युध्दाचे वर्णन आहे.

या बखरीच्या पूर्वार्धातील म्हणजे एक ते नऊ प्रकरणातून दत्ताजी शिंदे यांच्या पराक्रमाचे वर्णन येते. जनकोजी शिंदे यांच्या मृत्यूनंतर दत्ताजी शिंदे यांनी युध्दात निर्माण झालेल्या परिस्थितीवर स्वार होऊन जी शर्थीने झुंज दिली, ती इतिहासात उल्लेखनिय अशी आहे. युध्दातमरण पत्करण्याची त्यांची तयारी होतीच. या अनुषंगाने लेखकाने दत्ताजी शिंदे यांचे मनोगत चितारले आहे. ते मुळातून असे की, महा खंदारचा पातशहा अब्दुल अली चालोन आला आहे. या रानांत ईश्वरे मृत्यू आणिला तरी उत्तम आहे. भोगी, संन्यासी, तपस्वी नाना प्रकारचे देहदंडण करितात की, मोक्ष साधन व्हावे. त्याच आम्हा क्षत्रियांचा स्वधर्म हाच की, रणात उन्मुख होऊ नये. म्हणोन सर्व साधने साधिली. तेही कर्म ईश्वरे दाटून वोढून आणिले. आशात कोणी आभाग्य असेल तो विन्मुख होईल. रण सोडून निघाल्यास दोहिसही मुकावे लागेल. इकडे नर्कसाधन, इकडे आवेश, मरणाहून वोखटे, यात मरतांच उत्तम (पृ. ७६). यावरून दत्ताजी शिंदे यांची रणांगणातील कर्तव्यनिष्ठा दिसून येते. अवघ्या अठरा स्वारानिशी रणांगण लढवित असताना सुरवातीसच आकरांना वीरगती प्राप्त झाली. त्यांच्या सोबत फक्त सातच उरले. त्यात ते घायाळ झाले.ही परिस्थिती कुतुबशहाच्या नजरेत आली. त्याची दत्ताजी शिंदेच्या बाबतीतील भिती कमी झाली. त्याने घायाळ शिंदेना विचारले, क्या हमारे साथ तुम और लढेंगे? या घायाळ स्थितीतही दत्ताजी सावध होते. त्यांनी बाणेदारपणे उत्तर दिले, बचेंगे तो और भी लढेंगे, त्यांचे हे उत्तर ऐकताच कुतबशहा

याने कमरेचा सुरा काढोन, लाथेने ढकलून पालथा घालून दत्ताजी शिंदे यांचा सिरच्छेद केला व सीर भाल्यास टोचून साहादाने वाजवीत जाते जाहाले. (पृ. ५७) अशा प्रकारे दत्ताजी शिंदे यांनी उत्तरेकडील युध्दात मन भूतो न भविष्यतीफ असा पराक्रम गाजविला होता. याची साक्ष भाऊसाहेबांच्या बखरीत पहावयास मिळते.

या बखरीचा उत्तरार्ध म्हणजे प्रकरण दहा ते आठरा होय. या नऊ प्रकरणातून भाऊसाहेबांच्या पराक्रमाचे वर्णन येते. पाणिपतच्या रणसंग्रामात दत्ता शिंदे यांना वीरगती प्राप्त झाल्यानंतर, बखरकारांनी भाऊसाहोबंच्या विविधांगी व्यक्तिमत्वाचा वेध घेतलेला दिसतो. यामध्ये भाऊसाहेबांनी दिल्लीकडे प्रयाण केल्यापासून ते त्यांना पाणिपतवर आलेल्या वीरगतीपर्यंतचे चित्रण येते. निजामावर विजय प्राप्त केल्यावर भाऊसाहेबांचा आत्मविश्वास भक्कम झालेला होता. यश व पराक्रमांच्या आनंदात असतानाच उत्तरेकडच्या शिंदे यांच्या अपयशाची पत्रे त्यांना मिळताच त्यांची जी अवस्था झाली त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे-मजसा टाक्यांनी दगड फोडावा किंवा निर्जिव काष्ठाचा पुतळा तैसा देह वस्था होऊन तटस्थ बैसलेफ (पृ. ९२) उत्तरेकडे जाण्यासंबंधी जो विचार विनिमय झाला त्यात दादासाहेबांनी प्रत्यक्ष नकारच दिला. तेंव्हा भाऊंनीच उत्तरेकडे जाण्याचा आपला निश्चय नानासाहेबांकडे व्यक्त करून ते दिल्लीकडे रवाना झाले. दिल्लीचा किल्ला हस्तगत केल्यावर भाऊसाहेबांनी दोन चुकीचे निर्णय घेतले. त्यातील एक म्हणजे ज्या गाजुदी खानाने मराठ्यांना मदत केली, त्यांच्या ऐवजी बळवंतरावांच्या सल्ल्याने नारोशंकर मांस मराजेबहाद्दरपणाफहा किताब देऊन मवजीरीफदिली व दोन म्हणजे पैशाची चणचण भासताच दिल्लीच्या तख्ताचे रूप्याचे छत काढून त्याचे रूपये केले. त्यांच्या या कृत्याला सूरजमल जाटाने विरोध केला होता. नादरशहा व अब्दलीने दिल्लीवर स्वारी केली. तरी या छताला हातही लावला नाही. तेंव्हा आपण हे कृत्य करू नये असा सल्ला सुरजमलने देऊनही भाऊसाहेबांनी त्याकडे दुर्लक्ष केले.

भाऊसाहेबांचे हे कृत्य कसेकसे अशोभनीय होते हे सांगताना बखरकार लिहितात ते समयी मभूमिकंप जाहाला, जन वाईट बोलू लागले आणि उल्कापात जाहाला म्हणत ते समय बहुतास वाईटवाटलेफर भाऊसाहेबांच्या या निर्णयाने सुरजमललाही आपण चुक केली काय असे वाटून मयमुनेचे पाणी हाता घातले त्याचे सार्थक हे की काय?फ(पृ. १०५) असा प्रश्न भाऊसाहेबांना केला. रूप्याचे छत पुन्हा बसवून गाजुदीखानास वजीरी द्यावी असे सांगून युध्दाविषयीच्या काही युक्त्या सांगीतल्या. बुंदेलखंडाहून आणलेले वीस लक्ष रूपये लगेच संपले. फौजेतील निरवानिवरीची भाषा ऐकूण भाऊसाहेबांना पश्चाताप होऊ लागला. लढाऊ बाण्याचे भाऊ मसमागमे मुले माणसे आणिली एवढे वाईटकेले. ज्याचे दैवी असेल तसे घडेलफ(पृ. ११७) असे दैववादी विचार करू लागले. अबदालीने कपट कारस्थान केले. त्यावर विश्वासरावांसह स्वतःची फौज घेवून भाऊ दुराणीवर चालून गेले. दरम्यान बळवंतरावांचाही मृत्यू झाला. आणि भाऊसाहेब आणखी खचले. ते स्वतःच गोंधळात सापडले. गिलच्यांच्या लढाईबरोबरची व्युहरचना ऐनवेळी बदलून त्यांनी सर्वांनाच गोंधळात टाकले. याचे वर्णन बखरकार मविनाशकाल विपरीत बुध्दी निर्माण जाहालीफअसे भाऊसाहेबांबाबत लिहितात.

भाऊसाहेबांच्या बाबतीतही असाच विचार करता येतो.भाऊसाहेब हे बळवंतरावांच्या सल्ल्याचे बळी ठरलेले आहेत. विश्वसरावांचा मृत्यू होणे आणि भाऊसाहेबांबरोबर जनकोजी शिंदे यांचेही नाहिसे होणे या गोष्टी त्यांच्या पदरी पडलेल्या पराभवाइतक्या मनात शल्य निर्माण करणाऱ्या ठरतात. निजामाच्या पराभवानंतर जितकी घ्यावयास पाहिजे होती तितकी खबरदारी घेतली नाही. आपल्यापेक्षा अनुभवांनी श्रेष्ठ असलेल्या जेष्ठांचा सल्ला त्यांनी नाकारला इथेच त्यांच्या पराक्राची मुळे रूजू लागली. जेंव्हा विजय आपल्या हातातून पूर्णपणे निसटला पराभव आपल्या पदरी पडणारच याची जेंव्हा भाऊंच्या मनाला खात्री पटली, तेंव्हा खूपच उशीर झाला. तरीही स्वतःच्या अंगी असणारा लढावू बाणा त्यांनी त्यांच्या अखेरच्या क्षणापर्यंत टिकवला. भाऊसाहेबांच्या या शेवटच्या लढाईचे वर्णन वाचताना वरीलप्रमाणे भाऊसाहेबांचे नाहीसे होणे शक्य वाटते. बखरकारांनी मात्र त्यांचा गौरव मभाऊसाे व जनकोजी शिंदे यांची गत कशी काय झाली हे न कळे! उभयता खासे दृष्टीने पाहिले नाहीत गैब जाहाले किंवा अस्मानांत गेले किंवा पृथ्वीत गेले हे ईश्वरी कौतुक ब्रम्हाविकास न कळे तथे मानवियांस काय कले,फ(पृ १३५) या उचित वीररसपूर्ण शब्दांतून केलेला आहे.

वियोग, दुःख, शोक, आक्रोश उदासिनता या प्रत्ययकारी भावनांचे चित्रण या बखरीत येते.भाऊसाहेब उत्तरेच्या स्वारीवर जाताना नानासाहेबांच्या भावना पुढील शब्दांत व्यक्त होतात. मआम्हास दशरथाची गत प्राप्ती झाली तुमच्या वियोगाने आम्हास तर काहीच सुचणार नाही. असे बोलून डोळ्यास पाणी आणीले.फ(पृ. ९५) भाऊसाहेबांच्या मृत्यूची बातमी ऐकल्यावर नानासाहेबांची मृत्यूपेक्षा ही भयावह अशी अवस्था झाली होती.मआभाळ फुटले, तिथे ठिगळ कोठवर लावावे?फ,मअंगावर ब्रम्हांड कोसळले, आभाळ पांढरे झालेफ, अशी शोकात्मक अभिव्यक्तिबरोबर मभाऊसाहेबांचे घोडयावरून पायउतारा होणेफ, महाणा, मारा असे उद्‌गार काढत असताना तोंडास खरस येणे,फत्यावेळी दमून भागून जाणे, मशहादानाच्या आवाहनालाही सोबत्यांनी साथ न देणे, शेवटी शेवटी हाणा, मारा एवढेही न म्हणता येणे, फक्त समोरच्याला मानेनेच आज्ञा देणेफ या करूणामय घटनांनी मन हेलावून जाते. भाऊंच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी पार्वतीबाईंची झालेली स्थिती, तसेच त्यांच्या आईचे काय झाले. त्याचा सुगावाही कोणास लागला नाही. खासा जनकोजी शिंदे तर सरदार घायाळ पाणी पाणी म्हणोन बोलतं. परंतु वाटेने कोणी दम धरून पाणी पाजीनात तेथे हत्ती कोण जिनस (पृ. ७५) बळवंतरावांच्या मत्यूनंतर भाऊसाहेबांनी लढाईचा निर्णय घेतला, त्यावेळी त्यांच्याकडे दुष्काळस्थिती प्राप्त झालेली असते. मग मतमाम लोक भाऊसाहेब यांचे डेऱ्यास जाऊन अर्ज केला की, भाऊसाहेब आम्हांसरणांत मारावे.फ परंतु आणविणे मारु नये. (पृ. १२६) यावरून भाऊसाहेबांच्या सैन्याची दयनिय अवस्था लक्षात येते, विश्वासरावांच्या मृत्यूनंतर नानासाहेबांस तोंड काय दाखवावे हा दुःखाचा मोठा आघात. उराशी बाळगून भाऊसाहेब लढू लागले. तलवारीची खणाखणी जाहाली. मडुक्कर खलीस येतो तैसा प्रकार जाहालाफ(पृ १३३) मअंगावर ब्रम्हांड कोसळले तरी भाऊसाहेबंची हिंमत हारली नाही. शेवटी भाऊसाहेब व जनकोजी शिंदे अस्मानात गैब झालेफ(पृ १३४) अशा प्रसंगानुरुपाने रौद्र रसाची निर्मिती घेऊन युध्दाचे वर्णन गडद होते.

भाऊसाहेबांच्या बखरीतील रसशैलीचा आणखी एक विशेष गुण म्हणजे लयीतून निर्माण झालेले विचारसौंदर्य किंवा विचार सौंदर्यातून निर्माण झालेले लयसौंदर्य या बखरीतील युध्दाच्या वर्णनातून झालेल्या कथनाला एक लय प्राप्त झालेली असल्यामुळे तिथे कारुण्य, वत्सल आणि प्रसंगानुरूप आलेला रौद्र रस हा दुःख आणि उदासिनता ह्या भावनांनीयुक्त अशीलय निर्माण होते. उदा. मारवाड प्रांतातील रामसिंग या रजपूत योध्यास त्याचा वकील चेतराम याने त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देताना देशासाठीच्या लागाचे महत्व पटवून सांगताना म्हणतोमहिंमत मर्दा, मदत खुदा, मर्ता मर्ता करावे, परंतु केवळ अजिज होऊ नये.फ(पृ७) गोविंदरावांना नजीबखान भेटावसाय येतो तेंव्हा त्यांच्या सोबत असणारे छोटेसरदार विचार करतात की, मससा भाणवसांत चुकोन सापडतो तसाच हा सहज आला आहे. त्यास आजचे समई सोडू नयेफ(पृ ४४) दत्ताजी सिंदे यांनी आपल्या सरदारांचा सल्ला मानला नाही. मज्या ज्या काली जे जे होणार होवे ते होतच आहे.फ(पृ ६१) मजात्यातील रडती, सुपातील हसतीफ(पृ ७८) संकटकालाची चाहूल रूपराम कदही यांस लागते तेंव्हा तो सुरजमल जाट यांस म्हणतो की, मयेक आणि चुकी तो बारा बरस की हयातफ(पृ. १०६) तो स्वतःचा बचाव करण्यासाठी पळून जातो. जनकोजी शिंदे व दुराणी यांच्या युध्दाचे वर्णन मजैसे पूर्वी रामायणी वानर व राक्षसलढले किंवा भारती कौरव पांडव लढले याप्रमाणे लढाई जाहली.फ(पृ १२०) बळवंतरावांच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा आपाराव व पत्नी या मायलेकरांचा शोक वात्सल्य व कारूण्य रस निर्माण करतो. वडीलांच्या बरोबर आई सती जाणार हे ओळखून आपाराम म्हणतो मआम्हास सोडून न जावे आणि तुम्ही समागमें सहगमनास जाऊ म्हणता तेंव्हा आम्ही अन्न पाणी कोणास मागावे? आणि कोणावर रूसावे,फयांवर बळवंतरावांचे पत्नी सांगते, मबापा, तुम्ही आणपाणी ईश्वराजवळ मागावे आणि ईश्वरावर रूसावे आता आम्हास मिथ्या मायेत गोवू नये.फम्हणून त्यात ढकलून दिले. (पृ १२५) व निश्चयाप्रमाणे त्या सती गेल्या, होळकरांनी भाऊसाहेबांची बाजू सोडल्यावर भाऊसाहेब एकाकी झाले. त्यातच विश्वासरावांच्या झालेल्या मृत्यूने ते मनाने खचले, तरीही त्यांची हिंमत खचली नाही. त्यावेळच्या भाऊंनी केलेल्या लढाईचे वर्णन हे बखरदार करताना लिहितात, मडुकर खळीस येतो, तैसा प्रकार जाहालाफ(पृ १३३),मघोडी, मुंडक्यांनी खंदक भरलाफ(पृ १३३),मआभाळ फाटले तिथे ठिगळ

कुठवर लावावेफ (पृ १३४) मअशी परिस्थिती जाहाली, तर शेवटी शेवटी रणाचे ठायी ईश्वर सत्तेने जे घडणार असेल ते घडोफ(पृ १३४),ममराठी धर्माची शर्थ करून खस्त केलीफ(पृ १३४),मअंगावर ब्रम्हांड कोसळले, परंतु हिंमत हारली नाहीफ(पृ १३४-३५) मभूतो न भविष्यती एकदांच भोवता वेढा पडोन उभे राहिले, नंतर खंदळा खंदळ बहुतच केली. यांत भाऊसो व जनकोजी शिंदे यांची गत कसी काय जाली हे न कळे! उभयता खासे दृष्टीने पाहिले नाहीत गैब जाहाले किंवा अस्मानांत गेले किंवा पृथ्वीत गेले हे खरी कौतुक ब्रम्हादिकांन न कले, तेथे मानवियास काय कले?फअसे या बखरीत कारण्य व वात्सल्यरसपूर्ण अनेक प्रसंग आहेत.

या बखरीची भाषाशैली ही कथेचे कथन म्हणजे कथनात्मक स्वरूपाची आहे. मानवी जीवनांनुभांबरोबर, युध्दाचा अनुभव सादर करते. पुनःप्रत्यय, विषण्णता, भावात्मकतेबरोबर लोककथेची भाषाशैली या बखरीत आहे. ही बखर युध्दाचे वर्णन करते. तरी या वर्णानातून लालित्य जाणवते. ते संस्कृत शब्दांचा मुक्तहस्ते योग्य ठिकाणी वापर या कारणास्तव, शब्द व अर्थगुणदृष्ट्या युक्त अशी मराठी भाषा ही बखराच्या लेखनशैलीची संपन्नता वाढवते. लोकभाषा व साहित्याची भाषा ही बखरकारांनी योग्य पध्दतीने वापरून प्रसंगाचे वर्णन उठावदार केलेले आहे. यातील काही लोकभाषेची उदाहरणे पाहता आपल्या लक्षात येईल ममुरगी मारी बचडे दाणादाणफ(पृ १४४),मअजगर का दाता रामफ(पृ १६),ममोर थोडा घुसा बडाफ (पृ २४),मससा भाववसास सापडलो तैसी शिकार अनायसे सापडली सापडलीफ(पृ ५४),मसुपातील हसती, जात्यातील रडतीफ(पृ ८४),मगोमीस पाप बहूत, त्यात एक पाय मोडला तर उणें पडत नाहीफ(पृ ९२),मचुकी तो बारा वारस की हयातफ (पृ १०६),मएक आणि चुकी तो बारा वारस की हयातफ(पृ १०६), तसेच साहित्याच्या भाषेची काही उदाहरणे मन भूतो न भविष्यतीफ (पृ १५),मजैसी क्रिया धरावी तैसे फल पावावेफ( पृ १६),मस्त्री बुध्दी : प्रलयं गतःफ(पृ २४),मजैसी दैवाची उजरी तैसी बुध्दी उपने शरीरीफ(पृ ५१),मधिक जिने याहून फकिरी बरीफ(पृ ५६), मकठीण समय वैरियास न यावाफ(पृ ८९) अशी अनेक उदाहरणे संस्कृतवचने व बोली भाषेतील आहेत.

**सारांश** : प्राचीन मराठी वाङमयाच्या इतिहासात गद्य या वाङमयप्रकारातील बखर या साहित्यप्रकाराला महत्वपूर्ण स्थान आहे. मराठीतील सर्व बखरीत भाऊसाहेबांच्या बखरीला ऐतिहासिकदृष्ट्या महत्वपूर्ण स्थान आहे. ही बखर लिहिण्याचा उद्देश दत्ताजी शिंदे व भाऊसाहेब यांनी निजामाबरोबर केलेल्या शर्थीने पराक्रमाची जी लढाई केली त्यांची हकीगत सांगणे हा आहे. बखरीच्या पूर्वार्धात दत्ताजी शिंदे यांनी केलेल्या पराक्रमाचे वर्णन येते. जीवाला जीव देणारे अपयशानंतर वीरमरण पत्करणारे जसे आहेत तसे, बळवंतरावांच्या सारखे चुकीचा सल्ला देणारे, रूपराम कटारी सारखे स्वतःच्या बचावासाठी विश्वासघात करून पळून जाणारेही आहेत. या बखरीतील घटना प्रसंगांचेचित्रण वीर, विभत्स, कारूण्य, रौद्र व अद्भूत या रसांनी युक्त आहे. तसेच विचार व अनुभवांची संपन्नता, विविध भाषांतील शब्दांचा योग्य ठिकाणी, योग्य परिस्थितीतील, छोटया-छोटया वाक्यांचा वापर करून, जो शर्थीचा पराक्रम आहे तो अपयशाकडे का?व कसा?गेला.याची गाथा बखरदाराने योग्य रितीने मांडून, अपयशातील पराक्रम किती श्रेष्ठ आहे हे स्पष्ट केलेले आहे.

**संदर्भ टिपा** :

१)नसिराबादकर ल. रा.- मप्राचीन मराठी वाङमयाचा इतिहासफ फडके प्रकाशन कोल्हापूर, नववी आवृत्ती २००८ / पृ ३०१

२) जोशी श. ना.- मभाऊसाहेबांची बखरफ आपटे स्मारक मंडळ प्रकाशन पुणे, सातवी आवृत्ती १९५९ पृ १०४

३) देशपांडे अ. ना.- मप्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास- भाग ७फ व्हीनस प्रकाशन पुणे ३०, प्रथमावृत्ती १९८८ / पृ ३८६

ISBN 978-93-5196-698-2

# 'बखर भाऊसाहेबांची' मधील तत्कालीन समाजाचे चित्रण : एक चिंतन

वृषाली विलास कदम
रिसर्च स्कॉलर, मराठी विभाग,राणी चन्नम्मा विद्यापीठ, बेळगांव.

बखर वाड्मय हा प्राचीन मराठी काळातील एक अत्यंत महत्वाचा वाड्मय प्रकार मानला जातो. 'लिळाचरित्रा'ने खंडित झालेली मराठी गद्याची परंपरा सुरु करणारा वाड्मयप्रकार म्हणूनही बखर हा वाड्मय प्रकार ओळखला जातो. या वाड्मयाची निर्मिती कधी झाली याबाबतीत अभ्यासकांमध्ये मतभेद असले तरी या वाड्मयाने मराठी भाषा व साहित्याला दिलेले योगदान अतुलनीय आहे. अशा बखर वाड्मयाची लेखनापाठीमागील प्रेरणा कोणती असावी? या बाबतीत वेगवेगळ्या अभ्यासकांनी आपले मत व्यक्त केले आहे.

**बखर निर्मितीमागील प्रेरणा:** 'बखर' एक वाड्मयप्रकार म्हणून अभ्यास करताना त्यामागील प्रेरणेचा अभ्यास करणे गरजेचे आहे. ज्या उद्देशाने व प्रेरणेने बखरकारांनी बखरी लिहिल्या त्या प्रेरणा पुढीलप्रमाणे नमूद करता येतील.

१. इतिहास शब्दबद्ध करणे
२. इतिहासातील स्त्री-पुरुषांचे व्यक्तिदर्शन घडविणे
३. गद्यलेखनाची परंपरा पुढे नेणे
४. धर्मतत्वज्ञानाची श्रोत्याना व वाचकाना ओळख करुन देणे
५. पूर्वजांच्या पराक्रमाची ओळख करुन देणे
६. श्रोत्यांचे आणि वाचकांचे रंजन करणे
७. पुढील पिढीला प्रेरणा देणे.

प्राचीन महाराष्ट्रामध्ये मराठी सत्तेचा उत्कर्ष झाल्यानंतरच बखर वाड्मयाची निर्मिती झाली असावी असे दिसून येते. कारण सर्वच बखरीमधून मराठी सत्तेचा उदय आणि अस्त याचा उल्लेख आलेला दिसून येतो. मराठी सत्तेचा एक जागता इतिहास म्हणून बखरीकडे पाहता येईल. मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष आणि त्यांचा अस्त याची ऐतिहासिक माहीती बखरीतूनच पहावयास मिळते.

**बखर वाड्मयाची वैशिष्टये:**

१) बखरीची सुरवात कोणाच्या तरी आज्ञेने होते आणि अखेर फलश्रुतीने होते.
२) बखरीमध्ये अधूनमधून पौराणिक दाखले दिले जातात.
३) बखरीत वंशावलीचा उल्लेख येत जातो.
४) या बखरी संग्रहीत केलेल्या आहेत असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे.
५) समकालीन समाज, राज्यव्यवस्था याचे वर्णन बखरीत येते.
६) भाव-भावनांचा अविष्कार बखरींमध्ये पहावयास मिळतो.
७) प्राकृत मराठीमध्ये बखरीचे लेखन झाले आहे.
८) वीर, करुण, अद्‌भूत, हास्य असे अनेक 'रस' बखरीमध्ये अनुभवायास मिळतात.
९) बखरकांरानी व्यक्तींदर्शन घडविताना रामायण, महाभारतातील व्यक्तींशी इतिहासातील व्यक्तींची तुलना केलेली आढळते.

**ङ्बखर' या शब्दाची व्युत्पत्ती :**

महाराष्ट्र सारस्वताच्या इतिहासात बखरींचे एक विशिष्ट स्थान आहे. ऐतिहासिकदृष्ट्या नव्हे तर वाड्मयीनदृष्ट्याही त्यांचे

महत्व मान्य केले पाहिजे. मराठेशाहीतील गद्यवाङमयाची एक स्वतंत्र शाखा म्हणून बखरींचा विचार करावा लागतो. इतिहास काळातील तरुण मराठ्यांच्या मनाचे यथातथ्य चित्रण बखरीतच केलेले आढळून येते. याबाबतीत र.वि. हेरवाडकर म्हणतात ''.बखरग्रंथ म्हणजे मराठेशाहीच्या तेजस्वी पराक्रमाचे नंदादीप होत ''१

'बखर' शब्दाच्या व्युत्पत्तिसंबंधी व अर्थासंबंधी गेल्या शे-दीडशे वर्षात अनेक विद्वानांनी आपले विचार मांडले आहेत. त्यांचा आढावा घेऊन 'बखर' शब्दाची व्युत्पत्ती, त्याचा अर्थ व बखर लेखनाचे स्वरुप यांचा विचार इथे केला आहे.

'बखर' हा शब्द 'खबर ' या अरबी शब्दापासून निघालेला असून मूळ अरबी शब्दाचा तो वर्णविपर्यास (Metathesis) होय. 'खबर' या शब्दाचा अर्थ वार्ता, माहिती, समाचार असा आहे.२

**ग्रँटडफ :** ''बखर म्हणजे प्राकृत भाषेत राजादिकांचे लिहिलेले गद्यरुप चरित्र''८

बखर या शब्दाचे निरनिराळे अर्थ वेगवेगळ्या कोशांमध्ये दिलेले आहेत ते खालील प्रमाणे-

१. राज्यव्यवहारकोशामध्ये बखर या शब्दाचा अर्थ खालील प्रमाणे दिला आहे-
''तेरीजं गणितं ताळा त्वैक्यमाख्यायिका बखैर.''

२. जगन्नाथशास्त्री क्रमवंत, महाराष्ट्र भाषेचा कोश-''प्राकृत भाषेने राजादिकांचे 'गद्यरुप चरित्र लिहिले असते ती.''

३. मोल्सवर्थच्या Dictionary of Marathi and English मध्ये-
"Any history, relation, memoir etc. in Prakrit Prose."

४. वा.गो आपटेंच्या 'मराठी शब्दरत्नाकर' मध्ये-''गद्य-इतिहास, चरित्र''

५. मराठी भाषेचा सरस्वतीकोश- ''राजा, थोर पुरुष लढाई इ.ची हकीकत.''

६. महाराष्ट्र शब्दकोशामध्ये- ''बखर म्हणजे देशी भाषेत, गद्यांत लिहिलेला इतिहास, कथानक अगर चरित्र.''९

अशा बखरीच्या वेगवेगळ्या व्याख्या दिलेल्या पहायला मिळतात. वरील व्याख्यांचा विचार करता बखर या शब्दांचा अर्थ 'इतिहास' असाच घेणे अधिक सोयीचे होईल. या अर्थाच्या कक्षेत जवळजवळ सर्व मराठी बखरी येऊ शकतात. मध्ययुगीन कालखंडात गद्याची निर्मिती कमी प्रमाणात होत होती. ही उणीव पुढे मराठी बखरींनी भरुन काढली. शिवकाल व पेशवेकाल या कालखंडात सामाजिक व राजकीय जीवनाचे चित्र रेखाटणाऱ्या अनेक बखरींची रचना झाली. बखरींच्या रुपाने मराठी गद्याचा प्रवाह जोमाने वाहू लागला. त्यामुळे प्राचीन मराठी वाङमयाला नव्याने उजाळा मिळाला. 'उत्कृष्ट वाङमय' म्हणून बखरींना मानाचे स्थान मिळाले. प्राचीन मराठी काव्यात अवतरलेली 'ओवी', शिवपूर्वकालात व शिवकालात आलेला 'अभंग' आणि पेशवेकाळातील 'लावणी' आणि 'पोवाडा' हे लेखनाविष्काराचे प्रकार मराठीने वाङमयप्रकार म्हणून जसे निर्माण केले तसाच प्राचीन गद्यवाङमयात ऐतिहासिक व्यक्ती आणि प्रसंग यांची पुराणव्यतिरिक्त लौकिक इतिहास कथा म्हणून 'बखर' हा वाङमयप्रकारही निर्माण केला. बखरींनी आपल्या वाङमयगुणांनी आपली अशी एक स्वतंत्र परंपराही निर्माण केली आहे. या संदर्भात बापूजी संकपाळ यांचे मत ध्यानात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात-
''बखर हा अस्सल मऱ्हाठमोळा वाण आहे.''१०

**बखरींचे वर्गीकरण:** बखरींचे वर्गीकरण दोन विभागात केले जाते. ते दोन प्रमुख घटक म्हणजे:-

१. काल

२. विषय हे होत. कालानुसार काही बखरींचे वर्गीकरण केले जाते तर काही बखरींचे विषयानुसार वर्गीकरण केले जाते.

**बखरींचे कालखंडानुसार वर्गीकरण:** मराठी भाषेचे यादवकाल, शिवकाल, बहामनीकाल, पेशवेकाल असे विशिष्ट राजवटीनुसार आणि कालखंडाला अनुसरुन विभाग पाडता येतात. त्याचप्रमाणे बखरीचे देखील विभाग पाडता येतात. याबाबतीत हेरवाडकर यांनी केलेले वर्गीकरण उपयुक्त वाटते.

१. शिवपूर्वकाल

२. शिवकाल

३. पेशवेकाल इत्यादी प्रकारात हेरवाडकरांनी बखरींचे वर्गीकरण केलेले दिसून येते.

शिवपूर्वकालीन बखरीत महिकावतीची उर्फ महीमची बखर, राक्षसतागडीची बखर इत्यादी बखरी येतात.

**बखरींचे विषयवार वर्गीकरण:** बखरीत ज्या विषयाचे प्रतिपादन केले असेल किंवा ज्या परिस्थितीचे वर्णन केले असेल त्या अनुरोधाने बखरींचे विषयवार विभाग पाडता येतात. काही बखरीत महत्वपूर्ण ऐतिहासिक प्रसंगांचे, लढाईचे इत्यादीचे चित्र रेखाटलेले असते. उदा. पाणिपतची बखर, काही बखरीत ऐतिहासिक किंवा धर्मसंप्रदायांशी निगडीत असलेल्या व्यक्तीचे जीवन चित्रित केलेले असते. उदा. सभासदी बखर, शिवछत्रपतिमहाराज यांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र इत्यादी.

काही बखरीतून एखाद्या घराण्याचा इतिहास सांगितलेला असतो. उदा : श्री. समर्थांची बखर इत्यादी.

पेशव्यांची बखर, मराठ्यांची बखर यासारख्या बखरीतून तर एका संपूर्ण राजवटीचा इतिहास वर्णिलेला आहे.

काही बखरी आत्मचरित्रपर आहेत. उदा : नाना फडणिसांचे आत्मचरित्र, बापू कान्हो यांचे आत्मवृत्त इत्यादी. त्याचबरोबर स्थलवर्णनात्मक, पौराणिक, शैक्षणिक, भाषांतरित व प्रासंगिक इत्यादी बखरींचे आणखीन विभाग ही पाडता येतात. प्रस्तुत बखरीमध्ये राजांच्या लढाईचे वर्णन, त्यांच्या शौर्याचे, पराक्रमाचे वर्णन फार मोठ्या प्रमाणात येतेच शिवाय तत्कालीन समाजाचेदेखील बखरकाराने मोठ्या तपशीलाने वर्णन केले आहे. त्यामध्ये समाजाच्या चालीरीती, नीतीनियम, धार्मिकजीवन, समाजातील स्त्रीयांचे स्थान याचे वाचकांना जवळून दर्शन घडण्यास मदत होते. या बखरीमध्ये तत्कालीन समाजाचे जे चित्रण आले आहे त्याचे स्वरुप खालील प्रमाणे पाहता येईल.

**तत्कालीन समाजातील चालीरीती :**

तत्कालीन समाजातील चालीरीतींपैकी सतीच्या चालीचा उल्लेख प्रस्तुत बखरीत अनेक ठिकाणी आला आहे.

१. धन्य ते रजपूत! सतीचे वाण घ्यावे, तसे तयार जाहाले. पृ.१३.

२. तेथे बाळाजी शिंदा म्हणोन पालक लेक होता. नामी सरदार जाहला होता. त्यास गोळी लागोन ठार जाहाला. त्यासमागमें त्याचें स्त्रीने सहगमन केले. पृ.३८.

३. वाण सतींचे घेतलें आहे हें सांभाळावें, असेच धर्मशास्त्र आहे. पृ.क्र.८७.

४. भाऊसाहेब यांणी येऊन (बळवंतराव मेहेंदळे यांच्या पत्नीस) बहुत प्रकारें बोध केला की, 'पुत्र असतां जाणें उचित नाही'... बाईंनी उत्तर केले की, 'आम्ही प्रपंचाचे रहस्य पूर्ण अनुभविलें आता आस्था कांही राहिली नाही. या समयीं आमचे मायबाप तुम्ही होऊन आमची बोळवण करावी.' मग भाऊसाहेबांनी सहगमनाचें साहित्य करुन उभयतां स्त्रीपुरुषांचे दहन केले. पृ.क्र.१२८.

प्रस्तुत बखरीमध्ये तत्कालिन समाजातील तीर्थयात्रा, होमहवन, तुलादाने इत्यादी धार्मिक आचारांचे देखील चित्रन येताना दिसते. तत्कालिन लोक या आचारांचे पालनही मोठ्या कांटेकोरपणाने करत असत. याचेही चित्रण या बखरीत आलेले दिसून येते.

१. ते मजल दरमजल पानिपतारुन कुरुक्षेत्रास गेले. तेथे आठ मुक्काम करुन चार तुलादानें करुन शतद्रु नदीपावेतो गेले. पृ.४५.

२. 'साहेब, तुम्ही मुक्तेश्वरी जाऊन तीर्थविधि करावा'. पृ.४७.

३. लाहूरचे पहाडानजीक ज्वालामुखी म्हणून महाजागृत स्थान शक्तीचें पीठ होते. ते महाक्षेत्र. तेथील ब्राम्हण केवळ हिदुस्थान-प्रांती प्रतिसूर्य होते. त्या क्षेत्रात साबाजी शिंदे यांणी त्याचा विश्वंस केला. तेव्हा तेथील ब्राम्हणांनी शक्तीपुढें सहस्त्र चंडीचा होम केला. प्रथम आहूति दत्ताजी शिंदे यांचे नांवे टाकिली. पूर्णाहुती नानासाहेब यांचे नांवे टाकिली. पृ.५३.
४. डेरियास येऊन दत्ताजी शिंदे यांचे धडहि आणलें आणि आपणाकडील मराठे होते त्यास आणून साहित्य उत्तम प्रकारें करुन चंदनकाष्ठे व बेलकाष्ठें व तुळशीकाष्ठें मेळवून यथाविधी यमुनातीरीं दहन केले. तीन हजार रुपये दानधर्म केला. पृ.८०.
अशा प्रकारे तात्कालिन समाजातील लोक धार्मिक रीतीरिवाज पालन करताना दिसतात.
तत्कालीन समाजातील लोकांचा दैवी चमत्कार, मंत्र-तंत्र, बळी देऊन देवतेस प्रसन्न करणे यासारख्या गोष्टीवरही लोकांचा विश्वास होता असे दिसून येते.
१. त्यास किमया अवलिया-फकिरापासून प्राप्त जाहली होती, त्या किमियाचे द्रव्येंकरुन अेवढे असाध्य दुर्ग निर्माण केले होते. पृ.३०.
२. 'अटक' तोफेस साडेतीनशें बैलांच्या तीन माळा वोढावयास लाविल्या, दोन हत्ती लावले परंतू तोफ जागेवरुन हालेना, तेंव्हा एक मनुष्य शहरांतून धरुन आणून तोफेवर जेब केले. बकरी व कोंबडी व नारळ व लिंबे यांसी गणती नाही. मोठे संकटे तोफ लष्करांत आणिली. पृ.४४ (बखर भाऊसाहेबांची)

मराठे सरदार मुलुखगिरी करण्यासाठी जात असत. त्यांच्या या मोहिमांचे उल्लेख बखरींत जागोजाग आढळतात. या मुलुखगिरीमध्ये त्यांना कधी यश मिळत असे तर कधी अपयश येत असे. कधी खंडणी मिळत असे तर कधी रसद तुटल्यानें उपासमार व्हायची. यावेळी मराठे सरदार धैर्याने तोंड देत. कारण क्षत्रिय-धर्मास जागणे हे आपले आद्य कर्तव्य होय. अशी त्यांची निष्ठा होती. हे पुढील अवतरणांवरुन लक्षांत येईल.
१. युध्द करावें यांत यश-अपयश शुराचा वाटा, याची क्षिती काय? पृ.क्र.७ (भाऊसाहेबांची बखर)
२. रण सोडून निघाल्यास दाहोंसहि मुकावें. इकडे नर्क-साधन, इकडे अपेश मरणाहून वोखटे. त्यांत मरतांच उत्तम. पृ.७४.
३. शरण आलियाचा अंगिकार करावा, आसे धर्मशास्त्री वाक्यप्रमाण. शरण येईल त्यास मरण चिंतू नये. पृ.४ (भारुसाहेवांची बखर)
४. खेद स्त्रीजातीने करावा पुरुषास साजत नाही. पृ. ७३ (भारुसाहेवांची बखर)
अशाप्रकारे तत्कालिन समाजातील लोक जीवनविषयक तत्वज्ञानाचे पालन करताना दिसतात.
मराठे सरदार मुलुखगिरी करत, मोहिमां करत या धामधुमींतदेखील सणवार यथायोग्य रीतीने साजरे होत असत.
१. ते दिवशी शिमगी पौर्णिमा होती. सर्वत्रांनी ते दिवशी अन्नपाणी केले. हुताशनी-पूजन केले. पृ.९०.
२. तों माघ-मास जाऊन फाल्गुन मास आला होता. म्हणोन तमाम मराठे व ब्राम्हण अवहो सरदार लहान-थोर सर्व रंग खेळावयास आणिले. पृ.९९.

प्रस्तुत बखरीत तत्कालीन समाजात रुढ असलेल्या कल्पना आढळतात. त्यामधील मान सन्मानाच्या कल्पना पहाता येतील.
१. प्राणत्याग स्त्रीजातीने करावा आणि देश त्याग ब्राम्हण संन्यासी यांनी करावा.
२. सोयरे जाहाले तरी अेकमेकांचे येथे जेवणास यावें जावें परंतू क्षत्रिय-धर्मांत अंतर करता येत नाही.
३.फमग परस्परे हत्ती, घोडे जड (जवाहीर) देऊन रघुनाथराव देशात आले. पृ.३९.
४. राजस्त्रीने बोलिल्याप्रमाणें पाऊण कोटी रुपये (खंडणी देऊन बहुमान हत्ती, घोडे, अमोल्य रत्नें, सिरपेच, जवाहिर, मोत्याचे तुरे, पदके व मोत्यांच्या माळा, कापड, वस्त्रे येणेप्रमाणे दिले. पृ.१७.

जीवन जगताना तत्कालिन समाजातील लोक दानधर्माला देखील कसे महत्व द्यायचे याचे चित्रण या बखरीत

येताना दिसतात.

कधी कधी बखरकाराने इतर प्रांताविषयीही माहिती सांगितली आहे. मारवाडच्या राठोडांचा पराक्रम वर्णन करताना बखरकाराने म्हटले आहे–

१. मारवाड राठोड म्हणजे बहुत पराक्रमी लढाईत पडोन शिरच्छेद जाहला तरी त्याचे कबंध रणांत नाचते. पृ.३५.

'बखर भाऊसाहेबांची' या बखरीत प्रामुख्याने महाराष्ट्रातील व कांही ठिकाणी भारतातील इतर प्रांतातील तत्कालीन समाजस्थितीचे दर्शन घडते. मराठ्यांच्या यशाचे उज्वल क्षण आणि अपयशाचे करुण प्रसंग, त्यांच्या आशा–आकांक्षा आणि सुखदुखे, या सर्वांचे प्रतिबिंब सदर बखरीत पडले आहे. बखरकाराच्याठिकाणी असलेल्या प्रतिभासंपन्नतेमुळे परिणामकारक व्यक्तिचित्रणे, लालित्यपूर्ण भाषाशैली आणि त्याचबरोबर राजकारणातील डावपेचांची देखील वर्णने खुबीने केली आहेत. यामुळे त्याला एक प्रकारच्या श्रेष्ठ अशा ललित कृतीचे स्वरुप प्राप्त आले आहे. प्रस्तुत बखर मराठी बखर वाड्मयामध्ये एक अजोड अशी वाड्मयकृती आहे. अशा प्रकारे 'बखर भाऊसाहेबांची' या बखरीत तत्कालिन समाजाचे चित्रण येताना दिसते.

**संदर्भ :**


१. र. वि. हेरवाडकर – 'मराठी बखर', व्हीनस प्रकाशन पुणे, प्रथमावृती, डिसेंबर १९५७, पृ.क्र.१

२. तत्रैव – पृ.क्र.१

३. तत्रैव – पृ.क्र.१ आणि २

४.डॉ. बापूजी संकपाळ – बखर वाड्मय: उद्‌गम आणि विकास, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे, प्रथमावृत्ती जून १९८२, पृ.क्र.२२.

५. संपादक डॉ.यू.म.पठाण – 'बखर भारुसाहेबांची' न.गौ.व्होरा, सुरस ग्रंथमाला, सोलापूर, प्र.आ.१९३९, पृ.क्र.३.

६. तत्रैव – पृ.क्र.३

७. डॉ. बापूजी संकपाळ – बखर वाड्मय: उद्‌गम आणि विकास, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे, प्रथमावृत्ती जून १९८२, पृ.क्र.१९

८. तत्रैव – पृ.क्र.१९

९. सदर शोधनिबंधातील व्याख्या १ ते ६ पर्यंतचे सदर्भ संपादक डॉ. यू. म. पठाण – 'बखर भाऊसाहेबांची' पृ.क्र.२ मधून घेतलेले आहेत.

१०. डॉ. बापूजी संकपाळ – बखर वाड्मय: उद्‌गम आणि विकास, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे, प्रथमावृत्ती जून १९८२, पृ.क्र.३१


**आधारभूत संदर्भग्रंथ :**


१. संपादक – भीमराव कुलकर्णी – 'भाऊसाहेबांची बखर', अनमोल प्रकाशन पुणे, पुनर्मुद्रण १९९९.

११. संपादक – डॉ. यू.म.पठाण – 'बखर भारुसाहेबांची' न.गौ.व्होरा,सुरस ग्रंथमाला, सोलापूर, प्र.आ.१९३९.

ISBN 978-93-5196-698-2

# ''शिवकालीन बखरींचा ऐतिहासिक दृष्टिकोण''

**प्रा.डॉ.तानाजी ज्ञानदेव पाटील.**
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप, महिला महाविद्यालय, उंब्रज, ता.कराड.

मराठी गद्यवाङ्मयाचा शिवकालीन आणि पेशवेकालीन अवतार जितका कलात्मक, तितकाच तेजस्वी होता. हा काळ कौटुंबिक आणि राष्ट्रीय भावनेने भारलेला होता. राजकीय पार्श्वभूमीवर विविध व्यक्तींच्या जीवननाट्याचे जितके उग्रभीषण, तितकेच करूणरम्य असे दर्शन घडविणारा होता. या काळाचे गद्य ग्रंथ मुख्यत: बखरवजा असून त्यामधून स्वराज्याचे दर्शन घडताना दिसते. मराठी गद्य सारस्वताच्या इतिहासातील बखर वाङ्मयाचे स्थान महत्त्वपूर्ण असलेले दितसे. या एकूणच बखरीचा अभ्यास केवळ इतिहास म्हणून करण्यापेक्षा मराठेशाहीतील गद्य सारस्वताचा 'एक' म्हणून केला तर वाङ्मयीन सौंदर्याचे मोठे भांडार खुले होते. शाहिरी कवितेप्रमाणेच इतिहासासोबत तत्कालीन सांस्कृतिक जीवनाचा वारसा जतन करण्याचे श्रेय बखरींना दिले पाहिजे. म्हणूनच ग्रंथांना मराठेशाहीच्या तेजस्वी पराक्रमाचे 'नंदादीप' म्हटले गेले आहे.

शिवपूर्वकालामध्ये 'बखरी' सारखा एक महत्त्वपूर्ण वाङ्मयप्रकार मराठी गद्य साहित्यामध्ये अवतरलेला दिसतो. 'महिकावतीची बखर' सारख्या लेखनाचा उल्लेख करता येईल. अरबी 'खबर' या शब्दाचा वर्णविपर्यय होऊन बखर हा मराठी शब्द रूढ झाला आहे. हे अनेक विद्वानांनी मान्य केले आहे. शिवपूर्वकाळात या वाङ्मयप्रकाराचे बीजारोपण झाले आणि शिवकाळात व पेशवेकाळात हा वाङ्मय प्रकार बहरलेला दिसतो. शिवकाळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाचे चित्र रेखाटणाऱ्या '९१ कलमी बखर' किंवा 'शेंडगावकर बखर', 'चित्रगुप्ताची बखर' यासारख्या अनेक बखरी लिहिल्या आहेत. तथापी तुलनात्मक दृष्ट्या विचार करता पेशवे कालीन बखर वाङ्मय गुणत्तेने व संख्येनेही लक्षणीय आहे. 'भाऊसाहेबांची बखर' किंवा 'होळकरांची कैफियत' इत्यादी बखरींचा उल्लेख करता येईल.

'फार्सी' या भाषेमध्ये 'तारीख' या शब्दाचा अर्थ 'इतिहास' असा असून 'तवारीख' हे त्या शब्दांचे अनेक वचनाचे रूप आहे. 'फार्सी तारीखनवीस' म्हणजे इतिहासकार असा होतो. लेखनकालाचा विचार कला तर बखरकारांचे दोन विभाग पडतात ते म्हणजे १. समकालीन बखर लेखक २. उत्तरकालीन बखर लेखक

बखरीमध्ये ज्या प्रसंगाचे, काळाचे वा राजवटीचे चित्रण केले आहे. त्या काळात जे बखरलेखक हयात होते. ज्यांनी तो काळ प्रत्यक्ष पाहिला आहे व त्याचेच चित्रण आपल्या बखरीमध्ये केले आहे. अशा बखरलेखकांचा 'समकालीन बखर' लेखकाच्या गटात समावेश होतो. तसेच काही बखर लेखक आपल्या पूर्वीच्या काळाचे, राजवटीचे वा प्रसंगाचे चित्रण आपल्या बखरीमध्ये करतात. त्यांना 'उत्तरकालीन बखर ' ही लेखक गटात समावेश होते. बखर या वाङ्मयप्रकाराचे अधिष्ठान इतिहास हेच आहे. एकूणच बखरी इतिहासाच्या आधारावर लिहिलेल्या दिसतात.

**बखर म्हणजे काय ? :**खबर म्हणजे 'वार्ता', 'समाचार' व 'वृत्त' या अरबी शब्दाचा विपर्यास होऊन बखर शब्दाची निर्मिती झाली आहे. बक = बकणे म्हणजे बोलणे या धातूपासून बखर शब्दाची निर्मिती झाली. असे वि.का. राजवाडे यांचे मत आहे. मराठी साहित्यामध्ये 'बखर' हा शब्द अरबी भाषेचा विपर्यास होऊन तो वापरात आला आहे. यास 'वार्ता', 'समाचार', 'घटना', 'बातमी', वृत्त असे अनेक पर्यायी शब्द दिसतात. मराठी गद्य सारस्वताच्या इतिहासातील बखर वाङ्मयाचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण असे आहे. या सर्व बखरींचा अभ्यास केवळ इतिहास म्हणून करण्यापेक्षा मराठेकालीन

गद्य सारस्वताचा नमुना म्हणुन केला तर भाषिक सौंदर्याचे भांडार आपणासमोर उघडले जाते. याच गरजेतून बखरींची निर्मिती झाली आहे. या बखरींचा स्थूल मानाने पाच भागांमध्ये विचार करता येईल.

१. बखरकाराने प्रत्यक्षपणे पाहिलेल्या व ऐकलेलया राजकीय घटना व प्रसंगावर आधारित बखरी.

उदा. १. सभासदाची बखर

२. भाऊसाहेबांची बखर. या बखरींचा समावेश करता येईल.

२. केवळ आठवणीवर विश्वास ठेवून लिहिलेल्या बखरी. या बखरी स्मृतीवर हवाला ठेवून लिहिलेल्या असतात.

उदा. १. अख्यायिका, पारंपारिक हकीकती. दंतकथा आठवणी इ.च्या अधारे बखरी लिहिल्या जातात.

३. ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे लिहिलेल्या बखरी

उदा. ऐतिहासिक कागदपत्रे दप्तरांतील टिपणे, जुने ग्रंथ, हस्तलिखिते इ.चा समावेश होतो.

४. बखर सदृश्य ऐतिहासिक स्वरूपाच्या लेखनाचा समावेश केला जातो.

उदा. चरित्र, आत्मचरित्र, वाका, हकीकत, कैफियत इ. प्रकारच्या लेखनाचा समावेश होतो.

भाऊसाहेबांची कैफियत, पटवर्धनीय वाका, इ. बखरींचा समावेश होतो.

५. ऐतिहासिक व राजकीय विषय नसलेल्या परंतू बखर म्हणून संबोधल्या जाणाऱ्या साहित्याचा या वर्गात समावेश करण्यात येतो. हे लेख प्रामुख्याने पौराणिक व सांप्रदायिक स्वरूपाचे असतात. मराठ्याच्या इतिहासामध्ये मराठी वाङ्मयात सर्व विश्वाला दीपवून टाकणारे आणि आपल्या कर्तृत्वाने स्वत:चे असे हिंदवी स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज होय. त्या कालखंडातील हे युग प्रवर्तक असे व्यक्तिमत्व घेऊन गेले. त्यामुळे त्यांचे जीवन आणि चरित्र हा अनेक लेखकांच्या लेखनाचा विषय होऊन राहणे हे ही स्वाभाविकच होते. या कालखंडात कृष्णाजी अनंत सभासद हा महत्त्वपूर्ण बखरकार होऊन गेला. या शिव कालीन बखरींचा विचार पुढील प्रमाणे करता येईल.

**अ) सभासदांची बखर :** शिवकालीन पहिली बखर समकालीनाने लिहिलेले हे पहिलेच शिवचरित्र होय. ऐतिहासिक दृष्टीने या बखरीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कृष्णाजी अनंत सभासद हा छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते राजारामांच्या अखेरीपर्यंत तो दरबारी सभासद होता. शिवाजी महाराजांच्या जीवनातील एकूण एकाहत्तर प्रसंगाचे निवेदन त्याने केले असून सर्व घटनाक्रम सत्य पातळीवर उतरविले आहेत. त्याचप्रमाणे अफजलखानवध, शिवाजीचे दिल्लीस प्रयाण, शिवराज्याभिषेक, शिवाजींची भागानगरास भेट व शिवाजी व व्यंकोजी भेट हे प्रसंग सविस्तरपणे वर्णन केलेले दिसतात.

शिव राज्याभिषेक (शालिवाहन शके १५९६ ज्येष्ठ मास शु.१३) . शिवरायांचे महाप्रमाण (शालिवाहन शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे चैत्र शुद्ध १५ रविवार) या दोनच घटनांचा कालनिर्देश बखरींमध्ये केला आहे. पुढे मग 'त्याजवरी' 'त्याउपरी', तो, 'इतक्यात' इत्यादी. शब्दांनी केलेला आढळतो. तसेच घटनांचे तपशीलावार वर्णने. अठरा कारखाने, खजिना, शिलेदार, कारकून, हुजरे, गड कोट इ. चा जमाखर्च तपशीलही आढळतो. बखरकाराने काही तोंडची वाक्ये नमूद केली आहेत. ''अफजलखान सामान्य नव्हे केवळ दुर्योधनच जातीने होता दिलेरखान म्हणजे मोठा बळकट, एका हत्तीचे बळ आणि जास्तीच होईल. आणि हत्ती बरोबर खाणे, दररोजी हत्ती खातो तेणेप्रमाणे वजन. शरीर तरि दुसरा हेडंब राक्षसच''. यासारख्या वाक्यांतून अफजलखान आणि दिलेरखानचे व्यक्तिदर्शन सभासदाने मोठे सुरेख साधले आहे. ''डेरे बिछाने व असनमानाशिरी त्रिवाशिया व मोतियांच्या झालरी लाविला. चित्रविचित्र वाडे व लोडे, गाद्या, पडगाद्या टाकिल्या''

हे शिवाजी-अफजल भेटीसाठी उभारलेल्या मंडपाचे वर्णन बखरकार सुरेखपणे करतो. अफजलखान वधाचा प्रसंग रेखाटताना सभासद म्हणतो, ''राजियाने भेटी देता खानाने राजियाची मुंडी कवटाळून काखेखाली धरिली.

**(२) शिवाजी महाराज छत्रपती जनेश्वर यांचे चरित्र :** या बखरीचे लेखक रघुनाथ यादव चित्रे उर्फ चित्रगुप्त असून या बखरीचा लेखनकाल इ.स. १७६१ शके १६८३ असा आहे. ही बखर रचनात्मक नूसन सभासद बखरीचा अनुवाद आहे. सभासद बखरीतीलच सर्व प्रसंग घेऊन फक्त मुळात व्यक्तींची संपूर्ण नसलेली नावे यामध्ये दिली आहेत. 'अफजलखान-शिवाजी भेट' आणि 'शिवराज्याभिषेक' या दोन प्रसंगाचे वर्णन सभासदांपेक्षा चित्रगुप्ताने अधिक विस्तृत आणि डौलदार भाषेत केले आहे.तैसेच हृदयस्थान प्रशस्थ, बाहु-दंड गजशूंडप्राय व कटी सिंहा कृति, तैसेच करपल्लव पंकजपुष्पासमान, तैशाच जानुजंघा चरण कमलें आरक्त शेंदूर वर्णातुल्य ऐसे महाराजांचेफशरीर स्वयं हस्तके हर्षोत्कर्षचित्ते विधिनेच निर्मिले. अशी अलंकारपूर्ण भाषा तो वापरून बखर दर्जेदार करण्याचा प्रयत्न केला आहे. शिवकालीन बखरींपैकी ही आणखी एक चरित्र होय. ही बखर इ.स.१७२८ (शके १६४०) मध्ये लिहिली असून त्याचे लेखन खंडो बल्लाळ चिटणीसांनी केल आहे. हे चरित्र छ.शिवाजी महाराजांचे आहे. या चरित्रातील वंशावळी विष्णुपुराण, रजपूतांच्या राजावळी व यौवनांच्या तवरिखा यामधून घेतल्या आहेत. तसेच प्रतागडावरील अफजलखानाच्या भेटीवेळी रस्ते सुशोभित केले आहेत. तसेच वापी, कूप, तलाव, उद्याने, सधन वृक्ष, निबिड छाया याचीही वर्णने केलेली आहेत.

**क) शिवछत्रपतींची सप्तप्रकरणात्मक चरित्र :** शिवकालीन बखरींपैकी एक महत्त्वपूर्ण व उल्लेखनीय बखर आहे. या बखरीचे लेखन मल्हार रामराव चिटणीस यांनी केले आहे. सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या आज्ञेवरून शके १७३३. इ.स.१५११ मध्ये केल्याचा उल्लेख सापडतो. बखरीच्या सुरूवातीलाच बखरकार लिहितो की, ''स्वस्ति श्री राज्याभिषेक १३७ प्रमोदीनाम संवत्सरे, ज्येष्ठ बहुलषष्टी भृगूवासरे क्षेत्रिय कुलावंतस श्री राजाधिराज श्री महाराज प्रतापी शाहू नृपतीयांसी यांनी आज्ञा केली ऐसिजे '' असा उल्लेख केलेला आहे. या बखरीमध्ये 'अफजलखान वधाचा' प्रसंग अत्यंत नाट्यात्मक रेखाटला असून त्यांच्या भेटीच्या वेळी उभयतांमध्ये घडलेला संवाद व व्यक्तिदर्शन अत्यंत प्रभावीपणे साधले आहे. त्याचबरोबर संत तुकाराम व शिवाजी महाराजांच्या भेटीचा प्रसंग व कीर्तनातील चमत्कार हे प्रसंगही भावपूर्ण रेखाटले आहेत. तसेच दरबारातील शिष्टाचार व चालीरिती यांचाही उल्लेख या बखरीत चिटणीसांनी केला आहे. पुढे आपल्या निवेदनातून राजनीतीही सांगितली आहे.

**ड) शिवाजी प्रतापचरित्र :** शिवकालीन बखरीमध्ये ऐतिहासिक प्रामान्य नसलेल्या. परंतू वाङ्मयीन दृष्ट्या बखर म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो. ती बखर म्हणजे 'शिवाजी प्रताप' चरित्र होय. या बखरीमधून छ.शिवाजीमहाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू बखरकाराने उलगडले आहेत.सर्वच बखरींची भाषा अत्यंत प्रभावी व परिणाम कारकता साधली आहे. साधी भाषा, छोटी-छोटी वाक्यरचना, संस्कृत, फारशी मिश्रीत वाक्यांचा वापर, अलंकारिकता, चित्रमयता या गुणविशेषामुळे सर्वच बखरी महत्त्वपूर्ण ठरल्या आहत. आजही या बखरींचा अभ्यास केल्याशिवाय पुढे जाता येत नाही.

**संदर्भ :**

१. सभासद बखर – डॉ.यू.म.पठाण

२. मराठी वाङ्मयाचा इतिहास – डॉ.ल.रा.नसिराबादकर

३. मराठी वाङ्मयाचा इतिहास – शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूरदर्शन केंद्र बीए भाग ३

ISBN 978-93-5196-698-2

# 'बखर : इतिहास लेखनाचे महत्त्वपूर्ण साधन'

डॉ. अशोक शिंदे
मराठी विभाग, मुधोजी महाविद्यालय, फलटण

मध्ययुगीन कालखंडात म्हणजे १७ व्या – १८ व्या शतकामध्ये महाराष्ट्रात बखर या लेखन प्रकाराला अधिक गती आली असल्याचे दिसते. याचे कारण म्हणजे याच कालखंडात स्वराज्याची स्थापना झाली. मराठी भाषेला राजव्यवहारात प्रमुख भाषेचा दर्जा मिळाला. तसेच मराठीमध्ये राज्यव्यवहार कोश देखील निर्माण झाला. याचा परिणाम म्हणून या काळात विविध प्रकारच्या लेखनासाठी मराठी भाषेचा अधिकाधिक वापर होऊ लागला. मराठी मुलुखाचा स्वाभिमान असलेले वीर, पराक्रमी, आदर्श राज्यकर्ते यांच्या शौर्याने तत्कालिन प्रतिभावंत प्रेरित झाले व यातूनच मराठ्यांच्या कर्तृत्वाचा अविष्कार 'बखर' या लेखन प्रकाराच्या माध्यमातून होऊ लागला. या लेखनप्रकारातून समर प्रसंगातील पराक्रम, शौर्य, वीरता तसेच विदारक शोकमयता इत्यादीचे चित्रण होऊ लागले. तत्कालिन सामाजिक, धार्मिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनाचे सर्वांगीण चित्रण बखरीतून उमटत होते. एक उपयुक्त ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून 'बखर' या लेखन प्रकाराकडे पाहिले जाऊ लागले. मात्र नंतरच्या कालखंडात इतिहास लेखनाची सुत्रबद्ध पद्धती व विविध साधने अस्तित्वात आली. त्यांच्याशी तुलना करताना बखर लेखनातील ऐतिहासिक मूल्याबाबत शंका तथा संशय उत्पन्न झाला. त्या अनुषंगाने बखरीची ऐतिहासिक आणि वाङ्मयीन दृष्टीने चिकित्सा सुरू झाली. विविध अभ्यासक, तज्ज्ञ, संशोधक यांनी याबाबत सखोल साधक बाधक चर्चा केली. त्यामुळे बखर लेखनाकडे पुन्हा नव्या दृष्टीने पाहण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. प्रस्तुत शोध निबंधात इतिहास लेखनाचे महत्त्वपूर्ण साधन म्हणून 'बखर' या लेखनप्रकाराची उपयुक्तता स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**भारतीय इतिहास लेखनाचे स्वरूप व साधने :** भारताला इतिहास लेखनाची फार जुनी परंपरा असलेली दिसते. भारतीयांमध्ये इतिहासाविषयी केवळ आस्थाच नव्हती तर त्यांना इतिहासविषयक जिज्ञासादेखील होती. अगदी वैदिक काळापासून भारतीयांनी ही परंपरा जतन केली आहे. इतिहास लेखनाच्या विविध साधनाद्वारे भारतीय इतिहास आज उपलब्ध असलेला दिसतो. वैदिक वाङ्मयात इतिहास व पुराण या शब्दसंज्ञा बरोबरीने वापरल्या जात असत. आख्यायिका, दंतकथा यांच्या समुदायास उद्देशून या संज्ञा वापरल्या जात असत. खरेतर वेदांचा अधिकार ज्यांना नाही अशा स्त्रिया आणि शूद्रांना शिक्षण देण्यासाठी ही योजना होती. वेदाचा पूरक भाग म्हणून या संज्ञा वापरल्या जात असत. वैदिक वाङ्मयात इतिहास व पुराण हे स्वतंत्र ग्रंथ उपलब्ध असल्याचे दिसते. 'इतिहासवेद' नावाचा ग्रंथ समुदायही पूर्वी अस्तित्वात असल्याचे ज्ञानकोशकार सांगतात. याशिवाय छंदोग्योपनिषधात इतिहास पुराणाला पाचवा वेद म्हटले गेले आहे. उपरोक्त विवेचनावरून वैदिक काळात इतिहास ही संकल्पना अस्तित्वात असल्याचे दिसते.

वैदिक काळात इतिहास लेखनाचे प्रमुख साधन ग्रंथ असल्याचे दिसून येते. ग्रंथाच्या माध्यमातून इतिहास कथन करणे वा इतिहास लेखन करणे हा प्रघात त्यावेळी असलेला दिसतो. 'दानस्मृती' व 'दाशराज्ञ युद्ध' या ऋग्वेदातील प्रकरणामध्ये इतिहास या कल्पनेचे मूळ असलेले दिसते. 'दानस्मृती' या प्रकरणामध्ये केवळ आश्रयदाते किंवा राजे यांच्या 'स्मृती' किंवा आठवणी नाहीत तर या प्रकरणांमध्ये त्यांच्या नावाच्या याद्यादेखील आहेत. 'दाशराज्ञ युद्ध' या प्रकरणात तर

तत्कालिन इतिहासच आढळतो. पौराणिक काळात इतिहास ग्रंथरूपाने आढळून येतो. 'रामायण', 'महाभारत' या ग्रंथाना इतिहास म्हणूनच संबोधले जाते. महाभारताला तर ग्रंथनिर्माता स्वतः 'इतिहासोत्तम' ही पदवी बहाल करतो. या काळामध्ये चतुर्विद्य पुरुषार्थ प्राप्त करून घेण्यासाठी केलेले उपदेश अशी इतिहासाबाबत कल्पना असल्याचे दिसते. एकूणच वैदिक व पुराणकाळात ग्रंथरूपाने (स्वतंत्र) तथा वेदातील प्रकरणांच्या माध्यमातून इतिहास लेखन झाल्याचे दिसून येते.

प्राचीन काळात भारतीयांनी केलेले इतिहास लेखन फारसे आढळत नाही. मात्र या कालखंडात परकीय प्रवाशांनी भारताविषयी आपले अभिप्राय शब्दबद्ध केले आहेत. मेगॅस्थेनिस (ग्रीस), ह्युएनत्संग (चीन), अल्मसूरी (अरबस्थान), मनूची (ग्रेनीस) व वर्निअर (फ्रान्स) या परकीय लेखकांनी पत्रांच्या माध्यमातून भारताविषयीचे अभिप्राय मांडले आहेत. या अभिप्रायांची विश्वनियता बाजूला ठेवली तर परकीयांची ही प्रवासवृत्ते इतिहास लेखनाची उपयुक्त साधने असून इतिहास लेखनाच्या कामी त्यांचा बराच उपयोग झालेला आहे.

मध्ययुगीन कालखंडात भारताच्या विविध प्रांतामध्ये इतिहास लेखन झालेले दिसते. १२ व्या शतकात काश्मीरमध्ये 'राजतरंगिणी' हा कल्हणाचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. यामध्ये पाचशे वर्षापूर्वीचा इतिहास असल्याचे दिसते. प्रबंधचितोमणी व प्रबंधकोश या ग्रंथातून गुजरातमधील चालुक्य राजांच्या राजवटीच्या इतिहासाचे दर्शन घडते. भारताच्या इतर प्रांतामध्ये ग्रंथ काव्य व इतर लेखन प्रकारातून इतिहास लेखन झाले आहे. महाराष्ट्रात मात्र इतिहास लेखनासाठी एका वेगळ्या लेखन प्रकाराचा अवलंब केला गेला. तो लेखन प्रकार म्हणजे 'बखर' होय. या लेखन प्रकाराचे स्वरूप व त्याचे ऐतिहासिक साधन म्हणून उपयुक्तता याबाबत चर्चा करणे आवश्यक आहे.

**बखर लेखन परंपरा व स्वरूप** :'खबर' या अरबी शब्दाचा विपर्यास होऊन बखर शब्दाची निर्मिती झाली आहे. खबर म्हणजे वार्ता, समाचार किंवा वृत्त, इ. प्रकारचे लेखन होय. बखर या शब्दाचा रूढ अर्थ राजकीय स्वरूपाचे ऐतिहासिक लेखन असा आहे. टिपणी, यादी, रोजनिशी, हकीगती, इ. त्रोटक वृत्तांत कथन व ऐतिहासिक लेखसंग्रह, संतचरित्रे, इ. चा समावेशही बखरीमध्ये केला जातो. महाराष्ट्रात मुसलमानी राजवट अस्तित्वात आल्यापासून या लेखन प्रकारास महाराष्ट्रात सुरूवात झाली असे म्हटले जाते. मुसलमानांच्या 'तवारिखा' पाहून मराठी लोकांनी बखरी लिहिण्यास सुरूवात केली.

रचनाकाळाच्या दृष्टीने महिकावतीची किंवा माहिमची बखर ही सर्वात जुनी बखर मानली जाते. मात्र जिच्यामध्ये इतिहासाचा काही अंश आढळतो अशी सर्वात जुनी बखर म्हणून 'शालीवाहनाची बखर' उल्लेखली जाते. महानुभावी लेखकांनी लिहिलेली सिंघणराज यादवांची बखर, हेमाडपंथी बखर तसेच राक्षसतागडीची बखर या बखरीची निर्मिती शालीवाहनाच्या बखरीनंतर झालेली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केल्यानंतर महाराष्ट्रात मराठी प्रशासनाचा प्रारंभ झाला. या काळापासून ते पेशवाईची अखेर म्हणजे इ.स. १८१८ पर्यंतच्या काळामध्ये सुमारे अडीचशे बखरींची निर्मिती झाली असल्याचे इतिहासकार राजवाडे सांगतात.

**इतिहास लेखनाचे साधन म्हणून बखरीची उपयुक्तता** : बखरीचे मुख्य तीन भाग किंवा वर्ग समजले जातात. राजकारणात्मक किंवा ऐतिहासिक बखर हा पहिला वर्ग. यामध्ये समकालीन व उत्तरकालीन राजकारणाचा इतिहास असतो. दुसरा वर्ग बखर सदृश्य ऐतिहासिक लेखनाचा तर केवळ बखर हे नाव असलेल्या लेखनाचा एक स्वतंत्र वर्ग असतो तो बखरीचा तिसरा वर्ग समजला जातो. या तिसऱ्या वर्गामध्ये सांप्रदायिक व पौराणिक बखरीचा समावेश असतो. या बखरीतील लेखन श्रद्धामय व धार्मिक स्वरूपाचे असल्याने त्यामध्ये ऐतिहासिक सत्याचे प्रमाण अत्यंत अल्प किंबहुना

ISBN 978-93-5196-698-2

नसतेच असे म्हटले तरी चालेल. उदा.समर्थांची बखर, कृष्णजन्माची बखर. एक व दोन वर्गातील बखरींचा विचार करता यामध्ये ऐतिहासिक सत्य ही बाब महत्त्वपूर्ण ठरलेली दिसते. विशेषतः समकालीन बखरीमध्ये ऐतिहासिक सत्याची विश्वसनीयता अधिक पटते. या प्रकारच्या बखरीत समकालीन राजकारणाचा इतिहास असतो. कोणतीही ऐतिहासिक घटना प्रत्यक्ष डोळ्यांपुढे घडल्याप्रमाणे बखरकार सांगत असतो. त्यामुळे ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने समकालीन बखरी अधिक विश्वसनीय ठरतात. वर्ण्य विषयाशी बखरनविसाचा प्रत्यक्ष परिचय असल्यामुळे या प्रकारच्या बखरीत खरा इतिहास येण्याची अधिक शक्यता असते.

प्राचीन काळात भारतीयांनी केलेले इतिहास लेखन फारसे आढळत नाही. मात्र या कालखंडात परकीय प्रवाशांनी भारताविषयी आपले अभिप्राय शब्दबद्ध केले आहेत. मेगॅस्थेनिस (ग्रीस), ह्युएनत्संग (चीन), अल्‌मसूरी (अरबस्थान), मनूची (ग्रेनीस) व वर्निअर (फ्रान्स) या परकीय लेखकांनी पत्रांच्या माध्यमातून भारताविषयीचे अभिप्राय मांडले आहेत. या अभिप्रायांची विश्वनियता बाजूला ठेवली तर परकीयांची ही प्रवासवृत्ते इतिहास लेखनाची उपयुक्त साधने असून इतिहास लेखनाच्या कामी त्यांचा बराच उपयोग झालेला आहे.

मध्ययुगीन कालखंडात मात्र भारतीय आणि परकीय या दोन्हीही घटकांकडून इतिहास लेखन झालेले आढळते. मुस्लीम राजवटीच्या काळात १३ व्या शतकात 'चचनामा' या मूळ अरबी ग्रंथाचे मुहम्मद अली बिन हमीद बिन अबू बकर कूफी या भाषांतरकाराने पर्शियन भाषेत भाषांतर केले. या ग्रंथामध्ये सिंध प्रांतावर केलेल्या स्वारींचे वर्णन आले आहे.तुर्की काळापासून इतिहासाचे खरे स्वरूप पहावयास मिळते. बाबर, जहांगीर व औरंगजेब, इ. मोगल सम्राटांची चरित्रे व आत्मचरित्रे प्रसिद्ध आहेत. दैनंदिन व्यवहारातील राजकीय पत्रव्यवहारांचे ऐतिहासिकदृष्ट्या संरक्षण करणे, दैनंदिन घटनांच्या नोंदी ठेवणे, ऐतिहासिक घटनांचा सुसंबद्ध इतिहास मांडणे तसेच बातमीपत्रे तयार करणे हे मुस्लीम राजवटीतील इतिहास लेखनाचे स्वरूप असल्याचे दिसते.

मध्ययुगीन कालखंडात भारताच्या विविध प्रांतामध्ये इतिहास लेखन झालेले दिसते. १२ व्या शतकात काश्मीरमध्ये 'राजतरंगिणी' हा कल्हणाचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. यामध्ये पाचशे वर्षापूर्वीचा इतिहास असल्याचे दिसते. प्रबंधचितोमणी व प्रबंधकोश या ग्रंथातून गुजरातमधील चालुक्य राजांच्या राजवटीच्या इतिहासाचे दर्शन घडते. राजस्थानमध्ये 'रासा' या ग्रंथ प्रकारात तेथील थोर व पराक्रमी व्यक्तींचे गुण संकीर्तन व ऐतिहासिक माहिती मिळते.

**बखर लेखन परंपरा व स्वरूप** :'खबर' या अरबी शब्दाचा विपर्यास होऊन बखर शब्दाची निर्मिती झाली आहे. खबर म्हणजे वार्ता, समाचार किंवा वृत्त, इ. प्रकारचे लेखन होय. बखर या शब्दाचा रूढ अर्थ राजकीय स्वरूपाचे ऐतिहासिक लेखन असा आहे. टिपणी, यादी, रोजनिशी, हकीगती, इ. त्रोटक वृत्तांत कथन व ऐतिहासिक लेखसंग्रह, संतचरित्रे, इ. चा समावेशही बखरीमध्ये केला जातो. महाराष्ट्रात मुसलमानी राजवट अस्तित्वात आल्यापासून या लेखन प्रकारास महाराष्ट्रात सुरूवात झाली असे म्हटले जाते. मुसलमानांच्या 'तवारिखा' पाहून मराठी लोकांनी बखरी लिहिण्यास सुरूवात केली.

इंग्रजी अंमलाच्या काळातही पौराणिक, मिशनरी चळवळी विषयक आणि ऐतिहासिक स्वरूपाच्या बखरींची निर्मिती झालेली दिसते. पौराणिक लोककथा लोकप्रिय करणे हा पौराणिक बखरींचा उद्देश होता तर मिशनरी लोकांचे उद्दिष्ट धर्मप्रसार करण्याचे होते. याच काळात सरकारी माहितीसाठी तत्कालिन सरदार व जहागिरदार यांच्या कौटुंबिक संक्षिप्त हकीगती तयार केल्या गेल्या.

**इतिहास लेखनाचे साधन म्हणून बखरीची उपयुक्तता :** बखरीचे मुख्य तीन भाग किंवा वर्ग समजले जातात. राजकारणात्मक किंवा ऐतिहासिक बखर हा पहिला वर्ग. यामध्ये समकालीन व उत्तरकालीन राजकारणाचा इतिहास असतो. दुसरा वर्ग बखर सदृश्य ऐतिहासिक लेखनाचा तर केवळ बखर हे नाव असलेल्या लेखनाचा एक स्वतंत्र वर्ग असतो तो बखरीचा तिसरा वर्ग समजला जातो. या तिसऱ्या वर्गामध्ये सांप्रदायिक व पौराणिक बखरीचा समावेश असतो. या बखरीतील लेखन श्रद्धामय व धार्मिक स्वरूपाचे असल्याने त्यामध्ये ऐतिहासिक सत्याचे प्रमाण अत्यंत अल्प किंबहुना नसतेच असे म्हटले तरी चालेल. उदा.समर्थांची बखर, कृष्णजन्माची बखर. एक व दोन वर्गातील बखरींचा विचार करता यामध्ये ऐतिहासिक सत्य ही बाब महत्त्वपूर्ण ठरलेली दिसते. विशेषतः समकालीन बखरीमध्ये ऐतिहासिक सत्याची विश्वसनीयता अधिक पटते. या प्रकारच्या बखरीत समकालीन राजकारणाचा इतिहास असतो. कोणतीही ऐतिहासिक घटना प्रत्यक्ष डोळ्यांपुढे घडल्याप्रमाणे बखरकार सांगत असतो. त्यामुळे ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने समकालीन बखरी अधिक विश्वसनीय ठरतात. वर्ण्य विषयाशी बखरनविसाचा प्रत्यक्ष परिचय असल्यामुळे या प्रकारच्या बखरीत खरा इतिहास येण्याची अधिक शक्यता असते.

बखरी समकालीन असोत अथवा उत्तरकालीन त्यामध्ये इतिहास कथन आणि ऐतिहासिक सत्याची विश्वसनीयता असणे आवश्यक असते. मुळात इतिहास लेखनासाठीच बखर हा लेखन प्रकार निर्माण झाल्याचे दिसून येते. डॉ. यु. म. पठाण म्हणतात, ''बखर या वाङ्मय प्रकाराचे अधिष्ठान इतिहास हेच होय. इतिहासाच्या आधारावरच बखरी लिहिल्या गेल्या. किंबहुना बखरकारांना त्यांच्या आश्रयदात्यांकडून इतिहास लेखनाचा आदेश दिला गेल्याचे आढळते.''[२] इतिहास लेखनाचा मुख्य उद्देश बखरी लेखनाचा असतो. मात्र इतिहासकार बखरीमधील इतिहासास ऐतिहासिक कागदपत्राइतकी मान्यता देत नाहीत. इतिहासाचार्य राजवाडे तर ऐतिहासिक पत्राचे एक चिठोरे देखील बखरीच्या संपूर्ण संभारास हाणून पाडण्यास पुरेसे आहे असे सांगतात. एकूणच इतिहासकारांच्या दृष्टीने बखरींना कमी महत्त्व दिले जाते असे दिसते. मात्र तरीही इतिहासकारांच्या संशोधनात बखरीचा महत्त्वपूर्ण वाटा असल्याचे दिसते.

बखरीचे लेखन हे पक्षनिष्ठेने झालेले असते. अनेक बखरकार हे राजाश्रित असल्यामुळे त्यांच्या बखरीचे स्वरूप प्रदीर्घ अन् एकांगीपणे झालेले दिसते. अशा लेखनात राजकीय जीवनातील घटनांचे कथन असते. हे लेखन कोणाच्या तरी आज्ञेने झाले असल्यामुळे त्या व्यक्तीचे गुणसंकीर्तन करणे हे बखरकाराकडून स्वाभाविकपणे घडते. उदा. सभासदाची बखर, चिटणीशी बखरी, भाऊसाहेबांची बखर, होळकर, दाभाडे, गायकवाड, आंग्रे, इ. सरदारांच्या कैफियती व हकीगती, इ. बखरीतून पक्षनिष्ठता व एकांगीपणा आला असल्याचे दिसते. स्वकीयांसंबंधी अभिमानाची भावना ही बहुतेक बखर लेखकांची भूमिका असते. त्यादृष्टीने महत्त्वाचा तेवढा मजकूर घेऊन त्यात कल्पना सौंदर्य, भाषा सौंदर्य निर्माण करून आपले पांडित्य, चातुर्य यांचा यथायोग्य वापर करून बखरी साधण्याचा त्याचा प्रयत्न असतो. लेखन कलेचे सर्व गुण त्याच्याकडे असल्यामुळे त्याच्या लेखनात जिवंतपणा येतो. मात्र हे लेखन समकाळात होत असेल तर त्यामध्ये शक्य तितकी विश्वसनीयता दिसून येते. त्यामुळे बखर लेखनातील ऐतिहासिक मूल्याच्या संदर्भातील दोष कमी व्हायला मदत होते. मराठी बखरीचे लेखन हे इतिहासाच्या शास्त्रीय भूमिकेतून होत नसले तरी विविध साधनांच्या आधारे केलेल्या त्यातील ऐतिहासिक घटनांच्या जुळणीत इतिहासाशास्त्रीय लेखनाचे अंग दिसून येते. ऐतिहासिक सत्यनिष्ठा, घटनांचे विश्लेषण व तद्भूत सिद्धांत हे इतिहास शास्त्राचे गुण बखरीमध्ये ध्वनीत झालेले दिसतात. भाऊसाहेबांच्या बखरीतून घटनांची जुळणी किती पद्धतशीर

झाली याचा प्रयत्य येईल.

बखरीमध्ये राजकीय, सामाजिक, कौटुंबिक, धार्मिक व सांस्कृतिक अशा विविध प्रकारचा इतिहास आढळतो. ऐतिहासिक कागदपत्रात न येणारा हा इतिहास बखरीत अधिक प्रमाणात मिळतो. भाऊसाहेबांच्या बखरीचा विचार करता या बखरीमध्ये पानीपतची घटना ऐतिहासिक व राजकीय घटना, मुडदे ओळखून त्यांची सार्थक करण्याची सामाजिक व धार्मिक घटना, फाल्गुन मासात लहानथोर व सर्वांनी रंग खेळण्याची सांस्कृतिक घटना तसेच बळवंतराव मेहेंदळे यांच्या पत्नीच्या शोकाची कौटुंबिक घटना या घटना म्हणजे सर्व इतिहासच आहे. डॉ.हेरवाडकरांनी तत्कालिन कागदपत्रे अन् बखरी यांच्यातील विश्वसनीयताच स्पष्ट केल्याचे दिसते. एकूणच बखर लेखनाच्या मर्यादा, दोष, उणिवा यांचा विचार करता काहीसा एकांगी, काल्पनिक, वर्णनात्मक असा असणारा लेखन प्रकार ऐतिहासिक प्रामाण्य किंवा सत्यता याबाबतही उपयुक्त ठरताना दिसतो. विविध ऐतिहासिक घटनांचा क्रम लावण्याकरिता बखरीइतके उपयुक्त साधन दुसरे कोणतेही नाही. म्हणूनच ऐतिहासिक साधन म्हणून बखरीला एक स्वतंत्र मूल्य प्राप्त झाल्याचे दिसून येते.

**सारांश** : भारतात इतिहास लेखनाची अतिप्राचीन परंपरा असल्याचे दिसते. वैदिक काळ, पौराणिक काळ, प्राचीन, मध्ययुगीन कालखंड या सर्वच काळामध्ये भारतामध्ये इतिहास लेखन झालेले दिसून येते. प्रारंभीच्या काळात ग्रंथातील प्रकरणे, उपप्रकरणे या साधनाद्वारे इतिहास प्रकटत होता. नंतरच्या काळात मात्र गद्य वा पद्य ग्रंथरूपाने इतिहास लेखन झालेले दिसून येते. मध्ययुगीन कालखंडात वृत्तांत लेखन, पत्रे, दैनंदिन्या, बातम्या, इ. साधनांच्या माध्यमातून इतिहास लेखन केलेले दिसते. बखरी संपूर्णपणे ऐतिहासिक सत्याच्या कसोटीला उतरत नसल्या तरी काही मर्यादेपर्यंत त्यांना इतिहास मानणे आवश्यक आहे. इतिहास लेखनाचे मुख्य लेखनगुण बखरीमध्ये प्रभावीपणे आढळतात. बखर लेखनात उपलब्ध साधनांचा अधिकाधिक उपयोग केल्याने बखरींना ऐतिहासिक मूल्य प्राप्त झाल्याचे दिसून येईल. इतिहासदृष्ट्या बखरीचे महत्त्व सिद्ध झाल्यामुळेच आज त्यांचा इतिहासात अंतर्भाव केलेला आढळून येतो. एकूणच बखरींना संपूर्ण ऐतिहासिक मूल्य नसले तरी इतिहास लेखनाचे बखर हे उपयुक्त साधन आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भ :**


१) डॉ. र. वि. हेरवाडकर, मराठा बखर, पृ. ९.

२) डॉ. यु. म. पठाण, कृष्णाजी अनंत सभासद विरचित सभासद बखर,
संपा. डॉ. यु. म. पठाण, स्नेहवर्धन पुणे, ९ मार्च २०००, पृ. ७.

३) मु. श्री. कानडे – प्रस्तावना
कृष्णाजी अनंत सभासद विरचित शिवछत्रपती चरित्र, संपा. डॉ. र. वि. हेरवाडकर,
आवृत्ती १ ली, १९८६, पुनर्मुद्रण– २०१४, व्हीनस प्रकाशन.

४) ल. रा. नसिराबादकर – प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन,
६ वी सुधारित आवृत्ती, १९९९, पृ. २४६.

५) डॉ. र. वि. हेरवाडकर, मराठी बखर, पृ. ३४.

ISBN 978-93-5196-698-2

# मद्रासमधील मराठी बखर वाङ्मय

डॉ. अरुण शिंदे
साहायक प्राध्यापक, मराठी विभाग,नाइट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर

**प्रास्ताविक :** 'बखर' हा मध्ययुगीन मराठीतील वैशिष्ट्यपूर्ण गद्यवाङ्मय प्रकार आहे. इतिहास आणि कल्पित यांचा मिलाफ झालेल्या या साहित्यप्रकारामधून तत्कालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनाबरोबरच भाषिक व वाङ्मयीन सौंदर्याचे दर्शनही घडते. वार्ता, समाचार, वृत्त या अरबी शब्दांचा विपर्यास होऊन बखर शब्दाची निर्मिती झाली असल्याचे मानले जाते. 'गद्यात लिहिलेला ऐतिह्य वृत्तांत' म्हणजे बखर. समकालीन बखरी, उत्तरकालीन बखरी, ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे लिहिलेल्या बखरी, धार्मिक, पौराणिक सांप्रदायिक स्वरूपाच्या बखरी आणि बखरसदृश्य लेखन असे बखरींचे स्थूलमानाने वर्गीकरण केले जाते. प्रत्यक्ष बखर हे नाव नसलेले परंतु बखरसदृश्य ऐतिहासिक स्वरूपाचे लेखन हा बखरींचाच एक महत्त्वाचा प्रकार मानला जातो. कैफियत, हकीकत, वाका, चरित्र, आत्मचरित्र इ. स्वरूपाचे लेखन या प्रकारात मोडते. 'कैफियत' या फारशी शब्दाचा अर्थ 'अथपासून इतिपर्यंत माहिती, हकीगत' असा आहे. मराठीमध्ये अनेक कैफियती लिहिलेल्या आढळतात. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मद्रासमधील मध्ययुगीन मराठी बखरी व कैफियतींची हस्तलिखिते व त्यांचे स्वरूप शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

**संग्रहक- कर्नल कॉलिन मॅकेंझी :** मद्रासच्या शासकीय प्राच्यविद्या ग्रंथालयातील हस्तलिखितांचा प्रचंड संग्रह हा कर्नल कॉलिन मॅकेंझी, डॉ. लेडन, सी. पी. ब्राऊन यासारख्या अधिकाऱ्यांच्या अविरत ज्ञानलालसेचे प्रचंड जिज्ञासेचे व अखंड परिश्रमशीलतेचे प्रतीक आहे. मॅकेंझी हा स्कॉटलंडमधील गणितात रूची असणारा एक तरुण. वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी कस्टम खात्यातील नोकरी सोडून तो ईस्ट इंडिया कंपनीत रुजू झाला व १८७२ साली भारतातील मद्रास प्रांतात आला. ईस्ट इंडिया कंपनीच्या लष्करातील एक शूर व हुन्नरी सेनानायक म्हणून तो प्रसिद्धीस आला. लष्करात असतानाच म्हैसूर, कर्नाटक या भागाचे प्रमाणशीर नकाशे तयार करण्याचे काम त्याच्यावर सोपविले गेले व त्याने ते इतके चोखपणे पार पाडले की, पुढे सबंध देशाचे नकाशे तयार करण्याच्या यंत्रणेवर 'सर्व्हेअर जनरल' म्हणून त्याची नेमणूक झाली. नकाशे तयार करण्यासाठी सर्वेक्षणाच्या निमित्ताने फिरताना त्याला भारतीय इतिहास, धर्म, संस्कृती यांचे दर्शन घडले. त्याने त्यांचा अभ्यास व संकलन केले. १८१५ पर्यंत त्याने १५६८ हस्तलिखित ग्रंथ, ६२१८ नाणी, ३००० ताम्रपट, ८०७६ शिलालेखांचे ठसे, २६१० देवळांची व मूर्तींची चित्रे जमा केली. जेथे मूळ कागद हाती येण्याची शक्यता नव्हती, तेथे त्याच्या नकला करून घेतल्या. हा प्रचंड उद्योग त्याने स्वतःची पदरमोड करून केला. १८२१ मध्ये त्याचा मृत्यू झाला. ईस्ट इंडिया कंपनीने त्याचा संग्रह खरेदी करून तो तीन भागात विभागून लंडन, कलकत्ता व मद्रास येथे पाठविला. त्यानंतरच्या इतर ब्रिटिश अधिकाऱ्यांनीही या संग्रहामध्ये मौलिक भर घातली. त्याचे जतन व संवर्धन काळजीपूर्वक केले. या ग्रंथालयामध्ये मराठी हस्तलिखितांचा दुर्मीळ खजिना संशोधकांची वाट पाहत आहे.

**मद्रासमधील मराठी हस्तलिखिते :**मद्रास विद्यापीठाच्या आवारात असणारे 'शासकीय प्राच्यविद्या ग्रंथालय' (Govt. Oriental Manuscripts Library) हे संग्रहालय म्हणजे संस्कृत, तमिळ, तेलुगु, मराठी आदी भाषांतील दुर्मीळ हस्तलिखितांचा, प्राचीन साहित्याचा शोध घेणाऱ्या संशोधकांसाठी अत्यंत महत्त्वाचे संग्रहालय आहे.या ग्रंथालयातील हस्तलिखितांची वर्णनात्मक सूची तामिळनाडू सरकारने तीन भागात प्रकाशित केली आहे. पहिल्या भागामध्ये निवडक ३०८ कैफियतींची माहिती आहे. दुसऱ्या भागात काही ऐतिहासिक आज्ञापत्रे, पत्रे, सनदा अशांसारख्या ऐतिहासिक कागदपत्रांची माहिती आणि तिसऱ्या भागात हस्तलिखित ग्रंथांची यादी दिली आहे. पहिल्या भागातील सर्वच कैफियती मोडी लिपीत

लिहिलेल्या आहेत. ग्रंथालयाने अभ्यासकांच्या सोयीसाठी प्रत्येक दप्तरास एक वर्णनात्मक क्रमांक आणि ते ज्यात समाविष्ट केलेले आहे, त्या भागाचा क्रमांक (ऊशीलीळश्रींश छीलशी अपव छीलशी जष तेर्श्रीश) देऊन सूची तयार केली आहे. हस्तलिखितांची एकंदर स्थिती व स्वरूप संक्षिप्त आशय, लेखकाचे नाव, प्रारंभीच्या व शेवटच्या काही ओळी असे या सूचीचे स्वरूप  आहे. या बखरी व कैफियतींमधून प्रामुख्याने मराठा साम्राज्याचा उदय, उत्कर्ष व अस्त आणि या साम्राज्यनिर्मितीस व विकासास साह्यभूत व्यक्ती, सरदार, राजे व राजघराण्यांचा इतिहास वर्णन केला आहे. त्यांचा कुलवृत्तांत, त्यांनी केलेली युद्धे, संघर्ष, त्यांचे जय-पराजय, त्यांची प्रदेश व व्यक्तींवरील पकड व त्यांचे परिणाम तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक जीवन वगैरेंचे दर्शन या बखरी व कैफियतींमधून घडते. काही कैफियतींमध्ये तीर्थक्षेत्रे व महत्त्वाच्या ठिकाणांचे वर्णन येते.

**कैफियती व बखरींचे स्वरूप :** मद्रासच्या प्राच्यविद्या ग्रंथालयात महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, गुजरात, उत्तर भारत आदी क्षेत्रांशी निगडित कैफियती व बखरींची हस्तलिखिते आहेत. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्राशी संबंधित कैफियती व बखरींचा परिचय करून दिला आहे. विषयानुसार बखरींचे वर्गीकरण स्थूलमानाने पुढीलप्रमाणे केले आहे. हे वर्गीकरण काटेकोर नसून फक्त आकलनसुलभतेसाठी आहे.

**राजकीय बखरी व कैफियती –**

**शिवपूर्वकालीन :**'शालिवाहनाची बखर' या नावाच्या दोन बखरी असून शालिवाहन राजांच्या कारकिर्दीचे वर्णन यामध्ये येते. देवगिरीचा संस्थापक रामराजा आणि त्याचा मंत्री हेमाडपंडित यांचे मूळ व इतिहास  'रामराजा देवगिरी बखरी'मध्ये येतो. हेमाडपंडित मोडीलिपीचा जनक असल्याचेही बखरीत स्पष्ट केले आहे. 'हेमाडपंताची बखर' असे नाव असलेल्या बखरीमध्ये हेमाडपंताबद्दल फारच थोडी माहिती येते. पन्हाळा किल्ल्याचे मूळ व इतिहास या संबंधी माहिती देण्यासाठी हेमाडपंताला आदिलशहाने विचारलेल्या प्रश्नापासून या बखरीचा प्रारंभ होतो. हेमाडपंताने त्या किल्ल्याची माहिती दिली आहे. 'विजयनगर कैफियती'मध्ये विजयनगरचे राजे व कृष्णदेवरायाचा राज्यकारभार यांचे वर्णन केलेले आढळते.

'अहमदशा हसनगंगु बामणी' नावाची कैफियत मोडी लिपीमध्ये असून तीत बामनी (बहामनी) राज्याचा संस्थापक अहमदशहा हसन गंगु बामिन याचा जन्म आणि इतिहास सांगितलेला आहे.

'चार युगांची राजे' या १७२ पृष्ठांच्या कैफियतीमध्ये मराठ्यांच्या उदयापासूनच्या इतिहासाची विस्तृत माहिती येते. प्रारंभी ऐतिहासिकदृष्ट्या कमी महत्त्व असणाऱ्या पौराणिक राजांच्या आख्यायिका येतात. पुढच्या भागामध्ये देवगिरी आणि मोडी लिपीचे मूळ, पुणे शहराचे मूळ, निजामशाही, आदिलशाही, ईमादशाही यांची संक्षिप्त माहिती येते. छ. शिवाजी महाराजांची कारकिर्द मराठेशाही, पेशवाई याची सविस्तर माहिती येते.

**शिवकालीन :** भोसले राजघराण्याशी निगडित तीन बखरी आहेत. 'भोसले यांची बखर' या बखरीत भोसले घराण्यातील राजांचे मूळ व इतिहास सांगणारी ३६२ पाने येतात. बाबाजी भोसले आणि त्यांचे विठोजी व मालोजी हे पुत्र (पहिला भाग) शिवाजी महाराजांचे जीवनचरित्र व राजकारण (दुसरा भाग) शिवाजी राजांचे खासगी जीवन (तिसरा भाग) याबरोबरच संभाजी, औरंगजेब वगैरेंचे इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाची माहिती या बखरीमध्ये येते. मोडी लिपीतील ही बखर चांगल्या स्थितीत आहे. 'भोसले यांची वंशावळी' ही कैफियत दोन भागात विभागलेला असून पहिल्यात भोसले घराण्यात इतिहास आणि दुसऱ्या भागात पेशव्यांच्या अधिपत्याखालील मराठा राज्याचा वृत्तांत येतो. प्रत्येक वर्षात घडलेल्या महत्त्वाच्या घटना कालक्रमानुसार वर्णन केलेल्या आहेत. इतिहासदृष्ट्या महत्त्वपूर्ण असणाऱ्या या कैफियतीमध्ये शिवाजी महाराजांच्या बालपणापासून शाहूंच्या नेतृत्वाखालील मराठा राज्याच्या पडझडीची माहिती येते. 'भोसले यांची वंशावळी' या तिसऱ्या कैफियतीमध्ये १३२ पृष्ठे असून भोसले व जाधव घराण्याचा इतिहास, शिवशाही, पेशवाई आदींचे तपशीलवार उल्लेख

केलेले आहेत. 'मालोजी भोसले कैफियत'मध्ये मालोजीचे धाडस व शौर्य येते. शहाजीपासून संभाजीच्या मृत्यूपर्यंतचा इतिहास 'शाहाजी राजाची कैफियत'मध्ये येतो. शिवकाळातील अनेक महत्त्वाच्या घटना-घडामोडींचे तपशीलवार वर्णन आढळते.

'शाहु राजाची उत्तपती' या कैफियतीमध्ये संभाजीपुत्र शाहूचे चरित्र व पेशव्यांचा संक्षिप्त इतिहास येतो. 'शाहु राजे व निजाम मुल्लमुलक कैफियत' ही शाहूचे शेवटचे दिवस, मराठ्यांची स्थिती, दक्षिणेच्या व कर्नाटक प्रांताच्या निजाम उल मुल्काची स्वारी या इतिहासाशी निगडित आहे. शाहू आणि कोल्हापूरचा राजाराम यांच्यातील वारसायुद्धाचे वर्णनही केलेले आहे. 'शाहु राजाची माहिती' या कैफियतीमध्ये भोसले घराणे, मराठा राज्य, शाहू चरित्र व पेशवाईतील मराठा साम्राज्याचे तपशीलवार वर्णन येते. यास शाहू कैफियत असे म्हटले असले तरी एकूण मराठ्यांच्या इतिहासाशी ती संबंधित आहे.

ग्रँट डफने लिहिलेल्या 'मराठ्यांचा इतिहास' या इंग्रजी ग्रंथाचा कॅ. डेव्हिड कॅफेन यांनी १८३० मध्ये केलेला अनुवाद 'मराठ्यांची बखर' या नावाने प्रसिद्ध आहे. पहिल्या भागात ३३ प्रकरणे व १९२ पाने आहेत तर दुसऱ्या भागात १६८ पृष्ठे आहेत.

**पेशवेकालीन बखरी :** 'मराठे व पेशवे' या कैफियतीमध्ये मराठ्यांचा इतिहास आणि पेशव्यांचे सत्ताग्रहण यांच्याशी निगडित वर्णन येते. घटना-प्रसंग कालानुक्रमाने योजिलेले असून महिने व तारखा यांचा उल्लेख आहे.

'पेशवे यांची कैफियती'चे दोन भाग असून पहिल्या भागात भोसले घराण्याचा कुलवृत्तांत व इतिहास येतो. दुसऱ्या भागात पेशवाईचा उदय व त्यांचा इतिहास विस्ताराने येतो. लेखकाचे नाव, माहितीचे मूळ नमूद केलेले नाही. 'पेशवे यांची वंशावळ'मध्ये पेशव्यांची माहिती येते. 'बखर सवाई माधवराव' मध्ये सवाई माधवराव यांच्या सैन्यदलातील तपशील, खेड्यातून जमा होणारा महसूल, सैनिकांचा पगार, जहागिरी वगैरेंची माहिती येते. पेशव्यांच्या मूळ हिशोबवह्यांतून हा सर्व मजकूर नकलून घेतला असल्याचे कैफियतीच्या अखेरीस सांगितले आहे. 'नानासाहेब कैफियत' ही मोडी लिपीत ३६ पृष्ठांची असून मराठ्यांच्या इतिहासातील नानासाहेब, विश्वासराव आणि इतर महत्त्वाच्या दृष्टीने ही बखर महत्त्वाची आहे. नाना फडणवीसांच्या राजकारणाची माहिती नाना फडणवीसांची पत्रे या कैफियतीमध्ये येते.

पानिपतच्या युद्धावर मोडी लिपीमध्ये दोन बखरी आहेत. इंदूराव घोरपडे याला रघुनाथराव, जाधवराव चित्रगुप्त यांनी लिहिलेल्या पत्राच्या रूपातील निवेदन एका बखरीमधून येते. मराठे व अब्दाली यांच्यात झालेली युद्धे, सैन्याचे नेतृत्व करणारे दोन्ही बाजूचे सेनापती, सरदार यांची नावे येतात. दुसऱ्या बखरीमध्ये सदाशिवराव भाऊ व विश्वासराव यांची युद्धातील भूमिका, सैन्याच्या हालचाली वगैरेंची माहिती येते. पानिपत येथे झालेल्या मराठा व मागल युद्धाचे तपशीलवार वर्णन 'भाऊगर्दी-पानिपत कैफियत'मध्ये येते.

'शिंदे कैफियती'मध्ये शिंदे घराण्याचे मूळ व इतिहासाबरोबरच पेशवाईतील मराठा साम्राज्याचा इतिहासही येतो. सावजी शिंदे हा शिंदे घराण्याचा पहिला पुरुष. त्याचा मुलगा राणोजीने साताराचे राज्य उभे करण्यात मोठी भूमिका बजावली. पुढे पानिपत सोनपत च्या लढाईत दत्ताजी शिंदे यांचे शौर्य, पेशव्यांची राजवट आदींची माहिती येते. 'सिंदे कैफियत'मध्ये शिंदे घराण्याचे मूळ व इतिहास वर्णिलेला आहे.

'घोरपडे सोंडूर कैफियती'च्या मोडीलिपीतील दोन प्रती उपलब्ध असून सोंडूर संस्थानाच्या घोरपड्यांचा उदय व इतिहास या कैफियतीमध्ये येतो. 'सोंडुर घोरपडे कैफियती'मध्ये सोंडूर व तेथील मराठा राज्यकर्त्यांचा इतिहास येतो. सोंडूर संस्थानाचा संस्थापक मुराराव घोरपडे यांनी संताजी घोरपडे यासह केलेला क्षेत्रविस्तार, मुरारराव-त्यांच्या वंशजांचा इतिहास, हैदर व टिपू यांची स्वारी, सोंडूरवरील संकट, सवाई माधवरावांची मदत आदींचा वृत्तांत येतो.

'मराठी (लोकांची) अडनावाची बखर' ही वैशिष्ट्यपूर्ण असून शिंदे, घोरपडे, भोसले, होळकर, पवार आदी मराठा घराण्यांचा कुलवृत्तांत व इतिहास वर्णिलेला आहे.

'मैसुर कैफियत'मध्ये म्हैसूरचे मूळ, तेथील राजघराणी, ओडियार राजे, म्हैसूरवर मोघल व मराठे यांनी केलेल्या स्वाऱ्या, कावेरी नदीला घातलेले बांध व घाट, तेथील शेतकऱ्यांना मराठ्यांनी केलेली मदत आदींचे वर्णन केलेले आहे. म्हैसरूशी निगडित आणखी दोन कैफियती उपलब्ध आहेत. टिपू सुलतान च्या कारकिर्दीवर मोडी लिपीमधून पाच बखरी आहेत. टिपूची आज्ञापत्रे, राज्यकारभारपद्धती, प्रजेसंदर्भातील धोरण आदींची माहिती येते.

**भौगोलिक/क्षेत्रवर्णनपर कैफियती :**एखाद्या विशिष्ट ठिकाण, स्थळ येथील भौगोलिक, राजकीय, सांस्कृतिक इतिहास या प्रकारच्या बखरींमध्ये आलेला आहे. 'वेरूळ घृष्णेश्वर माहिती' ही कैफियत विजापूर आणि दौलताबाद या शहरांशी निगडित आहे. ती चार भागात विभागलेली असून पहिले दोन विभाग विजापूरशी तर उरलेले दोन दौलताबादशी निगडित आहेत. घृष्णेश्वर मंदिराच्या भिंतीवरील शिलालेखातील मजकूर यात उद्‌धृत केलेला आहे.

'अहमदनगर कैफियत' ही मोडी लिपीमध्ये असून अहमदनगर किल्ल्याची निर्मिती आणि इतिहास पूर्ण स्वरूपात आलेला आहे. हे मोठे शहर रामदेवाच्या कारकिर्दीत एक छोटे खेडेगाव होते, हे या कैफियतीच्या प्रारंभीच स्पष्ट केलेले आहे. अहमद निजामशहाने रामदेवाचा पराभव करून या खेड्याच्या अंतर्भागात किल्ला बांधला व त्याला आपल्या वडिलांचे नाव दिले. अनुक्रमे मोगल, मराठा आणि इंग्रज यांनी केलेल्या स्वाऱ्यांच्या वेळेचा तपशील या किल्ल्याचा इतिहास मोठ्या तपशीलवार रेखीवपणे सांगितला आहे. अहमदनगरच्या राजघराण्याचा परिचय ही कैफियत करून देते.

पुणे शहराचा इतिहास चार कैफियतींमधून येतो. 'पुणे कैफियत'मध्ये पुणे शहर व उपनगरांचा इतिहास, मंदिरे व महत्त्वाची ठिकाणे याचे वर्णन पहिल्या भागामध्ये येते. मलिक अंबर याने पुणे येथे प्रवर्तित केलेली वजन मापे, नंतर शिवाजीने व पेशव्यांनी त्यांच्या परिमाणात केलेले बदल यांविषयीचा वृत्तांत दुसऱ्या भागामध्ये येतो. मराठ्यांची महसूलव्यवस्था, अधिकारी आणि शिवकाळात अधिकाऱ्यांना प्राप्त झालेली आडनावे, किताब वगैरेंचे वर्णन तिसऱ्या व चौथ्या भागात येते. ही कैफियत अपूर्ण असून लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ किंवा तारीख यांचा उल्लेख नाही. पुणे शहराच्या वसाहतीकरणापासून वसईचा तह आणि दुसऱ्या बाजीरावाचे पेशवेपद इथपर्यंतचा तपशीलवार वृत्तांत 'पुणे पेठ कैफियत'मध्ये येतो. तसेच मराठा सरदारांच्या घराण्यांचा व कर्तृत्वाचा इतिहास, विजयनगर, पाच सुलतान, कर्नाटकचे नवाब, हैदर अलीखान, टिपू सुलतान, शिवाजी महाराज, मराठा सरदार, पेशवाई असा इतिहासदृष्ट्या महत्त्वाचा काळ व घटना मोठ्या विस्ताराने वर्णिलेल्या आहेत. लेखकाचे नाव व माहितीचे मूळ दिलेले नाही. त्याच नावाच्या दुसऱ्या दोन कैफियतींमध्येही साधारणतः पुणे शहर व उपनगरांच्या उभारणीपासून मराठेशाही व पेशवाईची माहिती येते.

'सातारा राजांचे कैफियती'मध्ये सातारा येथे राज्य केलेल्या राजघराण्यांची माहिती येते. मराठा गादीबद्दल राजाराम व सातारा यांच्यात झालेला संघर्षही येतो. पेशव्यांच्या काळातील सातारा व पुणे यांच्यातील संबंधांचे वर्णनही येते.

'उज्जेयनी राजे लोकांची कैफियत'मध्ये अजमेरला राज्य केलेल्या काही राजांची नामावली दिलेली आहे. कैफियतीच्या दुसऱ्या भागामध्ये मराठेशाहीतील नाना फडणवीसांसारखे प्रमुख कारभारी आणि इतर महत्त्वाच्या व्यक्ती यांची माहिती दिलेली असून त्यांना अजमेरच्या मोगल राजांवर केलेल्या चढाया, संघर्ष, लढाया यांविषयीची माहिती दिलेली आहे.

'औरंगाबाद उर्फ सुभे खुजस्ते बुनिया' या मोडी लिपीतील २६७ पृष्ठांच्या बखरीमध्ये औरंगाबाद, जालनापूर, सोलापूर आणि अहमदनगर या जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुके-महालांतील खेड्यांमधून आकारल्या जाणाऱ्या करांची माहिती येते.

'गोकर्णेश्वर कैफियत'मध्ये गोकर्णेश्वर-महाबळेश्वर या स्थळाचा उगम आणि इतिहास या कैफियतीमध्ये येतो. 'पंचवटी कैफियत'मध्ये नाशिक व त्र्यंबकेश्वर यांचे स्थानिक इतिहास हेमाद्री पंडितांचे चरित्र, गंगा व गोदावरीचे जलप्रवाह वगैरेंचे वर्णन येते. पंचवटी कैफियत या नावाच्या दुसऱ्या एका कैफियतीमध्ये देवगिरीच्या यादव राजांच्या इतिहासाबरोबरच ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या व्यक्तींचे तपशील, काही तीर्थक्षेत्रे व नद्या यांची माहिती येते. 'लोहदंड उर्फ पंढरपूर क्षेत्र कैफियत'मध्ये विठोबा, पुंडलिक, नामदेव, ज्ञानदेव, तुकाराम, मंदिराला देणग्या देणारे मराठा राजे, व्यक्ती, पंढरपूरची भौगोलिक रचना आदींचे वर्णन येते.

**जैन कैफियती :**'जाविता सिरस्ते दप्तर बादशा विजापुर' या कैफियतीमध्ये पहिला जैन राजा व त्याचे वारस यांचा उदय आणि इतिहास येतो. 'जैनमहाचि कैफियत' या मोडी लिपीतील कैफियतीमध्ये मोठ्या संख्येने कानडी वाक्प्रचार व वाक्ये येतात. ही चार भागात विभागलेली आहे. पहिल्या दोन भागांत कर्नाटकातील जैन मठांची निर्मिती व इतिहास सांगितलेला असून उरलेल्या दोन भागात जैन धर्ममतांच्या काही पाठीराख्यांचा इतिहास दिलेला आहे. जैन धर्म व जैन साहित्याच्या अभ्यासकांना दुर्मीळ माहिती या कैफियतीमधून मिळू शकते.

**जातिजमातींवरील कैफियती :**'महाराष्ट्र ब्राह्मणांची पाच जातीची कैफियत' ही मराठी ब्राह्मण जातीतील भिन्न भिन्न उपजातींशी संबंधित आहे. या उपजातींची नावे, त्यांचे मूळ व इतिहास, त्यांच्या सवयी, चालीरीती, जीवनपद्धती, देवदेवता, व्यवसाय यांचे वर्णन केलेले आहे. कैफियतीचा शेवट असा आहेः ''ब्राह्मणाचे घरीचे मुलीस वरहाड करून घेतात. परंत

त्याचे मुलीस चितपावन ब्राह्मणास देत नाहीत. वरकड गोरगरीब आपल्यास त्या गोत्रातच समध करितात.'' अशा सामाजिक समजुती, ग्रह यांची माहिती आणखी अनेक कैफियतीत आहे. याच पद्धतीची माहिती 'महाराष्ट्र ब्राह्मणांची कैफियत' या दुसऱ्या एका कैफियतीमध्ये येते.

'बेडर लोकांची कैफियत'मध्ये बेडर (की बेरड?) जमातीतील चालीरीती, सण-उत्सव, व्यवसाय-धंदे ही कैफियत स्पष्ट करते. हे बेडर म्हणजे जंगलातील आदिवासी असे सांगितले आहे. शिकारी वंशातील चार संघटित जमातींबद्दलची जास्त माहितीयात दिलेली आहे. शूद्र जमातीतील पुरुषांप्रमाणेच या बेडर वंशातील स्त्रिया वेशभूषा करतात असे कैफियतीच्या अखेरीस सांगितले आहे. लेखकाचे नाव किंवा माहितीचे मूळ निर्देश केलेले नाही.

**समारोप :**

मद्रासच्या प्राच्यविद्या संग्रहालयातील मराठी हस्तलिखितांमध्ये आजवर अप्रकाशित कैफियती व बखरी मोठ्या संख्येने आहेत. मध्ययुगीन महाराष्ट्राचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक व वाङमयीन इतिहास त्यांमध्ये दडलेला आहे. येथील बखरवाङ्मय मोडी लिपीमध्ये आहे. या हस्तलिखितांचे संग्राहक कर्नल मॅकेन्झी व रेव्ह. टेलर या ज्ञानपिपासू इंग्रजांनी आपल्या पदरी मराठी भाषा आणि मोडी लिपी जाणणारे आनंदराव, नारायणराव रंगाप्पा यांसारखे विद्वान बाळगले होते. जेथून मूळ हस्तलिखिते मिळाली नाहीत, तेथून त्यांच्या नकला करण्यात आल्या. अनेक कैफियतींमध्ये नक्कल करणारांचे नाव, नकलेचे वर्ष यांचे उल्लेख असले तरी मूळ लेखकांचे नाव-गाव, त्यांचा काळ यांची माहिती दिलेली नाही. त्यामुळे त्यांचा मूळ कर्ता व त्यांचा लेखनकाल अज्ञात राहतो. या सग्रहालयातील काही हस्तलिखिते पूर्ण व चांगल्या स्थितीत आहेत तर काही अपूर्ण व खराब अवस्थेत आहेत. राजकारण, शासनव्यवहार, सामाजिक स्थिती, भूगोल, देवस्थाने अशा अनेकविध विषयांवरील हा बखरींचा संग्रह अपूर्व म्हणावा लागेल. मोडीतज्ज्ञ इतिहास संशोधकांनी या बखरींचा व कैफियतींचा अभ्यास व अनुवाद केल्यास मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाचे अनेक नवे संदर्भ उजेडात येतील. काही सन्माननीय अपवाद वगळता या हस्तलिखितांचा अभ्यास इतिहास व वाङ्मय क्षेत्रातील अभ्यासकांनी अद्याप केला नाही. अनेकांनी ही हस्तलिखिते पाहिलेलीही नाहीत. त्यांच्या अध्ययनाने या दोन्ही अभ्यासक्षेत्रात मूलभूत स्वरूपाची नवीन भर पडेल.

संदर्भ


1. जोशी वसंत (संपा.)ः मद्रासची मराठी हस्तलिखिते, राज्यमराठी विकास संस्था, मुंबई, १९९६.
2. जोशी वसंत (संपा.)ः त्रिवेंद्रमची मराठी हस्तलिखिते, राज्यमराठी विकास संस्था, मुंबई, १९९६.
3. जोशी वसंत (संपा.)ः दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास- तंजावर खंड, राज्यमराठी विकास संस्था, मुंबई.
4. धनपलवार माणिक : दाक्षिणात्य साहित्यसंस्कृतीचा मराठीशी अनुबंध, राज्यमराठी विकास संस्था, मुंबई, १९९७.

ISBN 978-93-5196-698-2

# बखर वाङ्मयातून दिसणारे तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब

**प्रा. लोहीता रेडेकर**
सहाय्यक प्राध्यापिका , मराठी विभाग, निओरा महिला महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**सारांश :** मराठी शाहीच्या निर्मितीनंतर उदय पावलेल्या आणि मराठीशाहीच्या अस्ताबरोबरच नाहीसा झालेला 'बखर हा मध्यमयुगीन मराठी वाड्मयाच्या इतिहातील वैशिष्यपूर्ण असा वाड्मय प्रकार आहे. गौण म्हणून का होईना परंतु इतिहास पंडितांनी स्विकारलेले इतिहासाचे एक साधन म्हणून तर या वाड्मयाचे एक महत्वाचे स्थान आहेच. परंतु त्याहीपेक्षा शिवकाल आणि पेशवे काळामधला उदय वाड्मयातील बखरीची योग्यता केवळ अपूर्व आहे. मुसलमानांमध्ये तवारिखा लिहीण्याची पध्दत होती. त्यामुळे उदयात लिहलेला ऐतिहासिक वृत्तांत म्हणजे बखर होय.

**मराठीशाहीच्या पराक्रमाचे नंदादीप :** सुमारे १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात पारतंत्र्याचे मध्ययुग संपून स्वातंत्र्याच्या दृष्टीने नवयुगाची सुरूवात झाल्याचे पाहावयास मिळते. या शतकाच्या उत्तरार्धात स्वराज्याची स्थापना होऊन मराठीला राज्यभाषेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे मराठ्यांच्या पराक्रमाचे पोवाडे साहित्यात अवतरले. तसेच त्यांच्या कर्तृत्वाचे दर्शन देखील गद्य स्वरूपात आपल्याला घडू लागले. या दृष्टीने शिवकाल व पेशवेकाल हा अत्यंत कलात्मक व तेजस्वी ठरला आहे. राष्ट्रीय भावनेने कालखंड भारला होता हे जसे पहावयास मिळते तसेच अनेक आक्रमणांमुळे सारा समाज भरडून निघाला होता. त्याचे कारूण्यही पहावयास मिळते. पण तशाही स्थितीत विलक्षण भाबडी बालबोध अशी पक्षनिष्ठा, या साऱ्याविषयी वाटणारी आत्मीयता आणि स्वकियाबद्दल वाटणारा अभिमान या साऱ्यांचे दर्शन बखर वाड्मयात आपणाला घडते. मराठी गद्य सारस्वतांच्या इतिहासातील बखर वाड्मयाचे स्थान या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे या बखरींचा अभ्यास केवळ इतिहास म्हणून करण्यापेक्षा मराठीशाहीतील गद्य सारस्वताचा एक नमुना म्हणून केला, तर भाषेच्या सौंदर्याने संपन्न भांडारच आपल्या समोर उघडे होते. त्या गरजेतून बखरींची निर्मिती झाली आहे. सद्यस्थितीतील मराठ्यांच्या या ऐतिहय वृत्तांत्ताचा आढावा घेताना इतिहासातील वेगवेगळ्या घटना व प्रसंगावर आधारीत अशा सुमारे अडीचशे इतक्या बखरी लिहिल्या गेल्याचे आहेत. अगदी इंग्रजी आमदानातही काही पौराणिक, मिशनरी, चळवळीविषयक आणि ऐतिहासिक बखरीही लिहिल्या गेल्या आहेत.

**उदादत्त विचार व कर्तृत्व :** बखरीतील प्रसंगचित्रे, व्यक्तिचित्रणे, अत्यंत उत्तम भाषेत रेखाटली आहेत. परमेश्वराने यश दिले तरी उत्तम, नाही दिले तरी पुन्हा तुमची-आमची भेट स्वर्गात होईल. असे निरवानिरवीचे उद्‌गार पत्नीजवळ काढून युध्दात जिद्दीने उतरणारे बळवंतराव मेहंदळे, आणि उत्तम आहे शतवर्षात केव्हा तरी मरावे, त्यास या संग्रामात मुक्ति आली तरी बहुत बरे झाले चिंता याची कशाला करावी तुम्ही लौकिक करून गेलात तरी मी ही वाचणार नाही असे उत्तेजनपर तेजस्वी उत्तर देणारी बळवंतरावांची पत्नी, ' बचेंगे तो और भी लढेंगे ' असे रणांगणावर लढताना धारातिर्थ पडलेले दत्ताजी शिंदे जिध्दीने प्रत्युत्तर देतात. वाटा तरी शुराचा उचलला आहे, पण वाण सतीचे घेतले आहे ते सांभाळावे. तसेच धर्मशास्त्र सुध्दा असे ठणकावून कर्तव्याची जाणीव करून देणारी गौतमाबाई (मल्हाररावांची पत्नी) अशी बखरीतील व्यक्तिचित्रणे जिवंत आणि वक्तव्याला तेजस्वी कर्तृत्वाची उदात्त अशी जीवननिष्ठेची धार आहे. भाऊसाहेबांनी सैनिकाचे पैसे भागविण्यासाठी दिल्लीचे सोन्याचे छत पाडले. पतिनिधनामुळे दु:खी झालेली बळवंतरावांची पत्नी आपल्या मुलाला

(आप्पारावाला) भाऊसाहेबांच्या ओटीत टाकून सती जाते. भागीरथीबाई पति निधनाचे दु:ख घोटून शोकाकूल प्रश्न विचारणाऱ्या जानकोजीला बाबा, तू रडतोस काय? जयाजी शिंदे यांचे पोटी चौघी लेकी झाल्या तशीच तू एक झाली असतीस तर आणखी एक जावाई आला असता, असे उत्तर दिले. अशा कितीतरी प्रसंगातून उग्रभीषण जीवननाट्याचे प्रखर दर्शन घडते. हे प्रसंग आणि व्यक्तिचित्रे यांचे रेखाटन करताना त्यांच्याशी इतका समरस होतो की, त्यामुळे या प्रसंगातून त्याचा आत्मविष्कारही घडतो. दिल्लीहून बादशहाची फौज निजामावर चालून आली असता त्याने छत्रपती शाहूकडे मदत मागितली तेव्हा याची तजवीज कशी करावी असा प्रश्न शाहूस पडला, त्यावेळी बाजीरावाने उत्तर केले, मोगल म्हणजे काय? आज्ञा झाली असता मोठ्या काळाच्या तोंडात देखील जाऊन सरकारचे पुण्यप्रतापेकरून त्यांचा बंदोबस्त करून येऊ तेथे मोगलांची काय कथा? या उद्‌गारात बाजीरावाची स्वामिनिष्ठा आणि आत्मविश्वास दिसून येतो. शिवाय त्यातील आवेश शैलीदृष्ट्या परिणामकारक झाला आहे. आत्मगौरव मनावर ठसतो. बाजीरावाची निजामभेट झाल्यावर नबाब बोलतात, एक बाजी सब पाजी, हे श्रीमंतांनी ऐकून श्रीमंत नबाबांस बोलले, एक निजाम सब हजाम, यातील निजामाच्या उद्‌गारात त्याचा अहंगंडात्मक कृतघ्नपणा जसा दिसून येतो तसे बाजीरावाच्या उद्‌गारात त्याचे हजरजबाबी बुध्दीचातुर्य दिसून येते. यात विरोधाने उभयतांच्या शाब्दिक देवाण-घेवाणाला कलात्मक समतोल प्राप्त झाल्यामुळे त्यात वाङ्मयीन सौंदर्य निर्माण झाले आहे.

**राजेघराण्यातील लग्न समारंभ :** लग्न करताना ब्राम्हण व कारकून मुली पाहण्यास जात. सुलक्षणी, रास, नक्षत्र, छत्तीस गुण जुळतात का नाही पाहूनच होकार कळवत लग्नाचा मुहूर्त पाहून 'जानवशघर ' म्हणजे वऱ्हाडी मंडळी उतरण्यासाठी दिलेले घर दिले जात असे. जानवशघर हा शब्द अजूनही समाजात रूढ आहे. मग शहरात लग्नाचे अमंत्रण दिले जात असे. सरकारी मंडळी मुत्सुद्दी मंडळी, कारभारी, सरदार व पुण्यात मुक्कामाला असणारे मामलेदार इत्यादी आमंत्रणे दिली जातात. नंतर देवकस्थापना होऊन, लग्नापूर्वी वराकडून दिली जाणारी देणगी, वधूकडून वराकडे द्यावयाचे पदार्थ (रूखवत) वरप्रस्थान होत असत. लग्न दिवसा होत, अंबारीतून बसून सरकारची स्वारी नवरीच्या मंडपात वाजत-गाजत येत असे. त्यांच्या पाठीमागून पायी चालत सरकारी कारभारी, प्रमुख व्यक्ती, पोशाखात असत. हत्तीच्या मागे बायकांचा समुदाय, त्यांच्या मागे कारभारी यांचा समुदाय असे मिरवत - मिरवत खाजगीवाले त्यांचे वाड्यात स्वारी दाखल झाली. नंतर लग्न सोहळा होऊन, विवाह होम झाल्यानंतर सर्वांना भोजनास आमंत्रण दिले जाते. दुसऱ्या दिवशी सोऱ्यांकडील सारी मंडळी भोजनास जातात. त्या दिवशी मिरवत-मिरवत सरकारची स्वारी वाड्यात दाखल होते. त्यानंतर सर्वांना मेजवाणी करून सर्वांचे आहेर आले होते ते परत दिले जातात लग्नाची दक्षिणा रमण्यांत वाटली जाते. अशा पध्दतीने विवाह सोहळा पार पडला जातो.

**देवदेवतांवर श्रध्दा :** महाराष्ट्राच्या या मंगल भूमीत अेक दैवते वास करून आहेत. त्याचबरोबर भक्तांची मांदियाळी देखील प्रचंड आहे. उन्मनी अवस्थेला पोहोचलेल्या भक्तांच्या भेटीसाठी परब्रम्ह ह्या भूमीवर अवतरले आहे. मात्र एका समशेर बादशहाच्या भक्तीवर प्रसन्न होऊन आदिमाया त्याच्या घरापर्यंत पायी चालत आल्याची घटना फक्त रंभाजीराव निंबाळकरांच्याच बाबतीत घडली असावी. आजही या संदर्भात एक दंतकथा करमाळ्याच्या कमलादेवीच्या बाबतीत सांगितली जाते.

रंभाजीराव हा क्षात्रतेजस्विनी तुळजाभवानीचा परमभक्त होता. रंभाजीराव आई जगदंबेच्या दर्शनासाठी दर पौर्णिमेला तुळजापुरला जात असे. कालांतराने शरीर थकले. तेव्हा राजास देवीने दृष्टांत दिला, तो असा की, लेकरा, 'मी

तुझ्या मागुनी तुझ्या गावापर्यंत चालत येइेन मात्र तू मागे वळून पहायचे नाही. आणि पाहिलेस तर मी तेथेच थांबेन ‘ रंभाजीच्या आनंदाला पारावार राहिला नाही. आई जगदंबेला कबुली देऊन तो चालू लागला. रंभाजीराव पुढे आणी जगन्माता त्याच्या मागे.. असा प्रवास सुरू झाला. शहराला जवळ आल्यावर मानवी स्वभावातील साशंक वृत्तीने राजाने मागे वळून आई येते किंवा नाही हे पाहिले. झाले, आईसाहेब तेथेच थांबल्या शहराच्या पूर्वेला दूर एका माळावर ! तिथेच रंभाजीरावाने आदिभक्तीचे प्रचंड कलापूर्ण मंदिर उभे केले. ही तुळजापूराहून आलेली देवी ही तुळजाभवानीची भगिनी मानली जाते आणि म्हणूनच तुळजापूरास गेलेला भक्त नंतर करमळ्याच्या देवीच्या दर्शनास येतो. रावरंभा याने तिच्यासाठी लिहिलेल्या आरत्यासुध्दा प्रसिध्द आहेत. ही आदिशक्ती, आदिमाया, जगदंबा तिचा रावरंभा दास झाला आहे. आणि त्याचाच उद्धार करण्यासाठी आणि त्याचा वंश पावन करण्यासाठी ती ही तुळजापूरहून करमाळयास आलेली आहे. अशी अख्यायिका प्रचलित आहे.

ह्या देवीचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे यात्रेच्यावेळी वाहनवाल्यांची खरी परीक्षा असते. ती नगारखान्याच्या खाली असलेल्या वेशी मध्ये! कारण खांद्यावर पेलून धरलेल्या हत्तीची अंबारीसह उंची वेशीच्या उंचीपेक्षा जास्त होते. यावेळी इतर छोटी चार वाहने मागे थोड्या अंतराने उभी राहतात आणि देवीचा हत्ती पुढे ढकलला जातो. ‘सदा आनंदीचा उदे या घोषात वाहनवाले त्यांच्या खांद्यावरील जड वाहनाच्या दांड्या एका समयावच्छेद करून तळहातावर घेवून चक्क खाली बसतात आणि बसूनच पुढे सरकू लागतात व वेस पास केली की पालखीच्या शब्दासारखे वाहनवाले पुन्हा उभे राहतात व वाहन खांद्यावर घेवून स्थिर करतात. या कालात वाहन वाल्यांच्या आरोळ्यांनी वातावरण भरून जाते आणि पाहणाऱ्यांच्या अंगावर शहारे येतात. मध्यरात्री वेशीबाहेर जाताना व पहाटे वेशीच्या आता येताना अशा दोन वेळा हा रोमांचकारी प्रसंग यात्रेच्यावेळी पहावयास मिळतो.

अर्थात यात्रेशिवाय इतर वेळी ही कसबी वाहनवाली मंडळी उपेक्षितच असतात. हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. पण त्यांचा त्यांना ना खेद ना खंत, आपले दृढ निष्ठेने हे काम वर्षानुवर्षे पार पाडत आहेत.

**९६ कुळीच्या मराठ्यांचा कुलाभिमान :** मंदिराची रचना कसाना निंबाळकरांनी सर्वत्र ९६ या संख्येची योजना केलेली दिसते. मुख्य देवालयाभोवती आत व बाहेरील ओवऱ्या ९६ आहेत. ज्यांच्यावर मुख्य देवालय आधारलेले आहे हे खांब ९६ आहेत. दीपमाळेच्या पायऱ्या ९६ आहेत. मंदिराच्या कळसावरील शिल्पचित्रे ९६ आहेत. हत्ती बारवेच्या पायऱ्या ९६ आहेत. मंदिराच्या कळसावरील शिल्पचित्रे ९६ आहेत. शहाण्णव कुळीच्या मराठ्यांचा कुलाभिमान व्यक्त करणारे एवळे मोठे उदाहरण महाराष्ट्रात अन्यत्र कुठेही नाही. आध्यात्मात सृष्टीरचनेची मुलतत्वे काहींनी ९६ मानली आहेत. त्या अध्यात्म कल्पनेचाही आदिशक्तीच्या साक्षीने साकारलेला हा अविष्कार असावा.

**सामाजिक जीवन व संस्कृती :**तत्कालीन सामाजिक जीवन व संस्कृती ही सर्व बखरीतून प्रतिबिंबीत झालेली आहे. धर्ममुलक श्रध्देचे अस्तित्व पेशवेकालात होते. ईश्वराविषय निष्ठा हा तत्कालीन समाजाचा स्थायीभाव होता. थोरले माधवराव पेशवे गणपतीचे दर्शन घेऊनच सायंकाळी परत वाड्यात येत. राजयक्षमा हा रोग झाल्यावर थेऊरास श्री गणपतीच्या ब्राम्हण घातले. भाऊसाहेबांनी नासिक मुक्कामी गोदामाहात्म्य ऐकिले त्यांनी त्र्यंबकेश्वरांचे देवालय व कुशावर्त बांधावयास काम लाविले. नानासाहेबांनी हिंदूस्थानास स्वारीस गेल्यावर गंगास्थान केले. नारायणरावांच्या खुनानंतर नदीवर बाळवेची लिंगे करून त्यांच्या आणक्रिया लिंगावर हात ठेवून झाल्या की, नानासाहेबाचा वंश चालवायचा. एका

ब्राम्हणाच्या तंट्यास त्यास उपद्रव होणार नाही. म्हणून निजामाने कुराण उचलून दिले. तत्कालीन समाजात ब्राम्हणांस विशेष मान असे पेशव्यांनी श्रावणमासांत दक्षिणेसाठी रमाणा बांधून ब्राम्हणास खिचडी वाटून भोजन वगैरे देण्याची प्रथा पाडली.

त्या काळात शकुनापशकुनावर श्रध्दा असे. दुसऱ्या बाजीरावाच्या जन्मावेळी अपशकून फार झाले. त्यांची शांती केली. निजामावर खर्डाच्या स्वारीत विजय संपादन केल्यावर पुण्यात सुमुहूर्ताने प्रवेश केला. लोकांचा मंत्रतंत्रावर विश्वास असे. बाजीरावाने ब्राम्हणांकडून ताईत भरून त्याचा प्रयोग सवाई माधवरावावर केला. गारपगारी यांनी इंग्रजांकडे जाऊन मंत्राने गारांचा पाऊस बाजीरावाच्या लष्करावर पाडला. इंग्रज होळकरांच्या मागे लागले असता होळकरांनी ईश्वरास स्मरून नदीत आपला हत्ती लोटला तेव्हा त्यांच्या दोन लाख फौजेस नदीने वाट दिली.

धर्ममुलक आचारांचे तत्कालीन स्वरूप बखरीतून दिसून येते. यज्ञविधी, हुताशनीपूजन, संक्रांतीस तिळगुळ वाटणे. रंगपंचमीस रंगाचा खेळ, मुहूर्त पाहणे, सहगमन व मुरद्यांची सार्थके ही याची उदाहरणे होत. साबाजी शिंदे यांनी कमाऊचे पहाडानजीक ज्वालामुखी या महाक्षेत्राचा विध्वंस केला. तेव्हा येथील ब्राम्हण आणि सहस्र-चंडीचा होम करून प्रथमआहूती दत्ताजी शिंदे यांच्या नावे टाकली. शत्रूस ठार मारल्यावर त्यांची मुलेबाळे महार-मांगांच्या स्वाधीन करून अधिक बेअब्रू करणे, सोयऱ्यांच्याकडे जेवावयास जाणे पण युध्दाच्या वेळी त्यांच्याशी लढणे, एखादी गोष्ट यशस्वी होण्यासाठी प्राण्यांचा बळी देवून उतारा करणे, मैत्रीचे इमान देण्यासाठी बेलभंडार, सानकरोटी व पगडी यांची देवघेव, आनंदाच्या प्रसंगी साखर वाटणे, एकाच्या कामात हात गुंतला असल्यास दुसऱ्यास डाव्याहाताने वंदन करणे, भेटीचे प्रसंग हात्तीघोडे, वस्त्रादी देणे, शत्रुकडून एखादी वस्तू मिळविण्यासाठी बोटास जाळणे व छातीवर जखमा झालेल्या पतीचा गौरव व पाठीवर जखमा झालेल्या पतीचा त्याग ही मारवाडातील स्त्रियांची चाल होय. अशा पध्दतीचे सामाजिक आचार-विचार हे धर्ममुलक असून इतर व्यवहार अूकेकांगी होत.

**संदर्भ :**


१) पेशव्यांचे बखर - (संपादक- र. वि. हेरवाडकर)

२) भाऊसाहेबांची बखर (संपादक- भिमराव कुलकर्णी )

३) रावरंभाची बखर - अनिरूध्द बिडवे

४) मराठी बखर - र. वि. हेरवाडकर

ISBN 978-93-5196-698-2

# 'बखर' अभिव्यक्तीतील वाड्.मयीन गुण

प्रा. जवाहर लक्ष्मण मोरे
संतोष भीमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप ता. द.सोलापूर जि.सोलापूर

मराठी साहित्यामध्ये संत, पंत आणि तंत साहित्याने जशी मोलाची भर टाकली तशीच बखर साहित्यानेही भर टाकल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या इतिहासाचा आणि संस्कृतीचा बहुमोल ठेवा म्हणून या बखरीकडे पाहिले जाते. म्हणून आजही बखरीचे अनन्यसाधारण महत्व आहे. तत्कालीन राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती कशी होती याचे आकलन बखरीतून तर होतेच, शिवाय स्वराज्यनिष्ठा शुरवीरांचा पराक्रम, मराठेशाहीला आलेली अधोगती याची माहिती बखरीच्या लेखनामुळेच जतन झाली आहे. त्याचबरोबर मराठयांचा इतिहास, त्यांच्या जीवननिष्ठा, श्रध्दा याचे चित्रणही बखरीमध्ये येते. वाड्.मयाच्या अनुषंगाने या बखरींचा उल्लेख केला तर बखर वाड्.मयनिर्मितीमागील प्रेरणा, बदलते रुप, स्वरुप, रचना, लेखन व भाषिक वैशिष्टये इत्यादी प्रकारचा अभ्यास ही करता येतो. म्हणूनच प्रस्तुत लेखामध्ये बखर या वाड्.मयप्रवाहाच्या अभिव्यक्तीतील वाड्.मयीन गुणांचा ऊहापोह केला जाणार आहे.

**'बखर' शब्दाचा अर्थ** : 'बखर' हा शब्द 'खबर' या अरबी शब्दाचा वर्णविपर्यास आहे. त्याचा अर्थ वार्ता, माहिती, समाचार असा आहे.१ तसेच 'बखेर' व 'बखैर' अशी शब्दरुपेही अनेक ठिकाणी आढळतात. 'बखैर' म्हणजे आख्यायिका होय. ही आख्यायिका गत इतिहासाचे निवेदन करते. बखरकारानेही कथात्मक निवेदनाचा घाट स्विकारलेला दिसतो. त्यामुळे बखेर – बखैर – बखर अशी शब्दरुपे घेवून मराठीत बखर हा शब्द रुढ झाला असे म्हणता येईल.२

**बखर निर्मितीमागील प्रेरणा** : शाहिरी वाड्.मयाने तत्कालीन ऐतिहासिक घटनेसोबतच सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब पोवाडा आणि लावणीतून मांडले. अर्थातच ते पद्यप्रकारात होते. पुढे हेच साहित्य बखरकारांनी मराठी गद्यातून मांडले. म्हणून बखरीचा अभ्यास हा केवळ इतिहास म्हणून न करता मराठीतील गद्य सारस्वताचा नमुना म्हणून केला जाऊ लागला आणि ऐतिहय वृत्तकथनाच्या गरजेतून मराठी बखर वाड्.मयाची निर्मिती झाली. र.वि. हेरवाडकर यांनी बखरनिर्मितीविषयी सांगताना 'इतिहास प्रामाण्याच्या आधारे राज्यशासनाचे आदर्श, मुसलमानांची संस्कृती व फार्सी भाषा यांचा झालेला परिणाम यामुळे बखरीची निर्मिती अपरिहार्यपणे झाली.'३

**बखर अभिव्यक्तीतील वाड्.मयीन गुण** : बखर वाड्.मयाने आपल्या आविष्कार आणि अभिव्यक्तीतून वाड्.मयीन परंपरेशी नाते जोडले आहे. एवढेच नव्हे तर आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. त्यामुळे यास स्वतंत्र वाड्.मय प्रवाह म्हणूनही मान्यता मिळाली आहे. इतिहासाबरोबरच मानवी जीवनाचेही दर्शन बखरीतून घडते. पण बखरीचा आशय हा मराठयांच्या इतिहासापुरता मर्यादित आहे असे म्हणावे लागेल. परंतु याचा अधिक विचार न करता या वाड्.मयप्रवाहाची वाड्.मयीन वैशिष्टये एक अभ्यास म्हणून शोधता येतील. व्यक्ती वर्णन, प्रसंगवर्णन हा बखरीचा महत्वाचा वाड्.मयीन गुण असून त्या आधारे इतर वैशिष्टयांचा शोध घेणे सोईचे होईल.

**बखर लेखनातील वर्णनकौशल्य** : बखर लेखनामध्ये स्थळ, व्यक्ती, प्रसंग, युध्द इत्यादीचे वर्णन आल्याशिवाय बखरीची अभिव्यक्ती परिपूर्ण होत नाही. वरील चारही बाबी परस्परावलंबी आहेत. त्यांच्या वर्णनामुळेच बखरीच्या कथाप्रवाहास नाटयमयता व गतिमानता प्राप्त होते. त्याचबरोबर ऐतिहासिक वातावरणाचा व व्यक्तीच्या स्वभाव व

भावभावनांचा समर्पक असा परिपोषही झाल्याचे वर्णनातून दिसून येते. व्यक्तीवर्णनातून अल्पाक्षर रमणीयता हे वैशिष्टय दिसून येते.

उदा. १) दिल्लीश्वर म्हणजे या कलियुगी संपदेचा अमर्याद सागर.

२) भाऊसाहेब धैर्याचा मेरु !

३) विश्वासराव बालसिंहाचे, कोल्हया कुत्र्याचे नाहीत.

४) मुधोजी भोसले वय लहान, परंतू शहाणे फार.

अशाप्रकारच्या अल्पाक्षरतेमुळे सागर, मेरु पर्वत ही प्रतिमाने लक्ष वेधून घेतातच शिवाय व्यक्तीवर्णनातून जिवंत व्यक्तिचित्रण उभे राहिल्याचे जाणवते. सभासद बखरीमध्ये अफजलखानाच्या सैन्याशी झालेले युध्द, सिंहगडावरील तानाजी - उदयभानू यांचे युध्द, मुरारबाजी - दिलेरखान यांचे पुरंदर गडावरील युध्द ही युध्दवर्णनेही यथोचित आलेली आहेत. उदा. १) शिवाजी काय ? चढे घोडियानिशी जिवंत कैद करुन घेवून येतो.४

२) युध्द बहुत केले पुर्वी युध्दात अतिरथी, महारथी झुंजले, त्याप्रमाणे भाऊसाहेबी विरथीपणे शर्थ केली. पुढे काही इलाज चालेनासा झाला. दुराणी व नजीबखान रोहिला असे चाळीस हजार फौजेतून दहा बारा हजार फौजेनिशी भाऊसाहेब याजवर येवून वर्षले. ते समयी मारामार अशी जाली कीं न भूतो न भविष्यती.५ अशा युध्दवर्णनात गतिमानता, आवेश, शस्त्रांचा मारा, झुंज, पराक्रम याचे वर्णन येते. वीर आणि करुण रसांचा आविष्कार पहावयास मिळतो.

युध्द, प्रसंग आणि व्यक्तीवर्णनाबरोबरच स्थळवर्णनालाही बखरीमध्ये महत्वाचे स्थान आहे. स्थळ वर्णनाचे आपल्या शैलीमध्ये बखरकार १) दिल्ली म्हणजे हस्तीनापूर २) जशी काशी तसे सातारा-पुणे जाले. ३) श्री शैल म्हणजे कैलासच दुसरे! ४) पानिपत म्हणजे कुरुक्षेत्र ५) तीन वर्षे वसई भांडली ६) मिरजेचा किल्ला मास पक्ष भांडला. अशा प्रकारचे लेखन करताना दिसतो. ही स्थळवर्णने सजीव भासवण्याचे कार्य बखरकार करतो. छोटया छोटया वाक्यातून सहजता आणि सुलभता प्रत्ययास येते. उपमा आणि उप्रेक्षा अलंकाराने भाषा सजवलेली दिसते.

**बखर लेखनातील रसाविष्कार :** बखरकारांनी बखर लेखनांमध्ये वीर रसाचा परमोत्कर्ष साधला आहे. हे तर सर्वश्रुत आहेच. त्यामुळे व्यक्ती, घटना, प्रसंग सजीव होताना दिसतात. या वीर रसाबरोबरच सैन्याची वाताहात, पराभव व भितीदायक वातावरण अशा वर्णनातून शोक आणि करुण रसाचाही परिपोष होतो. तुजे हाते अफजलखान मारवितो. तुजला यश देतो. तू काही चिंता करु नको.६ अशा प्रकारे वीर, करुण, शोक, अद्‌भुत, बीभत्स, रौद्र आणि वत्सल अशा अनेक रसांचा परिपोष बखरीतून केलेला पहावयास मिळतो.

**बखरीची भाषाशैली :** बखर वाड्.मयामध्ये आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने भाषाशैलीचा विकास झाला आहे. प्रारंभी लोकजीवनातील बोलीभाषा वापरात होती आणि हे स्वाभाविक आहे.बखरीतील प्रसंगवर्णनातून प्रासादात्मकता, लयबध्दता, नादमाधुर्य व नागरी भाषा आदींनी भाषा नटली आहे. दृष्टांत, यमक, अनुप्रास, अलंकाराचीही रेलचेल बखर वर्णनात येते. काही वर्णनात १) आम्हांस धनी ना गोसावी २) धड धन्याचे ना चोराचे ३) सोड आऊत हो मोरोबाचा राऊ त अशा म्हणींचा वापर व १) चिंधी चोळा करणे २) पानिपत होणे. ३) छातीचा कोट करणे अशा वाक्प्रचाराचाही वापर केलेला दिसून येतो.७

**समारोप :** यावरुन किंवा वाड्.मयीन गुणांवरुन बखर हा एक वाड्.मय प्रकार आहे असे ठाम मत होते. प्रौढ व रसाळ

भाषा, संस्कृती आणि फार्सीप्राचुर्यता, पौराणिक दाखले, अलंकार, सुभाषिते, वाक्प्रचार, म्हणी, आख्यायिका, रेखीवरचना, कल्पनाचातुर्य, निवेदनकौशल्य इत्यादी वैशिष्टयांच्या जोरावर बखरीचे लिखाण हे आकर्षक व मनोरंजक झाले आहे. त्यामुळे शेवटी बखरीतील भाषा ही साधी, गद्य, निरस, नुसतीच निर्जिव वर्णन करणारी ललितेतर साहित्याची भाषा नाही. तर जिवंत रसरशीत आणि मनोहर अशा वाड्.मयमूर्तीचे दर्शन देणारी ललित वाड्.मयाची भाषा आहे.८ असे म्हणणे इष्ट होईल.

**निष्कर्ष :**

१) बखर लेखन व भाषा शैलीतून तत्कालीन मराठी भाषेचे रुप कसे होते हे पाहता येते.

२) त्याचा आधार घेवून भाषेमध्ये कसा बदल घडत गेला याचे आकलन होईल.

३) बखरीच्या आशयातून तत्कालीन सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय स्थितीची जाणीव होते. त्या जाणीवेचा संबंध २१ व्या शतकात प्रगतीच्या दिशेने जोडता येईल.

४) तत्कालीन शुरवीरांचे पराक्रम, स्वामिनिष्ठा व स्वराज्यनिष्ठा सद्यस्थितीत आचरणात आणण्यास मदत होईल.

५) बखर वाड्.मयप्रकारास पुनर्लेखनाने उर्जिताअवस्थेत आणता येईल.

६) नवोदित साहित्यिकांना बखरकारांची लेखन व भाषिक कौशल्ये आत्मसात करता येतील.

७) लोकवाड्.मय, म्हणी, वाक्प्रचार, निवेदन पध्दती याची नव्याने ओळख होवून शब्दसंपदा वाढवता येईल.

८) इतिहासाच्या सत्य व असत्य बाबी पडताळून पाहता येतील.

९) बखर वाड्.मयाच्या अनेक पैलूवर अधिकाधिक सूक्ष्मपणे अभ्यास करता येईल.

१०) बखरीतील भाषेचा उपयोगभाषा विज्ञानाच्या अभ्यासासाठी बहुउपयोगी ठरेल.

**संदर्भ :**


१) जोशी प्र.न. - मराठी वाड्.मयाचा विवेचक इतिहास - प्राचीन काळ, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, आवृत्ती तिसरी २००८, पृ. क्र. ५३०

२) वरखेडे रमेश - संपादक, मध्ययुगीन वाड्.मय प्रवाह, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक, पुनर्मुद्रण - २००८, पृ. क्र. ४८

३) तत्रैव - पृ. क्र. ५५

४) पठाण यु.म. - संपादक, सभासद बखर, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली २०००, पृ.क्र.४०

५) जोशी प्र.न. - मराठी वाड्.मयाचा विवेचक इतिहास - प्राचीन काळ, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, आवृत्ती तिसरी २००८, पृ. क्र. ५३८

६) नसिराबादकर ल.रा. - प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर, आवृत्ती सातवी २००३, पृ.क्र. २५०

७) वरखेडे रमेश- संपादक, मध्ययुगीन वाड्.मय प्रवाह, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक, पुनर्मुद्रण - २००८, पृ. क्र. ७२

८) नसिराबादकर ल.रा. - प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर, आवृत्ती सातवी २००३, पृ.क्र. २६४

# मराठी बखर गद्यः वाङ्मयीन दृष्टिकोन

डॉ. शिल्पा नेवे
मराठी विभाग, रामनारायण रुईया महाविद्यालय, माटुंगा (पूर्व), मुंबई.

प्राचीन मराठी वाङ्मयात पद्यरचना अधिक आहे. महानुभावांचे चरित्रग्रंथ, दृष्टांतपाठ, सूत्रपाठासारखे ग्रंथ एकनाथांची काही प्रकरणे आणि ख्रिस्तपुराणांची प्रस्तावना एवढे अपवाद वगळले तर प्राचीन मराठी वाङ्मयात गद्य लेखनाचा विस्तार झालेला दिसत नाही. शिवकाळामध्ये मराठी ही स्वराज्याची आणि व्यवहाराची भाषा म्हणून स्थिर झाल्यावर बखरीच्या रूपाने पुन्हा मराठी गद्यलेखनाचा अवतार झालेला दिसतो.

मुसलमानांच्या तवारिखा (तारीखवार इतिहास) पाहून बखर नावाचा लेखनप्रकार सुरू झाला. मुसलमानांच्या तवारिखांप्रमाणे आपल्याकडेही इतिहासाची नोंद असावी या प्रेरणेतून हे बखर लेखन झालेले दिसते.

र.वि.हेरवाडकर यांच्या मते बखर हा शब्द 'खबर' या मूळ अरबी शब्दापासून निघालेला असून त्याचा वर्ण विपर्यास होऊन बखर हा शब्द आलेला असावा. खबर म्हणजे 'माहिती'. त्यामुळे काय घडलं याची माहिती म्हणून बखर असा शब्द आला असावा. दुसरा अर्थ 'राजकीय बातमी'. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मते 'बक्' म्हणजे बोलणे या संस्कृत धातूपासून 'बखर' हा मराठी शब्द आला असावा. तर दाते ङ्क कर्वे शब्द कोशात गद्यरुपचरित्र, गद्यइतिहास, बातमी, हकीकत, कथानक इ. अर्थ दिले आहेत. तर शं.गो.तुळपुळे यांच्या मते बखर म्हणजे माहिती देणारे 'गद्य मोडीलेखन'. थोडक्यात बखरींचे एकंदर स्वरूप पाहता ऐतिहासिक घटना किंवा व्यक्ती यांची हकीकत सांगणे, माहिती देणे या अर्थाने बखर हा शब्द आलेला आहे, असे म्हणता येते. बखरींचे हे स्वरूप लक्षात घेतले तर त्यातील माहिती ही पुष्कळशी कर्णोपकर्णी आली असावी हे उघड आहे आणि म्हणून ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने बखरी गौण मानल्या गेल्या आहेत.

मराठ्यांनी मुसलमानांच्या संपर्काने मराठीत बखर लेखनाला सुरूवात केली असली तर बखरींची परंपरा संस्कृतातील महाभारतापर्यंत नेता येते. महाभारताच्या सुरूवातीलाच 'हाजय नावाचा इतिहास आहे', असे म्हटलेले आहे. बखर लेखनामागील प्रेरणा एकच एक नाही तर त्यात बदल होत गेलेला आहे. शिवाजी महाराजांपासून जे नवे वीरयुग निर्माण झाले त्यातील शूरवीरांनी स्वराज्य मिळविण्यासाठी आणि टिकविण्यासाठी ज्या मर्दुमक्या गाजवल्या त्याच्या गाथा सुरूवातीच्या बखरकारांनी लिहिलेल्या दिसतात. शूरवीरांची चरित्रे सांगणे, त्यांनी मारलेल्या लढाया आणि पराक्रमांची वर्णने करणे, त्याद्वारे नवीन लोकांना मार्गदर्शन करणे हा उद्देश आरंभीच्या बखरींमागे दिसतो.

बखर वाङ्मय प्राधान्याने शिवकाळापासून पुढे आढळते. त्यामुळे शिवपूर्वकालीन, शिवकालीन आणि पेशवेकालीन बखरी असे बखरींचे स्थूल वर्गीकरण केले जाते. शिवपूर्वकालीन बखरी प्राधान्याने दोनच आहेत. सगळ्यात जुनी मानली जाणारी 'माहिमची किंवा महिकावतीची बखर' आणि 'राक्षसतागडीची लढाई'. 'सभासदाची बखर', 'चित्रगुप्ताची बखर', 'श्रीशिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र' या काही प्रमुख शिवकालीन बखरी. तर 'पानिपतची बखर', 'साष्टीची बखर', 'भाऊसाहेबांची बखर', 'पेशव्यांची बखर' या पेशवेकालीन बखरी होत. शिवकालीन बखरींमध्ये अर्थातच शिवाजी महाराज आणि भोसले घराणे यांच्या पराक्रम वर्णनावर भर आढळतो. तर पेशवेकालातील अनेक बखरींना पानिपतच्या युद्धाचा संदर्भ आहे. तसेच चरित्रवर्णनपर बखरी, युद्धवर्णनपर बखरी, पत्रात्मक बखरी, आत्मचरित्रात्मक बखरी (उदा. नाना फडणविसाचे आत्मचरित्र) तसेच कैफियती, थैली (उदा. होळकरांची थैली) इ. बखरींचे विषयानुसारी वर्गीकरणही केले जाते.

इतिहास आणि ललितकृती या दोन्हींचे विशेष घेऊन अवतरणारा एक वेगळा लेखनप्रकार हे बखरींचे वैशिष्ट्य आहे. १७व्या शतकापासून ते १९व्या शतकाच्या मध्यापर्यंत प्राचीन मराठी वाङ्मयात बखरलेखनाची लक्षणीय परंपरा दिसते. इतिहास, चरित्र, आत्मचरित्र, कादंबरी, नाटक या आधुनिक लेखनप्रकारांची काही वैशिष्ट्ये बखर या प्राचीन लेखनप्रकारात दिसतात. इतिहास आणि वाङ्मय यांच्या सीमारेषेवरच्या ऐतिहासिक कादंबरीसारखाच बखर हा वाङ्मय प्रक

ार आहे. स्वतंत्र विषय, स्वतंत्र लेखनपद्धती आणि प्रभावी भाषाशैली ही बखर वाङ्मयाची वैशिष्ट्ये होत. मूळ कल्पना तवारिखांशी संबंधित असली तरी मराठीत स्वतंत्र वाङ्मय प्रकार होण्याइतका बखरींचा विकास झाला. बखर ही कल्पना तत्कालीन मराठी समाज जीवनाशी अतिशय समरस झाली होती आणि म्हणून बखर हा अस्सल मराठी लेखन प्रकार आहे. एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार म्हणून मराठी गद्य प्रकारात त्याला विशेष स्थान आहे.

संगतवार इतिहास हा बखरींचा एक गुण आहे. बखरीत इतिहासाची एक संगती असते. अनेक घटनांची एक सलग साखळी असल्याने त्यातील घटनाक्रम चटकन लक्षात येतो. परंतु बखर लेखनावर पुराणांचे संस्कार दिसतात. बखरींची सुरूवात पुराणपद्धतीची असते. कोणत्याही घटनेचा एकदम वृत्तांत न सांगता सृष्टीची उत्पत्ती, निरनिराळ्या राजवंशांची माहिती ही सुरूवातीला येते. शिवकालीन विषयांवरच्या कित्येक बखरींत हा प्रकार दिसतो. बखरींचा शेवटही पुराणांप्रमाणे फलश्रुती देऊन केला जातो. उदा. जेलक्षुमीवंत असतील ते विशेष भाग्यवंत होतील, जे यशस्वी असतील ते दिग्विजयी होतील, येणे प्रमाणे सर्व मनोरथ पूर्ण होतील.अशी फलश्रुती सभासदाच्या बखरीत सांगितली आहे.

अंतरंगाच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण लेखनशैली हा बखरींचा एक मुख्य गुण आहे. हा गुण बखरलेखनाच्या प्रौढ पण रसाळ भाषापद्धतीत व्यक्तहोतो. उदा. भाऊसाहेबांची बखर, चिटणीसांच्या बखरी. उत्कृष्ट निवेदन पद्धतीमुळे आकर्षक झालेली लेखनशैली हे बखरींचे खास वैशिष्ट्य. बहुतेक बखरींचा एकंदर थाट हरिदासी पद्धतीचा दिसतो. श्रोत्यांचे भान हरपण्यासाठी हरिदास ज्याप्रमाणे विविध साधनांचा अवलंब करतात त्याचप्रमाणे बखरकारही वाचकांचे चित्त वेधण्यासाठी अनुरूप भाषा, काव्यात्मक कल्पना, अलंकार, सुभाषिते, म्हणी इ. साधने वापरतात. हरिदासी भाषेचा अस्खलित ओघ बखरीत स्पष्टपणे आढळतो. 'भाऊसाहेबांची बखर' हे याचे सर्वोत्कृष्ट उदाहरण होय. निवडक प्रसंग, निवडक शब्दांच्या सहाय्याने प्रभावीपणे व्यक्त करण्याचे या बखरीतील बखरकाराचे कौशल्य अप्रतिम आहे. एखाद्या उत्कृष्ट ललित कथेप्रमाणे सुरूवातीपासून ते शेवटपर्यंत वाचकाच्या मनात उत्कंठा आणि विस्मय निर्माण करण्याचे सामर्थ्य सर्वच बखरीत आढळते.

'प्रसाद' हा वाङ्मयीन गुण बखरीत आढळतो. या गुणाबरोबरच ओज आणि माधुर्य हे त्याला पोषक असे गुणही आढळतात. तसेच स्वकीयांचे शौर्य, धैर्य तसेच त्यांचा सात्विक व स्वाभिमानी बाणा इ.चे वर्णन करताना बखरकारांचा आवेश दिसून येतो. बखरींमधील अर्थवाहकता लक्षात घेण्यासारखी आहे. उदा. 'भाऊसाहेबांच्या बखरी'त दत्ताजी शिंद्यांच्या मृत्यूच्या वर्णनात किंवा मेहेंदळ्यांच्या पराक्रमाच्या वर्णनात ही अर्थवाहकता दिसते. बखरकारांच्या भाषाप्रभुत्वाची कल्पना येते. बखरकारांची भाषाशैली ही कोणाच्याही अनुकरणाने तयार झाली नसून ती त्यांच्या अंतरंगातून निर्माण झाली आहे, म्हणून ती स्वतंत्र आहे. उदा. कुतुबशहा याने कमरेचा सुरा ओढून, लाथेने ढकलून, पालथा घालून, दत्ताजी शिंदे यांचा शिरच्छेद केला.

'आटोपशीरपणा' हा वाङ्मयीन गुण बखरीत आढळतो. थोडक्यात पण परिणामकारकपणे निवेदन करण्यात बखरकारांचे चातुर्य प्रकट होते. आजच्यापेक्षा वाक्यरचना शिथिल असली तरी ती दीर्घ नाही. दीर्घ वाक्यरचनेपेक्षा लघु वाक्यरचनेकडे बखरकारांचा कल आहे. लहान लहान सुटी वाक्ये बखरीत आढळतात आणि परिणामाच्या दृष्टीने ती अधिक उपयोगी असतात. 'भाऊसाहेबांची बखर' यामुळेच आकर्षक झाली आहे. वेचक शब्द, मार्मिक व भावपूर्ण वाक्ये, अनुरूप सुभाषिते, अलंकार यांचा वापर करून बखरीत सौंदर्य आणले जाते. तसेच बखरलेखनात फारसी शब्दांचे आधिक्य आढळते.

'अत्युक्ती' हे बखरीचे एक अंग आहे. वर्ण्यविषयासंबंधी आत्यंतिक जिव्हाळा असल्यामुळे बऱ्याचवेळा बखरकारांच्या हातून अतिशयोक्तीपूर्ण लेखन झालेले दिसते. बहुतेक बखरी या गौरवार्थ लिहिलेल्या असल्यामुळे तसे होणे स्वाभाविक आहे. या अतिशयोक्तपूर्ण लेखनामुळे 'अद्भुतवर्णन' हा बखरींचा गुणधर्म झालेला आहे. उदा. राक्षसतागडीची बखर, सभासदाची बखर, चिटणीसांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र इ. अत्युक्तीपूर्ण लेखन हा पौराणिक कथांचाही प्रभाव किंवा परिणाम असावा.

'यथार्थ व्यक्तिचित्रण' हे बखरींचे आणखी एक वैशिष्ट्य होय. या व्यक्तींविषयी बखरकारांना कमालीचा आदर असल्यामुळे त्या जणू ईश्वरी अवतारच अशा भूमिकेतून बखरकार त्यांच्याकडे पाहतात. त्यांच्याविषयीचे बारीकसारीक तपशील हे व्यक्तीचित्रण अधिक उठावदार करतात. उदा. ङ्गबचेंगे तोऔर भी लढेंगेङ्ख असे म्हणणारा दत्ताजी शिंदे किंवा

ङ्गशिवाजी क ाय! चढे घोड्यनिशी जिवंत कै द क रून घेऊन येतो या अफ जलखानाच्या उद्गारात त्याच्या आत्मविश्वासाबरोबरच त्यांचा उद्दामपणाही दिसतो.

'बखर सजवणे' असा एक शब्द प्रयोग बखरींच्या संदर्भात वापरला जातो. समर्पक वाक्ये, सुभाषिते, अलंकार, दृष्टांत यांचा वापर करून बखर सजवली जाते. बखरींमध्ये विपुल प्रमाणात पौराणिक दृष्टांत येतात. उदा. ङ्गअफजलखानसामान्य नव्हे, के वळ दुर्योधनाच्या जातीचा होता. अंगाच्या बळाचाही तसाच आणि दुष्टबुद्धीनेही तसाच किं वा भडभुंजे लाह्या भाजताति तैसी गत जाहली अशाप्रका रे समर्पक उदाहरण देऊन लढाईच्या मैदानावरचे चित्र उभे के ले जाते. चित्रमयता, गतिमानता, नाट्यात्मक ता, आविष्क रण यांच्या सहाय्याने बखरीत सौंदर्य निर्माण के ले जाते. वीररसाप्रमाणेच क रूण रस, अद्भुत रस, भयानक रस, बीभत्स रस, रौद्र रस अशा अनेक रसांची उत्कटता आढळते आणि अशाप्रकारे बखर सजविली जाते. पौराणिक कथांचे दर्शन बखरका रांच्या पुढे असले तरी त्यांचे के वळ अंधानुक रण न क रता बखरीत त्यांचा योग्य उपयोग क रून बखरक ारांनी आपले स्वतंत्र व्यक्तीमत्व प्रक ट के ले आहे. बखरीमधल्या स्वाभाविक्ते ला बखरक ारांची बहुश्रुतता, त्यांचे मार्मिक निरीक्षण आणि त्यांची क ल्पक्त ा यांची अनुपम जोड मिळाली आहे आणि त्यामुळेच बखर वाङ्मय तेजस्वी झाले आहे. शिवाय बखरींमधून तत्कालीन श्रद्धा - अंधश्रद्धा, चालीरिती, सामाजिक संक्ते तसेच तत्क ालीन धार्मिक, सामाजिक वातावरण समजते.

अशाप्रक ारे बखरींमध्ये स्वराज्याच्या आणि साम्राज्याच्या क ाळाचे प्रतिबिंब पडले आहे. याच क ाळात ऐतिहासिक पोवाडे लिहिले गेले, तसेच बखरीही लिहिल्या गेल्या. शाहिरांप्रमाणेच स्वराज्याच्या उदयाबरोबर बखरींचा जन्म झाला आणि स्वराज्याच्या नाशानंतर बखरीही अस्तंगत झाल्या. बखर वाङ्मय हे तत्क ालीन राष्ट्रीय भावनेची, देशाभिमानाची साक्ष आहे असे म्हणणे योग्य होईल. ह.श्री.शेणोलीकरांच्या मते, ङ्गतत्कालीन महाराष्ट्राच्या आशा आकांक्षा, हर्षविषाद यांचे स्पष्ट प्रतिबिंब बखरीतून पडले आहे. म्हणून या बखरी म्हणजे मराठ्यांच्या अस्तंगत जीवनाचे 'स्मृतिदीप'च होत. प्रा.दत्तो वामन पोतदार म्हणतात, ङ्गमराठी गद्याला या बखरकारांनी मोठी श्रीमंती आणली.

बखरलेखनात महाराष्ट्राचा स्वभाव भावना, गुणदोष असल्यामुळे ते मराठ्यांचे प्रातिनिधिक वाङ्मय झाले आहे. स्वतंत्र विषय, स्वतंत्र लेखनपद्धती आणि रम्य भाषाशैली ही बखरींची वैशिष्ट्ये. बखरलेखनाची मूळ क ल्पना परक ीय म्हणजेच मुसलमानी असली तरी तो मराठीत स्वतंत्र वाङ्मयप्रक ार होण्याइतक ा त्याचा विक ास झाला आहे. मराठीच्या पेहराव बखरीने इतके कौशल्याने धारण केला आहे की हिचे मूळ परकीय असेल अशी शंका येण्यासही जागा नाही. बखरींचे बाह्यांग परकीय वाटले तरी तिचे अंतरंग अस्सल मराठी दिसते. बखर वाङ्मयाचे महत्त्व दुहेरी आहे. इतिहासाचे साधन म्हणून जशी बखरींची योग्यता आहे त्याचप्रमाणे वाङ्मयप्रक ार यादृष्टीने त्याचे विशिष्ट मूल्य आहे. मराठी गद्याच्या इतिहासांत बखरवाङ्मय हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. प्राचीन मराठी वाङ्मयात पद्यलेखनापेक्षा गद्यलेखन अल्प झाल्यामुळे बखरींनी गद्याची रिकामी जागा भरून काढली. एवढेच नव्हे तर एका नवीन लेखनप्रकाराची भर टाकून मराठी भाषेचे वैभव वाढवले म्हणून बखरींना मराठी वाङ्मयाच्या इतिहासात स्वतंत्र स्थान आहे.

**संदर्भ सूची :**

१. मराठी वाङ्मयाचा इतिहास महाराष्ट्र साहित्य परिषद संपादित खंड ५ (संपादक रा.श्री.जोग)

२. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास ह.श्री.शेणोलीकर

३. मराठी वाङ्मयाचा इतिहास अ.ना.देशपांडे

४. मराठी बखर र.वि.हेरवाडकर

ISBN 978-93-5196-698-2

# बखर वाङ.मय संकल्पना स्वरूप व वैशिष्ट्ये

प्रा. सौ. निर्मला वसंतराव मोरे
(मराठी विभाग), राजे रामराव महाविद्यालय, जत. ता. जत, जि. सांगली.

महाराष्ट्र ही संत महतांची भूमी आहे. तिला एक उज्वल संस्कृतीचे व उदात जीवनमुल्यांचे अधिष्ठान प्राप्त आहे. सूरूवातीच्या काळात प्राचीन मराठी साहित्यात संत,पंत, तंत असे तीन प्रवाह निर्माण झाले. मराठी साहित्य हे सुरूवातीला पद्यरूपातच अवतरले. संत ज्ञानेश्वरापासून ते संत तुकारामाच्यां पर्यत सर्व संत साहित्याने आपल्या अमृतमय वाणीनेसमाजाला भक्तीमार्ग शिकविला. तर पंत साहित्याने पंडित कवी पासून ते रघुनाथ पंडीतापर्यंत संस्कृत कवितेचा मराठी अवतार म्हणून पंडीतकाव्य जन्माला आले. त्याचा संस्कृतप्रचुत असा प्रवास सूरू झाला. पूढे मात्र 'मराठी कवितेची प्रभात' असे संबोधले जाते.ते तंत साहित्य जे शाहिरी काव्य पोवाडा, लावणी ही मराठीची आद्य कविता होण्याचा मान हिला मिळाला. पूढे मात्र पद्यलेखनाबरोबर गद्यरूपातही मराठी साहित्य उदयास आले. अगदी सुरूवातीच्या काळात ग्रह ज्योतिष, फलज्योतिष, वैद्यक इ. विषयाची छोटी, छोटी प्रकरणे याशिवाय हेमाद्रीने मेस्तके,

लेखनकल्पतरू या सारखे ग्रंथ लिहले. ते ग्रंथ आज पुराणपुरूषाची साक्ष देतात. याशिवाय महानुभाव संप्रदायतही अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत.ते म्हणजे लीळाचरित्र, गोविंदप्रभू चरित्र, स्मृतीचरित्र असे अनेक ग्रंथ आहेत. त्यात त्यांचे चरित्र, दिनचर्या, आठवणी, तत्वज्ञान, दृष्टांतपाठ अश्या विविध स्वरूपात आहेत. यादवकाळात सजलेले पहावयास मिळतात.त्यानंतर काही काळ हे गद्यसाहित्य लुप्त झालेले आढळते. बहामनी काळात परभाषतीले शब्दांचे लोण पचवून स्वत:च्या सामर्थ्यात भर घालणारे गद्य विकासावस्थवकडे वाटचाल करू लागले.अस्मानी व सुलतानी संकटावर मात करीत सतराव्या शतकाच्या उतरार्धात हिंदवी स्वराज्य स्थापन झाले. अणि मराठी भाषेलाही राज वैभव प्राप्त झाले.मराठीच्या गदयासाठी शिवकाळ पेशवेकाळ हा कलात्मक व तेजस्वी होता. या शिवकालात संत सहित्याला म्हणजेच पोवाडा लावणी बखर वाड्मयाला सोन्याचे दिवस आले. कारण त्या सर्व साहित्याला राजाश्रय मिळाला.बखर वाङमयाने राजे लोकांच्या पराक्रमाच्यां गाथा गद्यरूपात जतन करून ठेवल्या आहेत. त्यामुळे प्राचीन बखरी या फक्त मराठी साहित्यालाच नाही तर इतिहास विषयालासुद्धा नंदादीपाप्रमाणे मार्गदर्शकच ठरतात. म्हणूनच त्यावेळी तरवार बहाद्दारांच्या पराक्रमाचे वर्णन करण्यासाठी कलमबहाद्दाराची लेखणी कुरूकुरू लागली. त्यामुळे याकाळातील ग्रंथाचा विशेष त्यावर स्वराज्याचे तेज फाकलेले दिसते.

बखर या शब्दाची व्युत्पती— बक म्हणजे बोलणे या धातूपासून मराठीत आला आहे. तो पुरातन बखरी(हकीकती)मौखिक स्वरूपात होत्या. नंतर त्या लिखित रूपात अवतरल्या आहेत. बखर हा शब्द तसा फारशी भाषेतील आहे.तो बखर हा शब्द खबर या शब्दापासून झाला आहे.खबर म्हणजे वार्ता, समाचार किंवा वृत अश्या अर्थाने रूढ झाला. पण पूढे खबर या अरबी शब्दाचा विपर्यास होऊन बखर असा शब्द रूढ झाला आहे. असे मत इतिहासाचार्य राजवाडे यांना वाटते. तसेच याविषयी वा.सी. बेंद्रे म्हणतात, बखर म्हणजे वीर पुरूषाच्या पराक्रमाची वर्णने होत.तर प्रा. शेणोलीकर म्हणतात, बखर म्हणजे गद्यात लिहलेला ऐतिहासिक वृतांत होय.बखरीची कल्पनाही परकियांची असावी.हे राजकिय स्वरूपाचे ऐतिहासिक लेखन त्यामुळे तो गंद्यात लिहलेला ऐतिह्य वृतांत आहे. अशी बखरीची ओळख देता येईल. रचनाकाळाच्या दृष्टीने महिकावतीची बखर सर्वात जुनी आहे.शिवपूर्वकालीन बखरी,शिवकालीन बखरी, पेशवेकालीन बखरी अश्या वेगवेगळया कालखंडात बखरी निर्माण झाल्या.

**बखर वाङमयाची उत्पती:**

बखर वाङमयाला प्राचीन ऐतिहासिक ऐवज म्हणून फार जुनी परंपरा आहे.अगदी शालीवाहन,सिंघनादी, यादवकालीन हेमाड पंत बिंबस्थान यांच्या बखरी पुरातन आहेत. यावरून बखरलेखनाचा प्रवास अगदी जुना आहे.तेराव्या शतकाखेर महाराष्ट्राचे परकियाची सत्ता आली.पुढे इतिहास लिहून ठेवण्याची प्रथाही खंडीत झाली. पुन्हा नव्याने शिवकालात बखर वाङमयाला नवे धुमारे फुटले. पण प्राचीन मराठीत बखरलेखनाची मूळ प्रेरणाही इतिहास लेखनाचीच होती. बखरलेखनाची कल्पना पुन्हा

पुर्नजीवित झाली ती मुसलमानाच्यां तवारिखा पाहूनच मराठयांच्या इतिहासातील विविध प्रसंगावर दोन अडीचशे बखरी लिहल्या गेल्या. हिंदूस्थानाचा इतिहास फक्त दोन भाषेत लिहला गेला. एक मराठीत व दुसरा फारशी भाषेत या विषयी वि. का. राजवाडे म्हणतातश संगतवार इतिहास ज्याचा अभिमानाने सांगत येईल.अशी व्यवस्थित प्रौढीला पोहचलेली राष्ट्रे म्हणजे एक मराठयाचे व दुसरे मुसलमानाचे ऐतिहासिक वृतकथनाच्या गरजेतून मराठी वाङमयाची निर्मिती झाली.

बखर वाङमयाची वर्गीकरण करताना स्थूलमानाने पाच वर्ग करता येतील. एक समकालीन बखरनविसांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या राजकिय घटना व प्रसंगावर आधारित बखरकाराने पाहिलेल्या म्हणजेच ऑखो देखा हकिकत असते. त्यामुळे ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने या बखरी विश्वसनीय ठरतात. जसे सभासदाची बखर,चरित्रात्मक बखर होय.

दुस-या वर्गात केवळ स्मृतीवर विश्वास ठेवून आठवणी, दंतकथा, आख्यायिका पारंपारिक हकीकतीवर आधारीत उतरकाळी लिहलेल्या बखरी होत. जसे कृ.वि. सोहनीविरचित पेशव्यांची बखर होय.

तिसरा वर्ग हा म्हणजे जुनी कागदपत्रे, ग्रंथदप्तरातील टिपणे,यांच्या आधारे लिहलेल्या उत्तरकालीन बखरी जसे मल्हारराव चिटणीस बखर, साप्तप्रकरणात्मक चरित्र ही बखरही याच सदरात मोडतो.

चौथा वर्ग हा ऐतिहासिक स्वरूपाचे लेखन जसे वाका,कैफियत, हकीगत,चरित्र, आत्मचरित्र, यात पटवर्धनी वाका,आग-याची हकिगत, भाऊसाहेबाची कैफियत हया वर्गातीस बखरी सांगता येतील.

पाचवा वर्ग हा पौराणिक व सांप्रदायिक स्वरूपाच्या असतात. हेलेखन श्रद्धा व भक्तीमय स्वरूपाच्या असतात.यांची भूमिका केवळ धार्मिकच असते. त्यात प्रसंग व वर्णनावर भर असतो. जसे समर्थाची बखर,बकासूराची बखर,कृष्णजन्माची बखर अश्या अनेक बखरी आहेत.

**बखरवाङमयाचे स्वरूप -** बखरी म्हणजे गद्याच्या शैली सारस्वताचा एक स्वतंत्र विलास आहे. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण बहुतेक बखरी या गद्यात्म स्वरूपाच्या आहेत.तसेच गद्यात्म मजकूर हा पद्यापेक्षा निश्चितस्वरूपाचा असतो. त्यामुळे बखरकाराला बखर लेखनासाठी गद्यात्म लेखनाचे माध्यम स्वीकारले असावे. तसेच बखर लेखन हे राजकिय पुरूषांच्या आज्ञेवरून झाले. बखरकार हे सरकारी दरबारचे अश्रित असल्याने किंवा कारकून पेशातील असल्याने त्यांच्यावर बखर लेखनाची जबाबदारी पडते.पण बखरीचा लेखनकाल व लेखक यांची नोंद बखरीत कुठेही आढळत नाही. इतर वाङमयापेक्षा बखर वाङमयाचे स्वरूप वेगळे आहे. कारण बखरीचा प्रारंभ हा पुराणपद्धतीचा आणि शेवट मात्र फलश्रुतीमय असतो. सृष्टीची उत्पती किंवा राजांच्या वंशावळी इ. गोष्टी बखरीच्या सुरूवातीला देवून नंतर वृतकथन म्हणजे राजाचा पराक्रमाचे वर्णन तर युद्धाचे रसभरीत घटना आणि प्रसंग असते. महत्वाचे म्हणजे बखरलेखनावर आध्यात्मिक, धार्मिकता व श्रद्धेचा पगडा आहे. तर बखर लेखन बाळबोध वळणाचे आहे.

**बखरवाङमयाचे भाषिक सौंदर्य-** बखरवाङमयाचे भाषिकसौंदर्य पहाताना बखर ही नुसती लिहायची नसून ती सजवायची असते. मूळ बखरी बहुधा मोडी लिपीत असल्याने त्यात विरामचिन्हे नसत. त्यानंतर इंग्रजी राजवटीत बखरीतील वाक्ये वेगवेगळी केली गेली. त्यावेळी बखरवाङमयाचे लेखन करणारे बखरकार हे कलावंत असावा. त्यावेळी त्यांच्या व्यक्तीमत्वाचा प्रभव दिसून येतो. बखरवाङमयातील व्यक्ती आणि प्रसंग निर्माण करताना बखरकाराची प्रतिभा कसाला लागायची. कारण सर्वच बखरवाङमयाला एक ऐतिहासिक संदर्भमुल्य प्राप्त होत असे.

मराठी गद्याला डौलदार,घाटदार, ऐटबाज,भारदस्तपणा, संस्कृतप्रचूर फारसी शब्दकळा,नाटयपूर्ण प्रसंग निर्माण करून बखरनवीसानी बखरवाङमयाचे स्थान अमर राखले आहे.याचे कारण बखरवाङमयात रेखीवरचना,कल्पनाचातुर्य व प्रभावी निवेदन कौशल्य तसेच व्यक्तीदर्शन अमोघ वर्णन पद्धती नवरसपरिपोष, आणि रसाळ भाषाशैली,यामुळे बखरीचे ऐतिहासिक वृतकथन मनोरंजक व आकर्षक बनले. निवेदन भाषा प्रौढ ओघवती होती. तसेच संस्कृत व फारसीप्रचूर पौरणिक दाखले, अंलकार, सुभाषिते, वाक्यप्रचार,म्हणी यांचा परिपोष असायचा. दंतकथा, आख्यायिका चा आधार घेतला गेला. बखरीची भाषा ही जिवंत, रसरसशीत वीररसयुक्त वाचकांच्यात जोश निर्माण करणारी अशी बखरवाङमयमुर्तीचे दर्शन घडविणारी होती. बहुतेक बखरी या गौरवार्थच लिहल्या गेल्या त्यामुळे त्यात पक्षपातीपणा दिसून येतो. पण भावनापूर्ण लेखन मात्र केले गेले. त्यामुळे असे म्हणता येईल कि, त्याकाळातील वीरयुगामुळे बखरवाङमयाची निर्मिती झाली. यातूनच मराठी गद्याची क्षितिजे दिसू लागली.

ISBN 978-93-5196-698-2

**समारोप -** महिकावतीच्या बखरीपासून जे अव्वल इंग्रजी काळामध्यापर्यंतचा इतिहास वेगळा आहे. बखरवाङमयाची विषय व लेखनाची एक खास शैली असल्याने त्यांना स्वतंत्र वाङमयाचे स्थान प्राप्त झाले.तसेच बखरी या मराठेशाहीत वीरपुरूषाच्या गौरवार्थ लिहल्याने त्या एक वीरयुगाची साक्ष देणा-या ठरल्या. त्यावेळी वीरांनी स्वराज्य मिळविण्यासाठी व नंतर ते टिकविण्यासाठी मर्दुमक्या गाजविल्या. त्या वीरपुरूषांच्या पराक्रमाच्या गाथा मराठी बखरकारानी लिहल्या.पण या बखरी या ऐतिहासिक ललितकृती म्हणता येत नाही. परंतु इतिहास लेखनाला आवश्यक असणारा वास्तव तपशील व तटस्थपणे संगतवार सांगण्याचा वकूब बखरकाराजवळ नसत. तर अतिशयोक्ती करून पाल्हाळीकपणा बखरवाङमयात दिसून येतो. त्यामुळे इतिहास व मराठी साहित्य या दोघांचे काही गुण विशेष घेवून अवतरलेला एक वाङमय प्रकार आहे. मराठी गद्य सारस्वताच्या इतिहासातील बखरी हा वाङयीन सौंदर्याचे भांडार आपल्यापुढे खुले आहे.

**निष्कर्ष-**

१. बखर हे इतिहासाचे महत्वपूर्ण साधन आहे. कारण इतिहास लिहताना उपयुक्त ठरते.

२. धार्मिकता आणि बाळबोध वळणाची छाप असलेल्या बखरी या विज्ञानयुगात प्रमाण मानणार नाही.

३. बखरवाङमयावर परकिय भाषांचे आक्रमण झाले तरीही मराठी भाषा आपले अस्तित्व टिकवूव आहे.

४.बखरवाङमयाला राजाश्रय लाभल्यामुळे बखरकाराचेमानसिक स्वास्थ्य मिळाल्याने बखरीचे स्वरूप त्रोटक न राहता प्रदीर्घ झाले.

**संदर्भग्रंथ -**


१. गं.ब. ग्रामोपाध्ये ; मराठी बखर

२. र.वि. हेरवाडे ; मराठी बखर

३. रा.श्री.जोग;मराठी वाङमयाचा इतिहास

४. प्र.न. जोशी ;प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास

५. ल. रा. पांगारकर; प्राचीन मराठीवाङमयाचा इतिहास

६. संपा.जयादडकर,प्रभा गणोरकर; मराठीवाङमयकोश

७. ल.रा.नसिराबादकर ; प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास

८. प्रा. एन. डी. पाटील ; मराठी सत्तेचा उदय

ISBN 978-93-5196-698-2

# बखरींची भाषाशैली

**प्रा. डॉ. मालती रवींद्र पाटील**
मराठी विभागप्रमुख, श्री. शिवशाहू महाविद्यालय, सरूड

**प्रस्तावना**

सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात स्वराज्य स्थापना झाली आणि मराठीला राजभाषेचे स्वरूप प्राप्त झाले, पराक्रमाचे पवाडे जसे कवितेतून गायिले जाऊ लागले तसे कर्तृत्ववान आणि आदर्श राज्यकर्त्यांचे, त्यांच्या कर्तृत्वाचे, कारकिर्दीचे दर्शन मराठी गद्यातूनही घडू लागले. मराठी गद्याचा हा शिवकालीन आणि पेशवेकालीन अवतार जितका कलात्मक, तितकाच तेजस्वी होता; कौटुंबिक आणि राष्ट्रीय भावनेने भारावलेला होता. राजकीय पार्श्वभूमीवर विविध व्यक्तींच्या जीवन नाट्यांचे जितके उग्रभीषण, तितकेच करूणरम्य असे दर्शन घडविणारा होता. या सर्व वैशिष्ठ्यांच्या मूळाशी होती विलक्षण भाबडी, बालबोध अशी पक्षनिष्ठा, आत्मीयता आणि स्वकीयांचा अभिमान. या काळचे गद्य ग्रंथ मुख्यत: बखरवजा असून त्यातून स्वराज्याचे दर्शन घडते. मराठी गद्य सारस्वताच्या इतिहासातील बखर वाड्.मयाचे स्थान महत्वपूर्ण असे आहे.

खबर (= वार्ता, समाचार, वृत्त) या अरबी शब्दांचा विपर्यास होऊन बखर, शब्दाची निर्मिती झाली आहे. बक=बकणे म्हणजे बोलणे या धातूपासून बखर शब्दाची निर्मिती झाली असावी. असे इतिहासाचार्य राजवाडे यांना वाटते. मुसलमानांमध्ये तवारिखा लिहिण्याची पध्दत होती. म्हणून मुसलमानांच्या सहवासाने त्यांच्या तवारिखा पाहून, मराठ्यांनीही बखरी लिहिण्याची प्रघात पाडला; असे राजवाडे म्हणतात. ऐतिहासिक वृत्त कथनासाठी मराठी बखर वाड्.मयाची निर्मिती झाली असावी. बखरीचे स्थूल मानाने पाच वर्ग पडतात ते असे.

१. समकालीन बखरकाराने समक्ष पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या राजकीय घटना-प्रसंगांवर आधारित बखरी
२. केवळ स्मृतीवर हवाला ठेवून, आठवणी, दंतकथा, आख्यायिका, पारंपारिक हकीगती यांच्या आधारे लिहिलेल्या उत्तरकालीन बखरी
३. ऐतिहासिक कागदपत्रे, जुने ग्रंथ, दप्तरातील टिपणे यांच्या आधारे लिहिलेल्या उत्तरकालीन बखरी
४. प्रत्यक्ष बखर हे एक न दिले तरी बखरसदृश ऐतिहासिक स्वरूपाचे लेखन हा बखरींचा चौथा प्रकार म्हणता येईल. उदा. वाका, कैफियत, हकीगत, चरित्र आत्मचरित्र इत्यादी लेखन.
५. ऐतिहासिक किवा राजकीय विषय नसलेल्या परंतु बखर हे नाव असलेल्या बखरींचा हा वर्ग होय. या बखरी प्रामुख्याने पौराणिक व सांप्रदायिक स्वरूपाच्या असतात.

बखरकार हा कथनकार आहे. त्याने केलेल्या वर्णनातील विलक्षण उत्कट भावनामुळे या बखरी मनाला भावतात बखरकारांच्या निवेदनाला रंग,रूप आणि आकार प्राप्त होऊन त्यातून सुंदर वाड्.मयीन मूर्ती निर्माण होते. भाऊसाहेबांच्या बखरीत असे जिवंत आणि नाट्यपूर्ण प्रसंग किती तरी आढळतात. वीर आणि कारूण्याचा प्रत्यय सतत देणाऱ्या या बखरी म्हणजे प्राचीन मराठी 'गद्य सारस्वताचा एक स्वतंत्र विलास आहे' बखरीतील व्यक्ती व प्रसंगनिर्मितीमागे बखरनवीसाचे व्यक्तिमत्व उभे असते. बालबोध वळण, रामायण, महाभारतादी पुराणग्रंथांचे श्रवणपठण, फारसी उर्दूचे अध्ययन, सरकारदरबारी वावरल्यामुळे अनुभविलेले रीतिरिवाज आणि प्राप्त झालेली बहुश्रुतता या संस्कारानी त्याचे व्यक्तिमत्व संपन्न झाले आहे. वरील साऱ्या वैशिष्ठ्यांना व्यक्ती आणि प्रसंगानुरूप असणारी जिवंत व रसरशीत भाषा, अलंकृती, कल्पनारम्यता,सुभाषिते, म्हणी यांचा वापर, पौराणिक संदर्भ, दाखले यांनी युक्त असलेल्या बखरकाराच्या शैलीची जोड मिळाली आहे.

**१. शिवपूर्वकालीन बखर महिकावतीची बखर :** रचनाकाळाच्या दृष्टीने सर्वात जुनी बखर म्हणजे महिकावतीची बखर

उर्फ माहीमची बखर होय. यातील वर्णन आकर्षक आहेत. कोकणचा अज्ञात इतिहास या बखरीमुळे प्रकाशात आला.

**व्यक्तिचित्रणे –** प्रतापबिंब, महीबिंब, केशवदेव, रामदेवराव यादव यांची व्यक्तिचित्रणे अत्यंत कल्पकतेने केलेली आहेत.

**स्थलवर्णनं –** दवण, वाळुकेश्वर, महिकावती या स्थलांची सविस्तर वर्णनं उल्लेखनीय व चित्तवेधक आहेत. उदा. 'माहिम जागा उत्तम, रम्य स्थळ' असे माहिमचे नेटके व आटोपशीर वर्णन केलेले आहे.

**घटनावर्णन –** घटनावर्णनातून बखरकाराच्या कल्पकतेचा प्रत्यय येतो. केशवदेवाने जसवंतदेवाच्या भैसे दुर्गावर स्वारी केली. बरेच दिवस झाले तरी किल्ला हस्तगत होईना या संदर्भात 'चिंचवणी खादले खादले । त्या चिंचोऱ्याचे वृक्ष जाले । त्यांच्या चिंचा खादल्या । ईतके दिवस राहिले । परि गड हाती येत नाही ; ' असे कल्पकतापूर्ण वर्णन केलेले आहे.

ही बखर गद्यपद्यमय अशी असून बखरीतील प्रकरणे निरनिराळ्या लेखकांनी निरनिराळ्या काळात लिहिली आहेत. एकूण सात राजवटींचा उल्लेख यात येतो. परंतु या बखरीतील साधी भाषा,घटना प्रसंगाचे आकर्षक निवेदन, भावनारम्य व्यक्तिरेखाटन हे देखील अल्पाक्षरात केल्यामुळे त्यातील लेखकांचा भिन्नपणा लक्षात येत नाही.

**२. शिवकालीन बखर**

छत्रपती शिवाजी महाराज ही या कालखंडातील थोर, युगप्रवर्तक विभूती, त्यामुळे या काळातील एकूण बखरींपैकी जवळजवळ निम्म्या बखरी शिवचरित्रवर्णनपर आहेत.

सभासदाची बखर

ही शिवकालीन पहिली बखर होय. कृष्णाजी अनंत सभासद यांनी ही बखर रचली समकालीनाने शिवाजी महाराजांचे लिहिलेले पहिले चरित्र म्हणूनही ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने या बखरीचे महत्व अनन्यसाधारण आहे. सभासद बखरीतून आलेले शिवचरित्र कृष्णाजी अनंत सभासद यांच्या भाषाशैलीमुळेच वाचनीय झाले आहे. त्यांच्या भाषाशैलीचे विशेष

**व्यक्तिचित्रणं :–**

सभासद बखरीमध्ये दोन प्रकारची व्यक्तिवर्णने दिसून येतात. त्यातील पहिला प्रकार म्हणजे साक्षात पध्दतीचे व्यक्तिवर्णन होय. या प्रकारात लेखक वस्तुनिष्ठ म्हणजेच सरळपणे व्यक्तिचित्रण करीत असतो. अशा प्रकारच्या वर्णानातून ती व्यक्ती तिच्या स्वभाववैशिष्ठ्यांसह डोळ्यांपुढे उभी राहते.

उदा. अफजलखानाचे वर्णन करताना, 'अफलजखान सामान्य नव्हे, केवळ दुर्योधन जातीने होता. अंगाचा, बळाचाही तैसाच आणि दुष्टबुध्दीचे तैसाच' अशा समर्पक शब्दांचा वापर केला आहे. शाहिस्तेखानाच्या बादशाही वैभव आणि दराऱ्याची सूचकतेने यथार्थ कल्पना आणून देताना, 'नबाब शास्ताखान म्हणजे पादशाहाची प्रतिमाच दुसरी, ऐसा सेनासमुद्र सर्व संपत्तीनिशी दक्षिणेस राजियावर चाल करून आला. दिलेरखानाच्या सामर्थ्याचे वर्णन करताना, 'दिलेरखान म्हणजे मोठा बळकट. एका हत्तीचे बळ किंवा जास्तीच होईल आणि हत्ती बराबरी खाणे. दररोज हत्ती खातो तेणेप्रमाणे वजने खाणे. एरीर तर दुसरा हेडंब राक्षसच ! ऐसा थोर' अशा नेमक्या शब्दांचा वापर केलेला असल्यामुळे ते वाचनीय ठरते. 'भट गोसावी, थोर पंडित, चार वेद, सहा शास्त्रे, योगाभ्यास संपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येने निपुण, कलयुगींचा ब्रह्मदेव, असे पंडित' या शब्दात गागाभट्टाचे वर्णन केले आहे. त्यातून त्याच्या वैशिष्ठ्यपूर्ण व्यक्तिमत्वाचा परिचय करून दिला आहे.

व्यक्तिवर्णनाचा आणखी एक प्रकार असून त्याला प्रतिबिंबात्मक व्यक्तिचित्रण असे म्हणतात. व्यक्तींच्या उद्‌गारातून व संवादातून ते सूचित होत असते. उदा. शिवाजीवर चालून जाण्यास कोण तयार आहे, असे बडी साहेबिणीने विचारताच कोणीच कबूल होत नाही. मात्र अफजलखान तयार होतो आणि ''शिवाजी काय? चढे घोड्यानिशी जिवंत कैद

करून येतो.'' अशी तो प्रतिज्ञा करतो. त्याच्या या उद्‌गारात आत्मविश्वास असा उद्दामपणा दिसून येतो.'' अशी तो प्रतिज्ञा करतो. शत्रूच्या अभयपत्राबद्दल वाटचारी तुच्छता, शिवाजीबद्दल वाटणारी, उत्कट स्वामीनिष्ठा व अभयपत्र न घेण्याचा पक्का निश्चय व्यक्त करताना मुरारबाजी दिलेरखानास म्हणतो. 'तुझा कौल म्हणजे काय ? मी शिवाजीराजाचा शिपाई, तुझा कौल घेतो की काय ? ' यातून स्वामीनिष्ठा दिसून येते.

अशा प्रकारे या बखरीतील व्यक्तिचित्रणे वेधक असून,लेखकाने समर्पक, नेमक्या शब्दांचा वापर केल्यामुळे त्यांना वेधकपणा प्राप्त झाला आहे. साहजिकच लेखकाच्या भाषाशैलीचे ते वैशिष्ठ्य आहे.

वस्तुवर्णनातील समर्पकता

कृष्णाजी अनंत सभासद यांनी या बखरीत वस्तंची वर्णन समर्पक शब्दात केली आहेत. पतकांच्या (पथक) साजाचे वर्णन साधे असून कलादृष्टया त्यात एक विशिष्ट क्रम आहे. त्यामुळेच या वर्णनाला एकजिनसीपणा प्राप्त होऊन ते मोहक झाले आहे. उदा. 'डोईस मंदील, आंगास सखलादी फतू, दोहो हाती दोन सोन्याची कडी, कोणास रूप्याची कडी, तरवारास अबनाळ तैनाळ सोनेरूप्याचे, बंदुकीस कट रूप्याचे व विटियासि कट तैसेच, कानास जोडी कुडक्यांची, येणेप्रमाणे अवघे लोकांस साज.'रायगडाचे वर्णनही पाहण्यासारखे आहे. बखरकार लिहितो, 'राजा खासा जाऊन पाहतां गड बहुत चखोट, चौतर्फी गडाचे कडे तासिल्याप्रमाणे, दीड गांव उंच, पर्जन्यकाळी कडियावर गवत उगवत नाही, आणि धोंडा तासीव एकच आहे. 'चखोट' हे विशेषण, कडे तासिल्याप्रमाणे, 'उंच', गवत उगवत नाही व धोंडा तासीव एकच या शब्दयोजनेमुळे वर्णन साभिप्राय झाले आहे. याचप्रमाणे 'तक्त सुवर्णाचे, बत्तीस मणाचे नवरत्ने जडित सिंहासन सिध्द केले'. 'तो कोट म्हणजे पृथ्वीवर दुसरा गड असा नाही..... दोन गाडिया जोडून जावे ऐशी मजबुती' आणि 'पडकोट तरि चार चार फेरियावरि फेरे. ये जातीचा कोट' या शब्दात अनुक्रमे शिवाजींचे सिंहासन आणि येळूरकोटचे वर्णन अतिशय नेमकेपणाने केलेले आहे. हा रेखीवपणा लेखकाच्या भाषेचा विशेष गुणधर्म आहे.

**निवेदन शैली –**

बखरकाराने निवेदन करताना पाल्हाळाला आवर घालून व्यापक विषय आटोपशीर केलेला पाहायला मिळतो. त्याने साधी पण परिणामकारक लघुवाक्ये वापरून आपले लेखन चटकदार केले आहे. १. 'इतक्यांत सवड पाहून नबाब बायकांतून एकीकडे होऊन तरवारीस हात घालावयासि गेला. ती नदर राजियाने धरून वार केला. खानाची बोटे तीन उडाली. तेव्हा गलबा थोर जाहाला. '२. 'त्या उपरि मातुश्री अग्निप्रवेश करीत होती. तिचे मांडीवर बसून, गळा मिठी घालून, आण घालून राहाविली. ३. पातशहांनी कुल नगर श्रृंगारिले, चौफेरी बिदीस कुंकुमकेशराचे सडे रंगमाळा घातल्या. गुढिया, तोरणे, पताका, निशाणे नगरांत लाविली, नगर-नागरिक लोक कोट्यानकोटी राजा पाहावयास उभे राहिले. नारींनी मंगलआर्त्या अगणित उजळून राजियास वंदिले. सोने रूपियाची फुले राजियावीर उधळली. ' इत्यादी. अनुक्रमे शाहिस्तेखानावरील हल्ल्याचा प्रसंग, शहाजींच्या मृत्यूनंतर जिजाबाईंचा सहगमनाचा प्रसंग व शिवाजी भागानगरास आल्यावेळचा प्रसंग हे आटोपशीर निवेदनशैलीमुळे परिणामकारक झाले आहेत.

बखरकार समकालीन असल्यामुळे शिवाजींच्या जीवनातील अनेक घटनांची त्याला माहिती आहे. साहजिकच तो चरित्रनायकाशी एकरूप झालेला आहे. परिणामी या घटकांचे वर्णन करताना तो आवेशाने करतो. उदा. शिवाजीच्या पुंडपणाबद्दल बडी साहेबिण शहाजीकडे तक्रार करते व त्यावर शहाजीने दिलेले उत्तर, शिवाजीच्या क्रोधयुक्त वागणुकीबद्दल औरंगजेबाने चौकशी केली तेव्हा, ''जंगली वाघ हयवान, त्यास गर्मा जाहाला. काही करीणा जाहाला. '' असे रामसिंगाने काढलेले उद्‌गार आवेशपूर्ण आहेत. या आवेशपूर्ण उद्‌गारांनी निवेदनाला धार येऊन ते आकर्षक झाले आहे. संयम आणि अल्पाक्षरात्वामुळे या शिवचरित्रात काही उत्कट प्रसंग असूनही रसनिर्मिती झालेली नाही.

पौराणिक व पारंपरिक दाखले

कोणत्याही लेखकावर त्याच्या समाजातील पौराणिक/पारंपारिक संस्कार झालेले असतात. लेखक आपले लेखन

डौलदार, आलंकारिक करण्यासाठी पारंपारिक दाखल्यांचा, सुभाषितांचा कलात्मकतेने वापर करीत असतो. तसेच उपमा, रूपक, अनुप्रास या अलंकाराचाही वापर केलेला असतो.

**उपमा :** 'मागे कौरवांचा क्षय पांडवी केला, (तेव्हां) असा वीरावीरांस झगडा जाहाला.'

**रूपक :** बादशहाने 'बहुत खेद, दु:खाचे पर्वत मानिले'

**उत्पेक्षा :** अफजलखान सामान्य नव्हे, केवळ दुर्योधनच जातीने होता, अंगाचा, बळाचाही तैसाच आणि दुष्टबुध्दीनेही तैसाच.

**अनुप्रास :** 'त्याउपरि मातुश्री अग्निप्रवेश करीत होती, तिचे मांडीवर बैसून, गळा मिठी घालून, आण घालून राहाविली.

**वाक्‌प्रचार :** १) गर्दीस मिळविणे २) धुंद उठविणे

**सुभाषितांचा वापर :** जितेन (जयन ?) लभते लक्ष्मी मृत्यूनापि सुरांगणा ।
क्षण विध्वंसिनी काया का चिंता मरणे रणे ।।१।।

याबरोबरच कानडी तेलगू, हिंदी भाषेतील शब्दांचाही वापर केला आहे. अशा प्रकारे कृष्णाजी अनंत सभासद यांनी शिवछत्रपतींचे चरित्र लिहित असतांना त्यातील प्रसंग, व्यक्ती, वस्तूचित्रणं अत्यंत रेखीव व चित्रदर्शी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. बखरकाराच्या भाषा शैलीमुळे ही वर्णने अधिक उठावदार झाली आहेत.

पेशवेकालीन बखर

**भाऊसाहेबांची बखर :**

पानिपतच्या रणसंग्रामाचा सविस्तर वृत्तांत देणारी महत्वपूर्ण आणि वाङ्.मयीन गुणांनी परिपूर्ण अशी समकालीन बखर म्हणजे भाऊसाहेबांची बखर होय. पानिपतच्या युध्दानंतर बहुधा दोन वर्षाने ही लिहिली असावी पोष्य कृष्णाजी शामराव मुक्कामी दिली इंद्रप्रस्थ हा या बखरीचा लेखक असून त्याने राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री व्यंकाप्पा नाईक दिंडोरे कसबा वेळापूर स्वामींचे सेवेशी ही युध्दाची हकीगत लिहून पाठविली आहे. इतिहास आणि वाङ्.मय यांचा सुरेख संगम या बखरीत आढळतो ' जुन्या गद्याचा नमुना नसून मराठी भाषेचे वैभव आहे, असे र.वि.हेरवाडकर म्हणतात. व्यक्तिवर्णनं, प्रसंगवर्णनं आणि वस्तूवर्णनं यांनी या बखरीइतकी दुसरी कुठलीही बखर समृध्द नाही या बखरीचे भाषाविशेष

१. व्यक्तिवर्णने - नजिबखान रोहिला मात्रागमनी एखढ्या शब्दातून तो नजीबखानाचे व्यक्तिचित्र उभे करतो. 'ईश्वरे यश दिले तरी उत्तम, नाही तरी पुन : तुमची आमची भेट स्वर्गी होईल,' असे निरवानिरवीचे उद्‌गार पत्नीजवळ काढून युध्दात जिद्दीने उतरणारे बळवंतराव मेहेंदळे आणि उत्तम आहे. शतवर्षात केव्हा तरी मरावे, त्यास या संग्रामात मुक्ति आली तरी बहुत बरे जाहाले. याची क्षीत कशास करावी ? तुम्ही लौकीक करून गेला तरी मीहि वाचणार नाही मी ही तुमची सांगातीण होईल, असे उत्तेजनपर तेजस्वी उत्तर देणारी बळवंतरावांची पत्नी; 'बचेंगे तो भी लढेंगे; ' असे जिद्दीचे प्रतिउत्तर देणार दत्ताजी शिंदे ; 'आपले पदरी लौकीक भारी तुम्ही आपले विनावयाचे स्वकर्म करीत असता तरि सहजच वाचावयाची आस्था धरावी, वाटा तरी शूराचा उचलला आहे; वाण सतीचे घेतले आहे हे सांभाळावे, असेच धर्मशास्त्र; ' या शब्दात मल्हाररावास ठणकावून कर्तव्याची जाणीव करून देणारी गौतमाबाई अशी या बखरीतील कितीतरी व्यक्तिचित्रणं जिवंत आणि अविस्मरणीय आहेत.

**प्रसंगवर्णने :**

भाऊसाहेबांनी पैशासाठी दिल्लीचे छत पाडणे, पतीनिधनामुळे 'राव ! तुम्ही आम्हांवर का रूसला ? आमचे हातचा विडा का घेतला नाही ? ईश्वरे आम्हांस एवढे निर्वाण का दाखविले ? ' असा शोक करीत आप्पारावाला भाऊसाहेबांच्या ओटीत टाकून बळवंतरावांची पत्नी सती जाते तो प्रसंग; विश्वासरावांचा मृत्यू, मराठ्यांची कत्तल व त्यांचा पळ;

दत्ताजीच्या मृत्यूनंतर 'बाई, काका कोठे आहेत?' असा शोकाकूल प्रश्न विचारून धीर सोडणाऱ्या जनकोजीला पतिनिधनाचे दु:ख घोटून 'बाबा तू रडतोस काय? जयाजी सिंदे यांचे पोटी चौधी लेकी जाहाल्या तशीच तू येक जाहाली असती तरी आणखी एक जावाई येता,' असे भागिरथीबाईने उत्तर दिले तो प्रसंग ; अशा कितीतरी प्रसंगातून उग्रभीषण जीवननाट्याचे प्रखर दर्शन घडते. हे प्रसंग आणि व्यक्तिचित्रे यांचे रेखाटन बखरकार अत्यंत तन्मयतेने करतो. त्यामुळे आत्माविष्काराचेही दर्शन घडते त्यामुळे या बखरीला श्रेष्ठ वाड्.मयकृतीचे स्वरूप आपोआप प्राप्त झाले आहे.

**वस्तुचित्र रेखाटन**

प्रसंगचित्रा प्रमाणेच वस्तुचित्राचेही रेखाटन बखरकार प्रभावीपणे करतो. उदा. हे आगऱ्याचा किल्ला व कुंभेरीचा किल्ला यांच्या वर्णनातून दिसून येते.

मार्मिक उपमा व दृष्टांत

प्रासादिक, जोमदार आणि नाट्यपूर्ण भाषा हे भाऊसाहेबांच्या बखरीचे नजरेत भरण्यासारखे वैशिष्ठ्य आहे. उदा. 'डुक्कर खळीस येतो तैसे इरेस पडून मारामार केली,' जैसे भडभुंजे लाह्या भाजतात तशी गत केली', 'मुरगी मारी बचडे दाणादाण तैसे जिकडील तिकडे पळाले', 'तुपाचे घागरीवर उंदराचे पिटुकले बसते, तैसा प्रकार जाहाला', शाळवाचे पिकाप्रमाणे शिरे कापली', 'दुधाचे रांजणीत कांज्याचे शिंतोडे किंवा 'धनलोभियाचे धन जाते, अथवा राजा दशरथास कैकयेचे शब्दबाण, अशा मार्मिक लोकव्यवहारातील व पुराणातील उपमा दृष्टांतानेही भाषा सजते.

समर्पक सुभाषिते व म्हणी

'विनाशकाली विपरीत बुध्दी', 'भाग्य अभाग्य कालपरत्वे येते जाते', 'स्त्री बुध्दी हा प्रलयं गता', 'मेरे मनमें कछु ओर । कर्ताके कछु ओर' यासारखी समर्पक सुभाषित त्यात आढळतात मधूनमधून 'सुपातील हंसती व जात्यातील रडती', 'आपण मरावे आणि जग बुडवावे', 'दे माय धरणी ठाय' अशा काही म्हणी व वाकप्रचारांचे दर्शन घडते. 'बहुत भाऊ आहेत! परंतु श्रीमंत लोकांत याजप्रमाणे भाऊपणा कोठे नाही राम भरताची साम्यता' ही वाक्ये बखरकाराच्या शैलीचा स्वतंत्रपणा व त्यातील कलात्मकता नाट्यात्मकता, सांस्कृतिक संदर्भ यांचे दर्शन घडवितात.

काव्यत्मकता

निवेदनाच्या ओघात बखरकार काही सुंदर दोहरेही वापर करतात उदा.

जल की शोभा कलम है, दलकी शोभा पील
धनकी शोभा धरम है, कुलकी शोभा शील

यातून बखरीचे संस्कारसामर्थ्यही प्रकट होते. भाषा सौंदर्य आणि विचार सौंदर्याचे कलात्मक साहचार्य इतिहास आणि वाड्.मय याचा सुरेख संगम या बखरीत आढळतो.

समारोप

भाऊसाहेबांच्या बखरीची भाषा १८ व्या शतकाच्या उत्तरार्धातील विदग्ध मराठी गद्याचा एक प्रातिनिधीक नमुना आहे. हस्तिनापूर,मुचकुंदतीर्थ इ. प्राचीन स्थळांची माहिती, पुराणसिध्द व्यक्तींचे आणि प्रसंगाचे उपमा देण्यासाठी वापरलेले दाखले आणि 'न भुतो न भविष्यती' अशा काही संस्कृत वचनांचा वापर आपणांस या बखरीमध्ये पहावयास मिळतो.

**संदर्भ ग्रंथ :**


१. ल.रा.नसिराबादकर-प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास ,फडके प्रकाशन कोल्हापूर. आठवी आवृत्ती, २००५.
२. डॉ.मु. श्री. कानडे -भाऊसाहेबांची बखर ,नूतन प्रकाशन, पुणे,पहिली आवृत्ती.१९७५.
३. संपा.डॉ.र.वि.हेरवाडकर - सभासदाची बखर

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखरींचे ऐतिहासिक दृष्टीकोनातून पुनःवाचन

मुफिद महंमदइक्बाल मुजावर
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली.

सतराव्या शतकामध्ये शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापण्याच्या सुरवातीच्या प्रयत्नांपासून विसाव्या शतकाच्या सुरवातीला इंग्रजांच्याकडून मराठ्यांच्या झालेल्या पराभावापर्यंतचा काळ हा इतिहासात "मराठा काळ" म्हणून ओळखला जातो. कॉस्मो द गोर्द सारख्या पोर्तुगीज आणि काही इंग्रज इतिहासकारांनी सतराव्या-अठराव्या शतकातच मराठ्यांच्या इतिहासाबाबत लिहिण्यास सुरवात केली होती. मात्र असे मानले जाते की 'मराठा काळ' बाबतच्या आधुनिक इतिहास लेखनाचा आरंभ एकोणीसाव्या शतकात इंग्रज प्रशासकांकडून केला गेला, ज्यात ग्रांट डफचा ग्रंथ उल्लेखनीय आहे.

ग्रांट डफच्या ग्रंथाला प्रतिक्रिया म्हणून एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात मराठी भाषेत 'मराठा काळ' संदर्भात आधुनिक इतिहास लेखनाचे युग सुरु झाले. आधुनिक इतिहासलेखनामधील 'आधुनिक' शब्द खूप महत्वाचा आहे, कारण एकोणिसाव्या शतकात सुरु झालेल्या मराठ्यांच्या इतिहासलेखनामध्ये साधनांच्या विश्वसनीयतेच्या आणि इतिहासलेखनामध्ये त्यांच्या उपयोगितेच्या कसोट्या ह्या पाश्चात्य आधुनिक इतिहास लेखन पद्धतींच्या आधारावर ठरविल्या गेल्या. तत्कालीन इतिहासलेखनामध्ये रांकेच्या प्रत्यक्षवादाचा मोठा प्रभाव होता. तरी देखील काव्येतिहास संग्रहकर्त्यांसाहित काही अभ्यासकांनी बऱ्याच मराठी बखरी शोधून संपादित केल्या. प्रत्यक्षवादाचा प्रभाव आणि राजकीय घटनाक्रमांची संगतवार मांडणी करणे हेच या काळात प्रामुख्याने इतिहासलेखनाचे स्वरूप राहिले. वि. का. राजवाडे यांनी अस्सल कागदाच्या चिटोऱ्याला बखरीच्या असंख्य पानांपेक्षा विश्वसनीय मानले आणि इतिहास लेखनाचे साधन म्हणून नाकारले. जदुनाथ सरकार यांनी बखरींना बाजारगप्पा संबोधले. त्या नंतरच्या इतिहासकारांनी देखील बखरींकडे अशाच दृष्टीकोनातून पहिले. बखरींना आधुनिक इतिहासलेखनातील विश्वसनीय साधनांच्या कसोट्या लावल्या मुळे बखरी अस्सल ऐतिहासिक साधने म्हणून वर्ज्य ठरल्या. अस्सल कागदपत्रे तपासून त्यातील तारखा, घटना अथवा घटनाक्रमांची पुष्टी करण्यापुरती कधी कधी बखरींचा आधार घेतला गेला. त्यामुळे बखरींचा इतिहासाची साधने म्हणून पूर्णांशाने वापर मराठा इतिहासकारांकडून झाला असे म्हणता येणार नाही.

मराठी भाषेच्या आणि साहित्याच्या अभ्यासकांनी बखरींचा अभ्यास हा वसाहतपूर्वकालीन गद्य रचनांच्या स्वरूपात केला. त्यांनी बखरींमधील बखरींची उत्पत्ती, त्यातील लेखन शैली, त्यातील

आदर्श आणि मूल्यांचे स्वरूप, समाज आणि स्थळांचे वर्णन, शब्द भांडार आणि म्हणींचा वापर, शब्दांचे बदलणारे अर्थ आणि वाक्य रचना इत्यादी बाबींचा अभ्यास केला. तरी देखील मराठा इतिहासकारांकडून आणि मराठी भाषा-साहित्याच्या अभ्यासकांकडून बखरींच्या आकलना संदर्भातील अनेक दुवे सुटले आहेत. त्याचाच विचार या शोधनिबंधात करण्यात आला आहे.

पंधराव्या ते सतराव्या शतकाच्या दरम्यान रचण्यात आलेली 'महिकावतीची बखर' अथवा 'माहीमची बखर' ही उपलब्ध बखरीतील सर्वात जुनी बखर मानली जाते. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेनंतर अठराव्या शतकापासून एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीपर्यंत मोठ्या प्रमाणात बखरींची रचना झाली. 'बखर' रचना ही मराठी भाषेत आणि मोडी लिपीत लिहिलेले गद्य ऐतिहासिक कथन आहे. महान व्यक्तींची चरित्रे, युद्धांची वर्णने, महत्वपूर्ण घराण्यांच्या वंशावळी अश्या रुपात बखरींची रचना केली जात होती. बखरी या मुख्यत: आपल्या स्वामी अथवा उच्च अधिकाऱ्याच्या आदेशानुसार माहितीगार असलेल्या जेष्ठ व्यक्तींकडून रचल्या जात असत. बखर लेखनशैलीची आणि 'बखर' या शब्दाच्या उत्पत्ती संदर्भात मराठा इतिहासकार आणि मराठी भाषा-साहित्य अभ्यासकांनी विविध मते मांडली आहेत. काही इतिहासकारांचे आणि भाषा-साहित्य अभ्यासकांच्या मते बखर लेखनप्रकार हा फारसी 'तवारीख' आणि 'अखबारात' यांच्या पासून प्रेरणा घेऊन उत्पन्न झाला. तर काहींच्या मते बखरी या संस्कृत 'अख्यान' आणि 'पुराण' यांचेच बदललेले रूप आहेत अथवा त्यांच्या पासून प्रेरित आहेत. अश्याच प्रकारे 'बखर' या शब्दाच्या उत्पत्ती संदर्भात देखील त्यांच्यात मतभेद आहेत. मात्र बखर हा शब्द अरबी शब्द 'खबर' पासून बनलेला आहे असे म्हणता येते. 'खबर' या शब्दाचा अर्थ 'बातमी' अथवा 'सूचना' असा होतो.

अलीकडच्या काळात संजय सुब्रमण्यम, डेविड सुलमन आणि व्ही एन राव यांनी दक्षिण भारतातील इतिहास लेखन परंपरेचा आणि त्यात होणाऱ्या बदलांचा अभ्यास करताना बखरींकडे या परंपरेचा एक भाग म्हणून पाहिले आहे. बखरींच्या उत्पत्तीच्या संदर्भातील या चर्चेपासून दूर वेगळ्या प्रकारे बखरी, कैफियती यांच्याकडे पाहण्याचा प्रयत्न इतिहासकार सुमित गुहा यांनी केला. बखरी आणि कैफियतींच्या अभ्यासामध्ये त्यांनी बखरींची आणि कैफियतींची सामाजिक मुळे तपासण्याकडे लक्ष दिले. मराठा राज्याच्या प्रशासनासाठी ज्ञानाची रचना अथवा रूपरेखा उपलब्ध करणे किंवा वंशपरंपरेने मिळालेल्या अधिकारांच्या संदर्भातील विवादांच्या प्रसंगी न्याय-निवाड्या दरम्यान उपयोगासाठी बखरींची, कैफियतींची रचना केली जात असे अशी मांडणी त्यांनी आपल्या 'स्पीकिंग हिस्टोरिकली: द चेंजिंग वॉइसेस ऑफ़ हिस्टोरिकल नरेशन इन वेस्टर्न इंडिया' या शोधनिबंधात केली आहे.

महाराष्ट्रामध्ये सतराव्या ते विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंतच्या काळातील ऐतिहासिक स्मृती आणि अस्मितांची निर्मिती संदर्भाचा अभ्यास करताना प्राची देशपांडे यांनी बखरींचा देखील अभ्यास केला. सत्तेच्या संदर्भातील कथने आणि मराठा राज्यसत्ताचे परीघामध्ये सत्तेशी संबंधित अधिमान्यतेच्या संदर्भात करण्यात आलेल्या अनेक दाव्यांमधील अंतर्निहित तणाव तसेच ऐतिहासिक घटनांवर, व्यक्तींवर आणि त्यांच्या कर्तुत्वांवर आदर्श मूल्यांच्या परीपेक्षातून केलेल्या टिप्पण्या या बखर रचनांची वैशिष्ट्ये असून या तणावांमुळे मराठा सत्ता आणि अस्मितांचे प्रस्तुतीकरण बखरींमधील कथनामध्ये आढळत असल्याचे मत त्यांनी आपल्या 'क्रीएटीव पास्ट: हिस्टोरिकल मेमरी ॲण्ड आयडेनटी इन वेस्टर्न इन्डिया १७००-१९६०' या ग्रंथात मांडले आहे. पानिपतच्या तिसऱ्या युद्धाशी संबंधित 'भाऊसाहेबांची बखर' मधील मराठे, राजपूत आणि अफगाण या तीन समुदायांमधील सांस्कृतिक आणि संघटनात्मक भिन्नतेची रचना, त्यांची स्पष्टता तसेच त्यांमध्ये होणारे बदल यांच्याकडे 'मराठाज, राजपूतस ॲण्ड अफगानस् इन मिड-एटिंथ-सेंचुरी इन्डिया: भाऊसाहेबांची बखर ॲण्डद आर्टिक्युलेशन ऑफ कल्चरल डीफरेन्सेस इन प्री-कॉलोनिअल इन्डिया' या शोधनिबंधाच्या माध्यमातून अनिरुद्ध देशपांडे यांनी लक्ष वेधले आहे.

ऐतिहासिक दृष्टीकोनातून बखरींच्या संदर्भात उपरोक्त नव्या अध्ययनाने बखरींच्या कडे पाहण्याच्या दृष्टीकोनात अमुलाग्र बदल घडून आला आहे. सुरवातीला उल्लेखल्या प्रमाणे मराठा काळाच्या संदर्भात झालेल्या आधुनिक इतिहासालेखन प्रवाहामध्ये बखरींना आधुनिक इतिहासलेखनाच्या तसेच प्रत्यक्षवादाच्या कसोट्या लावल्या मुळे बखरींकडे बरेच दुर्लक्ष्य झाले. पुनर्जागरण काळात इतिहास या ज्ञानशाखेत झालेल्या बदलांचा प्रभाव आधुनिक इतिहास लेखनावर होता. या प्रभावात असलेल्या भारतासंदर्भात लिहिणाऱ्या पाश्चात्य इतिहासकारांनी भारतातील लोकांना इतिहाससंदर्भात ज्ञान नव्हते तसेच भारताला इतिहास नव्हता असे मानले. वसाहतपूर्व काळातील भारतातील साहित्यात काळासंदर्भात, तिथी संदर्भात स्पष्टता दिसत नसल्यामुळे तसेच या साहित्यांमध्ये भूतकालीन घटनांची नोंद ऐतिहासिक पद्धतीने केली नसल्याचे त्यांचे मत होते. मराठयांच्या भूतकाळाबाबत लिहिणाऱ्या भारतीय इतिहासकारांनी देखील वसाहतपूर्व रचनांकडे त्याच दृष्टीने पहिले आणि बखरींना इतिहासलेखनात विश्वासाहार्य साधन म्हणून नाकारले.

वसाहतपूर्वकाळातील भारतीयांना इतिहासाची जाण नव्हती का? त्यांना बदलणाऱ्या काळाबाबतचे भान नव्हते का? भूतकाळ अथवा घडून गेलेल्या घटना यांचे वसाहतपूर्वकाळातील भारतीयांच्या वर्तमानकाळात काहीच महत्व नव्हते का?अथवा त्यांची काहीच प्रासंगिकता नव्हती काय? बखरी

अथवा तत्सम वसाहतपूर्वकाळातील रचना, ज्या मध्ये भूतकाळाची माहिती अथवा घडून गेलेल्या घटनांचे कथन मांडण्यात आले आहे, त्यांना आधुनिक इतिहासाच्या कसोट्या लावल्या नंतर वरील प्रश्न निर्माण होतात.

बखरींच्या संदर्भात वरील प्रश्नांकडे पाहिल्यास काही रोचक तथ्य समोर येतात. वसाहतपूर्व काळात लिहिलेली प्रत्येक बखरीच्या सुरवातीला बखर लिहिण्याचे कारण-उद्देश स्पष्ट करण्यात आले आहे. उदा. सभासद बखर ही औरंगजेबाच्या आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांचे चरित्र म्हणून रचली आहे. घडून गेलेल्या घटनांची माहिती मिळवण्याची जिज्ञासा आणि ह्या घटनाक्रमाला कारणमीमांसेची जोड देत कथनाची केलेली रचना आपल्याला भाऊसाहेबांची बखर मध्ये पाहायला मिळते. भले बखरींतील अनेक घटना अथवा प्रसंगवर्णने ही अतिशयोक्तीपूर्ण अथवा ऐकीव माहितीवर आधारलेले असतील. पण या प्रसंगवर्णनामधून बखरकारच्या मनातील भूतकाळाच्या स्मृती आणि कल्पना यांचा अंदाज बांधता येतो. बखरी मध्ये आलेले प्रसंग, पोवाड्यातील प्रसंग यांच्यात ऐतिहासिक कथनांची नेमकी कशाप्रकारे देवाणघेवाण झाली याच्या अभ्यासातून आपल्याल्या ऐतिहासिक स्मृती कशाप्रकारे बदलत गेल्या हे समजून घेता येईल.

बखरींच्या कथनामध्ये प्रतिबिंबित झालेल्या विविध राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक, प्रादेशिक अश्या विविध पैलूंचे सातत्य आणि बदलांच्या संदर्भाने अभ्यास करता येऊ शकतो. बखरी मध्ये आलेले प्रादेशिक अथवा सामाजिक-सांस्कृतिक भिन्नतेचे दाखले हे तत्कालीन समाजातील अस्मितांचे स्वरूप स्पष्ट करण्यास मदत करते. बखरींच्या कथनामध्ये प्रस्तुत होणारे 'ते' आणि 'स्व' ह्या संकल्पना तत्कालीन तसे वर्तमानकालीन अस्मितांची घडवणूकीवर प्रकाश टाकतात. बखरींच्या लेखन मागची कारणे-उद्दिष्टे ही तत्कालीन राजकीय-सामाजिक संदर्भात समजून घेतल्यास सत्तासंबंध आणि सत्तेचे समर्थन यांचे स्वरूप समजून घेता येते. बखर लेखनपद्धतीचा वसाहतपूर्वकाळातील ज्ञान रचना करण्याची एक पद्धत म्हणून अभ्यास करता येऊ शकतो. वसाहतपूर्व भारतातील इतिहासाची समज, ऐतिहासिक स्मृती, ऐतिहासिक ज्ञानाची रचना, तिचे जतन आणि प्रसाराची पद्धत, 'ते आणि 'स्व' च्या कल्पना, अस्मितांची निर्मिती आणि स्वरूप इत्यादी पैलूंचे अध्ययन करण्यासाठी बखरींचे ऐतिहासिक दृष्टीकोनातून नव्याने अध्ययन करण्याची आवश्यकता आहे.

[1] एम्.एस.कानडे (संपा.), *'भाऊसाहेबांची बखर'*, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस, पुणे, द्वितीय संस्करण,२००४,पृ.१-३.

[2] यासंदर्भातील विस्तुत चर्चेसाठी पुढील ग्रंथातील संपादकीय लेख आणि प्रस्तावना पहा, आर.व्ही.हेरवाडकर(संपा.),*'मल्हार रामराव चिटणीस-विरचित थोरले शाहू महाराज यांचे चरित्र'*,व्हिनस प्रकाशन,पुणे,१९७६, आर.व्ही.हेरवाडकर(संपा.), *'कृष्णाजी अनंत सभासद विरचित शिव छत्रपतींचे चरित्र'*, व्हिनस प्रकाशन,पुणे,१९८६, आर.व्ही.हेरवाडकर(संपा.),*'ए फॉरगॉटन लिटरेचर: फाउंडेशनस ऑफ़ मराठी क्रोनिकल्स'*, पॉप्युलर प्रकाशन, बॉम्बे, १९९४, आर.व्ही.हेरवाडकर(संपा.),*'रघुनाथ यादव विरचित पानिपतची बखर'*, व्हिनस प्रकाशन, पुणे, तृतीय संस्करण, १९९७, आर.व्ही.हेरवाडकर(संपा.), *'श्री शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र: मल्हार रामराव चिटणीस विरचित'*,व्हिनस प्रकाशन, पुणे, द्वितीय संस्करण,२०००.

[3] संजय सुब्रमण्यम, डेविड सुलमन आणि व्ही एन राव, 'टेक्सटूअर ऑफ टाइम: राईटिंग हिस्टरी इन साउथ साउथ इंडिया १६००-१८००, पर्मनंट ब्लैक,रानीखेत,२००६.

[4] सुमित गुहा,*'स्पीकिंग हिस्टोरिकली: द चेंजिंग वॉइसेस ऑफ़ हिस्टोरिकल नरेशन इन वेस्टर्न इंडिया'*, अमेरिकन हिस्टोरिकल रिव्युव १०९,नं.४ (ऑक्टो.२००४):१०८४-२००४.

[5] प्राची देशपांडे, *'क्रीएटीव पास्ट: हिस्टोरिकल मेमरी अँण्ड आयडेनटी इन वेस्टर्न इन्डिया १७००-१९६०'*, पर्मनंट ब्लैक,रानीखेत,२००७,पृ.३९.

[6] अनिरूद्ध देशपांडे, *'मराठाज, राजपूतस अँण्डअफगानस इन मिड-एटिंथ-सेंचुरी इन्डिया: भाऊसाहेबांची बखर अँण्डद आर्टिक्युलेशन ऑफ कल्चरल डीफरेन्सेस इन प्री-कॉलोनिअल इन्डिया'*, नेहरू मेमोरिअल म्युझिअम अँण्ड लायब्ररी,ओकॅसिओनल पेपर : हिस्ट्री अँण्ड सोसायटी, न्यू सिरीज-१०,२०१३.

ISBN 978-93-5196-698-2

# बखर गद्य : वाङ्मयीन स्वरूप

**डॉ. केशव भीमाचार्य ताशी**
प्रमुख मराठी विभाग, एल्फिन्स्टन महाविद्यालय, मुंबई

बखर गद्य हा मराठी वाड्मयास ललामभूत झालेला लेखन प्रकार आहे. बखरकारांनी केलेले हे लेखन व त्याचे ऐतिहासिक अंग पाहाना, बखर हा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यासण्याचा लेखन प्रकार आहे. तसा तो वाड्मयीन अंगाने अभ्यास करण्यास भाग पाडणारा गद्य- लेखन प्रकारआहे. प्रथम बखर म्हणजे काय ते स्पष्ट करण्याचा यत्न करु, विविध व्याख्यांचा विचार करुन इतिहासाचार्य राजवाडे यांनी बखर या शबदाची व्युत्पत्ती सांगताना वक- वकणे म्हणजे बोलणे या शब्दापासूप बखर हा शब्द तयार झाला असे म्हटले आहे (वि.का राजवाडे ऐैतिहासिक पृ-३४८ पेशव्यांची बखर ३ संपा. प्रा.वि.म.कुलकर्णी, अ.रा.कुलकर्णी, अ.ना. देशपांडे, प्रास्ताविक पृष्ठ १० वरुन उद्धृत) बखर या शब्दाचा रुढार्थ राजकीय बातमी हा होय. मुसमानांच्या सहवासाने त्यांच्या नवारेखा पाहून मरराठयांनीही बखरी लिहिण्याचा प्रघात पडला. (तत्रैव, पृ-१०) बखर हा शब्द खबर या फारशी शब्दापासून वर्णव्यत्यासाने आला असावा असेही म्हटले जाते.बखरी म्हणजे चरित्र ग्रंथ असे वा.सी.बेंद्रे यांनीही म्हटले आहे.(तत्रैव, पृ-१०) बखर हया अरबी शब्दाच्या वर्ण्यविपर्यासामुळे बखर हा शब्द तयार झाला असेही एकमत आहे. खुशालीची हकीकत या अर्थाने असणाऱ्या विल-खैर या शब्दापासून बखर हा शब्द आला असेही म्हटले जाते. मुसलमानांच्या सहवासाने त्यांच्या ---- पाहून बखरी लिहिण्याचा प्रघात पडला असावा असे राजवाडे यांचे मत आहे. वकण्याच्या चामडयावर लिहिण्याच्या प्रथेवरुन वकर/ बखर अशी ही एक उत्पत्ती पुढे केली जाते. फारशी वळणाचा वखेर हा शब्द बखरचे पूर्व रुप सुचविणारा आहे.वखेरचा बखर होणे हे भाषाशास्त्रीय दृष्टयाही बरोबर आहे. फारशी बखर अखबार याच्याशी उच्चार सामग्य असणाऱ्या या शबदाला यावेळी जो रुढ अर्थ आणि ज्याचा उल्लेख राज्यव्यवहार कोशात केला आहे. तो आख्यायिका वखैर असा बखर शब्द मराठीत कसा आला, याबद्दल श्री. रं.कुलकर्णी यांनी दिलेली व्युत्पत्ती मान्य होण्यासारखी आहे.आपल्याकडील पत्रलेखनात मागील पिढील प्रथम क्षेमवा कुशल हे शब्द लिहिण्याचा प्रघात होता. या क्षेमकुशलचा फारशी भाऊ आहे बिल्टवेर वा वखैर वा या वखैरचे

बखर होणे हे भाषाशास्त्रीय दृष्टया मान्य होण्यासारखे आहे. बखरलेखाचे प्रयोगजन - बखर ही सामान्यतः कोणाच्या तरी आज्ञ ेने लिहिली जात असावी असे दिसते. सभासद बखर ही राजारामाच्या आज्ञेने लिहिली गेली.आपल्या पूर्वजांचा पराक्रम श्रवण करावा.त्यापासूप स्फुर्ती, प्रेरणा व संतता मिळावी हेच बखर निर्मितीच्या मागील प्रयोजन असावे.प्रयोजन विचार शूरवीरांची चरित्रे सांगणे त्यांनी मारलेल्या बढाया व केलेले पराक्रम यांची वर्णने करणे व तद्द्वारा नवीनांना मार्गदर्शन करणे. पेशव्यांकडे बखरनवीस असत जुनी कागदपत्रे पाहून बखरी सजविणे हा त्यांचा व्यवसाय असे. कालानुक्रमाने लिहिलेला पेशव्यांच्या वखारीत शिवाजी महाराजांच्या पासून ते शके १७०५ पर्यंतची हकीकत आढळते. महाराष्ट्रात स्वदेशाच्या इतिहासाची आस्था अठराव्या शतकात व एकोणीसाव्या शतकाच्या पहिल्या चतुर्थांत बरीच होती. त्यामुळे गेल्या शतकात व पंचवीस तीस वर्षापाठीमागे हया शतकांत महाराष्ट्र देशांत बखरी लिहिण्याचा व वाचनाचा फार सपाटा असे. बखर या संज्ञेने ज्या लेखनाचा बोध होतो त्या लेखनाचे स्वरुप मात्र सर्वत्र सारखेनाही .तरीही या साऱ्यांना उद्देशून बखर हा शब्द थोडयाशा सैल अथवा ढिल्या अर्थाने योजिला जातो.बखर लेखनामागील प्रेरणा अथवा प्रयोजन ज्या प्रकारचे त्यावरुन त्या बखर लेखनाचे स्वरुपही निश्चित झाल्याचे दिसणे तसेच विषयावरुनही बखरीचे वर्गीकरण आपणास करता येते.

१. चरित्रात्मक (उदा. सभासदकृत शिवछत्रपतींचे परीत्र)

२. आत्मचरित्रात्मक (उदा. नाना फडणिसांचे आत्मचरीत्र)

३. मुध्दवर्णनात्मक (उदा. पाणिपतची बखर, खडर्यांच्या स्वारीची बखर

४. सांप्रदायक (उदा. हनुमंतस्वामीची बखर)

५. वंशवर्णनात्यक (उदा. पेशव्यांची बखर, हरिवंशाची बखर भोसले वंशचरीत्र)

६. प्रसंग वर्णनात्मक (उदा. ब्रम्होंदस्वामींच्या निधनाची बखर इत्यादी. बखरी आढळतात. (उदा. बकासुराची बखर, तहाख्यानाची बखर) ऐतिहासिक विश्वसनीयतेच्या दृष्टीनेशी बखरींचे वर्गीकरण राजवाडयांनी केले आहे.

१. समकालीन बखरनिवासांनी लिहिलेल्या बखरी (उदा. सभासद विरचित शिवछत्रपतींचे परीत्र, चित्रगुप्ताविरचित शिवाजी महाराजांची बखर, भाऊसाहेआंची कफफियत, खडर्यांच्या स्वारीची बखर)

२. कर्णोकर्णी ऐकलेले वृत्तांत देणाऱ्या बखरी उदा. सोहोनीकृत पेशव्यांची बखर, ब्रहोद्स्वामींचे चरीत्र) आणि उ. पूर्वीच्या जून्या बखरीतील व टिप्पणीतील माहिती जशीच्या तशी किंवा काही फेर फार रिन इष्ट तेवढी माहिती देणाऱ्या बखरी (उदा. चिटणीसकृत शिवछत्रपतींचे सत्रप्रकरणात्मक चरीत्र, शिवदिग्विजय, शिवप्रताप) महाकावतीची बखरी, त्यातही महावतीची बखर आज सापडलेल्या बखरीत सर्वांत जूनी बखर आहे. अर्थात ती एक बखर नसून निरनिराळया काळी, निरनिराळया व्यक्तींनी लिहिलेली प्रकरणे असे तिचे स्वरुप आहे. इतर सर्व बखरींचे लेखन सामान्यतः मराठी शाहीज झालेले आहे. कृष्णाजी अनंत सभासद कृत व सभासदी बखर म्हणून संबंधिली जाणारी शिवछत्रपतींचे परीत्र सांगणारी बखर शिवाजींच्या मृत्युनंतर लगेचच १६९७ साली लिहिली आहे. इतर बहूतेक सर्व बखरी उत्तर पेशवाईत लिहिल्या गेल्या आहेत.

बखर पत्रप्रकार व वाडमय प्रकार

सभासद बखरीच्या प्रकाशनेत इतिहास संशोधक शं.ना.जोशी यांनी बखर हा एक पत्रप्रकारही असल्याचे विवेचन केले आहे. ते महणतात, बख

र हा एक पत्रप्रकार होता हे एक राजकीय व लोक व्यावहारीक पूर्ण प्रमाण असे सही शिक्क्यानिशी सिद्ध होत असलेले एक माहितीपत्र होते..कथपत्र, दुमालपत्र, अभयपत्र, देणगीपत्र इ. जसे व्यवहारात्मक कागद रीतीप्रमाणे सिद्ध होते, त्याप्रमाणे हे बखरपत्र तयार होई. न्यायनिवाडयाचे कामी साक्षपत्र, चौकशीपत्र अथवा माहितीपत्र म्हणून हा बखर कागद बनत असे. त्यावर शिक्का मोर्ताब होई तथापि बखर हा पत्रप्रकार वेगळा व वाडमय प्रकार वेगळा असेही श्री जोशी यांनी स्पष्ट केले आहे व बखर वाडमयाची पंचलक्षणात्मक व्याख्याही दिली आहे. ज्यांत विषय प्रतिपादन व्यावहारीक अंगाचे आहे.तात्विका वा साहित्य इत्यादीवर नाही. --- भांडी, भाषा मराठी, काळ यादवोत्तर व आंगळपूर्व असून लेखन गद्य आहे त्यास बखर म्हणावयाचे ऐतिहासिक प्रसंग, घटना व्यक्ती वा कालखंड या विषयी लिहिलेली माहितीपर गद्यग्रंथ म्हणजे बखर होय असे थोडक्यात म्हणता येईल.

(१९२) पृ.२८० मराठी वाङ्मयाचा पुर्नविचार, मेहता, पब्लिशिंग हाऊस, पूणे, वखनलेखन : एक नवचिंतन प.११ (प्रथमावृत्ती) ऑगस्ट १९८६ वरुन उद्धृत तसेच शिवकालीन बखरीत अनेक दोष असल्याचे त्यांचे प्रतिपादन आहे. चौथ्या खंडाच्या प्रस्तावणेत बखरींची स्थूल वर्गावारी करून शिवचरीत्रविषयक ज्या सभासदादी बखरींची त्यांनी तुलना केली आहे. आणि शंकास्थळे ही दर्शविली आहेत.यामागे बखरी इतिहास म्हणून अप्रमाण असल्याचे त्यांना दाखवून दयावयाचे आहे.तरीही अव्वल दर्जाचे नसल्या तरीही बखरी हा इतिहास आहे.तेव्हा बखरीचे हे ऐतिहासिक अंग महत्त्वाचे आहे.बखरीत स्थळ- काल वपरीर्यास असल्याने इतिहासाच्या तुलनेत त्या विश्वासार्ह ठरत नाहीत.अप्रमाण ठरतात.परंतू या सगळया दोषांनी युक्त बखर हा इतिहासच आहे असेच त्यांना म्हणयाचे आहे.

बखर म्हणजे इतिहास नव्हे हे मान्य केले तरी ते इतिहासाचे एक साधन म्हणून मानावयास प्रत्यवाय नाही.उदा.शिवाजीचे संपूर्ण चरित्र कृष्णाजी अनंत सभासदाच्या बखरीचे सहाय्य घेतल्याखेरीज व्यवस्थीत लिहीता येणार नाही.बखरकार हा इतिहासकार नाही तरीही त्याची भुमिका इतिहास लेखका पेक्षा फार वेगळी नसते वस्तूनिष्ठपणे काळाचा क्रम पाळून घटनांची मांडणी करणे म्हणजे इतिहास.इतिहास संशोधकाला ऐतिहासिक घटनांची कार्यकारण परंपरा शोधावी लागते.राजकीय स्वरुपाच्या इतिहासाची प्रकृती ही अशीच असते.कालसंगती हा या इतिहासाचा पाया होय. शिवाजी महाराजांच्या जन्ताची तिथी निश्‍चित करणारा वार. इतिहासकाराच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो.इतिहास जीवनाच्या इतरही अंगाना स्पर्श करतो.जसे सामाजिक, धार्मिक, आर्थिक इ.परंतू बकरींचा संबंध केवळ राजकीय इतिहासाशी असल्याचे स्पष्ट दिसते. विवक्षीत व्यक्तीला समोर ठेवून जेव्हा बखरीचे लेखन केले जाते. तेव्हा नायक या नात्याने त्या व्यक्तीचा पराक्रम बखरकार खुलवून सांगतो.

बखरीत इतिहासा संबंधी अनेक दोष स्थळे आढळून येतात.नकलकारांच्या चुका पदरचा घातलेला मजकूर मोडी वाचनाच्या चुका इ.बखरकार बऱ्याच वेळा त्याच्या स्मरणशक्तीवरही अवलंबून असतो.म्हणून बखरीतील विधाने ऐतिहासिक सत्य म्हणून स्विकारता येत नाही.ऐतिहासिक कागदपत्राच्या सहाय्याने ती पारखून घ्यावी लागतात.

बखरीचे वाङ्मयीन अंग :

इतिहासाच्या दृष्टीने बखरींना अव्वल स्थान नसले तरी वाङ्मयाच्या दृष्टीने उत्कृष्ट गद्य प्रकार म्हणून त्यांना गौरवीले जाते.इतिहासातील निर्जिव घटना इतिहास वजा प्रसंग व मृत व्यक्ती इ.संदर्भात त्यांने तपशील गोळा केलेले असतात.या रुक्ष गद्यप्राय निरस अशा घटना प्रसंगांना सजीव करणे मृतव्यक्तीत चैतन्य ओतणे हे महत्तवाचे काम बखरकार करत असतो.ऐतिहासिक कादंबरीकार व बखरकार यांच्यातही एक महत्त्वाचा फरक आहे.तो ही ध्यानात घेतला पाहिजे. इतिहासातील निर्जीव घटना प्रसंग व मृतव्यक्ती या सामुग्रीतून ऐतिहासिक कांदबरीकार संपूर्ण काल्पनिक सृष्टी निर्माण करतो व हा रुक्ष निर्जीव तपशील चैतन्यमय करुन या सर्व जिवंत व रुचीर अशा घटकांच्या सहाय्याने कलात्मक प्रत्यय देणारा एकात्म परीणाम साधत असतो. तसेच कलाकृतींना आवश्यक तेवढया भांगांची तो निवड करत असतो. बखरकार असा कलात्मक प्रत्यय देऊ शकत नाही तरी देखील ऐतिहासिक वस्तुस्थितीला चालती बोलती करण्याची मरगळ झडकून रोचकता निर्माण करण्याची किमया तो साधतो हे मात्र मान्य करावे लागते.

सगळयाच बखरींची वाङ्मयीन गुणवत्ता तपासून पाहता येणे स्थलाभावि शक्य नाही.परंतू पेशव्यांच्या बखरीचा विचार वाङ्मयीन दृष्टीने करता येईल.

ISBN 978-93-5196-698-2

# बखर वाङ्मयाचे स्वरूप व भाषाशैली

प्रा. सुनिता गोरख रोकडे
मराठी विभाग, आदर्श महाविद्यालय, विटा

प्रास्ताविक —

लेखन ऐतिहासिक असो किंवा वाङ्मयीन ते वाचकांपर्यंत पोहचते ते भाषेच्या माध्यमातूनच. बखरकार इतिहासातील घटनांची नुसती गोळा बेरीज करीत नाही.तो त्यांची संगती लावतो आणि ही संगती लावताना कथावस्तूची रचना करतो. व्यक्तींचा आणि घटना प्रसंगांचा रूपवेध घेतो. त्यांचा कार्यकारण भावाने संबंध जोडतो त्यासाठी आपल्या प्रज्ञेचा आणि प्रतिभेचा उपयोग करून घेतो. वाङ्मयदृष्टया एक नवनिर्मिती साधतो.

बखरींचे मूळ उद्दिष्ट केवळ इतिहासनिवेदनाचे नाही तर इतिहासकथा निवेदनाचे आहे. इतिहासाबरोबर कथानिवेदन आवर्जून ध्यानी घ्यावे लागेल. निवेदनात कथात्मकता नसेल तर 'बखर' आकृतिबंधाच्या दृष्टीने उभीच राहू शकत नाही. कथानिवेदन हा बखरवाङमयाचा महत्वाचा विशेष आहे.

बखर हा कथात्मक वाङ्मयप्रकार आहे. त्याला इतिहासाचे अधिष्ठान आहे. बखरीमधून ऐतिहासिक सत्याचे कण विखुरलेले आहेत. पण तो रूक्ष इतिहास नसतो. इतिहास जसा अमुक कालखंडापासून सुरू झाला. अमुक कालखंडात संपला हे सांगता येते तसे बखर वाङमयाचे असत नाही. बखरीस इतिहासाचे अधिष्ठान लाभले असले तरी तिच्यात बखरकाराच्या प्रतिभेच्या उत्कट विलासाचाही प्रत्यय येतो. रसाविष्कार स्वभावचित्रण, वर्णनशैली, दृष्टांत म्हणी वाक्प्रचार प्रवाही निवेदन कौशल्य नादमाधुर्य, अल्पाक्षर रमणीयता, गतिमानता, रंजकता इ. वाङमयीन गुणांनी बखरीची भाषा संपन्न आहे. या वाङमयीन वैशिष्टयांमुळे बखरीस इतिहासापेक्षा वाङ्मयीन कलाकृती म्हणून तिला महत्व अधिक आहे.

ओवी, अभंग, पोवाडा, लावणी हे लेखनाविष्कार जसे खास मराठी आहेत तसा 'बखर' हा देखील अस्सल मराठी लेखनाविष्कार आहे. जो एक स्वतंत्र वाङमय प्रवाह म्हणून उदयास आला. या वाङ्मय प्रवाहाच्या अभ्यासात मराठी सत्तेचा अत्कर्ष आणि ऱ्हास कसा झाला हे कळते त्याबरोबरच बखरीचे वाङ्मयीन स्वरूप स्पष्ट होते.

'बखर' या वाङ्मय प्रकाराचा 'महिकावतीची बखर' 'सभासद बखर', 'भाऊसाहेबांची बखर' या तीन प्रमुख बखरींच्या रचनावैशिष्टयांचे व भाषशैलीचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

बखर शब्दाची व्युत्पतिमीमांसा —

'बखर' म्हणजे आख्यायिका, आख्यायिका म्हणजे इतिहास कथा याच अर्थाने 'बखर' शब्द मराठीत रूढ झाला. 'खबर' या मूळ अरबी शब्दाचा वर्णविपर्यय होऊन 'बखर' शब्द मराठीत आला असे आजवर मानण्यात आले परंतु महिकावतीची बखर ते पेशव्यांची बखर या प्रदीर्घ कालात 'खबर' आणि 'बखर' हे दोन्हीही शब्द स्वतंत्रपणे येतात. याचाच अर्थ असा की 'खबर' आणि 'बखर' हया शब्दांचे अर्थ लेखनस्वरूप वेगवेगळे आहेत.

बखरीचे स्वरूप —

- प्रारंभी अवस्थेत बखर ही आख्यायिका म्हणून अवतरते.
- शिवकालात तिला चरित्रकथेचे माध्यम मिळते.

ISBN 978-93-5196-698-2

✧ पेशवेकालात बखरवाङ्मयाचा वैभवसंपन्न विकास झाला.

''बखरीचा अविष्कार 'गद्यात्मक' आहे आशय 'राजकीय इतिहासाचा' आहे. तर अभिव्यक्ती मात्र 'वाङ्मयीन' परंपरेशी नाते जोडून आहे.'' गद्य आणि पद्य अशा दोन प्रकारच्या रचनांमधून या वाङ्मयीन प्रकाराची निर्मिती झाली आहे. बखरीने आपल्या वाङ्मयगुणांनी एक स्वतंत्र परंपरा निर्माण केली ती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

बखरीचे अंतरंग –

बखरीत राजकीयदृष्टया इतिहास आणि वाङ्मयदृष्टया कथानिवेदन महत्वाचे असते. बखर इतिहासातील घटनांची संगती लावते. त्याला कथात्मक निवेदन हे बखरीचे व्यवच्छेदक लक्षण आहे.

बखर वाचकांनी वाचावी आणि श्रोत्यांनी ऐकावी यासाठी अभिव्यक्तीच्या विविधतेबरोबर रंजकता आली आहे.

बखरींची व्यभिव्यक्ती विविध प्रकारांतून झालेली आहे. कधी चरित्र तर कधी एखादा युध्दप्रसंग तर कधी एखादी घटना तर कधी दौलतींचे विशालरूप घेऊन बखर अवतरते.

बखरीत इतिहास असला तरी इतिहासाची रूक्षता नाही ती कधी अदभूतरम्य तर कधी अवतार कल्पना तर कधी चमत्कारपूर्ण वर्णन तर कधी स्वप्न दृष्टयांत येतात.

बखरीचे बहिर्रंग –

बखरीची सुरूवात पत्रलेखनाच्या मायन्याने होते. तशी ती कोणाच्या तरी आज्ञेने होते. आपल्या लेखनास राजाज्ञेची अधिकृतता आहे याचे हे निदर्शक असते. उदा. महिकावतीची बखर मालाडच्या देसला नायकोराव यांच्या आज्ञेने लिहिली. तर सभासद बखर छत्रपती राजाराम यांच्या आज्ञेवरून लिहिली.

पत्र लेखनाचे संकेत स्वीकारून जवळ जवळ सर्वच बखरींचे लेखन झालेले आहे.

बखरीची सुरूवात पत्रलेखनाने होते तर अखेर फलश्रुतीने होतो. प्राचीन वा मध्ययुगीन काळात वाचकांपेक्षा श्रोतावर्ग संख्येने अधिक होता. आपला ग्रंथ पुराणग्रंथाप्रमाणे घरोघरी जावा ही बखरकारांची लेखकनिष्ठ असल्याने लेखक व श्रोत्यांच्या वाचकांच्या संदर्भातही फलश्रुती महत्वाची आहे.

बखरीचे वाङमयीन स्वरूप –

१) भाषाशैली :

बखरवाङमयाच्या भाषाशैलीचे आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने विचार करता बखरीची भाषा ही केवळ गद्यलेखनाची भाषा नाही गद्य पद्य अभिव्यक्तीची भाषा आहे. बखरवाङमयाचा उगम कथाकथनाच्या प्रेरणेमधून झाला आहे त्यामुळे प्रारंभीक अवस्थेत लोककथांची भाषाशैली वापरली जाणे स्वाभाविक होते त्यामुळे ती लोकजीवनातील बोलीभाषेच्या जवळची आहे.

शिवकालात राजदरबाराची भाषा फार्सी होती. फार्सी शब्दांमुळे राजदरबारी थाटाची भाषा साकारली. स्वत: बखरकार राजदरबारी वावरणारे होते. त्यामुळे राजदरबारातील फार्सी भाषा व लोकजीवनातील भाषा परस्पर जवळ आल्या. त्यामुळे सभासद बखरीत याचे प्रत्यंतर दिसते. गद्यलेखनाची मराठी भाषाशैली या काळात अधिक प्रौढ आणि प्रगल्भ झाली.

पुढे राज्यव्यवहार कोशाने दिलेले संस्कृत भाषेचे नवे परिणाम स्विकारले त्यामुळे शिवकालीन भाषाशैलीत लोकजीवनातील मराठमोळी भाषा, राजदरबारांची फार्सी भाषा आणि सांस्कृतिक वारशाची संस्कृत भाषा यांचा त्रिवेणी संगम त्याकाळातील बखरीमध्ये पहावयास मिळतो.

बखरीची भाषाशैली वाङ्मय गुणाच्या दृष्टीने सरस आहे. कथेची गतिमानता सलग राहावी यासाठी आलेली लहान लहान वाक्ये, प्रासादात्मक शैली ही लोककथांच्या जवळची आहे. मराठी, संस्कृत आणि फार्सी या तिन्ही भाषांचा बखरलेखनात झालेला अविष्कार पुढील काळातील बखरींच्या प्रवाहात तसाच टिकून आहे.

बखर एक नवनिर्मिती —

बखरकार इतिहासातील घटनांची नुसती गोळा बेरीज करीत नाही. तो त्यांची संगती लावतो. कथावस्तूंची रचना करतो, घटना प्रसंगाचा रूपवेध घेतो, कार्य कारण भवाने संबंध जोडतो. वाङमय दृष्टया ती नवनिर्मिती साधतो.

कथानिवेदन —

बखरीचे मूळ उद्‌दिष्ट इतिहासनिवेदनाचे नाही तर इतिहास कथा निवेदकनाचे आहे. इतिहासाबरोबर कथानिवेदन आवर्जून ध्यानी घ्यावे लागते. निवेदनात कथात्मकता नसेल तर 'बखर' आकृतिबंधाच्या दृष्टीने उभीच राहू शकत नाही.

संवादलेखन —

बखरकारांच्या निवेदनशैलीमधील 'संवादलेखन' हा महत्त्वाचा घटक आहे. तो बखरींना कलात्मक पातळीवर घेऊन जातो. त्यात स्वगते, भाषणे, संभाषणे, आव्हाने आणि आवाहने यांचा समावेश होतो. बखरीतील संवादलेखनामुळे

- व्यक्ती आणि घटनांना जिवंतपणा लाभतो.
- इतिहासातील प्रसंग डोळयासमोर उभे राहतात.
- निवेदनास गतिमानता, नाटयात्मकता लाभते.
- संवाद लेखनामुळे कथानिवेदनाला एकसुरी चाकोरबध्द रूप येत नाही.
- संवादामुळे एखाद्या प्रसंगातील नाटय फुलत जाते.
- बखरीतील संवादलेखनामुळे आपणास नाटयवाचनाचा आनंद मिळतो.
- मराठयांच्या इतिहासांमधील प्रसंग चित्रणातील संवांदामधून ऐतिहासिक वातावरण निर्मिती झाली आहे. उदा. खलबते, वाटाघाटी, सल्लामसलत, सावधतेचे इशारे यात संवादलेखन आले आहे.

रसाविष्कार —

बखरीतील वीररसामुळे व्यक्तिरेखांना जिवंतपणा लाभला आहे. ऐतिहासिक घटना प्रसंग सजीव झाले आहेत. एखाद्या चित्रपटाप्रमाणे सगळा इतिहास आपल्या डोळयांसमोर उभा राहतो. वीरवृत्तीने भारलेल्या व्यक्ती, त्यांचे पराक्रम, सैन्याची वीरश्री, युध्दाची धुमश्चक्री इ. च्या अभिव्यक्तीत वीररसाचा उत्कट अविष्कार झालेला आहे. काव्यात्मता आणि रसवत्ता यांचा सुरेख समन्वयातून बखरकारांनी वीररसाला श्रृंगारले आहे. वीररसाबरोबरच सैन्याची वाताहत, पराभव, भयभीत अवस्था, पलायन यातून करूण रसाचा अविष्कार झालेला आहे. पुरूष व्यक्तिरेखांचा कारूण्यापेक्षा स्त्री व्यक्तिरेखांचे कारूण्य कांकणभर अधिक आहे. याचा प्रत्यय सतीप्रसंगामधून येतो. वीर आणि करूण रसांचा अविष्कार बखरील विविध प्रसंगाच्या व युध्दांच्या वर्णनामधून आपणास पहावयास मिळतो. हे दोन्ही रस हातात हात घालून येथे वाटचाल करीत आहेत.

वीर व करूण रसांबरोबर अदभूत रसाचा अविष्कार आगऱ्याहून सुटका, अफझलखानाचा वध, शाहिस्तेखानाचे पारिपत्य इ. प्रसंगातून उत्कटपणे होतो.

ISBN 978-93-5196-698-2

अशाप्रकारे वीर, करूण रसांबरोबर अद्‌भूत, बीभत्स, रौद्र आणि वत्सल या रसांचा कमी अधिक प्रमाणात अविष्कार बखरीमध्ये झाला आहे.

वर्णनशैली —

बखर वाङ्‌मयाने आपली एक स्वतंत्र वर्णनशैली निर्माण केली आहे. बखरीत व्यक्तिवर्णने, प्रसंगवर्णने, स्थलवर्णने आढळतात. बखरकार वर्णन करताना तो अनुभवलेल्या काळाशी, पुन्हा एकदा समरसून जातो. केवळ स्वत:च तो त्या गतकाळाशी समरस होत नाही तर वाचकांना आपल्याबरोबर त्या काळात नेण्याचे सामर्थ्य त्याच्या लेखणीत आहे आणि या वर्णनांमुळे बखरीची गुणवत्ता अधिक डोळयात भरते.

अ) व्यक्तिवर्णने—

व्यक्तिवर्णनात बखरीतील काहीव्यक्तिवर्णने वाचकांच्या कायम लक्षात राहतील त्यांच्या मन:पटलावर कोरली जातील अशी आहेत. बखरकार कधी भाष्य तर कधी निवेदन करीत जातो. त्यातून व्यक्तिदर्शन उलगडत जाते. या व्यक्तिवर्णनात कधी गौरव व कधी मानी, हट्‌टी, मनस्वी, आग्रही स्वभाचे दर्शन होते या व्यक्तिदर्शनातून व्यक्तीच्या जीवनाचा तसेच मानवी जीवनाचा वेध नेमका घेतला जातो. व्यक्तीच्या जीवनाचा नेमकेपणा टिपला जातो. उदा.

- भाऊसाहेब धैर्याचा मेरू
- नवाब शास्ताखान म्हणजे पादशाहीची प्रतिमाच दुसरी
- मुधोजी भोसले वय लहान, परंतू शहाणे फार
- मल्हारराव जे बोलले ते करील
- सखारामबापू केवळ निधडा मनसेबाज
- बाजी पासलकर महायोध्दा त्याच्या मिशा दंडा एवढया

सहज सुबोध भाषेत कमीत कमी शब्दांच्या सहाय्याने ऐतिहासिक व्यक्तिंची व्यक्तिचित्रे उभी केली त्यात स्त्रियांची व्यक्तिदर्शनेही लक्ष वेधून घेतात.

ब) स्थलवर्णन —

बखरीतील स्थलांचे वर्णन इतिहासदृष्टया मराठयांच्या इतिहासाशी, सांस्कृतिकदृष्टया लोकजीवनाशी आणि वाङ्‌मयदृष्टया कथारचनेशी एकजीव झालेले आहेत. निर्जीव स्थलांना बखरकारांच्या लेखणीने सजिवत्व प्राप्त करून दिले आहे. उदा.

- तीन वर्षे वसई भांडली
- मिरजेचा किल्ला मासपक्ष भांडला
- दिली म्हणजे हस्तिनापूर
- पानिपत म्हणजे कुरूक्षेत्र

क) युध्दवर्णन —

मराठयांचा इतिहास बखरींचा आशय आसल्याने युध्दांची वर्णने बखरीत येणे स्वाभाविक आहे. पण युध्दप्रसंगाच्या वर्णनात बखरकार विस्तार करीत नाही. कथानायकाचे दर्शन घडविणे हा प्रमुख हेतू असल्याने युध्दवर्णनास दुय्यम स्थान मिळते. तरीही युध्द प्रसंगाच्या वर्णनात युध्दातील गतिमानता, आवेश शस्त्रांचा मारा, यांचे प्रत्ययकारी वर्णन केलेले आढळते.कडाखा, झुंज, खणाखणी हे शब्द वर्णनात रंग भरतात. उदा.

- भाऊसाहेबांच्या बखरीतील युध्दप्रसंगाचे वर्णन —बाणांचा वर्षाव, मेघमालाप्रमाणे जाहला.
- मोठा कडाखा जाहला.
- झुजात धुराची व धुळीची एकदाच गर्दी व धुंदी जाहाली.
- कोणाचे तोंड कोणाचे दृष्टीस पडेनासे जाहाले.
- ऐसी आग जाहली. नंतर आगीचा मार राहून तलवारीची खणाखणी जाहली असे युध्द गलिमात कोणी केले नाही.

गतिमानता —

युध्दवर्णन म्हणजे गतिमान प्रसंगाचे गतिमान चित्रण तेथे ढिलाई, सुस्तपणा उपयोगाचा नाही. बखरकारांनी आपल्या शब्दामधून व प्रतिमांमधून गतिमानता साकारली उदा.

- एक प्रहर टिपरी जैशी शिमग्याची दणाणते तैसे —
- टिपरघाई जाहली
- हुतुतूची घाई घडीभर जाहली

- अशाप्रकारे बखरीत निवेदनकौशल्यात कथाकथाचे कौशल्य आहे.
  - अनेक प्रसंगाच्या नवनिर्मितीमुळे बखर ही इतिहासापेक्षा वेगळी निर्मिती आहे. ती एक कलाकृती आहे याचे प्रत्यंतर येते.
  - बखरकारांच्या कथानिवेदन शैलीमुळे तर ते जाणीवपूर्वक वाङ्मयनिर्मिती करणारे आहेत, हे स्पष्ट होते.
  - निवेदनातील संवादलेखन कौशल्यामुळे कथाप्रवाहास नाटयमयता, गतिमानता प्राप्त झाली आहे.
  - व्यक्तिवर्णन असो की स्थलवर्णन असो त्यांचे दृक्प्रत्ययी चित्रण केले आहे.
  - कथारचनेत प्रवाही निवेदन, गतिमानता, रंजकता या गुणांमुळे बखरींची परिणामकारकता साधली आहे.

बखरींची भाषा ही वाङ्मयाची भाषा आहे. त्यामुळे तिच्यात नादमाधुर्य, लयबध्दता, सुबोधता, काव्यात्मता, अल्पाक्षर रमणीयता, अनुभवसंपन्नता, शब्दसौष्ठव, विचारसौंदर्य आणि भावसौंदर्य अनेकविध वाङ्मयगुणांचे दर्शन घडते.

संदर्भ —


- महिकावतीची बखर
- सभासद बखर
- भाऊसाहेब बखर
- बखरवाङ्मय उद्‌गम आणि विकास — डॉ. संकपाळ बापू

ISBN 978-93-5196-698-2

# छत्रपती संभाजी महाराजांचे बखर वाड्:मयातील व्यक्तिदर्शनः एक ऐतिहासिक चिकित्सा

**प्रा. शशिकांत महादेव मोहिते**
इतिहास विभाग, आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा.

**प्रस्तावना:**

'बखर वाड्:मय' हा मराठी गद्यवाड्:मयाचा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार होय. ऐतिहासिक आणि वाड्:मयीन या दोन्ही दृष्टींनी बखरींचे स्थान निश्चितच महत्वपूर्ण ठरते. मध्ययुगीन कालखंडात विशेषत: मराठी सत्तेच्या काळात ऐतिहासिक घटना, प्रसंग, स्थल व व्यक्ति यांच्या आनुषंगाने बखर वाड्:मयाची निर्मिती मोठ्या प्रमाणावर झाली. बखर लेखनाचा मुळ आशय महाराष्ट्राच्या इतिहासाशी संलग्न आहे. इतिहासाचे 'साधन' म्हणून बखरींना दुय्यम स्थान दिले जात असले तरी भाषाशास्त्रीय दृष्टिकोणातून बखरींचे वाड्:मयीन मूल्य फार मोठे आहे. कल्पकता, सृजनशीलता, वर्णनशैली, रसाविष्कार व निवेदनशैली इत्यादी या विविध गुणधर्मांमुळे बखर वाड्:मय मराठी साहित्यामध्ये आपले वेगळे स्थान निर्माण करते. तथापि स्थल, काल व व्यक्तिविपर्यास, प्रसंग आणि कारणविपर्यास, अतिरंजकता अवतारकल्पना, कल्पित दंतकथा, पौराणिक वंशावळींचे संदर्भ आणि संदिग्ध स्वरुपाचे लिखाण इ. या दोषांमुळे ऐतिहासिक दृष्ट्या बखरींच्या विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होतो. त्यामुळेच प्रस्तुत शोधनिबंधात मराठ्यांचा इतिहासातील एक शौर्यशाली राजा छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर बखरकारांनी केलेले लिखाण आणि ऐतिहासिक वस्तुस्थिती यांची चिकित्सा करण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे.

**'बखर' शब्दाची उत्पत्ती:**

'बखर' या शब्दाच्या उत्पत्तीविषयी विविध मते आढळतात. 'बखर'या शब्दाची 'बखेर', 'बखैर' अशीही रुपे आढळतात. 'बखर' हा शब्द अरबी 'खबर' या शब्दाचा वर्णविपर्यय आहे असे मानण्यात येते. 'खबर' या शब्दाचा अर्थ वार्ता, माहिती, समाचार असा आहे. १ विविध विद्वानांची 'बखर' या शब्दाविषयीची मते पुढील प्रमाणे सांगता येतील.

* १) कै. वि. का. राजवाडे: 'बक' म्हणजे 'बकणे' आणि 'बकणे' म्हणजे बोलणे या धातूपासुन 'बखर' या शब्दाची निमिर्ती झाली आहे.
* २) श्री. वा. गो. आपटे: बखर म्हणजे गद्य इतिहास चरित्र होय.
* ३) श्री. मा. वि. पटवर्धन: बखर म्हणजे बातमी, हकिकत किंवा इतिहास होय.
* ४) श्री. श. ना. जोशी : बखर हा पत्रप्रकार असुन त्यावरील शिक्का मोर्तबामुळे तो सर्वथा प्रमाण मानण्यात येत होता.
* ५) श्री. वा. सी. बेंद्रे : बखर म्हणजे चरित्रगंथ होय.
* ६) श्री. श्री. रं. कुलकर्णी : फारसी बिलखैर (क्षेत्र) किंवा अरबी 'बकर' म्हणजे लेखनासाठी उपयोजिले जाणारे बकरीचे चामडे या वरुन बखर हा शब्द रुढ झाला असावा. २ थोडक्यात ऐतिहासिक घटना, प्रसंग, वार्ता बातम्या आणि इतिहास पुरुषांची चरित्रे याविषयीची माहिती देणारे इतिवृत्तांत म्हणजे 'बखर' होय.

**✻ छ. संभाजी महाराजांचे बखर वाड्:मयातील व्यक्तिदर्शन:**

मराठ्यांच्या इतिहासातील एक तेजस्वी, शौर्यशाली, धैर्यवान, प्रतिभाशाली व बाणेदार व्यक्तिमत्व म्हणजे छ.संभाजी महाराज होय. आपल्या अवघ्या आठ-नऊ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीमध्ये बलाढ्य दिल्लीपती औरंगजेबाविरुद्ध एकाकी झुंज देणारा रणझुंजार सेनापती, सिद्दी व पोर्तुगिजांविरुद्ध वेगवेगळ्या आघाड्यांवर लढणारा कुशल युद्धनेता, स्वराज्याच्या भुमीचे संरक्षण करणारा स्वराज्य रक्षक आणि निधड्या छातीनिशी अमानुष व क्रुरपणे दिल्या गेलेल्या

मृत्युदंडाला निर्भिडपणे सामोरा जाणारा 'शंभुराजा' म्हणजे मराठ्यांच्या इतिहासातील 'अनमोल रत्नच' होय. परंतु सभासद बखर, शिवदिग्विजय बखर, मराठी साम्राज्याची छोटी बखर आणि मल्हार रामराव चिटणीसकृत 'श्री शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्म चरित्र' व 'श्रीमंत छत्रपती संभाजी महाराजांचे चरित्र' या सारख्या बखर वाङ्:मयामध्ये बखरकारांच्या पूर्वग्रह व आकसयुक्त दृष्टिकोणामुळे छत्रपती संभाजी महाराजांची प्रतिमा स्वराज्यद्रोही युवराज, उग्रप्रकृती संभाजी, व्यसनी, दुर्वर्तनी, स्त्रीलंपट संभाजी अशा विविध पात्रामध्ये रंगविलेली दिसून येते. ही बाब खरोखरच दुर्देवी व खेदजनक आहे. त्यामुळे बखर वाङ्:मयातील संभाजी महाराजांचे व्यक्तिमत्व आणि ऐतिहासिक वस्तुस्थिती यांचा शोध घ्यावा लागतो. हा शोध पुढीलप्रमाणे घेता येईल.

*** युवराजांचा स्वराज्यद्रोह:**

शिवचरित्रातील एक क्लेशदायक परंतु सत्य घटना म्हणजे, १३ डिसेंबर १६७८ रोजी युवराज संभाजीराजे मोगल सरदार दिलेरखानास जाऊन मिळाले. या घटने विषयी बखरींचा एकंदरीत सुर ''संभाजी राजे रुसुन मोगलांकडे गेले'' असा आहे. सभासद बखरीत, ''इतकियात संभाजी राजे, राजियांचे जेष्ठ पुत्र राजियांवर रुसुन मोगलाईत गेले ते जाऊन दिलेखानाला भेटले मग त्यांनी बहुत सन्मान करुन वागविले'' ३ असा उल्लेख येतो. श्रीशिवदिग्विजय बखरीतील उल्लेखानुसार, ''रायगडी संभाजी राजे आणि कारभारी निळोपंत मुजुमदार यांच्यातील वैमनस्यामुळे महाराजांनी संभाजीराजांची निर्भत्सना केली. त्यामुळे संभाजीराजे मोगलांना जाऊन मिळाले.'' ४ चिटणीस बखरीत रायगडावरील शीतलागौरी समारंभ व त्या समारंभावेळी हळदीकुंकवास आलेल्या एका सुवासिनी स्त्रीशी संभाजी राज्यांनी केलेला व्याभिचार हा धागा पकडून छ.शिवाजी महाराज आपल्याला मोठी शिक्षा करतील या भितीने संभाजी राजे मोगलांना जाऊन मिळाले असा तर्क काढला आहे. ५ या पार्श्वभूमीवर या मुद्द्याची वस्तुस्थिती जाणून घेणे महत्वाचे ठरते. कर्नाटक मोहिमेवर जाण्यापूर्वी महाराजांनी युवराजांना शृंगारपूर येथे ठेवले होते. कर्नाटकातुन परत येताच प्रधानांच्या तक्रारींमुळे महाराजांनी संभाजी राजांची प्रत्यक्ष गाठ न घेता परस्परच त्यांना सज्जनगडावर रामदास स्वामींच्या भेटीस जाण्यास सांगितले. सज्जनगडावर रामदास स्वामींची भेट झाली नाही. या स्थितीत प्रधानांचा कांगावा आणि वडिलांचा अविश्वास या द्विधा मन अवस्थेत ''स्वत:चा उपेक्षित पराक्रम सिद्ध करण्यासाठी आणि दिल्लीन्द्राच्या सैन्याची खडान्खड बातमी घेण्यासाठी संभाजी राजे मोगलांना मिळाले'' असा तर्क श्री. शरद पाटील यांनी काढला आहे. ६ त्यामुळे रुसुन जाणे हा मुद्दा अनैतिहासिक ठरतो.

*** उग्रप्रकृती संभाजी:**

बखरकारांनी रंगविलेली संभाजी राजांची ही अजुन एक प्रतिमा होय. सोयराबाईंना भिंतीत चिणुन मारणे, मंत्र्यांना ठार करणे आणि शिर्क्यांचे शिरकाण करणे या मुद्द्यांच्या आधारे संभाजींची उग्रप्रकृती रंगविलेली आहे.

चिटणीस बखरीत ''संभाजी राजे पन्हाळ्यावरुन रायगडला आले व सोयराबाईंकडे जाऊन तुम्ही राज्यलोभास्तव महाराजांस विषप्रयोग करुन मारिले असा आरोप करुन तिला भिंतीत चिणले. त्यानंतर तिसरे दिवशी तिचा प्राण गेला ७ असा वृत्तांत उपलब्ध आहे. परंतु उपलब्ध साधनांची चिकित्सा केल्यास, छत्रपती संभाजी महाराज रायगडावर आल्यानंतर सव्वा वर्षापर्यंत सोयराबाई जिवंत होत्या असे दिसते. ८ तसेच बाकरे दानपत्रात, ''जिचे हृदय स्फटिकांप्रमाणे स्वच्छ व सौजन्ययुक्त आहे अशी माता'' असा संभाजी राजे सोयराबाईबद्दल उल्लेख करीत असल्याचा पुरावा मिळतो. या वरुन सोयरा बाईंना भिंतीत चिणुन मारले हा बखरकारांचा दावा फोल ठरतो. संभाजी राजांनी मंत्र्यांना ठार केले म्हणून संभाजी उग्रप्रकृती ठरतात हा बखरकारांचा दावा सुध्दा फोल ठरतो. कारण संभाजी महाराजांविरुद्ध केलेल्या पहिल्या कटात सहभागी

असणाऱ्या मंत्र्यांना छत्रपती संभाजीमहाराजांनी ठार केले नव्हते तर कैद केले होते. त्यापैकी अण्णाजी दत्तो व मोरोपंत पिंगळे यांची संभाजी राजांनी स्वत:च्या राज्याभिषेकावेळी सुटकाही केली होती. अण्णाजी दत्तोंना सचिव पदाऐवजी मुजुमदार पद देऊ केले होते. तर मोरोपंतांच्या नैसर्गिक मृत्युनंतर त्यांचा मुलगा निळोपंत याची पेशवेपदी नेमणुक केली होती. परंतु ३० ऑगस्ट १६८१ रोजी अन्नातून विषप्रयोग करुन छत्रपती संभाजी महाराजांना ठार करण्याचा दुसरा कट रचला गेला. छत्रपती संभाजी महाराजांच्या सुदैवाने हा कट उघडकीस आला त्यानंतर मात्र कटामध्ये सहभागी असणाऱ्या अण्णाजी दत्तो, सोमजी दत्तो, बाळाजी आवजी चिटणीस, शामजी आवजी, हिरोजी फर्जंद या सारख्या २०-२५ लोकांना राजांनी हत्तीच्या पायी देऊन ठार केले. राजांचे हे कृत्य खरेतर एका राज्यकर्त्याला शोभेल असेच होते. त्यामुळे मंत्र्यांना ठार मारणे हा आरोप खोटा ठरतो.

चिटणीस बखरी मध्ये ''शिर्क्यांचे शिरकाण केले'' असा संभाजी महाराजांवर आरोप केला आहे. वास्तविक 'शिरकाण' या शब्दाचा अर्थ शिर्क्यांच्या ताब्यातील प्रदेश असा आहे. परंतु 'शिरकाण' म्हणजे शिर कापणे किंवा कत्तल करणे असा चुकीचा अर्थ बखरकारांनी घेतल्यामुळे संभाजी महाराजांविषयी गैरसमज झाला आहे. ९

*** दुर्वर्तनी संभाजी:**

परस्त्रीविषयी वाटणाऱ्या विषयासक्तीतुन केलेला व्याभिचार हा धागा पडकून बखरकारांनी संभाजींना 'स्त्रीलंपट' ठरविले आहे. चिटणीस बखरीत रायगडावरील शीतलागौरी समारंभ व या समारंभावेळी हळदीकुंकवास आलेल्या कोणा एका सुवासिनी स्त्रीशी संभाजी महाराजांनी केलेला व्याभिचार हा संदर्भ देऊन संभाजी राजांना दुर्वर्तनी ठरविले आहे. पुढे हेच 'गोदावरी प्रकरण' म्हणुन गाजले. तथापि या प्रसंगाला अनुसरुन अनेक प्रश्न उपस्थित होतात. रायगडावरील या प्रसंगातील ती स्त्री कोण? कोणाची? याचाकाही एक संदर्भ मिळत नाही. छत्रपती शिवाजीं सारख्या स्त्रीयांचा सन्मान करणाऱ्या राजाचा मुलगा, जिजाबाईच्या संस्कारात वाढलेला संभाजी असे दुष्कृत्य करु शकेल का? असे प्रश्न उपस्थित होतात. चिटणिस बाखरीत औरंगजेबाच्या केदैतील संभाजीला औरंगजेब धर्मांतराच्या अटीवर जीवदान देण्यासंबंधी आमिष दाखवितो त्यावेळी ''तुमची बेटी द्यावी म्हणजे बाटतो'' असे प्रतिउत्तर संभाजी औरंगजेबाला देतो असा प्रसंग वर्णन केलेला आहे. १० यावरुन पुढे झेबुन्निसाचे नाव संभाजी राजांशी जोडण्याचा खोडसाळ प्रयत्न काही लोकांनी केला. खरे तर झेबुन्निसा आणि संभाजी यांच्या वयात १९ वर्षांचे अंतर होते. शिवाय झेबुन्निसा सालिमगड येथे कैदेत होती ती दक्षिणेत कधी आलीच नाही तरी सुध्दा संभाजीबरोबर तिचे नांव जोडणे शुद्ध अनैतिहासिक ठरते. या शिवाय थोरातांची कमळा, तुळशी राधाबाई, सुरंग, शेवंता, हंसा या स्त्रियांबरोबर संभाजीराजांचे नांव जोडून संभाजींची प्रतिमा स्त्रीलंपट करण्यामध्ये साहित्यीकांची प्रतिभा खर्ची पडली.

*** बेसावध व व्यसनी संभाजी:**

छ. संभाजी महाराज अखेरच्या क्षणी बेसावध असताना शत्रुकडून पकडले गेले. याचा अर्थ बखरकारांनी ते नशेत असताना पकडले गेले असा लावला आहे. चिटणिसकृत बखरीमध्ये ''कबजीने संभाजी राजांना वश केल्याने ते बेहोष आहेत असे औरंगजेबाला समजताच त्याने संभाजीला पकडण्यासाठी शेख निजामला पाठविले. तेंव्हा संभाजी राजे बेहोष-तजवीज तयारी काही एक नाही अशा परिस्थितीत त्यांना पकडले '' असा उल्लेख आढळतो. म्हणजे बखरकार संभाजी महाराजांवर बेसावधपणाचा व व्यसनीपणाचा आरोप करतात. विशेषत: चिटणिसांनी वापरलेल्या 'बेहोष' हा शब्द व्यसनाशी संबंध दर्शवितो. शृंगारपुरास शाक्त पंथाच्या प्रभावामुळे संभाजी मद्य, मांस, मुद्रा, मत्स्य आणि मैथुन या पंचकाराच्या अधीन गेला होता असा बखरकारांचा आरोप आहे. पण तो खरा वाटत नाही,. कारण शृंगारपुरला असताना संभाजी राजे व्यायाम,

धनुर्विद्या व इतिहासाचा अभ्यास करीत होते असा दाखला मिळतो. मग उरतो प्रश्न तो बेसावधपणाचा. या काळातील न्याय निवाड्याची जी कागदपत्रे उपलब्ध आहेत त्यावरुन छत्रपती संभाजी महाराज शेवटपर्यंत आपल्या लोकांच्या तक्रारींचे निवारण करण्यात व्यस्त होते हे सिद्ध होते. असा व्यस्त राजा बेसावध राहणे शक्य नाही.

**निष्कर्ष:** वरील विवेचनावरुन बखरवाङ्‌मयातील संभाजींचे व्यक्तिदर्शन आणि संभाजी महाराजांचे वास्तविक व्यक्तिमत्व यातील फरक लक्षात येतो. खरे तर वाङ्‌मय आणि इतिहास यांच्यात अतिशय जवळचा संबंध असतो. वाङ्‌मयापासून इतिहास आणि इतिहासापासून वाङ्‌मय वेगळे करता येत नाही. तथापि इतिहास संशोधनाच्या शास्त्रीय कसोट्या लावल्यास वाङ्‌मयातून ऐतिहासिक सत्य बाजुला काढून घेता येते व त्याच वेळी वाङ्‌मय मूळ स्थितीत ठेवता येते. असे केल्यामुळे दोहोंचे महत्व व स्थान अबाधित राहते. बखर वाङ्‌मयातील संभाजींच्या बाबतीत असे केल्यामुळे वाङ्‌मयातील संभाजी महाराजांची प्रतिमा 'ऐतिहासिक संभाजी' म्हणून वेगळी होते व त्याचवेळी बखरींचे वाङ्‌मयीन मुल्यही अबाधित राहते.

**संदर्भ:**


१) डॉ. संकपाळ बापूजी : बखरवाङ्‌मय उद्‌गम आणि विकास, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे

२) डॉ. पाटील बी. एन : प्राचीन महाराष्ट्र वाङ्‌मय वैभव, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.

३) डॉ. मोहोड शालिनी : शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज, कलादत्त प्रकाशन, पुणे.

४) डॉ. मोहोड शालिनी : उपरोक्त

५) श्री. देशमुख विजयराव : शककर्ते शिवराय (उत्तरार्ध), छत्रपती सेवा प्रतिष्ठान, नागपूर.

६) श्री. पाटील शरद : शिवाजीच्या हिंदवी स्वराज्यांचे खरे शत्रु कोण-महंमदी की ब्राम्हणी? खंड-२ भाग-२ मावळाई प्रकाशन, शिरुर

७) डॉ. मोहोड शालिनी : उपरोक्त

८) श्री. बेंद्रे वा.सी. : छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र, प्राज्ञ पाठशाळा, वाई.

९) डॉ. मोहोड शालिनी : उपरोक्त

१०) डॉ. ग्रामोपाध्ये गं. ब. : मराठी बखर गद्य, व्हीनस प्रकाशन, पुणे.

ISBN 978-93-5196-698-2

# सभासद बखरीतील लोकतत्त्वे

**डॉ. प्रकाश दुकळे**
देशभक्त आनंदराव ब. नाईक कॉलेज चिखली. ता. शिराळा, जि. सांगली.

मानवी जीवनाचा इतिहास आणि प्राचीन समाजजीवन यांचा अभ्यास लोकसाहित्याच्या अभ्यासाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. धर्म, संस्कृती, आचार, विचार, रूढी प्रथा, परंपरा, कला, वाङ्‌मय जाणून घेण्यासाठी लोकसाहित्याचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. वर्तमान समाजजीवनात रूढ असलेल्या परंपरांचा मागोवा घेण्यासाठी लोकसाहित्याची मदत घेणे आवश्यक असते. लोकसाहित्यात त्या त्या देशाच्या, प्रदेशाच्या लोकजीवनाचे आणि लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब पडलेले असल्याने लोकसाहित्याचा अभ्यास विविध अंगांनी करता येतो. लोककथांचे उगम आणि इतिहास यांचा शोध ऐतिहासिक अभ्यास पध्दतीव्दारे करता येतो. लोकसाहित्याचे अनेक विशेष लिखित साहित्याने स्वीकारलेले दिसतात. लोकसाहित्यात कथनपरंपरा आहे. ही परंपरा माध्ययुगीन आणि आधुनिक कथात्मक साहित्यात अविष्कृत झाली आहे. बखर वाङ्‌मय हे कथनात्म असल्यामुळे बखर वाङ्‌मयाच्या परिपूर्ण आकलनासाठी लोकतत्वीय अभ्यासपध्दती महत्त्वाची ठरते. कोणताही वाङ्‌मय निर्माता समकालीन सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणात जीवन जगत असतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण लोकपरंपरेने केलेली असते. त्यामुळेच त्याच्या अनुभवविश्वाचा अविष्कार होत असताना लोकतत्त्वे प्रकट होत असतात.

डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या मते, ङ्ग जो साहित्यिक लोकाभिमुख असतो तो लोकजीवनातील परंपरांनी प्रभावित होतो आणि त्यानुसार आपले लेखन करतो. त्याच्या दृष्टीने हे लोकसाहित्य म्हणजे संजीवक सामर्थ्य असते. त्यामुळे संपूर्ण लोकसाहित्यालाच मलोकत्त्वफ म्हणावे.फ्फ१ या व्याख्येवरून आपल्या लक्षात येते की, शाब्द लोकसाहित्य आणि व्यक्तिनिर्मित वाङ्‌मय यांचा परस्पर संबंध असतो. विधीनाट्य, नाट्यविधी,भ्रम, समजूती, म्हणी, वाक्प्रचार, लोकगीते, लोककथा, जादूटोणा, तंत्र-मंत्र, लोकरूढी, उत्सव, सणवार, शिल्पकला, नृत्यकला, लोकनाट्य यांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष उल्लेख लिखित साहित्यात येत असतात. साहित्य निर्मितीत लोकसाहित्यातील बराचसा भाग कळत-नकळत प्रकट होत असतो. याचे महत्वाचे कारण म्हणजे ग्रंथकर्ता समकालीन सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणात जीवन जगत असतो. त्यामुळेच त्यांच्या लेखनातून लोकत्वे प्रकट होत असतात.

**सभासद बखर**

शिवपूर्वकालात मबखरीफ सारखा एक महत्त्वपूर्ण वाङ्‌मय प्रकार मराठी गद्य साहित्यात अवतरला. बखरीवरून इतिहास समजतो. मसभासद बखरफ हा शिवचरित्राचा जवळचा पुरावा आहे. प्रत्येक बखरीचे स्वरूप तिच्या लेखकाच्या सामर्थ्यावर अवलंबून असलेले दिसते. आपल्या निवेदनात स्वतः रंगून जाऊन वाचकालाही त्याचा प्रत्यय आणून देण्याचा बखरकाराचा खटाटोप असतो. या संदर्भात बखरलेखन या अर्थी मबखर सजिवणेफ हा शब्दप्रयोग स्वतः बखरलेखक वापरीत असत. या वाङ्‌मय प्रकाराचे अधिष्ठान इतिहास लेखन हे आहे. इतिहासाच्या आधारावर बखरी लिहिल्या गेल्या. किंबहूना बखरकारांना त्यांच्या आश्रयदात्यांकडून इतिहास लेखनाचाच आदेश दिला गेल्याचे आढळते.

सभासद बखरकार काही वेळा मचरित्रफ व मचरित्र-आख्यानफ हे दोन्ही शब्द आपल्या बखरीच्या संदर्भात योजतो. बखरकाराच्या समोर लेखनाचे जे आदर्श होते, त्याचे दर्शन त्यात घडते. सभासदांच्या समोर आपल्या प्राचीन परंपरांचे आदर्श होते. रामायण, महाभारत, आख्याने, पुराणे यांचा आदर्श बखरकारासमोर होता. शिवाजी महाराजांना सभासद ईश्वरी अंश किंवा ईश्वरी अवतार समाजतो.

**सभासद बखरीतील लोकतत्त्वे :** कोणताही लेखक समकालित सामाजिक आण सांस्कृतिक पर्यावरणात जगत असतो. बखरकारांच्या समकालात देव-देवतांवर श्रध्दा ठेवणारा समाज होता. भूत-खेत, धर्म, संस्कृती, रुढी, परंपरा इत्यादी लोकमानस मानणार बखरकार असल्यामुळे बखरीमध्ये या पध्दतीची अनेक वर्णने आली आहेत. शिवरायांच्या जन्माच्या पूर्वी शहाजीराजांना जो दृष्टान्त झाला, त्याचे वर्णन करताना सभासदकार म्हणतो, ङ्ग रात्री श्रीशंभुमहादेव स्वप्नात येऊन प्रसन्न होऊन बोलिला जें, तुझ्या वंशात आपण अवतार घेऊं देवब्राम्हणाचे संरक्षण करून म्लेंछांचा क्षय करतो. दक्षण देशांचे राज्य देतो. म्हणोन त्रिवार वचन करून वर दिला. फ्फ२ या विधानात श्रीशंभुमहादेव स्वप्नात येणे, भोसले वंशात देव अवतार घेण्याचे वचन देणे या बाबी म्हणजे लोकतत्त्वे होत.शिवजन्माच्या वेळी बखरकार लिहितो, ङ्ग जिजाई आऊ, तिचे पोटी राजश्री शिवाजीराजे पुत्र होतांच श्रीशंभुमहादेव जागृती येऊन स्वप्न जाले की, आपणच अवतरलो आहे. पुढे बहुत ख्यात करणे आहे. फ्फ३ शंभूमहादेव शिवाजी महाराजांच्या जन्मानंतर स्वप्नी येणे आणि किती वर्षे आपण किर्ती करतील हा दृष्टांत लोकमानसातून अविष्कृत झाला आहे.

शिवाजी महाराजांना कैद करण्यासाठी आलेला अफजलखान श्रीभवानीच्या मूर्ती फोडून, जात्यात भरडून त्याचे पीठ करतो. त्यावेळी आकाशवाणी होते की, ङ्गअरे अफजलखाना, नीचा, आजपासून एकविसावे दिवशी तुझे शिर कापून तुझे लष्कर अवघे संहार करून नवकोटी चामुंडास संतृप्त करिते. फ्फ४ अशी अश्रणी जाहाली. सभासदाने शिवाजी महाराजांचे मोठेपणा आणि ईश्वरीत्व सिध्द करण्यासाठी पुराणकथातील आकाशवाणी या घटनांचा आधार घेतल्याचे दिसते. अफजलखान वधाच्या आदल्या दिवशी तुळजापूरच्या श्रीभवानीने महाराजांना मूर्तिमंत दर्शन दिले आणि बोलली की, ङ्गआपण प्रसन्न जाहालो. सर्वस्वे साह्य तुला आहे. तुझे हाते अफजलखान मारवितो तुजला यश देतो. तू काही चिंता करू नको. फ्फ५ असे स्वप्नातील दृष्टांत सभासद बखरीमध्ये अनेक ठिकाणी चित्रित झाले आहेत. अफजलखानाचे वर्णन करताना त्याची बरोबरी दुर्योधनाच्या दृष्टबुध्दी स्वभावासी केली आहे. तर शाहिस्तेखान म्हणजे रावण आणि दिलेलखान म्हणजे हेडंब राक्षस तसेच अफजलखानाचा वध करणारे महाराज म्हणजे भीमच ! कौरव आणि पांडव युध्दाचे दाखले देऊन पौराणिक प्रतिमा बखरकाराने वापरल्या आहेत.

शिवरायांच्या महाप्रस्थानाचे वर्णन करताना बखाकार म्हणतात, ङ्गराजियांनी... योगाभ्यास करून आत्मा ब्रम्हांडास नेऊन, दसव्दारे फोडून प्राणप्रयाण केले.... त्यानंतर शिवदूत विमान घेऊन आले आणि (राजे) विमानी बैसून कैलासास गेले शिवरायांचे अवतारीत्व सिध्द करण्यासाठी सभासदाने सदर वर्णन केले असावे. अशा घटना ह्या पौराणिक कथामधून सापडतात. त्या लोकमानसामध्येही सापडतात. त्याचा आधार बखरकाराने घेतल्याचे जाणवते.

**समारोप :**

लोकतत्त्वीय अध्ययनपध्दतीमुळे वाङ्:मयीन कलाकृतींचे अधिक समृध्द परिपूर्ण आकलन होऊ शकते. लोकसमूहाच्या जीवनाचे निराळेपण प्रकट होते. अलौकीक पुरूषांच्या कृतींचा अर्थ लावता येतो. शिवरायांचे जीवन शौर्य, पराक्रम, आणि अद्‌भूत घटनांनी समृध्द आहे. त्यांच्या जीवनाचा अर्थ सभासदकारांने तत्कालिन जीवनपध्दतीने लावला आहे. तो लोकतत्वीय पध्दतीने अधिक समजून घेता येतो. त्यामुळे शिवरायांचा पराक्रम अधिक गडद होतो.

**संदर्भ :**

१. संतसाहित्य आणि लोकसाहित्य : काही अनुबंध, रा. चिं. ढेरे, राजहंस प्रकाशन, पुणे पृ. क्र. १५

२. सभासद बखर, संपादक : डॉ. यू. म. पठाण, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे २०००, पृ. क्र. ३५

३. तत्रैव, पृ. क्र. ३५ ४. तत्रैव, पृ. क्र. ४० ५. तत्रैव, पृ. क्र. ४१

ISBN 978-93-5196-698-2

# बखर वाङ्मय : स्वरूप व संकल्पना

कु. तृप्ती सुरेश काटकर
बी. ए. भाग ३ मराठी विभाग, आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा

**प्रस्तावना :**

कोणत्याही भाषेत प्रथम पद्य वाङमय निर्माण होतेव कालांतरानेगद्य वाङमयाचा जन्म होतो. मराठी गद्य वाङमयाचा प्रारंभ महानुभाव पंथानेकेला. महानुभावी गद्य वाङमय धर्मप्रसाराच्या उद्देशानेजन्माला आले. हेगद्य वाङमय मराठीत असून त्यांचेस्वरूप सूत्रात्मक आहे. त्यात धर्मशास्त्राची सुत्रेआली आहेत.

लिळाचरित्र, सूत्रपाठ, पंचवार्तिक यासारखेग्रंथ निर्माण होऊन मराठी गद्याला चालना मिळाली. हेमहानुभावी ग्रंथ १३ व्या – १४ व्या शतकातील आहेत. ह्या वेळी महाराष्टात इस्लामी अमंल सुरू होता. मराठीला उत्तेजन नव्हते. म्हणून मराठी ग्रंथनिर्मिती थांबली. त्या त्या काळात फारशी राजभाषा होती म्हणून फारशी भाषेत ग्रंथ निर्मिती होऊ लागली. सत्ताधिकाऱ्यांनी सांगावेव कारकूनांनी लिहावे. असा हा प्रकार होता. सहाजिकच या पोटार्थी कारकुनांनी धन्याला खुष करण्याकरिता आपल्या धन्याला पराक्रमाच्या अवास्तव घटना वर्णन केलेल्या आहेत. त्यात सत्य कमी व अतिशयोक्ती अधिक अशा ग्रंथांना 'बखरी' असेम्हणतात. थोडक्यात, बखरी म्हणजेराजकीय घडामोडीचेवर्णन व आपल्या स्वामींचा अवास्तव गौरव असलेला मजकूर होय.

मराठी गद्य सारस्वताच्या इतिहासातील बखर वाङमयाचेस्थान महत्त्वपूर्ण असेआहे. एाहिरी कवितेप्रमाणेच इतिहासासोबत तत्कालीन तेजस्वी संस्कृतीच्या जीवनाचा वारसा जतन करण्याचेश्रेय बखरींचेम्हटलेपाहिजे. म्हणून बखर ग्रंथांना 'मराठीशाहीच्या तेजस्वी पराक्रमाचेनंदादीप' असेम्हटलेगेलेआहे. तसेच मराठीतील बखर वाङमय हेएक विकसित कालखंडाचेअपत्य आहे.

**बखर वाङमयाचा अर्थ व स्वरूप :**

खबर (= वार्ता, समाचार वृत्त) या अरबी शब्दाचा विपर्यास होऊन बखर शब्दाची निर्मिती झाली आहे. बक-बकणेम्हणजेबोलणेया धातू पासून बखर शब्दाची निर्मिती झाली आहेअसावी असेइतिहासाचार्य राजवाडेयांना वाटते. त्यावरून फार पुर्वीच्या काळी बखरी, लिहिण्याऐवजी तोंडानेबोलल्या जात असाव्यात असा तर्क करणेभाग पडते. पण बखरीची मूळ कल्पना परकीय असल्यानेराजवाडेयांची वरील व्युत्पत्ती मान्य होणेकठीण ओ. बखर या शब्दाचा रूढ अर्थ राजकीय स्वरूपाचेऐतिहासिक लेख असा आहे. त्यामुळेगद्यात लिहिलेला 'ऐतिह्य वृत्तांत' अशी बखरींची ओळक करून देता येईल.

बखर लिहिण्याचा मुख्य उद्देश हा ऐतिहासिक पुरूषाचा पराक्रम व ऐतिहासिक घटना कथन करणेहा असावा असेस्पष्ट दिसून येते. मुसलमानांमध्येतवारिखा लिहिण्याची पध्दत होती. म्हणून मुसलमानांच्या सहवासाने, त्यांच्या तवारिखा पाहून, मराठ्यांनीही बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला; असेराजवाडेम्हणतात.

**बखर वाङमयाचेस्वरूप किंवा वैशिष्ट्ये :**

बखरीमध्येराजकीय घटना वर्णन केलेल्या असल्या तरी बखर म्हणजेइतिहास नव्ह. त्यात ऐतिहासिकता कमी

आणि काल्पनिकता व अवास्तवता जास्त असते.

ऐतिहासिक दृष्टिनेबखर वाङमयात खालील दोष आढळतात. या दोषांनाच बखर वाङमयाची वैशिष्ट्येअसेम्हणता येईल –

१) बहुतेक बखरी ह्या आपल्या धन्याच्या आज्ञेवरून लिहिलेल्या आहेत. तेलिहिणारेलेखक पगारी नोकर होते. म्हणून स्वाभाविकपणेच त्यात आपल्या धन्याचा फाजील गौरव व पराक्रम वर्णन केलेला असतो. एकूण हेबखर वाङमय स्वंयप्रेरित नसून पर प्रेरित असल्यामुळेत्यात अतिशयोक्ती आणि कल्पनाविलास आढळतो.

२) बखरकार हा कोणतीही घटना प्रत्यक्षपणेपाहणारा साक्षदार नसून म्हणून त्यातील स्थल, काल व व्यक्तिविषयक उल्लेख अनेकदा चुकीचेअसतात.

३) अनेकदा अशा बखरी काल्पनिक व असत्य घटना असतात.

४) बखर पक्षपाती भावनेनेलिहिलेली असते. उदा. बखरकार मुसलमानी असेल तर तोआपल्या पक्षाचेवर्णन करतो. आपल्या धर्माची स्तुती करतोव शत्रू पक्षाच्या यशाची वर्णनेटाळतोअशा बखरीत न घडलेलेपराक्रमही वर्णन केलेलेअसतात.

५) मराठी बखरीत अनेकदा भिन्न-भिन्न पुराणकथेचा व वंशावळीचा उल्लेख असतो. आपला धनी हा पुराणकालीन श्रेष्ठ वंशाचा आहेअसेतोभासवितो.

६) बखर वाङमयात अनेक काल्पनिक कधा, वर्णनेव दंतकथा त्यांचा आधार घेतला जातो. म्हणून त्या ऐतिहासिक दृष्टीनेह्या विश्वसनीय नसतात.

७) बखरकार म्हणजेइतिहासकार नव्हेत्यामुळेतोसत्य संशोधनाचा प्रयत्न करीत नाही. केवळ स्मरणशक्ती देत कथा व ऐकिव माहिती ह्यावर भिस्त ठेवून वर्णन करीत जातो. म्हणून अशा बखरींना इतिहास मानता येत नाही.

बखर वाङमयावरून तत्कालीन भाषेचा व चालिरीतीचा अभ्यास करता येतोआणि बखरी जमा करून ऐतिहासिक घटनेची सत्यसत्यता पारखता येते.

**बखरीचेऐतिहासिक महत्त्व :**

इतिहासच्या दृष्टिकोनातून म्हणजेऐतिहसिक सत्य संशोधनाच्या बाबतीत बखरीला फार महत्त्व देणेचूक आहे. कारण अशा बखरी बहुधा पक्षपाती बुध्दीनेलिहिल्या असतात. बखरकार हेकुणाचेतरी नोकर असल्यामुळेत्याला आपल्या धन्याचा खरा-खोटा पराक्रम वर्णन करावा लागतो. तोतटस्थ वृत्तीनेलिहू शकत नाही. म्हणून बखर वाङमयात पक्षपातीपणा आढळतो.

शिवाय बखरीत स्थल, काल निर्देहशी चुकीचेअसतात. दिलेली माहिती विपर्यस्त, असंबध्द व परस्पर विरोधी असते. तसेच बखरीत कल्पिताचा मालमसाला भरपूर असतो. इतिहासकाराप्रमाणेबखरकाराची भुमिका निष्पक्ष व सत्यसंशोधनाची भूमिका चिकित्सकपणाची नसते. फक्त आपल्या धन्याची किंव स्वपक्षाची फाजील तरफदारी त्यात असते. ती त्यात सत्य आढळत नाही. उलट सत्याचा अपलाभ आढळतो. बऱ्याचशा बखरी स्मरण शक्तीचा उपयोग करून लिहिण्यात आल्या आहेत. त्यात ऐकिव गोष्टीवर जोर दिलेला आहे. घटनांचा कालानुक्रम व जुळणी व्यवस्थित नसते. म्हणून बखरींना ऐतिहासिक महत्त्व देता येत नाही. त्यांना इतिहास म्हणता येणार नाही. फार तर ऐतिहासिक कथा म्हणता येईल. मात्र

तत्कालीन समाज, राजकीय परिस्थिती, लोकाचार व लोकरूढी तत्कालीन भाषा समजून घेण्यासाठी बखर वाङमय फार उपयोगी आहे.

**पेशव्यांची बखर**

**प्रस्तावना :**

कृष्णाजी विनायक सोहनी-विरचित "पेशव्यांची बखर" हा पेशवेघराण्याचा इतिहास होय. त्यात पहिला बाळाजी विश्वनाथ यांच्या व पूर्ववृत्तापासून शेवटचा पेशवा दुसरा बाजीराव यांच्या कारकिर्दीतील मराठी राज्यांच्या नाशापर्यंत सुमारेदीडशेवर्षाचा इतिहास आहे. बखरीची सुरूवात "राजश्रियाविराचित राजमान्य राजश्री श्रीनिवासपंत दाजी, स्वामींचेसेवेंशी सेवक नारोमेघश्याम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती" अशी आहे. काव्येतिहाससंग्रहकार म्हणातात, की ही बखर सदर्हू "वैजनाथ" गावी रा.रा.कृष्णाजी विनायक सोहनी यांनी तोंडी सांगितली व तेथील लोकांपैकी कित्येकांनी ती आदरपूर्वक लिहून घेऊन तिचा संग्रह केला. मूळ बखर कृष्णाजीपंतांनी सांगितली आहे.

**कृष्णाजीपंत विनायक सोहनी / बखरलेखनाकल :**

कृष्णाजी विनायक सोहनी हेप्रस्तुत बखरीचेमूळ कल्पक होत. सदर बखर त्यांनी कुसुरधाराखालील भिवपूरी जवळील वैजनाथ गावी तोंडी सांगितली व तेथील लोकांपैकी काहींनी ती आदरानेलिहिली. कृष्णाजीपंत हेरत्नागिरीनजीक सोमेश्वर या गावचेरहिवासी होते. काव्येतिहास संग्रहकाराच्या मते, त्यांचा कल काल सुमारेइ.स.१८५४-५५ मध्येझाला. त्या वेळी त्यांचेवय सुमारे७०वर्षांचेअसावे. यावरून त्यांचा जन्म इ.स.१७८४-८५ च्या सुमारास म्हणजेसवाई माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दित झाला असेहोते. कृष्णाजीपंत हेपेशवाईत सुभेदारीवर होते. शेवटच्या पेशव्यांचेकारभारी चिंतोवामन देशमुख पावसकर हेत्यांचेआप्त हेते. पंत जटा वाढवून एखाद्या तपस्याप्रमाणेविरक्तपणेआपला काल ईश्वरोपासनेत घालवीत. येथेच त्यांचा इ.स.१८४५-५५ च्या सुमारास काल झाला.

**पेशव्यांचा बखरीच्या प्रती**

ही बखर काव्येतिहाससंग्रहात प्रथम इ.स.१८७८ च्या पहिल्या अंकापासून क्रमश प्रसिध्द झाली. या बखरीच्या एकूण तीन प्रती काव्येतिहास संग्रहकर्त्यास मिळाल्या. त्याचा इतिहास खालील प्रमाणेआहे.

**अ) कल्याण प्रत :**

ही प्रत कल्याण येथील राजश्री वासुदेव पांडूरंग काळेयांजकडील होती. या बखरीचेतीन बंद गहाळ झालेअसून पुढेमध्येच १२१ वा बंद हरवला आहे. ती बखर सुरूवातीपासून बंदांच्या एका अंगानेलिहिता लिहिता २४० बंद पर्यंत जाईल. तेथून बंदांच्या पाठीवर लिहित लिहित पहिल्या बंदापर्यंत आणून संपविली आहे. अशा रितीनेलिहिल्यामुळेपहिलेबंद गहाळ झालेतेव्हा अर्थात पाठीमागील शेवटचेबंद ही त्यांज बरोबर गेले. हितेखर्ची कागदाचे२४० बंद पाठोपाठ आहे. या प्रतीत अक्षर दोन तीन प्रकारचेअसून तेबरेच सुवाच्च आहे. हीत पहिलेपेशवेबाळाजीपंत नान हेआपल्या श्रीवर्धन या मूळ गावाहून निघाल्यापासून इंग्रज सरकारन पुण्यात शनिवारवाड्यावर आपला बावटा चढविला तोपर्यंत हकीकत आहे.

**ब) इंदूर प्रत :**

प्रस्तुत बखरीची ही साद्यंत प्रत इंदूर येथील रा.ब.नीळकंठ जनार्दन कीर्तनेयांजकडील होय. हिजवरून कल्याण प्रतीचेगेलेलेबंद घेतलेआहेत. ही प्रत कल्याण  प्रतीवरून नकलून घेतली असावी असेदिसते. अर्थातच हिचेसर्व बंद शाबूद

असल्यामुळेती कल्याण प्रतीचेबंद गहाळ होण्यापूर्वी उतरून घेतली असावी हेउघड आहे.

**क) भिवपूरीप्रत :**

ही प्रत कुसूरघाटाखालील भिवपूरी येथील करंदीकर यांजकडील रा.आबा अभ्यंकर मुजुमदार राहणार माहीम यांजकडून मिळाली. ही प्रत म्हणजेप्रस्तुत बखरीचा उत्तरार्ध होय. याविशाय भिवपूरी जवळील वैजनाथ येथील रा.रामभाऊ पेठेयांनी याच बखरीची अस्सल प्रत मिळवून देण्याचेअभिवचन काव्येतिहास संग्रहकारास दिलेहोते.

**ऐतिहासिक स्वरूप**

प्रस्तुत बखरीची सुरूवात –श्रीवर्धन येथील बाळाजी विश्वनाथ भट हा जंजिऱ्याच्या हबश्याच्या दहशतीनेतेथून पळून वेळास येथील बाळाजी महादेव भानू यांच्याकडेआला. नंतर तोव त्रिवर्ग बंधू भानू हेरोज गारासाठी तिकडून साताऱ्यास धनाजी जाधवराव यांच्याकडेआलेअशी आहे. शाहू बाळाजीसह खानदेशातून महाराष्टात येऊन साताऱ्यास दि.१२ जानेवारी इ.स.१७०८ पासून राज्य करू लागला. तेव्हापासून दि.३ जून इ.स.१८१८ रोजी बाजीराव मालकमला शरण जाऊन ब्रम्हवर्तास जाईपर्यंतची हकीकत यात आहे. बाळाजी गणेश कारकून कृत पेशव्यांच्या बखरीत मालोजी भोसलेयांच्यापासून इ.स. १७८३ पर्यंत (सवाई माधवराव) इतिहास आहे, तर भट पेशवेघराण्याच्या हकीकतीत बाळाजी पंताचेपूर्वज परश रामपंच भट हेशिवत्रत्रपतीच्या आश्रयाला होते.

**वाङमयीन स्वरूप :**

बखरकार ही सामान्य कारकुनी माणसे. स्वकियांच्या कर्तृत्वाची नोंद करण्याच्या भावनेनेकाही बखरी त्यांनी लिहिल्या वर्ण्य व्यक्ती प्रसंग वा वस्तू यांच्यासंबंधी त्यांना विलक्षण आत्मीयता वाटे. या गोष्टी अर्थातच त्यांच्या अभिमानाच्या होत्या. एखादा बखरलेखक आपलेलेखन करताना त्यात रचनेच्या दृष्टीनेठाकठिकी, सौंदर्य,प्रमाणबध्दता इतयादी गुणांकडेसाहजिकच लक्ष देई. या दृष्टिनेबखरलेखन या अर्थी बखर सजविणेहा शब्दप्रयोग अधिक रूढ असे. बखर लेखनात तिच्या लेखकाचेचातुर्य, प्रामाणिकपणा व बहुश्रुतता ही प्रत्ययास आल्यावाचून राहत नाहीत. बखरनवीस स्वत:च्या कृतीत उत्कटपणेरंगून जातो.

**पेशवेबखरीतील विविध प्रकरणे:**

१. प्रकरण पहिले: बाळाजी विश्वनाथ (इ.स. १७१३ -१७२०)

२. प्रकरण दुसरे
बाजीराव बल्लाळ ऊर्फ रावसाहेब इ.स.१७२०-१७४०

३. प्रकरण तिसरे
बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब इ.स.१७४० -१७६१

४. प्रकरण चौथे
माधवराव बल्लाळ ऊर्फ रावसाहेब इ.स.१७६१ – १७७२

५. प्रकरण पाचवे
नारायणराव बल्लाळ इ.स.१७७२-१७७३

६. प्रकरण सहावे
माधवराव नारायण ऊर्फ सवाई माधवराव इ.स. १७७४-१७९५

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखर गद्य – ऐतिहासिक दृष्टीकोन

प्रा. डॉ. विजय बापू गायकवाड
यशवंतराव चव्हाण कला व वाणिज्य महाविद्यालय इस्लामपूर

१. प्रास्ताविक :-

मराठी साहित्याला बखर वाङ्.मयाच्या रूपाने ऐतिहासिक दस्तऐवजाच्या स्वरूपातील पण ज्याला 'कलात्मक इतिहास' मानावा असा लालित्यपूर्ण वाङ्.मय प्रकार लाभला. 'बखर' या शब्दाचा रूढ अर्थ राजकीय स्वरूपाचे ऐतिहासिक लेखन असा आहे. त्यामुळे गद्यामध्ये लिहिलेला 'ऐतिहय वृत्तांत' अशी बखरीची ओळख करून देता येते. ऐतिहय वृत्तलेखनाच्या गरजेतून मुसलमानामधील तवारिखा लिहिण्याच्या प्रकाराचे अनुकरण करून मराठी बखर वाङ्.मयाची निर्मिती झाली. बखर वाङ्.मयाच्या निर्मितीबद्दल ह. श्री. शेणीलीकर म्हणतात, बखरकरार हे काही त्या त्या राज्याचे अधिकृत इतिहासकार वा वृत्तांत लेखक नव्हते. किंवा स्वयंप्रेरणेने संशोधित इतिवृत्ते लिहून ठेवणारे राजकारणाचे अभ्यासकही नव्हते. कारकूनी पेशाच्या या मंडळींनी आपल्या मालकाच्या आज्ञेवरून तात्कालिक स्वरूपाच्या काही व्यावहारिक कारणांसाठी ते वृत्तांत स्मरणशक्तीवर व सांगोपांगी गोष्टीवर भिस्त ठेवून लिहून काढले.''[१]

बखरवाङ्.मयाचे लेखन स्वयंस्फूर्त नसून परप्रेरित आहे. महाराष्ट्राच्या वैभव ङ्काळात खुद्द छत्रपती शिवाजी महाराज, मराठे सरदार, पेशवे यांच्या पदरी बखरनवीस, चिटणीस असत. आपल्या धन्याच्या आज्ञेवरून त्या राजघराण्याच्या पराक्रमाच्या घडामोडी वीरश्रीपूर्ण शैलीने लिहून काढीत. शिवपूर्वकाळात तेराव्या शतकाअखेरीस महारष्ट्राचे स्वतंत्र नष्ट झाल्यामुळे ऐतिहासक वृत्तलेखन करण्याची प्रथा खंडित झाली होती. शिवकाळात या लेखन प्रकाराचा पुन्हा उदय झाला. रणभूमीवरील पराक्रमातून स्वराज्य स्थापनेची स्वप्न जाणवू लागली. 'बखर लेखनाच्या खंडित परंपरेचा उदय शिवकाळात झाला म्हणून बखर वाङ्.मयाची परंपरा शिवकाळापासून सुरू झाली. असे म्हटले पाहिजे'[२] हे शेणोलीकरांचे मत सार्थ वाटते कारण ''त्यानंतरच्या काळात मराठ्यांच्या इतिहासातील निरनिराळ्या प्रसंगावर दोन अडीचशे बखरी लिहिल्या गेल्याचे राजवाडे सांगतात''[३] राजवाडेंच्या मते या कालखंडात झालेल्या पराक्रमाचा वृत्तांत बखर सदृश्य स्फूट स्वरूपाचा रोजनिशी, टिपणे, हकिकती या स्वरूपाच्या सर्वंकष्टा लेखनाला बखर असा स्थूल अर्थाने शब्द वापरला आहे. पण शिवकालीन बखरीकडे ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहता प्रमाणभूत स्वरूपाचा राजकीय इतिहास म्हणून विशेष महत्त्व देता येत नसले तरी ''गत कालीन लेखकानी राजकीय कथातून रंगविलेली समाजचित्रे या दृष्टीने बखरींना समाजशास्त्रीय संशोधनाचे एक ऐतिहासिक साधन म्हणून स्वतंत्र मूल्य आहे''[४]

२. बखर वाङ्.मयातील ऐतिहासिक मूल्य

बखर वाङ्.मयात तत्कालीन राजकीय जीवनातील घटना प्रसंगाचे चित्रण लालित्यपूर्ण शैलीत केल्याचे जाणवते. बखरीची निर्मिती अशा 'ऐतिह्य वृत्तकथना' च्या भूमिकेतून झाली असल्यामुळे ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीने बखर वाङ्.मयाला पूर्णत: विधसनीयता लाभत नाही. ''स्थलविपर्यास, कालविपर्यास, व्यक्तिविपर्यास प्रसंग आणि कारणविपर्यास, पौराणिक, वंशावळीचे संदर्भ, कल्पित व दंतकथांच्या आश्रयामुळे आलेली अद्‌भुतरम्यता: संदिग्ध स्वरूपाचे लेखन यांमुळे ऐतिहासिक सत्याला अनेकदा बाधा येते. ''[५] इतिहासाचार्य वि. का. राजवाडे व वासुदेव शास्त्री खरे यांनी सर्वच बखरी ऐतिहासिक विधसनीयतेसंदर्भात अप्रमाण ठरविल्या. त्यांनी इतिहास लेखनासाठी बखरीऐवजी अस्सल कागदपत्राच्या संशोधनाकडे आपला मोहरा वळविला. त्यांच्या मते बखरकार हे काही त्या त्या राज्याचे अधिकृत इतिहासकार नव्हते. आपण राजाच्या पदरी नोकर असल्याने व्यवहारिक कारणासाठी राजे लोकांच्या आज्ञेवरून स्मरणशक्तीच्या बळावर त्यांनी त्या राजवटीतील

राजकीय इतिहासाचे प्रसंग वीरश्रीच्या कल्पक रंगछटेने रेखाटले. त्यामुळे त्यातील ऐतिहासिक सत्य दुरावले आहे. बखरकारांनी त्या त्या राजवटीतील राजकीय घडामोडींची जुळणी ढोबळमानाने सुसंगतवार व कालानुक्रमाप्रमाणे केली असल्याने बखर वाड्.मयाला आपण ऐतिहासिक सदरात टाकतो. पण या वाड्.मय प्रकारास इतिहास असे न म्हणता ऐतिहासिक कथा असे म्हणजे जास्त संयुक्तीक ठरेल. बखरकार हा केवळ कथनकार आहे. प्रत्यक्ष पाहिलेल्या व ऐकलेल्या प्रसंगाच्या आधारे आपल्या कल्पकतेचे रंग भरतो. बखरलेखनातील आपली कलात्मकता प्रकट करतो. उदा. रघुनाथ यादव पानीपताच्या बखरीच्या शेवटी 'यथामताने बखर सजवून सेवेशी पाठविली आहे.' असे म्हणतो. या बखरकाराच्या प्रतिक्रियेतून बखरील ऐतीहासिक सत्यापेक्षा कलात्मकता आणि सौंदर्य दृष्टीला प्राधान्य असल्याचे जाणवते. प्राचीनकाळातील बखरकार पौराणिक ग्रंथाच्या पध्दतीने अद्भूत घटनांच्या आधारे बखर लेखन करतात. हा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन शिवकालीन बखरीमध्येही अद्भूतरम्यता, चमत्कार, पौराणिक संदर्भ, साक्षात्कार इत्यादी घटना प्रसंगाचा समावेश झाल्याचे जाणवते. म्हणूनच समकालीन बखरीतील ऐतिहासिक सत्य हे विश्वसनीय ठरत नाही.

बखर वाड्.मयातील इतिहास विषयक ज्ञानाची मर्यादा लक्षात घेऊन मराठी बखरकर्तेश्री. हेरवाडकर बखर वाड्.मयाबाबत म्हणतात बखरीची निर्मिती इतिहास लेखनाच्या भूमिकेतून झाली हे निर्विवाद होय. बखरीतील ऐतिहासिक ''सत्याच्या अपलापामुळे बखरीच्या प्रामाण्याला धोका निर्माण झाला आहे'' हे हेरवाडकरांचे विधान वस्तुस्थितीला अधिक धरून आहे. ''[६]

ह. श्री. शेणोलीकर हेरवाडकरांच्या या विधानाचा आधार घेऊन बखर वाड्.मयातील ऐतिहासिक दृष्टीकोणाबद्दल ते एक समाजशास्त्रीय संशोधनाचे ऐतिहासिक साधन मानतात. बखर वाड्.मयाच्या ऐतिहासिक दृष्टीकोनाचा आढावा घेताना प्राचीन बखरी, शिवकालीन बखरी, पेशवेकालीन बखरी यातील ऐतिहासिक सत्य व सत्याभासाचा वेध घेणे गरजेचे ठरते.

३. बखर वाड्.मय ऐतिहासिक दृष्टिकोन –

'बखर' म्हणजे केवळ इतिहास नसून ऐतिहासिक दृष्टिकोनातून लिहिलेला कलात्मक राजकीय वृत्तांत होय. प्राचीन बखरी पासून अर्वाचीन बखरीतील ऐतिहासिक विश्वनीयतेचा वेध घेताना, बखरीतील ऐतिहासिक सत्याला मर्यादा असली तरी बखर वाड्.मय मूलत: इतिहास लेखनाच्या भूमिकेतून निर्माण झाले हे मान्य करावे लागते.

**A)** शिवपूर्वकालीन बखरीतील ऐतिहासिक प्रामाण्य –

''मराठीतील गद्यमय इतिहास लेखनाची मुहूर्तमेढ रोवण्याचे श्रेय शिवपूर्वकालीन बखरीतील महिकावतीच्या बखरीला आहे. ''[७] रचनाकाळाच्या दृष्टीने ही सर्वात जुनी बखर होय. ही बखर गद्य– पद्यमय स्वरूपाची असून निरनिराळया लेखकांनी वेगवेगळ्या कालखंडात या बखरीचे आज्ञेनुसार लेखन झाले आहे. यामध्ये राजा प्रतापाबिंबापासून (इ.स.११३८) महिबिंब केशवदेव, रामदेव इ. राजवटीपासून इंग्रजांच्या आगमनापर्यंतचा (इ.स. १५००) एकूण सात राजवटींचा इतिहास या बखरीमुळे प्रथम प्रकाशात आला. या बखरीतील संरक्षणव्यवस्था, संरक्षणार्थ निरनिराळ्या महालात ठेवलेल्या सैन्यांच्या व सरदारांच्या यादया, तत्कालीन राजव्यवस्था, जमीन मोजण्याची पध्दती, या बाबी ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. माहिमप्रातांचा व कोकणाचा इतिहास या बखरीमुळे लोकांसमोर आला. या बखरीतील घटनाप्रसंगाची सुसंगती आणि नोंदीची ऐतिहासिक साधनांशी पडताळणी करता बखरीतील घटना प्रसंगाच्या नोंदी बाबत काटेकोरपणा जाणवतो. त्यामुळे ही बखर ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने विश्वसनीय मानावयास हरकत नाही असे ल. रा. नसिराबादकरांचे मत सार्थ वाटते. शिवपूर्वकालीन 'विजयनगरच्या विध्वंसाचा इतिहास' कथन करणारी 'राक्षसतागडीची बखर' ऐतिहासिक विषयाची अभिव्यप्ती या दृष्टीने दर्जेदार ठरते. 'शालिवाहनाची बखर' कृतयुग, शेतायुग, द्वापारयुग आणि कलियुगाची

ISBN 978-93-5196-698-2

पौराणिक माहिती देणारी इ.स. पू. पहिल्या शतकापासून, तिस–या शतकापर्यंतचा तीनशे वर्षाचा प्रदिर्घ कालखंड व्यापणारी अद्‌भूतरम्य असल्यामुळे ऐतिहासिक प्रामाण्याच्या निकषामध्ये ही बखर बसू शकत नाही. शिवकालीन बखरीमध्ये ऐतिहासिक प्रामाण्यवाद आणि विश्वसनीयता बऱ्याच प्रमाणात जाणवते.

ब) शिवकालीन बखरीतील ऐतिहासिक दृष्टिकोन –

शिवकालीन बखरीपैकी 'सभासद बखर' ही समकालीन बखर असून बाकी सर्व शिवचरित्रवर्णनपर बखरी उत्तरकालीन आहेत. समकालीन बखरकारांनी तो काळ प्रत्यक्ष पाहिलेला, अनुभवलेला आहे. त्यामुळे समकालीन बखर ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने विश्वसनीय ठरते. सभासद बखरीचे ऐतिहासिक अधिष्ठान उत्तरकालीन बखरीपेक्षा अधिक दर्जेदार आणि विश्वसनीय आहे. उत्तरकालीन बखरकार ऐतिहासिक कागदपत्रे धुंडाळून गतकाळाचे ऐतिहासिक वर्णन कल्पकता आणि तर्कधिष्टीत स्वरूपाने करतात.

सभासद बखरीतील लेखन राजाराम महाराजांच्या आज्ञेमुळे झाले. शिवरायांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या एका समकालीनाने लिहिलेली ही बखर आहे. बखर लेखनाच्या समाप्तीविषयी बखरकार म्हणतात. 'ही बखन संपूर्ण जाहाली. चैद्ध शुध्द प्रतिपदा. ते दिवशी वर्णन समाप्त जाहाले. ईश्वर संवत्सर मुक्काम चंदी, शालीवाहन शके १६१६''[८] सभासद बखरीतील लेखन आरंभासह इतर घटना प्रसंगांच्य नोंदी तारीख वार नोंदविलेल्या आढळतात. या बखरीत शिवाजीराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी उभारलेली मावळ्यांची संघटना, चार पातशाहींशी दिलेली लढत, स्वराज्य स्थापना, अफझलखानाच वध, शाहिस्तेखानाचे पारिपत्य, आगऱ्याहून सुटका, शिवरायांची शासन व्यवस्था, आरमार स्थापना, शिवरायांचा राज्याभिषेक, व्यंकोजी प्रकरण इ. महत्त्वपूर्ण घटनांचे कथन ऐतिहासिक प्रामाण्य सिध्द करतात. सभासदांनी वर्णन केलेले हे शिवचरित्र केवळ ललित्मय नसून त्यामध्ये शिवरायांच्या पराक्रमाची, गुप्त खलबतांची, युध्दनीतीची ऐतिहासिक वर्णन वाटतात. या ऐतिहासिक वर्णनांना बखरकार वाड्.मयीन वैशिष्टयाने सजवितो त्यामुळे त्यातील ऐतिहासिक प्रामण्य लोप पावत नाही. या ऐतिहासिक घटना प्रसंगांना तत्कालीन सामाजिक श्रध्दांनुसर देवदैवतांच्या जोड दिली आहे. बखरीतील दृष्टांताची जोड दिली आहे. बखरीतील दृष्टांत अद्‌भूतरम्यता वगळता या बखरीतील ऐतिहासिक प्रामाण्य सिध्द होते. या बखरीची निर्मिती इतिहास लेखनाच्या भूमिकेतून झाली असल्याचे सिध्द होते. उत्तरकालीन बखरीमध्ये खंडो बल्लाळ चिटिणीसांची 'शिवदिग्वीजय', चिटणीस विरचित 'शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र इ.'अनेक बखरींचा समावेश होतो. या बखरींचे ऐतिहासिक प्रामाण्य समकालीन बखरींच्या तुलनेत काही प्रमाणात कमी जाणवते तरीही बखरीतून इतिहास लेखनाची भूमिका स्पष्ट होते.

क) पेशवेकालीन बखरीतील – ऐतिहासिक दृष्टिकोन –

पेशवाईतील पानिपतचा रणसंग्राम हा मराठ्यांच्या इतिहासातील पराभवही अभिमानास्पद ठरावा असे क्षात्रतेजाचे स्वतंत्र पर्व होय. मराठ्यांच्या या रणसंग्रामाचे वर्णन 'पानिपतची बखर' भाऊसाहेबांची बखर, होळकरांची थैली, काशिराजाची बखर इ. बखरीतून समग्रपणे सविस्तर हकिकत सांगण्याच्या उद्देशाने केले आहे. पानिपतच्या युध्दानंतर अवघ्या दोन वर्षाच्या आत ही बखर लिहिली गेली असल्यामुळे समकालीन बखर म्हणून तिला ऐतिहासिक महत्त्व आह. ''[९] पानिपत रणसंग्रामाच्या विविध कडा या बखरीतून उजळून निघत असल्याने या बखरीच्या वाचनाने आपणास ऐतिहासिक सत्यापर्यंत पोहोचता येते. ''इतिहासाने मान्य केलेल्या काही सत्याच्या आधारेच या बखरींची भव्य कलात्मक वास्तु उभारली आहे हे अमान्य करता येत नाही.''[१०] पानिपतच्या रणसंग्राम हा इतिहास आहे. या ऐतिहासिक घटनेतील तपशील कमी अधिक असला तरी पानिपतचा संग्राम त्याचा मराठेशाहीवर झालेला परिणाम, त्या संग्रामात विविध ऐतिहासिक

व्यक्तींनी घेतलेल्या भूमिका व केलेला पराक्रम बखरीतील वास्तव आहे. या वास्तवाचे ऐतिहासिक साधनांनी सिध्द झालेल्या ऐतिहासिक सत्याशी जवळचे नाते आहे. बखरीतील लालित्यमय स्वरूपाचे ऐतिहासिक प्रामाण्य मान्य करावे लागते.

४. निष्कर्ष –

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे बखरींना इतिहासाचे साधन ग्रंथ म्हणून मान्यता देत नसले तरी या बखरीतून आपणास इतिहास वजा करता येणार नाही. बखरीची निर्मिती मुळातच तत्कालीन समाजदर्शनासह इतिहास लेखनाच्या भूमिकेतून होते. बखरकारांची भूमिकाच मुळात इतिहास चिकित्साची नाही. त्यामुळे इतिहास लेखनाचे निकष लावता येणार नाहीत म्हणून त्यातील इतिहास नाकारता येणार नाही.

बखरीचा प्रारंभ शिवपूर्वकाळात झाला. त्याचे विशिष्ट ऐतिहासिक प्रामाण्य असणारे वळण शिवकालाने निश्चित केले. ऐतिहासिक विश्वसनीयतेचा विकास पेशवेकाळात झाला, कारण तत्कालीन घडामोडी संबंधीची टिपण, पत्रे, साधने उपलब्ध असल्याने शिवकाळापेक्षा पेशवेकालीन बखरी ऐतिहासिक दृष्टया अधिक विश्वसनीय उतरल्या आहेत.

## संदर्भ सूची


1. प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास – लेखक – डॉ. ल. रा. नसिराबादकर
फडकेप्रकाशन, कोल्हापूर. आवृत्ती ३, जानेवारी १९८८ पृ. २५७
2. प्राचीन मराठी वाड्.मयाचे स्वरूप – लेखक – ह. श्री. शेणोलीकर मोघे प्रकाशन, कोल्हापूर.
आवृत्ती २, जानेवारी १९६७. पृ. ३०२
3. तत्रैव – पृ. ३०२
4. तत्रैव – पृ. ३०६
5. प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास – उनि. पृ. २५७
6. प्राचीन मराठी वाड्.मयाचे स्वरूप – उनि. पृ. ३०५
7. प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास – उनि. पृ. २६०
8. सभासद बखर – संपा. डॉ. यु. म. पठाण स्नेहवर्धन प्रकाशन पुणे. आवृत्ती. १, मार्च २००० पृ. १०
9. प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास – उनि. पृ. २६७
10. भाऊसाहेबांची बखर संपा. डॉ. यु. म. पठाण कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे. आवृत्ती . १ मार्च १९७५ पृ.३

ISBN 978-93-5196-698-2

# मराठी बखर गद्यः वाङ्मयीन दृष्टीकोन

प्रा.महादेव ज.जाधव
मराठी विभाग प्रमुख, विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे

प्रस्तावना

मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात बखरीला वाङ्मय म्हणावे की इतिहास याविषयी मतप्रवाह दिसतात. पण बखरीचा एकूण आशय व अभिव्यक्तीचा विचार केल्यास आपल्याला बखर हा इतिहास नसून बखर हा वाङ्मयाचा प्रकार आहे निर्विवाद मान्य करावे लागते.

बखरीचा वाङ्मयीनदृष्ट्या विचार करताना आपल्या बखरीमधील आशय, व्यक्तिचित्रणे, वर्णनशैली, स्थळवर्णने, समाजजीवन, भाषाशैली यांचा विचार करावाच लागतो. हे मुद्दे बखरीचा वाङ्मयीन दृष्टीकोन व्यक्त करण्यास निश्चितच मदत करतात.

''बखर'' शब्दाचे मूळ

1) बक-बकणे बोलणे या धातूपासून बखर शब्द - इतिहासचार्य राजवाडे.

2) बखैर - बखेर - बखर अशा पायऱ्यांनी बखर शब्द निर्माण - प्रा.पा.ना.कुलकर्णी

3) तर 'खबर' या अरबी शब्दामध्ये वर्ण विपर्ययाची प्रक्रिया होऊन बखर शब्द निर्माण.

वरील दोन उपपती पेक्षा तिसरी उपपती पटणारी व स्विकारहार्य आहे असे वाटते.

बखर एक वाङ्मय प्रकार

मराठी साहित्यामध्ये कथा, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, नाटक या वाङ्मयाप्रमाणेच 'बखर' हा सुद्धा वाङ्मयाचा प्रकार मानला जातो. कारण ललित साहित्यामध्ये आढळणारे बहुतांशी गुण हे बखरीमध्ये दिसून येतात. म्हणूनच बखर हा एक वाङ्मय प्रकार मानला जातो.

मराठी बखर गद्य

डॉ.हेरवाडकरांनी मराठी बखर या आपल्या पुस्तकात तपशिलवार अध्ययन केले आहे. यामध्ये त्यांनी सर्व बखरींचे विषयानुसार वर्गीकरण करून एकंदर १४ प्रकारात बखर वाङ्मय समाविष्ट केले आहे. (भाऊसाहेबांची बखर पृष्ठ ६)

डॉ.श्रीधरराव कुलकर्णी यांनी 'प्रेरणा आणि परंपरा' यांचा शोध घेण्याच्या दृष्टीने पुढील पाच प्रकारात बखर वाङ्मयाचे वर्गीकरण केले आहे. १) चरित्र आध्यानपर, २) प्रसंगवर्णनपर, ३) वार्तापत्रे, ४) उपदेश प्रधान परसाहित्य, ५) सांप्रदायिक व भक्तिपर इ. कुलकर्णी यांनी केलेल्या वर्गीकरणामध्ये बहुतांशी बखरीचा समावेश करता येऊ शकेल.

बखरीचे वाङ्मयीन दृष्टीने विवेचन

बखर म्हणजे इतिहास नव्हे तर ऐतिहासिक सत्याचा धागा पकडून आपला कलात्मक अविष्कार करणे होय. मराठी बखरींचे महाराष्ट्राच्या इतिहासाशी आणि विशेषतः मराठ्यांच्या इतिहासाशी आशयांच्यादृष्टीने समांतर स्वरूपाचे नाते आहे. पण म्हणून सर्व ऐतिहासिक पातळीवरचे लिखाण हे बखर ठरू शकत नाही. बखरीचा नेमकेपणा सांगताना अभ्यासकांचा गोंधळ झालेला आहे. तरीही बखरचे नेमके लक्षण सांगताना म्हणावे लागते. ऐतिहासिक साधनांचा आधार घेऊन मानवी भावभावनांचे विचार-विकारांचे अविष्करण म्हणजे बखर होय. बखरींमधील आशय बखरींमधील आशय हा ऐतिहासिक सत्यावर आधारित एखादी व्यक्ती, घटना, प्रसंग असतो.

उदा. भाऊसाहेबांची बखर –

ऐतिहासिक तपशीलच्या दृष्टीने शाहू महाराजांच्या निधनापासून पहिल्या माधवराव पेशव्यांना पेशवाईची वस्त्रे मिळेपर्यंतच्या कारकीर्दीतील उत्तरेकडील मराठ्यांच्या राजकारणाचा इतिहास यामध्ये आहे. पानिपतच्या रणसंग्राम हा तर या बखरीचा गाभा आहे. भाऊसाहेब व दत्ताजी शिंदे यांचा पराक्रम कथन केले आहे.

आज्ञापत्राची बखर

शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे विश्लेषण करणारा हा ग्रंथ आहे. त्याची नऊ प्रकरणे असून प्रत्येकात राज्याचे एक एक अंग वर्णिले आहे. शिवाजी महाराजांचे राज्य शिव राज्यावरील संकटाचा प्रतिकार, राजकर्तव्ये, प्रधान, साहुकार, वतनदार, वृत्ति, दुर्ग, आरमार याविषयी बारकाव्यासह विवेचन आज्ञापत्रात केले आहे.

सभासदांची बखर

शिवकालातील शिवकालीन विषयावरील हे पहिले चरित्र होय. शिवचरित्रातील घटना हा या बखरीचा विषय असून सुरुवातीला शिवाजीच्या पुर्वजांची म्हणजे मालोजी, विठोजी, शहाजी भोसले यांची माहिती दिली आहे. शिवाजी महाराजांच्या जीवनावरील २४३ प्रसंगापैकी महत्त्वाचे ७१ प्रसंग येथे सांगितले आहेत.

त्यामुळे सभासदांची बखर यामध्ये पानिपतचा रणसंग्रहामाची घटना, आज्ञापत्राची बखरीमध्ये शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराची विश्लेषण करणारा ग्रंथ आणि सभासदाची बखर किंवा शिवछत्रपतींचे चरित्र यामध्ये शिवाजीच्या जीवनातील घटना प्रसंग यामध्ये आले आहेत.

आशयाच्यादृष्टीने या बखरी स्वयंपूर्ण बनले आहेत, असे म्हणावे लागते.

व्यक्तिचित्रणे / स्वभावचित्रणे

बखरीमध्ये बखरकाराने व्यक्तिचित्रणे किंवा स्वभाव चित्रणाचे कौशल्य हे त्या बखरीतील व्यक्तींच्या स्वभाव चित्रणातून प्रकट झाले आहे. कोणत्याही बखरीमध्ये व्यक्तिचित्रणे असतातच. यामध्ये प्रधान व्यक्तिचित्रणे व गौणव्यक्तिचित्रणे असे विभागणी केली जाते. तर याचबरोबर पुरुष व्यक्तिचित्रणे व स्त्रीयांची व्यक्तिचित्रणे अशाही प्रकारे विश्लेषण केले जाते.

यामध्ये बखरीचा नायक, त्याचा स्वभाव, पोषाख, कर्तृत्व, त्याचे इतरांशी असणारे संबंध त्याचा गौरव हा करण्याचा प्रयत्न केलेला असतो. तर गौण व्यक्ती चित्रणाच्या माध्यमातून नायकाचे कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी पोषक वातावरण तयार केले जाते. यामधील स्त्रीयांच्या व्यक्तिरेखा या पुरुषांच्या पराक्रमाने व त्यांच्या उध्दतेचे दर्शन घडविण्यासाठी मदत करणाऱ्या अशा चित्रीत केलेल्या असतात व त्याचे गुणगौरव करण्याच्या निमित्ताने बखरींची निर्मिती झाली आहे. असे खालील उदाहरणावरून स्पष्ट होते.

प्रधान्य व्यक्तिचित्रणे

'भाऊसाहेबांच्या बखर' मधील भाऊसाहेब हे अर्ध्या बखरीच्या वृत्तांतपर्यंत कोठेही दिसत नाही. पण भाऊसाहेबांचा प्रवेश हा उत्तरेकडील मोहिमेवर जाण्याच्या निश्चयाने होतो व त्यातून त्याचे धाडस, लढण्याची जिद्द प्रकट होते. भाऊसाहेबांच्या कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी अनेक घटना, प्रसंग व व्यक्तिमत्त्वाचे वर्णन येते.

'सभासदांची बखर' या बखरील शिवछत्रपतींचे चरित्र असेही संबोधले जाते. यामध्ये शिवाजी महाराजांच्या

ISBN 978-93-5196-698-2

जन्मापूर्वीपासून ते शिवाजी महाराजांच्या देहावसनापर्यंतचा वृत्तांत या बखरीमध्ये आहे. शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचा आलेख रेखाटताना बखरकार कृष्णाजी अनंत सभासद यांनी शिवाजी जन्म, बारा मावळे काबीज, पुरंदर घेतला, जावळी काबीज, संभाजी जन्म,आदिलशहाचा शहाजीस जाब, अफजलखान भेट, शाहिस्तेखानाची बोटे तोडली, जयसिंग-शिवाजी भेट, सुरतेची लूट अशा अनेक प्रसंगातून व व्यक्तिचित्रणातून शिवाजी राजाच्या कर्तृत्वाचा उल्लेख केला आहे.

आज्ञापत्राच्या बखरींमधूनही शिवाजी राजांच्या राजनिती विषयक विचार प्रकट केले आहेत. यामधील प्रधान , वतन व वृत्ती, अर्थव्यवस्था, संरक्षण व्यवस्था, आरमार या माध्यमातून शिवाजीच्या आदर्श राज्याची संकल्पना सर्वांना समजावी व शिवाजीचे कर्तृत्व सर्वमान्य व्हावे या उद्देशाने हे व्यक्तिमत्त्व चित्रीत केले आहे.

अशाप्रकारे प्रधान व्यक्तिचित्रणे चित्रीत करताना गौण व्यक्तीचित्रणे, घटना, प्रसंगाचा वापर केला आहे हे मान्य करावे लागते.

गौण व्यक्तीचित्रणे

भाऊसाहेबांच्या बखरीमध्ये मल्हारराव होळकर, दत्ताजी शिंदे, जयाप्पा शिंदे, जनकोजी शिंदे, विश्वासराव रघुनाथ दादा, बळवंतराव मेहंदळे, नजीबखान, अबदाली इ. व्यक्तीची चित्रणे आली आहेत पण ती प्रमुख व्यक्तिमत्त्व असणाऱ्या भाऊसाहेबांपेक्षा नक्कीच दुय्यम / गौण आहेत.

सभासद बखरीमधील, अफजलखान, शाहिस्तेखान, नेताजी पालकर, मुरारबाजी मार्झाराजा जयसिंग, औरंगजेब या व्यक्तिरेखा शिवाजींचे कर्तृत्व अधोरेखित करण्यासाठीच बखरीमध्ये आल्या आहेत.

'आज्ञापत्र' बखरीमधील प्रधान, साहूकार, वतनदार ही व्यक्तीचित्रणे दुय्यम स्वरूपात येऊन याच बखरीमधील नायक व्यक्तीमत्त्व साकारण्यासाठी मदत करणारी आहेत.

स्त्रीयांची व्यक्तिचित्रणे

बखरीमधील स्त्रीयांची व्यक्तिचित्रणे ही बखरीमधील नायकाचे कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी, वातावरण निर्माण करण्यासाठीच निर्माण झालेल्या दिसतात. बहुतांशी व्यक्तिचित्रणेही दुय्यम / गौण स्वरूपचित्र आहेत.

'भाऊसाहेबांच्या बखरीं' मधील मल्हाररावांची पत्नी गौतमाबाई, बळवंतराव मेहंदळे यांची पत्नी, जनकोजीची पत्नी काशीबाई, मलकाजमानी, भाऊसाहेबांची पत्नी पार्वतीबाई इ. स्त्रियांची स्वभावचित्रणे बखरकाराने अत्यंत कलात्मक पद्धतीने रंगविली आहेत. पण एकूण बखरींमधील त्यांचा परिणाम गौणच स्वरूपाचा आहे.

बखरकाराची वर्णन शैली

प्रत्येक बखरीमध्ये बखरकार आपल्या लेखनात समर्पक पौराणिक दृष्टांत देतो त्याचप्रमाणे. एखाद दुसऱ्या वाक्यात प्रसंगावर अनुरूप भाष्य करण्याचाही विशेष बखरीत सर्वत्र आढळतो. त्या ठिकाणी समर्थक शब्दयोजना आणि मार्मिक टीका यांचे मोठे मनोज्ञ मिश्रण असते. नमुन्या दाखल काही उदाहरणे - नजीबखानाने उत्तरेकडील अनेक सरदारांना मराठ्यांपासून फोडण्यासाठी जी उठावणी केली त्याचे वर्णन, ''तमाम गारुडी सन भारितो तसा प्रकार केला'' (भाऊसाहेबांची बखर - पृष्ठ - २७), प्रधानाचे महत्त्व सांगताना त्याचे केलेले वर्णन ''प्रधान म्हणजे राज्य लक्षणगृहाचे स्तंभ आहेत, प्रधान म्हणजे नृपसत्ताप्रसारक, प्रधान म्हणजे प्रजापालनधर्म संरक्षणाचे अध्यक्ष किंबहुना प्रधान म्हणजे इहलोकी राज्यकृत्य संपादनामुळे नृपाची विश्वात'' (आज्ञापत्र पृष्ठ ६५),शाहिस्तेखानाची बोटे तोडले या प्रसंगाचे वर्णन, ''शास्त्राखानाची तीन बोटे तुटोन

गेली. उजवा हात थोटा जाहाला. वरकडही कित्येक लोक गेले. नवाब दहशत खाऊन पळोन दिल्लीस चालिला.'' (सभासद बखर पृष्ठ – ४४)

अशी भरपूर उदाहरणे नमूद करता येतील पण वर्णन करताना कमीत कमी शब्दात, अलंकाराचा वापर करून वर्णन केले आहे. हे बखरकारचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये मानावे लागेल. याचबरोबर युद्धाची वर्णन हे बखरकारांचे कौशल्य तर सर्व बखर वाङ्मयात अद्वितीय आहे.

स्थळवर्णने

बखरींमधील इतिहास प्रसिद्ध स्थळाची वर्णने हा महत्त्वाचा विशेष होय.

आगऱ्याच्या किल्ल्याची अभेद्यता वर्णन करताना बारीक सारीक तपशील देऊन बखरकाराने किल्ल्याची दुर्गमता पटवून दिली आहे.

''आगरियाचा किल्ला यमुनेच्या तीरी आहे. येकींकडून यमुनेचा खंदक व येकीकडून खणून दोही तोंडी यमुनेस मिळवून खंदकात पाणी विपुल. दरबाजियापुढे खंदकावरील पल्ल्यावरून जावे–यावे. फल्या काढल्यावर यत्न नाही. तो किलाकेवल असाध्य. येकात येक पाच परीघ. किल्ल्यात दर परिघास दोनशे तोफा व सिवाय धाकटी यंत्रे. आज्ञा किल्ल्यावरी बारासे तोफा दारुगोळा वगैरे सरंजाम पोक्त. केवल दुर्ग अवघड. आगरियाप्रमाणे भूईकोट किला कोठे उपमेस नाही'' (भाऊसाहेबांची बखर पृष्ठ–३३)

दुर्गांचे महत्त्व वर्णन करताना ''संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्ग नसतां मोकळा देश परचक्र येताच निराश्रय प्रजाभग्न होऊन देश उद्धस होतो'' (आज्ञापत्र, पृष्ठ ७९)

अशाप्रकारे ऐतिहासिक स्थळांच्या वर्णनातून डोळ्यासमोर प्रतिमा उभा करण्याचा बखरकारांचा प्रयत्न अतिशय वाखाणण्याजोगा आहे.

बखरीतील समाज जीवन

बखरकाराला प्रामुख्याने एका विशिष्ट कालखंडातील राजकीय इतिहास लिहून कळवावयाचा असल्याने तत्कालीन समाज जीवनाची सर्व अंगोपांगे त्यात प्रतिबिंबित होण्याची कोणीच अपेक्षा धरणार नाही. तरीही प्रसंगोपात सामाजिक चालीरिती, समजुती यांचे निर्देश अनेक बखरीत आलेले आहे.

''पुत्रप्राप्तीसारख्या आनंदाच्या प्रसंगी हत्तीवरून साखर वाटीत आणि तोफा उडवीत'' (भाऊसाहेबांची बखर पृष्ठ ८८), ''रंगपंचमी सारखा सण दरबारातील सर्व सरदार एकत्र येऊन उत्साहाने साजरा करीत , त्यावेळी नृत्यगायनाचे ही कार्यक्रम होत.'' (पृष्ठ ९७)

''धर्मार्थ भूमिदान देणे याचे पुण्य अनंत आहे. परंतु धर्मांत अधर्म, अधर्मांत धर्म ही धर्माची सुक्ष्मता बरी शास्त्रात विचारून धर्मार्थ भूमि देणे ते देशकाल पात्र पाहून द्यावी.'' (आज्ञापत्र पृष्ठ – ७५)

''मराठमोळ्या स्त्रिया चारचौघात उघडपणे वावरत नसत, अगदी अपरिहार्य झाले तरच तसा प्रसंग येई, हे भागीरथी बाईच्या वागण्यावरून दिसते. मृत्युसारख्या प्रसंगी मात्र अशा उच्च भरातील स्त्रियाही बाडाचे बाहेर येत. दत्ताजी शिंदे गेल्याचे कळताच भागीरथीबाई व कासीबाई धावत आल्या. त्याचे वर्णन करताना उभयता महाराष्ट्र धर्म विसरून आल्या असे बखरकार नमूद करतो'' (भाऊसाहेबांची बखर, पृष्ठ ८६) अशाप्रकारे बखरीतील समाजजीवन चित्रित केले आहे.

बखरींचे भाषा – विशेष

ISBN 978-93-5196-698-2

बखरींची भाषाही अठराव्या शतकाच्या विदग्ध मराठी गद्याचा एक प्रातिनिधीक नमुना आहे. संत काव्य आणि पंडिती काव्य यांचे काही विशेष होऊन या सुमारास शाहिरी काव्य जसे भरभराटीस आले, त्याचप्रमाणे संस्कृतची प्रौढी आणि फारसीया धारदारपणा यात मऱ्हाटी वळण मिसळून बखरकारांनी एक ढंगदार अशी भाषाशैली निर्माण केली आहे. मराठी वळणाचे शब्द, वाक्यप्रयोग आणि म्हणी च्या वापरामुळे बखरींना एक वेधकता निर्माणत झाली आहे.

सुभाषिते, म्हणी, दोहरे

सुभाषिते, म्हणी, दोहरे यांच परिणामकारक वापर बखरकाराने बखरीमध्ये केला आहे. उदा. भाऊसाहेबांची बखर –स्त्रीबुद्धि ः प्रल्यंगता (९२) कर्मणी गहना गति ः (१४०) हिंमत मर्दा मदद खुदा (५६) थेक आणि चूक तो बारा बरसकी हयात (१०८) मुरगी मारा बचे दानादान (११६)

जलकी शोभा कमल है, दलकी शोभा पील
धनकी शोभा धरम है, कुलकी शोभा शल

दत्ताजीच्या मृत्युनंतर कठोर निग्रहाने शोक आवरणारी भागीरथीबाई –

मेरे मन मे कुछ और कर्ता के कुछ और
उधो माधो कहे झुरी मनकी दौरा (८३)

आज्ञापत्रातील काही उदाहरणे – ''राजेलोकी बहुत सोसक असावे'' (पृ.६३), ''खजीना म्णजे राज्याचे जीवन'' (पृ.५९), ''संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग'' (पृ.७६), ''साहूकार म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा'' (पृ.६९)

अशाप्रकारे समर्पक वापर केला आहे असे दिसते.

शब्दसंग्रह

बखरीतील शब्दांची वर्गवारी केली म्हणजे तत्सम शब्द, ततभव शब्द आणि फारसी, अरबी शब्द असे तीन प्रकार मुख्यत्वे आढळून येतात.

अप्रत्यास (सहज), अभिधान (रुठ नाव), अशुद्ध (स्वतः), उपरांतिक (नंतर), फलादेश (परिणाम), क्षिती (विषाद) इ.

संस्कृत शब्द

शब्दांचे लेखन अत्यंत भ्रष्ट स्वरूपात झाले आहे. आन्न, आन, (अन्न), कत्रिम (कृत्रिम) , त्रप्त (तृप्त) इ.

मराठी शब्द

मराठी शब्दसंग्रहावरील संस्कृतचा वरचष्मा, फारसी, अरबी भाषांतील हजारो शब्द मराठी भाषेत जबरदस्तीने शिरले आहेत. आमुरदा (त्रस्त, खिन्न), इजारा (खंड, मुक्ता),बेजान (ठार), मालियत (उत्पन्न)इ.

त्यावेळेस हे शब्द प्रचलित असले तरी कालांतराने लुप्त झाले आहेत.

वाक्प्रचार

शब्दसंग्रहाच्या विविधतेपेक्षा बखरीतील वाक्प्रचाराचे वैभव अधिक संपन्न आहे.

अगत्य पडणे (पाठिशी घालणे), अन्नाचे खोबरे होणे (अन्न दुर्मिळ होणे),आग्नप्रसाद देणे (अत्यंसंस्कार करणे), आडविहीर होणे (दोन्ही बाजूंनी अडचणीत येणे) इ.

विशिष्ट परिणामाच्या दिशेने झालेल्या या लेखनाचे अंग म्हणून ऱ्हेटरिकल भाषेचा अवलंब या विशेषांचा निर्देश करता येईल.

अशा प्रकारे सुभाषित, म्हणी, दोहरे, शब्दसंग्रह, वाक्प्रचार, ऱ्हेटरिअल भाषा अशा प्रकारे बखरींमधील भाषेचे विशेष स्पष्ट करता येतील.

समारोप

मराठी बखर गद्यः वाङ्मयीन दृष्टीकोनातून अभ्यासत असताना बखर हा एक वाङ्मयाचा प्रकार आहे हे मान्य केल्यानंतरच त्यामधील आशय, व्यक्तीचित्रणे, वर्णनशैली, समाजजीवन, भाषाशैली यांचे विशेष पाहिल्यानंतर आपल्याला बखर इतिहास नसून ऐतिहासिक सत्याचा बागा पकडून आपला कलात्मक अविष्कार करणारा हा वाङ्मय प्रकार आहे हे स्पष्टपणे जाणवते. म्हणूनच मराठी बखर गद्य हे वाङ्मयीनदृष्ट्या स्वयंपूर्ण आहे, असे म्हणावे लागते.

निष्कर्ष

1) इतर उपपत्तीपेक्षा 'खबर' या अरबी शब्दामध्ये वर्ण विपर्ययाची प्रक्रिया होऊन 'बखर' हा शब्द निर्माण झाला.

2) इतर वाङ्मय प्रकाराप्रमाणे बखर हा एक वाङ्मय प्रकार आहे.

3) मराठीतील सर्व बखरी या आशयाच्या दृष्टीने स्वयंपूर्ण आहेत.

4) बखरीमधील व्यक्तिचित्रणे हा बखरीमधील महत्त्वाचा मूलभूत घटक आहे.

5) बखरींमध्ये घटना प्रसंगाचे वर्णन करताना समर्पक शब्दयोजना आणि मार्मिकरित्या त्यांचे मनोज्ञ मिश्रण आढळते.

6) बखरींमधील इतिहासप्रसिद्ध स्थळाची वर्णने ही महत्त्वाचा विशेष आहे.

7) बखरींची भाषा ही अठराव्या शतकातील विदग्ध मराठी गद्याचा एक प्रतिनिधीक नमुना आहे.

8) सुभाषित, म्हणी, दोहरे, शब्दसंग्रह, वाक्प्रचार, ऱ्हेटरिकल भाषा वापर हे बखरींचा विशेष आहे.

संदर्भ ग्रंथ

1) विलास खोले (संपा), आज्ञापत्र, लोकवाङ्मयगृह, मुंबई.
2) मु.श्री.कानडे (संपा), भाऊसाहेबांची बखर, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे.
3) र.वि.हेरवाडकर (संपा), शिवछत्रपतींचे चरित्र (सभासद बखर), व्हीनस प्रकाशन, पुणे.
4) यू.म.पठाण (संपा), भाऊसाहेबांची बखर, कॉन्टिन्टेल प्रकाशन, पुणे.
5) डॉ.र.वि.हेरवाडकर, मराठी बखर, व्हीनस प्रकाशन, पुणे.